# उल्हासनगर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2014-2015

सह संचालक, मनपा लेप,उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई

रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे उल्हासनगर महानगरपालिका यांनी 2014-2015 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

उल्हासनगर महानगरपालिका 2014-2015 वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल.

जा.क्र.स्था.18/ब/उल्हास.मनपा/लेपअ 2014-15/ ४०८

सह संचालक (म.न.पा.ले.प.)
स्थानिक निधी लेखापरीक्षा
7 वा मजला,रायगड भवन
सी.बी.डी. बेलापुर,
नवी मुंबई- 400 614.
दिनांक:- 30 NOV 2017.

प्रति,
आयुक्त,
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर.

उल्हासनगर महानगरपालिकेचे 2014-2015 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण श्रीम. अश्विनी आनंद भोसले, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (म.न.पा.ले.प.), नवी मुंबई यांच्या पथकाने दिनांक 25/04/2016 ते दिनांक 13/01/2017 या कालावधीत पूर्ण केले आहे.

श्रीम. अश्विनी आनंद भोसले, सहाय्यक संचालक, (म.न.पा.ले.प.), उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी सदर अहवालाचे पुनर्विलोकन केले असून श्री. मंगेश ना. गावडे, उप संचालक (म.न.पा.ले.प.), उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी दिनांक 10/10/2017 रोजी श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे समवेत सदर अहवालावर चर्चा करुन लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण केले आहे.

लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी उल्हासनगर महानगरपालिकेचे कामकाज पहात होते.

| अ.क्र | पदाधिकारी / अधिकारी | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | श्रीम. आशा राजु (जीवन) इदनानी | महापौर | 01/04/2014 ते 03/10/2014 |
| 2 | श्रीम. अपेक्षा विकास पाटील | महापौर | 04/10/2014 ते 31/03/2015 |
| 3 | श्री. बालाजी खतगांवकर. | आयुक्त | 01/04/2014 ते 31/03/2015 |

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ........ 1

**I PART I : भाग १ ........ 3**

मागील लेखा परीक्षण अहवाल ........ 3

**PART II ........ 9**

**कलम ९ अ खालील आक्षेप ........ 10**

1 उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2014-15या आर्थिक वर्षाची अर्थसंकल्पीय निरीक्षणे व आर्थिक स्थितीवरील भाष्य 11

2 31 मार्च - 2015 चे बँक ताळमेळ पत्रक तयार न केल्याबाबत ........ 18

3 जल उपकर (प्रदूषण व प्रतिबंध नियमन) अधिनियम 1977 नुसार आकारलेला जल उपकर विहित कालावधीत भरणा न केल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाने आकारलेल्या रु.57,78,051 दंडनीय व्याजबाबत. ........ 19

4 कॅम्प 1 ते 3 व कॅम्प 4 व 5 मधील तीव्र पाणी टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा करणेसाठी भाडे तत्वावर 7000 लिटर क्षमतेच्या टँकर पुरवठा करणेसाठी काढलेल्या दोन निविदेतील अनियमितता. ........ 21

5 कॅम्प 1 ते 3 मधील पाणीपुरवठा दैनंदिन देखभाल,दुरुस्ती व वितरण व्यवस्थेसाठी मिस्त्री व मजूर पदाचे कर्मचारी 01.06.2012 ते 01.12.2013 या सहा महिने कालावधीसाठी पुरवठा करणे या कामातील अनियमितता.... 25

6 कॅम्प 4 व 5 करिता जि.आय.पाईप, व्हॉल्व्हज व स्पेशियल्स चा पुरवठा करणे कामातील उणीवाबाबत. ........ 27

7 महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी विविध व्यासाच्या जि.आय.जलवाहिन्या नवीन टाकणे तसेच जुन्या जलवाहिन्या काढून नवीन जि.आय.जलवाहिन्या टाकणे या मजूर कामगार सोसायटी मार्फत केलेल्या कामातील अनियमितता. ........ 29

8 उल्हासनगर मनापांतर्गत एच.टी.पंपिंग स्टेशन चालविणेसाठी अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरविणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितांबाबत ........ 32

9 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पूर्ननिर्माण अभियान (JNNURM) योजनेच्या रोखवहीची पडताळणी करता आढळून आलेल्या अनियमितताांबाबत ........ 35

10 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) योजनेतून हाती घेतलेल्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामावर नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.टंडन अँड असोशिएटस यांना केलेल्या सल्लागार फीच्या प्रदानातील अनियमितता. ........ 37

11 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) योजने अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या काम- 29 व्या धावत्या देयकाअखेर खोदाईतून निघालेल्या साहित्यापैकी कामात वापरलेल्या साहित्य वगळता शिल्लक राहिलेल्या साहित्याची रु.49,76,368 ची जादा वाहतूक दर्शवून प्रदान करणे व इतर अनियमितता बाबत. 40

12 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) योजने अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या काम-निविदा अट क्र.38 नुसार कामातील बाबींच्या विहित परिमाणाच्या पेक्षा जादा परिमाणाचे प्रदान चालू दरसूचीतील दरापेक्षा 6.014% जादा दराने केल्याने झालेल्या रु.51,44,635 च्या जादा खर्चाबाबत. ................42

13 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) योजने अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या काम- लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध न करून देणेच्या व 21 व्या धावत्या ते 29 व्या धावत्या देयकाद्वारे केलेल्या प्रदानातील अनियमितता बाबत. ..........................................................45

14 शिक्षण विभागाच्या रोखवही व तिन खात्यावरील शिलकाबाबत बॅक ताळमेळ न घेणे व इतर अनियमितता बाबत. 50

15 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी शैक्षणिक सहली आयोजित करणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितता. ..........................................................53

16 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2013-14 व 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी वह्या पुरवठा करणे निविदेतील अनियमितता..........................................................55

17 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2013-14 व 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी दफ्तर पुरवठा करणे निविदेतील अनियमितता..........................................................58

18 पूर्व प्राथमिक (बालवाडी) वर्गास ताई-शिक्षिका पुरवठा केलेबाबतच्या कामात अनियमितता झालेबाबत. ........62

19 भविष्य निर्वाह निधीची बॅक खाती व विनावापर गुंतुन राहिलेल्या शिल्लक रकमेबाबत. ..............................64

20 भविष्य निर्वाह निधी लेख्यातील अनियमिततेबाबत. ..........................................................65

21 दि. 01/11/2005 नंतर नियुक्त कर्मचा-यांना अंशदान निवृत्ती वेतन योजनेऐवजी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देण्याबद्दल. ..........................................................68

22 पारगमन शुल्क (ESCORT FEE) वसुलीसाठी अभिकर्ता नेमणेसाठी मागविलेल्या निविदेतील अनियमितता. 69

23 स्थानिक संस्था कर विभागास भांडार विभागाकडून वसुलीसाठी वापरणेस दिलेली पारगमन शुल्क पावती पुस्तके व सामान्य पावती पुस्तके तपासणीस उपलब्ध न होणे बाबत. ..........................................................72

24 स्थानिक संस्था कराच्या म.न.पा.कडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रात (ई-2) नमूद भरलेल्या कराची भरणा चलने नस्तीसोबत नसणेबाबत. ..........................................................74

25 स्थानिक संस्था कर विभागाचे लेखे लेखापरीक्षणात उपलब्ध न झाले बाबत.................................................77

26 स्थानिक संस्था कराच्या वसुलीची प्रभावी प्रभावी अंमलबजावणी न केल्याने महानगरपालिकेस कराचा अपेक्षित महसूल प्राप्त न झालेबाबत..........................................................79

27 शासनाची मंजुरी न घेता महानगरपालिका सदस्यांना वाढीव बैठक भत्ता प्रदान करणेच्या अनियमिततेबाबत. 80

28 स्थायी समितीच्या सभा प्रत्येक आठवड्यास न घेणेबाबत व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 73 (ड) नुसार केलेल्या संविदांची माहिती स्थायी समितीस न कळविणे बाबत.................................................82

29 विधि विभागाचे लेखे तपासणीस उपलब्ध न झालेबाबत. ..........................................................83

30 2014-15 मध्ये जंतूनाशक / किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक औषधे खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत. ....84
31 2014-15 मध्ये सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत. ....85
32 2014-15 मध्ये नागरी सुविधा केंद्र विभागाने 1) रायटिंग डेसक व खुर्ची 2) मॉडम, इंटरनेट केबल (फायबर) खरेदी मध्ये अनियमितता झालेलाबाबत....87
33 निर्मल एम.एम.आर.डी. योजना अंतर्गत केलेल्या कामाबाबत खर्चाचे अभिलेखे व त्या अनुषंगाने ठेवलेल्या नस्त्या लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिले नसलेबाबत. ....88
34 प्रभाग समिती 1,2 व 3 मध्ये पावसाळयापूर्वी,पावसाळयानंतर पडलेले खड्डे डांबराने भरणे व पॅचवर्क करणे कामातीळ अनियमिततेबाबत....90
35 उल्हासनगर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता इमारती, भाजी मार्केट गाळे, शौचालय एसटीडी/पीसीओ, गटई कामगार, व्यवसाय बुथ, मैदाने, मोकळी जागा वगैरे यांची थकबाकी 2013-14 अखेर थकित व 2014-2015 मधील चालू थकबाकीची रक्कम वसुल केली नसलेबाबत. ....93
36 उल्हासनगर शहरातील गरीब व गरजू महिलांना स्वयरोजगारासाठी शिवण यंत्र उपलब्ध करून दिलेल्या कामाबाबत अनियमितता झालेबाबत. ....95
37 महानगरपालिकेच्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावर झालेल्या खर्चातील अनियमिततेबाबत. ....97
38 महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील देण्यात आलेल्या वाहना वरील खर्चातील अनियमिततेबाबत....98

**कलम ९ ब खालील आक्षेप....100**

39 महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या खडेगोळवली येथील 28 द.ल.ली.क्षमतेचे मल प्रक्रिया केंद्र व 22/433 व्होल्ट उपकेंद्रासह चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता. ....101
40 कॅम्प 1 ते 5 मधील तीव्र पाणी टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा करणेसाठी भाडे तत्वावर 7000 लिटर क्षमतेच्या टँकर पुरवठा करणेसाठी काढलेल्या दोन निविदा मंजुरीपूर्वी जुन्या मंजूर दराने केलेल्या रु.1,92,54,780 च्या प्रदानातील अनियमितता. ....103
41 उल्हासनगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती कामातील अनियमितता. ....106
42 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मध्ये असलेले टप्पा क्र-1 अंतर्गत एच.टी.पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती कामातील अनियमितता. ....109
43 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.4 ते 5 मध्ये असलेले टप्पा क्र-1 अंतर्गत एच.टी.पंपींग स्टेशन चालविणे,देखभाल व दुरुस्ती कामातील अनियमितता. ....111
44 उल्हासनगर मनापांतर्गत नेताजी एच.टी.पंपिंग स्टेशन व आनंदनगर पंपींग स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरविणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितांबाबत....114

45 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.4 ते 5 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता ....116
46 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.4 ते 5 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता ....118
47 उल्हासनगर मनापांतर्गत विविध पंपिंग स्टेशन येथे मोनोब्लॉक पंप,स्टार्टर आणि पॅनल बसविणे, कार्यान्वित करणे चाचणी देणे इ.वरील खर्चाबाबत....120
48 उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागातील उत्पन्न विषयक धोरणात्मक त्रुटींबाबत. ....122
49 उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विषयक योजनांची साध्यता/यशस्वीता पडताळणीसाठी आवश्यक दस्तऐवज व आकडेवारी उपलब्ध करूण देणेबाबत. ....125
50 उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विषयक पडताळणीसाठी आवश्यक दस्तऐवज व आकडेवारी उपलब्ध करुन न दिलेबाबत. ....126
51 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) पाणी पुरवठा वितरण कामाच्या 29 व्या धावत्या देयकात एकूण मागील प्रदानाची चढती बेरीज कमी दर्शवून प्रत्यक्ष केलेल्या कामात रु.20,19,297 चे जादा प्रदान केले बाबत तसेच 29 व्या धावत्या देयकात सब वर्क क्र.12 मधील बाब क्र.2 व 3 मधील रु.49,08,318 चे यापूर्वी केलेले प्रदान कमी करणेचे कार्यकारी अभियंता यांनी नमूद केले असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करणे. ....127
52 जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियांनार्गत पाणी पुरवठा वितरण योजना निविदा प्रक्रीया व 2014-2015 मधील खर्च विषयक अंमलबजावणीतील अनियमितता बाबत. ....129
53 स्थानिक संस्था कराच्या म.न.पा.कडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रात (ई-2) स्थानिक संस्था कराची कमी आकारणी केले बाबत. ....131
54 स्थानिक संस्था कराच्या म.न.पा.कडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रात (ई-2) नमूद भरलेल्या कराची नस्तीसोबत जोडलेली भरणा चलने कमी रक्कमेची असणेबाबत. ....133
55 स्थानिक संस्था कराच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेला स्थानिक खरेदी बाबत. ....136
56 विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेला आयात मालाच्या किमतीवर स्थानिक संस्था कराच्या मंजूर दरसूचीनुसार आकारणी न केल्याने कमी कराचा भरणा झालेबाबत. ....138
57 मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 चे नियम 28 विवक्षित प्रकरणातील सूट व नियम 32 नुसार निर्यातीच्या बाबतीत कराचा परताव्या नुसार भरलेल्या विवरणातील अनियमितता....140
58 स्थानिक संस्था कर नोंदणीकृत संस्थांनी वार्षिक विवरणे सादर न केलेबाबत. ....143
59 उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये इ-गर्व्हन्स प्रकल्पा अंतर्गत SMART या संकल्पनेच्या कामात अनियमितता झालेबाबत. ....154
60 उल्हासनगर-4 येथील ख्रिश्चन स्मशानभूमीची संरक्षण भिंत बांधणे कामात अनियमितता झालेबाबत. ....155
61 2014-15 मध्ये उदयान कामाबाबतीत मजूर कामगार सहकारी संस्था यांना देण्यात आलेल्या कामातील अनियमितता झालेबाबत. ....158

62 उल्हासनगर वाल्मिकी वसाहत या ठिकाणचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत झाल्याने त्या कामात अनियमितता झालेबाबत. ....160
63 सेंच्यूरी टोडलर शाळेसमोर सी.सी.गटार बांधणे बंदीस्त करणे ....164
64 उल्हासनगर महानगरपालिका शाळेमधील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करणे कामातील अनियमितता झालेबाबत. ....165
65 उल्हासनगर महानगरपालिका शाळामधील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य (स्टेशनरी) पुरविणे कामातील अनियमितता झाले बाबत. ....169
66 शालेय पोषण आहार योजनेंतर्गत 2014-15 मध्ये खाजगी शाळांना व स्वयंसेवी संस्थाना आहार खर्चासाठी अनुदान वितरीत करणेबाबत ....171
67 शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस खर्चासाठी स्वयंसेवी संस्था / बचत गट तसेच खाजगी शाळांना प्रदान केलेल्या अनुदानातील अनियमिततांबाबत ....174
68 मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदी करणे कामावरील खर्चातील अनियमिततांबाबत 2014-15 ....177
69 मनपा बालवाडीतील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी खुर्च्या, टेबल पुरवठयासाठी केलेल्या प्रदानातील अनियमिततांबाबत ....179
70 मनपा शाळांमध्ये फर्निचर खरेदी करणे कामावरील खर्चातील अनियमिततांबाबत ....180
71 नगररचना विभागाने बांधकाम लाईन आउट व जोता चेकींगसाठीची फी/शुल्क आकारणी केली नसलेबाबत. 183
72 बांधकाम परवानगी मंजरी देताना स्टॅकिंग शुल्क, जिना व लिफ्ट क्षेत्रफळ शुल्क, जमीन विकास अधिभार शुल्क, रहिवाशी अधिभार शुल्क, उपकर शुल्क, प्रतिपूर्ती ठेव शुल्क व जोता प्रमाण पत्र शुल्क यांची आकारणी कमी केले बाबत. ....184
73 उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना या कामातील अनियमितताबाबत. ....187
74 बांधकाम विकासकांकडून जमीन विकास शुल्काची कमी रक्कम वसूल केलेबाबत… ....189
75 जीना ,पॅसेज व लॉबी इ.बाबीं सवलतीकरीता आकारणी कमी केलेबाबत. ....190
76 बांधकाम विकासकांकडून कामगार कल्याण उपकराची कमी रक्कम वसूल केलेबाबत.. ....191
77 इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेबाबत… ....193
78 इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कराची कमी रक्कम वसूल केलेबाबत… ....195
79 इमारत बांधकाम प्रतिभुती ठेवीची कमी आकारणी केलेबाबत… ....197
80 मे रिजेन्सी निर्माण लि., उल्हासनगर यांचे म्हारळ येथील इमारत बांधकाम प्रारंभ परवानगीच्या अनुषंगाने अभिप्राय… ....198
81 महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्त्यांची पावर स्विपींग मशिनद्वारे साफसफाई करणे कामातील अनियमिततेबाबत. ....202
82 मे. कोनार्क इनव्हायरो प्रा.लि. यांना झालेल्या प्रदानाबाबत. ....204

83 मिळकतीची आकारणी चुकीची केल्याने फरकाची रक्कम वसुलीबाबत...व अर्धसमास ज्ञापनाच्या अनुषंगाने मागणी केलेले अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता प्राप्त न झालेबाबत. ....205
84 मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत ....212
85 उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरूस्तीवर विहित मार्यादेपेक्षा जास्त खर्च केल्याबाबत. ....214
86 वेतन राखीव निधी नियमाप्रमाणे ठेवला नसलेबाबत. ....215

**कलम ९ क खालील आक्षेप ....217**

**------------------- निरंक ------------------ ....218**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....220**

87 वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये वार्षिक विवरण भरलेल्या संस्थांच्या नस्त्यामध्ये अशी विवरणे आढळून आली नसल्याबाबत. ....221
88 उल्हासनगर महानगरपालिका शाळेतील विदर्यार्थ्यांची दि. 30/09/2013 व दि. 30/09/2014 अखरे पटपडताळणी न केल्याने शिक्षकांची पदे निश्चिती झाली नसलेबाबत. ....222
89 शिक्षण मंडळ येथील जादा प्रदान निवृत्तीवेतन व लेख्यासंबंधी इतर अनियमिततेबाबत....222
90 शालेय विदयार्थ्यांकरीता पुरक पोषण आहार चिक्की खरेदी करणे कामातील अनियमितता. ....227
91 मनपा शाळामधील विदयार्थ्यांना सन 2014-15 करीता रेनकोट पुरविणे कामातील अनियमितता.. ....234
92 जाहिरात व मागासवर्गीय भत्ता या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत....237
93 संगणकाची दुरूस्ती व देखभाल तसेच मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे कामातील अनियमिततेबाबत....239
94 उल्हासनगर 4 मधील प्रभाग क्र. 26 मध्ये वाघरी पाडा ते रोशन तबेला पर्यंत मोठा नाला बांधणे कामातील अनियमिततेबाबत. ....241
95 वार्ड क्र. 13 मध्ये सोनवणे यांच्या घरापासुन ते अमरज्योत अर्पाटमेंट पर्यंतचा नाला व संरक्षणाभिंत बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत....242
96 प्रभाग क्र. 1 मधील दत्तवाडी व गुलशणनगर येथे सी सी पेव्हमेंट रस्ता व नाला बाधंणे कामातील अनियमिततेबाबत. ....243
97 बांधकाम विभागाकडील ठेवण्यात आलेल्या लेख्यांच्या अनियिमितता व त्रृतींबाबत....245
98 बांधकाम विभागची लेखे उपलब्ध करून न दिले बाबत....246
99 करनिर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे विहीत नमुन्यात ठेवले नसलेबाबत. ....247
100 मालमत्ता कर विभागातील अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसलेबाबत....248
101 उल्हासनगर मनपा अग्निशमन विभागांतर्गत सर्वसाधारण अभिप्राय... ....251
102 नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तीवर मात करण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे खरेदी करणे कामातील अनियमितता ....253

103 प्रभाग कार्यालय क्र.1 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत....255
104 प्रभाग कार्यालय क्र.2 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत....257
105 प्रभाग कार्यालय क्र.3 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत....258
106 प्रभाग कार्यालय क्र.4 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत....261
107 अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील जमा रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत.......262
108 अनाधिकृत बांधकामांच्या निष्कासना करीता महानगरपालिकेने केलेला खर्च संबंधिताकडून वसूल केला नसल्याबाबत.. ....263
109 अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत.....264
110 नगररचना विभागातील जमा होणा-या रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत ....265
111 नगररचना विभागातील सर्वसाधारण अनियमितता....267
112 संगणक संच खरेदीतील अनियमिततेबाबत. ....271
113 उल्हासनगर महानगरपालिकेत आस्थापना खर्चावर नियंत्रण नसलेबाबत ....272
114 . उल्हासनगर महानगरपालिकेने पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसा हक्काने नियुक्त केलेल्या कर्मचारी यांच्या नियुक्त्या नस्ती उपलब्ध करून दिली नसलेबाबत ....273
115 उल्हासनगर महानगरपालिका क्रीडा विभागाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नसलेबाबत...274
116 कर्ज निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध न केलेबाबत....274
117 पाणी पुरवठा विभागातील जमेचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणे ....275
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....278

**विवरणपत्रे व जोडपत्रे....279**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| नगर सचिव | 27, 28 | | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 33, 34 | 60, 61, 62, 63 | | 94, 95, 96, 97, 98 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 3, 4, 5, 6, 7, 8, 9 | 39, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50 | | 117 |
| लेखा विभाग | 1, 2 | 86 | | |
| लेखापरीक्षण | | | | 116 |
| नगर रचना | | 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80 | | 110, 111 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | 22, 23, 24, 25, 26 | 53, 54, 55, 56, 57, 58 | | 87 |
| कर निर्धारण व संकलन | | 83, 84 | | 99, 100 |
| भूमी व मालमत्ता विभाग | 35 | | | |
| वाहन विभाग | 37, 38 | 85 | | |
| जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम | 10, 11, 12, 13 | 51, 52 | | |
| विधी विभाग | 29 | | | |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 30, 31 | 81, 82 | | |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | 32 | 59 | | |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक | 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21 | 64, 65, 66, 67, 68, 69, 70 | | 88, 89, 90, 91, 92, 93 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शिक्षण | | | | |
| महिला व बालकल्याण विभाग | 36 | | | 112 |
| क्रिडा विभाग | | | | 113, 114, 115 |
| अग्निशमन विभाग | | | | 101, 102 |
| अतिक्रमण विभाग | | | | 107, 108, 109 |
| प्रभाग कार्यालये | | | | 103, 104, 105, 106 |

# I Part I : भाग १

## *मागील लेखा परीक्षण अहवाल*

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमांचे वैधानिक लेखापरीक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.स्थानिले1010/प्र.क्र.26ब/विमाप्रशा, दिनांक 31/03/2011 अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांचेकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे लेखापरीक्षण 2011-12 या वित्तिय वर्षांपासून सुरू करण्यात आले. प्रलंबित परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.
लेखापरीक्षण अहवाल वर्ष 2011-12, 2012-13 व 2013-14

| अ.क्रं. | ले.प.वर्ष | परिच्छेद क्रं. | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-2012 | 1 ते 171 | 171 |
| 2 | 2012-2013 | 1 ते 113 | 113. |

**2013-2014 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद. (चालू लेखापरीक्षणाचे मागील वित्तीय वर्ष)**

| परिच्छेद क्र. | शिर्षक |
|---|---|
| 1 | उल्हासनगर महानगरपालिकेच्या 203-2014 या आर्थिक वर्षाची अर्थसंकल्पीय निरीक्षणे व आर्थिक स्थितीवरील भाष्य. |
| 2 | 31 मार्च 2014 चे बॅंक ताळमेळ पत्रक तयार न केल्याबाबत. |
| 3 | महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प 1 ते 5 मधील भुयारी गटारांची चौकट व आर.सी.सी. कव्हर्स आणि गोल एस.एफ.आर.सी. फ्रेम व कव्हर्स पुरविणे व बसविणे कामातील अनियमितता. |
| 4 | प्रभाग समिती-3 क्षेत्रात सीव्हर लाईन क्लिनिंग मशीन क्र.एम.एच-05-216 वर काम करणेकरिता 29 जाने.2013 ते 28 जाने.2014 या कालावधीसाठी दररोज 5 मजूर पुरवठा करणे या कामातील अनियमितता. |
| 5 | महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी शैक्षणिक सहली आयोजित करणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितता. |
| 6 | भविष्य निर्वाह निधीची बॅंक खाती व विनावापर गुंतून राहिलेल्या शिल्लक रकमेबाबत. |

| | |
|---|---|
| 7 | भविष्य निर्वाह निधी लेख्यातील अनियमिततेबाबत. |
| 8 | दि. 01/11/2005 नंतरनियुक्त कर्मचा-यांना अंशदान निवृत्ती वेतन योजने ऐवजी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देण्याबद्दल |
| 9 | मनपा शाळांमधील विद्‌यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदी करणे कामावरील खर्चातील अनियमिततांबाबत |
| 10 | मनपा शाळांमधील विद्‌यार्थ्यांसाठी बेंच पुरवठयासाठी केलेल्या प्रदानाबाबत |
| 11 | मनपा शाळामधील विदयार्थ्यांना सन 2010-11 करीता रेनकोट पुरविणे कामातील अनियमितता.. |
| 12 | 2013-14 मध्ये सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत |
| 13 | आरोग्य विभागाने लस खरेदी केलेली नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करून न दिलेबाबत. |
| 14 | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय मागे स्थानिक संस्था कर विभागाकरीता नवीन कार्यालय बांधणेच्या कामात अनियमितता झालेबाबत |
| 15 | निर्मल एम.एम.आर.डी. योजने अंतर्गत केलेल्या कामाबाबत खर्चाचे अभिलेखे व त्या अनुषंगाने ठेवलेल्या नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध न करून दिलेबाबत. |
| 16 | उल्हासनगर वाल्मिकी वसाहत या ठिकाणंचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत झालेल्या कामात अनियमितता बाबत. |
| 17 | नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत उल्हासनगर-5 येथील प्र.क्र. 38 ब मधील पटेलनगर मध्ये विविध ठिकाणी सी.सी पेव्हमेंट आणी नाली बांधणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 18 | उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये इ-गर्व्हेन्स प्रकल्पा अंतर्गत SMART संकल्पनेच्या कामात अनियमितता झालेबाबत |
| 19 | महानगरपालिकेच्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावर झालेल्या खर्चातील अनियमिततेबाबत |
| 20 | महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील देण्यात |

| | |
|---|---|
| | आलेल्या वाहना वरील खर्चातील अनियमिततेबाबत. |
| 21 | उल्हासनगर मनपा अग्निशमन विभागांतर्गत सर्वसाधारण अभिप्राय... |
| 22 | आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या खर्चासंबंधी अनियमितता |
| 23 | प्रभाग कार्यालय क्र.1 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत |
| 24 | मालमत्ता कर विभागातील अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसलेबाबत |
| 25 | महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शांतीनगर व नेहरूनगर या मलउपसा केंद्रे विद्युत उपकेंद्रासहित चालविणे,देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता. |
| 26 | वार्ड क्र.17 मधील रामभाऊ म्हाळगी चौक, आम्बिकानगर येथे 200 मिमी.व्यासाचे आर.सी.सी.एन.पी.2 क्लास पाईप टाकणे व वार्ड क्र. 31 बॅरेक 1050,1013,1028,1029 येथे 200 मिमी.व्यासाची एस.डब्लू.मलवाहिनी टाकणे या दोन कामातील अनियमितता |
| 27 | उल्हासनगर मनापांतर्गत विविध बुस्टरपंपिंग स्टेशन येथे कंत्राटदारामार्फत अतिरिक्त पंपचालक पुरविणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमिततांबाबत |
| 28 | उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मधील अस्तित्वातील विंधण विहीरींवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमिततांबाबत. |
| 29 | उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे 2013-14 कालावधीतील वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता |
| 30 | उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विषयक योजनांची साध्यता/यशस्वीता पडताळणीसाठी आवश्यक दस्तऐवज व आकडेवारी उपलब्ध करूण देणेबाबत. |
| 31 | पाणीपुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी जमा केलेल्या पाणी पुरवठयाच्या रकमां बाबत. |
| 32 | महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2010-11 या शैक्षणिक वर्षासाठी दफ्तर पुरवठा करणे च्या प्रदानातील अनियमितता. |
| 33 | शालेय पोषण आहार योजनेंतर्गत 2013-14 मध्ये खाजगी शाळांना व स्वयंसेवी संस्थाना आहार खर्चासाठी अनुदान वाटपातील अनियमितता |
| 34 | उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ई-गर्व्हन्स प्रकल्पा अंतर्गत SMART संकल्प या कामात |

| | |
|---|---|
| | अनियमितता झालेबाबत |
| 35 | समाज मंदिर बांधणे कामात अनियमितत झालेबाबत. |
| 36 | राजीव आवास योजने अंतर्गत झोपडयांचे सर्वेक्षण करणेच्या कामात अनियमितता झालेबाबत. |
| 37 | नगररचना विभागाने बांधकाम लाईन आउट व जोता चेकींगसाठीची फी/शुल्क आकारणी केली नसलेबाबत. |
| 38 | उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना या कामातील अनियमितताबाबत |
| 39 | जीना ,पॅसेज व लॉबी इ.बाबीं सवलतीकरीता आकारणी कमी केलेबाबत... |
| 40 | इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेबाबत |
| 41 | इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कराची कमी रक्कम वसूल केलेबाबत... |
| 42 | महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्त्यांची पावर स्विपिंग मशिनद्वारे साफसफाई करणे कामातील अनियमिततेबाबत. |
| 43 | भविष्य निर्वाह निधीचे रक्कम ठेवी स्वरुपात राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये गुंतवणूकीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत. |
| 44 | मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत |
| 45 | मिळकतीची आकारणी चुकीची केल्याने फरकाची रक्कम वसुलीबाबत...व अर्धसमास ज्ञापनाच्या अनुषंगाने मागणी केलेले अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता प्राप्त न झालेबाबत |
| 46 | उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरूस्तीवर विहित मर्यादेपेक्षा जास्त खर्च केल्याबाबत. |
| 47 | महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत चार नवीन अग्निशमन गाडयांचे चेसिस खरेदी करणे कामातील अनियमिततेबाबत |
| 48 | जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान अभियानांर्गत पाणी पुरवठा वितरण योजना निविदा प्रक्रीया व 2013-2014 मधील खर्च विषयक अंमलबजावणीतील अनियमितता बाबत. |
| 49 | महानगरपालिकेत क व ड च्या लाभार्थी कर्मचाऱ्यांच्या गणवेष कापड खरेदीतील |

| | |
|---|---|
| | अनियमिततेबाबत |
| 50 | खेमानी नाल्यातील कचरा बाहेर काढण्यासाठी खाजगी ठेकेदारामार्फत चार महिन्याकरिता मजूर व मुकादम पुरविणे कामातील अनियमितता. |
| 51 | वार्ड क्र. 21 मधील बॅरेक क्र. 1135, 1136, 1137 व 1139 येथे 225 मिमी. व्यासाची एस.डब्लू.मलवाहिनी टाकणे या कामातील अनियमितता |
| 52 | पाणी पुरवठा विभागातील जमेचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणे |
| 53 | प्रभाग क्र.16 मध्ये विविध ठिकाणी पेव्हमेंट व नाली बसविणेच्या खर्चातील अनियमिततेबाबत |
| 54 | उल्हासनगर मनपा उद्याना जवळ व आस्था हॉस्पिटल समोर सि.सि.पेव्हमेंट व नाली बसविणेच्या कामातील अनियमिततेबाबत. |
| 55 | उल्हासनगर मनपा क्षेत्रातील प्रभाग 11- मध्ये गारूडीपाडा येथे बॅरेक क्रमांक 1201 जवळ आरोग्य केंद्र बांधणे कामातील अनियमिततेबाबत. |
| 56 | प्रभाग क्र. 59 मधील बॅरेक क्रमांक 1666 जवळ सरस्वती शाळा रोड येथे समाजमंदिर बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत |
| 57 | प्रभाग क्र.15 मधील निळकंठ अपार्टमेंट ते पोलिस प्लॉट पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे व C.C.M-350 रस्ता बनविणेच्या कामातील अनियमिततेबाबत |
| 58 | उल्हासनगर-4 विलास कंट्रीबार जवळ कल्व्हर्ट बनविण्याच्या खर्चातील अनियमितेबाबत. |
| 59 | कर निर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे विहीत नमुन्यात ठेवले नसलेबाबत. |
| 60 | महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत चार नवीन अग्निशमन गाडयांच्या फायर वॉटर टेंडरचे फॅब्रिकेशनचे काम करणे कामातील अनियमितता |
| 61 | प्रभाग कार्यालय क्र.2 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत |
| 62 | प्रभाग कार्यालय क्र.3 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत |
| 63 | प्रभाग कार्यालय क्र.4 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत |
| 64 | शिक्षण मंडळ येथील जादा प्रदान निवृत्तीवेतन व लेख्यासंबंधी इतर अनियमिततेबाबत |

| | |
|---|---|
| 65 | जाहिरात व मागासवर्गीय भत्ता या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत |
| 66 | संगणकाची दुरूस्ती व देखभाल तसेच मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे कामातील अनियमिततेबाबत... |
| 67 | अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील जमा रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत |
| 68 | अनाधिकृत बांधकामांच्या निष्कासना करीता महानगरपालिकेने केलेला रु.75 लाख खर्च संबंधिताकडून वसूल केला नसल्याबाबत.. |
| 69 | अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत. |
| 70 | अतिक्रमण विभागाकडून अनधिकृत/धोकादायक बांधकाम निष्कासनाकरीता केलेल्या खर्चाबाबत अभिप्राय... |
| 71 | नगररचना विभागातील जमा होणा-या रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत |
| 72 | नगररचना विभागातील सर्वसाधारण अनियमितता |
| 73 | क्रीडा विभाग खर्चाचे प्रमाणके व संबधित निविदा नस्ती व इतर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नसलेबाबत |
| 74 | कर्ज निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध न केलेबाबत. |

**“उपरोक्त नमुद केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात त्या त्या वर्षाच्या प्रथम पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावेत.”**

**पुनर्विलोकन अहवालामध्ये समविष्ट परिच्छेदांचा तपशील :-**
**नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये समविष्ट परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1. | 2011-12 | 1,4,8,18,20,21,26,36,40,41,46,54,58,62,77,78,87,92,114,131,138,148. | 22. |
| 2. | 2012-13 | 2012-13 चे लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालाचे काम सुरू आहे. | |

# Part II

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2014-15या आर्थिक वर्षाची अर्थसंकल्पीय निरीक्षणे व आर्थिक स्थितीवरील भाष्य*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***उल्हासनगर महानगरपालिकेचे 2014-15या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज वास्तववादी नाहीत.मागील तीन वर्षाच्या जमेची सरासरी वाढ विचारात न घेता वाढीव तरतुदीचे अंदाजपत्रक बनविले आहे.शासनाने विहित केलेल्या नियमानुसार महिला बाल कल्याण, अपंग कल्याण व क्रिडा क्षेत्रातील योजनेसाठी पुरेशी तरतूद केलेली नाही.महानगरपालिकेचे सर्व करांपासून मिळणारे उत्पन्न धोरणात्मक त्रुटींमुळे व वसुलीच्या अत्यल्प प्रमाणामुळे कर विषयक मागणीच्या तुलनेत केवळ26.49% इतके अत्यल्प आहे.तर थकबाकीचे प्रमाण 73.51% इतके आहे.तसेच मागील दहा वर्षात करांच्या दरात कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. मार्च 2015 अखेर एकून थकीत कर्ज 30.98 कोटी रुपये इतके आहे. 2014-15 चे महानगरपालिकेचे दायित्वमत्तेपेक्षा 48 कोटींनी अधिक आहे. शासनास देय असलेली 2014-15 ची जल उपकराची एकूण रक्कम 53 लाख रुपये इतकी आहे. 2014-15 अखेर रक्कम देय असलेल्या अपूर्ण कामांची संख्या 672 इतकी आहे. 2014-15 चे वार्षिक लेखे National Muncipal Accounting Mannual प्रमाणे विहित नमुन्यात तयार केलेले नाहीत.दैनिक लेखे बंद करून त्याच्या नोंदी रोखवहीत घेतल्या जात नाहीत.पाणीपुरवठा व साफसफाई सेवा स्वयंमाधारित नाहीत.पाणीपट्टीची एकूण थकबाकी72% इतकी आहे.महानगरपालिका अधिनियमात दिलेली बंधनकारक कार्ये करण्यास महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम नाही. केंद्र व राज्य शासन अनुदानितजवाहरलालनेहरु नागरी पुनुरूत्थान अभियान अंतर्गत भुअंतर्गत जलवाहिन्या जोडणे ही 268 कोटी रुपयांचीभांडवली स्वरुपाची पाणी पुरवठा योजना मार्च 2015 अखेर अपूर्ण आहे.***

**अर्थसंकल्पावरील निरीक्षणे उल्हासनगर महानगरपालिकेचे 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये असे आढळून आले की या वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज वास्तववादी नाहीत. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30 (बी) नुसार मागील तीन वर्षाचे प्रत्यक्ष जमा व खर्च विचारात घेऊन अर्थसंकल्पीय अंदाजकरणे आवश्यक असतांना असे केलेले दिसून येत नाही. ते पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होईल.**

| आर्थिक वर्ष | प्रस्तावित जमा | प्रत्यक्ष जमा | फरक |
|---|---|---|---|
| 2011-12 | 190.34 कोटी | 182.11 कोटी | (-)04.33% |
| 2012-13 | 192.57 कोटी | 181.49 कोटी | (-)5.76% |
| 2013-14 | 255.20 कोटी | 224.77 कोटी | (-)11.93% |
| 2014-15 | 265.87 कोटी | 221.18 कोटी | -16.80% |

मागील तीन वर्षातील जमेची वाढीची टक्केवारी नगण्य असताना सरासरी11% प्रस्तावित वाढ गृहीत धरून अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. यावरून जमेच्या रकमा वाढविल्याचे स्पष्ट होते.

खर्च बाजू वाढविण्यासाठी जमा बाजू अवास्तवरित्या वाढविलेली आहे.

अर्थसंकल्प हा वास्तववादी असणे आवश्यक आहे.

मुळ अर्थसंकल्पाच्या आधारे कामांना मंजूरी असल्याने प्रत्यक्ष उत्पन्न कमी प्राप्त झाल्यामुळे महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये 789 कोटी रुपये इतक्या मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

**महिला बाल विकास,अपंग वक्रिडा विकास तरतूद**

1) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-1093/325/प्र.क्र.24 नवि 32 दि.17/04/1993 व नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन 1093/1198/नवि 14 दि.14/07/1993 अन्वये महिला व बालविकासकल्याण विभागासाठी बांधील खर्च वजा जाता 5 टक्के तरतुद करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. ते पुढील आकडेवरून स्पष्ट होईल.

| 2013-2014 | आवश्यक तरतूद 5% | प्रत्यक्ष तरतूद | प्रत्यक्ष खर्च | तरतूदीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| महिला बाल विकास | 14.17 कोटी रु. | 3 कोटी रु. | 22 लाख रु. | 1.05% |

2)नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जीईएन-1655/प्र.क्र.46/नवि 33 दि.14/02/2002 अन्वये अपंगासाठी 3 टक्के तरतुद व खर्च करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

| 2013-14 | आवश्यक तरतूद (3%) | प्रत्यक्ष तरतूद | प्रत्यक्ष खर्च | तरतूदीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अपंग विकास | 8.50 कोटी रु. | 50 लाख रु. | 46 हजार रु. | 0.17% |

वरील आकडेवारी वरून अपंगासाठी प्रत्यक्ष तरतूद विहित प्रमाणात केली नसून प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण अत्यल्प आहे.

**3)**नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जीइएन 1098/प्र.क्र.21/98/नवि 24 दि.09/03/1998 नुसार महानगरपालिकेने आपल्या वार्षिक खर्चापैकी 5 टक्के खर्च क्रिडा क्षेत्राकरीता शासननिर्णयातून नमुद केलेल्या कामांवर करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

| 2014-15 | आवश्यक तरतूद (5%) | प्रत्यक्ष तरतूद | प्रत्यक्ष खर्च | तरतूदीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| क्रिडा विकास | 14.17 कोटी रु. | 50 लाख रु. | 27.87 लाख रु. | 0.28% |

वरील आकडेवारीवरून अपंगासाठी प्रत्यक्ष तरतूद विहित प्रमाणात केली नसून प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण अत्यल्प आहे.

आर्थिक स्थितीवरील भाष्य

1)जमाविषयक अभिप्राय

कराधन नियम 21(2) प्रकरण8 मधील तरतुदी नुसार ठराविक कालावधीनंतर नवीन कर आकारणी पुस्तक तयार करणे अर्थात करांच्यादरांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असलेचे म्हंटले आहे. तथापि उल्हासनगर महानगरपालिकेचे सर्व करांपासून मिळणारे उत्पन्नकर आकारणी व कर वसुली विषयक धोरणात्मक त्रुटीमुळे व वाढत्या थकबाकीमुळे मागणीच्या तुलनेत अत्यल्प आहे. हे पुढील आकडेवारी वरून स्पष्ट होईल.

| वित्तीय वर्ष | कर विषयक मागणी | प्रत्यक्ष वसुली | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 2014-15 | 300.82 कोटी रु. | 67.28 कोटी रु | 233.53 कोटी रु. |

वरील आकडेवारीवरून महानगरपालिकेचे वसुलीचे प्रमाण केवळ 22.54% असून थकबाकीचे प्रमाण 77.64% इतके प्रचंड आहे हे स्पष्ट होते. कर विषयक विविध निरीक्षणे,थकबाकी व अन्य धोरणात्मक त्रुटी या बाबतचे स्वतंत्र विवेचन मालमत्ता कर,स्थानिक संस्था कर,पाणीपट्टी व अ अन्य जमा विषयकबाबींच्या परिच्छेदांमध्ये विस्तृतपणे समावेशित केले आहे

2)मत्त्ता व दायित्व विषयक अभिप्राय

उल्हासनगर महानगरपालिकेने दिलेल्या मत्ता व दायित्व विवरनपत्रानुसार वर्ष 2013-14 मध्ये 862 कोटीरु. मत्ता व789 कोटी रु. दायित्व असल्याचे म्हंटले आहे. तथापि विवरणपत्रामध्ये मत्तेच्या बाजूस रोख रकमा, गुंतवणुका, अदत्त आगाऊ रकमा, अदत्तकर, दंडाच्या रकमा,सहायक अनुदाने याबाबत विस्तृत विवरण दिलेले नाही. तसेच दायित्वाचे विस्तृत विवरण दिलेले नाही.

3)थकीत कर्ज विषयक अभिप्राय

उल्हासनगर महानगरपालिकेचे मार्च 2014 अखेर एकूण थकीत कर्ज 30.98 कोटी रु. इतके आहे याबाबतचे विवेचन पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होईल.

(रक्कम कोटीमध्ये)

| कर्ज देणारी संस्था | कर्जाचे कारण | मुद्दल | व्याज | एकूण |
|---|---|---|---|---|
| एम.जे.पी | भुयारी गटार | 9.2 | 4.33 | 13.53 |
| एम.जे.पी | पाणीपुरवठा | 7.65 | 5.54 | 13.19 |
| एम.जे.पी (LIC) | पाणीपुरवठा | 3.06 | 1.2 | 4.26 |
| एकूण | | 19.91 | 11.07 | 30.98 |

वरती नमूद केलेल्या भांडवली स्वरूपाच्या योजनापूर्ण करण्यासाठी सदरची कर्ज उभारणी करण्यात आली तथापि त्या अद्याप अपूर्ण आहेत.परिणामी महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये कोणत्याही निष्पत्ती शिवाय भर पडली आहे. याबाबतचे विस्तृत विवेचन अहवालामध्ये स्वतंत्र परिच्छेदांमध्ये करण्यात आले आहे.

4)पुरवठा किंवा बांधकामे याबाबत देय रकमांबाबत अभिप्राय

पुरवठा किंवा अपूर्ण बांधकामे याबाबत देय असलेल्या राकामाबाबत अर्धासामास पत्र क्र.18 नुसार विचारणा करण्यात आली तथापि उत्तर अप्राप्त असल्याने याबाबत निश्चित भाष्य करता येत नाही.तथापि उपलब्ध माहितीनुसार मार्च 2004 अखेर कार्यान्वित झालेली अद्याप अपूर्ण असलेली एकूण बांधकामे 530 इतकी आहेत.कार्यादेशात नमूद केलेल्या मुदतीत बहुतांशी कामे पूर्ण न झाल्याने महानगरपालिकेवरील दायित्वसातत्त्याने वाढत आहे.

5)लेखेविषयक अभिप्राय

दैनंदिन लेखेबंद करणे (day closing) व त्याची दैनिक नोंद रोखवहीत घेणे या पद्धतीचा अवलंब उल्हासनगर महानगरपालिकेत केला जात नाही.त्यामुळे वर्षातील सर्वात कमी रोख शिल्लक व शासनाने निश्चित केलेली किमान रक्कम यांची पडताळणी करता आली नाही.तसेच जमा व खर्चाचे मासिक गोषवारे संगणकीकृत प्रणालीत तयार होणारया रोखवहीतून काढले जातात.सदर रोखवहीत संबधित प्रधीकाऱ्यांचे सही व शिक्के नसल्याने सदर रोखवहीची अधिकृतता मानता येणार नाही.

शासन निर्णय क्रमांक लेखास-102004/71/प्र.क्र. 5/04/न.वि.31दि.-06/07/2005 अन्वये भारताचे नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता (NAM) प्रकरण 2 ते5

मधील तरतुदीनुसार सन 2005-06 पासून महापालिकांनी उपार्जित पद्धतीवर आधारित द्विनोंद पद्धतीने लेखे ठेवणे क्रम प्राप्त आहे. उपर्जीत तत्वावर ताळेबंद पत्रक, रोखप्रवाह विवरणपत्र, जमा खर्चाचे विवरणपत्र, लेख्यावरील टिपण्या (Financial Indicators) आर्थिक सूचना (Financial Performanace Indicators) या बाबींसह वार्षिक लेखे तयार करून स्थायी समिती समोर सादर करणे आवश्यक आहेत. तथापि उल्हासनगर महापालिकेत या पद्धतीचा अवलंब केला जात नाही.तसेचवार्षिक लेखे प्रमाणित करून ते शासनास सादर केले जात नाहीत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 9 चे कलम 106(3) अन्वये प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यावर मुख्य लेखापरीक्षकाने मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तसेच कलम 106(4) प्रमाणे आयुक्तांनी उक्त अहवाल छापून त्याची प्रत प्रशासन अहवालाच्या व लेखा विवरण पत्राच्या छापील प्रतिसह प्रत्येक पालिका सदस्यास पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे. तसेच कलम 105 अन्वये मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी व लेखापरीक्षण करून त्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर केला पाहीजे. अशी तरतूद आहे.तथापि उल्हासनगर महापालिकेत 2008-09 पासून विहित पद्धतीने एकदाही कार्यवाही झालेली नाही.

6)महापालिकेच्या सेवा स्वंनिर्धारण बाबत अभिप्राय

महाराष्ट्र शासन,नगर विकास विभागाच्या दि.02/08/2010 च्या शासन निर्णयानुसार महापालिकेची पाणीपुरवठा व साफसफाई सेवा स्वंनिर्धारित असणे आवश्यक असलेचे नमूद केले आहे.तथापि उल्हासनगर महानगरपालिकेचे पाणीपट्टीचे थकबाकीचे प्रमाण 72%असून गेल्या 10 वर्षात कराच्या दरामध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही.जवहारलाल नेहरू नागरी पुनुरुत्थान अभियान अंतर्गत भूअंतर्गत जलवाहिन्या टाकणे या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेचा 50% निधी महापालिका उत्पन्नातून उभारणे अपेक्षित असताना त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाकडून कर्ज उभारणी केली आहे.वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदीतील मोठा हिस्सा व्याज व हप्त्यापोटी खर्ची पडतो.तथापि अद्याप ही योजना अपूर्ण आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 63 मध्ये नमूद केलेली सर्व बंधनकारक कार्ये करण्यास उल्हासनगर महानगरपालिका समर्थ नाही.कारण महानगरपालिकेचे उत्पन्न कमी असून कर्जाचे प्रमाण अधिक आहे.करांची टक्केवारी शासनाने शिफारस केलेल्या मर्यादेपर्यंत आणण्यासाठी महानगरपालिकेने कोणतीही पुरेशी उपाययोजना केलेली नाही.तसेच करदर सुधारणा तर नाहीच व वसुलीची टक्केवारी 22.54% इतकी अत्यल्प आहे.

7)इतर महत्वपूर्ण अभिप्राय

ठेवी व आगाऊ रकमांची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.महानगरपालिकेने द्यावायाच्या सहायक अनुदानातील प्रमुख बाब जल उपकर असून 2013-14ची देय रक्कम

53 लाख रुपये इतकी आहे.वटवण्यातन आलेल्या धनादेशाबाबतअर्धसमासपत्र क्रमांक 7 दिनांक 3/5/2016 नुसारमाहिती मागवण्यात आली होती.तथापि ती उपलब्ध केली नाही.कालावधी पूर्ण झालेल्या परंतु चुक्त्या न केलेल्या दायित्वाच्या रक्कमे बाबतचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने दायित्वाच्या रकमेतून वजा केल्यानंतरची शिल्लक रक्कम याबात निश्चित स्थिती मांडता येत नाही.तथापि उपलब्ध माहितीनुसार2013-14 मधील रोख शिल्लक 25.22कोटी रुपये इतकी आहे.

8) अहवालासोबत विवरण पत्र क्र.02 शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्रातील रकाना क्र.3 ते 6 व 10 ते 13 मध्ये तपशिल नमुद नाही. तसेच अनुदान निहाय तपशिल नमुद न करता एकत्रितरित्या अनुदान दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे लेखापरिक्षणास अनुदान निहाय मंजुर करणारे प्राधिकारी, लेख्यातील प्रधानशिर्ष, लेखापरिक्षण वर्षानंतर खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची रक्कम, शासनास परत करावयाचे अनुदान व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले अथवा नाही याबाबतचा तपशिल उपलब्ध होवू शकला नाही. त्यामुळे याबाबत सविस्तर अभिप्राय देता येत नाहीत.

9) अहवालासोबत विवरणपत्र क्र.04 मूल्य निर्धारण कर संकलन विभाग-करांची येणे वसुली व थकबाकी
दर्शविणारे विवरणपत्र जोडण्यात न आल्यामुळे महापालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या विविध करांची
मागणी, वसुली व थकबाबी बाबतची पडताळणी करता आली नाही.

10) अहवालासोबत विवरण पत्र क्र्रर.5 (अ) महानगरपालिकेने दिलेल्या व लेखापरिक्षण वर्षा अखेर थकीत कर्ज व आगावू रक्कम दर्शविणारे विवरण पत्रातील माहीती निरंक दर्शविण्यात आली आहे. याबाबतची साधार स्पष्टता झाली नाही तर विवरणपत्र 5 (ब) महानगरपालिकेने दिलेल्या व लेखापरिक्षण वर्षा अखेर आगावू रक्कमा दर्शविणारे विवरणपत्र जोडलेले नाही.

11) पुढील विविरण पत्र लेखा परिक्षण अहवालासोबत जोडण्यात आलेली नाहीत.

| अ.क्र. | विवरण पत्र क्र. | तपशिल |
|---|---|---|
| 1 | 6 (अ) | प्रलंबित अग्रमि रक्कम दर्शविणारे विवरणपत्र |
| 2 | 6 (ब) | प्रलंबित अनामत (ठेव) रक्कम दर्शविणारे विवरण पत्र |
| 3 | 7 | अपुर्ण बांधकामाची यादी दर्शविणारे विवरण पत्र |

| | | |
|---|---|---|
| 4 | 8 | गुंतवणुकीबाबतचे विवरण पत्र |

त्याअभावी विषंयाकीत बाबीबाबत लेखापरीक्षणास अभिप्राय नोंदता आले नाहीत.

DATAPJF8101 (Ref No : 117, Hmm No : 18)

## *2 31 मार्च - 2015 चे बँक ताळमेळ पत्रक तयार न केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिकेने विहीत नमुन्यात रोखपुस्तक व इतर नोंदवहया ठेवून त्यामध्ये क्रमवार दिनांक सहित नोदीं केलेल्या नाहीत. राष्ट्रीय लेखा संहितेच्या परिच्छेद क्र. 29.11 व प्रकरण 30 मध्ये नमूद केल्यानुसार महिना अखेरीस रोखपुस्तकातील शिल्लक रक्कम व बँक पुस्तकातील शिल्लक रक्कम यांचा ताळमेळ घेतलेला नाही. रोख पुस्तक रोजच्या रोज बंद करूण शिल्लक रक्कम पुढील तारखेला आरंभिची रक्कम म्हणून दर्शविलेली नाही***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या 2014-2015 या वित्तीय वर्षातील सर्वसाधारण रोखवहीतील 31 मार्च 2015 मधील शिल्लक रकमेचे व उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण AXIS BANK खात्यातील 31 मार्च

2015 च्या शिल्लक रकमेबरोबर ताळमेळ घेतलेला नाही

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण रोखवहीची तपासणी केली असता दि. 1 मार्च 2015 ची आरंभिची रक्कम रु.128097902 इतकी असून दि. 31/03/2015 ची शिल्लक रक्कम रु.372430562 इतकी आहे. महानगरपालिकेचे सर्वसाधारण खाते AXIS BANK, उल्हासनगर येथे असून खाते क्र. 910020045288278 हा आहे. सदर खात्यामध्ये दि. 01/03/2015 ची आरंभिची रक्कम रु. 20613981 इतकी असून दि. 31/03/2015 ची शिल्लक रक्कम रु.56488442 इतकी आहे. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण रोखवहीतील 31/03/2015 ची शिल्लक रक्कम व AXIS BANK खात्यातील 31/03/2015 ची शिल्लक रक्कम यामध्ये रक्कम रु.315942120 इतका फरक दिसून येतो. अर्धसमास पत्र क्र. 207 दि.14/06/2016 रोजी निर्गमित केली असता विभागाचे उत्तर प्राप्त झाले नाही.

याबाबत खालील अनियमितता आहेत.

1) राष्ट्रीय लेखा संहितेच्या परिच्छेद क्र. 29.11 व प्रकरण 30 मध्ये नमुद केल्यानुसार महिना अखेरीस रोख पुस्तकातील शिल्लक रक्कम व बॅक पुस्तकातील शिल्लक रक्कम यांचा ताळमेळ घेणे आवश्यक असतांना ताळमेळ घेतलेला नाही.

2) राष्ट्रीय लेखा संहिता नियम पुस्तिकेच्या प्रकरण 5 मधील परिच्छेद 5.3 च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेने विहीत नमुन्यात रोखपुस्तक व इतर नोंदवहया ठेवून त्यामध्ये क्रमवार दिनांक सहित नोदीं करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

3) राष्ट्रीय लेखा संहिता प्रकरण 29 मधील परिच्छेद 29.5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे रोख पुस्तक रोजच्या रोज बंद करूण शिल्लक रक्कम पुढील तारखेला आरंभिची रक्कम म्हणून दर्शविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 49, Hmm No : 207)

## *3 जल उपकर (प्रदूषण व प्रतिबंध नियमन) अधिनियम 1977 नुसार आकारलेला जल उपकर विहित कालावधीत भरणा न केल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाने आकारलेल्या रु.57,78,051 दंडनीय व्याजबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5758051.00/-

***प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी मूल्य निर्धारण करून जल उपकाराची रक्कमेची मागणी करूनही प्रदीर्घ कालावधीसाठी अशा रक्कमेचा महापालिकेने भरणा न केल्याने महापालिकेवर थकीत रकमेवर वार्षिक 24%***

***दराने रु.57,78,051 चा दंडनीय व्याजाचा नाहक आर्थिक भार पडणे, प्रत्येक वर्षाच्या अर्थसंकल्पात जल उपकराची तरतूद असताना थकबाकीचा भरणा केलेला नाही. त्यामुळे वर्षागणिक व्याजाच्या रकमेत वाढ होत असून दंडनीय व्याजाचा आर्थिक भार वाढत जात असताना कोणतीही कार्यवाही न करणे.***

जल उपकर (प्रदूषण व प्रतिबंध नियमन) अधिनियम 1977 नुसार महापालिका क्षेत्रात वापरलेल्या पाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जल उपकराची आकारणी करून मूल्य निर्धारण आदेश निर्गमित करून जल उपकर भरणा करणेस महापालिकेस सूचित करणेत येते. सदर अधिनियमाच्या कलम 10 नुसार मूल्य निर्धारण आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यात उपकराचा भरणा न केल्यास दरमहा 2% व्याजाची आकारणी करणेची आहे. महापालिकेने जल उपकर आकारणी व भरणा करणे व प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील पत्रव्यवहार याबाबतची लेखापरीक्षणात सादर केलेल्या नस्तीची तपासणी करता नस्तीतील म.प्र.नि.मंडळ यांचे पत्र क्र.121 दि.27.03.2014 नुसार उपकाराची रु.61,87,251 थकबाकी असल्याचे दिसून येते. सदर पत्रातील तपशिलानुसार एकूण थकबाकीत रु.57,78,051 दंडनीय व्याजाचा समावेश आहे. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.54 दि. 30.07. 2016 निर्गमित करण्यात आले होते. याबाबत विभागाने दिलेले (क्र.व दिनांक नाही.) दि.07.09.2016 रोजी प्राप्त झालेले उत्तर तपासून लेखापरीक्षणात पुढीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील याबाबतचे पत्र क्र.1026 दि.18.09.2014 च्या पत्रानुसार व्याजाच्या एकूण 57,78,051 रकमेपैकी रु.29,95,433 हि व्याजाची रक्कम दि. 29.07.1984 ते दि.19.05.1999 या कालावधीची असून उर्वरित रु.27,82,618 हि 20.05.1999 ते 31.12.2013 या कालावाधीतील असल्याचे नमूद केले आहे. जल उपकर (प्रदूषण व प्रतिबंध नियमन) अधिनियम 1977 मध्ये व्याज माफीची कोणतीही तरतूद नाही व अधिनियमाच्या कलम 12 नुसार थकबाकीची रक्कम जमीन महसूल म्हणून वसूल करणेची तरतूद आहे. मंडळाकडून वेळोवेळी मूल्य निर्धारण करून जल उपकाराची रक्कमेची मागणी करूनही प्रदीर्घ कालावधीसाठी अशा रक्कमेचा महापालिकेने भरणा न केल्याने महापालिकेवर थकीत रकमेवर वार्षिक 24% दराने रु.57,78,051 चा दंडनीय व्याजाचा नाहक आर्थिक भार पडला आहे.

2) महानगरपालिकेने वेळोवेळी आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याचे कारण नमूद करून व्याजाच्या रक्कमेचा भरणा करणे टाळले आहे. याबाबत प्रत्येक वर्षाच्या अर्थसंकल्पात जल उपकराची तरतूद असताना थकबाकीचा भरणा केलेला नाही. त्यामुळे वर्षागणिक व्याजाच्या रकमेत वाढ होत असून दंडनीय व्याजाचा आर्थिक भार वाढत आहे.त्यामुळे याबाबत त्वरित कार्यवाही होणे आवश्यक आहे. विभागाने उत्तरात प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देयके प्राप्त झाल्यावर अदायगीच्या कार्यवाहीसाठी विहित वेळेत देयके सादर केली आहेत असे नमूद केले आहे. तथापि जल उपकाराचा भरणा प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केलेला नसल्याने उत्तराद्वारे केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.57,58,051.

DATBEPM6101 (Ref No : 2, Hmm No : 54)

## *4 कॅम्प 1 ते 3 व कॅम्प 4 व 5 मधील तीव्र पाणी टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा करणेसाठी भाडे तत्वावर 7000 लिटर क्षमतेच्या टँकर पुरवठा करणेसाठी काढलेल्या दोन निविदेतील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 11**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 11999395.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9768545.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2230850.00/-

***निविदेस मुदतवाढ देण्यासाठी शहर अभियंता यांनी आयुक्त यांचेकडे पाठविलेल्या प्रस्तावास आयुक्त यांची मंजुरी प्राप्त केले बाबत नस्तीतील पुढील पान नस्तीसोबत नसणे, निविदाकारानी पात्रतेबाबत निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे नस्तीसोबत नसणे, तपासणीस सादर केलेल्या दोन नस्त्यासोबत मंजूर निविदा अटी/ शर्ती जोडलेल्या नसणे तसेच निविदाकारानी निविदेसोबत अपलोड केलेल्या निविदा अटी/ शर्ती नस्तीसोबत नसणे, लेखापरीक्षणात सादर केलेल्या निविदा अटी/ शर्तीतील सर्वसाधारण अटी व शर्ती च्या अट क्र.15 नुसार दुसऱ्या निविदेतील दर कमी असल्यास दोनही निविदास सदर लघुत्तम दर बंधनकारक असतील असे नमूद केले असताना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने महापालिकेस रु.19,27,279 जादा खर्चाचा भार सोसावा लागणे, मुंबई मुद्रांक अधिनियम मध्ये झालेल्या 2006 मधील सुधारणानुसार करारनामा रु.8,000 च्या मुंद्राक पेपरवर करणे आवश्यक असताना तो रु.100 च्या मुद्रांक पेपरवर केल्याने रु.7,900 ची मुद्रांक शुल्काची कमी वसुली, स्थायी समितीने कलम 73 नुसार दि.05.02.2014 रोजी दरांना मंजुरी दिली असताना त्यापूर्वीच मे.प्रथम यांना दि.23.01.2014 रोजी कार्यादेश देणे व मे. हरदीप यांना दि.01.07.2014 रोजी विलंबाने कार्यादेश देणे, वाहनांच्या परमीटची मुदत संपली असताना त्यांची निविदा ग्राह्य ठरवून स्वीकारणे, कार्यादेशाच्या व करारनाम्याच्या अनु.1,7 व 8 या अटीनुसार ठेकेदाराने त्यांना नेमून दिलेल्या भागात पाणीपुरवठा केला नसल्याने त्यांची सुरक्षा अनामत जप्त करून त्यांचा ठेका रद्द करणेची कार्यवाही न करणे, नस्तीसोबत तसेच प्रमाणकासोबत 7000 लिटर वाहन क्षमतेबाबत आर.टी.ओ.चे प्रमाणपत्रे, पाणी भरणेच्या ठिकाणच्या पाणी भरलेच्या पावत्या, पाणी पुरवठा केलेल्या ठिकाणी पाणी पुरवठा करणेसाठी केलेली मागणी व त्यानुसार विभागाच्या अभियंत्यांनी ठेकेदारास दिलेले आदेश, पाणी पुरवठा झाल्याचे सबंधित वार्डमधील नगरसेवक अथवा लोकांच्या पोहोच, वाहनांची लॉगबुके इ. कागदपत्रे नसणे, कॅम्प 1 ते 3 मध्ये पाणीपुरवठा करणेस मे.हरदीप यांना कार्यादेश देणेत आले असताना मे.प्रथम यांनी पाणीपुरवठा करणे व त्यामुळे रु.50,671 चे जादा प्रदान होणे.***

महापालिका क्षेत्रातील कॅम्प 1 ते 3 व कॅम्प 4 व 5 मधील तीव्र पाणी टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा

करणेसाठी भाडे तत्वावर 7000 लिटर क्षमतेच्या टँकर पुरवठा करणेसाठी काढलेल्या दोन स्वतंत्र निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- स्थायी समिती ठ.क्र.77 दि.28.03.2013
2. अंदाजपत्रकिय रक्कम- 1) 1 ते 3 कॅम्प रु.85,52,790 (31,677 फेऱ्या दर रु.270 प्रती फेरा.)
   2) 4 ते 5 कॅम्प रु.89,10,000 (33,000 फेऱ्या दर रु.270 प्रती फेरा.)
3. मंजूर निविदा रक्कम- 1) 1 ते 3 कॅम्प रु.88,86,349(3.90% जादा दर.रु.280.53 प्रती फेरा.)
   2) 4,5 कॅम्प रु.1,10,12,760(23.60% जादा दर दर.रु.333.70 प्रती फेरा)
4. निविदा मंजूर - स्थायी समिती ठराव क्र. 1) 79 दि.05.02.2014, 2) 80 दि.05.02.2014
5. लेखाशिर्ष - क अंदाजपत्रक ब-4 महसुली खर्च
6. निधी - म.न.पा.
7. ठेकेदाराचे नाव -1) 1 ते 3 कॅम्प मे.हरदीप रोडवेज कल्याण.
   2) 4 ते 5 कॅम्प मे.प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि. उल्हासनगर.
8. कार्यादेश-1) क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./864 दि.01.07.2014 मे.हरदीप रोडवेज.
   2) क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./132 दि.23.01.2014 मे.प्रथम मल्टी प्रोजेक्ट.
9. करारनामा- 1) 1 ते 3 कॅम्प रु.1000 2) 4 ते 5 कॅम्प - नस्तीत उपलब्ध नाही.
10. कामाचा कालावधी - 12 महिने.
11. एकूण खर्च-अनु.क्र.1 वरील ठेकेदारास प्रदान रु. निरंक.

अनु.क्र. 2 वरील ठेकेदारास प्रदान रु.1,19,99,395. एकूण 16 प्रमाणके.

एकूण रु.1,19,99,395.

सदर खर्चाबाबत लेखापरीक्षणात तपासणीस सादर केलेल्या निविदा नस्त्या, अंदाजपत्रके,निविदा अटी/ शर्ती, करारनामे, कार्यादेश व प्रमाणके यांची पडताळणी करता आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.63 दि.22.08.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) विभागाच्या नस्तीतील दि.13.06.2013 च्या टिप्पणी नुसार दोनही कामासाठी दि.17.05.2013 रोजी निविदा मागविण्यात आल्यानुसार शेवटच्या दिवशी दि.12.06.2013 रोजी फक्त एकच निविदा प्राप्त झाल्याने मुदतवाढ देण्यासाठी शहर अभियंता यांनी आयुक्त यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे. तथापि आयुक्त यांची मान्यता प्राप्त केले बाबत पुढील पान नस्तीसोबत नसल्याने मुदतवाढीस आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाल्याची पडताळणी करता आली नाही.

2) मुदत वाढीनुसार प्राप्त तीन निविदा पात्र ठरल्याने त्यांचे दरांचे लिफाफे दि.14.10.2013 रोजी उघडण्यात आले. नस्तीसोबत तीनही निविदाकार 1 ते 15 पात्रतेच्या आवश्यक बाबी पूर्ण करीत असल्याचे विवरण जोडले आहे. तथापि या बाबत तीनही निविदाकारानी पात्रतेबाबत निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.त्यामुळे निविदाकारांच्या पात्रतेची पडताळणी करता आली नाही.

3) विभागाने तपासणीस सादर केलेल्या दोन नस्त्यासोबत मंजूर निविदा अटी/शर्ती जोडलेल्या नाहीत, तसेच निविदाकारानी निविदेसोबत अपलोड केलेल्या निविदा अटी/शर्ती नस्तीसोबत नाहीत. विभागाने याबाबत दोन कोऱ्या निविदा अटी/शर्ती च्या प्रती (ज्यावर कोणाच्याही सह्या नसलेल्या व त्या मंजूर

असल्याच्या सह्या नसलेल्या.) सादर केल्या. त्यामुळे अटी/शर्तीनुसार कार्यवाही केल्याची पडताळणी करता आली नाही.

4) 1 ते 3 कॅम्पच्या निविदेबाबत मे. हरदीप रोडवेज,कल्याण यांची 4% जादा दराची व 4 ते 5 कॅम्पच्या निविदेबाबत मे.प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि. उल्हासनगर यांची 23.60% जादा दराची निविदा लघुत्तम होत्या. निविदा जादा दराच्या असल्याने त्यांच्या सोबत दर कमी करणेस वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार 1 ते 3 कॅम्पच्या लघुत्तम दराच्या निविदाकाराने 0.10% दर कमी करून 3.90% जादा दराने काम करणेस तयारी दर्शविली, तथापि 4 ते 5 कॅम्पचे लघुत्तम दराचे निविदाकार मे.प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि.उल्हासनगर यांनी दर कमी करणेस नकार दिला. त्यानुसार सदरचे दरांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 2012-13 च्या दरसूचीनुसार पाणी भरणेंच्या ठिकाणापासूनच्या अंतरानुसार व बाजारभावानुसार डीझेलचे दर घेवून दर पृथ:करण करून अशा दरांच्या तुलनेत निविदाकाराने नमूद केलेले दर कमी असून ते वाजवी असल्याचे नमूद करून मान्य केले आहेत.
विभागाने लेखापरीक्षणात उपरोक्त नमूद सादर केलेल्या निविदा अटी/शर्तीतील जनरल टर्म्स व कंडीशन च्या अट क्र.15 नुसार दुसऱ्या निविदेतील दर कमी असल्यास दोनही निविदास सदर लघुत्तम दर बंधनकारक असतील असे नमूद केले असताना 1 ते 3 कॅम्पच्या निविदेबाबत मे. हरदीप रोडवेज, कल्याण यांची 4% जादा दर हे दोनही निविदेत लघुत्तम असताना 4 ते 5 कॅम्पच्या निविदाकार मे.प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि. उल्हासनगर यांचे 23.60% जादा दर मान्य करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर अटीचा भंग झाल्याचे दिसून येते.याबाबत विभागाने कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नाही. परिणामी 4 ते 5 कॅम्पच्या निविदाकार मे.प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि. उल्हासनगर यांचे मंजूर दर 19.60% जादा दराने मान्य केल्याने 2014-15 अखेर केलेल्या खर्चानुसार महापालिकेस रु. 19,27,279 जादा खर्चाचा भार सोसावा लागला आहे.

5) मे.हरदीप यांची वार्षिक रु.88,86,359 ची निविदा मंजूर करून त्यांचे सोबत रु.100 च्या मुन्द्रांक पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम मध्ये झालेल्या 2006 मधील सुधारणानुसार करारनामा रु.8,000 च्या मुंद्राक पेपरवर करणे आवश्यक असल्याने कमी मुंद्राक शुल्क रु.7,900 सबंधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) मे.प्रथम यांची वार्षिक रु.1,10,12,760 ची निविदा मंजूर झाल्याने त्यांचे सोबत मुंबई मुद्रांक अधिनियमामध्ये झालेल्या 2006 मधील सुधारणानुसार रु.10,200 च्या मुद्रांकावर करारनामा केल्याची पडताळणी त्यांचा करारनामा नस्तीसोबत नसल्याने करता आली नाही. तसेच त्यांना कामाचे कार्यादेश दि.23.01.2014 रोजी दिल्याने एक वर्षाच्या मुदतीनंतर सुधारित रु.10,200 च्या मुद्रांकावर करारनामा केल्याची व अधिनियमाच्या कलम 73 नुसार स्थायी समितीची मुदतवाढीसाठी सुधारित मंजुरी घेतल्याची पडताळणी त्यांचा सुधारित करारनामा व सुधारित स्थायी समितीची मंजुरी नस्तीसोबत नसल्याने करता आली नाही.

7) दोनही निविदाकारांच्या दरास महानगरपालिका अधिनियम कलम 73 नुसार स्थायी समितीने दि.05. 02.2014 रोजी मंजुरी दिली असताना त्यापूर्वीच मे.प्रथम यांना दि.23.01.2014 रोजी कार्यादेश देणेत आले आहेत. तसेच स्थायी समितीने दि.05.02.2014 रोजी दर मंजूर केले असताना मे.हरदीप यांना दि.01.07.2014 रोजी विलंबाने कार्यादेश देणेत आले आहेत. मे.हरदीप यांना टँकरने पाणी वाहतूक केल्याचे कार्यादेशापूर्वीच्या कालावधीचे प्रदान केल्याचे प्रमाणकावरून दिसून येत नसले तरी विलंबाने कार्यादेश देणेबाबतची कारणे नस्तीत नमूद नाहीत.

8) दोनही नस्तीसोबत निविदाकारांचे टँकर नंबर, आर.सी.बुक, परमीट, फिटनेस, विमा, पी.यु.सी.व उलाढाल याचा तपशील नमूद करून त्याखाली विभागाच्या सर्व अभियंत्यांच्या सहया आहेत. सदर तपशीलात मे.हरदीप यांचे अनु.3 वरील वाहन क्र.एमडब्लूयु-7123 चे परमीट दि. 25.11.2013 पर्यंत व अनु.क्र.9 वरील वाहन क्र.एमएच-05-195 चे परमीट दि.07.04.2013 पर्यंत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.वाहनांच्या परमीटची मुदत संपली असताना त्यांची निविदा ग्राहय ठरवून स्वीकारणेत आली आहे.

9) प्रमाणकांची पडताळणी करता मे. हरदीप यांना 2014-15 अखेर त्यांना दिलेल्या उपरोक्त कार्यादेशानुसार कोणत्याही कालावधीचे प्रदान करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांनी कार्यादेश व करारनाम्यानुसार पाणीपुरवठा केल्याची पडताळणी करता आली नाही. याबाबत कार्यादेशाच्या व करारनाम्याच्या अनु.1,7 व 8 या अटीनुसार त्यांना सबंधित अभियंत्याने कॅम्प 1 ते 3 मधील पाण्याच्या टंचाई भागात पाणीपुरवठा करणेस निर्देश दिले असताना त्यांनी पाणीपुरवठा केला नसल्यास त्यांची सुरक्षा अनामत जप्त करून त्यांचा ठेका रद्द करणेची कार्यवाही करणेत आलेली नाही. त्यामुळे त्यांनी भरलेली सुरक्षा अनामतीची रक्कम रु.2,45,000 वसुलपात्र ठेवणेत येत आहे.

10) नस्तीतील कागदपत्रांची तसेच प्रमाणकांची पडताळणी करता कार्यादेश व करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे नस्तीसोबत 7000 लिटर वाहन क्षमतेबाबत आर.टी.ओ.चे प्रमाणपत्रे, पाणी भरणेच्या ठिकाणच्या पाणी भरलेच्या पावत्या,पाणी पुरवठा केलेल्या ठिकाणी पाणी पुरवठा करणेसाठी केलेली मागणी व त्यानुसार विभागाच्या अभियंत्यांनी ठेकेदारास दिलेले आदेश, पाणी पुरवठा झाल्याचे सबंधित वार्डमधील नगरसेवक अथवा लोकांच्या पोहोच, वाहनांची लॉगबुके इ.कागदपत्रे नसल्याने प्रदान रक्कमांच्या अचूकतेची खात्री करता आली नाही.

11) प्र.क्र.3043 दि.20.11.2014 नुसार मे.प्रथम यांना कॅम्प 1 ते 3 मधील वार्ड 10 मध्ये दि. 29.08.2014 ते 07.09.2014 या कालावधीत 308 टँकर फेऱ्यासाठी रु.333.70 प्रतीफेरा दराने रु.1,02,780 चे प्रदान करणेत आले आहे. तसेच प्र.क्र.3817 दि.16.01.2015 नुसार मे.प्रथम यांना दि.01.09.2014 ते 30.10.2014 या कालावधीसाठी 645 टँकर फेऱ्यासाठी रु.333.70 प्रतीफेरा दराने रु.2,15,236 चे प्रदान करणेत आले आहे. कॅम्प 1 ते 3 मध्ये पाणीपुरवठा करणेस मे.हरदीप यांना कार्यादेश देणेत आले असताना मे.प्रथम यांनी पाणीपुरवठा केला आहे. याबाबत विभागाने कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नाही.

कॅम्प 1 ते 3 मध्ये पाणीपुरवठा करणेसाठी रु.280.53 प्रतीफेरा दर निश्चित केला असताना रु.333.70 प्रतीफेरा दराने प्रदान केल्याने रु.53.17 प्रतीफेरा दराने 953 फेऱ्याचे झालेले जादा प्रदान रु.50,671 ची संबंधिताकडून वसुली होणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.22,30,850

आक्षेपाधीन रक्कम रु.97,68,545

DATBEPM6101 (Ref No : 3, Hmm No : 63)

## *5 कॅम्प 1 ते 3 मधील पाणीपुरवठा दैनंदिन देखभाल,दुरुस्ती व वितरण व्यवस्थेसाठी मिस्त्री व मजूर पदाचे कर्मचारी 01.06.2012 ते 01.12.2013 या सहा महिने कालावधीसाठी पुरवठा करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 578062.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 537597.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 40465.00/-

***महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2011-12 च्या जिल्हा दरसूचीतील मजूर व मिस्त्री यांचे दैनिक वेतन दराबाबत दरसूची लेखापरीक्षणात उपलब्ध न होणे, मोजमाप पुस्तिका क्र.20 व मिस्त्री तसेच मजूर यांचे उपस्थिती अहवाल तपासणीस उपलब्ध न होणे, प्रत्यक्ष काम झाल्यानंतर प्रशासकीय मंजुरी, कार्यादेश व करारनामा करून कामाचे प्रदान करणेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात कोणतीही तरतूद नसताना नियमबाहय प्रदान करणे, केलेल्या साविदेंबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात न कळविणे,शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्र. प्र.क्र.-1088/ कामगार 7-अ दि.17 जून 2010 अन्वये ठेकेदाराच्या देयकातून 1% कामगार कल्याण उपकर कपात करणे आवश्यक असताना तसेच विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे दि.04/04/2012 च्या नोटीफिकेशन नुसार दि.1/4/2012 पासुन 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक असताना देयकातून कामगार कल्याण उपकर व कार्यकंत्राट कर एकूण रु.34,684 कपात न करणे.***

कॅम्प 1 ते 3 मधील पाणीपुरवठा दैनंदिन देखभाल, दुरुस्ती व वितरण व्यवस्थेसाठी अस्तित्वातील कर्मचारी अपुरा असल्याने पाण्याची गळती दूर करणे, दुषित पाण्याच्या तक्रारी वेळीच निपटारा करणे, वितरण व्यवस्थेतील व्हॉल्व्ह ऑपरेट करणे यासाठी ठेकेदाराकडून मजूर व मिस्त्री पुरविणेच्या केलेल्या कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- महापालिका अतिरिक्त आयुक्त दिनांक 18.11.2013.
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.5,78,965 ता.म.क्र.97 दि.20.11.2013 कार्यकारी अभियंता.
3. मंजूर निविदा रक्कम रु.5,78,965. जिल्हा मजूर कामगार सहकारी संघ,ठाणे यांची शिफारस.
4. लेखाशिर्ष - “क” अंदाजपत्रक बी-5 पाणीपुरवठा साहित्य खरेदी(दुरुस्ती), महसुली खर्च.
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे. हरेकृष्ण मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित, उल्हासनगर.
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./205 दि.01.02.2014 (अंदाजपत्रकीय दर)
8. करारनामा-रु.100.

9. कामाचा कालावधी - 180 दिवस.

10. काम पूर्ण दि.-01.12.2013

11. एकूण खर्च रु.5,78,062(प्र.क्र.810 दि.05/06.2014 )

12. मोजमाप पुस्तक क्र.-16 पृ.क्र.20 ते 23 व 44 ते 47

सदर कामाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मंजुरी नस्ती व प्रमाणक यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.65 दि.22/08/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2011-12 च्या जिल्हा दरसूचीतील मजूर व मिस्त्री यांचे दैनिक वेतन दरानुसार करण्यात आले आहे. तथापि सदरची दरसूची लेखापरीक्षणात उपलब्ध न झाल्याने अनुक्रमे दर रु.346.50 व रु. 399.30 अचूक असल्याची खात्री करता आली नाही.

2) कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिका क्र.20 पृ.क्र.15 व 16 वर घेतल्याचे देयकात नमूद करण्यात आले आहे. तथापि सदर मोजमाप पुस्तिका तसेच मिस्त्री व मजूर यांचे उपस्थिती अहवाल तपासणीस उपलब्ध न झाल्याने केलेले प्रदान अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) कामाची अंदाजपत्रकाप्रमाणे दि.01.06.2012 ते दि. 01.12.2013 या सहा महिने कालावधीसाठी मजूर व मेस्त्री पुरवठा करणेच असताना कामास अतिरिक्त आयुक्त यांची दि.18.11.2013 रोजी म्हणजेच कामगार पुरवठा करणेचा कालावधी संपत असताना प्रशासकीय मंजुरी घेतली आहे. प्रत्यक्ष कामाचा कार्यादेश दि.01.02.2014 रोजी व करारनामा दि.01.02.2014 रोजी म्हणजेच कामाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देण्यात आला आहे. सदर कार्यादेशात व करारनाम्यात कामाचा कालावधी दि.01.06.2012 ते दि.01.12.2013 असा सहा महिने नमूद करण्यात आला आहे. त्यामुळे अशाप्रकारे प्रत्यक्ष काम झाल्यानंतर प्रशासकीय मंजुरी, कार्यादेश व करारनामा करून कामाचे प्रदान करणेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात कोणतीही तरतूद नसताना नियमबाह्य प्रदान केले आहे. विभागाने याबाबत कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नसल्याने केलेल्या प्रदानाची रक्कम रु.5,78,062 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

4) केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

5) कामगारांचा विमा काढल्याची पावती पाहता ती दि.12.03.2014 ची दिसते. म्हणजेच कामाच्या कालावधीचा कामगारांचा विमा काढण्यात आला नाही. नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जी.ई.एन./1098 /1357/प्र.क्र-166/98, नवि-24 दि.03/11/2003 अन्वये कामांचा व कामगारांचा विमा न काढल्यास देयकातून 1% विमा रक्कम रु.5,781 कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने विमा रक्कम रु.5,781 सबंधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्र. प्र.क्र.-1088/कामगार 7-अ दि.17 जून 2010 अन्वये ठेकेदाराच्या देयकातून 1% कामगार कल्याण उपकर कपात करणे आवश्यक असताना तसेच विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे दि.04/04/2012 च्या नोटीफिकेशन नुसार दि.1/4/2012 पासुन 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक असताना देयकातून कामगार कल्याण उपकर व कार्यकंत्राट कर कपात केला नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रु.5,781 व कार्यकंत्राट कराची रु.28,903

एकूण रु.34,684 सबंधीताकडून वसूल करून शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.40,465

आक्षेपाधीन रक्कम रु. 5,37,597

DATBEPM6101 (Ref No : 5, Hmm No : 65)

## *6 कॅम्प 4 व 5 करिता जि.आय.पाईप, व्हॉल्व्हज व स्पेशियल्स चा पुरवठा करणे कामातील उणीवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 05**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 790795.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 790795.00/-

***महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2012-13 ची जिल्हा दरसूची तसेच सिंगल फेज वेल्डिंग मशीन पुराविणेचे रु.16,500 प्रतीनग दराबाबत बाजारभाव तपासणीस उपलब्ध न करणे,अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे साहित्य पुरविल्याच्या नोंदी मोजमाप पुस्तिका क्र.85-बी पृ.क्र.55 व 56 वर घेतल्याबाबत मोजमाप पुस्तिका तपासणीस उपलब्ध न करणे, अंदाजपत्रकात बाब क्र.1 व 2 नुसार जि.आय.पाईप, स्लूस व बटरफ्लाय व्हॉल्व्ह यांचे इन्स्पेक्शन अहवाल घेणेचे नमूद असताना प्रमाणकासोबत इन्स्पेक्शन अहवाल नसताना देयकाचे प्रदान करणे, प्राप्त साहित्याच्या नोंदी साठा नोंदवहीत घेवून त्यांचा विनियोग नमूद केलेबाबत साठा नोंदवही तसेच दोन नग सिंगल फेज वेल्डिंग मशीनच्या नोंदीबाबत मालमत्ता नोंदवही तपासणीस उपलब्ध न होणे, केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात न कळविणे.***

कॅम्प 4 व 5 मधील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील जुने पाईप रसायनयुक्त पाण्यामुळे झीजल्याने पाण्याची गळती होत असल्याने व त्यामुळे व्हॉल्व्हची खोलबंद रोज वारंवार होत असल्याने झीज होऊन ते खराब होत असल्याने जि.आय.पाईप, व्हॉल्व्ह तातडीने बदली करणेसाठी त्यांचा साठा करण्यासाठी आवश्यकते एवढे पाईप, व्हॉल्व्हज व स्पेशियल्स खरेदी करणेचे काम करण्यात आले आहे.सदर कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- महापालिका अतिरिक्त आयुक्त दिनांक 16.01.2014.
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.9,95,370 ता.मा.क्र.158 दि.06.01.2014 कार्यकारी अभियंता.
3. मंजूर निविदा रक्कम रु. 9,95,370. जिल्हा मजूर कामगार सहकारी संघ,ठाणे यांची शिफारस.

4. लेखाशिर्ष - “क” अंदाजपत्रक बी-5 पाणीपुरवठा साहित्य खरेदी (दुरुस्ती), महसुली खर्च
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे. बालाजीकृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित, उल्हासनगर.
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./ई.ई./286 दि.11.02.2014 (अंदाजपत्रकीय दर)
8. करारनामा- रु.100.
9. कामाचा कालावधी - 60 दिवस.
10. काम पूर्ण दि.-19.03.2014
11. एकूण खर्च रु.7,90,795 (प्र.क्र.724 दि.28/05.2014 व प्र.क्र.786 दि.02/06.2014 )

12. मोजमाप पुस्तक क्र.- 85-बी पृ.क्र.55 ते 56.

सदर कामाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मंजुरी नस्ती व प्रमाणक यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.66 दि.22/08/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1)कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 2012-13 च्या जिल्हा दरसूचीतील विविध आकाराच्या जि.आय.पाईप कप्लरसह, स्लूस व बटरफ्लाय व्हॉल्व्ह तसेच फ्लांज व स्पेशियल्स च्या दरानुसार करण्यात आले आहे.तथापि सदरची दरसूची लेखापरीक्षणात उपलब्ध न झाल्याने अंदाजपत्रकात नमूद दर अचूक असल्याची खात्री करता आली नाही. तसेच अंदाजपत्रकात बाब क्र.4 नुसार 2 नग सिंगल फेज वेल्डिंग मशीन पुराविणेचे रु.16,500 प्रतीनग दर बाजारभावानुसार घेणेत आले आहेत. तथापि याबाबत मागविलेले बाजारभाव नस्तीसोबत नाहीत.

2) साहित्य अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे पुरविल्याच्या नोंदी मोजमाप पुस्तिका क्र.85-बी पृ.क्र.55 व 56 वर घेतल्याचे देयकात नमूद करण्यात आले आहे. तथापि सदर मोजमाप पुस्तिका तपासणीस उपलब्ध न झाल्याने केलेले प्रदान अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) कामाच्या अंदाजपत्रकात बाब क्र.1 व 2 नुसार जि.आय.पाईप, स्लूस व बटरफ्लाय व्हॉल्व्हज यांचे इन्स्पेक्शन अहवाल घेणेचे नमूद असताना प्रमाणकासोबत इन्स्पेक्शन अहवाल नसताना देयकाचे प्रदान करणेत आले आहे.

4) प्राप्त साहित्याच्या नोंदी साठा नोंदवहीत घेवून त्यांचा विनियोग नमूद केलेबाबत साठा नोंदवही तपासणीस उपलब्ध झाली नाही.तसेच दोन नग सिंगल फेज वेल्डिंग मशीनची नोंद महापालिकेच्या मालमत्ता नोंदवहीत घेतल्याची पडताळणी सदर नोंदवही अभावी करता आली नाही.

5) केलेल्या संविदेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.7,90,795

DATBEPM6101 (Ref No : 6, Hmm No : 66)

## *7 महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी विविध व्यासाच्या जि.आय.जलवाहिन्या नवीन टाकणे तसेच जुन्या जलवाहिन्या काढून नवीन जि.आय.जलवाहिन्या टाकणे या मजूर कामगार सोसायटी मार्फत केलेल्या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5008728.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4860146.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 148582.00/-

***कामांच्या अंदाजपत्रकात नमूद बाबींच्या दराबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2010-11 व 2012-13 च्या जिल्हा दरसूच्या तपासणीस उपलब्ध न होणे, कामांच्या मोजमाप पुस्तिका क्र.अनुक्रमे सी/2/3, सी-2, 60-सी, 01, 04, 01, 06, 06, सी-2, 19, 05, 63-सी, 02, 04 व 03 लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध न करणे, महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 कलम 2(2) नुसार कामासाठी निविदा मागविणे आवश्यक असताना निविदा न मागविता नियमबाह्यपणे कामे मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करणे,कामांच्या केलेल्या संविदाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात न कळविणे, ठेकेदारांना कामाचे आदेश देणेपुर्वी त्यांचे कडून बी-1 निविदेतील अटीशर्ती मान्य असलेबाबत निविदा अटीशर्तीवर स्वाक्षऱ्या न घेणे, इसारा रक्कम न घेणे व करारनाम्यात बी-1 निविदेच्या अटीशर्ती मान्य असल्याचे कलम व दोष दायित्व कालावधीचे कलम नमूद न करणे, कामाच्या अंदाजपत्रकात विविध व्यासाचे मेडियम क्लास जि.आय. पाईप पुरविणे या बाबीत पाईपचे इन्स्पेक्शन करणे अंतर्भूत असताना इन्स्पेक्शन अहवाल प्रमाणका सोबत नसताना देयकाचे प्रदान करणे, पाईपलाईन कामाचे 15% प्रदान हायड्रोलिक टेस्ट दिल्यानंतर करणे आवश्यक असताना ठेकेदारास एकाचवेळी हायड्रोलिक टेस्ट शिवाय कामाचे प्रदान करणे, जुने पाईप महापालिकेच्या भांडारात जमा केल्याबाबतचे अभिलेखे तपासणीस उपलब्ध न होणे, अनु.क्र.1 वरील कामात 1% विमा,1% कामगार उपकर व 5% कार्यकंत्राट कर ची एकूण रु.13,227 ची कपात न करणे, जुन्या पाईप लाईन काढून नवीन टाकणेच्या कामाच्या खोदाईत मऊ खडक व कठीण खडक लागणे शक्यच नसल्याने अशा कामाच्या खोदाईत सदर बाबी समाविष्ट केल्याने जादा दरानुसार प्रदान केल्याने रु.1,35,355 चे जादा प्रदान,केलेल्या कामांच्या नोंदी पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेच्या इतिहास नोंदवहीत न घेणे.***

महानगरपालिका क्षेत्रातील 1 ते 5 कॅम्प मध्ये विविध ठिकाणी विविध व्यासाच्या जि.आय.जलवाहिन्या नवीन टाकणे तसेच जुन्या जलवाहिन्या काढून नवीन जि.आय.जलवाहिन्या टाकणेची खालील तपशीलात नमूद कामे मजूर कामगार सोसायटी मार्फत केली आहेत.सदर कामांची खर्च प्रमाणके व

त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.80 दि.29/08/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक | ठेकेदार/मजूर कामगार संस्था. | प्र.क्र./तारीख | खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जि.आय.पाईप बदलणे.प्र-1 | 1,88,953 | मे.झा.पी.कंपनी | 3399/17.12.14 | 1,88,953 |
| 2 | जि.आय.पाईप नवीन टाकणे. | 1,69,815 | मे.ओमसाई म.का.स. | 4949/31.3.15 | 1,69,815 |
| 3 | जि.आय.पाईप नवीन टाकणे. | 3,29,130 | मे.त्रिशूल म.का.स. | 5383/1.3.14 | 3,29,140 |
| 4 | जि.आय.पाईप नवीन टाकणे. | 4,69,228 | धनलक्षीमी म.का.स. | 5807/18.3.14 | 4,69,228 |
| 5 | जि.आय.पाईप नवीन टाकणे. | 1,99,585 | मे.अनंत म.का.स. | 5802/11.3.14 | 1,99,585 |
| 6 | जि.आय.पाईप बदलणे.प्र-1,2 | 2,99,960 | मे.जयहिंद म.का.स. | 4892/30.3.15 | 2,99,960 |
| 7 | जि.आय.पाईप नवीन टाकणे. | 1,11,711 | मे.गीतांजली का.स. | 4644/17.3.15 | 1,11,711 |
| 8 | जि.आय.पाईप बदलणे.प्र-3 | 1,46,800 | मे.गीतांजली का.स. | 4644/17.3.15 | 1,46,800 |
| 9 | जि.आय.पाईप बदलणे.प्र-1, | 3,43,430 | मे.सिद्धनाथ म.का.स, | 4631/16.3.15 | 3,43,429 |
| 10 | जि.आय.पाईप बदलणे.ओ.टी. | 2,10,000 | विजयालक्ष्मी का.स. | 3717/13.1.15 | 2,08,875 |
| 11 | जि.आय.पाईप नवीन टाकणे. | 2,29,950 | विजयालक्ष्मी का.स. | 3709/12.1.15 | 2,27,937 |
| 12 | जि.आय.पाईप बदलणे.प्र.5 | 3,00,485 | विजयालक्ष्मी का.स. | 3660/12.1.15 | 3,00,485 |
| 13 | जि.आय.पाईप बदलणे.प्र.3 | 5,43,130 | आशीर्वाद म.का.स. | 3081/24.11.14 | 5,48,130 |
| 14 | जि.आय.पाईप नवीन टाकणे. | 5,74,805 | मे.वडार म. का.स. | 1997/2.9.14 | 5,74,805 |
| 15 | जि.आय.पाईप नवीन टाकणे. | 5,93,590 | शीलालेख म.का.स. | 1996/2.9.13 | 5,93,582 |
| 16 | जि.आय.पाईप बदलणे.प्र.5 | 2,98,100 | मे.आरती म का.स. | 5890/29.3.14 | 2,96,293 |
| | | | | एकुण रु. | 50,08,728 |

1) उपरोक्त कामांची अंदाजपत्रके महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2010-11 व 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार करण्यात आली आहेत. तथापि सदरच्या दोनही दरसूच्या तपासणीस उपलब्ध न केल्याने अंदाजपत्रकात नमूद दरांच्या अचूकतेची पडताळणी करता आली नाही.

2) सदर कामांच्या मोजमाप पुस्तिका क्र.अनुक्रमे सी/2/3,सी-2,60-सी,01,04,01,06,06,सी-2,19,05,63-सी.,02,04 व 03 लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध झाल्या नाहीत.त्यामुळे प्रत्यक्ष मोजमाप पुस्तिकेत नमूद केलेल्या कामानुसार प्रदान झाल्याची पडताळणी करता आली नाही.

3) वरील सर्व कामांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांनी दिली आहे. तथापि केलेल्या खर्चाबाबत महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही. तसेच महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 कलम 2(2) नुसार कामासाठी निविदा मागविणे आवश्यक असताना निविदा न मागविता नियमबाह्यपणे कामे मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करणेत आली आहेत.

4)उपरोक्त केलेल्या कामापैकी अनु.क्र.1 वरील काम वगळता उर्वरित कामे जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थांचे फेडरेशनच्या शिफारशीनुसार मजूर कामगार सहकारी संस्था मार्फत करून घेणेत

आली आहेत.तथापि कामाचे आदेश देणेपुर्वी त्यांचे कडून बी-1 निविदेतील अटी/शर्ती मान्य असलेबाबत निविदा अटी/शर्तीवर स्वाक्षऱ्या घेणेत आल्या नाहीत, तसेच त्यांचेकडून इसारा रक्कम घेणेत आलेली नाही. करारनाम्यात बी-1 निविदेच्या अटी/शर्ती मान्य असल्याचे कलम व दोष दायित्व कालावधीचे कलम नमूद करण्यात आलेले नाही.

5)कामाच्या अंदाजपत्रकात विविध व्यासाचे मेडियम क्लास जि.आय.पाईप पुरविणे या बाबीत पाईपचे इन्स्पेक्शन करणे अंतर्भूत असताना इन्स्पेक्शन अहवाल प्रमाणका सोबत नसताना देयकाचे प्रदान करणेत आले आहे.

6) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुच्यामधील सर्वसाधारण सूचना नुसार पाईपलाईन कामाचे 15% प्रदान हायड्रोलिक टेस्ट दिल्यानंतर करणे आवश्यक असताना ठेकेदारास एकाचवेळी हायड्रोलिक टेस्ट शिवाय कामाचे प्रदान करणेत आले आहे.

7)जुने गंजलेले, लिक असलेले खराब पाईप काढून नवीन पाईप टाकणेच्या कामात जुने पाईप भांडारात जमा केल्याचे उपलब्ध अभिलेख्यावरून दिसून येत नाही.

8) अनु.क्र.1 वरील कामात 1% विमा, 1% कामगार उपकर व 5% कार्यकंत्राट कर कपात केला नाही. त्यामुळे अशा कपातीची एकूण रक्कम रु.13,227 वसूल करून शासनाच्या सबंधित खाती जमा करणे आवश्यक आहे.

9) उपरोक्त सर्व कामात 25 मिमी ते 100 मिमी.चे पाईप पुरवून बसविणेत आले आहेत. कामांच्या अंदाजपत्रकात पाईप जमिनीत पुरणेसाठी जमिनीत 0.10 मी. माती मुरुमात खोदाई, 0.10 मी.मऊ खडकात खोदाई, 0.10 मी. कठिण खडकात अशी एकूण 0.30 मी. खोदाई करणेत आली आहे. व त्यानुसार यासाठी मातीमुरूम खोदाई, मऊ खडकात खोदाई व कठीण खडकात खोदाई चे 2012-13 च्या दरसूचीनुसार अनु.147.40 प्रती घ,मी.,487.30 प्रती घ.मी. व 896 प्रती घ.मी.दर प्रस्तावित करून त्याप्रमाणे प्रदान करणेत आले आहे. वास्तविक 0.30 मी.खोलीच्या खोदाईसाठी प्रत्येक ठिकाणी मऊ खडक व कठीण खडक लागणे सयुक्तिक वाटत नाही. जुन्या पाईप लाईन काढून नवीन टाकणेच्या कामाच्या खोदाईत मऊ खडक व कठीण खडक लागणे शक्यच नसल्याने अशा कामाच्या खोदाईत जादा दर लावून प्रदान केल्याने जादा प्रदान होत आहे. त्यामुळे अनु.क्र.6 वरील कामात रु.9,928, अनु.क्र.8 वरील कामात रु.8,817, अनु..क्र.9 वरील कामात रु.14,602, अनु.क्र.10 वरील कामात रु.22,829, अनु.क्र.12 वरील कामात रु.19,784 अनु.क्र. 13 वरील कामात रु.18,295 व अनु.क्र.16 वरील कामात रु.41,100 चे एकूण रु.1,35,355 चे जादा प्रदान झाले आहे. सदर जादा प्रदानाची सबंधीताकडून वसुली होणे आवश्यक आहे.

10) केलेल्या कामांच्या नोंदी पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेच्या इतिहास नोंदवहीत घेतल्याचे दिसून आले नाही.

वसूलपात्र रक्कम रु.1,48,582

आक्षेपाधीन रक्कम रु. 48,60,146

DATBEPM6101 (Ref No : 7, Hmm No : 80)

## *8 उल्हासनगर मनापांतर्गत एच.टी.पंपिंग स्टेशन चालविणेसाठी अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरविणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :WS-B-6(XIII) मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4020692.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4020692.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 437070.00/-

***मनपा कर्मचाऱ्यांकडून चालविण्यात येणाऱ्या बुस्टर पंपींग स्टेशन वरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या बुस्टर पंपींग स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यासाठी 2013-14 व 2014-15 मध्ये होणा-या खर्चास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 73(ड) नुसार मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता न घेता पुरवठादारास तोंडी आदेश देवून काम करुन घेण्यात आले आहेत. कंत्राटदाराशी केलेला करारनामा, पुरवठा केलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांचे हजेरीपत्रक, उपस्थिती अहवाल पडताळणीस उपलब्ध झाले नाहीत. कामगार कल्याण कर कपात करण्यात आलेला नाही. पुरवठादारास प्रदान केलेला सेवाकर शासनाकडे भरणा केलेल्याचे चलन सादर केलेले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामार्फत शहरातील वितरण वाहिन्यांच्या टोकाच्या भागात व उंच ठिकाणी पाणी पोहचत नसल्याने अशा ठिकाणी वितरण वाहिन्यावर विविध ठिकाणी बुस्टर पंप लावून पाणी खेचले जाते. यासाठी महापालिका क्षेत्रातील कॅम्प क्र.1 ते 3 मधील विविध बुस्टर पंपींपी स्टेशन, टप्पा क्र.1 कॅम्प क्र.1 ते 3 मधील बुस्टर पंपींग स्टेशन व टप्पा क्र.1 कॅम्प क्र.4 ते 5 मधील बुस्टर पंपींग स्टेशन अशा प्रकारे बुस्टर पंपींग स्टेशनची विभागणी करुन जाहिर निविदा मागवून मे.हर्षल टेक्निक, नासिक या कंत्राटदाराची निविदा मंजूर करुन पंपिंग स्टेशन उभारणे,चालविणे,देखभाल व दुरुस्तीसाठी कामाचे आदेश देण्यात आले आहेत. परंतू सदर निविदेत समाविष्ट असलेल्या बुस्टर पंपींग स्टेशन व्यतीरिक्त मनपा कर्मचाऱ्यांकडून चालविण्यात येणाऱ्या बुस्टर पंपींग स्टेशन वरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या बुस्टर पंपींग स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्याचे काम मे.कल्पतरु इंजिनियअर्स यांचेकडून करुन घेण्यात आले असल्याचे लेखा विभागाकडील वर्ष 2013-14 व 2014-15 मधील खर्च प्रमाणकांची पडताळणी करतांना लेखा परिक्षणास आढळून आले आहे. पडताळणी केलेल्या सदर प्रमाणकांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यादेश क्र. | दिनांक | कामाची बाब | पुरवठा कालावधी | परिमाण शिफ्ट | दर रु. | एकूण खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रमाणक क्रमांक 4830 दि.25.03.2015 रु.5,26,710/- | | | | | | | |
| 1 | 261 | 25.02.2015 | चोपडा कोर्ट टर्निंग पॉईंट बुस्टर पंपींग स्टेशन | 1.04.2014 ते 31.08.2014 | 362 | 485 | 175570 |
| 2 | 265 | 25.02.2015 | गोपस्वामी समाज मंदिर पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 31.03.2015 | 362 | 485 | 175570 |
| 3 | 259 | 25.02.2015 | सीरुचौक बूस्टर पंपींग | 1.09.2014 ते | 362 | 485 | 175570 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्टेशन | 31.03.2015 | | | |
| प्रमाणक क्रमांक 4629 दि.16.03.2015 रु.9,28,087/- | | | | | | | |
| 4 | 1682 | 29.11.2014 | कॅम्प क्र.05 ओटी सेक्शन पंपींग स्टेशन | 1.04.2014 ते 31.08.2014 | 306 | 485 | 148410 |
| | | | | 15.05.2014 ते 31.08.2014 | 109 | 451 | 49159 |
| 5 | 1680 | 29.11.2014 | गोलमैदान बुस्टर पंपींग स्टेशन | 01.05.2014 ते 31.08.2014 | 246 | 485 | 119310 |
| | | | | 01.05.2014 ते 31.08.2014 | 168 | 451 | 75768 |
| 6 | 1679 | 29.11.2014 | गोपस्वामी समाज मंदिर पंपींग स्टेशन | 01.04.2014 ते 31.08.2014 | 306 | 485 | 148410 |
| 7 | 1684 | 29.11.2014 | चोपडा कोर्ट टर्निंग पॉईंट बुस्टर पंपींग स्टेशन | 1.05.2014 ते 31.08.2014 | 246 | 485 | 119310 |
| 8 | 1683 | 29.11.2014 | टिव्हीएस सुप्रीम ऑटो शोरुम बुस्टर पंपींग स्टेशन | 1.05.2014 ते 31.08.2014 | 246 | 485 | 119310 |
| 9 | 1781 | 31.12.2014 | लस्सीवाला स्मशानभूमी बुस्टर पंपींग स्टेशन | 1.4.2014 ते 31.8.2014 | 306 | 485 | 148410 |
| प्रमाणक क्रमांक 4918 दि.31.03.2015 रु.9,28,087/- | | | | | | | |
| 10 | 264 | 25.02.2015 | नेहरु नगर एस.टी.कॉलनी बुस्टर पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 28.03.2015 | 362 | 485 | 175570 |
| 11 | 263 | 25.02.2015 | कमुशेट बंगला भाजी मार्केट जवळ बुस्टर पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 28.03.2015 | 362 | 485 | 175570 |
| 12 | 260 | 25.02.2015 | जुनी साठवण टाकी कॅम्प-1 | 10.01.2014 ते 28.02.2015 | 420 | 346.5 | 145530 |
| प्रमाणक क्रमांक 4917 दि.31.03.2015 रु.4,38,925/- | | | | | | | |
| 13 | 270 | 25.02.2015 | गावडे स्कुल पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 28.02.2015 | 181 | 485 | 87785 |
| 14 | 268 | 25.02.2015 | टिव्हीएस सुप्रीम ऑटो शोरुम बुस्टर पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 28.02.2015 | 362 | 485 | 175570 |
| 15 | 262 | 25.02.2015 | लस्सीवाला स्मशानभूमी बुस्टर पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 28.02.2015 | 362 | 485 | 175570 |
| प्रमाणक क्रमांक 4945 दि.31.03.2015 रु.5,26,710/- | | | | | | | |
| 16 | 266 | 25.02.2015 | गोलमैदान बुस्टर पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 28.02.2015 | 362 | 485 | 175570 |
| 17 | 267 | 25.02.2015 | बिरला गार्डन बुस्टर पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 28.02.2015 | 362 | 485 | 175570 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | 269 | 25.02.2015 | कॅम्प क्र.05 ओटी सेक्शन पंपींग स्टेशन | 1.09.2014 ते 28.02.2015 | 362 | 485 | 175570 |
| प्रमाणक क्रमांक 4387 दि.26.02.2015 रु.1,99,824/- | | | | | | | |
| 19 | 168 | 25.02.2015 | बिरला गार्डन बुस्टर पंपींग स्टेशन | 1.4.2014 ते 31.8.2014 | 306 | 485 | 148410 |
| | | | | 1.4.2014 ते 31.8.2014 | 114 | 451 | 51414 |
| प्रमाणक क्रमांक 4835 दि.25.03.2015 रु.81,994/- | | | | | | | |
| 20 | 194 | 11.7.2014 | आनंदनगर बुस्टर पंपींग स्टेशन | 1.12.2014 ते 31.1.2015 | 4 | 13728 | 54912 |
| | | | | | 2 | 13541 | 27082 |
| प्रमाणक क्रमांक 4556 दि.10.03.2015 रु.8,21,772/- | | | | | | | |
| 21 | 1675 | 29.11.2015 | गावडे स्कुल पंपींग स्टेशन | 1.04.2014 ते 31.08.2014 | 276 | 485 | 133860 |
| 22 | 1676 | 29.11.2015 | कमुशेट बंगला भाजी मार्केट जवळ बुस्टर पंपींग स्टेशन | 1.04.2014 ते 31.08.2014 | 306 | 485 | 148410 |
| 23 | 1678 | 29.11.2015 | नेहरु नगर एस.टी.कॉलनी बुस्टर पंपींग स्टेशन | 1.04.2014 ते 31.08.2014 | 306 | 485 | 148410 |
| 24 | 1677 | 29.11.2015 | सीरुचौक बूस्टर पंपींग स्टेशन | 1.04.2014 ते 31.08.2014 | 306 | 485 | 148410 |
| | | | | 1.04.2014 ते 31.08.2014 | 114 | 451 | 51414 |
| 25 | 1674 | 29.11.2015 | जुनी साठवण टाकी कॅम्प-1(04मजुर 138 दिवस) | 1.07.2014 ते 15.11.2014 | 552 | 346.5 | 191268 |
| | | | | | | | 4020692 |

उपरोक्त प्रमाणकांची व सोबतच्या अभिलेख्यांची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्यास अर्धसमास पत्र क्र.74 दि.24/08/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी लेखा परिक्षण अभिप्राय खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

1) मनपा कर्मचाऱ्यांकडून चालविण्यात येणाऱ्या बुस्टर पंपींग स्टेशन वरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या बुस्टर पंपींग स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यासाठी 2013-14 व 2014-15 मध्ये होणा-या खर्चास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 73(ड) नुसार मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता न घेता पुरवठादारास तोंडी आदेश देवून काम करुन घेण्यात आले आहेत. कामाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर कंत्राटदारास खर्चाच्या प्रदानावेळी अतिरिक्त आयुक्त यांची कार्योत्तर मंजूरी घेवून पंपींग स्टेशननिहाय स्वतंत्र कार्यादेश निर्गमित करुन प्रदान करण्यात आले आहे. यावरुन सक्षम प्राधिकाऱ्याच्या पुर्व मंजूरीशिवाय केलेल्या कामावर खर्च करण्यात आला आहे.

2) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील परिशिष्ट-ड प्रकरण 5 मधील कलम 2 नुसार रु.3.00 लक्ष पेक्षा जादा खर्चासाठी जाहिर निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. परंतू मनपा कर्मचाऱ्यांकडून चालविण्यात येणाऱ्या बुस्टर पंपींग स्टेशन वरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या बुस्टर पंपींग स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यासाठी वर्ष 2013-14 मध्ये जाहिर निविदा मागवून

कंत्राटदाराची नियुक्ती न करता मे.कल्पतरु इंजिनिअर्स या पुरवठादारास तोंडी आदेश देवून काम करुन घेण्यात आले आहेत. यासाठी पाणी पुरवठा, भाग-1 बी-13- "बुस्टर पंपींग स्टेशन चालविणे" या लेखाशीर्षाखाली उपरोक्त प्रमाणकांनुसार एकूण रु.40,20,692/- एवढा खर्च करण्यात आला आहे.

3) सदर कामासाठी मे.कल्पतरु इंजिनिअरर्स या कंत्राटदाराशी केलेला करारनामा लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नसल्याने कामाच्या व प्रदानाच्या अटीशर्ती याबाबत तसेच मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार विहीत शुल्काच्या रकमेचा भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

4) कंत्राटदाराकडून पुरवठा केलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांचे हजेरीपत्रक, उपस्थिती अहवाल प्रमाणकांसोबत आढळून आले नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या कामगारांच्या उपस्थितीबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

5) कामगार पुरवठा केल्याबाबत कंत्राटदाराकडून खर्चाच्या मागणीसाठी वेळोवेळी सादर केलेले मुळ बीजक ( Tax Invoice) मुळ प्रमाणकासोबत आढळून आले नाही. कंत्राटदाराकडून मुळे बीजकासह (Tax Invoice) खर्चाची मागणी करण्यात आली नसतांना प्रदान करण्यात आले आहे.

6) अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यासाठी मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर या कंत्राटदारास मे.हर्षल टेक्निक, नासिक या कार्यरत कंत्राटदाराच्या निविदेतील मंजूर दराने पंपचालक व मदतनीस पुरवठ्याचे प्रदान करण्यात आले आहे. मे.हर्षल टेक्निक यांच्या अंदाजपत्रकीय रकमेत पंपचालक यांच्या वेतनात रु.13728/-प्रतीमहा या रकमेत रु.1480/-प्रतीमहा व मदतनीस यांच्या वेतनात रु.13,541/-प्रतीमहा या रकमेत रु.1460/- प्रतीमहा एवढा सेवाकर समाविष्ट असून अंदाजपत्रकीय रकमेवर 6टक्के जादा दराने निविदा मंजूर करण्यात आली आहे. मे.कल्पतरु यांना रु.13728/- ÷ 30 = 458/- + 6%= रु.485/- प्रती दिन या दराने प्रदान करण्यात आले असल्याने त्यात रु.52/- एवढा सेवाकर समाविष्ट आहे. त्यामुळे कामगारांच्या वेतन रु.52/-प्रतीशीफ्ट प्रमाणे कंत्राटदारास सेवाकराचे प्रदान झाले आहे. परंतू केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी. दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात आली असून सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. तरी वरील तक्तयातील अ.क्र.12 व 25 वगळता एकूण 7462 शिफ्ट साठी रु.52/- प्रमाणे एकूण रु.3,88,024/- तसेच अ.क्र. 20 येथील प्रदानाच्या रक्कमेतून रू.8840/- असा एकूण रू.3,96,864/- एवढा सेवाकर कंत्राटदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

7) उपरोक्त देयकांची पडताळणी करता देयकाच्या रकमेतून 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसुल करण्यात आलेली नाही तरी वरील प्रमाणे रू.4020692/- एवढया प्रदानाच्या रक्कमेवर 1 टक्का कामगार कल्याण कराची रु.40,206/- वसुल करणे आवश्यक आहे.

आक्षेपाधिन खर्च रू.4020692/-

वसुलपात्र रक्कम रू.3,96,864/- अधिक रु.40,206/- एकूण रु.4,37,070/-

FDSANMM7201 (Ref No : 63, Hmm No : 74)

## *9 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पूर्ननिर्माण अभियान (JNNURM) योजनेच्या रोखवहीची पडताळणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 465496475.00 /-

***13 व्या वित्त आयोगाचे अनुदान व मुलभूत सुविधा अनुदान जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पूर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत कामावर खर्च करणेबाबतचे प्राधिकार लेखापरीक्षणात उपलब्ध झाला नाही. सुरक्षा अनामतीच्या रक्कमा जनरल फंडात अथवा सुरक्षा अनामातीच्या खाती वर्ग केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कपात सुरक्षा अनामतीच्या रक्कमा रोखवहीत पुढील खर्चासाठी वापरणेत आल्या आहेत. सदर खात्याच्या बँक तपशीलात मोठ्या प्रमाणावर रक्कमा वेळोवेळी एफ.डी.साठी कमी केल्याचे दिसून येते. तथापि याबाबत मुळ एफडीआर, गुंतवणूक नोंदवही, गुंतवणुकीस मंजुऱ्या, व्याजाचा दर इ.तपशील तपासणीस उपलब्ध झाला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पूर्ननिर्माण अभियान (JNNURM) या केंद्र व राज्य शासन अर्थसहाय्य योजनेतुन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे काम हाती घेतले आहे. याबाबत महापालिकेच्या लेखा विभागाकडून योजनेसाठी अँक्सिस बँकेत खाते क्र.605010100021164 उघडण्यात आले आहे. याबाबतची लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 ते 2014-15 या कालावधीची लेखापरीक्षणास तपासणीस सादर केलेल्या रोखवहीची पडताळणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र.94 दि.14.09.2016 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) सदर रोखवहीनुसार लेखापरीक्षण वित्तीय वर्षात एम.एम.आर.डी.ए.कडील कर्ज रु.26,01,19,000/- जमा रकमेव्यतिरिक्त 13 व्या वित्त आयोगाचे अनुदान रु.24,54,96,475 व मुलभूत सुविधा योजना अनुदान रु.22,00,00,000 असे एकूण रु.46,54,96,475 अनुदान जमा असल्याचे व त्यातून योजनेच्या कामाचे ठेकेदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना प्रदान केल्याचे दिसून येते. 13 व्या वित्त आयोगाचे अनुदान व मुलभूत सुविधा अनुदान जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पूर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत कामावर खर्च करणेबाबतचे प्राधिकार लेखापरीक्षणात उपलब्ध झाला नाही.

2) रोखवहीत ठेकेदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना केलेली नमूद प्रदाने व त्याबाबतच्या प्रमाणके यांची पडताळणी करता प्रमाणकानुसार देयकातून 2% सुरक्षा अनामत कपात केली असताना ती रोखवहीत न दर्शविता 2% कमी ढोबळ रक्कम नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे रोखवहीत लेखापरीक्षण वित्तीय वर्षात नमूद खर्च प्रत्यक्ष प्रमाणकानुसार केलेल्या खर्चापेक्षा रु.1,52,32,236 ने कमी दिसतो. देयकातून कपात केलल्या कार्यकंत्राट कर, आयकर व कामगार कल्याण उपकर यांच्या रक्कमा जनरल फंडात वर्ग केल्याचे दिसते. तथापि सुरक्षा अनामतीच्या रक्कमा जनरल फंडात अथवा सुरक्षा अनामातीच्या खाती वर्ग केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कपात केलेल्या सुरक्षा अनामतीच्या रक्कमा रोखवहीत पुढील खर्चासाठी नियमबाहयपणे वापरणेत आल्या आहेत.

3) देयकातून कपात कार्यकंत्राट कर, आयकर व कामगार कल्याण उपकर यांच्या रक्कमा जनरल फंडात वर्ग

केल्याचे दिसते तथापि याबाबतच्या काही प्रमाणकासोबत त्या कोणत्या देयकाच्या सबंधित आहेत, याबाबतचा तपशील आढळून येत नाही. (उदा.प्र.क्र.212 दि.20.04.2013 रु.1 कोटी व प्र.क्र. नमूद नाही. तारीख 21.04.2014 रु.99,99,015 ) त्यामुळे सदर कपातीच्या रक्कमा अचूक वर्ग झाल्याची पडताळणी करता आली नाही.

सदर कपातीच्या वर्ग केलेल्या रक्कमा जनरल फंडात अचूक जमा झाल्याचे व त्यांचा भरणा शासनखाती विहित वेळेत केल्याची पडताळणी जनरल फंड रोखवही, बँक स्टेटमेंट व भरणा चलने तपासणीस उपलब्ध न केल्याने करता आली नाही.

4) सदर योजनेच्या ( JNNURM) रोखवहीत एम.एम.आर.डी.ए.कडून तीन वेळा प्राप्त कर्ज हप्ते एकूण रु.26,01,19,000 जमा घेतल्याचे नमूद केले आहे. तथापि याबाबतचे एम.एम.आर.डी.ए.कडील कर्ज वितरणाचे आदेश तपासणीस उपलब्ध न झाल्याने कर्जाच्या जमा रकमांच्या अचूकतेची पडताळणी करता आली नाही.

5) रोखवहीत लेखापरिक्षण वित्तीय वर्षात एम.ओ.पी.एल. डीपाँजीट वरील एकूण व्याज रु.47,66,869 जमा झाल्याचे नमूद केले आहे. तसेच दि.12.02.2014 रोजी रु.73,00,000 एफ.डी.आर.ची रक्कम जमा केल्याचे नमूद केले आहे. याबाबत सदर व्याजाच्या रक्कमा कोणत्या व किती रक्कमेच्या डीपाँजीटवरील व कोणत्या कालावधीच्या आहेत. याबाबत पडताळणी त्याअनुषंगिक कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने करता आली नाही. तसेच दि.12.02.2014 रोजी रु.73,00,000 एफ.डी.आर.ची रक्कम कोणत्या एफ.डी.आर.ची आहे व त्यावरील व्याज दर, मुद्दल रक्कम, कालावधी याबाबतचा तपशील तपासणीत उपलब्ध झाला नाही. त्यामुळे एफ.डी.आर. च्या रकमांची तसेच व्याजाच्या जमा रकमांची पडताळणी करुन लेखा अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

सदर खात्याच्या बँक तपशीलात मोठ्या प्रमाणावर रक्कमा वेळोवेळी एफ.डी.साठी कमी केल्याचे दिसून येते. तथापि याबाबतची गुंतवणूक नोंदवही, गुंतवणुकीस मंजुऱ्या, व्याजाचा दर इ.तपशील तपासणीस उपलब्ध झाला नाही. त्यामुळे गुंतवणुकीच्या रकमांची पडताळणी करुन लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

FDSANMM7201 (Ref No : 65, Hmm No : 94)

## ***10 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) योजनेतून हाती घेतलेल्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामावर नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.टंडन अँड असोशिएटस यांना केलेल्या सल्लागार फीच्या प्रदानातील अनियमितता.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 09**

*लेखा शीर्ष :JNNURM केंद्र व राज्य व म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 35429000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 32430039.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2998961.00/-

***कामावर नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक करणेबाबत निविदा नस्त्या, निविदा अटी/ शर्ती, स्थायी समिती मंजुरी ठराव, करारनामे, कार्यादेश, मोजमाप नोंदवह्या लेखी मागणी करूनही तपासणीस***

***उपलब्ध न करणे, निविदा मंजुरीचा ठराव मे.टंडन अँड असोशिएटस यांचे नावे झालेला असताना करारनामा मात्र मे.टंडन अर्बन सोलूशन प्रा.ली.या संस्थेसोबत करणे, मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मध्ये सन 2006 पासून झालेल्या सुधारणेनुसार रु.35,400 च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना तो रु.35,300 च्या कमी मुद्रांकावर करणे तसेच सुधारित अंदाजपत्रकानुसार मे. टंडन यांचे सोबत करारनामा न करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीच्या कामास केंद्र सरकार यांचे कडून मंजुरी प्राप्त झाली नसल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी चे रु.1,17,68,400 प्रदान महापालिकेच्या निधीतून करणे आवश्यक असताना जे.एन.एन.यु.आर. एम.निधीतून करणे, योजनेचा सुधारित डी.पी.आर. तयार करून शासनाची मंजुरी प्राप्त केली नसताना यासाठीचे रु.25,59,300 चे प्रदान प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना करणे, अन्य निधीतून अथवा महानगरपालिका निधीतून प्रकल्प सल्लागार यांना फी चे प्रदान केल्याची पडताळणी करणेसाठी आवश्यक लेखे व मागविलेली माहिती उपलब्ध करून न देणे, करारनाम्यानुसार मंजूर निविदा दरानुसार प्रदान करणेचे नसताना 32.04% जादा मंजूर दरानुसार रक्कम विचारात घेवून प्रदान केल्याने रु.4,04,361 चे जादा प्रदान, मे.टंडन यांना दि.31.12.2014 पर्यंत अंतिम मुदत देणेत आली असताना मुदतवाढी शिवाय त्यांना सल्लागार फी चे प्रदान त्यानंतरही करणे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पूर्ननिर्माण अभियान (JNNURM) या केंद्र व राज्य शासन अर्थसहाय्य योजनेतुन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे काम हाती घेतले आहे. यासाठी महापालिकेने स्थायी समिती ठ.क्र.44 दि.15.07.2010 नुसार मे.टंडन अँड असोशिएटस यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करून कामाच्या किमतीच्या 2.65% दराची अधिक सेवाकर अशी निविदा स्वीकारून त्यांना कार्यादेश क्र.1994 दि.25.08.2010 अन्वये कार्यादेश दिल्याचे प्रमाणका सोबतच्या ठराव व कार्यादेशाच्या प्रतीवरून दिसून येते. यानंतर कामाच्या सुधारित अंदाजपत्रकानुसार मुळ कामास दि.31.12.2014 पर्यंत मुदतवाढ मिळाल्याने स्थायी समिती ठराव क्र.37 दि.16.08.2014 नुसार मे. टंडन अँड असोशिएटस यांचीच मागील मंजूर दराने सुधारित अंदाजपत्रकातील वाढीव परिमाण व अतिरिक्त बाबी तसेच क्लॉज 38 अंतर्गत वाढीव परिमाणाच्या कामासाठी नेमणूक करून त्यांना पत्र क्र.69 दि.25.08.2014 नुसार कार्यादेश दिल्याचे प्रमाणका सोबतच्या कार्यादेश व ठरावाच्या प्रतीवरून दिसून येते. वित्तीय वर्ष 2013-14 ते 2014-15 या लेखापरीक्षण कालावधीत मे.टंडन अँड असोशिएटस यांना जे.एन.एन.आर.यु.आर.एम. निधीच्या रोखवहीतून प्र.क्र.1520 दिनांक 16.07.2013 रु.95,31,000 व प्र.क्र.2239 दिनांक 22.09.2014 रु. 22,37,400 तसेच जनरल फंड रोखवहीतून प्र.क्र.3609 दि.28.11.2013 रु.84,76,000 व प्र.क्र.4944 दि.31.03.2015 रु.1,51,84,000 असे एकूण रु.3,54,29,000 चे प्रदान करणेत आले आहे. असे एकूण प्रदान कामाच्या 11 वे धावते ते 28 वे धावत्या देयकाच्या सबंधित आहे. याबाबत लेखापरीक्षणात विभागाने सादर केलेली प्रमाणकांची पडताळणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.92 दि.14/09/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1)पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामावर नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीबाबत

निविदा नस्त्या,निविदा अटी/शर्ती,स्थायी समिती मंजुरी ठराव, करारनामे, कार्यादेश, मोजमाप नोंदवह्या तपासणीस उपलब्ध करून देणेत आल्या नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.75 दि.24.08.2016 व क्र.81 दि.30.08.2016 अन्वये लेखी मागणी करूनही चार प्रमाणका शिवाय कोणतेही लेखे उपलब्ध करून देणेत आले नाहीत.अशाप्रकारे लेखापरीक्षणात आवश्यक अभिलेखे उपलब्ध न करून महापालिकेने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 चे उल्हंघन केले आहे.

2) प्रमाणकासोबत जोडलेल्या मे.टंडन यांचाशी दि.25.08.2010 रोजी केलेल्या करारनाम्याची प्रत व त्यानुसार मे.टंडन अँड असोशिएटस यांना पत्र क्र.1194 दि.25.08.2010 नुसार दिलेल्या कार्यादेशाची प्रत तसेच याबाबतच्या स्थायी समिती ठ.क्र.44 दि.15.07.2010 ची प्रत पाहता निविदा मंजुरीचा ठराव मे.टंडन अँड असोशिएटस यांचे नावे झालेला असताना करारनामा मात्र मे. टंडन अर्बन सोलूशन प्रा.ली. या संस्थे सोबत करण्यात आला आहे. व कार्यादेश मे. टंडन अँड असोशिएटस यांचे नावे देवून प्रदाने सुद्धा मे. टंडन अँड असोशिएटस यांचे नावे करण्यात आली आहेत.

3) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.टंडन यांचे सोबत उपरोक्त नमूद केलेला करारनामा रु.100 च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. यासाठी उपरोक्त नमूद स्थायी समिती ठ.क्र.44 दि.15.07.2010 मधील प्रस्तावनेत यासाठी सेवाकरासह 3,62,10,000 खर्च होणार असल्याचे नमूद केले असल्याने मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मध्ये सन 2006 पासून झालेल्या सुधारणेनुसार रु.35,400 च्या मुद्रांक मूल्य पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना तो रु.100 च्या मुद्रांकावर केल्याने कमी मुद्रांक रु.35,300 ची व्याजासह वसुली करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) सुधारित अंदाजपत्रकानुसार मे.टंडन यांचे सोबत करारनामा करण्यात आल्याचे दिसून आले नाही. अन्यथा वाढीव कामासाठी येणाऱ्या खर्चानुसार वाढीव मूल्याच्या मुद्रांक शुल्काची रक्कम परीगणित करून व्याजासह सदर रक्कम वसूल करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) मे.टंडन यांना करण्यात आलेले एकूण रु.3,54,29,000 प्रदान हे कामाचे ठेकादार मे.कोणार्क यांना प्रदान केलेल्या 11 वे धावते देयक ते 28 वे धावत्या देयकांच्या संदर्भातील आहे. उपरोक्त नमूद ठ.क्र. 44 दि.15.07.2010 च्या प्रस्तावनेत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीच्या कामास केंद्र सरकार यांचे कडून मंजुरी प्राप्त झाली नसल्याने खर्च महानगरपालिका निधीतून करणेचे व मूळ कामाचे अंदाजपत्रक व निविदा तयार करणेचे काम पाणीपुरवठा विभागाने स्व:ता केल्याने सदर खर्चावरील सूट म.न.पा.च्या मंजुरी नंतर मे. टंडन यांचे देयकातून वजा करणेचे नमूद केले आहे.तथापि त्यानुसार त्यांना प्रदान देयकातून अशी सुट वजा केल्याची खात्री आवश्यक लेख्याअभावी करता आली नाही.

तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीच्या कामास केंद्र सरकार यांचे कडून मंजुरी प्राप्त झाली नसल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी चे प्रदान महापालिकेच्या निधीतून करणे आवश्यक असताना जे.एन.एन.यु.आर.एम. निधीच्या रोखवहीतून रु.1,17,68,400 चे प्रदान करण्यात आले आहे.

6) उपरोक्त नमूद ठ.क्र.37 दि.16.08.2014 नुसार सुधारित अंदाजपत्रकानुसार मे.टंडन यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे काम देणेत आले आहे. सदर ठरावाच्या प्रस्तावनेत सुधारित योजनेसाठी सविस्तर डी.पी.आर.तयार करणे, आराखडे व नकाशे तयार करून मंजुरीसाठी शासनाकडे पाठविणे व पाठपुरावा करणेचे निर्देश मे.टंडन यांना देणेत आल्याचे नमूद करणेत आले आहे.तथापि अशाप्रकारे काम करून सुधारित डी.पी.आर.लेखापरीक्षणात उपलब्ध झाला नाही. तसेच सुधारित योजनेस शासन मंजुरी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि प्र.क्र.4944 दि.31.03.2015 अन्वये त्यांना एकूण प्रदानात रु.25,59,300 चे प्रदान डी.पी.आर.तयार करणेसाठी करणेत आले आहे. त्यामुळे केलेले

रु.25,59,300 चे प्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

7) लेखापरीक्षण कालावधीत जे.एन.एन.यु.आर.एम.निधीच्या रोखवहीतून रु.1,17,68,400 च्या प्रदाना व्यातिरिक्त महानगरपालिका निधीतून दोन प्रमाणकाद्वारे रु.2,36,60,000 चे प्रदान मे.टंडन यांना करणेत आले आहे. तथापि याव्यतिरिक्त अन्य निधीतून अथवा महानगरपालिका निधीतून प्रकल्प सल्लागार यांना फी चे प्रदान केल्याची पडताळणी आवश्यक लेखे व मागविलेली माहिती उपलब्ध न झाल्याने करता आली नाही.

8) वित्तीय वर्ष 2013-14 ते 2014-15 मध्ये कामाच्या 21 ते 29 व्या धावत्या देयकांचे प्रदान ठेकेदार मे.कोणार्क यांना करणेत आले आहे. व 30 व्या देयकाचे प्रदान पुढील वित्तीय वर्षात 2015-16 मध्ये करण्यात आले आहे. त्यानुसार 29 व 30 व्या धावत्या देयकानुसार प्रकल्प सल्लागार मे.टंडन यांना प्र.क्र.3920 दि.24.02.2016 अन्वये रु.24,89,500 चे प्रदान प्रकल्प सल्लागार फी म्हणून करणेत आले आहे. मे.टंडन यांचेशी केलेल्या उपरोक्त नमूद करारनाम्यानुसार मंजूर निविदा दरानुसार प्रदान करणेचे नसताना त्यांना सदर प्रमाणका अन्वये 32.04% जादा मंजूर दरानुसार रक्कम विचारात घेवून प्रदान करणेत आले आहे.त्यामुळे 32.04% जादा दरानुसार येणारी रक्कम रु.1,35,80,385 वर 2.65% दराने रु.3,59,880 व त्यावरील 12.36% सेवाकर रु.44,481 एकूण रु.4,04,361 चे जादा प्रदान झाले आहे. त्यामुळे सदर रक्कमेची सबंधीताकडून वसुली होणे आवश्यक आहे.

9) उपरोक्त स्थायी समिती ठराव क्र.37 दि.16.08.2014 नुसार मे. टंडन यांना दि.31.12.2014 पर्यंत अंतिम मुदत देणेत आली आहे.तथापि मात्र त्यांना सल्लागार फी चे प्रदान त्यानंतरही करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना ज्या कामाच्या धावत्या देयकासंदर्भात प्रदान केले आहे अशी देयकात नमूद काम दि.31.12.2014 पर्यंत झाल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे. किवा त्यांना स्थायी समितीने मुदतवाढ दिल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.अन्यथा अंतिम मुदतीनंतर मुदतवाढी शिवाय केलेल्या प्रदानाची रक्कम परीगणित करून वसूल होणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.29,98,961.

आक्षेपाधीन रक्कम रु.3,24,30,039.

DATBEPM6101 (Ref No : 9, Hmm No : 92)

## ***11 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) योजने अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या काम- 29 व्या धावत्या देयकाअखेर खोदाईतून निघालेल्या साहित्यापैकी कामात वापरलेल्या साहित्य वगळता शिल्लक राहिलेल्या साहित्याची रु.49,76,368 ची जादा वाहतूक दर्शवून प्रदान करणे व इतर अनियमितता बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :JNNURM केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 11866028.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6107626.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5758402.00/-

***कामात वापरुन शिल्लक परिमाणाच्या साहित्याची वाहतूक करणे आवश्यक असताना जादा परिमाणाच्या साहित्याची वाहतूक केल्याचे दर्शवून रु.49,76,368 जादा प्रदान, पाईपच्या भरावासाठी खोदाईतून निघालेले अतिरिक्त साहित्य न वापरता बाहेरून रु.61,07,626 चे साहित्य आणून वापरणे, बाहेरून आणलेल्या व कामात वापरलेल्या एकूण 11,066 घ.मी.वरील साहित्यावरील स्वामित्वधन रु.7,82,034 महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.गौख/10/1009/सिआर-309/ख दि.11/02/2010 नुसार शासन खाती भरणा केल्याची खात्री देयकाचे प्रदान करताना न करणे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) या केंद्र व राज्य शासन अर्थसहाय योजनेतुन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे काम हाती घेतले आहे. सदरचे काम कार्यादेश क्र.3718 दि.21.12.2009 नुसार मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांना 32.04% जादा दराने देणेत आले आहे. कामावर 2013-14 ते 2014-15 या वित्तीय वर्षात रु. 74,98,42,745 खर्च करण्यात आला आहे व 2014-15 अखेर रु.235,46,02,754 खर्च करणेत आला आहे. कामाची एकूण 29 धावती देयके मंजूर करून प्रदान करणेत आली आहेत व 29 व्या धावत्या देयकाचे पार्ट प्रदान रु.3,34,81,176 चे प्रदान पुढील आर्थिक वर्षात करणेत आले आहे. सदर 29 धावत्या देयकात 25 दर फरकाच्या देयकांची रु.38,93,70,487 रक्कम समाविष्ठ आहे. सदर कामाची लेखापरीक्षण कालावधीत प्रदान करणेत आलेल्या व लेखापरीक्षणात तपासणीत सादर केलेल्या 21 वे ते 29 वे धावत्या देयकांची पडताळणी पडताळणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.93 दि.14/09/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाच्या 29 व्या धावत्या देयका अखेर पाईपलाईन साठी केलेली खोदाई, पाईप टाकल्यानंतर केलेला भराव व अतिरिक्त राहिलेले साहित्य 5 कि.मी.अंतरावर वाहतुक करणेच्या साहित्याच्या परिमाणाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सब वर्क क्र. | खोदाई परिमाण घ.मी. | भराव केलेले परिमाण घ.मी. | शिल्लक परिमाण घ.मी. | वाहतूक केलेले परि. घ.मी. | जादा वाहतूक परि.घमी. | दर रु. 119.49 ने किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 8 | 1,26,200 | 11,43,05 | 11,895 | 28,904 | 17,009 | 20,32,405 |
| 2 | 9 | 1,16,585 | 10,75,33 | 9,052 | 23,584 | 14,532 | 17,36,429 |
| | | | | | | एकुण रु. | 37,68,834 |

(+) 32.04% जादा दरासह एकूण रु.49,76,368.

प्रत्यक्षात खोदाई केलेल्या साहित्याच्या परीमाणातील कामात वापरलेल्या साहित्याचे परिमाण कमी

करता शिल्लक परिमाणाच्या साहित्याची वाहतूक करणे आवश्यक असताना जादा परिमाणाच्या रु.49,76,368 किमतीच्या साहित्याची वाहतूक केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. विभागाने याबाबत कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नाही. त्यामुळे सदरच्या रु.49,76,368 जादा प्रदानाची सबंधिताकडून वसुली होणे आवश्यक आहे.
2) उपरोक्त पाईपच्या भरावासाठी वापरलेल्या साहित्य शिवाय सब वर्क 9,1 व 3 मध्ये फिलिंग इन प्लिंथ अँड ट्रेचेस साठी अनुक्रमे 6,523 घ.मी.,3,296 घ.मी.व 1,247 घ.मी. साहित्य बाहेरून आणून दर रु.418 प्रती घ.मी. दराने प्रदान करणेत आले आहे.तथापि यासाठी खोदाईतून निघालेले अतिरिक्त साहित्य वापरले नाही.सदर अतिरिक्त साहित्य न वापरणे बाबत मोजमाप पुस्तिकेत ते वापरण्यास योग्य नव्हते असे मोजमाप पुस्तिकेत प्रमाणित केल्याबाबतची पडताळणी कामाच्या सबंधित मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध करून न दिल्याने करता आली नाही. त्यामुळे महानगरपालिकेस कामावर मंजूर निविदा दरानुसार रु.61,07,626 जादा खर्च करावा लागला आहे.
3) उपरोक्त बाहेरून आणलेल्या व कामात वापरलेल्या एकूण 11,066 घ.मी.वरील साहित्यावरील स्वामित्व धन रु.7,82,034 महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.गौख/10/1009/सिआर 309/ख दि.11/02/2010 नुसार शासन खाती भरणा केल्याची खात्री देयकाचे प्रदान करताना करण्यात आली नाही. त्यामुळे सदरची रक्कम रु.7,82,034 सबंधिताकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु57,58,402
आक्षेपाधीन रक्कम रु61,07,626

DATBEPM6101 (Ref No : 10, Hmm No : 93)

## *12 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) योजने अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या काम-निविदा अट क्र.38 नुसार कामातील बाबींच्या विहित परिमाणाच्या पेक्षा जादा परिमाणाचे प्रदान चालू दरसूचीतील दरापेक्षा 6.014% जादा दराने केल्याने झालेल्या रु.51,44,635 च्या जादा खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :JNNURM केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 88066717.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 82922082.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5144635.00/-

***कामाच्या निविदेच्या अटी/ शर्तीत अट क्र.38 मध्ये कामाच्या बाबीच्या परिमाणाच्या 125% पेक्षा जास्त परिमाणाच्या कामाचे प्रदान चालू दरसूचीच्या दरापेक्षा जादा दराने प्रदान करणेची अट समाविष्ट केल्याने व***

***त्याप्रमाणे चालू दरसूचीच्या दरावर 6.014% जादा दराने प्रदान केल्याने रु. 51,44,635 चे अतिरिक्त प्रदान, कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तपासणीस उपलब्ध न झाल्याने 29 व्या धावत्या देयकाअखेर अट 38 नुसार नमूद केलेले कामाच्या बाबींचे परिमाण हे अंदाजपत्रकातील बाबींच्या परीमाण अधिक 25% परिमाण यापेक्षा जादा केलेल्या कामाचे परिमाण असल्याची पडताळणी करता न येणे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) या केंद्र व राज्य शासन अर्थसहाय योजनेतुन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे काम हाती घेतले आहे. सदरचे काम कार्यादेश क्र.3718 दि.21.12.2009 नुसार मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांना 32.04% जादा दराने देणेत आले आहे. कामावर 2013-14 ते 2014-15 या वित्तीय वर्षात रु.74,98,42,745 खर्च करण्यात आला आहे व 2014-15 अखेर रु.235,46,02,754 खर्च करणेत आला आहे. कामाची एकूण 29 धावती देयके मंजूर करून प्रदान करणेत आली आहेत व 29 व्या धावत्या देयकाचे पार्ट प्रदान रु.3,34,81,176 चे प्रदान पुढील आर्थिक वर्षात करणेत आले आहे. सदर कामाची लेखापरीक्षण कालावधीत प्रदान करणेत आलेल्या व लेखापरीक्षणात तपासणीत सादर केलेल्या 21 वे ते 29 वे धावत्या देयकांची पडताळणी करता 29 व्या धावत्या देयकाअखेर निविदा अट क्र.38 नुसार कामाच्या बाबींच्या विहित परिमाणापेक्षा जादा परिमाणाचे तीन सबवर्क मध्ये चालू दरसूचीच्या दरानुसार व त्यावर 6.014% जादा दराने एकूण रु.8,80,66,717 चे प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामध्ये 6.014% जादा दराने झालेले रु.49,95,880 चे प्रदान समाविष्ठ आहे.याबाबत अर्धसमास पत्र क्र.102 दि.13/10/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाच्या 29 व्या धावत्या देयकाअखेर निविदेतील अट क्र. 38 नुसार कामातील बाबींचे विहित परिमाणापेक्षा (125%) जादा परिमाणाचे केलेले प्रदान खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सबवर्क क्र./कामाच्या बाबीचा तपशील. | चालू दरसूचीनुसार कामाचे मूल्य रु. | 6.014%जादा दराची रक्कम रु. | एकूण प्रदान रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | सब वर्क क्र.3 - mfg., prov. & supply spirally welded e r w /saw fabricated m. s. pipe 508 mm o. d., 7.1 mm thick. | 33,58,772.64 | 2,01,996.6 | 35,60,769.23 |
| 2 | सब वर्क क्र.-10-making consu. reconnection by prov., laying& fixi. up to 5 m.pipeline of mpde 15&25 mm. dia. | 1,28,63,891.82 | 7,73,634.4 | 1,36,37,526.27 |
| 3 | सब वर्क क्र.-11-prov.& installing with pipe domestic water meter. | 6,68,48,173.05 | 40,20,249.13 | 7,08,68,422.18 |
| | | एकूण रु. | 49,95,880 | 8,80,66,717 |

याबाबत लेखापरीक्षणात मूळ व सुधारित अंदाजपत्रक, त्यांचे दरपृथ:करण, अंदाजपत्रकात वापरलेल्या दरसूच्या,निविदा अटी/शर्ती, निविदा मंजुरीचे ठराव, करारनामा, कामाचे आदेश, मोजमाप पुस्तिका इ. अभिलेखे तपासणीस अर्धसमास पत्र क्र.75 दि.24.08.2016 व क्र.81 दि.30.08.2016 अन्वये लेखी मागणी करूनही उपलब्ध करून देणेत आले नाहीत. तथापि मागील वित्तीय वर्ष 2012-13 च्या लेखापरीक्षण अहवालातील परी.क्र.43 उप परी.10 मध्ये निविदेमध्ये नमूद करण्यात आलेली अट क्रमांक 38 प्रमाणे कामाच्या बाबीच्या 125% परिमाणाचे प्रदान मंजूर निविदेत नमूद दराने व त्यापेक्षा जादा परिमाणाचे प्रदान काम ज्या वर्षामध्ये करण्यात आले त्या वर्षाच्या चालू दरसूची मधील दराप्रमाणे करणे आवश्यक असताना 125% पेक्षा जादा परिमाणाचे प्रदान चालू दरसूचीपेक्षा 6.014% जादा दराने प्रदान केल्याचे व कामामधील अट क्र.38 मधील अ.क्र.3 नुसार 125% पेक्षा जास्त परिमाणाचे प्रदान वाढीव दराने करणे बाबत अट नमूद केल्याने बी-1 निविदेच्या तरतुदीचा भंग केल्याचे नमूद केले आहे.

कामाची निविदा मंजूर करताना ठेकेदाराने निविदेत नमूद केलेला 32.04% जादा दर मंजूर करताना निविदा उघडणेच्या वर्षातील दरसूचीशी तुलना करताना असा निविदेत नमूद केलेला दर 6.014% जादा असल्याचे दिसून येते. लेखापरीक्षण वित्तीय वर्षातील खर्च प्रमाणाकांची पडताळणी करता मूळ कामाच्या बाबीचे दर व अट क्र.38 मधील त्याच कामाच्या बाबीचे दर हे भिन्न असल्याचे दिसते. त्यामुळे अट क्र.38 मधील कामाच्या बाबींच्या जादा परिमाणाचे प्रदान चालू दरसूचीनुसार व त्यावर 6.014% जादा दर लावून प्रदान केल्याचे स्पष्ट होते. वास्तविक सदर जादा परिमाणाचे प्रदान काम करण्यात आलेल्या वर्षातील दरसूचीतील दराने करण्यात येत असताना त्यावर 6.014% जादा दराने प्रदान करणे सयुक्तिक नाही. अशा प्रकारच्या कामांच्या बी-1 निविदेत अट क्र.38 मधील कामाच्या बाबींच्या विहित परिमाणा पेक्षा जादा परिमाणाचे प्रदान चालू दरसूचीनुसार करण्याची अट समाविष्ट असते. तथापि प्रस्तुत कामाच्या निविदेच्या अटी/शर्तीत अट क्र.38 मध्ये चालू दरसूचीच्या दरापेक्षा जादा दरापेक्षा जादा दराने प्रदान करणेची अट समाविष्ट करून त्याप्रमाणे प्रदान करणेत आले आहे.याबाबत सदर जादा दरानुसार केलेले प्रदान योग्य असल्याची प्राधिकारासह पूर्तता दर्शविणेत आली नसल्याने नियमबाह्यपणे जादा दराने प्रदान करणेची अट समाविष्ट केल्याने महापालिकेस 29 व्या धावत्या देयका अखेर कामावर रु.49,95,880 जादा खर्च तसेच कामाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी चा 2.65% दर व त्यावरील 12.36% सेवाकर यावर रु.1,48,755 असा एकूण रु.51,44,635 जादा खर्च करावा लागला आहे.

2) निविदा अट क्र.38 नुसार कामाच्या बाबींच्या अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा 25% जादा परिमाणाचे प्रदान अंदाजपत्रकातील नमूद दराने व मंजूर निविदा दराने करणेचे आहे. त्यापेक्षा जादा परिमाणाचे प्रदान अट क्र.38(3) मध्ये नमूद केल्याप्रमाणे काम करण्यात आलेल्या वर्षातील दरसूचीतील दराने व उपरोक्त नमूद वाढीव दराने करणेचे आहे.कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तपासणीस उपलब्ध न झाल्याने 29 व्या धावत्या देयकाअखेर अट 38 नुसार नमूद केलेले

कामाच्या बाबींचे परिमाण हे अंदाजपत्रकातील बाबींच्या परीमाण अधिक 25% परिमाण यापेक्षा जादा केलेल्या कामाचे परिमाण असल्याची पडताळणी करता आली नाही.त्यामुळे केलेले प्रदान रु.8,80,66,717 अचूक असल्याची तपासणी करता आली नाही.

वसूलपात्र रक्कम रु.51,44,635

आक्षेपाधीन रक्कम रु.8,29,22,0822

DATBEPM6101 (Ref No : 11, Hmm No : 102)

## *13 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) योजने अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या काम- लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध न करून देणेच्या व 21 व्या धावत्या ते 29 व्या धावत्या देयकाद्वारे केलेल्या प्रदानातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2354602754.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2324609045.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 29993709.00/-

***स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 चे कलम 4 नुसार लेखापरिक्षणास तपासणीसाठी आवश्यक अभिलेख उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची असताना महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियमातील कलम 6(2) नुसार अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही मंजूर डीपीआर, प्रशासकीय मंजुरी, अंदाजपत्रक, तांत्रिक मंजुरी व त्यासंबंधातील दरसुची व दर पृथ: करणे, केंद्र शासनाची व राज्य शासन मंजुरी, निविदा नस्ती, निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा, निविदा मंजुरी प्रस्ताव, निविदा मंजुरी ठराव, कार्यादेश व करारनामा, सुधारित प्रशासकिय मंजुरी व सुधारीत अंदाजपत्रक, सुधारीत तांत्रिक मंजुरी व संबंधित जिल्हा दरसुच्या व दरपृथ: करणे सुधारीत निविदा नस्ती, सुधारित निविदा अटी/ शर्ती, प्राप्त निविदा, सुधारित निविदा मंजुरी प्रस्ताव, सुधारित निविदा मंजुरी ठराव, सुधारित कार्यादेश व करारनामा, केंद्र व राज्य शासनांकडून प्राप्त अनुदाने, कर्जे यांचा तपशिल तसेच केंद्र व राज्य शासनास पाठवलेली उपयोगिता प्रमाणपत्रे, मोजमाप पुस्तिका व वेळोवेळी शासनास कामाचा प्रगतीचे पाठविलेले अहवाल ई. अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून न देणे, कामाचा व कामगारांचा विमा उतरवल्याची व 1% विमा रक्कम रु.74,98,427 भरल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध न करणे, कामाच्या ठेकेदाराचे मूल्यवर्धित कराची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध न झाल्याने कपात 2% मूल्यवर्धित कर अचूक कपात केल्याची खात्री न होणे, कामात वापरलेल्या पाईपचे अंदाजपत्रकातील व त्यानुसार देयकात नमूद केलेले दर हे उत्पादन शुल्क करासहित आहेत किवा उत्पादन शुल्क कराशिवाय***

***आहेत याची पडताळणी दरसूच्या,अंदाजपत्रके व दर पृथ:करण उपलब्ध न झाल्याने करता न येणे व त्यामुळे केंद्र शासनाच्या दि.01.03.2006 च्या अधिसूचना क्र.6/2006 नुसार पिण्याच्या पाणीपुरवठा योजनेसाठी वितरण व्यवस्थेसाठी वापरण्यात येत असलेल्या पाईपवर उत्पादन शुल्क माफीची सवलत घेतल्याची पडताळणी करता न येणे,मूळ मुदतीनंतर दिलेल्या मुदतवाढीनुसार ठेकेदारास दर फरकाचे केलेले प्रदान देय असल्याचे व केलेले प्रदान अचूक असल्याची पडताळणी आवश्यक अभिलेखे उपलब्ध न झाल्याने करता येणे,22 व्या देयकान्वाये केलेल्या रु.3,30,13,388 दर फरकाच्या प्रदानाबाबतचे दर फरक देयक प्रमाणकासोबत न जोडणे, योजनेचे काम आजपर्यंत अपूर्ण असल्याने जोडलेले मीटर विनावापर पडून असल्याने दीर्घकाळ असे पाणी मीटर विना वापर पडून राहिल्याने ते खराब होऊन त्यावरील केलेला खर्च रु.30,70,84,287 वाया जाण्याची शक्यता, कामाच्या मंजूर 32.04% जादा निविदा दराने कामावर रु.160,03,24,112/- अधिक दर फरक रक्कम एवढा खर्च होणे आवश्यक असताना माहे मार्च 2015 अखेर (29 व्या धावत्या देयकापर्यंत) कामावर रु.238,80,83,930/- खर्च झाल्याने जादा केलेला खर्चाबाबत आवश्यक मंजुऱ्या घेतल्याबाबत अभिलेखे उपलब्ध न झाल्याने कामावरील जादा खर्च नियमानुसार केल्याची पडताळणी करता न येणे, कामासाठी वापरलेल्या पाईप, विविध प्रकारचे व्हालव्ह,कॉलर, स्टील, सिमेंट, रेती,पंपिंग मशिनरी ई.साहित्याचा चाचणी अहवाल तसेच पाईप बाबत हायड्रोलिक चाचणीचे अहवाल लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न होणे, केंद्र व राज्य सरकारकडून किती अनुदान प्राप्त झाले त्यातील किती अनुदानाचा वापर केला व त्यानुसार किती रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे पाठविण्यात आली तसेच योजनेच्या जादा खर्चासाठी कोणाकडून किती कर्ज घेणेत आले व त्यातील किती कर्जाची परतफेड करण्यात आली याबाबतची माहिती व अभिलेखे उपलब्ध न झाल्याने सदर बाबींची पडताळणी न करता येणे. ई.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) या केंद्र व राज्य शासन अर्थसहाय योजनेतुन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे काम हाती घेतले आहे. सदरचे काम कार्यादेश क्र.3718 दि.21.12.2009 नुसार मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांना 32.04% जादा दराने देणेत आले आहे.कामावर 2013-14 ते 2014-15 या वित्तीय वर्षात रु. 74,98,42,745 खर्च करण्यात आला आहे व 2014-15 अखेर रु.235,46,02,754 खर्च करणेत आला आहे. कामाची एकूण 29 धावती देयके मंजूर करून प्रदान करणेत आली आहेत व 29 व्या धावत्या देयकाचे पार्ट प्रदान रु.3,34,81,176 चे प्रदान पुढील आर्थिक वर्षात करणेत आले आहे.सदर 29 धावत्या देयकात 25 दरफरकाच्या देयकांची रु.38,93,70,487 रक्कम समाविष्ठ आहे. कामाची लेखापरीक्षण कालावधीत प्रदान करणेत आलेल्या व लेखापरीक्षणात तपासणीत सादर केलेल्या 21 वे ते 29 वे धावत्या देयकांची पडताळणी करुन आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.101 दि. 13.10.2016 निर्गमित करण्यात आले होते.तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) सदरच्या योजनेच्या कामाचे मंजूर डीपीआर, प्रशासकीय मंजुरी, अंदाजपत्रक, तांत्रिक मंजुरी तसेच त्यासंबंधातील दरसुच्या व दर पृथ:करणे, केंद्र शासनाची व राज्य शासन मंजुरी, निविदा नस्ती,

निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा, निविदा मंजुरी प्रस्ताव, निविदा मंजुरी ठराव, कार्यादेश व करारनामा, सुधारित प्रशासकिय मंजुरी व सुधारीत अंदाजपत्रक, सुधारीत तांत्रिक मंजुरी व संबंधित जिल्हा दरसुच्या व दरपृथ:करणे सुधारीत निविदा नस्ती, सुधारित निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा, सुधारित निविदा मंजुरी प्रस्ताव, सुधारित निविदा मंजुरी ठराव, सुधारित कार्यादेश व करारनामा, कैंद्र व राज्य शासनांकडून प्राप्त अनुदाने, कर्जे यांचा तपशिल तसेच कैंद्र व राज्य शासनास पाठवलेली उपयोगिता प्रमाणपत्रे, मोजमाप पुस्तिका व प्रमाणके व वेळोवेळी शासनास कामाचा प्रगतीचे पाठविलेले अहवाल ई. अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास पत्र क्र.75 दि.24.08.2016 व क्र.81 दि.30.08.2016 अन्वये लेखी मागणी करूनही 21 व्या ते 29 व्या धावत्या देयकांची खर्च प्रमाणके व योजनेची वित्तीय वर्ष 2013-14 ते 2014-15 ची रोखवही व्यतिरिक्त कोणतेही अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून देणेत आले नाहीत.महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 चे कलम 4 नुसार लेखापरिक्षणास तपासणीसाठी आवश्यक अभिलेख उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियमातील कलम 6(2) नुसार अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून देणेत आले नाहीत.

2)मागिल लेखापरीक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद 43 मध्ये निविदेमधील अट व शर्त क्रमांक 62 नुसार शासकीय विमा निधीकडे विमा उतरविण्यात यावा अशी अट असल्याचे व कंत्राटदाराकडून शासकीय विमा निधीकडे विमा उतरविण्यात आला नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. कामाचा व कामगारांचा विमा उतरवल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाहीत. लेखापरीक्षणात सादर केलेल्या देयकातून 1% विमा रक्कम कपात करण्यात आलेली नाही. नगरविकास विभाग परिपत्रक क्र. जी.ई.एन./1098/1357/प्र.क्र-166/98,नवि-24 दि. 03/11/ 2003 अन्वये कामांचा व कामगारांचा विमा न काढल्याने 1% विमा रक्कम देयकातून कपात करून शासन खाती भरणा करणेची आहे. याबाबत विभागाने कोणताही खुलासा अथवा पूर्तता न दर्शविली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण कालावधीत प्रदान रु.74,98,42,745 रक्कमेवर 1% रक्कम रु.74,98,427 सबंधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3)लेखापरीक्षण वित्तीय वर्षातील कामाच्या प्रदान देयकांची पडताळणी करता कार्यकंत्राट कराची 2% कपात करण्यात आली आहे.विक्रीकर आयुक्त,महाराष्ट्र राज्य, यांची अधिसूचना दि.04/04/2012 नुसार दि.01/04/2012 पासून नोंदणीकृत ठेकेदाराकडून 2% व नोंदणी नसलेल्या ठेकेदाराकडून 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक असताना कामाच्या ठेकेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नसताना त्यांचे देयकातून 2% कार्यकंत्राट कर कपात करणेत आला आहे.याबाबत विभागाने कोणताही खुलासा व पूर्तता न दर्शविल्याने लेखापरीक्षण कालावधीत प्रदान रु.74,98,42,745 रक्कमेवर 3% कमी कपात कार्यकंत्राट कर रु.2,24,95,282 सबंधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) कामाच्या लेखापरीक्षण वित्तीय वर्षात प्रदान देयकात नमूद बाबी, त्यांचे नमूद दर, प्रदान केलेले

परिमाण, मंजूर निविदा दर व त्यानुसार केलेले एकूण प्रदान हे अचूक असल्याची पडताळणी सबंधित वर्षाच्या दरसूच्या, त्यानुसार केलेले दरपृथ:करण, सुधारित व मूळ अंदाजपत्रके, सुधारित व मूळ निविदा अटी/शर्ती,कामाच्या मोजमाप पुस्तिका,करारनामे,कार्यादेश,निविदा मंजुरीचे ठराव,कामाच्या मुदतवाढीचे ठराव व मुदतवाढीचे आदेश ई.अभिलेखे तपासणीस उपलब्ध न झाल्याने करता आली नाही.

5)कामाच्या 29 व्या धावत्या देयका अखेर कामात स्पायरली वेल्डेड इआरडब्लू/एसएडब्लू फब्रीकेटेड एम.स.पाईप 508 एम.एम. 9259 र.मी, 508 एम.एम., 457 एम.एम.1205 र.मी., 406 एम.एम. 2031 र.मी., 273 एम.एम. 1247 र.मी., 600 एम.एम 228 र.मी. वापरल्याचे तसेच डी.आय.के. पाईप 100 एम.एम.1292695 र.मी.,150 एम.एम.77650 र.मी.,200 एम.एम. 56617 र.मी., 250 एम.एम. 17985 र.मी., 300 एम.एम.16447 र.मी., 350 एम.एम. 2700 र.मी.,400 एम.एम. 3966 र.मी., 450 एम.एम.542 र.मी. व 500 एम.एम. 459 र.मी. वापरल्याचे देयकातील बाबवाइस परिमाणानुसार दिसून येते.अशा वापरलेल्या पाईपचे अंदाजपत्रकातील व त्यानुसार देयकात नमूद केलेले दर हे उत्पादन शुल्क करासहित आहेत किवा उत्पादन शुल्क कराशिवाय आहेत याची पडताळणी दरसूच्या, अंदाजपत्रके व दर पृथ:करण उपलब्ध न झाल्याने करता आली नाही. केंद्र शासनाच्या दि.01.03.2006 च्या अधिसूचना क्र.6/2006 नुसार पिण्याच्या पाणीपुरवठा योजनेसाठी वितरण व्यवस्थेसाठी वापरण्यात येत असलेल्या पाईपवर उत्पादन शुल्क माफ करण्यात आलेले आहे. त्यानुसार कामात वितरण व्यवस्थेसाठी वापरलेल्या पाईपबाबत सदरच्या उत्पादन शुल्काच्या माफीची सवलत घेणे अपेक्षित आहे. ठेकेदाराने सदर सवलतीचा लाभ घेतला असल्यास त्याचा लाभ महानगरपालिकेस सुद्धा देणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा उत्पादन शुल्काचा लाभ घेतल्याची कागदोपत्री खुलासा करून पूर्तता दर्शवावी. अन्यथा सदर लाभ न मिळाल्याने अथवा न घेतल्याने महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणावर कामावर जादा खर्च करावा लागणार आहे.

6)मागिल लेखापरीक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद 43 मध्ये निविदेमधील भाग-1 मधील अट व शर्त क्रमांक 59 मध्ये कंत्राटदाराने निविदेमध्ये नमूद केलेल्या कालावधी पर्यंतच भाववाढ देण्यात यावी अशा प्रकारची अट असल्याचे नमूद केले आहे. तसेच वित्तीय वर्ष 2011-12 च्या लेखापरीक्षण अहवालात सदर योजना पूर्ण करण्याची मुळ मुदत कार्यादेशानंतर 24 महिने होती,तथापि 45 महिन्या नंतरही काम अपूर्ण असून दि.31 मार्च 2014 पर्यंत कामास मुदतवाढ दिली असल्याचे नमूद केले आहे. याबाबत कामास वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढीचे ठराव, मुदतवाढीचे आदेश, मुदतवाढ ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे दिली किवा अन्य कारणामुळे दिली, मुदतवाढ विनादंड किवा दंड आकारून दिली याबाबतचे अभिलेखे, कामाच्या मोजमाप पुस्तिका तपासणीस ई. अभिलेखे तपासणीस उपलब्ध झाले नाहीत. कामाचा कालावधी वाढल्याने 29 व्या धावत्या देयकाअखेर ठेकेदारास दरफरकाचे रु.38,93,70,485 चे प्रदान करण्यात आले आहे. कामाच्या मुळ मुदतीनंतर (दि.21 डिसे.2011) केलेल्या कामावर 29 व्या धावत्या देयकापर्यंत रु.26,33,49,923 चे दर फरकाचे प्रदान करणेत आले आहे. त्यामुळे मूळ दि.21 डिसे.2011 पर्यंतच्या मुदतीनंतर दिलेल्या मुदतवाढीनुसार ठेकेदारास दर फरकाचे केलेले प्रदान देय असल्याचे व केलेले प्रदान अचूक असल्याची पडताळणी आवश्यक अभिलेखे उपलब्ध न झाल्याने करता आली नाही.

7)लेखापरीक्षण वित्तीय वर्षातील प्रमाणाकांची पडताळणी करता प्रदान रक्कमेत दर फरक देयकांची

रक्कम समाविष्ठ असल्याचे दिसून येते.प्रमाणकासोबत दर फरक देयके जोडलेली आहेत. तथापि 22 व्या देयकान्वाये केलेल्या रु.3,30,13,388 दर फरकाच्या प्रदानाबाबतचे दर फरक देयक प्रमाणकासोबत जोडलेले नाही.प्रमाणकासोबत जोडलेल्या दर फरक देयके पाहता त्यांची कामाच्या देयकाप्रमाणे लेखा विभाग अथवा लेखापरीक्षा विभागाकडून तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

8) 29 व्या धावत्या देयकाअखेर म्हणजेच 2014-15 अखेर कामात सब वर्क क्र. 11 नुसार व अट क्र. 38 नुसार एकूण 59,164 वॉटर मीटर बसविल्याचे व त्यावर एकूण रु.30,70,84,287 खर्च करणेत आला आहे. तथापी महानगरपालिकेची लेखापरीक्षण कालावधीतील (2016-17 मधील) पाणीपट्टीची वसुली पाहता ती मीटरप्रमाणे आकारणी करून वसूल केली जात नसल्याचे दिसून येते. महानगरपालिकेने हाती घेतलेले योजनेचे काम आजपर्यंत अपूर्ण असल्याने जोडलेले मीटर विनावापर पडून असल्याचे स्पष्ट होते. दीर्घकाळ असे वॉटर मीटर विना वापर पडून राहिल्याने ते खराब होऊन त्यावरील केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे याबाबत त्वरेने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

9) मागिल लेखापरीक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद 43 मध्ये कामाच्या प्राकलनाची किंमत रुपये 121,19,99,479/- असल्याचे नमूद केले आहे. मंजूर 32.04% जादा निविदा दराने कामावर रु.160,03,24,112/- अधिक दर फरक रक्कम एवढा खर्च होणे आवश्यक असताना माहे मार्च 2015 अखेर (29 व्या धावत्या देयकापर्यंत) कामावर रु.238,80,83,930/- खर्च झाल्याचे दिसते. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहीता 1984 मधील नियम क्र.313 नुसार मूळ कामाच्या प्रकालन किमतीच्या 5% पेक्षा जादा खर्च होत असल्यास सुधारीत अंदाजपत्रक तयार करून सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणात सुधारित अंदाजपत्रक, सुधारित तांत्रिक मंजुरी, सुधारित कामासाठी सुधारित प्रशासकीय मंजुरी ठराव, सुधारित कार्यादेश, मोजमाप पुस्तिका, निविदा अटी/शर्ती,करारनामा ई.अभिलेखे तपासणीस उपलब्ध न झाल्याने कामावरील जादा खर्च नियमानुसार केल्याची पडताळणी करता आली नाही.

10) 29 व्या धावत्या देयकाअखेर विविध जादा बाबींचे (extra item rate list) इ.आय.आर.एल.क्र.1 ते 4 व 6 द्वारे एकूण रु.28,89,29,086 चे प्रदान ठेकेदारास करण्यात आले आहे. याबाबत लेखापरीक्षणात सुधारित अंदाजपत्रक, सुधारित तांत्रिक मंजुरी, सुधारित कामासाठी सुधारित प्रशासकीय मंजुरी ठराव, सुधारित कार्यादेश, निविदा अटी/शर्ती, मोजमाप पुस्तिका, करारनामा ई. अभिलेखे तपासणीस उपलब्ध न झाल्याने तसेच काम सुरु असताना कामात निर्माण झालेल्या जादा बाबींचे काम करणेस व त्यांचे परिमाण यासाठी शहर अभियंता यांची पूर्वमंजुरी घेतल्याचे व अशा बाबींचे काम करणेस लेखी आदेश दिल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध न झाल्याने इ.आय.आर.एल.क्र.1 ते 4 व 6 द्वारे ठेकेदारास रु.28,89,29,086 चे केलेले प्रदान योग्य व अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.

11) कामासाठी वापरलेल्या पाईप, विविध प्रकारचे व्हालव्ह, कॉलर, स्टील, सिमेंट, रेती, पंपिंग मशिनरी ई. साहित्याचा चाचणी अहवाल तसेच पाईप बाबत हायड्रोलिक चाचणीचे अहवाल

लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध झाला नाहीत.

12) सदरच्या योजनेचे काम हे केंद्र व राज्य अर्थसहाय्यीत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनर्निमाण अभियान अंतर्गत हाती घेतले आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून किती अनुदान प्राप्त झाले त्यातील किती अनुदानाचा वापर केला व त्यानुसार किती रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे पाठविण्यात आली तसेच योजनेच्या जादा खर्चासाठी कोणाकडून किती कर्ज घेणेत आले व त्यातील किती कर्जाची परतफेड करण्यात आली याबाबतची माहिती व अभिलेखे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे लेखी मागणी करूनही तपासणीस उपलब्ध करून देणेत आले नाहीत. त्यामुळे अशा बाबींची पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपानुसार लेखापरीक्षणात रक्कम रु.2,99,93,709 वसूलपात्र व रक्कम रु.232,46,09,045 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु. 2,99,93,709.

आक्षेपाधीन रक्कम रु. 232,46,09,045.

DATBEPM6101 (Ref No : 12, Hmm No : 101)

## *14 शिक्षण विभागाच्या रोखवही व तिन खात्यावरील शिलकाबाबत बॅंक ताळमेळ न घेणे व इतर अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 26020.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2895.00/-

***महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(1) प्रमाणे तसेच राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावली 2003 नियम 29.3.1(अ) नुसार तसेच नियम 5-34 नुसार रोखववही रोजच्या रोज बंद करणे आवश्यक असताना वित्तीय वर्ष 2013-14 ची रोखवही प्रत्येक महिनाअखेर बंद करणे व 2014-15 ची रोखवही वर्षाअखेर एकदाच बंद करणे, महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता तसेच 1971 चे नियम 51(3) प्रमाणे तसेच राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावली 2003 नियम 5.33 (सि) नुसार तसेच नियम 29.3.2 (अ) नुसार प्रत्येक महिना अखेर बॅंकमध्ये शिल्लक रक्कमांचा रोखवही प्रमाणे शिल्लकेचा ताळमेळ घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करणे, विभागाकडील रोखवहीनुसार 31.03.2015 अखेर शिल्लक रक्कम कोणत्या बाबीसाठी कोणाकडून कधी प्राप्त झाली याबाबतचा गोषवारा न काढल्याने शासनाकडून प्राप्त अनुदानापैकी अखर्चित रक्कम किती व महापालिकेकडून प्राप्त रक्कमेतून अखर्चित किती याबाबतची पडताळणी करता न येण, वित्तीय वर्ष 2013-14***

***मधील रु. 26,020 खर्च रक्कमेची पाच प्रमाणका सोबत बिले आढळून न येणे, रोखवहीत नमूद खर्चापेक्षा कमी खर्चाचे बिजक सोबत जोडणे, ठेकेदारांच्या देयकातून कपात एकूण रु.51,093 चा आयकर पुढील आर्थिक वर्षात शासन खाती भरणा केल्याची पूर्तता न दर्शविणे.***

अ) महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून ठेवण्यात आलेल्या रोखवहीत माहे मार्च 2015 अखेर तिन बँक खाती नमूद शिल्लक व अशा बँक खात्याच्या पासबुकात मार्च 2015 अखेर नमूद शिल्लक याची पडताळणी करता वित्तीय वर्ष 2013-14 पासून वर्षाअखेर तसेच दरमहा बँक ताळमेळ घेण्यात आला आला नसल्याचे दिसून आले आहे. या बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बँक खाते क्र. व नाव | रोखवही प्रमाणे अखेर शिल्लक रक्कम रु. | पासबुक प्रमाणे अखेर शिल्लक रक्कम रु. | फरक रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | 10931261314 स्टेट बँक. | 5,858 | 11,335 | 5,477 |
| 2 | 912010027380256 अँक्सिस बँक. | 1,85,26,813 | 1,90,64,433 | 5,37,620 |
| 3 | 912010052077223 अँक्सिस बँक. | 22,657 | 81,387 | 78,370 |

याबाबत आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.114 दि.18.10.2016 निर्गमित करणेत आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(1) प्रमाणे तसेच राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावली 2003 नियम 29.3.1(अ) नुसार तसेच नियम 5-34 नुसार रोखववही रोजच्या रोज बंद करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही. वित्तीय वर्ष 2013-14 ची रोखवही प्रत्येक महिनाअखेर बंद करून व 2014-15 ची रोखवही वर्षाअखेर एकदाच बंद करुन अखेर शिल्लक काढण्यात आली आहे.

2)महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता तसेच 1971 चे नियम 51(3) प्रमाणे तसेच राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावली 2003 नियम 5.33 (सि) नुसार तसेच नियम 29.3.2 (अ) नुसार प्रत्येक महिना अखेर बॅकमध्ये शिल्लक रक्कमांचा रोखवही प्रमाणे शिल्लकेचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावलीचा नियम 30.7 मध्ये ताळमेळ घेण्याची पध्दत व या बाबतचा विहित नमुना क्र. 30.2 सुध्दा देण्यात आला आहे. नियम 5.34 नुसार विभाग प्रमुखाने असा बॅक ताळमेळ प्रमाणित करणेचा आहे. तथापी अशा प्रकारे नियमानुसार कार्यवाही करण्यात न आल्याने रोखवही व बँक स्टेटमेंटच्या रक्कमांमधील तफावतीची कारणे समजली नाहीत.

3) शिक्षण विभागाकडील रोखवहीनुसार 31.03.2015 अखेर एकूण रु.1,85,26,813 शिल्लक दिसते.

तथापि अशी शिल्लक रक्कम कोणत्या बाबीसाठी कोणाकडून कधी प्राप्त झाली याबाबतचा गोषवारा काढण्यात आला नाही. शिक्षण मंडळास महापालिकेकडून व शासनाकडून रक्कम प्राप्त होत असते. त्यामुळे शिलक रक्कमेपैकी शासनाकडून प्राप्त अनुदानापैकी अखर्चित रक्कम किती व महापालिकेकडून प्राप्त रक्कमेतून अखर्चित किती याबाबतची पडताळणी करता आली नाही.

ब) लेखापरीक्षण वित्तीय वर्षातील माहे मार्च 2014 व माहे मार्च 2015 या महिन्यात रोख वहीत नमूद खर्चाच्या प्रमाणकांचे रेखांकन करता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) वित्तीय वर्ष 2013-14 मधील खालील तपशीलात नमूद खर्चाबाबतची प्रमाणका सोबत बिले आढळून आली नाहीत.

| अ.क्र. | तारीख | रक्कम रु. | प्रदानाचा तपशील | धनादेश क्र. |
|---|---|---|---|---|
| 1 | 19.03.2014 | 2,100 | मे. सविता मारोटीया, | 140306 |
| 2 | 19.03.2014 | 1,452 | मे.हिंदू न्यूज पेपर डेली. | 140310 |
| 3 | 26.03.2014 | 9,200 | मे.अवंतिका पब्लिकेशन. | 140312 |
| 4 | 26.03.2014 | 10,100 | टी.डी.एस. भरणा चलन नाही. | 140317 |
| 5 | 26.03.2014 | 3,168 | मे.अवंतिका पब्लिकेशन. | 140311 |
| | एकूण रु. | 26,020 | | |

विभागाने याबाबत पूर्तता न दर्शविल्याने खर्च रक्कम रु.26,020 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2)रोखवहीनुसार मे.मायक्रोकेम सिलीकर यांना चिकी नमुने तपासणीसाठी दि.16.03.15 नुसार ध.क्र. 191035 नुसार रु.15,573 चे प्रदान केल्याचे नमूद केले आहे. तथापि प्रमाणकासोबतचे त्यांचे जोडलेले बीजक क्र.141507142 पाहता ते रु.12,978 म्हणजेच रु.2,595 कमी रक्कमेचे आहे. त्यामुळे झालेल्या रु.2,595 जादा प्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

3) वित्तीय वर्ष 2013-14 च्या रोखवहीत दि.19.03.2014 रोजी मे.सविता मरोटीया यांना रु.2100 चे प्रदान ध.क्र.140306 नुसार करणेत आले आहे. तथापि सदर धनादेशाचा खर्च बँकेत रु.2,400 नमूद करणेत आला आहे. त्यामुळे रोखवहीत नमूद खर्चापेक्षा प्रत्यक्ष रु.300 जादा खर्चाची वसुली करणे आवश्यक आहे.

4) माहे मार्च 2015 मध्ये मे.हिंदुजा इंटर.यांना प्रदान देयकातून एकूण रु.1,03,102 आयकर कपात करणेत आला आहे. तथापी मार्च 2015 अखेर त्यातील रु.65,447 चा भरणा शासनखाती केल्याबाबत खर्च रोखवहीत नमूद करण्यात आल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे मे.सोनाक्षी इंटरप्रयासेस यांचे देयकातून माहे मार्च 2015 मध्ये एकूण रु.25,300 आयकर कपात केला असताना मार्च 2015 अखेर त्यातील रु. 11,862 चा भरणा शासनखाती केल्याबाबत खर्च रोखवहीत नमूद करण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे उर्वरित अनु.रु.37,655 व रु.13,438 एकूण रु.51,093 चा आयकर पुढील आर्थिक वर्षात शासन खाती भरणा केल्याची पूर्तता दर्शविली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.26,020.

वसूलपात्र रक्कम रु.2,895.

DATBEPM6101 (Ref No : 13, Hmm No : 114)

## *15 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी शैक्षणिक सहली आयोजित करणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 750000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 688500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 61500.00/-

***सहलींसाठी अयोजाकासोबत केलेल्या संविदाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस 15 दिवसात न कळविणे, सहली काढल्याची तारीख व सहलींसाठी किती विध्यार्थी, किती शिक्षक व किती शिपाई उपस्थित होते याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख नसणे, सहलींचे आयोजन करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण पाच मधील नियम 2 नुसार निविदा मागवून आयोजकांची नेमणूक न करणे, इयत्ता सातवीत 2014-15 या शैक्षणिक वर्षात किती मुले व मुली शिक्षण घेत होती व त्यातील सहलीसाठी किती विध्यार्थी उपस्थित होते व अशा विध्यार्थी, शिक्षक व शिपाई यांचे उपस्थितीनुसार खर्च झाल्याची पूर्तता न दर्शविणे, मे.सिद्धांत यांचे देयकातून रु.15,000 आयकर कपात न करणे, महापालिकेचे 20114-15 च्या मंजूर अर्थसंकल्पात तरतूद नसताना शैक्षणिक सहलीच्या आयोजनासाठी रु.7,50,000 खर्च करणे, आर्थिक व प्रशासकीय मंजुरीनुसार प्रती व्यक्ती रु.898 खर्चास मंजुरी दिली असताना बिलानुसार रु.1,000 प्रती व्यक्ती दराने प्रदान केल्याने 750 व्यक्तीसाठी रु.102 प्रती व्यक्ती जादा दराने रु.46,500 चे जादा प्रदान करणे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ शाळेतील 2014-15 या शैक्षणिक वर्षात इयत्ता 7 वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विध्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहल आयोजित करणेसाठी शिक्षण विभागाने 2014-15 या वित्तीय वर्षात प्र.क्र.एबी-332 दि.03.02.2015 नुसार रु.7,50,000 खर्च केला आहे. याबाबत विभागाने लेखापरीक्षणात उपलब्ध करून दिलेली नस्ती व खर्च प्रमाणक यांची तपासणी करुन आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.135 दि.25.10.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) विभागाने लेखापरीक्षणात सादर केलेल्या दि.27.11.2014 च्या नस्तीतील टिप्पणीनुसार 2014-15 च्या मंजूर अर्थसंकल्पात शाळेतील मुलांच्या सहलीसाठी रु.40 लाख तरतूद करण्यात आल्याचे व भातसा धारण येथे एकूण 1024 व्यक्तीसाठी एक दिवसाची सहल आयोजित करणेसाठी प्रवास

खर्चासाठी प्रति व्यक्ती रु.300 व सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण, संध्याकाळचा नाश्ता व रिसोर्ट फी रु.598 प्रति व्यक्ती एकूण रु.898 प्रतिव्यक्ती खर्च धरून रु.9,19,552 एकूण खर्च करणेस व त्यासाठी निविदा मागविणेस अति.आयुक्त यांची दि.10.12.2014 रोजी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त केली आहे. सदर शिक्षण मंडळ गठीत नसल्याने स्थायी समितीच्या मंजुरीस सादर करणेस सूचित केले आहे. तथापि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

2) सहल कोणत्या तारखेस काढण्यात आली व त्यामध्ये किती विध्यार्थी, किती शिक्षक व किती शिपाई उपस्थित होते याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख नाही.

3) सहलीच्या आयोजनाचे प्रदान मे.सिद्धांत समाज विकास संस्था, उल्हासनगर यांना प्र.क्र.एबी-332 दि.03.02.2015 रु.7,50,000 नुसार करणेत आले आहेत. तथापि त्यांनी सहलीचे आयोजन करणेसाठी मंजूर टिप्पणीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण पाच च्या नियम 2 नुसार निविदा मागवून त्यांची निविदा मंजूर करून त्यांना कार्यादेश दिल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

4) मे.सिद्धांत यांना एकूण 750 व्यक्तींच्या एक दिवसाच्या सहलीचे दर रु.1,000 प्रती व्यक्ती प्रमाणे रु.7,50,000 चे प्रदान केल्याचे त्यांचे प्रमाणकासोबतचे बिलावरून दिसून येते. विभागाने 2014-15 मध्ये दफ्तर पुरवठा करणेस पुरवठादारास दिलेल्या कार्यादेशात इयत्ता 7 वी च्या मुलामुलींची संख्या 1203 नमूद केली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात इयत्ता सातवीत 2014-15 या शिक्षणिक वर्षात किती मुले व मुली शिक्षण घेत होती व त्यातील सहलीसाठी किती विध्यार्थी उपस्थित होते व अशा विध्यार्थी, शिक्षक व शिपाई यांचे उपस्थितीनुसार खर्च झाल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

5) मे.सिद्धांत यांचे देयकातून आयकर कपात करणेत आला नाही. त्यामुळे 2% आयकर रु.15,000 सबंधीताकडून वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

6) महापालिकेचे 2014-15 चे अंतिम सुधारित अर्थसंकल्पात शैक्षणिक सहली आयोजित करणेसाठी तरतूद केल्याचे दिसून येत नाही. तसेच सन 2016-17 च्या मूळ अर्थसंकल्पात 2014-15 मध्ये शैक्षणिक सहलीसाठी प्रत्यक्ष खर्च निरंक दर्शविणेत आला आहे. त्यामुळे मंजूर अर्थसंकल्पात तरतूद नसताना शैक्षणिक सहलीच्या आयोजनासाठी रु.7,50,000 खर्च केल्याचे दिसून येते.

7) अतिरिक्त आयुक्त यांनी दिलेल्या आर्थिक व प्रशासकीय मंजुरीनुसार प्रती व्यक्ती रु.898 खर्चास मंजुरी दिली असताना मे.सिद्धांत यांना त्यांचे बिलानुसार रु.1,000 प्रतीव्यक्ती दराने प्रदान केले आहे. त्यामुळे 750 व्यक्तीसाठी रु.102 प्रती व्यक्ती जादा दराने झालेले जादा प्रदान रु.46,500 सबंधीताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपानुसार लेखापरीक्षणात रक्कम रु.61,500 वसूलपात्र व रक्कम रु.6,88,500 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.61,500.

आक्षेपाधीन रक्कम रु.6,88,500.

DATBEPM6101 (Ref No : 14, Hmm No : 135)

## *16 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2013-14 व 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी वह्या पुरवठा करणे निविदेतील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 12**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4137446.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4137446.00/-

***वह्या खरेदीसाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणेसाठी व गणवेश खरेदीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद कमी करणेस निविदा मागविणेपुर्वी महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड" प्रकरण सात चे नियम 2 नुसार स्थायी समितीची शिफारस घेवून महानगरपालिकेची मंजुरी न घेणे, वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीत निविदा दोन वर्षासाठी मागविणेत आल्याचे नमूद केले असताना निविदा प्रपत्रातील अटीत दर दोन वर्षासाठी व निविदा दोन वर्षासाठी असल्याचे नमूद करणे व दोन वर्षाचा करारनामा करणेपुर्वी एका वर्षापुढील दायित्व पत्करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 72-ब नुसार महानगरपालिकेची मंजुरी न घेणे, दर मंजूर करताना मागविलेले बाजारभाव उत्पादक संस्था व त्यांचे अधिकृत पुरवठादार यांचेकडील नसणे, महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस साविंदा केल्यापासून 15 दिवसात न कळविणे, साहित्याच्या नमुन्याची पाहणी केल्याची व वह्यांच्या कागदांची ते 58 जि.एस.सुपरलेटीव पेपर असल्याचे तपासणी अहवाल नस्तीसोबत नसणे, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंस/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दि.16/01/ 2013 नुसार ई- निविदा पद्धतीने निविदा न मागविणे, 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी पुरवठादारास कार्यादेश देणेस आयुक्त,स्थायी समिती अथवा मुख्य सभेची मंजुरी न घेणे, प्रपत्र प्राप्त करणेसाठी मे.श्रुती प्रिंटर या निविदेतील सहभागी निविदाकारांचा अर्ज नस्तीत नसणे,कार्यादेशाप्रमाणे पुरवठादाराने 28 शाळातील प्रत्येक विध्यार्थ्यास साहित्य पोहोचविणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करणे व सर्व शाळात वह्या प्राप्त झालेची चलने (शाळा क्र.30 व शाळा क्र.4 यांची 2014-15 ची चलने व वाटप व्यतिरिक्त) व त्यांचा विध्यार्थ्यांना केलेला वाटप याबाबतचे अभिलेखे तपासणीस उपलब्ध न होणे, पुरवठादार यांचे बिल क्र.298 दि.18.03.2014 पाहता त्यावर व्हॅट नं. नमूद नसणे, 2014-15 च्या प्रदानाच्या दोन प्रमाणकावर मुख्य लेखाअधिकारी यांची स्वाक्षरी नसणे, 2% ऐवजी 1% आयकर कपातीबाबत कागदोपत्री पूर्तता न दर्शविणे, विभागाने दिलेल्या विध्यार्थ्यांच्या संख्येनुसार 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी 7304 विध्यार्थ्यांसाठी 59,487 वह्यांची आवश्यकता व 2014-15 या शक्षणिक वर्षासाठी 7158 विध्यार्थ्यांसाठी 58,295 वह्यांची आवश्यकता असताना एकूण रु.4.86,204 किंमतीच्या 15,684 जादा वह्यांची खरेदी करणे, 2013-14 मध्ये विध्यार्थ्यास एका सत्रानंतर वह्या प्राप्त झाल्याने विध्यार्थी पहिल्या सत्रात सदर लाभापासून वंचित राहणे, तसेच 2014-15 मध्ये प्राप्त वह्या शैक्षणिक वर्ष सुरु होताना वितरीत***

***केल्याची पूर्तता न दर्शविणे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेत पहिली ते सातवी या वर्गात 2013-14 या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या 8070 विध्यार्थ्यांना एक रेघी, दोन रेघीव चार रेघी 200 पानी एकूण 65,725 नग वह्या खरेदी करून पुरवठा करणेसाठी महापालिकेच्या मंजूर अर्थसंकल्पात यासाठी उपलब्ध तरतुद कमी असल्याने गणवेश खरेदीसाठी मंजूर तरतूद कमी करून दफ्तर खरेदीसाठी वाढवून एकूण रु.20 लाख तरतुदीतून दफ्तर खरेदीसाठी आयुक्त यांची दि.15.07.2015 रोजी मान्यता प्राप्त केली आहे. यासाठी निविदा मागवून लघुत्तम दराचे निविदाकार मे.ओम मनीष इंटरप्रायासेस, उल्हासनगर यांचे एक रेघी,दोन रेघी व चार रेघी वह्यासाठी प्रत्यकी रु.31 प्रतीवही हे दर आयुक्त यांचे दि.28.08.2013 च्या मान्यतेने मंजूर करून त्यांचेसोबत दोन वर्षासाठी करारनामा करून त्यांना 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षण विभाग पत्र क्र.563/13 दि.05.09.2013 नुसार 28 शाळातील विध्यार्थ्यासाठी एकूण 65,725 वह्या 30 दिवसात पुरविणेचे आदेश देणेत आले आहेत. त्यानंतर 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षण विभाग पत्र क्र.951/14 दि.07.02.2014 नुसार 28 शाळातील विध्यार्थ्यासाठी एकूण 65,725 वह्या 30 दिवसात पुरविणेचे आदेश देणेत आले आहेत. त्यानुसार 2013-14 या शैक्षणिक वर्षातील 65,725 नग वह्या माहे सप्टे. 2013 मध्ये व 2014-15 या शैक्षणिक वर्षातील 67,741 नग वह्या माहे मार्च 2014 मध्ये प्राप्त झाल्याचे प्रमाणकासोबतच्या चलनावरून दिसून येते. सदर कामी 2013-14 मध्ये प्र.क्र.एस.बी.84 दि.24.09.2013 नुसार रु.20,37,475 खर्च करणेत आला आहे.तसेच 2014-15 मध्ये प्र.क्र.ए.33 दि.25. 04.2014 नुसार रु.20,78,971, प्र.क्र.ए.34 दि.25.04.2014 नुसार रु.21,000 असा एकूण रु.20,99,971 खर्च करणेत आला आहे. याबाबत विभागाने लेखापरीक्षणात उपलब्ध करून दिलेली निविदा नस्ती व खर्च प्रमाणके यांची तपासणी करुन आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.136 दि.25.10.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) वह्या खरेदीसाठी वित्तीय वर्ष 2013-14 च्या मंजूर अर्थसंकल्पात रु.10 लाख तरतूद उपलब्ध असल्याने गणवेश पुरवठ्यासाठी उपलब्ध रु.75 लाख तरतूदीतील रु.10 लाख तरतूद कमी करून दफ्तर खरेदीसाठी उपलब्ध करून दफ्तर खरेदीसाठी एकूण रु.20 लाख तरतूद उपलब्ध करून देणेचे व वह्या खरेदीसाठी रु.20 लाख खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेचे विभागाच्या टिप्पणीत प्रस्तावित केले आहे.त्यास आयुक्त यांनी दि.15.07.2013 रोजी मान्यता दिली आहे.वह्या खरेदीसाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणेसाठी व गणवेश खरेदीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद कमी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ‘ड” प्रकरण सात चे नियम 2 नुसार स्थायी समितीची शिफारस घेवून महानगरपालिकेची मंजुरी घेतली नसल्याचे नस्तीवरून दिसून येते. निविदा मागविणे पूर्वी अशी मंजुरी घेणे आवश्यक होते.

2) विभागाने वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीत निविदा दोन वर्षासाठी मागविणेत आल्याचे नमूद केले नाही. तथापी निविदा प्रपत्रातील अटीत दर दोन वर्षासाठी व निविदा दोन वर्षासाठी असल्याचे नमूद केले आहे. लघुत्तम निविदाकारा सोबत केलेला करारनामा सुद्धा दोन वर्षासाठी करणेत आला आहे. वास्तविक वह्या खरेदीसाठी निविदा मागविणेस व निविदा मंजुरीस आयुक्त यांनी वित्तीय वर्ष 2013-14 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार मंजुरी दिली असल्याने निविदा एक वर्षासाठी मागविणे आवश्यक

असताना नियमबाह्यपाने दोन वर्षासाठी मागवून करारनामा सुद्धा दोन वर्षासाठी करणेत आला आहे.
दोन वर्षाचा करारनामा करणेपुर्वी एका वर्षापुढील दायित्व पत्करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 72-ब नुसार महानगरपालिकेची मंजुरी घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) विभागाने निविदेच्या जाहिरातीत अनुभवी पुरवठादार व ठेकेदार यांचेकडून निविदा मागविणेचे नमूद केले आहे. याबाबत उत्पादक संस्था व त्यांचे अधिकृत पुरवठादार यांचेकडून निविदा मागवीत असल्याचा उल्लेख नाही. दर मंजूर करताना विभागाने बाजारभाव मागवून अशा दरासोबत तुलना करून मंजूर करावयाचे दर हे वाजवी असल्याचे नमूद करून दर मंजूर केले आहेत. तथापि असे बाजारभाव उत्पादक संस्था व त्यांचे अधिकृत पुरवठादार यांचेकडून मागविणेत आले नाहीत. त्यामुळे विभागास उत्पादक व त्यांचे अधिकृत पुरवठादार यांचे दर प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे मंजूर दर वाजवी असल्याची पडताळणी करता आली नाही.

4) वह्या खरेदीबाबत आयुक्तांनी मंजूर केलेल्या निविदेबाबत महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविले नाही.

5) निविदा अटीनुसार निविदाकाराने निविदेसोबत दिलेल्या साहित्याचे नमुन्यांची पाहणी करून कार्यादेश देणेचे होते. करारनाम्यानुसार वह्यांचे कागद 58 जि.एस.सुपरलेटीव पेपर असणे आवश्यक होते. तथापि अश्या प्रकारे साहित्याच्या नमुन्याची पाहणी केल्याची व वह्यांच्या कागदांची ते 58 जि.एस.सुपरलेटीव पेपर असल्याचे तपासणी अहवाल नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे प्राप्त साहित्य आवश्यक तांत्रिक दर्जाचे असल्याची पडताळणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंस/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दि. 16/01/2013 नुसार दफ्तर पुरवठा करणेच्या अंदाजपत्रकीय खर्च रु.10 लक्ष वरील असल्याने ई-निविदा पद्धतीने निविदा मागविणे आवश्यक असताना ई-निविदा पद्धतीने निविदा मागविल्या नाहीत.

7) विभागाने 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी पुरवठादारास कार्यादेश क्र.951/14 दि.07.02.2014 नुसार 65,725 नग वह्या पुरवठा करणेचे आदेश दिले आहेत. सदर कार्यादेश देणेस आयुक्त, स्थायी समिती अथवा मुख्य सभेची मंजुरी घेतल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

8) विभागाने मागविलेल्या निविदानुसार मे.अमरज्योती, मे.श्रुती प्रिंटर व मे.ओम मनीष इंटरप्रायासेस अशा तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. तथापि नस्तीत निविदा प्रपत्र प्राप्त करणेसाठी प्राप्त अर्ज मे. श्रुती प्रिंटर ऐवजी मोहिनी प्रिंटर चा दिसून येतो. याबाबत विभागाने कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नाही.

9) 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी कार्यादेश क्र.563/13 दि.05.09.2013 नुसार 65,725 नग वह्या पुरविलेबाबत पुरवठदाराचे चलन क्र.07 दि.16.09.2013 व बील क्र.22 प्रमाणकासोबत जोडले आहे. सदर पुरवठा चलनावर नमुन्याप्रमाणे 65,725 वह्या प्राप्त झाल्याची शाळा क्र.29 च्या मुख्याध्यापकांची पोहोच आहे. 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी कार्यादेश क्र.951/14 दि.07.02.2014 नुसार 67,741 नग वह्या पुरविलेबाबत पुरवठदाराचे चलन क्र.53 दि.18.03.2014 व बील क्र.298 दि.18.03.2014 प्रमाणकासोबत जोडले आहे. सदर चलनावर 67,741 वह्या शिक्षण मंडळास प्राप्त झाल्याची पोहोच आहे. कार्यादेशाप्रमाणे पुरवठादाराने 28 शाळातील प्रत्येक विध्यार्थ्यास पोहोचविणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच सर्व शाळात वह्या प्राप्त झालेची चलने (शाळा क्र.30 व शाळा क्र.4 यांची 2014-15 ची चलने व वाटप व्यतिरिक्त) व त्यांचा

विध्यार्थ्यांना केलेला वाटप याबाबतचे अभिलेखे तपासणीस उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेच्या 28 शाळेतील सर्व विध्यार्थ्यांना वह्या वाटप झाल्याची पडताळणी करता आली नाही.

10) शैक्षणिक वर्ष 2014-15 च्या वह्या पुरवठ्याबाबत प्रमाणकासोबत जोडलेले पुरवठादार यांचे बिल क्र.298 दि.18.03.2014 पाहता त्यावर व्हॅट नं.नमूद नाही. त्यामुळे सदर पुरवठ्याबाबत त्यांनी व्हॅट भरल्याची पडताळणी करता आली नाही.तसेच याबाबतच्या प्रदानाच्या प्रमाणकावर प्र.क्र.ए.33.दि. 25.04.2014 रु.20,78,971, प्र.क्र.ए.34 दि.25.04.2014 रु.21,000 मुख्य लेखाअधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या दिसून येत नाहीत.

शैक्षणिक वर्ष 2014-15 च्या वह्या पुरवठ्याबाबत च्या देयकातून 1% आयकर कपात करण्यात आला आहे. याबाबत मागील वर्षीच्या त्यांचे देयकातून 2.2% आयकर कपात करण्यात आला आहे. त्यामुळे कमी आयकर कपाती बाबत पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

11) विभागाने दिलेल्या माहितीनुसार 2012-13 मध्ये महानगरपालिका शाळेत 8070, 2013-14 मध्ये 7304 व 2014-15 मध्ये 7158 विध्यार्थी पहिली ते सातवी मध्ये शिक्षण घेत होते. वह्या वाटपाच्या (पाचवी ते सातवी प्रती विध्यार्थी 12 व पहिली ते चौथी प्रती विध्यार्थी 5 वह्या परिमाणानुसार) 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी 7304 विध्यार्थ्यासाठी 59,487 वह्यांची आवश्यकता व 2014-15 या शक्षणिक वर्षासाठी 7158 विध्यार्थ्यासाठी 58,295 वह्यांची आवश्यकता असताना अनुक्रमे 6,238 व 9,446 एकूण 15,684 जादा वह्यांची खरेदी झाली आहे.त्यामुळे सदर जादा प्राप्त वह्यांचा विनियोग कसा करण्यात आले याबाबत विभागाने कोणताही खुलासा अथवा पूर्तता न दर्शविल्याने जादा वह्या खरेदीवरील खर्च रु.4,86,204 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

12) शैक्षणिक वर्ष 2013-14 च्या वह्या ऑक्टो.2013 मध्ये प्राप्त झाली आहेत व शैक्षणिक वर्ष 2014-15 च्या वह्या मार्च.2014 मध्ये प्राप्त झाली आहेत. विध्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष जून मध्ये सुरु होते. त्यामुळे 2013-14 मध्ये विध्यार्थ्यास एका सत्रानंतर वह्या प्राप्त झाल्याने विध्यार्थी पहिल्या सत्रात सदर लाभापासून वंचित राहिले आहेत. तसेच 2014-15 मध्ये प्राप्त वह्या शैक्षणिक वर्ष सुरु होताना वितरीत केल्याची पूर्तता दर्शविली नाही.

उपरोक्त आक्षेपानुसार केलेला खर्च रु. 41,37,446 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.41,37,446.

DATBEPM6101 (Ref No : 15, Hmm No : 136)

## *17 महानगरपालिका शाळेतील विध्यार्थ्यांसाठी 2013-14 व 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी दफ्तर पुरवठा करणे निविदेतील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5604768.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5604768.00/-

| |
|---|
| ***दफ्तर खरेदीचा प्रस्तावित खर्च रु.25 लाख पेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) प्रमाणे स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असताना अशी मंजुरी न घेणे व दफ्तर खरेदीसाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणेसाठी व छत्र्या व रेनकोट साठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद कमी करणेस महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड" प्रकरण सात चे नियम 2 नुसार स्थायी समितीची शिफारस घेवून महानगरपालिकेची मंजुरी न घेणे, वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीत निविदा दोन वर्षासाठी मागविणेत आल्याचे नमूद केले नसताना निविदा प्रपत्रातील अटीत दर दोन वर्षासाठी व निविदा दोन वर्षासाठी असल्याचे नमूद करणे व दोन वर्षाचा करारनामा करणेपुर्वी एका वर्षापुढील दायित्व पत्करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 72-ब नुसार महानगरपालिकेची मंजुरी न घेणे, दर मंजूर करताना मागविलेले बाजारभाव उत्पादक संस्था व त्यांचे अधिकृत पुरवठादार यांचेकडील नसणे, मंजूर करावयाच्या दरानुसार एका वर्षासाठीचा खर्च रु.27,94,410 येत असताना विभागाने सदर रक्कम रु.24,66,370 नमूद करून खर्च रु.25 लाख पेक्षा कमी असल्याचे नमूद करून महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73(ड) नुसार आयुक्तांच्या मान्यतेने निविदा मंजूर करणे, महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस साविंदा केल्यापासून 15 दिवसात न कळविणे, निविदा अटी/ शर्ती प्रमाणे साहित्याच्या नमुन्याचे तपासणी अहवाल प्राप्त झालेनंतर निविदाकारांचे दराचे लिफाफे उघडणे आवश्यक असताना त्यापूर्वीच दरांचे लिफाफे उघडणे, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंस/ नस्ती-2012/ प्र.क्र.273/39 दि.16/01/2013 नुसार ई- निविदा पद्धतीने निविदा न मागविणे, 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी पुरवठादारास कार्यादेश देणेस आयुक्त, स्थायी समिती अथवा मुख्य सभेची मंजुरी न घेणे,2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी कार्यादेश क्र.947/14 दि.07.02.2014 नुसार 8116 नग दफ्तरे पुरविलेबाबत पुरवठदाराच्या चलनाची मूळ प्रत तपासणीस उपलब्ध न होणे, निविदा अटीनुसार पुरवठादाराने प्रत्येक शाळेत यादी प्रमाणे दफ्तरे पुरविणे व त्याचे बीजक व चलने लेखा विभागास प्रदानास पाठविणे आवश्यक असताना सदर शाळावाईज चलने प्रमाणकासोबत नसताना रु.28,10,358 चे प्रदान करणे, शाळा क्र.19 व 30 व्यतिरिक्त शाळेकडील साठा व वाटप नोंदी तपासणीस उपलब्ध न झाल्याने दफ्तरे प्राप्त झाल्याची व विध्यार्थ्यांना वाटप केल्याची पडताळणी करता न येणे, विभागाने दिलेल्या माहितीनुसार विध्यार्थ्यांच्या संख्येनुसार 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी 8016 व 2014-15 या शक्षणिक वर्षात 8170 दफ्तरांची आवश्यकता असताना एकूण रु.5,97,366 किंमतीच्या 1724 जादा दफ्तारांची खरेदी करणे, 2013-14 मध्ये विध्यार्थ्यास एका सत्रानंतर दफ्तरे प्राप्त झाल्याने विध्यार्थी पहिल्या सत्रात सदर लाभापासून वंचित राहणे,तसेच 2014-15 मध्ये प्राप्त दफ्तरे शैक्षणिक वर्ष सुरु होताना वितरीत केल्याची पूर्तता न दर्शविणे.*** |

महानगरपालिकेच्या शाळेत पहिली ते सातवी या वर्गात 2013-14 या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत

असलेल्या 8070 विध्यार्थ्यांना शालेय दफ्तर पुरवठा करणेसाठी महापालिकेच्या मंजूर अर्थसंकल्पात यासाठी उपलब्ध तरतुदीत छत्र्या व रेनकोट खरेदीसाठी मंजूर तरतूद कमी करून दफ्तर खरेदीसाठी वाढवून एकूण रु.34 लाख तरतुदीतून दफ्तर खरेदीसाठी आयुक्त यांची दि.22.07.2015 रोजी मान्यता प्राप्त केली आहे. यासाठी निविदा मागवून लघुत्तम दराचे निविदाकार मे.राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ मर्यादित,मुंबई यांची पहिली ते चौथी च्या दफ्तराचा रु.344.25 प्रतिनग व पाचवी ते सातवी च्या दफ्तराचा रु.348.75 प्रतिनग दर आयुक्त यांचे दि.27.09.2013 च्या मान्यतेने मंजूर करून त्यांचेसोबत दोन वर्षासाठी करारनामा करून त्यांना 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षण विभाग पत्र क्र.626/13 दि.01.10.2013 नुसार 28 शाळातील विध्यार्थ्यासाठी एकूण 8070 दफ्तरे 60 दिवसात पुरविणेचे आदेश देणेत आले आहेत. त्यानंतर 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षण विभाग पत्र क्र.936/14 दि.03.02.2014 नुसार 28 शाळातील विध्यार्थ्यासाठी एकूण 8116 दफ्तरे 60 दिवसात पुरविणेचे आदेश देणेत आले आहेत. त्यानुसार 2013-14 या शैक्षणिक वर्षातील दफ्तरे माहे ऑक्टो. 2013 मध्ये व 2014-15 या शैक्षणिक वर्षातील दफ्तरे माहे मार्च 2014 मध्ये प्राप्त झाल्याचे प्रमाणका सोबतच्या चलनावरून दिसून येते. सदर कामी 2013-14 मध्ये प्र.क्र.एस.बी.106 दि.15.10.2013 नुसार रु.27,94,410 खर्च करणेत आला आहे. तसेच 2014-15 मध्ये प्र.क्र.ए.बी.1 दि.10.04.2014 नुसार रु.13,77,076, प्र.क्र.ए.बी.2 दि. 10.04.2014 नुसार रु.14,33,282 असा एकूण रु.28,10,358 खर्च करणेत आला आहे. याबाबत विभागाने लेखापरीक्षणात उपलब्ध करून दिलेली निविदा नस्ती व खर्च प्रमाणके यांची तपासणी करुन आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.136 दि.25. 10.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) दफ्तर खरेदीसाठी वित्तीय वर्ष 2013-14 च्या मंजूर अर्थसंकल्पात रु.10 लाख तरतूद उपलब्ध असल्याने छत्र्या व रेनकोट साठी उपलब्ध रु.30 लाख तरतूद कमी करून त्यातील रु.20 लाख तरतूद कमी करून दफ्तर खरेदीसाठी उपलब्ध करून दफ्तर खरेदीसाठी एकूण रु.34 लाख तरतूद उपलब्ध करून देणेचे व दफ्तर खरेदीसाठी रु.28 लाख खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेचे शिक्षण विभागाच्या टिप्पणीत प्रस्तावित केले आहे. त्यास आयुक्त यांनी दि.22.07.2013 रोजी मान्यता दिली आहे.वास्तविक प्रस्तावित खर्च रु.25 लाख पेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) प्रमाणे स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असताना अशी मंजुरी घेतल्याचे नस्तीत दिसून येत नाही. तसेच दफ्तर खरेदीसाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणेसाठी व छत्र्या व रेनकोट साठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद कमी करणेस महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड" प्रकरण सात चे नियम 2 नुसार स्थायी समितीची शिफारशीसह महानगरपालिकेची मंजुरी घेतली नसल्याचे नस्तीवरून दिसून येते. निविदा मागविणे पूर्वी सदर मंजुऱ्या घेणे आवश्यक होते.

2) विभागाने वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीत निविदा दोन वर्षासाठी मागविणेत आल्याचे नमूद केले नाही.तथापी निविदा प्रपत्रातील अटीत दर दोन वर्षासाठी व दर भरणेच्या प्रपत्रात दोन वर्षातील विध्यार्थी संखेनुसार दफ्तर संख्या नमूद केली आहे. लघुत्तम निविदाकारासोबत केलेला करारनामा सुद्धा दोन वर्षासाठी करणेत आला आहे. वास्तविक दफ्तर खरेदीसाठी निविदा मागविणेस व निविदा मंजुरीस आयुक्त यांनी 2013-14 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार मंजुरी दिली असल्याने निविदा एक वर्षासाठी मागविणे आवश्यक असताना नियमबाह्यपाने दोन वर्षासाठी मागवून करारनामा सुद्धा दोन वर्षासाठी करणेत आला आहे.

दोन वर्षाचा करारनामा करणेपुर्वी एका वर्षापुढील कालावधीचे दायित्व पत्करण्यास महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 72-2 नुसार महानगरपालिकेची मंजुरी घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) विभागाने निविदेच्या जाहिरातीत अनुभवी पुरवठादार व ठेकेदार यांचेकडून निविदा मागविणेचे नमूद केले आहे. याबाबत उत्पादक संस्था व त्यांचे अधिकृत पुरवठादार यांचेकडून निविदा मागवीत असल्याचा उल्लेख नाही. दर मंजूर करताना विभागाने बाजारभाव मागवून आलेल्या दरासोबत तुलना करून मंजूर करावयाचे दर हे वाजवी असल्याचे नमूद करून दर मंजूर केले आहेत. तथापि असे बाजारभाव उत्पादक संस्था व त्यांचे अधिकृत पुरवठादार यांचेकडून मागविणेत आले नाहीत. त्यामुळे विभागास उत्पादक व त्यांचे अधिकृत पुरवठादार यांचे दर प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे मंजूर दर वाजवी असल्याची पडताळणी करता आली नाही.

4) प्राप्त तीन निविदा 30.08.2013 रोजी उघडून तीनही पात्र निविदाकारांचे नमुन्यांचा चाचणी अहवाल प्राप्त करून निविदाकारांचे दराचे लिफाफे दि.05.09.2013 रोजी उघडले आहेत. त्यानुसार लघुत्तम दराचे निविदाकार मे.राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ मर्यादित,मुंबई यांचे पहिली ते चौथी च्या दफ्तराचा रु.344.25 प्रतिनग व पाचवी ते सातवी च्या दफ्तराचा रु.348.75 प्रतिनग दर बाजारभावाची तुलना करून मंजूर करावयाचे दर बाजारभावापेक्षा कमी असल्याचे नमूद करून आयुक्त यांचे दि.27. 09.2013 च्या मान्यतेने मंजूर केले आहेत. मंजूर करावयाच्या दरानुसार एका वर्षासाठीचा खर्च रु. 27,94,410 येत असताना विभागाने सदर रक्कम रु. 24,66,370 नमूद करून खर्च रु.25 लाख पेक्षा कमी असल्याचे नमूद करून महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार आयुक्तांच्या मान्यतेने निविदा मंजूर केल्या आहेत. वास्तविक महानगरपालिका अधिनियम कलम 73 नुसार खर्च रु.25 लाख पेक्षा जास्त असल्याने स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही करण्यात आली नाही.तसेच आयुक्तांनी मंजूर केलेल्या निविदेबाबत महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार स्थायी समितीस 15 दिवसात कळविल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

5) निविदा अटीनुसार निविदाकाराने निविदेसोबत दिलेल्या साहित्याचे नमुने शासकीय प्रयोगशाळेकडून तपासून ते निविदेतील तांत्रिक तपशीलाप्रमाणे असल्यास त्यांचे दराचे लिफाफे उघडण्याचे होते. निविदाकारांचे दराचे लिफाफे दि.05.09.2013 रोजी उघडले आहेत. व नमुने तपासणीचे व्ही.जे.टी.आय.चे प्रयोगशाळा अहवाल दि.10.08.2013 रोजी प्राप्त झाल्याचे अहवालावरील तारखावरून दिसते. त्यामुळे निविदा अटीनुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंस/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दि. 16/01/2013 नुसार दफ्तर पुरवठा करणेच्या अंदाजपत्रकीय खर्च रु.10 लक्ष वरील असल्याने इ-निविदा पद्धतीने निविदा मागविणे आवश्यक असताना इ-निविदा पद्धतीने निविदा मागविल्या नाहीत.

7) कार्यादेश क्र.626 दि.01.10.2013 नुसार पुरवठादाराने माहे ऑक्टो. 2013 मध्ये 28 शाळांना 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी दफ्तर पुरवठा केला आहे. यानंतर 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी कार्यादेश क्र.947/14 दि. 07.02.2014 नुसार 8116 नग दफ्तर पुरवठा करणेचे आदेश देणेत आले आहेत. सदर पुरवठा आदेशात मंजुरीची तारीख दि.03.02.2014 नमूद करण्यात आली आहे. तथापि सदर दि.03.02. 2014 ची मंजुरी नस्तीसोबत नाही.तसेच सदर कार्यादेश देणेस आयुक्त, स्थायी समिती अथवा मुख्य सभेची मंजुरी घेतल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

8) 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी कार्यादेश क्र.947/14 दि.07.02.2014 नुसार 8116 नग दफ्तरे

पुरविलेबाबत पुरवठदाराचे चलन क्र.1601 दि.10.03.2014 ची झेरोक्स प्रत व बीजक क्र.3646 दि. 11.03.2014 प्रमाणकासोबत जोडले आहे.तथापि चलनाची मूळ प्रत तपासणीस उपलब्ध झाली नाही. अशा प्रतीवरून दफ्तरे प्राप्त झाल्याचे त्यावरील स्वाक्षरीवरून दिसते. तथापि स्वाक्षरीखाली पदनाम व शिक्का नमूद नाही. मूळ चलन व दफ्तरे कोणी व कोणत्या तारखेस ताब्यात घेतली याबाबत पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

9) निविदा अटीनुसार पुरवठादाराने प्रत्येक शाळेत यादी प्रमाणे दफ्तरे पुरविणे व त्याचे बीजक व चलने लेखा विभागास प्रदानास पाठविणे आवश्यक असताना सदर शाळावाईज चलने प्रमाणकासोबत नसताना प्र.क्र.ए.बी.1 दि.10.04.2014 रु.13,77,076, प्र.क्र.ए.बी.2 दि.10.04.2014 रु.14,33,282 असे एकूण रु.28,10,358 चे प्रदान करणेत आले आहे.

10) शाळा क्र.19 व 30 व्यतिरिक्त शाळेकडील साठा व वाटप नोंदी तपासणीस उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे दफ्तरे प्राप्त झाल्याची व विध्यार्थ्यांना वाटप केल्याची पडताळणी करता आली नाही.

11) विभागाने दिलेल्या माहितीनुसार 2012-13 मध्ये महानगरपालिका शाळेत 8070, 2013-14 मध्ये 7304 व 2014-15 मध्ये 7158 विध्यार्थी पहिली ते सातवी मध्ये शिक्षण घेत होते. तथापि 2013-14 मध्ये 8070 व 2014-15 मध्ये 8116 दफ्तरे खरेदी करून प्रदान करणेत आले आहे. त्यामुळे विभागाने आवश्यकतेपेक्षा अनुक्रमे 766 नग व 958 नग जादा दफ्तरे खरेदी केली आहेत. सदर जादा प्राप्त दफ्तरांचा काय विनियोग करण्यात आले याबाबत खुलासा झाला नाही. त्यामुळे जादा दफ्तर पुरवठ्याचा खर्च रु.5,97,366 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

12) शैक्षणिक वर्ष 2013-14 ची दफ्तरे ऑक्टो.2013 मध्ये प्राप्त झाली आहेत व शैक्षणिक वर्ष 2014-15 ची दफ्तरे मार्च.2014 मध्ये प्राप्त झाली आहेत. विध्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष जून मध्ये सुरु होते. त्यामुळे 2013-14 मध्ये विध्यार्थ्यास एका सत्रानंतर दफ्तरे प्राप्त झाल्याने विध्यार्थी पहिल्या सत्रात सदर लाभापासून वंचित राहिले आहेत. तसेच 2014-15 मध्ये प्राप्त दफ्तरे शैक्षणिक वर्ष सुरु होताना वितरीत केल्याची पूर्तता दर्शविली नाही.

उपरोक्त आक्षेपानुसार केलेला खर्च रु. 56,04,768 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 56,04,768.

DATBEPM6101 (Ref No : 16, Hmm No : 134)

## *18 पूर्व प्राथमिक (बालवाडी) वर्गास ताई-शिक्षिका पुरवठा केलेबाबतच्या कामात अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 920422.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 920422.00/-

***महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 5 नुसार संविदा करणे नियम-1 संविदा करण्याची पध्दत व नियम – 2 विवक्षित संविदासाठी प्रचलित निविदा मागविणे या नियमांचा अवलंब न केल्याने सदरील काम नियम बाहय झाले आहे.उल्हासनगर महानगरपालिका पूर्व प्राथमिक (बालवाडी) वर्गास ताई/ शिक्षका पुरवठा केलेने, नियमानुसार प्रचलित निविदा प्रक्रिया केलेली नाही सदरील ताई/ शिक्षका पुरवठा करारनामा मार्च 2014 पर्यंत आहे. पुढील वर्ष2014-15 मध्ये सदरील कामास व कोणतीही मुदतवाढ दिलेली नाही.तसा सुधारीत करारनामा केलेला नाही तसेच करारनामाच्या अटी व शर्तीमध्ये किमात बारावी पास शिक्षिका असतांना त्यांचे पालन झाले नाही, पुरवठादारास शिक्षिका पुरवविणेचे अनुभव नसतांना काम देण्यात आले आहे. मे. सिध्दांत समाज विकास संस्था ही एकच संस्था तांत्रिक बाबतीत पात्र असतांना फेर निविदा काढलेली नाही त्यामुळे नियमानुसार प्रचलित निविदा न झालेबाबत लेखा परिक्षणास सदरील कामाची निविदाबाबत खात्री झालेली नाही त्यामुळे काम नियम बाहय दिसून येते.***

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागाचे लेखा परीक्षण केले असता पूर्व प्राथमिक (बालवाडी) वर्गास ताई/शिक्षिका पुरवठा करणेस काम दरपत्रक प्रक्रियेने केले आहे . सदरील बाबतीत कार्यादेश देउन काम केले आहे बालवाडी शिक्षका ताई पुरविणेचे काम पुढीलप्रमाणे आहे.

कामाचे नाव:- पूर्व प्राथमिक (बालवाडी) वर्गास ताईचा/शिक्षकेचा पुरवठा होणेबाबत
कार्यादेश क्र:- जा. क्र /म.न.पा.शि.मं 3/शिक्षण/730/12 दि 27/11/2012
पुरवठा कालावधी:- माहे डिसेंबर 2012 ते मार्च 2014
पुरवठादाराचे नाव:- मे सिध्दांत समाज विकास संस्था उल्हासनगर
देयक प्रदानाचा तपशिल उदाहरणादाखल खालीलप्रमाणे

| अ.क्र | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| 1 | AB-287 | 01/12/14 | 1,90,200/- |
| 2 | AB-358 | 09/02/15 | 1,90,200/- |
| 3 | AB-402 | 16/03/2015 | 5,40,022/- |
| एकुण | | | 9,20,422/- |

प्राथमिक शिक्षण विभागातील पूर्व प्राथमिक ( बालवाडी) वर्गास ताई/शिक्षिका पुरवठा नस्तीचे / प्रमाणकाचे लेखा परीक्षण केले असता, मनपा लेखा शिर्ष बालवाडी ताई पुरवठा 2014-15 मध्ये रक्कम एकत्रित रक्कम रू 9,20,422/- एवढा खर्च झालेला आहे तरी सदरील ताई/शिक्षिका पुरविणे बाबतच्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) उपरोक्त विषयाप्रकरणी प्राचलित निविदा प्रक्रिया न राबविता केवळ दरपत्रके मागवून पुरवठादारास शिक्षिका/ताई मासिक मानधन रक्कम रू 3,170/- प्रमाणे ताईची नेमणूक केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 5 नुसार संविदा करणे नियम-1 संविदा करण्याची पध्दत व नियम - 2 विवक्षित

संविदासाठी प्रचलित निविदा मागविणे या नियमांचा अवलंब न केल्याने सदरील काम नियम बाहय झाले आहे.
2) न्यूनतम दरपत्रधारक मे सिध्दांत समाज विकास संस्था उल्हासनगर यांचेकडून करार नामा माहे डिसेंबर (2012 ते माहे मार्च 2014) पर्यंत ताई शिक्षीका पुरविणेचा शंभर रूपये मुद्रांक शुल्कवार करून घेतलेला आहे सदरील करारनाम्यावर शिक्षण मंडळाचे दोन सदस्यायांनी स्वाक्ष-या केलेल्या नाहीत. त्यामुळे करारनामाबाबत लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही
3) करारनामा अटी व शर्तीमध्ये बालवाडी शिक्षीकेची शैक्षणिक पात्रता बारावी पास व बालवाडी प्रशिक्षण झालेले पाहीजे असे नमूद असतांना 8 वी पास व दहावीनापास शिक्षित/शिक्षीकांची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे करारनाम अटीचे उल्लघन झाले आहे.
4) बालवाडी हजेरी अहवाल दर माहे त्या त्या शाळेच्या मुख्यध्यापकांकडे देणेस अटीत नमूद केलेले आहे परंतू तसे अहवाल मुख्य ध्यापकाने प्रमाणित केलेबाबतचे लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही, तसेच बालवाडी विद्यार्थ्यांचे हजेरी अहवाल शिक्षकांने प्रमाणित करून मुख्यध्यापक मार्फत प्रत्येक महिन्याच्या देयकाला जोडले नसल्याने शिक्षकांची हजेरीबाबत खात्री झालेली नाही.
5) मे. सिध्दांत समाज विकास संस्था उल्हासनगर यांना बालवाडी/ताई पुरवठा करणेचा अनुभव नसतांना काम देण्यात आलेले आहे. त्यामुळे दरपत्रक सुचनांचे उल्लंघन होउन पात्र बालवाडी/ताई विद्यार्थ्यांना मिळालेल्या नाहीत.
6) तांत्रिक कागदपत्रावरून मे. सिध्दांत समाज विकास संस्था यांनाच पात्र केले आहे तांत्रिक बाबतीत एकच दरपत्रक प्राप्त असतांना फेर दरपत्रक सूचनां काढलेली नाही. त्यामुळे प्रचलित दरपत्रक पद्धत झालेली नाही.
7) बालवाडी ताई/शिक्षिका यांचे हजेरी पत्रक तसेच बालवाडी विदयार्थ्याची किमान 20 विदयार्थी हजेरी आवश्यक असतांना तसे शाळानिहाय मुख्यध्यापकांचे अहवाल लेखा परिक्षणास प्राप्त नसल्यामुळे बालवाडी ताई/शिक्षिका व विदयार्थ्याची उपस्थिती बाबत लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही
सदरील आक्षेप मुद्दयांबाबत अर्धसमास क्र. 137 दि. 25/10/2016 नुसार विभागाला खुलासा विचारला असता विभागने अर्धसमासचे उत्तर लेखा परीक्षण संपणेचा कालावधीपर्यंत दिले नाही त्यामुळे सदरील एकुण रक्कम रू. 9,20,422/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 38, Hmm No : 137)

## *19 भविष्य निर्वाह निधीची बॅक खाती व विनावापर गुंतुन राहिलेल्या शिल्लक रकमेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : शिक्षण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 4103.00/-

***भविष्य निर्वाह निधीचे एसबीआय बॅक व आयडीबीआय बॅक अशा दोन बॅकेंत बचत खाती असून आयडीबीआय बॅकेच्या खात्यामध्ये मार्च 2014 अखेर 43,196/- एवढी रक्कम शिल्लक असून सदर बॅक खात्यात 2014-2015***

***या वित्तीय वर्षात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नसल्याने सदर शिल्लक रक्कम विनावापर व विनांगुतवनुक पडून राहिली आहे. तसेच सदर रक्कम भ.नि. निधीच्या गुंतवलेल्या रक्कमाप्रमाणे मुदत ठेवीत गुंतविण्यात आली नसल्यामुळे सदर रकमेवरील ऐप्रिल-2014 ते मार्च 2015 या कालावधीच्या व्याजाचे नुकसान झाले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या भविष्य निर्वाह निधीच्या बॅक खात्याची पडताळणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींचा खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 121 दि. 18/10/2016 अन्वये निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील अनियमितता दिसून येतात.

1) उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाच्या भविष्य निर्वाह निधीचे आयडीबीआय बॅक व स्टेट बॅक ऑफ इंडीया अशा दोन बॅकेत खाते उघडण्यात आले आहे. एकाच निधीचे दोन वेगवेगळया बॅकेत खाते उघडण्यात आल्याचे दिसून येते. याबाबतचे प्रायोजन स्पष्ट झाले नाही.

2) आयडीबीआय बॅकेतील बचत खाते क्र. 022110400008292 मध्ये दि. 31/03/2014 अखेर रू. 43,196/- एवढी रक्कम शिल्लक आहे. सदर बॅक खात्यामध्ये दि. 31/03/2014 पासून लेखारिक्षणाच्या दिनांकापर्यंत कोणताही व्यवहार करण्यात आलेला नाही. त्यामुळे रू. 43,196/- एवढी रक्कम विना वापर व विना गुंतवणुक पडून आहे. शिक्षण मंडळाकडून केलेल्या गुंतवणुकी सोबत सदर शिल्लक रक्कम मुदत ठेवीने न गुंतविल्याने द.सा.द.शे 9.5% दराने सदर रक्कमेवर शिक्षण मंडळास वर्ष 2015 अखेर रू. 4,103/- एवढे व्याजाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर रक्कम रू. 4,103/- वसूलपात्र आहे.

DATPKCM7101 (Ref No : 55, Hmm No : 121)

## *20 भविष्य निर्वाह निधी लेख्यातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष : शिक्षण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 25461862.00/-

***भविष्य निर्वाह निधीची नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. लेख्यांच्या नोंदीमध्ये खाडाखोड, उपरीलेखन, व्हाईट इंकचा वापर करून नोंदमध्ये बदल करण्यात आले असून सदर बदलफेरफार केलेल्या नोदी सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत. भ.नि.निधीच्या शिल्लक रक्कमेचे सुयोग्य नियोजन करून गुंतवणुक न केल्याने महिना निहाय सारासरी 33.00 लाख एवढी रक्कम खात्यात पडून राहिली आहे. बृहत्तपत्रकानुसार खात्यातील रक्कम व प्रत्यक्ष शिल्लक यामध्ये रू 2,54,61,862/- इतकी तफावत असल्याचे***

***दिसून येते.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळातील एप्रिल 2014 ते मार्च 2015 च्या भविष्य निर्वाह निधी लेख्याची तपासणी करतांना आढळून आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र. 123 दि. 18/10/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील अनियमितता दिसुन येतात.

1) मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 नियम 2 (1) नुसार भविष्य निर्वाह निधीची रोखवही ही सर्वसाधारण निधीच्या रोखवही प्रमाणे नमुना क्र.1 मध्ये ठेवणे आवश्यक असुन नियम 21(2) नुसार रोखवहीमध्ये दैनंदिन व्यवहाराच्या नोंदी घेवून प्रत्येक दिवसा अखरेची शिल्लक नोंदविणे आवश्यक आहे परंतु शिक्षण मंडळाकडील भविष्य निर्वाह निधीची रोखवही उपरोक्त प्रमाणे विहीत नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही.

2) एप्रिल 2014 ते मार्च 2015 मधील भविष्य निर्वाह निधीच्या लेख्याची खातेवही तपासणी करतांना खालील कर्मचा-यांच्या लेख्यांच्या नोंदी मध्ये खाडाखोड, उपरिलेखन, व्हाईट इंकचा वापर करून नोंदीमध्ये बदल करण्यात आले असून सदर बदल/फेरफार केलेल्या नोंदी सक्षम प्राधिका-यांने प्रमाणित केलेल्या नाहीत.

| अ.क्र. | भ.नि.नि. खाते क्र | खातेदाराचे नाव |
|---|---|---|
| १ | 540 | श्री प्रकाश ज. जसराणी |
| २ | 549 | श्रीम.भीमाबाई पवार |
| ३ | 552 | श्रीम. रजनी एस सावलानी |
| ४ | 530 | श्री. सुरेश त्रिभुवन |

सदर खात्याच्या नोंदीमध्ये केलेल्या दुरूस्त्या, उपरिलेखन करून केलेले बदल सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेले नाहीत.

1) भविष्य निर्वाह निधी लेख्याच्या रोखवहीनुसार वर्ष 2014-2015 मधील महिना निहाय अखेरच्या शिलकेचा तपाशिल खालीलप्रमाणे आहे.

महिना रोखवहीनुसार महिना अखेरची शिल्लक रक्कम रूपये पासबुकनुसार बॅक खात्यात महिना अखेरची शिल्लक रू.

| महिना | रोखवहीनुसार महिना अखेरची शिल्लक रक्कम रूपये | पासबुकनुसार बॅक खात्यात महिना अखेरची शिल्लक रू. | | |
|---|---|---|---|---|
| | | एसबीआय बॅक रूपये | आयडीबाआय बॅक रूपये | एकुण रक्कम रूपये |
| एप्रिल 2014 | 430108.86 | 530108.86 | 43196 | 1003412 |
| मे 2014 | 332521.86 | 742521.86 | 43196 | 1118238 |
| जुन 2014 | 1991142.86 | 1991142.86 | 43196 | 4025480 |
| जुलै 2014 | 2681692.86 | 2681692.86 | 43196 | 5406580 |
| ऑगस्ट 2014 | 3458692.86 | 3458692.86 | 43196 | 6960580 |
| सप्टेंबर 2014 | 3458692.86 | 3458692.86 | 44062 | 6961446 |
| ऑक्टोबर 2014 | 3458692.86 | 3458692.86 | 44062 | 6961446 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नोव्हेंबर 2014 | 3873612.86 | 3873692.86 | 44062 | 7791366 |
| डिसेंबर 2014 | 3937977.86 | 3937977.86 | 44062 | 7920016 |
| जानेवारी 2015 | 5057977.86 | 5057977.86 | 44062 | 10115954 |
| फेब्रुवारी 2015 | 4438870.86 | 4438870.86 | 44062 | 8921802 |
| मार्च 2015 | 6457510.86 | 6457510.86 | 44941 | 12959961 |
| एकुण सरासरी | 39577495.32 12 =3298124.61 | 40087575.32 12 =3340630.41 | 525293 12 = 43774-/ | 80146281 12 =6678856.75 |

वरील प्रमाणे भविष्य निर्वाह निधी लेख्यात रोखवहीनुसार महिना अखेर सरासरी रू. 32,98,124.61/- एवढी रक्कम शिल्लक राहिली असल्याचे दिसुन येते. तरी लेख्यात महिना निहाय जमा होणा-या रकमा सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या अंतिम प्रदानाच्या रक्कमा इतर कर्मचा-यांच्या मागणीनुसार अदा करावयाच्या अग्रिम रक्कमांच्या वेळोवळी आढावा घेवुन भ.नि. निधीच्या शिल्लक रक्कमेचे सुयोग्य नियोजन करून गुंतवणुक न केल्याने महिना निहाय मोठया प्रमाणात खात्यात रक्कम अनावश्यक पडुन राहिली आहे. पर्यायाने शिक्षण मंडळास सदर रक्कमेवरील व्याजाचे नुकसान झाले आहे.

1) भविष्य निर्वाह निधीच्या खातेवहीनुसार असलेल्या शिलकेशी बॅकेतील शिल्लक रक्कम अधिक भ.नि.निधीच्या गुंतवणुकीच्या रकमा यांचेशी पडताळणी केली असता खातेवहीतील शिलकेपेक्षा बॅकेतील शिल्लक अधिक गुंतवणुक यांची एकुण रक्कम कमी असल्याचे दिसुन येते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | दि.31/3/2014 रोजी भ.नि.नि.चा शिलकेचा तपशिल | रक्कम रू . |
|---|---|---|
| 1 | बृहत्तपत्रकानुसार भ.नि.नि.च्या शिलकेचा तपशिल | 10,22,07,861/- |
| 2 | अ गुंतवणुकीच्या मुददलाची एकुण रक्कम रू. | 70243548/- |
| 3 | ब आयडीबीआय बंक खात्यातील शिल्लक रक्कम रू. | 44941/- |
| 4 | क रू रक्कम शिल्लक खात्यातील बॅक एसबीआय | 6457510/- |
| 5 | एकुण (2+3+4) | 76745999/- |
| | बृहत्तपत्रात व रोखवहीतील शिल्लकेतील तफावत रक्कम रू . (अ.क्र.1 वजा 5) | 25461862/- |

वरील प्रमाणे भविष्य निर्वाह निधीच्या बृहत्तपत्रकानुसार वर्गणीदारांच्या खात्यामधील दि. 31/03/2015 अखेर एकुण रक्कम रू. 10,22,07,861/- एवढी रक्कम शिल्लक आहे परंतु गुंतवणुकीची रक्कम व रोखवहीची शिल्लक विचारात घेता शिक्षण मंडळाकडे भविष्य निर्वाह निधीच्या खाती शिल्लक एकुण रक्कम रूपये 7,67,45,999/- एवढे आहे त्यानुसार बृहत्तपत्रकाच्या रकमेपेक्षा प्रत्यक्ष शिल्लक रक्कम रू. 2,54,61,862/- ने कमी आहे. मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 मधील नियम 8 (1)(2) नुसार सदर तफावतीचा ताळमेळ घेतलेला नसुन

तफावत दुर केलेली नाही.



## *21 दि. 01/11/2005 नंतर नियुक्त कर्मचा-यांना अंशदान निवृत्ती वेतन योजनेऐवजी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देण्याबद्दल.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : शिक्षण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शिक्षण मंडळाचे दि. 31/10/2005 नंतर नियुक्त झालेल्या खाली नमुद केलेल्या कर्मचा- यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु केली असून दि. 01/11/2005 नंतर नियुक्त कर्मचा- यांच्या वेतनातून भ. नि. निधी योजनेतंर्गत वर्गणी वसूल करून त्यांना नियमबाहयपणे सदर योजनेचा लाभ दिला आहे.***

शासन निर्णय वित्त विभाग क्र. अनियो-1005/126/सेवा-4 दि 31 ऑक्टोबर 2005 अन्वये शासन सेवेत 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी, सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्त वेतन योजनेऐवजी केंद्र शासनाच्या धर्तीवर, नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्यात आली असुन सदर कर्मचा-यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन) नियमृ 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी यांच्या तरतुदी लागु होणार नाहीत. असे शासनाचे आदेश आहेत, तथापि उल्हासनगर मनपा शिक्षणमंडळाचे 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करतांना भविष्य निर्वाह निधी लेख्यांची पडताळणी करता शिक्षण मंडळाचे दि. 31/10/2005 नंतर नियुक्त झालेल्या खाली नमुद केलेल्या कर्मचा-यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु न करता सदर कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे उघडण्यात आले असुन कर्मचा-यांच्या वेतनातुन दरमहा भविष्य निर्वाह निधीची वर्गणी वसुल करून सदर कर्मचा-यांना नियमबाहयपणे सदर योजनेचा लाभ दिला आहे.

| अ.क्र. | कर्मचानाव यांचे- | पदनाम | नियुक्तीचा दिनांक | भ .नि.नि. .खाते |
|---|---|---|---|---|
| 1 | लीना अ. पाटील | उ.शि. | 28/12/2007 | 712 |
| 2 | सौ महाजन .प्र विद्या . | उ.शि. | 05/06/2006 | 709 |
| 3 | पंकज म भंगाळे . | उ.शि. | 01/06/2006 | 704 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | श्रीम केदार .ना दिपमाला . | उ.शि. | 03/03/2006 | 699 |
| 5 | सौ .नेमाडे .यों जयश्री . | उ.शि. | 01/06/2006 | 703 |
| 6 | श्रीमती गौरी नेहाते | उ.शि. | 07/11/2009 | 766 |
| 7 | सौ. एडके पल्लवी अ. | उ.शि. | 15/06/2006 | 700 |
| 8 | श्रीमती सरीता वि.सुर्यवंशी | उ.शि. | 01/06/2006 | 715 |
| 9 | श्री . पंकज ना पवार | उ.शि. | 01/06/2006 | 721 |
| 10 | श्री शंकर र खरेल . | शिपाई | 22/02/2010 | 710 |
| 11 | श्री हेमंत शेजवळ | लिपीक | 14/07/2007 | 694 |
| 12 | श्रीम. कदम .चं निलम | लिपीक | 28/10/2009 | 711 |
| 13 | श्रीम पवार रोहिणी . | उ.शि. | 25/11/2009 | 739 |
| 14 | श्रीमती रंजना व्ही जाधव . | उ.शि. | 15/06/2009 | 740 |
| 15 | श्रीमती माधुरी खैरनार | उ.शि. | 16/08/2006 | 743 |

उपरोक्त बाबत अर्धसमास पत्र क्र. 122 दि.18/10/2016 अन्वये निर्गमित केले असता शिक्षण विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

DATPKCM7101 (Ref No : 96, Hmm No : 122)

## *22 पारगमन शुल्क (ESCORT FEE) वसुलीसाठी अभिकर्ता नेमणेसाठी मागविलेल्या निविदेतील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6750000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 31000.00/-

***निविदा भरलेल्या व स्थायी समितीने मंजुरी दिलेल्या निविदाकारापेक्षा वेगळ्या नावाने करारनामा करणे, मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मध्ये सन 2006 पासून झालेल्या सुधारणेनुसार रु.31,500 च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना तो रु.500 च्या मुद्रांकावर केल्याने कमी मुद्रांक रु.31,000 वर करारनामा करणे, दुसरे निविदाकर मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर, उल्हासनगर यांनी ते काळ्या यादीत नसल्याचे प्रमाणपत्र निविदा अटी/ शर्तीनुसार सादर केले नसताना त्यांची निविदा ग्राह्य ठरविणे, स्थायी समितीच्या निविदा मंजुरीच्या ठरावात अभिकर्त्याने मागणी केल्यानुसार तीन महिने कालावधीसाठी महानगरपालिका कर्मचारी वसुलीसाठी देवून त्यांचे पगार तसेच भत्ते अभिकर्त्याकडून वसूल करणेचे नमूद केले आहे, त्याप्रमाणे म.न.पा.कर्मचारी दिल्याचे व सदर कालावधीचे त्यांचे वेतन व भत्ते महानगरपालिकेने अभिकर्त्याकडून वसूल केल्याची पडताळणी आवश्यक अभिलेख्या अभावी करता न येणे, महापालिकेने अभिकर्त्यास वसुलीसाठी दिलेल्या पावत्यांच्या स्थळप्रती तपासणीस उपलब्ध झाल्या नसल्याने म.न.पा.ने दिलेल्या पावत्याद्वारेच वसुली केल्याची पडताळणी करता न येणे,मुख्य रोखवही नुसार एकूण पाच हप्त्यात रु.67,50,000 धनादेशाद्वारे जमा केल्याचे दिसून येते, तथापि सदर रक्कम अभिकर्त्यानीच विहित वेळेत भरल्याचे अभिलेख्यासह पूर्तता न दर्शविणे, निविदा अटी/ शर्ती नुसार दैनिक वसुलीच्या भरण्यासाठी एक एस्क्रो बँक खाते आयुक्त व उप आयुक्त यांचे नावे काढून सर्व दैनिक वसुली जमा करून महानगरपालिका हप्त्याची रक्कम म.न.पा.चे खाती ट्रान्स्फर करून उरलेली रक्कम अभिकर्त्यास काढून घेणेची होती,तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केल्याची पडताळणी आवश्यक अभिलेखे उपलब्ध न झाल्याने करता न येणे.***

महापालिका हद्दीत आयात मालावर जकात आकारणी 1 जुलै 2012 पासून बंद झाल्याने व त्याऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला. पारगमन शुल्क (ESCORT FEE) वसुली बाबत शासनाची भूमिका व निर्णय स्पष्ट होईपर्यंत महानगरपालिका हद्दीतून बाहेर जाणाऱ्या मालावर व महानगरपालिका हद्दीत खप, वापर व विक्रीसाठी आयात न होणाऱ्या मालावर पारगमन शुल्काची एक वर्षासाठी वसुली करणेसाठी खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करणेसाठी मागविलेल्या निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- स्थायी समिती ठराव क्र.73 दि. 10.01.2014
2. प्रतिमहिना निश्चित किमान देकार रक्कम-रु.22,16,892 वार्षिक रु.2.66,02,704
3. मंजूर महत्तम देकार रक्कम रु.3.24,00,000 स्थायी समिती ठ.क्र.2 दि.13.05.2014 नुसार.
4. अभिकार्त्याचे नाव- मे. जे.के.इलेक्ट्रोनिक्स ॲड अप्लायन्सेस ली. डोंबिवली.
5. कार्यादेश क्र.उमपा/स्थानिक संस्था कर/47/14 दि.31.05.2014
6. करारनामा-रु.500.
7. वसुलीचा कालावधी-1/06/2014 ते 31/05/2015 किवा शासन निर्णय झाल्यास वसुली बंद करणे जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत.
8. शासन आदेशानुसार पारगमन शुल्क वसुली बंद केल्याचा दिनांक.15.08.2014 मध्यरात्री पासून .
11. एकूण जमा रक्कम रु. 67,50,000 (प्रतिमाह रु. 27 लक्ष प्रमाणे.

सदर विषयाबाबतची प्रशासकीय मंजुरी नस्ती व निविदेची नस्ती यांची तपासणी केली असता आढळून

आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.143 दि.29.11.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) मे.जे.के.इलेक्ट्रोनिक्स ॲड अप्लायन्सेस ली. डोंबिवली यांचा रु.3.24,00,000 चा महत्तम देकार स्वीकारून त्यांचे सोबत साविदा करणेस स्थायी समिती ठराव क्र. 2 दि.13.05.2014 नुसार मान्यता प्राप्त केली आहे. तथापि करारनामा मे.जे.के. इंटरप्रायासेस, डोंबिवली यांचे सोबत केलेला आहे. निविदा मे. जे. के. इलेक्ट्रोनिक्स ॲड अप्लायन्सेस ली. यांचे नावे भरली असताना व स्थायी समितीने त्याच नावाने संविदा करणेस मान्यता दिली असताना वेगळ्या नावाच्या मे.जे.के.इंटरप्रायासेस, डोंबिवली यांचेशी करारनामा करण्यात आला आहे. मे.जे.के.इंटरप्रायासेस,डोंबिवली सोबत कारनामा करणेस स्थायी समिती मंजुरी घेतल्याचे दिसून येत नाही.

2) मे.जे.के.इंटरप्रायासेस, डोंबिवली यांचे सोबत रु.500 च्या मुद्रांक पेपरवर करारनाम केलेला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मध्ये सन 2006 पासून झालेल्या सुधारणेनुसार रु.31,500 च्या मुद्रांक मुल्य पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना तो रु.500 च्या मुद्रांकावर केल्याने कमी मुद्रांक रु.31,000 ची व्याजासह वसुली करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) निविदेस तीन वेळा मुदतवाढ देवूनही दोनच देकार प्राप्त झाल्याने त्यांचे दराचे लिफाफे उघडण्यात आले. निविदेतील पात्रतेच्या अटी/शर्तीनुसार दुसरे निविदाकर मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर,उल्हासनगर यांनी ते काळ्या यादीत नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले नसताना त्यांची निविदा ग्राह्य ठरवून त्यांचा दराचा लिफाफा उघडला आहे.

4) स्थायी समितीच्या निविदा मंजुरीच्या ठरावात अभिकर्त्याने मागणी केल्यानुसार तीन महिन्यासाठी महानगरपालिका कर्मचारी वसुलीसाठी देणेत यावेत व त्यांचे पगार तसेच भत्ते अभिकर्त्याकडून वसूल करणेचे नमूद केले आहे.तथापि त्याप्रमाणे म.न.पा.कर्मचारी दिल्याचे व सदर कालावधीचे त्यांचे वेतन व भत्ते महानगरपालिकेने अभिकर्त्याकडून वसूल केल्याची पडताळणी आवश्यक अभिलेखे नस्तीसोबत नसल्याने करता आली नाही.

5)निविदा अटी/शर्ती नुसार महानगरपालिकेच्या रु.100 दर्शनी मूल्याच्या पारगमन शुल्क वसुलीच्या पावत्या अभिकर्त्याने वापरणे आवश्यक होते.त्यानुसार महापालिकेने अभिकर्त्यास वसुलीसाठी दिलेल्या पावत्यांच्या स्थळप्रती तपासणीस उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे म.न.पा.ने दिलेल्या पावत्याद्वारेच वसुली केल्याची पडताळणी करता आली नाही.

6)निविदा अटी/शर्ती तसेच करारनाम्यानुसार दर पंधरा दिवसांनी अभिकर्त्याने रु.13,50,000 चा भरणा महापालिकेस करणेच होता. विभागाने तपासणीस उपलब्ध करून दिलेल्या अभिलेखात याबाबत कोणताही तपशील उपलब्ध नाही.महापालिकेच्या मुख्य रोखवहीनुसार एकूण पाच हप्त्यात रक्कम रु.67,50,000 धनादेशाद्वारे जमा केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर रक्कम अभिकर्त्यानीच विहित वेळेत भरल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

7) निविदा अटी/शर्ती नुसार दैनिक वसुलीच्या भरण्यासाठी एक एस्क्रो बँक खाते आयुक्त व उप आयुक्त यांचे नावे काढणे आवश्यक होते. त्यामध्ये सर्व दैनिक वसुली जमा करून महानगरपालिका हप्त्याची रक्कम म.न.पा.चे खाती ट्रान्स्फर करून उरलेली रक्कम अभिकर्त्यास काढून घेणेची होती. तथापि अशा प्रकारे एस्क्रो बँक खाते काढल्याची व त्यातून म.न.पा. हप्त्याची रक्कम ट्रान्स्फर केल्याची व उर्वरित रक्कम अभिकार्त्यानी काढून घेतल्याची पडताळणी याबाबतचे अभिलेखे तपासणीस उपलब्ध न झाल्याने करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपानुसार लेखापरीक्षणात रक्कम रु.67,50,000 आक्षेपाधीन व रक्कम रु.31,000 वसूलपात्र ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रकम रु.31,000.
आक्षेपाधीन रक्कम रु.67,50,000.
DATBEPM6101 (Ref No : 17, Hmm No : 143)

## *23 स्थानिक संस्था कर विभागास भांडार विभागाकडून वसुलीसाठी वापरणेस दिलेली पारगमन शुल्क पावती पुस्तके व सामान्य पावती पुस्तके तपासणीस उपलब्ध न होणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
आक्षेपाधीन रक्कम रु. 196300.00/-

***विभागाची पावती पुस्तक साठानोंदवही तपासणीस उपलब्ध झाली नसल्याने प्राप्त पावती पुस्तके, वापरलेली पावती पुस्तके व शिल्लक पावती पुस्तकांची पडताळणी करता न येणे, वसुलीसाठी वापरलेल्या पावती पुस्तकांच्या स्थळप्रती तपासणीस उपलब्ध न झाल्यने भांडार विभागाने वापरास दिलेल्या पावती पुस्तकाद्‌वारेच वसूल झाल्याचे व पावतीद्‌वारे वसूल सर्व रक्कम वेळच्या वेळी महानगरपालिका निधीत जमा केल्याची पडताळणी करता न येणे, सामान्य पावतीद्‌वारे वसूल रक्कमाबाबत जमा नोंदवही, भरणा चलने,रोखपालाकडे रक्कम जमा केल्याची पोहोच तसेच पावत्यांच्या स्थळप्रती ई.तपासणीस उपलब्ध न झाल्याने वसूल केलेल्या सर्व रक्कम वेळच्यावेळी म.न.पा. निधीत जमा केल्याची पडताळणी करता न येणे, लेखापरीक्षण वित्तीय वर्षात नोंदणी केलेल्या एकूण 1963 संस्थाकडून रु.100 प्रती नोंदणी प्रमाणे एकूण रु.1,96,300 नोंदणी फी वेळच्या वेळी महापालिका निधीत जमा केल्याची पडताळणी सामान्य पावत्यांच्या स्थळप्रती व भरणा चलना अभावी करता न येणे,महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 4 नुसार लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करून देणे हि स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी असताना उपरोक्त नमूद अभिलेख्यांच्या उपलब्ध न झाल्याने मनपा कडून कलम 4 चे उल्हंघन होणे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये भांडार विभागाकडून खालील प्रमाणे पावती पुस्तके वसुलीसाठी वितरीत केली असल्याचे भांडार विभागाकडील पावतीपुस्तक साठा नोंदवाहिवरून दिसून येते.

| अ.क्र. | वसुली पावती | पा. पु. | पा. पुस्तक | दिल्याची |
|---|---|---|---|---|

| | प्रकार | संख्या | क्र. | तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | पारगमन शुल्क न.न.8 | 2000<br>2000<br>5000 | 2001 ते 4000<br>4001 ते 6000<br>1 ते 5000 | 30.09.2013<br>04.06.2014<br>16.09.2014 |
| 2 | सामान्य पावती न.न.2 | 3<br>2<br>3<br>2 | 1536 ते 1538<br>1638 ते 1639<br>1690 ते 1693<br>1 ते 2 | 22.04.2013<br>23.08.2013<br>11.11.2013<br>22.08.2014 |

विभागाचे पारगमन शुल्क वसुली व सामान्य पावती द्वारे वसुलीचे निवडक महिन्याचे लेखापरीक्षण करुन आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.147 दि.29.11.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) भांडार विभागाकडून वसुलीसाठी प्राप्त पावती पुस्तकांची स्थानिक संस्था कर विभागाने साठा नोंदवही ठेवून विनियोगाचे हिशेब ठेवणे आवश्यक असताना अशी साठानोंदवही तपासणीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्राप्त पावती पुस्तके,वापरलेली पावती पुस्तके व शिल्लक पावती पुस्तकांची पडताळणी करता आली नाही.

2)वसुलीसाठी वापरलेल्या पावती पुस्तकांच्या स्थळप्रती तपासणीस उपलब्ध न झाल्यने भांडार विभागाने वापरास दिलेल्या पावती पुस्तकाद्वारेच वसूल झाल्याचे व पावतीद्वारे वसूल सर्व रक्कम वेळच्या वेळी महानगरपालिका निधीत जमा केल्याची पडताळणी करता आली नाही.

3) सामान्य पावतीद्वारे वसूल रक्कमाबाबत जमा नोंदवही, भरणा चलने, रोखपालाकडे रक्कम जमा केल्याची पोहोच तसेच पावत्यांच्या स्थळप्रती ई.तपासणीस उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे वसूल केलेल्या सर्व रक्कम वेळच्यावेळी म.न.पा. निधीत जमा केल्याची पडताळणी करता आली नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 4 नुसार लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करून देणे हि स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी असताना उपरोक्त नमूद अभिलेख्यांच्या उपलब्ध न झाल्याने मनपा कडून कलम 4 चे उल्हंघन झाले आहे.

4) विभागाने दिलेल्या माहितीनुसार 2013-14 मध्ये 1638 व्यापारी संस्थाची व 2014-15 मध्ये 283 व्यापारी संस्थाची नोंदणी केल्याचे दिसून येते. प्रत्येक नोंदणीसाठी रु.100 नोंदणी फी वसूल केली जाते. यासाठी सबंधीतास रक्कम प्राप्त झाले बाबत सामान्य पावती देणे आवश्यक आहे.तथापि सदरच्या पावत्यांच्या स्थळप्रती तपासणीस उपलब्ध झाल्या नाहीत.त्यामुळे लेखापरीक्षण वित्तीय वर्षात नोंदणी केलेल्या एकूण 1963 संस्थाकडून एकूण रु.1,96,300 वेळच्या वेळी म.न.पा. निधीत जमा केल्याची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही. त्यामुळे रक्कम रु.1,96,300 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.1,96,300.

DATBEPM6101 (Ref No : 18, Hmm No : 147)

## *24 स्थानिक संस्था कराच्या म.न.पा.कडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रात (ई-2) नमूद भरलेल्या कराची भरणा चलने नस्तीसोबत नसणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4008044.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 90000.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 नियम 29(2) नुसार व्यापाऱ्याने नमुना ई-2 मध्ये वार्षिक विवरण दाखल करून त्यासोबत बँक चलने जोडणे आवश्यक असताना वार्षिक विवरणात नमूद कर भरणा रक्कम रु.40,08,044 बँक चलने विवरणासोबत न जोडल्याने सदर रक्कम महानगरपालिकेच्या खाती जमा झाल्याची पडताळणी करता न येणे, वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मधील वार्षिक विवरणासोबत विक्री व खरेदीच्या नोंदी,खाते वही,ताळेबंद,नफा तोटा पत्रक,स्थानिक खरेदी बिले व त्यांचे एल.बी.टी.क्रमांक,खरेदीची बिले ई. नसताना तसेच काही प्रकरणी वार्षिक विवरणे सादर केली नसताना नियमाप्रमाणे नोटीस न दिल्याने स्थानिक संस्था कर नियम 2010 चे नियम 48(6) अन्वये रु.5000/- मात्र पेक्षा अधिक नसेल एवढी रक्कमेची एकूण रु. 90,000 शास्ती लावता न येणे व अशा प्रकरणातील स्थानिक संस्था कर सुद्धा महापालिकेस प्राप्त न होणे, वार्षिक विवरणे सादर केलेल्या व्यापारी संस्थांनी त्यांचे विवरणासोबत विक्री व खरेदीच्या नोंदी, खाते वही,ताळेबंद, नफा तोटा पत्रक स्थानिक खरेदी बिले व त्यांचे एल.बी.टी.क्रमांक, खरेदीची बिले ई.कागदपत्रे जोडली नसताना विभागाने सदरची कागदपत्रे प्राप्त करणेसाठी कोणतीही कार्यवाही न करणे, विभागाकडील मूळ चलने व भरणा करण्यात आलेल्या बँकेचा बँक स्क्रोल तसेच संस्थाचे भरण्याबाबचे लेजर अर्धसमास पत्राद्वारे मागणी करूनही तपासणीस उपलब्ध न केल्याने सदर भरणा चलनांच्या प्रतीद्वारे भरणा केलेली रक्कम महानगरपालिका खाती जमा झाल्याची पडताळणी करता न येणे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये तपासणीस सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांची तपासणी करता खालील तपशीलात नमूद नोंदणीकृत व्यापारी संस्थांनी महानगरपालिकेकडे सादर केलेल्या त्यांचे वार्षिक विवरणपत्रात नमूद भरलेल्या कराबाबतची भरणा चलने नस्तीसोबत आढळून येत नाहीत.

| अ.क्र. | नोंदणी क्र. | नाव | ई-2 नमूद कर भरणा 2013-14 रु. | ई-2 नमूद कर भरणा 2014-15 रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | यु-1/8/1/273 | मे.मोर्या सुपारीवाला. | 67,407 | ई-2 नाही. |
| 2 | यु-1/8/1/252 | मे.कोहिनूर प्लास्टिक | - | 20,494(प्रत्यक्ष भेट) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | यु-1/253 | मे.गणेश मेडिकल स्टोर्स | 7,270 ( प्रत्यक्ष भेट) | 10,000 (प्रत्यक्ष भेट) |
| 4 | यु-1/251 | मे.न्यू हिंदुस्तान प्लॉस्टिक | - | 56,490(प्रत्यक्ष भेट) |
| 5 | यु-5/1593 | मे.अरमान प्लास्टिक | 4,800 | ई-2 नाही. |
| 6 | यु-5/1594 | मे.मयूर कलर लॅब. | 12,331 | ई-2 नाही. |
| 7 | यु-5/556 | मे.महालक्ष्मी कॉसमेटिक्स | 10,025 | 9,760 |
| 8 | यु-5/555 | मे.अनुप इंजिनी. | 31,683 | 18,544 |
| 9 | यु-5/554 | मे.सतीश इंड. | 7,200 | नील नमूद. |
| 10 | यु-1/103 | मे.कमल सथियाटी मर्चंट | - | 24,700(प्रत्यक्ष भेट) |
| 11 | यु-1/103 | मे.महेश पलाय. | 10,950 | 2,33,493 |
| 12 | यु-1/89 | मे.शाम एजेन्सी | - | 90,451 |
| 13 | यु-1/92 | मे.अंबिका कंट्री बार. | - | 27,800 (प्रत्यक्ष भेट) |
| 14 | यु-1/97 | मे.प्रिन्स प्रोडक्ट | - | 9,528 (प्रत्यक्ष भेट) |
| 15 | यु-1/61 | मे.जयभवानी स्टील सेंटर | 7,000 | 3.600(प्रत्यक्ष भेट) |
| 16 | यु-1/60 | मे.पारस मेडिकल स्टोर्स | 11,600 | 17,700 |
| 17 | यु-1/281 | मे.मुस्कान टेक्सटाइल्स | 4,996 | ई-2 नाही. |
| 18 | यु-5/559 | मे.राजबीर टायर सर्व्हिस | 4,800 | ई-2 नाही. |
| 19 | यु-5/563 | मे.पंकज फर्निचर | 14,745 | ई-2 नाही. |
| 20 | यु-5/565 | मे.अंबिका क्रिएशन | 35,911 | 39,505 |
| 21 | यु-5/571 | मे.महालक्ष्मी इंटर. | 1,00,521 | 73,771 |
| 22 | यु-5/574 | मे.आर.एस.इंटर. | 49,400 | ई-2 नाही. |
| 23 | यु-5/577 | मे.महाराजा प्रिंटर. | 32,412 | 32,500 |
| 24 | यु-5/578 | मे.जय शंकर फुट वेअर. | 53,024 | 45,808 |
| 25 | यु-5/582 | मे.लकी होसियारी वर्क्स. | 58,930 | ई-2 नाही. |
| 26 | यु-5/585 | मे.राजलक्ष् | ई-2 नाही. | 61,850 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मी ट्रेडर्स. | | |
| 27 | यु-8/260 | मे.महालक्षम ी ट्रेडर्स. | 12,31,830(प्रत्यक ्ष भेट) ई-2 नाही. | 7,30,043(प्रत्यक ्ष भेट) ई-2 नाही. |
| 28 | यु-5/20 | मे.मनीष बर्नर इंड. | - | 26,000 |
| 29 | यु-3/974 | मे.हर्ष इंटर. | 16,130 | ई-2 नाही. |
| 30 | यु-3/971 | मे.सोनू फुटवेअर | - | 17,640 |
| 31 | यु-3/976 | मे.ब्लॉसम इंटर. | 12,644 | ई-2 नाही. |
| 32 | यु-4/262 | मे.मोहन फोम हाउस. | 1,51,562 | ई-2 नाही. |
| 33 | यु-4/263 | मे.सुभाष टेक्सटाइल्स . | 60,220 | ई-2 नाही. |
| 34 | यु-4/297 | मे.रोहित फुटवेअर. | 9,880 | 25,391 |
| 35 | यु-4/294 | मे.जयगणेश स्टोर्स. | 41,860 | ई-2 नाही. |
| 36 | यु-4/273 | मे.शिवशक्ती स्टोर्स. | 20,123 | ई-2 नाही. |
| 37 | यु-4/275 | मे.वित्राग ऑटो. | 1,32,056 | ई-2 नाही. |
| 38 | यु-7/234 | मे.अनुपम अल्युमिनियम . | 9,807 | - |
| 39 | यु-7/242 | मे.एम.के.नीट वेअर. | - | 12,871 |
| 40 | यु-6/344 | मे.पराग इंड. | 76,287 | ई-2 नाही. |
| 41 | यु-6/439 | मे.आनंदजी इंटर. | 61,000 | 71,701 |
| | | एकूण रु. | 23,48,404 | 16,59,640 |

**एकूण दोन वर्ष रु.40,08,044.**

याबाबत आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.146 दि.29.11.2016 निर्गमित करण्यात आले होते.तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर ) नियम 2010 नियम 29(2) नुसार व्यापाऱ्याने नमुना ई-2 मध्ये वार्षिक विवरण दाखल करून त्यासोबत बँक चलने जोडणे आवश्यक असताना वार्षिक विवरणात नमूद कर भरणा रक्कमेची बँक चलने न जोडता विवरणे सादर केली आहेत. याबाबत विभागाकडील बँक भरणा चलने तपासणीस उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास पत्र क्र.107 दि.15/ 10/2016 व अर्धसमास पत्र क्र.133 दि.25/ 10/2016 व पत्र क्र.139 दि.11/11/2016 नुसार मागणी करूनही सदर चलने उपलब्ध करून देणेत आली नाहीत. त्यामुळे उपरोक्त नमूद व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणात नमूद केलेल्या कराचा भरणा रु.40,08,044 महानगरपालिकेच्या निधीत जमा झाल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे सदर रक्कम लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 नियम 33(7) नुसार सहामाही/

वार्षिक विवरण सादर न केलेल्या किवा वार्षिक विवरणासोबत आवश्यक कागदपत्रे न जोडल्यास अथवा नोंदणीसाठी अर्ज केला नसल्यास नमुना "एच" मध्ये नोटीस देणे आवश्यक असताना 2014-15 मधील वार्षिक विवरणासोबत विक्री व खरेदीच्या नोंदी,खाते वही,ताळेबंद,नफा तोटा पत्रक,स्थानिक खरेदी बिले व त्यांचे एल.बी.टी.क्रमांक,खरेदीची बिले ई. नसताना व वार्षिक विवरणे सादर केली नसताना नियमाप्रमाणे नोटीस दिल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही न केल्याने स्थानिक संस्था कर नियम 2010 चे नियम 48(6) अन्वये व्यापारी किंवा व्यक्ती यांनी पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहीत कालावधीत भरण्यास कसूर केली असेल तर आयुक्तास असा व्यापारी किंवा व्यक्ती यांचेवर त्यांना त्यांचे म्हणने ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर रु. 5000/- मात्र पेक्षा अधिक नसेल एवढी रक्कमेची शास्ती लावता आली नाही. उपरोक्त नमूद 41 प्रकरणापैकी 2013-14 व 2014-15 मध्ये एकूण 18 प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही न केल्याने रु.90,000 शास्तीचा महसूल महानगरपालिकेस प्राप्त झाला नाही, शिवाय अशा प्रकरणातील स्थानिक संस्था कर सुद्धा महापालिकेस प्राप्त झाला नाही.त्यामुळे शास्तीची रक्कम सबंधीताकडून जबाबदारी निश्चित करून वसूल करावी व सदर सर्व प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही करून त्यांचेकडून स्थानिक संस्था कर वसूल केल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

3) उपरोक्त 41 प्रकारापैकी वार्षिक विवरणे (इ-2) सदर केलेल्या व्यापारी संस्थांनी त्यांचे विवरणासोबत विक्री व खरेदीच्या नोंदी,खाते वही,ताळेबंद,नफा तोटा पत्रक,स्थानिक खरेदी बिले व त्यांचे एल.बी.टी. क्रमांक,खरेदीची बिले ई. कागदपत्रे जोडली नाहीत.विभागाने सदरची कागदपत्रे प्राप्त करणेसाठी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वार्षिक विवरण सादर केलेल्या व्यापारी संस्थांनी भरलेला कर अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.

4) वार्षिक विवरणासोबत व्यापारी संस्थांनी भरणा चलनांच्या प्रती जोडल्या आहेत.तथापि विभागाकडील मूळ चलने व भरणा करण्यात आलेल्या बँकेचा बँक स्क्रोल तसेच संस्थाचे भरण्याबाबचे लेजर उपरोक्त नमूद अर्धसमास पत्राद्वारे मागणी करूनही तपासणीस उपलब्ध न केल्याने सदर भरणा चलनांच्या प्रतीद्वारे भरणा केलेली रक्कम महानगरपालिका खाती जमा झाल्याची पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपानुसार रक्कम रु.90,000 लेखापरीक्षणात वसूलपात्र व रक्कम रु.40,08,044 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.90,000.
आक्षेपाधीन रक्कम रु.40,08,044.

DATBEPM6101 (Ref No : 19, Hmm No : 146)

## *25 स्थानिक संस्था कर विभागाचे लेखे लेखापरीक्षणात उपलब्ध न झाले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम कलम 4 नुसार लेखापरीक्षणात तपासणीसाठी अभिलेखे उपलब्ध करून देणेची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी असताना लेखी मागणी करूनही परिपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याने मनपा कडून अधिनियमाच्या तरतुदीचे उल्हंघन झाले आहे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाच्या वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 च्या लेखापरीक्षणात नोंदणीकृत संस्थाकडून घेण्यात आलेल्या सुरक्षा रक्कमांचा तपशील व अनुषंगिक लेखे, वार्षिक विवरणे सादर न केलेल्या संस्थांची वर्षावर संख्या व अनुषंगिक लेखे, दोनही वित्तीय वर्षात केलेल्या कर निर्धारण प्रकरणे संख्या व अनुषंगिक लेखे,वार्षिक विवरणे सादर न केलेल्या संस्थाना दिलेल्या नोटीसांची संख्या व त्यानुसार आकारलेली शास्ती याबाबतचे अभिलेखे, नियम 17 नुसार नोंदणी रद्द करण्यात आलेल्या संस्थांचा तपशील व अनुषंगिक लेखे,नियम 28 अंतर्गत सूट दिलेल्या प्रकाराने संख्या व अनुषंगिक लेखे,नियम 30 नुसार घेणेत आलेल्या प्रतीभूतीचा तपशील व नोंदवह्या, स्थानिक संस्था कर भरणा प्राधिकृत केलेल्या बँकांची यादी व त्यांची बँक स्टेटमेंट, जमा रक्कम मूळ चलने व संस्थांची भरणा लेजर,धनादेश नोंदवही व परत आलेल्या धनादेश नोंदवही व त्यावर केलेल्या कार्यवाहीचे अभिलेखे, स्थानिक संस्था कर भरणा प्राधिकृत केलेल्या बँकांत जमा रक्कम व चलनानुसार जमा रक्कमांचा ताळमेळ पत्रक ई. अभिलेख उपलब्ध करून देणेसाठी अर्धासमास पत्र क्र.107 दि.15.10.2016,पत्र क्र.25.10.2016 व पत्र क्र.139 दि.11.11.2016 नुसार लेखी मागणी करूनही उपलब्ध करून देणेत आली नाही. लेखापरीक्षणात लेखे उपलब्ध करून न दिल्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1)महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम कलम 4 नुसार लेखापरीक्षणात तपासणीसाठी अभिलेखे उपलब्ध करून देणेची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी असताना लेखी मागणी करूनही परिपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून देणेत आले नाहीत. त्यामुळे मनपा कडून अधिनियमाच्या तरतुदीचे उल्हंघन झाले आहे.

2) लेखापरीक्षण वित्तीय वर्षातील (2013-14 व 2014-15) संस्थाकडून घेण्यात आलेल्या सुरक्षा रक्कमांचा तपशील व अनुषंगिक लेखे,वार्षिक विवरणे सादर न केलेल्या संस्थांची वर्षावर संख्या व अनुषंगिक लेखे,बँक स्टेटमेंट,मूळ चलने तपासणीस उपलब्ध न केल्याने नियमानुसार सुरक्षा अनामत घेतल्याची व वार्षिक विवरण न भरलेल्या संस्थाकडून शास्ती वसूल करून मनपा निधीत जमा झाल्याची पडताळणी करता आली नाही.

3) लेखापरीक्षणात नियम 17 नुसार नोंदणी रद्द करण्यात आलेल्या संस्थांचा तपशील व अनुषंगिक लेखे, नियम 28 अंतर्गत सूट दिलेल्या प्रकरणे संख्या व अनुषंगिक लेखे, नियम 30 नुसार घेणेत आलेल्या प्रतीभूतीचा तपशील व नोंदवह्या हे अभिलेखे उपलब्ध न केल्याने याबाबत नियमानुसार कार्यवाही झाल्याचे व प्रतिभूती घेवून मनपा निधीत जमा झाल्याची पडताळणी करता आली नाही.

4) लेखापरीक्षणात स्थानिक संस्था कर भरणा प्राधिकृत केलेल्या बँकांची यादी व त्यांची बँक स्टेटमेंट,

जमा रक्कम मूळ चलने व संस्थांची भरणा लेजर, धनादेश नोंदवही व परत आलेल्या धनादेश नोंदवही व त्यावर केलेल्या कार्यवाहीचे अभिलेखे, स्थानिक संस्था कर भरणा प्राधिकृत केलेल्या बँकांत जमा रक्कम व चलनानुसार जमा रक्कमांचा ताळमेळ पत्रक ई. अभिलेख तपासणीस उपलब्ध न केल्याने मनपा ने प्राधिकृत केलेल्या बँकेतच कराचा भरणा झाल्याचे, चलनानुसार भरणा केलेली सर्व रक्कम बँकेत जमा झाल्याची, परत आलेल्या धनादेशाची रक्कम मनपा निधीत जमा झाल्याची तसेच कर भरणा प्राधिकृत केलेल्या बँकांत जमा सर्व कराची रक्कम महानगरपालिकेच्या खाती वर्ग झाल्याची पडताळणी करता आली नाही.

DATBEPM6101 (Ref No : 27, Hmm No : 172)

## *26 स्थानिक संस्था कराच्या वसुलीची प्रभावी प्रभावी अंमलबजावणी न केल्याने महानगरपालिकेस कराचा अपेक्षित महसूल प्राप्त न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
आक्षेपाधीन रक्कम रु. 512600000.00/-

***महापालिकेच्या मंजूर अर्थसंकल्पात अपेक्षित स्थानिक संस्था कर वसूलीसाठी प्रभावी अंमलबजावणी न केल्याने 2014-15 मध्ये 20% वाढ गृहीत धरून रु.147.48 कोटी स्थानिक संस्था कराचा महसूल प्राप्त होणे आवश्यक असताना फक्त रु.96.22 कोटी प्राप्त झाल्याने रु.51.26 कोटी कमी कराचा महसूल प्राप्त होणे, स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियमांच्या तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 52 प्रमाणे कार्यवाही न केल्याने महापालिकेस मोठ्या प्रमाणावर कराच्या महसुलास मुकावे लागणे.***

महानगरपालिकेने त्यांचे वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 च्या मंजूर अर्थसंकल्पात स्थानिक संस्था कराचे अनु.रु.132 कोटी व रु.216 कोटी उत्पन्न अपेक्षिले होते.प्रत्यक्षात 2013-14 मध्ये रु.122.90 कोटी व 2014-15 मध्ये रु.96.22 कोटी कराचा महसूल प्राप्त झाला आहे. महानगरपालिका क्षेत्रात 2014-15 अखेर 15027 नोंदणीकृत संस्था आहेत. महापालिकेच्या अर्थसंकल्पानुसार व 2013-14 च्या तुलनेत 2014-15 मध्ये स्थानिक संस्था कराची झालेली वसुली या बाबत अर्धसमास पत्र क्र.170 दि. 13/12/2016 निर्गमित करणेत आला होता. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त आहे. त्यामुळे याबाबत

खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1)महापालिकेच्या मंजूर अर्थसंकल्पात अपेक्षित स्थानिक संस्था कर वसूलीसाठी प्रभावी अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही. विशेषता 2013-14 मध्ये रु.122.90 कोटी कर वसूल झाला असताना 2014-15 मध्ये 20% वाढ गृहीत धरून रु.147.48 कोटी स्थानिक संस्था कराचा महसूल प्राप्त होणे अपेक्षित असताना फक्त रु.96.22 कोटी प्राप्त झाला आहे. त्यामुळे रु.51.26 कोटी कमी कराचा महसूल प्राप्त झाला आहे.

2) स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील तरतुदीनुसार प्रत्येक कर भरणा करणेस पात्र व्यापारी संस्थेची नोंदणी करणे,विहित मुदतीत कर न भरल्यास नोटीस देणे,व्याजाची आकारणी करणे, वार्षिक विवरणे सादर न करणाऱ्या संस्थावर शास्तीची आकारणी करून वसूल करणे,प्रतिभूती घेणे,कर निर्धारण करणे,प्रत्यक्ष जागेवर जावून तपासणी करून कार्यवाही करणे,प्राप्त विवरणे तपासून आवश्यक कागदपत्रे मागविणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 52 प्रमाणे कार्यवाही करणे या नियमानुसार करणेची कार्यवाही न केल्याने व अशा कार्यवाहीवर नियंत्रण न ठेवल्याने महापालिकेस मोठ्या प्रमाणावर कराच्या महसुलास मुकावे लागले आहे. एकंदर महापालिकेचा स्थानिक संस्था कराचा महसूल वाढविणेसाठी दिरंगाई केल्याचे तसेच उदासीनता दाखविल्याचे दिसून येते. त्यामुळे याबाबत त्वरेने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींची पुर्तता करून अनुपालन दर्शवावे,तोपर्यंत रक्कम रु.51,20,000,00 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 51,20,000,00.

DATBEPM6101 (Ref No : 28, Hmm No : 170)

## *27 शासनाची मंजुरी न घेता महानगरपालिका सदस्यांना वाढीव बैठक भत्ता प्रदान करणेच्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 418200.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 209100.00/-

***महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.संकीर्ण-2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दिनांक 24 जानेवारी 2005 नुसार महापालिका सदस्यांना रु.100/-प्रती बैठक भत्ता देणेचा असताना शासनाच्या मंजुरीशिवाय***

***रु.200/- प्रती बैठक भत्ता देणे, शासन मंजुरी प्राप्त झाली नसताना जादा दराने बैठक भत्ता दिल्याने रु.2,09,100 जादा प्रदान.***

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.संकीर्ण 2004/468/प्र.क्र.8 4/04/नवि-2 0 दिनांक 2 4 जानेवारी 200 5 अन्वये महानगरपालिका सदस्यांना रु.100/- प्रति बैठक भत्ता (कमाल मर्यादा रु.400/-दर महा) देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मधील महानगरपालिका सर्वसाधारण सभा,स्थायी समिती सभा,परिवहन उपक्रम सभा,वृक्ष प्राधिकरण सभा व प्रभाग समित्यांच्या सभांसाठी उपस्थित महानगरपालिका सदस्य व नामनिर्देशित सदस्यांच्या उपस्थितीनुसार देण्यात आलेल्या बैठक भत्ता देयकांची तपासणी करता रु.100 ऐवजी रु.200/- प्रति बैठक भत्ता (कमाल मर्यादा रु.1000/- दरमहा) प्रदान केल्याचे दिसून येते. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये रु.2,28,800 व वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रु.1,89,400 एकूण रु.4,18,200 बैठक भत्त्याचे प्रदान करण्यात आले आहे. याबाबत विभागाने लेखापरीक्षणात सादर केलेल्या अभिलेख्यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.181 दि.19.12.2016 निर्गमित करण्यात आले होते.याबाबत विभागाने त्यांचे पत्र क्र.208 दि.21.12.2016 नुसार दिलेले उत्तर तपासून खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दिनांक 24 जानेवारी 2005 अन्वये महानगरपालिका सदस्यांना रु.100/-प्रति बैठक भत्ता (कमाल मर्यादा रु.400/-दरमहा) देणेचा असताना त्यापेक्षा जादा रक्कमेचा प्रतिसभा बैठक भत्ता देणेसाठी शासनाची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक असताना पूर्व मंजुरीशिवाय जादा दराने बैठक भत्ता मंजूर करून प्रदान केला आहे.

2)स्थायी समिती ठराव क्र.36 दि.06.12.2012 नुसार शासन मंजुरीच्या अधीन राहून रु.200 प्रति बैठक भत्ता (कमाल मर्यादा रु.800/- दरमहा) देणेस मंजुरी देणेत आली आहे.तथापि शासनाची मंजुरी प्राप्त झाली नसल्याने 2013-14 मध्ये जादा दराने प्रदान बैठक भत्ता रक्कम रु.1,14,400 व 2014-15 मध्ये जादा दराने प्रदान बैठक भत्ता रक्कम रु.94,700 एकूण रु.2,09,100 ची वसुली होणे आवश्यक आहे.

विभागाने त्यांचे उत्तरात नगरसेवकांच्या मानधन व भत्यातून जादा दिलेल्या रक्कमेची वसुली करण्यात आल्याचे व त्यासाठी सर्व सदस्यांना सचिव कार्यालयाने अशा प्रकारे जादा दिलेला भत्ता कपात करून घेणेबाबत दिलेल्या पत्र क्र.134/2016 दि.05.10.2016 ची प्रत सोबत जोडली आहे. तथापि सदस्यांच्या मानधन व भत्यातून जादा दिलेला बैठक भत्ता कपात केलेबाबत मंजूर प्रमाणके जोडली नाहीत.त्यामुळे वसूली केल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.2,09,100.

DATBEPM6101 (Ref No : 29, Hmm No : 182)

## *28 स्थायी समितीच्या सभा प्रत्येक आठवड्यास न घेणेबाबत व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 73 (ड) नुसार केलेल्या संविदांची माहिती स्थायी समितीस न कळविणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिका सभा,स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज नियम 1997 चे नियम 3-अ नुसार स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती संविदा केल्यापासून 15 दिवसात स्थायी समितीस कळविल्याचे दिसून न येणे.***

महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 च्या लेखापरिक्षणात नगरसचिव विभागाच्या अभिलेख्यांची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.181 दि.19. 12.2016 निर्गमित करण्यात आले होते.याबाबत विभागाने त्यांचे पत्र क्र.208 दि.21.12.2016 नुसार दिलेले उत्तर तपासून खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.उमपा 3097/480/प्रक्र71/97/नवि-23.दि.17. 03.1997 अन्वये महानगरपालिकेचे महानगरपालिका सभा,स्थायी समिती,परिवहन समिती इत्यादीचे कामकाज नियम 1997 मंजूर करण्यात आले आहेत.सदर मंजूर नियम 3-अ नुसार स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा घेणे आवश्यक असताना वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मधील स्थायी समितीची काही इतिवृते, ठराव व विषय सूची यांचे अवलोकन करता स्थायी समितीच्या सभा प्रत्येक आठवड्यास न घेता प्रतीमहिना घेणेत आल्याचे दिसून आले. विभागाने त्यांचे उत्तरात सचिव कार्यालयाकडून प्रती आठवडा सभा घेणेस स्थायी समितीस कळविले जाते, तथापि सभा कोणत्या दिवशी घेणे हे नियमानुसार समितीचे अधिकार असल्याने समिती ठरवील त्या दिवशी सभा घेतली जाते असे नमूद केले आहे. तथापि नियमानुसार आठवड्यातून एकदा सभा घेणेची कार्यवाही करण्यात आली नाही.

2) स्थायी समितीच्या इतिवृत्त, ठराव व विषय सूचीचे अवलोकन करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती संविदा केल्यापासून 15 दिवसात स्थायी समितीस कळविल्याचे दिसून येत नाही. फक्त विद्युत विभागाकडून केलेल्या संविदांची माहिती स्थायी समितीस कळविल्याचे दिसून येते. विभागाने उत्तरात संविदा केलेल्या विभागाकडून सचिव कार्यालयास गोषवारे प्राप्त झाल्यावर स्थायी समितीकडे सादर केले जातात तसेच

संविदा करण्यात आलेले प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करणेची जबाबदारी हि त्या त्या विभाग प्रमुखाची आहे असे नमूद केले आहे. तथापि याबाबत स्थायी समितीच्या इतिवृत्तात साविंदा केल्याचे समितीस कळविल्याचे व समितीने त्याची नोंद घेतल्याचे दिसून येत नसल्याने अधिनियमाच्या तरतुदीचे पालन झाले नाही.

DATBEPM6101 (Ref No : 30, Hmm No : 181)

## *29 विधि विभागाचे लेखे तपासणीस उपलब्ध न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 11100000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11100000.00/-

***महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 4 नुसार लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करून देणेची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी असताना विधी विभागाने रु.1,11,00,000 खर्चाचे परिपूर्ण अभिलेखे लेखी मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत.***

विधी विभागाने वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये अनुक्रमे रु.49,99,000, रु.61,01,000 खर्च दावे,खटले व वकील फी साठी केल्याचे सन 2015-16 च्या अर्थसंकल्पातील मागील वर्षातील प्रत्यक्ष खर्चाच्या तपशिलावरून दिसून येते. याबाबत दावे खटले नोंदवही, वकील PANNEL नेमणूक ठराव व दर, बिल नोंदवह्या, उच्च न्यायालय व इतर न्यायालये दराबाबत मंजूर टिप्पण्या, वकील नेमणुकीचे आदेश,खर्च प्रमाणके,श्री.गायकवाड यांना प्रदान रु.11,25,000 बाबतचे लेखे ई.अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास पत्र क्र.167 दि.06/12/2016, अर्धसमास पत्र क्र.178 दि.15/12/ 2016 व अर्धसमास पत्र क्र.180 दि.19/12/2016 अन्वये लेखी मागणी करणेत आली होती. तथापि यातील कोणतेही लेखे तपासणीस उपलब्ध करून देणेत आले नाहीत.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 4 नुसार लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देणेची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी असताना आणि वारंवार तोंडी व विहित पद्धतीने लेखी मागणी करूनही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणेत आले नाहीत. लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न केल्याने सदरच्या खर्चाची तपासणी करता आली नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद रक्कम रु.1,11,000,00 चा खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 1,11,000,00

## *30 2014-15 मध्ये जंतूनाशक / किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक औषधे खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 9452800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9452800.00/-

***उद्योग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखस/1088(2512)उद्योग -6 दि.02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलब केलेले नसल्याने शासकीय व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तूचे दर ठरविण्यासंबधी या कार्य पद्धतीचा अवलंब झाला नाही.तसेच सदरील निविदा हि,प्रचलित दरानुसार बाजारभाव दर मागवून अंदाजित खर्च निश्चित करून त्याप्रमाणे निविदा प्रसिध्द करून निविदा मागविणे आवश्यक असतांना, तशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे खरेदी दरकरारपेक्षा किफायतशिर दराने झाल्याची खात्री करता आली नाही.***

प्रचलित बाजार भावानुसार अंदाजित खर्चाची निश्चिती करून त्याअनुषांगने निविदा मागविणे व त्यानुसार तुलनात्मक न्युनत्तम निविदाकार निश्चित करणेची प्रक्रीया राबविण्याचे व किफायतशीर दराने खरेदी झालेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत घनकचरा विभागाने जंतुनाशक/किटकनाशक /अळीनाशक / डासनाशक औषधे खरेदी केले आहे. 2014-15 मधील सदरील औषधे खरेदी करण्यासाठी मा. आयुक्त यांची दि. 29/03/2014 अन्वये मान्यता घेउन सदरील औषधे खरेदीची निविदा सुचना दै.जागरूक, दै. पुढारी व डेली फ्री प्रेस जरनल या वृतपत्रात दि. 10/05/2014 रोजी प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. प्रस्तुत खरेदीसाठी मे. मित्र हर्बल, मैं. डॉल्फीन, मे. रविराज व मे. रॉयल एन्टरप्रायजेस अशा चार निविदा प्राप्त झाल्या आसून ज्या ज्या ठिकाणी निविदा धारकांनी प्रत्येक औषधांच्या बांबीसाठी न्यून दर सादर केले आहेत. अशा निविदा धारकांना मागणीनुसार औषधे पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. 2014-15 या वर्षात एकुण रक्कम रु. 94,52,800/- एवढा खर्च औषधे खरेदी करण्यासाठी झाला आहे

1) प्रस्तूत जंतुनाशक/किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक औषधे खरेदीमध्ये ब्लीचींग पावडर, काळे फिनाईल, सॅनिटेक्स व्हाईट क्लीनर, जर्मीटॉक्स प्लस पावडर, प्रोडेन्टीसाईड झिंक रिप बेट, बायोक्लचर, बायोसोल 50% EC. वगेरे असे 27 प्रकारचे औषधे खरेदीसाठी शासनाने वेळोवेळी दर करारानुसार औषधे खरेदी करण्याचे निर्देश दिलेले आहेत, परंतु घनकचरा विभागाने जंतुनाशक/ किटकनाशक/ अळीनाशक/ डासनाशक औषधे खरेदीसाठी शासनाचे दर करारनुसार किवा प्रचलित दरानुसार बाजारभाव दर मागवून तसा अंदाजित

खर्च निश्चित करून त्याप्रमाणे निविदा मागविणे आवश्यक असताणा तशी कार्यवाही झालेली नाही.विभागाने सरळ सरळ जाहीर निविदा मागवून जंतुनाशक/ किटकनाशक/ अळीनाशक/ डासनाशक औषधे खरेदी केलेली आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियमातील नियम 74(2) नुसार किफायतीशिर असलेली निविदा स्विकारणे आवश्यक आहे. परंतू दरकरापेक्षा खरेदी किफायतीशीर झाली असल्याबाबत खात्री न करता जाहिर निविदा प्रसिध्द करून खरेदी करण्यात आली आहे.

उदयोग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. भाखस/1088/(2512) उदयोग-6 दि.02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलंब केलेले दिसून आले नाही.

2) आरोग्य विभागांतर्गत घनकचरा विभागाने जंतुनाशक/ किटकनाशक/ अळीनाशक/ डासनाशक औषधे खरेदी जरी स्पर्धात्मक निविदा स्विकारण्यापूर्वी सदर औषधाचे प्रचलित दर अधिकृत विक्रेत्याकडून मागवून घेउन कमीत कमी दर असलेल्या बाबी (कोटेशनप्रमाणे) निश्चित करून त्याप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करणे व सिलबंद निविदा मागविणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे औषधे खरेदी किफायतशीर दराने केल्याची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे खरेदीवर झालेला खर्च रक्कम रू 94,52,800/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबत अर्धसमास क्र. 28 दि. 08/07/2016 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता विभागाचे दि 25/07/2016 च्या प्राप्त खुलाश्यामध्ये दरकरारबाबत शासनाचे दर उपलब्ध नाहीत असा उल्लेख केलेला आहे तसेच इतर नगरपालिका व महानगरपालिका यांचे दर विचारात घेऊन खरेदी केली जाते असे नमूद केले आहे हे सदरील आक्षेपाशी सुसंगत नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही. अक्षेपाधीन खर्च रक्कम रू 94,52,800/-

DATRYJM7501 (Ref No : 32, Hmm No : 28)

## *31 2014-15 मध्ये सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4765378.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4765378.00/-

***उद्योग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखस/1088(2512)उद्योग -6 दि:02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलब केलेले नसल्याने शासकीय व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तूचे दर ठरविण्यासंबधी या कार्य पद्धतीचा अवलंब झाला नाही.तसेच सदरील निविदा हि; प्रचलित दरानुसार बाजारभाव दर मागवून अंदाजित खर्च निश्चित करून त्याप्रमाणे निविदा प्रसिध्द करून निविदा मागविणे आवश्यक असतांना, तशी***

***कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे खरेदी दरकरारपेक्षा किफायतशिर दराने झाल्याची खात्री करता आली नाही.***

प्रचलित बाजार भावानुसार अंदाजित खर्चाची निश्चिती करून त्याअनुषांगने निविदा मागविणे व त्यानुसार तुलनात्मक न्युनत्तम निविदाकार निश्चित करणेची प्रक्रीया राबविण्याचे व किफायतशीर दराने खरेदी झालेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत घनकचरा विभागाने सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदी केले आहे. 2014-15 मधील सदरील साहीत्य खरेदीसाठी मा. आयुक्त यांची दि. 25/06/2014 अन्वये मान्यता घेउन सदरील साहीत्य खरेदीची निविदा सुचना दै.खबरें व दै. पुढारी या वृतपत्रात दि. 02/07/2014 रोजी प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. प्रस्तुत खरेदीसाठी मे. अमरज्योत, मैं. डॉल्फीन, मे. मोहित व मे. मोहीणी एन्टरप्रायजेस अशा चार निविदा प्राप्त झाल्या आसून ज्या ज्या ठिकाणी निविदा धारकांनी प्रत्येक साहीत्याच्या बांबीसाठी न्यून दर सादर केले आहेत. अशा निविदा धारकांना साहीत्याचा पुरवठा करण्याचे मागणीनुसार पुरवठा धारकांना सफाई सहीत्य पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. 2014-15 या वर्षात एकुण रक्कम रु. 47,65,378/- एवढा खर्च सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदी करण्यासाठी झाला असून, झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) प्रस्तूत सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदीमध्ये गॅलवनाईजड बादल्या, गोवा ब्रुम, बाम्बू, खरी हात मोजे, हातरुमाल, साबन, फावडे घमेला, ॲपरॅन, दातारी, लोखंडी हातगाडया, फेस मास्क (कापडी), फावडे दांडे, वगेरे असे 20 प्रकारे सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साधने खरेदीसाठी शासनाने वेळोवेळी दर करारानुसार साहीत्य खरेदी करण्याचे निर्देश दिलेले आहेत, परंतु घनकचरा विभागाने सफाई साहीत्य व सरंक्षणार्थ साधने खरेदीसाठी शासनाचे कृषी विभाग व आरोग्य विभाग यांच्या दरकरानुसार खरेदी न करता जाहीर निविदा मागवून सफाई साहीत्य व संरक्षणार्थ साहीत्य खरेदी केलेली आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियमातील नियम 74(2) नुसार किफायतीशिर असलेली निविदा स्विकारणे आवश्यक आहे. परंतू दरकारापेक्षा खरेदी किफायतीशीर झाली असल्याबाबत खात्री न करता जाहिर निविदा प्रसिध्द करून खरेदी करण्यात आली आहे.

2) उद्योग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखस/1088(2512)उद्योग -6 दि.02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलब केलेले नसल्याने आरोग्य विभागांतर्गत घनकचरा विभागाने स्वच्छता साहित्य व संरक्षणार्थ साधने खरेदीच्या निविदा मागविण्यापूर्वी सदर साहीत्याचे प्रचलित दर अधिकृत विक्रेत्याकडून मागवून घेउन कमीत कमी दर असलेल्या बाबी (कोटेशनप्रमाणे) निश्चित करून त्याप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करणे व सिलबंद निविदा मागविणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे साहित्य खरेदी किफायतशीर दराने केल्याची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे खरेदीवर झालेला खर्च रू. 46,73,478/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबत अर्धसमास क्र. 29 दि. 25/07/2014 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता, विभागाने दि. 25/07/2016 च्या प्राप्त खुलाश्यामध्ये दरकरार बाबत सदरील साहीत्य हे शासनाचे दर उपलब्ध नाहीत, त्याची जाहीर ईनिविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करून प्रक्रिया पूर्ण करण्यात येत असते असे नमूद केले आहे. तसेच इतर नगरपालिका व महानगरपालिका यांचे दर विचारात घेऊन खरेदी केली जाते असे नमूद केले आहे. हे आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत

नाही आक्षेपाधिन खर्च रक्कम रू. 47,65,378/-

DATRYJM7501 (Ref No : 33, Hmm No : 29)

## *32 2014-15 मध्ये नागरी सुविधा केंद्र विभागाने 1) रायटिंग डेसक व खुर्ची 2) मॉडम, इंटरनेट केबल (फायबर) खरेदी मध्ये अनियमितता झालेलाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 399393.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 399393.00/-

***उद्योग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखस/1088(2512)उद्योग-6 दि.02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलब केलेले नसल्याने शासकीय व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तूचे दर ठरविण्यासंबधी या कार्य पद्धतीचा अवलंब झाला नाही.तसेच सदरील निविदा हि, प्रचलित दरानुसार बाजारभाव दर मागवून अंदाजित खर्च निश्चित करून त्याप्रमाणे निविदा प्रसिध्द करून निविदा मागविणे आवश्यक असतांना, तशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे खरेदी दरकरारपेक्षा किफायतशिर दराने झाल्याची खात्री करता आली नाही. प्रचलित निविदा प्रक्रीया न कर संगणक साहीत्य दरपत्रके मागवून खरेदी केल्याने अनियमितता झाली आहे***

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत नागरी सुविधा केंद्र यांनी 2014-15 या आर्थिक वर्षात मे. ओम मनिष यांचेकडून न्यूनतम दराने 1) रायटिंग डेस्क व खुर्ची 2) मॉडम, इंटरनेट केबल (फायबर) अशी वेगवेगळी दोनदा एकाच दिवशी दरपत्रके मागवून खरेदी केली आहे, निवड महिन्यातील खरेदी प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता खालील प्रमाणे त्रुटी आढळल्या त्या खालील प्रमाणे आहे.

मा. अतिरिक्त आयुक्त यांची दिनांक 16/08/2014 अन्वये मान्यता घेवून सदरील साहीत्य खरेदीसाठी रक्कम रू. 1,99,800/- व रक्कम रू. 1,99,563/- यांची वेगवेगळी दरपत्र सूचना पत्र काढून दि. 18/08/2014 रोजी एकाच दिवशी प्रोग्रामर नागरी सुविधा केंद्र यांनी दरपत्र सुचना प्रसिध्द केलेली आहे. त्याप्रमाणे प्रस्तूत दोन्ही साहित्य खरेदीसाठी मे. चिंतामणीस, मे. ओम मनिष इंटरप्रायजेस व मे. जयशकुमार ट्रेडर्स अशा तीन दरपत्रधारकांकडून दरपत्रके प्राप्त झाली आहे. त्यापैकी न्यूतन दरपत्रधारक मे. ओम मनिष इंटरप्रायजेस यांचेकडून 1) रायटिंग डेस्क खुर्ची 2) मॉडम इंटरनेट केबल (फायबर) इत्यादी साहीत्य खरेदी केले आहे. त्यांचा एकत्रित खर्च रू. 3,99,393/- झाला आहे सदरील साहीत्य खरेदीत झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात प्रमाणक क्र. 3667 दिनांक 08/01/2015 चे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) प्रस्तूत साहीत्य रायटींग डेस्क, खूर्ची व मॉडम इंटरनेट केबल (फायबर) हे साहीत्य एकाच न्यूनतम दरपत्र धारक एजन्सीकडून खरेदी केले आहे. त्यानुसार वेगवगळे दरपत्रक मागवून खर्च केले आहे. सदरील साहीत्य खरेदीसाठी एकूण खर्च हा रु. 3,99,363/- एवढा झाला आहे. तरी विभागाने प्रचलित निविदा न मागवता वेगवेगळी दरपत्रके मागवून खर्च

केला आहे

महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियमातील नियम 74(2) नुसार किफायतीशिर असलेली निविदा मागवून स्विकारने आवश्यक होते. त्याप्रमाणे नागरी सुविधा केंद्र यांनी प्रचलित निविदा प्रक्रीया केलेली नाही.

उदयोग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. भाखस/1088/(2512) उदयोग-6 दि.02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलंब केलेले दिसून आले नसल्याने शासकीय व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तूचे दर ठरविण्यासंबधी या कार्य पद्धतीचा अवलंब झाला नाही.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 5 संविदा मधील नियम 2(2) नुसार दोन लाख रुपयांपेक्षा कमी रक्कमेच्या कोणत्याही निविदेची सुचना महानरगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविण्यात येऊन खरेदी करण्यात यावे असे निर्देशित केले आहे. तसे विभागाने सदरील साहित्य खरेदीबाबतची निविदा प्रसिध्दीचे लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही तसेच मे. ओम मनिष एंटरप्रायजेस यांचे देयक प्रोगामर यांनी विभागाच्या साठा नोंद वहीत नोंद घेतली असे नमुद केले परंतू तसे विभागाच्या नोंदवहीत नोंद घेतल्याचे पृष्ठ क्रमांक नमूद केलेले नाही. देयका सोबत साहीत्य पुरवठा बाबतचे चलन जोडलेले नाही.

3) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - 1949 मधील प्रकरण क्र. 73(ड) नुसार मा. आयुक्तांनी तसेच तत्सम अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराच्या मर्यादेत मंजुरी दिलेल्या कामासंदर्भात मा. स्थायी समितीस कामा मंजुरी दिल्यापासुन 15 दिवसाचा आत स्थायी समितीस कळविले पाहिजे त्यानुसार कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास पाहवयास मिळालेले नाही.

उल्हासनगर महानगरपालिका नागरी सुविधा केंद्र यांनी सदरील साहीत्य खरेदी करणेसाठी वित्तीय नियमांचे अवलंब केलेले दिसून आलेले नाही. त्यामुळे सदरील साहीत्य खरेदीसाठी किफायतशीर दराने खरेदी केल्याची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही त्यामुळे खरेदीवर झालेला खर्च एकुण रक्कम रू. 3,99,363/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबतचा अर्धसमास क्र. 36 दि. 15/07/2016 अन्वये खुलासा मागविण्यात आला असता विभागाने दि. 25/07/2016 च्या खुलाश्यामध्ये रू. 2 लाख पर्यंत तातडीचे काम असल्याने खुल्या बाजारतून दरपत्रके मागवून खरेदी केले आहे असा उल्लेख केलेला आहे. तसेच दोन लाख रूपयांपेक्षा कमी रक्कमेच्या निविदा सुचना मनपाचा अधिकृत संकेत स्थळावर दर्शविण्यात येत असतात असे नमूद केले आहे परंतू तसे लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही व साहीत्य खरेदीची साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत 2014-15 च्या पृष्ठ क्र. 37 व 38 चा उपलब्ध आहे. असे नमूद केले आहे परंतू तसे लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. हे आक्षेपाशी सुसंगत नसल्याने आक्षेप मान्य करता येत नाही आक्षपाधीन खर्च रक्कम रू. 3,99,363/-.

DATRYJM7501 (Ref No : 34, Hmm No : 36)

## *33 निर्मल एम.एम.आर.डी. योजना अंतर्गत केलेल्या कामाबाबत खर्चाचे अभिलेखे व त्या अनुषंगाने ठेवलेल्या नस्त्या लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 7360121.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7317561.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 42560.00/-

***2014-15 या वित्तीय वर्षात मुंबई महाप्रदेश विकास प्राधिकरण मुंबई यांच्या अनुदानातून खर्च केलेल्या प्रमाणकांची तपासणी केली असता रू 73,17,561/- रक्कमेची अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध केली नसल्याने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 मधील कलम 6 नुसार लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देणेची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे.त्यामुळे सदरील अधिनियम तरतुदीचे उल्लघन झाले आहे.***

अर्धसमास क्र. 15 दि. 03/05/2016, अर्धसमास क्र.103, दि. 14/10/2016 व अर्धसमास क्र. 177 दि.14/12/2016 पत्रान्वये लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करणेबाबत विनंती करण्यात आली होती. तथापी लेखापरीक्षण संपेपर्यत विभागाचे कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणांस सदरील खर्चाची खात्री न झाल्याने पुढील प्रमाणे आक्षेप देण्यात येत आहे.

मुंबई महाप्रदेश विकास प्राधिकरण बांद्रा मुंबई यांचे 100% अनुदानातुन निर्मल अभियान कार्यक्रमातंर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रा मध्ये विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालयांची निर्मिती विविध संस्था/ कंत्राटदार यांचेकडून निविदा मागवून करूण घेतली आहे. तशी 2014-15 या वर्षामधील लेखा विभागाचे लेखा प्रमाणक परीक्षण केले असता, मुंबई महाप्रदेशविकास प्राधीकरण बांद्रा मुंबई यांचे 100% अनुदानातुन उल्हासनगर महानगरलिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय निर्मितीची कामे 2014-15 मध्ये 15 प्रमाणकांची रक्कम रू 73,17,561/- खर्च झालेली आहे. खालील कंत्राटदारामार्फत करून घेतली आहे.

1) मे. जागृत महिला मंडळ, 2) मे. सप्रेम 3) अकांशा सामाजिक प्रतिष्ठान 4) मे. जय दुर्गा माँ महिला गाहक सहकारी संस्था लिमिटेड, 5) मे. साईनाथ सेवा समिती 6) मे. श्रमिक सुशिक्षित बेरोजगार सेवा संघ 7) मे. सोसायटी फॉर प्रमोशन ऑफरिया रीसर्च सेंटर

सदरील ठेकेदाराचे 2014-15 मधील प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता सदरील ठेकेदारामार्फत बांधकाम विभागाने कामे करून घेतली आहे. संबंधित योजनेवर 2014-15 मधील रक्कम रू. 73,17,561/- खर्च केल्याचे प्रमाणक लेखे दिसून येत आहे सदर खर्चाचे लेखापरीक्षण करणेसाठी याबाबतचे खर्चाची प्रमाणका व्यतिरिक्त खालील अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून देण्यात आलेले नाही ते खालीलप्रमाणे आहे.

अ) निर्मल एम.एम.आर.डी. योजना

1) योजनेचा मंजूर ठराव व इतर दस्ताऐवज

2) प्रशासकीय मंजुरी व अंदाज पत्रक

3) तांत्रिक मंजुरी व त्यासंबंधातील दरसुची व दर पृथकरणे

4) एम.एम.आर.डी. यांची मंजुरी व त्या अनुषंगाचे योजनेचे दस्ताऐवज

5) निविदा नस्ती, निविदा अटी व शर्ती, प्राप्त निविदा, निविदा मंजुरी प्रस्ताव, निविदा मंजुरी ठराव, त्या अनुषंगाचे दस्ताऐवज

6) कार्यदेश व करारनामे त्या अनुषंगाचे दस्ताऐवज

7) सुधारीत प्रशासकीय मंजुरी व सुधारी अंदाजपत्रक, सुधारीत तांत्रिक मंजुरी व त्या संबंधित जिल्हा दरसुची पत्रक व दरपृथकरणे त्या अनुषंगानचे दस्ताऐवज

8) सुधारीत निविदा नस्ती फी, निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा निविदा मंजुरी प्रस्ताव निविदा मंजुरी ठराव त्या अनुषंगाचे दस्ताऐवज

9) सुधारीत कार्यदेश व सुधारीत करारनामा, सुधारीत ठरावची प्रत,

10) एम.एम.आर.डी.कडून प्राप्त अनुदाने कर्जे यांचा तपशिल त्यानुसार पाठविलेली उपयोगिता प्रमाणपत्र योजनेची रोखवही

11) वेळोवेळी एम.एम.आर.डी. यांना सदरील कामाच्या प्रगतीचा अहवाल पाठविलेबाबत पत्रके.त्यांचा दस्ताऐवज सदरील संस्थाना कोणत्या नियमानुसार कामे दिले ते प्रमाणक नस्ती सोबत लेखा परीक्षणास कोणतेही अभिलेखे व त्या अनुषंगाने त्याचे दस्ताऐवज पडताळणीसाठी दाखविण्यात आलेली नाही त्यामुळे लेखा परीक्षणास सदरील खर्चाची सत्यता पडताळणी करण्यात आलेली नाही.

2014-15 मधील प्रमाणक क्र. 3939 दि. 27/01/2015 स्थुल रक्कम 21,28,035/- मे. सोसायटी फॉर प्रमोशन ऑफ एरीया रिसर्च सेंटर यांचे देयकातून आयकर नियमानुसार कंत्राटदाराकडून 2% कपात केलेला नाही. त्यामुळे सदरील देयकातील वसुलपात्र रक्कम रू. 42,560/- मात्र एवढी आहे. सदर बाबत संबंधित विभागास अर्धसमास क्र. 103 दि. 14/12/2016 अन्वये विचारणा करण्यात आली होती विभागाचे लेखा परीक्षण संपेपर्यत उत्तर अप्राप्त आहे.

DATRYJM7501 (Ref No : 37, Hmm No : 177)

## *34 प्रभाग समिती 1,2 व 3 मध्ये पावसाळयापूर्वी,पावसाळयानंतर पडलेले खड्डे डांबराने भरणे व पॅचवर्क करणे कामातीळ अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 17784720.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 16692952.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1091768.00/-

***प्रभाग समिती 1,2 व 3 मध्ये पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर पडलेले खड्डे डांबराने भरणे व पॅचवर्क करणे या कामाची निविदा 5.2.2 सेक्शन खाली अत्यावश्यक कामे करणे या शिर्षाखाली स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करुन मागविण्यात आली असून या कामाचा ठेका मे. झा. पी. अॅण्ड कंपनी यांना अंदाजपत्रक्रिय दराच्या 3% कमी दराने देण्यात आला असून लेखा परीक्षण मुदतीत सदरचे काम अपूर्ण आहे. प्रस्तुत कामाचे तांत्रीक अधिकारी यांनी तांत्रीक मंजूरी दिलेले प्राकलन तपासले असता यामध्ये मातीमध्ये खोदाई करणे खडीकरणे करणे, पूर्वीच्या बी.एम (बीटूमिनीचस मॅकडम रस्त्यावर) रस्त्यावर टॅककोट करणे, हॉड मिक्स हॉडलेड डांबर पसरणे, अस्फाल्ट कॉक्रीट टाकणे इत्यादी बाबी प्रस्तीवित केल्या असून याबाबत मोजमाप नोंदीनुसार नोंदविणेत आलेली मोजमापे यांचे निरीक्षण करणेत आले बाब क्र. 1 नुसारकेलेले नाहीत. प्रत्यक्ष खडीकरणाचे काम योग्य असलेबाबत व खडीकरणाच्या कामात योब्य दर्जा वापरणेत आल्याचे दिसून येत नाही महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग – निर्णय क्र. गोखनी 10/1009/प्र.क्र.309/2 व/ दि: 11/02/2010 नुसार कंत्राटदाराने बांधकामासाठी वापरलेलेल्या साहित्यासाठी प्रति ब्रास रु 200/- प्रमाणे (प्रती घ.मी रू 70.67) गौणखनिजाची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करून शासन खाती भरणा भरणे आवश्यक आहे. परंतू सदर देयकामध्य गौणखनिजाची रक्क म शासनाकडे भरणा केले असल्याचे चलन तपासणीत उपलब्ध झाले***

***नाही. महाराष्ट शासन यांचेकडील नोटीफिकेशन क्र. व्हॅट – 1506/सी.आर-134/टॅकसेशन दि. 30.11.2006 अन्वये बांधकामावरील ठेक्यावर कंत्राटदारा कडून 5 टक्के व्हॅट त्याच्या देयकातून वसूल करून शासन खाती भरणा केलेला नाही***

| | |
|---|---|
| प्रशासकिय मंजूरी | : पज. क्र. 28 दि. 11.08.2014 (नियम 5.2.2) खाली |
| तांत्रिक मंजूरी | : कार्यकारी अभियंता |
| प्राकलन रक्कम | : 2,35,46,100/- |
| स्थायी समिती मंजूरी | : (5.2.2) ठराव क्र. 28 दि. 11.08.2014 |
| ठेकेदाराचे नांव | : मे. झा.पी. ॲण्ड कंपनी<br>3% कमी दराने |
| कार्यादेश | : पी.डब्य.डी. पत्र.क्र. 1168 दि. 19/08/2014 |
| कामाची मुदत | : 6 महिने |
| कामाची स्थती | : काम अपूर्ण |
| मोजमाप नोंदवही क्र. | : क्र. 8009 पान क्र. 1 ते 67 |
| एकुण झालेले खर्च | : रू. 1,66,92,652/- पहिले देयक |
| प्रमाणक क्र. | : 4430 दि. 02/03/2015 |

प्रभाग समिती 1,2 व 3 मध्ये पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर पडलेले खड्डे डांबराने भरणे व पॅचवर्क करणे या कामाची निविदा 5.2.2 सेक्शन खाली अत्यावश्यक कामे करणे या शिर्षाखाली स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करून मागविण्यात आली असून या कामाचा ठेका मे. झा. पी. ॲण्ड कंपनी यांना अंदाजपत्रक्रिया दराच्या 3% कमी दराने देण्यात आला असून लेखा परीक्षण मुदतीत सदरचे काम अपूर्ण आहे. या कामावरती एकुण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात आहेत.

1.प्रस्तुत कामाचे तांत्रीक अधिकारी यांनी तांत्रीक मंजूरी दिलेले प्राकलन तपासले असता यामध्ये मातीमध्ये खोदाई करणे खडीकरणे करणे, पूर्वीच्या बी.एम (बीटूमिनीचस मॅकडम रस्त्यावर) रस्त्यावर टॅककोट करणे, हॉड मिक्स हॉडलेड डांबर पसरणे, अस्फाल्ट कॉक्रीट टाकणे इत्यादी बाबी प्रस्तीवित केल्या असून याबाबत मोजमाप नोंदीनुसार नोंदविणेत आलेली मोजमापे यांचे निरीक्षण करणेत आले बाब क्र. 1 नुसार जमीनीमध्ये एकूण 712.87 घनमीटर खोदाई करणेत आली असून बाब क्र. 3 प्रमाणे खोदाई मधून प्राप्त झालेले साहित्य एकुण 797.35 घनमीटर वहातूकीसाठी ठेकेदाराला प्रति घनमीटर 147.92 समाणे रक्कम रू. 1,17,944/- एवढे प्रदान झालेले आहे. मोजमाप नोंदीनुसार खोदाईमधून 712.87 घ.मी एवढे साहित्य प्राप्त झाले असताना ( 797.35-712.87) = 84.48 एवढया जादा वहातुकीचे ठेकेदारास खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले असून असे जादा प्रदान वसूल करणेत यावे जादा वहातूक साहित्य 84.48 घ.मी x 147.92 = रू. 12,496/-

वसूलपत्र रक्कम रू. 12,496/-

2.बाब क्र. 2 नुसार प्रस्तुत रस्ता खडीकरणासाठी 80 मी.मी. ण्यासाची एकुण 1117.05 घनमीटर खडी पुरवठा

करून पसरविणेत आलेली आहे व सदर बाबीसाठी प्रति घनमीटर रू. 537.72 प्रमाणे ठेकेदारास रक्कम रू. 6,00,660/- एवढे प्रदान केलेले आहे. याबाबत सदर बाबीचे दराबाबत दरपृथ्थकरण (Rate Analises) तपासणी केली असता सन 2012.2013 च्या जिल्हा दरसूचीनुसार 80 मी.मी. खडीचा 5 टक्के महानगरपालिका + वहातूकदर एकत्र करून खडीचा दर रू. 524.37 + वडी दबाईदर रू. 12.70 असे एकुण एकदंर दर रू. 537.72 ठेकेदारास प्रदान केलेला आहे परंतु सदरच्या दरामध्ये खडीकरणासाठी प्राकलनानुसार तांत्रिकदृष्टया आवश्यक असलेला मुरूम व खडी पसरणेचा दर अंतर्भूत असल्याने खडीकरणा मध्ये वापरून खडी पसरविलेबाबत तांत्रिक बाब वापरणे आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष खडीकरणाचे काम योग्य असलेबाबत व खडीकरणाच्या कामात योग्य दर्जा वापरणेत आल्याचे दिसून येत नाही त्यामुळे खडीकरणाच्या कामासाठी एकुण झालेला खर्च रक्कम रे. 6,00,660/- तपासणीत मान्य करता येत नाही.

1).महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग – निर्णय क्र. गोखनी 10/1009/प्र.क्र.309/2व/ दि. 11/02/2010 नुसार कंत्राटदाराने बांधकामासाठी वापरलेलेल्या साहित्यासाठी प्रति ब्रास रू. 200/- प्रमाणे (प्रती घ.मी रू. 70.67) गौणखनिजाची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करून शासन खाती भरणा भरणे आवश्यक आहे. परंतू सदर देयकामध्य गौणखनिजाची रक्काम शासनाकडे भरणा केले असल्याचे चलन तपासणीत उपलब्ध झाले नाही अशी गौण खनिजाची रक्कम भरणा केल्याचे दाखवावे अन्यथा अशी रक्कम खालीलप्रमाणे वसूल करून अनुपालन दखवावे.

एकूण 40. मी.मी. वापरलेली खडी 1117.05 x 70.67 प्रती घ.मी. गौणखनिजदर = रू. 78,492/- वसूलपात्र रक्कम

2).महाराष्ट शासन यांचेकडील नोटीफिकेशन क्र. व्हॅट – 1506/सी.आर-134/टॅकसेशन दि. 30.11.2006 अन्वये बांधकामावरील ठेक्यावर कंत्राटदारा कडून 5 टक्के व्हॅट त्याच्या देयकातून वसूल करून शासन खाती भरणा करावयाचा आहे. परंतु कंत्राटदाराला प्रदान केलेल्या देयकाची पडताळणी केली असता. सदर देयकातील खर्चाची रक्कम रू. 1,66,92,652/- यावरती 2 टक्के व्हॅट रक्कम रू. 3,33,853/- वसूल केलेली आहे. देयकातील उर्वरित 3 टक्के व्हॅटची रक्कम रू. 5,00,780/- कंत्राटदाराकडून केल्याचे दिसून आले नाही अशी रक्कम त्वरीत वूसल करून तसे अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

वसूलपात्र रक्कम रू. 5,00,780/-

3).प्रस्तुत कामासाठी वापलेली 80 मी.मी. व्यासाची खडी, हॉट मिक्स हॉट लेड बिटूमन मॅकडम, हॉट मिक्स हॉट लेड अस्फास्ट कॉंक्रीट टूमन मॅकडम यांचे टेस्ट रिपोर्ट (चाचणी अहवाल) कार्यकारी अभियंता गुण नियंत्रण व दक्षता विभाग यांचेकडून घेणेत येऊन नस्तीसोबत जोडलेले नाहीत तसेच प्रत्यक्षात रायनरीकडून प्राप्त झालेले डांबर कोणत्या रायनरीमधून वहातूक करणेत आलेली डंपर (ट्रक) एकूण वापरलेले मेट्रीक टनामधील साहित्य इत्यादींची चलने कामाच्या नस्तीसोबत सादर केलेली नाहीत त्यामुळे प्राप्त झालेले साहित्य व त्यांचा दर्जा याबाबत अचूक माहिती लेखा परीक्षणास करता आली नाही याबाबत अनुपालन सादर करावे तोपर्यंत या कामावरील खर्चाची एकूण रक्कम रू. 1,66,92,952/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन खर्च रक्कम रू. 1,66,92,952/-

प्रस्तूत कामाची मुळ निविदा नस्ती तपासणीत तोंडी सूचना देऊनही सादर केलेली नाही अथवा कंत्राटदारास

पुरविणेत आलेले शेडयूल बी नस्तीसोबत जोडलेले नाही. या कामामध्ये ठेकेदारास प्रत्येक बाबीसाठी अदा केलेले दर यांचे दरपृथ्थकरण (रेट ॲनंलीसेस) सादर केलेला नाहीत त्यामुळे ठेकेदारास अदा केलेल्या दराची निश्चिती निविदा दर यांचा मेळ लेखा परीक्षणास घेता आला नाही त्यामुळे एकूण देयकामध्ये अदा केलेले दर यांची खात्री करता आली नाही.

प्रस्तुत कामाचा ठेकेदारासोबत केलेला करारनामा नस्ती सोबत जोडणेत आलेला नाही त्यामुळे महाराष्ट्र शासन मुद्रांक शुल्क अधिनियम 1956 च्या कलम 63 नुसार ठेकेदाराकडून निविदा रक्कमेच्या प्रथम 10 लाखा पर्यत रू. 100/- व त्यापुढील प्रत्येक पुढील लाखा वर रू. 100 या प्रमाणे तसेच रक्कम रू. 5 लाखाच्या मर्यादित मुदारंक शुल्क वसुल करून शासन खाती भरणा करावयाचे आहे सदर नस्ती मध्ये ठेकेदाराशी करारनामा केल्याचे निदर्शनास आलेले नाही. सबब याकामाची निविदा रक्कम 2,35,46,100/- असल्याने रक्कम रू. 5 लाखाच्या मर्यादेत मुद्रांक शुल्काची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे परंतु अशी रक्कम करारनामा न केल्यामुळे शासनाची नुकसान झालेले आहे अशी रक्कम वसुल करून अनुपालन करावे असे अर्ध समास क्र.129 दिनांक24/10/2016 नुसार विभागाला कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.त्यामुळे एकून आक्षेपाधीन रक्कम रु.16692952/-

एकुण वसुलपात्र रक्कम (1+3+4+7)

=12496+78492+500780+500000=10,91,768

एकुण आक्षेपाची रक्कम = 1,66,92,952/-

DATAPJF8101 (Ref No : 108, Hmm No : 129)

### *35 उल्हासनगर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता इमारती, भाजी मार्केट गाळे, शौचालय एसटीडी/पीसीओ, गटई कामगार, व्यवसाय बुथ, मैदाने, मोकळी जागा वगैरे यांची थकबाकी 2013-14 अखेर थकित व 2014-2015 मधील चालू थकबाकीची रक्कम वसुल केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 73896356.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 73896356.00/-

| ***उल्हासनगर महानगरपालिका मालकीची मालमत्ता यांचे भाडे वाढ प्रत्येक वर्षी 10% भाडे वाढ करून भाडे*** |
|---|

***निश्चिती केलेली नाही तसेच नियमानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 8 अ 81(ब) प्रमाणे (1) नुसार मालमत्तेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधीचे थकीत असल्याने थकबाकी वसुल केलेली नाही. तसेच भाडे मुल्यावर सेवाकर आकारणी केली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता विभागने 2013-14 व 2014-15 मधील मनपा मालकीचे सर्व मालमत्ताचे लेखा परीक्षण केले असता, मालमत्ता विभागाने महाराष्ट्र नगरपरिषेद लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 110 नुसार मनपा मालकींचे मालमत्ता भाडयाचे मागणी पुस्तक नमुना क्र. 81 प्रमाणे ठेवलेले नाही त्यामुळे मनपा मालकीचे इमारती, भाजी मार्केट गाळे, शौचालय, एसटीडी/पीसीओ गटई कामगार व्यवसाय मैदाने मोकळी जागा वगैरे या मालमतेचे भाडे 2014-15 अखेर किती येणे बाकी आहे व शिल्लक किती आहे याची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेने मालमत्ता विभागाकडील मालमत्ता भाडे थकबाकी वसुलीसाठी विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 8 अ कलम 81(ब) प्रमाणे (1) नुसार मालमतेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधीपर्यत थकीत असल्यास अशा सर्व थकबाकीदारांना भाडे जमा करणेबाबत नोटीस देणे आवश्यक होते तशा प्रकारच्या नोटीसा दिलेबाबत लेखा परीक्षणास पहावयास मिळालेले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 79 (ड) अन्वये जागेचे भाडे चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद केली आहे. त्यानुसार नियमाप्रमाणे भाडे आकारणी करणेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचे मार्फत निश्चित केलेल्या मनपाच्या मालकीची वेगवेगळया जागा/इमारती यांची भाडे निश्चित केली आहे. त्यानुसार मालमत्ता विभागाने जागा/इमारती यांची भाडेवसुली केलेली दिसुन येत नाही.

नियमानुसार प्रत्येक वर्षी मनपा मलाकीच्या मालमतेचे 10 टक्के भाडे वाढ केलेली नाही, त्यामुळे चालू बाजार किमती नुसार जागेचे मुल्यांकन करून तसा वेळोवेळी करारनामाही केलेला नाही. त्यामुळे लेखा परीक्षणास मनपा मालकीच्या मालमत्तेची भाडे वाढ झालेबाबतची खात्री झालेली नाही.

उल्हासनगर मनपाचे उदाहरणदाखल खालील मालमत्तेचे थकीत भाडे मालमत्ता विभागाने मालमत्ता भाडेने दिल्या दिनांका पासून त्या त्या वर्षी बाजार भावानुसार भाडे निश्चित न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येत आहे.

| · अ.क्र | जागा व भाडे करूचे नाव | प्रति माहे जागेचे भाडे | थकित भाडे कालावधी | थकित भाडे रक्कम | थकीत सेवाकर रक्कम | एकुण थकित भाडे. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आरक्षण क्र 57 उल्हासनगर-1 शहीद दुनीचंद कलानी मेमोरीयल ट्रस्ट | 30333.33 | 16/08/1989 ते31/0 3/2015 | 9327499/- | 639766/- | 9967265/- |
| 2 | आरक्षण क्र 106 उल्हासनगर-5 शहीद दुनीचंद कलानी मेमोरीयल ट्रस्ट | 61346.39 | 16/08/1989 ते3 1/03/2015 | 18864015/- | 1293869/- | 20157884/- |
| 3 | सचिव शारदा शिक्षण प्रशारक मंडळ, शाळा क्र 4, उल्हासनगर - 4 | 280658 | 01/05/2011 ते 31/03/2015 | 13190926/- | 1566801/- | 14757727/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | मे. कोर्णाक इन्वाहरयो प्रा लि.1) मध्यवर्ती जकात नाका जागा, 2) अग्निशमन टेशन मागिल जागा 3) व्हीटीसी. क्रिडा संकुल मागिल बाजु | 751600/-, 79000/-, 80700/- | 01/10/2013 ते 31/03/2015 | 16403400/- | 1464277/- | 17867677/- |
| 5 | मे. के.एल.एन्व्हीटेक प्रा.लि. | 70135 | 1/01/2010 ते 31/03/2015 | 4418505/- | 507118/- | 4925623/- |
| 6 | शासकिय शिधावाटप कार्यालय वुडलॅड इमारत ( 2रा मजला) उल्हासनगर - 3 | 43749 | 13/08/2004 ते 31/03/2015 | 5582372/- | 637808/- | 6220180/- |
| | | | एकुण | 67786717/- | 6109639/- | 73896356/- |

उपरोक्त थकीत भाडयावर केद्रीय वित्तीय आधिनियम 1994, 65B(105),zzzz नुसार मालमत्तेवर सेवाकर घेतलेबाबत लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्याप्रमाणे सेवाकराबाबत केंद्रशासनाकडील वेळोवेळी विहीत केलेले सेवाकर आकारणी टक्केवारी नुसार, आकारणी व दंडनीय व्याजाची रक्कम वसुलपात्र ठरविण्यात येत आहे.
तसेच उल्हासनगर मनपा मुख्यालय तळमजल्यावर 22.05 चौ.मी जागा भाडयाने मनपा कर्मचारी सहकारी पतपेढीस दिलेली आहे.
सदरील पतपेढीकडून मागील कित्येक वर्षापासून भाडे निश्चित करून रक्कम वसुल केलेली नाही. सदरील पतपेढीचे भाडे कार्यकारी अभियंता, उल्हासनगर मनपा यांनी निश्चिती केलेले आहे. त्यानुसार मा. महासभा ठराव क्र. 32 दि. 09/07/2015 अन्वये माहे एप्रिल 2015 पासुन सदरील जागेचे वार्षीक भाडे रू.1,89,840/- प्रमाणे करावयाचे निर्देशित केले आहे. तरी सदरील पतसंस्थेचे मागिल 20 वर्षापर्यंतचे भाडे वाढ न केल्याने लेखा परीक्षणास सदरील जागेचे भाडे निश्चिती बाबत व भाडे वाढ बाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. तरी आक्षेपित मुदयाबाबत विभागाला अर्धसमास पत्र क्र. 166 दिनांक 03/12/2016 रोजी खुलासा मागविला असता विभागाने दिनांक 02/01/2017 रोजी अनुपालन सादर केले असता सदर अनुपालनात विभागाने भाडे वाढ विषय व वसुली विषयी काम चालु असल्याचे कळविले आहे. तरी वसुल पात्र रक्कम 7,38,96,356/- (भाडे रूपये 6,77,86,717/- + सेवाकर 61,09,639/-)

DATRYJM7501 (Ref No : 43, Hmm No : 166)

## *36 उल्हासनगर शहरातील गरीब व गरजू महिलांना स्वयरोजगारासाठी शिवण यंत्र उपलब्ध करून दिलेल्या कामाबाबत अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3149213.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2999250.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 149963.00/-

***उल्हासनगर शहरातील गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवण यंत्र उपलब्ध करून दिलेल्या कामाबाबत शिवण यंत्र खरेदीसाठी निविदा संबंधी जाहिरात ही एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली नाही तसेच उदयोग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. भाखस/1088/(2512) उदयोग-6 दि. 02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलंब केलेले दिसून आले नाही. त्यामुळे सदरील शिवण यंत्र खर्चाबाबत नियमानुसार खरेदी झालेली नाही. शिवण यंत्र खरेदीच्या निविदेतील अटी हया पुरवठा दाराने पुर्ण केलेल्या दिसुन येत नाही.***

उल्हासनगर मनपा महिला व बालकल्याण विभागाचे लेखा परीक्षण केले असता महिला बालकल्याण विभागाने 2014-2015 मध्ये उल्हासनगर शहरातील गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवण यंत्र उपलब्ध करून दिल्याने, प्रमाणक क्रमांक 4335 दि. 25/02/2015 अन्वये रक्कम रू. 29,99,250/- खर्च करण्यात आले आहे. त्याप्रमाणे खालील ठेकेदाराकडून शिवण यंत्र पुरवठा झाले आहे.

कामाचे नाव :- उल्हासनगर शहरातील गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवण यंत्र उपलब्ध करून देणेबाबत.

कार्यादेश क्रमांक :- जा.क्र. उमपा/मबासक/उप.आ/26/14 दि. 05/09/2014

पुरवठा कालावधी :- 60 दिवस

पुरवठादाराचे नावे :- मे. ओम मनिष इंटरप्राईजेस

सदरील पुरवठादाराकडून उल्हासनगर शहरातील गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी मनपाने शिवण यंत्र खरेदी केले आहे. सदरील खरेदी नस्तीचे लेखा परीक्षण केले असता खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) उल्हासनगर शहरातील गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी 430 शिवण यंत्र पुरवठा करणेसाठी दि. 01/03/2014 रोजीच्या दैनिक आपल महानगर, दैनिक खबरे आज तक, दैनिक ठाणे वैभव हया वर्तमानपत्रात जाहिरात देउन निविदा मागविल्या आहे. प्रथम निविदा कालावधी 01/03/2014 ते 21/03/2014 मध्ये एकच निविदा प्राप्त, व दुस-यांदा निविदा कालावधी 16/06/2014 ते 19/06/2014 मध्ये दोन निविदा प्राप्त व तिस-यांदा दि. 02/07/2014 ते 07/07/2014 मध्ये दोन निविदा प्राप्त 1) मे. ओम मनिष एंटरप्रायजेस, उल्हासनगर 2) मे. मनोहर इलेक्ट्रो, भिवंडी सदरील खरेदीसाठी उदयोग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांचा शासन निर्णय क्र. 02/01/1992 मधील परिच्छेद क्र. 108 अन्वये निविदा संबंधी जाहिरात ही एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक आहे तसेच शासन निर्णय दि. 02/01/1992 मधील परिच्छेद क्र. 8.1 अन्वये खरेदी समितीची स्थापना करणे आवश्यक आहे व वार्षिक खरेदी 50000 पेक्षा जास्त असेल तर निविदा चौकशी वृत्तपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे त्याचे मनपा कडून पालन झालेले दिसून आले नाही त्यामुळे सदरील निविदा स्पर्धात्मक झालेली नाही.

2) मा. स्थायी समिती ठराव क्र. 42 दि. 01/09/2014 अन्वये उल्हासनगर शहरातील गरीब व गरजू महिलांना, महिला व बालकल्याण समिती अंतर्गत महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवण यंत्र उपलब्ध करून घेणेसाठी खरेदीच्या प्रस्तावास संविदा करण्यास व खर्चास मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे न्यूनतम पुरठाधारक मे. ओम मनिष एंटरप्राईजेस उल्हासनगर यांचेबरोबर दि. 03/09/2014 ते 31/03/2015 या कालावधीत शिवणयंत्र पुरवठा करणेचा करारनामा केलेला आहे. सदरील निविदा, निविदा समितीसमोर संगणक प्रणालीवर प्रथम तांत्रिक लिफाफे उघडले असता मे. मनोहर इलेक्ट्रो भिवंडी यांनी निविदेच्या अटीमधील तांत्रिक बाबींची कागदपत्रे सादर केलेली नाही. त्यामुळे मे. मनोहर इलेक्ट्रो भिवंडी यांना तांत्रिक बाबतीत निविदेतून बाद झाल्याचे दिसून येते, तसेच मे. ओम मनिष यांनी तांत्रिक बाबींची कागदपत्रक सादर केली परंतू,

सदरील कागदपत्रात खालील प्रमाणे लेखा परीक्षणास तांत्रिक बाबीच्या त्रुटी आढळून आल्या त्या खालील प्रमाणे

1) Central Sales Tax यांचे प्रमाणपत्र दि. 18/12/2008 पर्यंतच वैध आहे.

2) पुरवठा दाराचे मुंबई दुकाने व संस्था प्रमाणपत्रात धंदयांचे स्वरूपात फर्निचर, स्टेशनरी पुरठा व ऑफिस यांचे प्रमाणपत्र देण्यातआलेले आहे.

3) पुरवठादाराने उल्हासनगर मनपाचा खुर्च्या दुरूस्ती, फर्निचर स्टेशनरी या एकाच संस्थेचा अनुभव आहे.

4) शिवण मशिन यंत्र हे फिलीप्स एस.यु.मॉडलचे आहे सदर कंपनीचे विक्रेते म्हणून मे. ओम मनिष एंटरप्राईजेस यांचे शिवणयंत्र विक्रेतेबाबत Authority पत्रक जोडलेले नाही. त्यामुळे पुरवठादारांच्या विकेतेबाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे निविदा अट क्र. 20 चे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

5) मान्य निविदाधारक यांनी निविदेच्या सुरक्षा अनामत रक्कम 3% FDR स्वरूपात रक्कम रू. 89,978/- पुरवठादाराकडून वसुल केलेली नाही. तसे देयकातून 2% सुरक्षा अनामत रक्कम रू. 59,985/- वसुल केली नाही. तसे सदरीलबाबतीत कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे एकत्रित सुरक्षा अनामत रक्कम रू. 1,49,963/- बाबत निविदेची अट क्र. 7 चे उल्लंघन झाले आहे.

6) सदरील शिवण यंत्र ठेकेदारने पुरवठा केलेबाबत साठा नोद वही लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेली नाही, तसेच लाभार्थ्याना शिवणयंत्र वाटप केलेबाबतची नोंदवही लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेली नाही. त्यामुळे उल्हासनगर शहरातील गरीब व गरजु महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवण यंत्र पुरवठा केलेबाबतचे लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही. तसेच सदरील आक्षेप मुद्दयांबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 205 दि. 07/01/2017 नुसार विभागाला कळविले असता लेखापरीक्षण संपणेच्या कालावधीपर्यंत विभागाकडून अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे आक्षेपाधिन रक्कम रू. 29,99,250/- वसुल पात्र रक्कम रू. 1,49,963/- (सुरक्षा अनामत रक्कम)आहे.

DATRYJM7501 (Ref No : 48, Hmm No : 205)

## *37 महानगरपालिकेच्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावर झालेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5865704.00/-

***वाहनांचा स्कंद नोंदवहयामध्ये लेखा संहितेप्रमाणे नोंदी घेतलेल्या नाही. वाहनांची मासिक व वार्षिक सरासरी धाव याबाबत गोषवारा काढण्यात आलेला नाही लेखा शाखेकडे सादर करण्यात येणारी देयके यांची कार्यालयीन प्रत विभागाकडे ठेवण्यात आली नाही.***

महानगरपालिकेच्या वाहन विभागात 2014-2015 या आर्थिक वर्षात जड वाहने 39 तसेच हलकी वाहने 11 अशी

एकुण 50 वाहने कार्यरत आहेत या वाहनांच्या इंधनासाठी महानगरपालिकेने रक्कम रू. 58,65,704/- एवढा खर्च केला असुन एकुण इंधनावर झालेल्या खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्र. 195 दि. 28/12/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर विचारात घेउन खालील अनियमितता दिसून येत आहे.

1) महानगरपालिकेने नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 153 नुसार नमुना क्र. 127 नुसार प्रत्येक वाहनासाठी ठेवलेल्या स्कंद नोंदवहया (लॉगबुक) यांची तपासणी करण्यात आली असता स्कंद नोंदवहीमध्ये प्रत्येक दिवशी वाहन धावलेल्या किलोमीटर्सची संख्या नोंदविण्यात आलेली नाही. प्रवास कोठून ते कुठपर्यंत केला याबाबतच्या नोंदी नोंदविण्यात आलेल्या नाहीत एकुण वापरलेले इंधन तसेच खर्चाचे प्रमाणक क्रमांक व दिनांक अशा नोंदी घेण्यात आल्या नाहीत प्रवासाचे प्रयोजन नोंदविण्यात आलेले नाही वरील नियमानुसार स्कंद नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

2) वाहनांच्या स्कंद नोंदवहीमध्ये वाहनांची दरमहा एकुण झालेली सरासरी धाव तसेच वार्षिक सरासरी धाव यांचा गोषवारा काढण्यात आलेला नाही. वाहनांचे मॉडेल वर्ष यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे वाहनांची प्रतिलिटर इंधनामागे किलोमीटर धाव योग्य असल्याची तपासणी करता आली नाही वाहनांची मासिक व वार्षिक सरासरी धाव व प्रती किलोमीटर सरासरी इंधन वापर यांचे वेळोवेळी गोषवारे न घेतल्याने इंधनावरती झालेला रक्कम रु.5865704/- केलेला खर्च काटेकोरपणे/काटकसरीने व विहित पद्धतीने झालेला नाही.

3) इंधन खर्चाची देयके वाहन विभागामार्फत लेखाशाखेकडे पारित होण्यासाठी सादर केली जातात. परंतु अशा देयकांची कार्यालयीन प्रत वाहन विभागाने स्वत:कडे ठेवलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 97, Hmm No : 195)

## *38 महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील देण्यात आलेल्या वाहना वरील खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 9821263.00/-

***वाहनांच्या वापरासंबंधी नोंदवही ठेवण्यात आली नाही. ठेकेदाराला कार्यादेश देण्यापूर्वी पुरवठा केलेली वाहने 2005 नंतरची असल्याबाबत खात्री करून कार्यादेश देण्यात आलेले नाही.***

महानगरपालिकेच्या अधिका-यांना भाडेतत्वावरील वाहने एक वर्षाच्या कालावधीसाठी ठेक्याने पुरविणे कामी दिनांक 17/06/2010 च्या दैनिक सामना, दै प्रेस जनरल, दै. प्रात:काल, दै.नगर न्युज या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देउन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदापैकी मे. अनमोल ट्रान्सपोर्ट, उल्हासनगर यांची न्युनत्तम दराची निविदा स्विकारण्यात येउन स्थायी समिती ठराव क्र. 138 दिनांक 20/02/2012 अन्वये मंजुरी दिली परंतु निविदा एक वर्षाच्या कालावधी करिता मागविलेली असतांना स्थायी

समितीने ठेकेदाराच्या विनंतीनुसार त्याच दरात सदर निविदेचा कालावधी 5 वर्ष असा केला तथापी ठेकेदाराची एका वर्षाची भाडेतत्वावरील वाहने पुरविण्याची सेवा समाधानकारक असल्यास पुढील कालावधीचा विचार करण्यात येईल व त्यानुसार अनमोल ट्रान्सपोर्ट यांचा प्रस्ताव मंजुर केला. तसेच दर वर्षी प्रशासकीय मान्यता घेउनच मुदतवाढ देण्याचे आयुक्तांनी आदेश दिलेले आहे. 2014-2015 वर्षात या ठेक्याला मुदतवाढ दिलेली असुन प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. महानगरपालिकेच्या अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावर वाहने ठेक्यावर पुरविणे कामी 2014-2015 या वर्षात रक्कम रू. 98,21,263/- इतका खर्च केला असून एकूण झालेल्या खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्र. 197 दिनांक 28/12/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उत्तर विचारात घेऊन खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत भाडेतत्वावर वाहने पुरविण्याचा ठेका मे. अनमोल ट्रान्सपोर्ट यांना वेळोवेळी आवश्यक असलेली वाहने पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यांच्याकडून करारनामा करून निविदा अटी व शर्ती क्र. 19 नुसार पुरवठा करण्यात येणारी वाहने ही नविन किंवा 2005 नंतरची (म्हणजे 2006 पासुन) खरेदी केलेली असावीत. व सर्व वाहनाचे आर.टी.ओ. नियमाप्रमाणे सर्व पेपरची पूर्तता कार्यादेश देतेवळी करावी असे नमुद करण्यात आले आहे परंतु ठेकेदाराला कार्यादेश देण्यापूर्वी पुरवठा केलेली वाहने 2005 नंतरची असल्याबाबत खात्री करून कार्यादेश देण्यात आल्याचे दिसुन येत नाही

2) वाहन विभाग कार्यालयात पुरवठादाराकडून प्रत्येक महिन्यात कार्यादेश देउन किती व कोणत्या प्रकराची वाहने ठेक्याने किती दिवसासाठी मागविण्यात आली व अशा वाहनांचा वापर कोणत्या अधिका-यांनी केला याबाबतचा संपूर्ण तपशिल ठेवणे बाबत निविदा अटी व शर्तीनुसार स्वतंत्र नोंदवही ठेवून अशा नोंदी नोंदविण्यात आलेल्या आढळून येत नाही त्यामुळे भाडयाने घेण्यात आलेली वाहने यांचा योग्य वापर झाल्याची खात्री करता येत नाही.

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *39 महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या खडेगोळवली येथील 28 द.ल.ली.क्षमतेचे मल प्रक्रिया केंद्र व 22/433 व्होल्ट उपकेंद्रासह चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1708075.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1467372.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 240703.00/-

***केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/ 2012-एस.टी. दि. 6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात आल्याने सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदरचा सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास रु.2,38,203 जादा प्रदान होणे,मुंबई मुद्रांक अधिनियम मध्ये झालेल्या 2006 मधील सुधारणेनुसार करारनामा रु.2,400 च्या कमी मुद्रांक पेपरवर करारनामा करणे, ठेकेदाराकडून घेतलेल्या पर्फोमन्स बँकहमीची मुदत वाढवून न घेणे, कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार कामगारांचा 8.33% बोनस, रजा वेतन रक्कम, धुलाई भत्ता त्यांना प्रदान केल्याची व कामगारांना गणवेश, रेनकोट तसेच गमबूट दिल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नसणे, कामाच्या मोजमाप पुस्तिका क्र.210 मध्ये लेखा विभागाकडून प्रदानार्थ रक्कमा तपासल्याबाबत स्वाक्षऱ्या नमूद नसणे, प्रथम धावते देयक रु.8,97,697 मंजूर असताना रु.4,35,697 चे अंशता प्रदान केल्याने उर्वरित रु.4,62,000 चे प्रदान कधी करण्यात आले याबाबत पूर्तता न दर्शविणे.***

महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शांतीनगर व नेहरूनगर या मलउपसा केंद्रांत वितरण व्यवस्थेतील वाहिन्याद्वारे सांडपाणी येते व सदर सांडपाण्याचा उपसा खेडेगोळवली येथील मलप्रक्रिया केंद्रात करण्यात येतो. महापालिकेने अशा 28 द.ल.ली. क्षमतेचे मल प्रक्रिया केंद्र व 22/433 व्होल्ट उपकेंद्रासह चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेसाठी वार्षिक निविदा काढून ठेकेदारामार्फत काम करून घेतले आहे. सदर कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- स्थायी समिती मंजुरी उपलब्ध झाली नाही. आयुक्त मान्यता दि.20.09.2012.
2. तांत्रिक मंजुरी क्र./तारीख व अंदाजपत्रकिय रक्कम- क्र.7/दि.05.09.2012 रु.32,82,484.

3. मंजूर निविदा रक्कम रु. 34,79,433.
4. निविदा मंजूर - स्थायी समिती ठराव क्र.80 दि.28.03.2013
5. लेखाशिर्ष - क अंदाजपत्रक सी-2 महसुली खर्च
6. निधी - म.न.पा.
7. ठेकेदाराचे नाव - मे.ओम इंडस्ट्रीयल इंजिनियरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली.
8. कार्यादेश - क्र.यु.एम.सी./एस.एस.एस.एस.डी./ई.ई./553 दि.05.04.2013 (6% टक्के जादा दर)
10. करारनामा-रु.100.
11. कामाचा कालावधी - 12 महिने.
12. काम पूर्ण दि.- मुदत वाढ
13.एकूण खर्च रु.17,08,075 (प्र.क्र.897 दि.10/06.2014 रु.8,97,697, पैकी प्रदान रु.4,35,697 व प्र.क्र.1627/ 07.08.2014 रु.12,72,378)

14. मोजमाप पुस्तक क्र.- 210

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व देयकाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदवहीतील नोंदीची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.43 दि.27.07.2016 निर्गमित करण्यात आले होते. याबाबत विभागाने दिलेले ( क्र.व दिनांक नाही.) व दि.07.09.2016 रोजी प्राप्त झालेले उत्तर तपासून खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक आस्थापना, दळणवळणासाठी वाहन, 22 केव्ही सबस्टेशन देखभाल व मोटारींचे रिवायडिंग अशा चार भागात करण्यात आले आहे. यातील आस्थापना भागात पंपिंग स्टेशनसाठी आवश्यक कुशल, सेमीकुशल व अकुशल कामगारांचे व सेक्युरीटी गार्डचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन गृहीत धरून महिन्याचे वेतन काढून वार्षिक वेतन काढण्यात आले आहे. यामध्ये इलेक्ट्रिक ऑपरेटर 4, इलेक्ट्रिशियन 1, फिटर 1, हेल्पर/ व्होल्व्हमन 4, माळी/गार्डनर 1 व सेक्युरीटी गार्ड 4 अशा एकूण 15 कामगारांचा समावेश आहे. अशा कामगारांचे वेतन काढताना किमान वेतन + विशेष भत्ता + इ.पी.एफ.+ इ.एस.आय.+ रजा वेतन + लेबर लायसन्स व इतर + गणवेश/रेनकोट + धुलाई भत्ता + इतर किरकोळ साहित्य + आस्थापना खर्च + बोनस + सेवाकर 12.36% + कामगार कल्याण कर + विमा समाविष्ट करून कुशल कामगाराचे रु.13,728, सेमीकुशल कामगाराचे रु.13,541 व माळी/गार्डनर याचे रु.13,353 मासिक वेतन तसेच सेक्युरीटी गार्डचे रु.14,634 मासिक वेतन निश्चित करण्यात आले आहे.सदर मासिक वेतन काढताना कुशल कामगाराच्या मासिक वेतनात रु.1,480 व सेमीकुशल कामगाराच्या मासिक वेतनात रु.1,460, माळी/गार्डनर च्या मासिक वेतनात रु.1,440 व सेक्युरीटी गार्डच्या मासिक वेतनात रु.1,578 सेवाकराचा समावेश आहे. केद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी.दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात आल्याने सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदरचा सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. वित्तीय वर्ष 2012-13 व 2013-14 मध्ये ठेकेदारास एकूण 10 महिन्याचे रु. 17,08,075 चे प्रदान करण्यात आले आहे. त्यामध्ये 6% जादा मंजूर निविदा दराने रु.2,38,203 च्या सेवाकराचा समावेश आहे. विभागाने त्यांचे उत्तरात अंदाजपत्रक जुलै-12 पूर्वी तयार

केल्याने सेवाकराचा समावेश करणेत आल्याचे नमूद केले आहे. तथापि निविदा 2012-13 मध्ये काढल्याने सेवाकराविना सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते, तसेच ठेकेदारास प्रदान सेवाकर त्यांनी शासनखाती जमा केल्याची पूर्तता दर्शविली नसल्याने केलेला खुलासा सयुक्तिक नाही. त्यामुळे सदरची रक्कम रु. 2,38,203 ची सबंधीताकडून वसुली होणे आवश्यक आहे. तसेच पुढील प्रदानावर सुद्धा जादा प्रदान सेवाकराची वसुली करणे आवश्यक आहे.

2) ठेकेदारासोबत रु.100 च्या मुंद्राक पेपरवर करारनामा करण्यात आलेला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम मध्ये झालेल्या 2006 मधील सुधारणानुसार रु.2,600 च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना कमी मूल्याच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केल्याने कमी मुद्रांक शुल्क रु.2,500 सबंधीताकडून वसूल करून शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

3) निविदा अटी/शर्तीनुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना कंत्राटातील नमूद कामगारांना ठेकेदारास प्रदान रक्कमेतून कामगारांचा 8.33% बोनस, रजा वेतन व धुलाई भत्याची रक्कम त्यांना प्रदान केल्याची तसेच कामगारांना गणवेश, गमबूट व रेनकोट दिल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध करून देणेत आली नाहीत.

4) कामाच्या देयकाच्या सबंधित मोजमाप पुस्तिका क्र.210 पाहता त्यात लेखा विभागाकडून प्रदानार्थ मंजूर रक्कम, कपातीच्या रक्कमा व निव्वळ देय रक्कम लाल शाईने नमूद करण्यात आल्या आहेत. तथापि तपासल्याबाबत स्वाक्षऱ्या नमूद करण्यात आल्या नाहीत. याबाबतची पूर्तता दर्शविणेत आली नाही.

5) कामाचे प्रथम धावते देयक रु.8,97,697 मंजूर असताना रु.4,35,697 चे अंशता प्रदान केले आहे. उर्वरित रु.4,62,000 चे प्रदान त्यांना कधी करण्यात आले याबाबत पूर्तता दर्शविली नाही.

उपरोक्त आक्षेपानुसार लेखापरीक्षणात रक्कम रु.2,40,703 वसूलपात्र व रक्कम रु.14,67,372 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.14,67,372.

वसूलपात्र रक्कम रु.2,40,703.

DATBEPM6101 (Ref No : 1, Hmm No : 43)

## *40 कॅम्प 1 ते 5 मधील तीव्र पाणी टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा करणेसाठी भाडे तत्वावर 7000 लिटर क्षमतेच्या टँकर पुरवठा करणेसाठी काढलेल्या दोन निविदा मंजुरीपूर्वी जुन्या मंजूर दराने केलेल्या रु.1,92,54,780 च्या प्रदानातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 19254780.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 19200720.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 534060.00/-

***दि.01.11.2012 ते दि.30.06.2014 या मूळ मुदत संपल्यानंतरच्या कालावधीसाठी मे.हरदीप यांना मागील मंजूर दराने पाणीपुरवठा करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार स्थायी समिती अथवा महासभा यांनी दिलेली मुदतवाढ अथवा मंजुरी त्यानुसार केलेले करारनामा तपासणीस उपलब्ध न होणे, मे.शुभम कन्स.यांना पत्र क्र.1749 दि.12.07.2010 नुसार दिलेला कार्यादेश व मे.गायत्री वाटर सप्लायर्स यांना पत्र क्र.1486 दि.01.06.2010 नुसार दिलेला कार्यादेश या दोनही कार्यादेशात पुढील निविदा मंजूर होईपर्यंत पाणीपुरवठा करणेचे नमूद केले बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार स्थायी समिती अथवा महासभेची मंजुरी घेणेत आल्याचे व त्यांचेसोबत करारनामा केल्याचे अभिलेखे उपलब्ध न होणे, मे.शुभम व मे.गायत्री यांचे कार्यादेशात नमूद केल्याप्रमाणे 7000 लिटर वाहन क्षमतेबाबत आर.टी.ओ.चे प्रमाणपत्रे, पाणी भरणेच्या ठिकाणच्या पाणी भरलेच्या पावत्या, पाणी पुरवठा केलेल्या ठिकाणी पाणी पुरवठा करणेसाठी केलेली मागणी व त्यानुसार विभागाच्या अभियंत्यांनी ठेकेदारास दिलेले आदेश, पाणी पुरवठा झाल्याचे सबंधित वार्डमधील नगरसेवक अथवा लोकांच्या पोहोच,वाहनांची लॉगबुके इ.कागदपत्रे लेखापरीक्षणात उपलब्ध न होणे,एकाच क्षेत्रातील एकाच कालावधीत पाणीपुरवठा केलेबाबत दोन वेळा बिले सादर करून रु.5,34,060 चे दुबार प्रदान करणे,महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामार्फत शहरातील वितरण वाहिन्यांच्या टोकाच्या भागात व उंच ठिकाणी पाणी पोहचत नसल्याने अशा ठिकाणी वितरण वाहिन्यावर 40 ते 50 ठिकाणी बुस्टर पंप लावून पाणी खेचले जात असताना व यासाठी महापालिका विद्युत बिल व पंपिंग स्टेशन उभारणे, चालविणे, देखभाल व दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होत असताना तसेच याव्यतिरिक्त शहरातील बोरवेल दुरुस्ती व देखभाल तसेच नवीन बोरवेल मारणेसाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना जवळ जवळ सर्व महानगरपालिकेच्या सर्व वार्डात पावसाळ्यासह बारा महिने टँकरने पाणीपुरवठा करणे.***

महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कॅम्प 1 ते 5 मध्ये तीव्र पाणी टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा करणेसाठी भाडे तत्वावर 7000 लिटर क्षमतेच्या टँकर पुरवठा करणेसाठी काढलेल्या दोन निविदा स्थायी समिती ठराव क्र.79 दि.05.02.2014 व ठराव क्र. 80 दि.05.02.2014 अन्वये मंजूर करून दोन ठेकेदारांना अनुक्रमे पत्र क्र.864 दि.01.07.2014 व पत्र क्र.132 दि.23.01.2014 नुसार कार्यादेश देणेत आले आहेत. सदर कार्यादेश देणेपुर्वी महानगरपालिकेने यापूर्वी दिलेल्या खालील नमूद कार्यादेशातील मंजूर ठेकेदारामार्फत अशा कार्यादेशात नमूद रु. 270 प्रतीफेरा मंजूर दराने कॅम्प 1 ते 5 मध्ये तीव्र पाणी टंचाईग्रस्त भागात भाडे तत्वावर 7000 लिटर क्षमतेच्या टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 एकूण रु.1,92,54,780 चे प्रदान केले आहे.

| अ.क्र. | कार्यादेश क्र./तारीख | ठेकेदाराचे नाव | प्रदान रक्कम रु. | प्रमाणक संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2961 दि.18.11.2008 | मे.हरदीप रोडवेज.कल्याण. | 88,27,380 | 12 |
| 2 | 1749 दि.12.07.2010 | मे.शुभम कन्स.उल्हासनगर. | 97,51,320 | 17 |
| 3 | 1486 दि.02.06.2010 | मे.गायत्री वाटर सप्लायर्स.उ''नगर. | 6,76,080 | 05 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | 1,92,54,780 | 34 |

याबाबत विभागाने लेखापरीक्षणात उपलब्ध केलेली प्रमाणकांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.62 दि.22/08/2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) प्रमाणकासोबत आढळून आलेल्या पत्र क्र.2961 दि.18.11.2008 नुसार मे.हरदीप रोडवेज यांना दिलेल्या कार्यादेशाची प्रत पहाता त्यामध्ये स्थायी समिती ठराव क्र.55 दि.28.08.2008 नुसार त्यांना कॅम्प 1 ते 5 मध्ये टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी रु.270 प्रतीफेरा दर मंजूर केल्याचे व कार्यादेशाची मुदत सहा महिने असल्याचे नमूद केले आहे. लेखापरीक्षण वित्तीय वर्षात मे.हरदीप रोडवेज यांना सदर कार्यादेशानुसार प्रदान करण्यात आलेल्या प्रमाणकांची पडताळणी करता त्यांनी दि.01.11.2012 ते दि. 30.06.2014 या कालावधीत टँकरने पाणीपुरवठा केल्याचे दिसते. याबाबत दि.01.11.2012 ते दि.30. 06.2014 कालावधीसाठी मे.हरदीप यांना त्याच दराने पाणीपुरवठा करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार स्थायी समिती अथवा महासभा यांनी दिलेली मुदतवाढ अथवा मंजुरी त्यानुसार केलेले करारनामा हे अभिलेख तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

2) मे.शुभम कन्स.यांना पत्र क्र.1749 दि.12.07.2010 नुसार दिलेला कार्यादेश व मे.गायत्री वॉटर सप्लायर्स यांना पत्र क्र.1486 दि.01.06.2010 नुसार दिलेला कार्यादेश अशा दोनही कार्यादेशाच्या प्रमाणकासोबतच्या प्रती पाहता त्यांना कॅम्प 1 ते 5 मध्ये टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी रु.270 प्रतीफेरा दर मंजूर केल्याचे व पुढील निविदा मंजूर होईपर्यंत पाणीपुरवठा करणेचे नमूद केले आहे. तथापि सदरचे कार्यादेश देणेपुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार स्थायी समिती अथवा महासभेची मंजुरी घेणेत आल्याचे व त्यांचेसोबत करारनामा केल्याचे दिसून येत नाही.

3) ठेकेदारांना पाणीपुरवठा केलेबाबत प्रदान केलेल्या प्रमाणकांची पडताळणी करता मे.शुभम व मे.हरदीप यांनी काही महिन्यात एकाच कालावधीत 1 ते 3 कॅम्पमध्ये पाणीपुरवठा केल्याचे तसेच 4 व 5 कॅम्पमधे सुद्धा काही महिन्यात एकाच कालावधीत पाणीपुरवठा केल्याचे दिसून येते. मे. गायत्री यांनी फक्त 4 व 5 कॅम्प मध्ये पाणीपुरवठा केला आहे. तथापि त्यांनी केलेल्या पाणीपुरवठ्याचा कालावधी हा इतर दोन ठेकेदारांनी कॅम्प 4 व 5 मध्ये केलेल्या पाणीपुरवठ्याचा कालावधी काही महिन्यात सारखाच आहे.याबाबत कार्यादेशात नमूद केल्याप्रमाणे 7000 लिटर वाहन क्षमतेबाबत आर.टी.ओ.ची प्रमाणपत्रे, पाणी भरणेच्या ठिकाणच्या पाणी भरलेच्या पावत्या,पाणी पुरवठा केलेल्या ठिकाणी पाणी पुरवठा करणेसाठी केलेली मागणी व त्यानुसार विभागाच्या अभियंत्यांनी ठेकेदारास दिलेले आदेश, पाणी पुरवठा झाल्याचे सबंधित वार्डमधील नगरसेवक अथवा लोकांच्या पोहोच, वाहनांची लॉगबुके इ.कागदपत्रे लेखापरीक्षणात उपलब्ध न झाल्याने केलेल्या पाणीपुरवठ्याच्या टँकरच्या फेऱ्यानुसार ठेकेदारास प्रदान झाल्याची पडताळणी करता आली नाही.

4) मे.शुभम यांना कॅम्प 1 ते 3 मध्ये दि.1.3.2013 ते 31.3.2013,दि.1.4.2013 ते 30.4.2013 व दि.1.5.2013 ते 31.5.2013 या कालावधीसाठी पाणीपुरवठा केल्याचे प्रदान अनुक्रमे प्र.क्र.199 दि.17.4.2013 रु.7,23,060, प्र.क्र.567 दि.18.5.2013 रु.7,45,470 व प्र.क्र.1249 दि.21.06.2013 रु.7,90,290 नुसार करण्यात आले आहे. तथापि मे.शुभम यांना प्र.क्र.1958 दि.30.8.2014 नुसार 1 ते 3 कॅम्पमध्ये दि.01.03.2013 ते 21.05.2013 या कालावधीसाठी पाणीपुरवठा केल्याचे रु.5,34,060 चे प्रदान पुन्हा करण्यात आल्याचे दिसून येते. मे. शुभम यांनी 1.3.2013 ते 31.5.2013 या कालावधीत 1 ते 3 कॅम्पमध्ये केलेल्या पाणीपुरवठ्याची बिले सादर करून त्यांना

दि.21.06.2013 पर्यंत अशा कालावधीचे प्रदान केले असताना त्यांनी पुन्हा त्याच क्षेत्रातील त्याच कालावधीची बिले सादर केल्याने रु.5,34,060 चे दुबार प्रदान झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. विभागाने याबाबत कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नाही. त्यामुळे याबाबत दुबार प्रदान रक्कम रु.5,34,060 ची सबंधीताकडून वसूली होणे आवश्यक आहे.

5)महापालिका महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून शुद्ध पाणी विकत घेवून आपल्या कार्यक्षेत्रात वितरीत करते. शहराचा उंच/सखल भाग असल्याने व विद्युत पुरवठा अनियमित होत असल्याने पुरेश्या दाबाने पाणीपुरवठा होत नाही. वितरण जलवाहिन्या जुन्या असल्याने गळतीचे प्रमाण जास्त असल्याने वितरण वाहिन्यांच्या टोकाच्या भागात व उंच ठिकाणी पाणी पोहचत नसल्याने अशा भागात पाण्याची टंचाई निर्माण होते. त्यामुळे टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. याबाबत महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामार्फत शहरातील वितरण वाहिन्यांच्या टोकाच्या भागात व उंच ठिकाणी पाणी पोहचत नसल्याने अशा ठिकाणी वितरण वाहिन्यावर 40 ते 50 ठिकाणी बुस्टर पंप लावून पाणी खेचले जाते. यासाठी महापालिका विद्युत बिल व पंपिंग स्टेशन उभारणे,चालविणे,देखभाल व दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करते.याव्यतिरिक्त शहरातील बोरवेल दुरुस्ती व देखभाल तसेच नवीन बोरवेल मारणेसाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना जवळ जवळ महानगरपालिकेच्या सर्व वार्डात पावसाळ्यासह बारा महिने टँकरने पाणीपुरवठा होत असल्याचे विभागाच्या अभिलेख्यावरून स्पष्ट होते.त्यामुळे बंद नळाद्वारे घरपोच पाणीपुरवठा करणेस महापालिका पूर्णतः सफल न झाल्याचे स्पष्ट होते.

वसूलपात्र रक्कम रु.5,34,060

आक्षेपाधीन रक्कम रु.1,92,00,720

DATBEPM6101 (Ref No : 4, Hmm No : 62)

## *41 उल्हासनगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :WS-B-6(XIII) मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 10477896.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2184860.00/-

***उल्हासनगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 येथे असलेल्या विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी कामगार पुरवठा करण्यासाठी कामगारांच्या वेतनाच्या रकमेत 12.36 टक्के दराने सेवाकर समाविष्ट करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व***

***कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी. दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात असून सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी कामगार पुरवठा करण्यासाठी कंत्राटास मुदतवाढ देतांना स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही. मुदतवाढीच्या कालावधीत कंत्राटदाराशी सुधारीत करारनामा करण्यात आलेला नाही. पुरवठा केलेल्या कामागारांचे हजेरीपत्रक उपस्थिती अहवाल उपलब्ध नाहीत. कंत्राटी कामगार कायद्यातील तरतूदीनुसार कामगारांना वेतनाच्या अनुषंगिक सवलती देण्यात आल्याचे आढळून आले नाही.***

उल्हास नगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 येथे असलेल्या विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी वार्षिक निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करुन काम करुन घेण्यात आले आहे. सदर कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- आयुक्त यांची मान्यता दि.20.09.2012.
2. तांत्रिक मंजुरी क्र./तारीख व अंदाजपत्रकिय रक्कम- क्र. --/दि.05.09.2012 रु.98,84,808/-.
3. मंजूर निविदा रक्कम रु.104,77,896/- (6% जादा दराने)
4. निविदा मंजूर - स्थायी समिती ठराव क्र.56 दि.23/01/2013
5. लेखाशिर्ष - क अंदाजपत्रक सी-2 महसुली खर्च
6. निधी - म.न.पा.
7. ठेकेदाराचे नाव - मे.हर्षल टेक्निमक,नासिक
8. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्यू.एस.एस.डी./सी.ई./मेक/177 दि.29.01.2013 (6%टक्के जादा दर)
10. करारनामा- रु.10,500/-
11. कामाचा कालावधी - 12 महिने.
12. काम पूर्ण दि.- दि.मुदत वाढ

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता लेखापरिक्षणास आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र. 55 दि.30/07/2016 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखापरिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक आस्थापना, दळणवळणासाठी दुचाकी वाहनसेवा, मोटारींचे रिवायडिंग व पंपची देखभाल दुरुस्ती अशा चार भागात करण्यात आले आहे. यातील आस्थापना भागात विविध ठिकाणच्या 20 बुस्टर पंपिंग स्टेशनसाठी आवश्यक निवासी इंजिनियरसह कुशल व सेमीकुशल कामगारांचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन गृहीत धरून महिन्याचे वेतन काढून वार्षिक वेतन काढण्यात आले आहे. यामध्ये इंजिनियर 01, इलेक्ट्रिक ऑपरेटर 42, इलेक्ट्रिशियन 1, फिटर 1 व हेल्पर/व्होल्व्हमन 12 अशा एकूण 57 कामगारांचा समावेश आहे. अशा कामगारांचे वेतन काढताना किमान वेतन + विशेष भत्ता + इ.पी.एफ.+ इ.एस.आय.+रजा वेतन +लेबर लायसन्स व इतर+ गणवेश/रेनकोट+धुलाई भत्ता+ इतर किरकोळ साहित्य + आस्थापना खर्च + बोनस + सेवाकर 12.36%+कामगार कल्याण कर + विमा समाविष्ट करून इंजिनियरचे रु.26,245/- कुशल कामगाराचे रु.13,728 व सेमीकुशल कामगाराचे रु.13,541 मासिक वेतन मासिक वेतन निश्चित करण्यात आले आहे. सदर मासिक वेतन काढताना इंजिनियरच्या मासिक वेतनात रु.2830/- कुशल कामगार इलेक्ट्रिक ऑपरेटर, इलेक्ट्रिशियन व फिटर यांच्या मासिक वेतनात रु.1,480 व सेमीकुशल कामगार हेल्पर/व्होल्व्हमनच्या

मासिक वेतनात रु.1,460 सेवाकराचा समावेश आहे. केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी. दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात असून सदर कामाच्या अंदाजपत्रकात कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. अंदाजपत्रकात आस्थापना याबाबीमध्ये 57 कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी 12 महिन्याच्या कालावधीसाठी रु.95,13,228/- अधिक 6% जादा मंजूर निविदा दराने म्हणजेच रु.5,70,794/- अशी एकूण रक्कम रु.1,00,84,022/- एवढया रक्कम समाविष्ट आहे. त्यानुसार ठेकेदारास कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या रकमेमध्ये 12.36% सेवाकरापोटी वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये इंजिनिअर-1 रु.35,998/- इलेक्ट्रिक ऑपरेटर-42 रु.18,826/- इलेक्ट्रिशियन-1 रु.7,90,675/- फिटर-1 रु.37,651/- हेल्पर-12 रु.2,22855/- असे एकूण रु.10,87,180/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये त्याच ठेकेदारास मुदतवाढ देण्यात आल्याने सेवाकरापोटी माहे मार्च-2015 अखेर एकूण 12 महिन्याची रक्कम रु.10,87,180/- एवढे प्रदान करण्यात आल्याने वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये प्रदान करण्यात आलेली सेवाकराची एकूण रक्कम रु.21,74,360/- सबंधीताकडून वसुली होणे आवश्यक आहे.

2) सदर कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.56 दि.23/01/2013 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार मे.हर्षल टेक्निक, नाशिक यांना कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्यू.एस.एस.डी./सी.ई./मेक/177 दि.29.01.2013 अन्वये कामाची मुदत कार्यादेशापासून 12 महिन्यासाठी म्हणजेच दि.28.01.2014 पर्यंत देण्यात होती. निविदेचा कार्यकाल दि.28/01/2014 रोजी संपत असल्यामुळे तसेच 2 ते 3 महिन्यात जे.एन.एन.यु.आर.एम योजना कार्यान्वीत होणार असल्याने तसेच बरेच पंपींप स्टेशन बंद होण्याची शक्यता असल्याने नव्याने निविदा न मागविता मे.हर्षल टेक्निोक,नाशिक यांना मुदतवाढ देण्यास आयुक्तांनी जुन-2014 अखेर निविदा मागविण्याच्या अधीन राहून दि.28/02/2014 रोजी मान्यता दिली असून कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.839 दि.06.06.2014 नुसार ठेकेदारास पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. तथापि सदर मुदतवाढीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार स्थायी समितीची मान्यता घेणेत आली नाही.

3) मुदतवाढ देताना ठेकेदारासोबत सुधारित करारनामा न केल्याने मुद्रांक शुल्काचा रु.10,500/- चा महसूल शासनास प्राप्त झाला नाही. त्यामुळे सदर रकमेची वसुली करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

4) ठेकेदाराकडून सुरक्षा अनामत रकम म्हणून दि.2707.2014 पर्यंत मुदत असलेली रु.3,14,337/- एवढया रकमेची एफ.डी.आर. घेण्यात आली आहे. तथापि ठेकेदारास मुदतवाढ देतांना सदर एफ.डी.आर.ची मुदत वाढवून घेणेत आली नाही.

5) निविदा अटी/शर्तीनुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना कंत्राटातील नमूद कामगारांचा भविष्य निर्वाह निधी, इ.एस.आय.त्यांचे खाती जमा केलेबाबत तसेच किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना वेतन दिल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत. तसेच ठेकेदारास प्रदान केलेल्या रकमेत कामगारांचा 8.33% बोनस,रजा वेतन,धुलाई भत्ता या रकमांचा समावेश आहे. परंतू पुरवठादाराने सदर रकमा कामगारांना प्रदान केल्याची व गणवेश,रेनकोट तसेच गमबूट दिल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराकडून कामगारांना सदर सवलतीचा लाभ देण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

6) पुरवठा केलेल्या कामगारांचे हजेरीपत्रके/ उपस्थिती अहवाल नस्तीत अथवा प्रमाणकांसोबत आढळून आले नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराने प्रत्यक्षात किती कामगार पुरवठा केले व त्यापैकी किती कामगार प्रत्यक्ष कामावर हजर होते यांची पडताळणी करता आली नाही. कंत्राटदारास कामगारांच्या वेतनाच्या रकमेचे प्रदान करतांना प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या कामागारांच्या हजेरीची पडताळणी न करता कामगारांच्या वेतनाची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आली आली आहे.

7) कामाच्या देयकाच्या सबंधित मोजमाप पुस्तिका पाहता त्यात लेखा विभागाकडून प्रदानार्थ मंजूर रक्कम, कपातीच्या रक्कमा व निव्वळ देय रक्कम लाल शाईने नमूद करण्यात आल्या आहेत, तथापि मोजमाप नोंदवहीत नोदविलेला प्रदानाचा तपशिल साक्षांकीत करण्यात आलेला नाही. तसेच प्रमाणक क्रमांक दिनांकाची नोंद मोजमाप नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.104,77,896/-

वसुलपात्र रक्कम सेवा आकार रु.21,74,360/- अधिक मुद्रांक शुल्क रु.10,500/- एकूण रु.21,84,860/-

FDSANMM7201 (Ref No : 57, Hmm No : 55)

## *42 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.1 ते 3 मध्ये असलेले टप्पा क्र-1 अंतर्गत एच.टी.पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 09**

*लेखा शीर्ष :WS-B-XIII-Part-I मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 7570096.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6391389.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1178707.00/-

***उल्हासनगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 येथे असलेल्या टप्पा क्र.01 अंतर्गत विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी कामगार पुरवठा करण्यासाठी कामगारांच्या वेतनाच्या रकमेत 12.36 टक्के दराने सेवाकर समाविष्ट करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी. दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात असून सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी कामगार पुरवठा करण्यासाठी कंत्राटास मुदतवाढ देतांना स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही. मुदतवाढीच्या कालावधीत कंत्राटदाराशी सुधारीत करारनामा करण्यात आलेला नाही. पुरवठा केलेल्या कामागारांचे हजेरीपत्रक उपस्थिती अहवाल उपलब्ध नाहीत. कंत्राटी कामगार कायद्यातील तरतूदीनुसार कामगारांना वेतनाच्या अनुषंगिक सवलती देण्यात आल्याचे आढळून आले नाही.***

उल्हास नगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.1 ते 3 येथे असलेल्या टप्पा क्र.1 अंतर्गत एच.टी. पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी वार्षिक निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करुन काम करुन घेण्यात आले आहे.सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- आयुक्त यांची मान्यता दि.20.09.2012.
2. तांत्रिक मंजुरी क्र./तारीख व अंदाजपत्रकिय रक्कम- क्र.---/दि.05.09.2012 रु.59,91,876/-.
3. मंजूर निविदा रक्कम रु.63,91,389/- (6% जादा दराने)
4. निविदा मंजूर - स्थायी समिती ठराव क्र.55 दि.23/01/2013
5. लेखाशिर्ष - क अंदाजपत्रक सी-2 महसुली खर्च

6. निधी - म.न.पा. 7. ठेकेदाराचे नाव - मे.हर्षल टेक्निक,नासिक
8. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्यू.एस.एस.डी./सी.ई./मेक/178 दि.29.01.2013 (6%टक्के जादा दर)
10. करारनामा- रु.6,400/- 11. कामाचा कालावधी - 12 महिने.
12. काम पूर्ण दि.- मुदत वाढ

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता लेखा परिक्षणात आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.56 दि.30/07/2016 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. नाही. तरी खालील प्रमाणे लेखापरिक्षणाचे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक आस्थापना, दळणवळणासाठी वाहनसेवा, 22 केव्ही सबस्टेशनची देखभाल दुरुस्ती, मोटारींचे रिवायडिंग व सर्विस इंजिनिअरचा पुरवठा करणे अशा पाच भागात करण्यात आले आहे. यातील आस्थापना भागात विविध ठिकाणच्या 04 बुस्टर पंपिंग स्टेशनसाठी आवश्यक निवासी इंजिनियरसह कुशल व सेमीकुशल कामगारांचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन गृहीत धरून महिन्याचे वेतन काढून वार्षिक वेतन काढण्यात आले आहे. यामध्ये इंजिनियर 01 , इलेक्ट्रिक ऑपरेटर 11 ,इलेक्ट्रिशियन 1 ,फिटर 1 ,हेल्पर/व्होल्व्हमन 11 , माळी/गार्डनर 1 , टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटर 1, अशा एकूण 27 कामगारांचा समावेश आहे. अशा कामगारांचे वेतन काढताना किमान वेतन + विशेष भत्ता + इ.पी.एफ.+ इ.एस.आय.+रजा वेतन +लेबर लायसन्स व इतर+ गणवेश/रेनकोट+धुलाई भत्ता+ इतर किरकोळ साहित्य + आस्थापना खर्च + बोनस + सेवाकर 12.36%+कामगार कल्याण कर + विमा समाविष्ट करून इंजिनियरचे रु.26,245/- कुशल कामगाराचे रु.13,728 व सेमीकुशल कामगाराचे रु.13,541 टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटर रु.19,572/- मासिक वेतन निश्चित करण्यात आले आहे. सदर मासिक वेतन काढताना इंजिनियरच्या मासिक वेतनात रु.2830/- कुशल कामगाराच्या मासिक वेतनात रु.1,480 व सेमीकुशल कामगाराच्या मासिक वेतनात रु.1,460 व टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटरच्या मासिक वेतनात रु.2,111 सेवाकराचा समावेश आहे. केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी. दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात असून सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. अंदाजपत्रकात आस्थापना याबाबीमध्ये 27 कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी 12 महिन्याच्या कालावधीसाठी रु.46,39,020/- अधिक 6% जादा मंजूर निविदा दराने म्हणजेच रु.2,78,341/- अशी एकूण रु.49,17,361/- एवढी रक्कम समाविष्ट आहे. त्यानुसार वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये ठेकेदारास कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या रकमेमध्ये 12.36% सेवाकरापोटी इंजिनिअर-1 रु.35,988/- इलेक्ट्रिक ऑपरेटर-11रु.2,07,082/-इलेक्ट्रिशियन-1 रु.37,651/- फिटर-1 रु.37651/- हेल्पर/व्होल्व्हमन-11 रु.2,04,283/- माळी/गार्डमन-1 रु.36,634/- टायपिस्ट कम कॉम्प्यु.ऑपरेटर-1 रु.26,852/- असे एकूण रु.5,86,151/- चे प्रदान करण्यात आले आहे. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये त्याच ठेकेदारास मुदतवाढ देण्यात आल्याने सेवाकरापोटी माहे मार्च-2015 अखेर एकूण 12 महिन्याच्या वेतनाच्या रकमेमध्ये रु.5,86,151/- एवढे प्रदान करण्यात आल्याने वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये प्रदान करण्यात आलेली सेवाकराची एकूण रक्कम रु.11,72,307/- सबंधीताकडून वसुली होणे आवश्यक आहे.

2) वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे एच.टी.पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती या प्रस्तावित कामाचे स्वरुप विचारात घेता खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतांना त्यात माळी/गार्डनर 1, टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटर 1 ही दोन पदे समाविष्ट करण्याचे प्रयोजन नस्तीतील उपलब्ध अभिलेख्यावरुन स्पष्ट झाले नाही. त्यामुळे सदर पदांच्या वेतनासाठी अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या खर्चाच्या आवश्यकतेबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

3) सदर कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.56 दि.23/01/2013 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार मे.हर्षल टेक्निक,नासिक यांना कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्यू.एस.एस.डी./सी.ई./मेक/176दि.29.01.2013 अन्वये कामाची मुदत कार्यादेशापासून 12 महिन्यासाठी म्हणजेच दि.28.01.2014 पर्यंत देण्यात होती. निविदेचा कार्यकाल दि.28/01/2014 रोजी संपत असल्यामुळे तसेच 2 ते 3 महिन्यात जे.एन.एन.यु.आर.एम योजना कार्यान्वीत होणार असल्याने तसेच बरेच पंपींप स्टेशन बंद होण्याची शक्यता असल्याने नव्याने निविदा न मागविता मे.हर्षल टेक्निोक,नासिक यांना मुदतवाढ देण्यास आयुक्तांनी जुन-2014

अखेर निविदा मागविण्याच्या अधीन राहून दि.28/02/2014 रोजी मान्यता दिली असून कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.839 दि.06.06.2014 नुसार ठेकेदारास पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. तथापि सदर मुदतवाढीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार स्थायी समितीची मान्यता घेणेत आली नाही.

4) मुदतवाढ देताना वाढीव कामाबाबत ठेकेदारासोबत सुधारित करारनामा न केल्याने मुद्रांक शुल्काचा रु.6,400/- चा महसूल शासनास प्राप्त झाला नाही. त्यामुळे सदर रकमेची वसुली करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

5) ठेकेदाराकडून सुरक्षा अनामत रकम म्हणून दि.27.07.2014 पर्यंत मुदत असलेली रु.1,90,600/- एवढया रकमेची एफ.डी.आर.घेण्यात आली. तथापि ठेकेदारास मुदतवाढ देतांना सदर एफ.डी.आर.ची मुदत कंत्राट कालावधीत वाढवून घेणेत आली नाही.

6) निविदा अटी/शर्तीनुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना कंत्राटातील नमूद कामगारांचा भविष्य निर्वाह निधी, इ.एस.आय.त्यांचे खाती जमा केलेबाबत तसेच किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना वेतन दिल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.तसेच ठेकेदारास प्रदान कामगारांचा 8.33% बोनस,रजा वेतन,धुलाई भत्ता त्यांना प्रदान केल्याची व कामगारांना गणवेश,रेनकोट तसेच गमबूट दिल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

7) पुरवठा केलेल्या कामगारांचे हजेरीपत्रके/ उपस्थिती अहवाल नस्तीत अथवा प्रमाणकांसोबत आढळून आले नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराने प्रत्यक्षात किती कामगार पुरवठा केले व त्यापैकी किती कामगार प्रत्यक्ष कामावर हजर होते. यांची पडताळणी करता आली नाही. कंत्राटदारास कामगारांच्या वेतनाच्या रकमेचे प्रदान करतांना प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या कामगारांच्या हजेरीची पडताळणी न करता कामगारांच्या वेतनाची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आली आली आहे.

8) कामाच्या देयकाच्या सबंधित मोजमाप पुस्तिका पाहता त्यात लेखा विभागाकडून प्रदानार्थ मंजूर रक्कम, कपातीच्या रक्कमा व निव्वळ देय रक्कम लाल शाईने नमूद करण्यात आल्या आहेत, तथापि मोजमाप नोंदवहीत नोदविलेला प्रदानाचा तपशिल साक्षांकीत करण्यात आलेला नाही. तसेच प्रमाणक क्रमांक दिनांकाची नोंद मोजमाप नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.11,72,307/- अधिक रु.6400/- एकुण रु.11,78,707/-

आक्षेपाधीन रक्कम रु.63,91,389/-

FDSANMM7201 (Ref No : 58, Hmm No : 56)

## *43 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.4 ते 5 मध्ये असलेले टप्पा क्र-1 अंतर्गत एच.टी.पंपींग स्टेशन चालविणे,देखभाल व दुरुस्ती कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :WS-B-XIII- Part-I मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6944798.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1292354.00/-

| |
|---|
| ***उल्हासनगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.4 ते 5 येथे असलेल्या टप्पा क्र.01 अंतर्गत विविध बुस्टर पंपिंग स्टेशन*** |

***चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी कामगार पुरवठा करण्यासाठी कामगारांच्या वेतनाच्या रकमेत 12.36 टक्के दराने सेवाकर समाविष्ट करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी. दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात असून सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी कामगार पुरवठा करण्यासाठी कंत्राटास मुदतवाढ देतांना स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही. मुदतवाढीच्या कालावधीत कंत्राटदाराशी सुधारीत करारनामा करण्यात आलेला नाही. पुरवठा केलेल्या कामागारांचे हजेरीपत्रके/उपस्थिती अहवाल प्रमाणकासोबत उपलब्ध नाहीत. कामागारांच्या वेतनाची रक्कम प्रदान करतांना प्रत्यक्ष पुरवठा केलेले कामगारांच्या उपस्थितीबाबत पडताळणी न करता कंत्राटदारास प्रदान करण्यात आले आहे. कंत्राटी कामगार कायद्यातील तरतूदीनुसार कामगारांना वेतनाच्या अनुषंगिक सवलती देण्यात आल्याचे आढळून आले नाही.***

उल्हास नगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.4 ते 5 येथे असलेल्या टप्पा क्र.1 अंतर्गत एच.टी. पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी वार्षिक निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करुन काम करुन घेण्यात आले आहे.सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- आयुक्त यांची मान्यता दि.20.09.2012.
2. तांत्रिक मंजुरी क्र./तारीख व अंदाजपत्रकिय रक्कम- क्र.----/दि.05.09.2012 रु.64,30,369/-.
3. मंजूर निविदा रक्कम रु.69,44,798/- (6% जादा दराने)
4. निविदा मंजूर - स्थायी समिती ठराव क्र.57 दि.23/01/2013
5. लेखाशिर्ष - क अंदाजपत्रक सी-2 महसुली खर्च
6. निधी - म.न.पा.
7. ठेकेदाराचे नाव - मे.हर्षल टेक्निक, नाशिक
8. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्यू.एस.एस.डी./सी.ई./मेक/176 दि.29.01.2013 (6%टक्के जादा दर)
9. करारनामा- रु.6,900/-
10. कामाचा कालावधी - 12 महिने.
11. काम पूर्ण दि.- मुदत वाढ

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्यास अर्धसमासपत्र क्र.57 दि.30/07/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक आस्थापना, दळणवळणासाठी वाहनसेवा, 22 केव्ही सबस्टेशनची देखभाल दुरुस्ती, मोटारींचे रिवायडिंग अशा चार भागात करण्यात आले आहे. यातील आस्थापना भागात विविध ठिकाणच्या 05 बुस्टर पंपिंग स्टेशनसाठी आवश्यक निवासी इंजिनियरसह कुशल व सेमीकुशल कामगारांचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन गृहीत धरून महिन्याचे वेतन काढून वार्षिक वेतन काढण्यात आले आहे. यामध्ये इंजिनियर 01 ,इलेक्ट्रिक ऑपरेटर 14 , इलेक्ट्रिशियन 1,फिटर 1,हेल्पर/ व्होल्व्हमन 11, माळी/गार्डनर 1, टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटर 1, अशा एकूण 30 कामगारांचा समावेश आहे. अशा कामगारांचे वेतन काढताना किमान वेतन + विशेष भत्ता + इ.पी.एफ.+ इ.एस.आय.+रजा

वेतन +लेबर लायसन्स व इतर+ गणवेश/रेनकोट+धुलाई भत्ता+ इतर किरकोळ साहित्य + आस्थापना खर्च + बोनस + सेवाकर 12.36%+कामगार कल्याण कर + विमा समाविष्ट करून इंजिनियरचे रु.26,245/- कुशल कामगाराचे रु.13,728 व सेमीकुशल कामगाराचे रु.13,541 टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटर रु.19,572/- मासिक वेतन निश्चित करण्यात आले आहे. सदर मासिक वेतन काढताना इंजिनियरच्या मासिक वेतनात रु.2830/- कुशल कामगाराच्या मासिक वेतनात रु.1,480 व सेमीकुशल कामगाराच्या मासिक वेतनात रु.1,460 व टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटरच्या मासिक वेतनात रु.2,111 सेवाकराचा समावेश आहे. केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या सेन्ट्रल बोर्ड ऑफ एक्साइस व कस्टम च्या सर्क्युलर क्र.162/13/2012-एस.टी. दि.6 जुलै 2012 नुसार मुन्सिपल सेवा सेवाकरातून वगळण्यात असून सदर अंदाजपत्रकातील कामगारांच्या वेतनात सेवाकर समाविष्ट केल्याने व त्याप्रमाणे ठेकेदारास सेवाकारासह 6% जादा मंजूर निविदा दराने प्रदान केल्याने तसेच ठेकेदाराने सदर सेवाकर शासन खाती जमा केलेला नसल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. अंदाजपत्रकात आस्थापना याबाबीमध्ये 30 कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी 12 महिन्याच्या कालावधीसाठी रु.51,33,228/- अधिक 6% जादा मंजूर निविदा दराने म्हणजेच रु.3,07,994/- अशी एकूण रु.54,41,222/- एवढी रक्कम समाविष्ट आहे. त्यानुसार वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये ठेकेदारास कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या रकमेमध्ये 12.36% सेवाकरापोटी इंजिनिअर-1 रु.35,988/- इलेक्ट्रिक ऑपरेटर-14 रु.2,63,558/- इलेक्ट्रिशियन-1 रु.37,651/- फिटर-1 रु.37,651/- हेल्पर/व्होल्व्हमन-11 रु.2,04,283/- माळी/गार्डमन-1 रु.36,634/- टायपिस्ट कम कॉम्पु.ऑपरेटर-1 रु.26,852/- असे एकूण रु.6,42,627/- चे प्रदान करण्यात आले आहे. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये त्याच ठेकेदारास मुदतवाढ देण्यात आल्याने सेवाकरापोटी माहे मार्च-2015 अखेर एकूण 12 महिन्याच्या वेतनाच्या रकमेमध्ये रु.6,42,627/- एवढे प्रदान करण्यात आल्याने वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये प्रदान करण्यात आलेली सेवाकराची एकूण रक्कम रु.12,85,454/- सबंधीताकडून वसुली होणे आवश्यक आहे.

2) वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे एच.टी.पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती या प्रस्तावित कामाचे स्वरुप विचारात घेता खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतांना त्यात माळी/गार्डनर 1,टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटर 1 ही दोन पदे समाविष्ट करण्याचे प्रयोजन नस्तीतील उपलब्ध अभिलेख्यावरुन स्पष्ट झाले नाही. त्यामुळे सदर पदांच्या वेतनाचा खर्च अंदाजपत्रकात समाविष्ट करण्याच्या आवश्यकतेबाबत खात्री झाली नाही.

3) सदर कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.56 दि.23/01/2013 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार मे.हर्षल टेक्निक, नाशिक यांना कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्यू.एस.एस.डी./सी.ई./मेक/176दि.29.01.2013 अन्वये कामाची मुदत कार्यादेशापासून 12 महिन्यासाठी म्हणजेच दि.28.01.2014 पर्यंत देण्यात होती. निविदेचा कार्यकाल दि.28/01/2014 रोजी संपत असल्यामुळे तसेच 2 ते 3 महिन्यात जे.एन.एन.यु.आर.एम योजना कार्यान्वीत होणार असल्याने तसेच बरेच पंपींप स्टेशन बंद होण्याची शक्यता असल्याने नव्याने निविदा न मागविता मे.हर्षल टेक्निोक, नासिक यांना मुदतवाढ देण्यास आयुक्तांनी जुन-2014 अखेर निविदा मागविण्याच्या अधीन राहून दि.28/02/2014 रोजी मान्यता दिली असून कार्यकारी अभियंता यांचे पत्र जा.क्र.उमपा/पापु/काअ/यांत्रिकी/460 दि.01.03.2014 नुसार ठेकेदारास पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. तथापि सदर मुदतवाढीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार स्थायी समितीची मान्यता घेणेत आलेली नाही. दि.28/01/2014 ते दि.30/1/2015 या कालावधीत स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय ठेकेदार मुदतवाढ देवून काम करुन घेण्यात आले आहे.

4) मुदतवाढ देताना ठेकेदारासोबत सुधारित करारनामा न केल्याने मुद्रांक शुल्काचा रु.6,900/- चा महसूल शासनास प्राप्त झाला नाही. त्यामुळे सदर रकमेची वसुली करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

5) ठेकेदाराकडून सुरक्षा अनामत रकम म्हणून दि.27.07.2014 पर्यंत मुदत असलेली रु.2,40,500/- एवढया रकमेची एफ.डी.आर. घेण्यात आली. तथापि ठेकेदारास मुदतवाढ देतांना सदर एफ.डी.आर.ची मुदत कंत्राट कालावधीत वाढवून घेणेत आली नाही.

6) निविदा अटी/शर्तीनुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना कंत्राटातील नमूद कामगारांचा भविष्य निर्वाह निधी, इ.एस.आय.त्यांचे खाती जमा केलेबाबत तसेच किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना वेतन दिल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत. तसेच ठेकेदारास प्रदान कामगारांचा 8.33% बोनस, रजा वेतन, धुलाई भत्ता त्यांना प्रदान केल्याची व कामगारांना

गणवेश,रेनकोट तसेच गमबूट दिल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

7) पुरवठा केलेल्या कामगारांचे हजेरीपत्रके/ उपस्थिती अहवाल नस्तीत अथवा प्रमाणकांसोबत आढळून आले नाहीत. त्यामुळे विभागाकडून कंत्राटदारास कामगारांच्या वेतनाच्या रकमेचे प्रदान करतांना कंत्राटदाराने प्रत्यक्षात किती कामगार पुरवठा केले व त्यापैकी किती कामगार प्रत्यक्ष कामावर हजर आहेत याबाबत कामगारांच्या हजेरीची पडताळणी न करता कामगारांच्या वेतनाची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आली आली आहे. त्यामुळे कामगारांच्या वेतनासाठी प्रदान केलेल्या रकमेच्या अनुज्ञेयतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

8) कामाच्या देयकाच्या सबंधित मोजमाप पुस्तिका पाहता त्यात लेखा विभागाकडून प्रदानार्थ मंजूर रक्कम, कपातीच्या रक्कमा व निव्वळ देय रक्कम लाल शाईने नमूद करण्यात आल्या आहेत, तथापि मोजमाप नोंदवहीत नोदविलेला प्रदानाचा तपशिल साक्षांकीत करण्यात आलेला नाही. तसेच प्रमाणक क्रमांक दिनांकाची नोंद मोजमाप नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.12,85,454/- अधिक रु.6,900/- एकूण रु.12,92,354/-

आक्षेपाधीन रक्कम रु.69,44,798/-

FDSANMM7201 (Ref No : 59, Hmm No : 57)

## *44 उल्हासनगर मनापांतर्गत नेताजी एच.टी.पंपिंग स्टेशन व आनंदनगर पंपींग स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरविणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमितांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :WS-B-XIII-Part-I मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1741300.00/-

***नेताजी पंपींग स्टेशन व आनंदनगर पंपींप स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरविण्याचे वाढीव कामासाठी जाहिर निविदा न मागविता त्यावेळी कार्यादेश क्र.उमपा/ पापु/ यांत्रिकी/11698 दि.7/07/2004 अन्वये कार्यरत कंत्राटदार मे.कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापूर यांच्याकडून करुन घेण्यात आले आहे. यासाठी महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम 73(ड) नुसार प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही. दि.22/07/2008 ते 31/03/2012 या कालावधीतील खर्चाचे प्रदान वर्ष 2014-15 साठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतुन करतांना त्यास महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम 102 नुसार स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही. पुरवठादाराने पुरविलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांची हजेरीपत्रके प्रमाणकासोबत उपलब्ध नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीनुसार वेतनाची रकम पुरवठादारास प्रदान केल्याबाबत खात्री झाली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेतंर्गत नेताजी पंपींग स्टेशन व आनंदनगर पंपींग स्टेशनचे कामकाज मनपा कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यात येत होते. त्यामुळे सदर काम कार्यरत कंत्राटदाराच्या कामात समाविष्ट नव्हते. वर्ष 2008 मध्ये बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे नेताजी पंपींग स्टेशन व आनंदनगर पंपींप स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरविण्याचे काम त्यावेळी कार्यादेश क्र.उमपा/पापु/यांत्रिकी/11698 दि.7/07/2004 अन्वये कार्यरत कंत्राटदार मे.कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापूर यांच्याकडून करुन घेण्यात आले आहे. मे.कल्पतरु इंजिनिअर्स या पुरवठादारास नेताजी पंपींग स्टेशनसाठी रु.9,99,350/- एवढया रकमेपैकी कपातीची रक्कम वजा जाता प्रमाणक क्र.313 दि.5/05/2014 अन्वये रु.9,09,407/- तसेच आनंदनगर पंपींप स्टेशनसाठी रु.7,41,950/- एवढया रकमेपैकी कपातीची रक्कम वजा जाता प्रमाणक क्र.312 दि.5/5/2014 अन्वये रु.6,75,173/- एवढया निव्वळ रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रदानाच्या रकमांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| बाब | पुरवठा कालावधी | परिमाण | दर | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1) नेताजी पंपींग स्टेशन प्रमाणक क्र.313 दि.05/05/2014 | | | | |
| पंपचालक- 01 (दोन शिफ्ट) | 06/04/2010 ते 30/09/2012 | 1817 शिफ्ट | रु.277/- प्रती शिफ्ट | रु.5,03,309/- |
| मदतनीस 01 (दोन शिफ्ट) | 06/04/2010 ते 30/09/2012 | 1817 शिफ्ट | रु.273/- प्रती शिफ्ट | रु.4,96,041/- |
| | | | एकूण | रु.9,99,350/- |
| 2) आनंदनगर पंपींग स्टेशन प्रमाणक क्र.312 दि.05/05/2014 | | | | |
| पंपचालक- 01 (दोन शिफ्ट) | 22/07/2008 ते 31/03/2012 | 1349 शिफ्ट | रु.277/- प्रती शिफ्ट | रु.3,73,673/- |
| मदतनीस 01 (दोन शिफ्ट) | 22/07/2008 ते 31/03/2012 | 1349 शिफ्ट | रु.273/- प्रती शिफ्ट | रु.3,68,277/- |
| | | | एकूण | रु.7,41,950/- |

यासाठी झालेला खर्च "बुस्टर पंपींग मशीनरी चालविणे, देखभाल व दुरुस्ती" (WS-B-XIII-Part-I) या लेखाशीर्षाखाली वर्ष 2014-15 मधील मंजूर तरतूदीतून भागविण्यात आला आहे. सदर प्रमाणकांची व सोबतच्या कागदपत्रांची पडताळणी करता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या अनियमितांबाबत खुलासा करण्यास अर्धसमासपत्र क्र.69 दि.22/08/2016 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षणाचे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) नेताजी पंपींग स्टेशन व आनंदनगर पंपींग स्टेशनचे कामकाज मनपा कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यात येत होते. त्यामुळे सदर काम कार्यरत कंत्राटदाराच्या कामात समाविष्ट नव्हते. वर्ष 2008 मध्ये बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे नेताजी पंपींग स्टेशन व आनंदनगर पंपींप स्टेशन येथे अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरविण्याचे वाढीव काम त्यावेळी कार्यादेश क्र.उमपा/पापु/यांत्रिकी/11698 दि.7/07/2004 अन्वये कार्यरत कंत्राटदार मे.कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापूर यांच्याकडून करुन घेण्यात आले आहे. पुरवठादारास दि.06/04/2010 ते 30/09/2012 या कालावधीतील कामासाठी व खर्चाच्या प्रदानासाठी अतिरिक्त आयुक्त यांची दि.31/01/2014 रोजी कार्योत्तर मान्यता घेवून क्र.UMC/WSSD/EE/mech/1698 दि.07/07/2014 अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर काम सुरु करण्यासाठी कंत्राटदारास कामाचे आदेश देण्यासाठी महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम 73(ड) नुसार प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट " ड" प्रकरण 5 मधील कलम 02 नुसार रु.5,00,000/- किंवा त्यावरील खर्चासाठी जाहीर निविदा मागविणे आवश्यक आहे. नेताजी पंपींग स्टेशनसाठी अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करणेसाठी रु.9,99,350/- व आनंदनगर पंपींग स्टेशन येथील कामासाठी रु.7,41,950/- एवढा खर्च करण्यात आला. यासाठी जाहिर निविदा मागवून पुरवठादार नियुक्ती न करता

तत्कालीन कार्यरत कंत्राटदारास अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्याचे काम करुन घेण्यात आले आहे. त्यामुळे अधिनियमातील उपरोक्त तरतूदीचे पालन करण्यात आलेले नाही.

3) दि.22/07/2008 ते 31/03/2012 या कालावधीतील खर्चाचे प्रदान वर्ष 2014-15 साठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतुन करण्यात आले आहे. यासाठी महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम 102 नुसार स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही.

4) सदर कामासाठी कंत्राटदारांशी केलेला करारनामा लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे सदर कामाचा कालावधी व त्याबाबतच्या अटीशर्तीची पडताळणी करता आली नाही.

5) पुरवठादाराने पुरवठा केलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांची यादी, कामाच्या कालावधीतील उपस्थितीबाबत हजेरीपत्रके, उपस्थिती अहवाल प्रमाणकासोबत उपलब्ध नाहीत. यावरुन पुरवठादारास कामगारांच्या वेतनाच्या रकमेचे प्रदान करतांना पुरवठा केलेल्या कामागारांच्या उपस्थितीची पडताळणी न करता प्रदान करण्यात आले असल्याचे दिसून येते.

6) किमान वेतन कायद्याप्रमाणे कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांना सदर कालावधीत वेतनाचे प्रदान केल्याबाबतचे अभिलेख प्रमाणकासोबत उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे पुरवठादाराकडून किमान वेतन कायदयानुसार कामगारांना वेतनाचे प्रदान करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

आक्षेपाधिन खर्च रक्कम रु.17,41,300/-

FDSANMM7201 (Ref No : 60, Hmm No : 69)

## *45 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.4 ते 5 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 704139.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 704139.00/-

***मालमत्ता नोंदवहीतील नोंदीनुसार कॅम्प क्र.4 ते 5 मध्ये अस्तित्वात असलेली बोअरवेल व चालू वा बंद स्थितीत असलेली बोअरवेल यांचा आढावा घेवून त्यानुसार बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन कंत्राटदाराने कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे करावयाची आहेत त्याबाबी नमूद करुन कामाचे आदेश न देता एकूण 50 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्ती खर्चाची अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करुन कामाचे आदेश देण्यात आले. 50 बोअरवेलची यादी व अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पहाणी अहवाल उपलब्ध नाही. दुरुस्त करावयाच्या बोअरवेलचा दोषदायित्व कालावधी विहीत करण्यात आला नाही. स्क्रॅप मटेरियलसाठी रिबेटची तरतूद करण्यात आली नाही. मजुर कामगार संस्थेशी रु.8,54,750/- एवढया***

***अंदाजपत्रकीय रकमेच्या कामासाठी रु.100/- एवढया मुद्रांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करुन कार्यादेश देण्यात आले महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 73(ड) नुसार आयुक्तांनी केलेल्या संविदा 15 दिवसांच्या आत सदर बाब स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याचे आढळून आले नाही.***

उल्हासनगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.4 ते 5 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे वर्ष 2013-14 मध्ये देखभाल व दुरुस्तीचे काम मजुर कामगार सहकारी संस्थेकडून करुन घेण्यात आले आहे. सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- अतिरिक्त आयुक्त मान्यता दि.23.10.2013
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.8,54,750/-, कार्यकारी अभियंता ता.म.क्र.105 दि.02.12.2013
3.मंजूर निविदा रक्कम- रु.8,54,750/-,जि.म.का.सह.संघ,ठाणेयांची शिफारस क्र.3049दि.14/11/2013
4. लेखाशिर्ष - ब अंदाजपत्रक बी-6 कुपनलिका दुरुस्ती महसुली खर्च
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे.साईबाबा मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./1585 दि.07.12.2013 (अंदाजपत्रकीय दर)
8. करारनामा- रु.100/-
9. कामाचा कालावधी - 365 दिवस.
10. काम पूर्ण दि.-उपलब्ध नाही.
11. एकूण खर्च रु.7,04,139/- (प्रमाणक.क्र.4891 दि.30.03.2015 प्रथम धावते देयक)
12. मोजमाप पुस्तक क्र.- 03 पृ.क्र.138-141

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके यांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत लेखापरिक्षणास खुलासा करणेबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.71 दि.22/08/2016 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) उल्हासनगर मनपांतर्गत कॅम्प क्र.4 व 5 मधील एकूण 50 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु.8,54,750/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर बोअरवेलची यादी अंदाजपत्रकासोबत उपलब्ध नाही. अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या 50 बोअरवेलच्या मालमत्ता नोंदवहीतील नोंदी तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पाहणी अहवाल पडताळणीस उपलब्ध झाला नसल्याने अंदाजपत्रकात समाविष्ट खर्चाची पडताळणी करता आली नाही.

2) मनपाच्या कॅम्प क्र.4 ते 5 मधील एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत बोअरवेल व बंद पडलेली बोअरवेल याबाबचा तपशील मालमत्ता नोंदवहीतील नोंदीसह पडताळणीस उपलब्ध नाही.मालमत्ता नोंदवहीतील नोंदीनुसार कॅम्प क्र.4 ते 5 मध्ये अस्तित्वात असलेली बोअरवेल व चालू वा बंद स्थितीत असलेली बोअरवेल यांचा आढावा घेवून त्यानुसार बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन कंत्राटदाराने कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे करावयाची आहेत त्याबाबी नमूद करुन कामाचे आदेश न देता एकूण 50 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्ती खर्चाची अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करुन कामाचे आदेश देण्यात आल्याने कंत्राटदारास कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे देण्यात आली याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 72(ड) नुसार आयुक्तांनी केलेल्या संविदा 15 दिवसांच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. मे.गितांजली मजुर कामगार सह.संस्था मर्या.उल्हासनगर या मजुर कामगार संस्थेशी रु.8,54,750/- एवढया अंदाजपत्रकीय रकमेच्या कामासाठी रु.100/- एवढया मुद्रांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करुन कार्यादेश देण्यात आले आहेत. अधिनियमातील उपरोक्त तरतूदीनुसार सदर बाब स्थायी

समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

4) पहिल्या धावत्या देयकांन्वये कंत्राटदार संस्थेस 79 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी एकूण रु.7,04,139/- एवढया रकमेपैकी प्रमाणक क्र.4891 दि.30/03/2015 अन्वये रु.6,03,800/- एवढया निव्वळ रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर देयकाची पडताळणी करता कंत्राटदाराने दुरुस्त केलेल्या 79 बोअरवेलची यादी व बोअरवेलच्या हिस्ट्रीशिटच्या नोंदी पडताळणीस उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराने केलेल्या कामाच्या सत्यतेबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

5) कामाच्या अंदाजपत्रक बाब-1 लेबर पार्ट व बाब-2 मटेरिअल पार्ट अशा दोन भागात तयार करण्यात आले असून बाब-1 लेबर पार्ट याबाबीसाठी रु.57,500/- व बाब-2 मटेरिअल पार्ट याबाबींतर्गत विविध कामांसाठी रु.7,97,259/- एवढी रक्कम समाविष्ट आहे. तथापि, अंदाजपत्रकात स्क्रॅप मटेरियलसाठी रिबेटची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे कंत्राटदाराने स्क्रॅप मटेरियल मनपाकडे जमा करणे क्रमप्राप्त ठरते. परंतू कंत्राटदाराकडून स्क्रॅप मटरियल मनपाकडे जमा करण्यात आल्याबाबतची चलने प्रमाणकासोबत आढळून आले नाहीत. यावरुन मटेरिअल पार्ट या बाबीवरील खर्च व स्क्रॅप मटेरियल यांची पडताळणी न करता कंत्राटदारास देयकाचे प्रदान करण्यात आले आहे.

6) विभागाकडून दरवर्षी कंत्राटदार नियुक्त करुन बोअरवेल देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात. त्यामुळे पुन्हा त्याच बोअरवेलच्या दुरुस्तीसाठी खर्च टाळण्याच्या दृष्टीने कंत्राटदाराशी करारनामा करतांना त्यात दुरुस्त करण्यात येणाऱ्या बोअरवेल दुरुस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करणे आवश्यक होते. परंतू करारनाम्यात बोअरवेलचा दुरुस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करण्यात आला नाही.

7) सदर कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तक क्र.- 03 पृ.क्र.138-141 मध्ये नोंदविण्यात आल्या आहेत. सदर मोजमाप पुस्तक पडताळणीस उपलब्ध करण्यात आले नसल्याने खर्चाच्या प्रमाणकात नमुद केलेल्या बाबींची मोजमाप नोंदवहीतील नोंदीशी मेळ घेता आला नाही. त्यामुळे सदर कामावर केलेला खर्च रु.7,04,139/- आक्षेपाधिन आहे.

आक्षेपाधिन खर्च रु.7,04,139/-

FDSANMM7201 (Ref No : 61, Hmm No : 71)

## *46 उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.4 ते 5 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 404366.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 404366.00/-

***मालमत्ता नोंदवहीतील नोंदीनुसार कॅम्प क्र.4 ते 5 मध्ये अस्तित्वात असलेली बोअरवेल व चालू वा बंद स्थितीत असलेली बोअरवेल यांचा आढावा घेवून त्यानुसार बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन कंत्राटदाराने कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे करावयाची आहेत त्याबाबी नमूद न करता एकूण 325 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्ती खर्चाची अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करुन कामाचे आदेश देण्यात आले.***

***दुरुस्त करावयाच्या बोअरवेलचा दोषदायित्व कालावधी विहीत करण्यात आला नाही. स्क्रॅप मटेरियलसाठी रिबेटची तरतूद करण्यात आली नाही. महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 72(ड) नुसार आयुक्तांनी केलेल्या संविदा 15 दिवसांच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर केल्याचे आढळून आले नाही. मोजमाप पुस्तक पडताळणीस उपलब्ध करण्यात आले नाही.***

उल्हास नगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.4 ते 5 मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे वर्ष 2013-14 मध्ये देखभाल व दुरुस्तीचे काम मजुर कामगार सहकारी संस्थेकडून करुन घेण्यात आले आहे. सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. प्रशासकीय मंजुरी- अतिरिक्त आयुक्त मान्यता दि.13.11.2013
2. अंदाजपत्रकिय रक्कम- रु.6,40,110/-, कार्यकारी अभियंता ता.म.क्र.95 दि.14.11.2013

3.मंजूर निविदा रक्कम- रु.6,40,110/-,जि.म.का.सह.संघ,ठाणेयांची शिफारस क्र.3191दि.21/11/2013

4. लेखाशिर्ष - ब अंदाजपत्रक बी-6 कुपनलिका दुरुस्ती महसुली खर्च
5. निधी - म.न.पा.
6. ठेकेदाराचे नाव - मे.सिंधू भारती मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित
7. कार्यादेश क्र.यु.एम.सी./डब्ल्यू.एस.एस.डी./1621दि.11.12.2013 (अंदाजपत्रकीय दर)
8. करारनामा- रु.100/-
9. कामाचा कालावधी - 365 दिवस.
10. काम पूर्ण दि.—उपलब्ध नाही
11. एकूण खर्च रु.4,04,366/- (प्रमाणक.क्र.4091 दि.30.03.2015 प्रथम धावते देयक)
12. मोजमाप पुस्तक क्र.- 03 पृ.क्र.142-145

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके यांची तपासणी केली असता लेखापरिक्षणास आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्यास अर्धसमास पत्र क्र.70 दि.22/08/2016 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मनपाच्या कॅम्प क्र.4 ते 5 मधील एकूण 325 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु.6,40,110/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. परंतू कॅम्प क्र.4 ते 5 मधील एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत बोअरवेल व बंद पडलेली बोअरवेल याबाबचा तपशील मालमत्ता नोंदवहीतील नोंदीसह पडताळणीस उपलब्ध झाली नाही. दुरुस्त करावयाच्या बोअरवेलची यादी तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पाहणी अहवाल अंदाजपत्रकासोबत पडताळणीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अंदाजपत्रकात समाविष्ट खर्चाची पडताळणी करता आली नाही.

2) मालमत्ता नोंदवहीतील नोंदीनुसार कॅम्प क्र.4 ते 5 मध्ये अस्तित्वात असलेली बोअरवेल व चालू वा बंद स्थितीत असलेली बोअरवेल यांचा आढावा घेवून त्यानुसार बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन कंत्राटदाराने कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे करावयाची आहेत त्याबाबी नमूद करुन कंत्राटदारास कामाचे आदेश न देता एकूण 325 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्ती खर्चाची अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करुन कामाचे आदेश देण्यात आले त्यामुळे कंत्राटदारास कोणत्या बोअरवेलच्या दुरुस्तीची कामे देण्यात आली याची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 72(ड) नुसार आयुक्तांनी केलेल्या संविदा 15 दिवसांच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. मे.गितांजली मजुर कामगार सह.संस्था मर्या.उल्हासनगर या मजुर कामगार संस्थेस रु.6,40,110/-,एवढया अंदाजपत्रकीय रकमेच्या कामासाठी रु.100/- एवढया मुद्रांक शुल्काच्या

पेपरवर करारनामा करुन कार्यादेश देण्यात आले आहेत. परंतु अधिनियमातील उपरोक्त तरतूदीनुसार सदर बाब स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

4) पहिल्या धावत्या देयकांन्वये कंत्राटदार संस्थेस 82 बोअरवेलच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी एकूण रु.4,04,366/- एवढया रकमेपैकी प्रमाणक क्र.4891 दि.30/03/2015 अन्वये रु.3,46,744/- एवढया निव्वळ रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर देयकाची पडताळणी करता कंत्राटदाराने दुरुस्त केलेल्या 82 बोअरवेलची यादी व बोअरवेलच्या हिस्ट्रीशिटच्या नोंदी पडताळणीस उपलब्ध झाल्या नाहीत त्यामुळे कंत्राटदाराने केलेल्या कामाच्या सत्यतेबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

5) कामाच्या अंदाजपत्रक बाब-1 लेबर पार्ट व बाब-2 मटेरिअल पार्ट अशा दोन भागात तयार करण्यात आले असून बाब-1 लेबर पार्ट याबाबीसाठी रु.1,51,645/- व बाब-2 मटेरिअल पार्ट याबाबींतर्गत विविध कामांसाठी रु.4,88,444/- एवढी रक्कम समाविष्ट आहे. तथापि, अंदाजपत्रकात स्क्रॅप मटेरियलसाठी रिबेटची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे कंत्राटदाराने स्क्रॅप मटेरियल मनपाकडे जमा करणे क्रमप्राप्त ठरते. परंतू कंत्राटदाराकडून स्क्रॅप मटरियल मनपाकडे जमा करण्यात आल्याबाबतची चलने प्रमाणकासोबत आढळून आले नाहीत. यावरुन मटेरिअल पार्ट या बाबीवरील खर्च व स्क्रॅप मटेरियल यांची पडताळणी न करता कंत्राटदारास देयकाचे प्रदान करण्यात आले आहे.

6) विभागाकडून दरवर्षी कंत्राटदार नियुक्त करुन बोअरवेल देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात. त्यामुळे पुन्हा त्याच बोअरवेलच्या दुरुस्तीसाठी खर्च टाळण्याच्या दृष्टीने कंत्राटदाराशी करारनामा करतांना त्यात दुरुस्त करण्यात येणाऱ्या बोअरवेल दुरुस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करणे आवश्यक होते. परंतू करारनाम्यात बोअरवेलचा दुरुस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करण्यात आला नाही.

7) सदर कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तक क्र.- 03 पृ.क्र.142-145 मध्ये नोंदविण्यात आल्या आहेत. सदर मोजमाप पुस्तक पडताळणीस उपलब्ध करण्यात आले नसल्याने प्रमाणकातील खर्चाच्या बाबी व मोजमाप नोंदवहीतील नोंदी यांची पडताळणी करुन प्रदानाच्या रकमेच्या योग्यतेची खात्री करता आली नाही. त्यामुळे सदर कामावरील खर्चाची रक्कम रु.4,04,366/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन खर्च रु.4,04,366/-

FDSANMM7201 (Ref No : 62, Hmm No : 70)

## *47 उल्हासनगर मनापांतर्गत विविध पंपिंग स्टेशन येथे मोनोब्लॉक पंप,स्टार्टर आणि पॅनल बसविणे, कार्यान्वित करणे चाचणी देणे इ.वरील खर्चाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 532607.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 532607.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 10897.00/-

***मंजूर लेखाशीर्षाखालील उपलब्ध तरतूदी व्यतिरिक्त इतर लेखाशीर्षाखालील उपलब्ध तरतूदीतून खर्च करण्यासाठी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमाच्या कलम 102 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात***

***आलेली नाही. कामे पुर्ण झाल्याबाबत संबंधित शाखा अभियंत्याचा कामाच्या पुर्णत्वाचा दाखला प्रमाणकासोबत पडताळणीस उपलब्ध झाला नाही. देयकाच्या रकमेतून 2 टक्के प्रमाणे व्हॅट कपात करण्यात आलेला नाही. सदर पंपींग स्टेशनवर नवीन पंप बसविण्यात आल्यानंतर कंत्राटदाराकडून जुना पंप मनपाकडे जमा करण्यात आल्याबाबत प्रमाणकासोबतच्या कागदपत्रावरुन लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामार्फत शहरातील वितरण वाहिन्यांच्या टोकाच्या भागात व उंच ठिकाणी पाणी पोहचत नसल्याने अशा ठिकाणी वितरण वाहिन्यावर विविध ठिकाणी बुस्टर पंप लावून पाणी खेचले जाते. यासाठी महापालिका क्षेत्रातील कॅम्प क्र.1 ते 5 मध्ये विविध ठिकाणी बुस्टर पंपींग स्टेशन उपभारण्यात आली असून अशा विविध पंपिंग स्टेशन येथे मोनोब्लॉक पंप, स्टार्टर आणि पॅनल बसविणे, कार्यान्वितकरणे चाचणी देणे इ. कामे दरपत्रकेमागवून मे.कल्पतरु इंजिनिअर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टरर्स या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आली असून प्रमाणक क्रमांक 4668 दि.19/03/2015 अन्वये कंत्राटदारास एकूण रु.5,32,607/- एवढया रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी करता प्रदानाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यादेश क्र. | दिनांक | कामाची बाब | एकूण खर्च | आयकर कपात रु. | एलबीटी कपात रु. | निव्वळ प्रदान रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1007 | 01.08.2014 | गावडे स्कुलजवळ नवीन 10 एच.पी.मोनो ब्लॉक पंप मागविणे बसविणे व चाचणी देणे | 88404/- | 1728/- | 221/- | 86415/- |
| 2 | 1130 | 25.08.2014 | समतानगर-2 येथे नवीन बुस्टरपंप बसविणे, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे | 88,486/- | 1770/- | 221/- | 86495/- |
| 3 | 1131 | 25.08.2014 | प्रभाग क्र.5 सिध्दार्थ कॉलनी बॅरेक नं.29/30 येथे 20 एच.पी.नवीन पंप मोटारसेट बसविणे चाचणी देणे व कार्यान्वीत करणे | 1,23,356/- | 2467/- | 308/- | 120581/- |
| 4 | 1012 | 01.08.2014 | टिव्हीएस सुप्रीम ऑटो शोरुम व स्टेटबँकेजवळ 10 एचपी क्षमतेचे नवीन सबमर्सिबल स्टँडबाय पंप मागविणे बसविणे | 1,26,598/- | 2532/- | 316/- | 123750/- |
| 5 | 1096 | 19.08.2014 | रमाबाई पंपींग स्टेशन येथे 15 एचपी पंप व स्टार्टर आणि पॅनल बसविणे, कार्यान्वितकरणे | 1,18,021/- | 2360/- | 295/- | 115360/- |
| | | | एकूण | 5,44,865/- | 10857/- | 1361/- | 5,32,607/- |

उपरोक्त प्रमाणकांची व सोबतच्या अभिलेख्यांची तपासणी करता आढळुन आलेल्या अनियमितांबाबत खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.89 दि.07/09/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) उपरोक्त कामांवरील प्रस्तावित खर्च WS-B-III Part-II- बुस्टर पंपींग मशिनरी खरेदी या लेखाशीर्षाखाली वर्ष 2014-15 साठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यास अतिरिक्त आयुक्त यांची मंजूरी घेण्यात आली आहे. परंतू सदर कामावरील खर्चाच्या रक्कमेचे कंत्राटदारास प्रदान करतांना झालेला खर्च WS-B-XIII Part-I - बुस्टर पंपींग चालविणे या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात आला आहे. परंतू मंजूर लेखाशीर्षाखालील उपलब्ध तरतूदी व्यतिरिक्त इतर लेखाशीर्षाखालील उपलब्ध तरतूदीतून खर्च करण्यासाठी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमाच्या कलम 102 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

2) कार्यादेशानुसार विहीत कालावधीत वरील कामे पुर्ण झाल्याबाबत संबंधित शाखा अभियंत्याचा कामाच्या पुर्णत्वाचा दाखला प्रमाणकासोबत पडताळणीस उपलब्ध झाला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात केलेल्या कामाच्या सत्यतेची खात्री करता आली नाही.

3) कंत्राटदारास देयकांचे प्रदान करतांना देयकाच्या रकमेतून 2 टक्के प्रमाणे व्हॅट कपात करण्यात आलेला नाही. तरी प्रमाणकाच्या एकुण रु.5,44,865/- रकमेवर रु.10,897/- व्हॅट वसुलपात्र आहे.

4) उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.1,2 व 3 येथील कामाच्या बाब क्र.07 व 8 मध्ये MSEB चार्जेस सुरक्षा अनामत या बाबीसाठी प्रत्येकी रु.12,000/- एवढया रकमेचे कंत्राटदारास प्रदान करण्यात आले आहे. परंतू सदर रक्कम कंत्राटदाराने MSEB कडे भरणा केल्याबाबतचे चलन प्रमाणकासोबत उपलब्ध नाही. तरी कंत्राटदाराकडून सदर रक्कमेचा भरणा MSEB कडे करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे सदर खर्चाच्या प्रदानाची सत्यता पडताळणी करता आली नाही.

5) सदर कामाच्या नोंदी मोजमाप नोंदवही क्र.72(A) मध्ये नोंदविण्यात आल्याचे प्रमाणकावरील तपशीलावरुन दिसून येते. परंतु सदर मोजमाप नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आली नसल्याने मोजमाप नोंदवहीतील नोंदीची पडताळणी करुन प्रदानाच्या रकमेची खात्री करता आली नाही.

6) अ.क्र.5 येथील पंपींग स्टेशन येथेप पंप जुना असल्याने वारंवार नादुरुस्त होत असल्याने नविन पंप बसविण्यात येत असल्याचे टिपणीत नमूद करण्यात आले आहे. परंतू सदर पंपींग स्टेशनवर नवीन पंप बसविण्यात आल्यानंतर कंत्राटदाराकडून जुना पंप मनपाकडे जमा करण्यात आल्याबाबत प्रमाणकासोबतच्या कागदपत्रावरुन लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. तरी सदर कामे पुर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराकडून स्क्रॅप मेटेरियल मनपास परत करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही.

7) उपरोक्त पंपींग स्टेशनच्या मालमत्ता नोंदवहीतील नोंदी, हिस्ट्रिशीट लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध करण्यात आली नाहीत त्यामुळे त्याबाबत पडताळणी करुन लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

वसुलपात्र रक्कम रु.10,897/-

आक्षेपाधीन रक्कम रु.5,32,607/-

FDSANMM7201 (Ref No : 64, Hmm No : 89)

## *48 उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागातील उत्पन्न विषयक धोरणात्मक त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

उल्हासनगर महानगरपालिका

**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :06 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 454074204.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 454074204.00/-

***बिगर घरगुती मिळकत धारकांकडून करयोग्य मुल्याच्या 10% दराने पाणी पट्टी वसुल न करणे, पाणी पुरवठा लाभ करयोग्य मुल्याच्या 20% एवजी 5% दराने कर आकारणे, मलप्रवाहकर व साफसफाईकर वाढ न करणे भांडवली स्वरूपाच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मलप्रवाहकर व वाढविणे प्रचलित पाणी कराच्या दरात वाढ न केल्याने महापालिकेतील दायित्व वाढणे थकबाकीचे प्रमाणे अधिक असणे अल्प उत्पन्न व खर्चाचे अधिक्य यातून निर्माण झालेल्या तुटीच्या भरण्यासाठी कर्जाचे दायित्व वाढणे प्रसतावीत दरवाढ रद्द करण्याचा महापालिका ठराव कलम 45 नुसार विखंडनासाठी राज्य शासनाकडे न पाठविणे.***

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाच्या दिनांक 02/8/2010 च्या शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणीपुरवठा व मलनि:सारण योजनांचे संचलन, व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्ती कार्यक्षम व स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने पिण्याचे व मलनि:सारणाचे संयुक्तीक दर आकारणे व अनुषंगिक उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. त्याप्रमाणे पाणी पुरवठयावरील वाढता खर्च लक्षात घेता पाणीपट्टी दरात वाढ करणे क्रमप्राप्त आहे. तथापि सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी उल्हासनगर महानगरपालिकेकडून होत नाही तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 11 मधील कलम 130 व 131 मधील तरतुदींची अंमलबजावणी झाली नाही याबाबत खालील अनियमितता आढळून आल्या आहेत.

1) उल्हासनगर शहरात बिगर घरगूती वापर होत असलेल्या मिळकताधारक उदा, कापड, फर्निचर, हार्डवेअर, किराणा, लाईट, कटलरी स्टेशनरी, औषध इत्यदी. दुकाने तसेच डॉक्टरचा दवाखाना (O.P.D.) व वकीलांचे कार्यालय इत्यादी कडून कोणत्याही स्वरूपात पाणीपट्टी आकारली जात नाही तथापि अशा मिळकत धारकांकडून करयोग्य मुल्याच्या 10% दराने पाणी पट्टी आकारणे 2013-14 साठी प्रस्तावित केले होते. तथापि तशी आकारणी केली गेली नाही. यामुळे महापालिकेचे 2014-15 मध्ये 2.86 कोटी रूपये असे एकुण 2.86 कोटी रूपये नुकसान झाले आहे याबाबत खुलासा सादर करावा.

2) महाराष्ट्र म.न.पा. अधिनियम चे कलम 129(अ) नुसार भांडवली स्वरुपाचा पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा लाभ कर आकारता येतो. तसेच कलम 130(2) हा कर महानगरपालिकेला क्षेत्रात रिक्त सर्व जागांच्या बाबतीत आकारण्यात येतो. या कराचा दर करयोग्य मुल्याच्या 5% आहे. तो 10% दराने आकारणे 2014-15 च्या अर्थसंकलात प्रस्तावित केले होते. तथापि प्रत्यक्षात अंमलबजावणी न झाल्याचे महानगरपालिकेस अनुक्रमे 3.25 कोटी रुपये असे एकुण 3.25 कोटी रूपये इतक्या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

4) महाराष्ट्र म.न.पा अधिनियमातील कलम 131 नुसार भांडवली स्वरुपाचा प्रकल्प हाती घेण्यासाठी मलप्रवाह सुविधा कर आकारण्याची तरतुद आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने भुयारी योजनेअंतर्गत भुयारी गटार प्रकल्प व J.N.N.R.U.M अंतर्गत सुधारित पाणीपुरवठा प्रकल्प हाती घेतले. या भांडवली स्वरुपाच्या योजना राबविण्यासाठी लागणा-या निधीचा विचार करता महापालिकेचे तत्कालीन उत्पन्न कमी असल्याने सदर करात 3% वरून 10% अशी वाढ प्रस्तावीत करण्यात आली यामुळे म.न.पा उत्पन्नात 2014-15 मध्ये 4.55 कोटी रूपये इतकी वाढ अपेक्षित होती तथापी त्याची अंमलबजावणी झाली नाही.

5) 2011-12 ते 2014-15 पर्यंतच्या उल्हासनगर म.न.पा.च्या पाणी पुरवठा विभागाच्या सर्व अंदाजपत्रकांमध्ये पाणी पट्टी,

पाणी पुरवठा लाभ कर, मलप्रवाह कर यांच्या प्रचलीत दरांमध्ये वाढ प्रस्तावीत केली आहे तथापि त्या वाढीची प्रत्यक्ष अंमलबजावणी न केल्याने भांडवली स्वरुपाच्या योजना राबविण्यासाठी तसेच दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत चालणे साठी महापालिकेवरील तब्बल 63 कोटी रूपये इतक्या कर्जाचा बोजा पडला आहे. सदर कर्जाचा हप्ता व व्याजापोटी प्रतीवर्षी 1 कोटी रूपये या प्रमाणे महापालिकेचे दायित्व वाढल्याने महापालिकेच्या एकुण उत्पन्नातील मोठा हिस्सा विकास कामांऐवजी कर्ज परतफेड व व्याज भरणा या अनुत्पादक बांबीवर खर्ची पडत आहे.

2012-13 पासुन प्रस्तावित केलेल्या वाढीची अंमलबजावणी झाली असती तर 2014-15 मध्ये 51,35,15,600/- इतकी भर पडली असती तथापि प्रत्यक्षात प्रस्तावित दरांची अंमलबजावणी झाली नाही व प्रचलीत दर किमान स्वरुपाचे असून सुध्दा त्यांची 100% वसुली न झाल्याने एकुण थकबकीचे प्रमाण वाढते ते पुढील प्रमाणे याबाबत खुलासा करावा. एप्रिल 2014 ते मार्च 2015 अखेर पाणीपुरवठया विभागातील एकुण थकबाकी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कराचा प्रकार | 2014-15 |
|---|---|---|
| 1 | पाणी पुरवठा लाभ कर | 41730188 |
| 2 | मलप्रवाह कर | 23887925 |
| 3 | पाणीपट्टी | 388456091 |
| | एकुण | 454074204 |

**संदर्भ:- (उल्हासनगर महानगरपालिका करविषयक आज्ञावली)**

थकबाकाची रक्कम पाहता पाणीपुरवठा विभागाकडून वसुलीकडे पुर्णत: दुर्लक्ष झाले आहे.

6) अनधिकृत नळ जोडण्या शोधून त्या खंडीत करणे किंवा धारणातुरूप अधिकृत करणे याबाबत कोणती कार्यवाही केले जाते याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

7) उल्हासनगर महानगरपालिकेने पाणी पुरवठा विभागाच्या उत्पन्नात वाढ करण्याबाबत कोणत्याही उपाययोजना केलेल्या नाहीत. पाणी पुरवठा आस्थापना तसेच देखाभाल दुरूस्तीचा खर्च योजनबध्द पध्दतीने कमी करण्याकरीता कोणत्याही विशेष उपाययोजनांची अंमलबजावणी होत नाही परिणामी उत्पन्न व खर्च यामध्ये मोठी तफावत आहे.

| अ.क्र. | वर्ष | एकुण उत्पन्न | एकुण खर्च | तुट |
|---|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | 41,84,62,000/- | 61,17,35,000/- | 19,32,73,000/- |

वरील तुट भरुन काढण्यासाठी अनुदान व कर्ज उभारणी करण्यात आली त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | निधीचे मार्ग | 2014-15 |
|---|---|---|
| 1 | अनुदान (J.N.NR.U.M) | 2,77,44,000/- |
| 2 | कर्ज (M.J.P.) | 74,01,00,000/- |
| 3 | कर्ज (M.M.R.D.A) | 46,50,00,000/- |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून उल्हासनगर महानगरपालिकेने 1979, 1998,1999, या वर्षी दिर्घमुदती कर्ज उभारले तसेच M.M.R.D.A. कडून 2011 रोजी दिर्घमुदती कर्ज उभारले तथापी कर्ज/व्याज व शास्ती अशी एकुण थकीत रक्कम वरील प्रमाणे आहे. थकीत कर्जाच्या परतफेडीसाठी महानगरपालिका स्तरावरुन कोणतेही उपाय योजल्याचे लेखापरिक्षणास अढळून आले नाही.

8) शहरातील विविध प्रवर्गाना उदा. घरगुती/बिगर घरगुती, संस्था, व्यापारी व औदयोगिक घटक यांना करण्यात येणारा पाणी पुरवठा यांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी ग्राहक सर्वेक्षण करणे आवश्यक असते त्यानुसार पाणी पुरवठयाचे प्रमाण व पाणी निर्मिती खर्चाची परिगणना करणे व त्यानुसार पाण्याचे दर काढणे आवश्यक असते तथापि प्रत्यक्षात उल्हासनगर मध्ये पाणी पुरवठा विभागा मार्फत असे ग्राहक सर्वेक्षण झालेले नाही याबाबत खुलासा सादर केलेला नाही.

एकंदरीत पाणीपुरवठा योजना तोटयात असण्याचे मुख्य कारण पाणीपट्टीचे दर पर्याप्त नाहीत व वसुलीचे प्रमाणही अत्यल्प आहे. परिणामी पाणी पुरवठा प्रणालीचे संचलन देखभाल दुरूस्ती यामुळे खर्च अधिक असल्याने निर्माण होणारी तुट भरुन कारण्यासाठी महापालिकेच्या उत्पन्नाचा मोठा भाग यावर खर्च झाला आहे परिणामी इतर विकासकामे हाती

घेता आलेली नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 451 नुसार महापालिकेने कराची प्रस्तावित केलेली दरवाढ रद्द करण्याच्या ठरावाबाबत ते म.न.पा च्या आर्थिक हिताच्या व व्यापक लोकहीताच्या विरूध्द असल्याने राज्य शासनाकडे सदर ठराव निलंबीत करण्यासाठी प्रस्तावित करणे आवश्यक असताना अटी कार्यवाही करण्यात आली नाही परिणामी महापालिकेन कलम 63 नुसार दिलेली कामे अपु-या अनुदानामुळे करता आली नाहीत.

DATAPJF8101 (Ref No : 110, Hmm No : 51)

## *49 उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विषयक योजनांची साध्यता/यशस्वीता पडताळणीसाठी आवश्यक दस्तऐवज व आकडेवारी उपलब्ध करूण देणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :06 मनपा केंद्र राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 19360000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 19360000.00/-

***पाणी पुरवठा योजनांची साध्यता तपासणीसाठी आवश्यक दस्तऐवजाची अनुपलब्धता एकाच योजनेवर प्रत्यक्ष सर्व रक्कम रक्कम खर्ची पडूनही योजना आजतागायत पूर्ण नसलेबाबत.***

राष्ट्रीय लेखा संहीता 2004 मधील नियम क्र. 9.2 नुसार महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक व खाजगी उपयोगासाठी आवश्यक असणारा पुरेसा पाणीपुरवठा योग्य व वाजवी दरात उपलब्ध करुन देणे तसेच त्यासाठीचे व्यवस्थापन देखभाल व गरजेनुसार नवीन कामे हाती घेणे हे महानगरपालिकांना कायदेशीररित्या बंधनकारक आहे.

वरील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात 2013-2014 या वर्षात पाणीपुरवठा विषयक कोणत्या योजना राबविण्यात आल्या याबाबत खालील मुददयांच्या आधारे तपशील सादर करावा.

1) एकुण नवीन जलवाहीनीची संख्या, लांबी व व्यास व त्यावरील एकुण खर्च

2) एकुण नवीन व जुने जलकुंभ व त्यावरील एकुण खर्च.

3) टँकर द्वारे पाणीपुरवठ्या वरील एकुण खर्च.

4) एकुण नळ जोडणींची संख्या.

5) नवीन व जुन्या मीटरची एकुण संख्या.

6) केद्रपुरस्कृत J.N.N.U.R.M.(Water Supply) योजनेअंतर्गत मे. कोणार्क इंन्फ्रास्ट्रक्चर यांना योजना सुरू झाल्या पासून मार्च 2015 अखेर झालेले एकुण प्रदान.

7) महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळ (M.I.D.C.) यांना देय असलेली एकुण थकीत रक्कम.

उपरोक्त विषयाबाबत अर्धसमास पत्र क्र.30 दिनांक11/07/2016 नुसार खुलासा मागविण्यात आला होता तथापि तो अप्राप्त

असल्याने लेखापरीक्षणात आढळून आलेल्या पुढील अनियमितता नोंदविण्यात येत आहेत.

1) जलवाहिन्यांच्या विस्ताराचा विकासात्मक आढावा घेता आली नाही तसेच त्याबाबतच्या निविदा नस्ती, मोजमाप पुस्तिका, पत्रव्यवहार टिप्पण्या उपलब्ध करुन न दिल्याने सदर बाबतचे लेखा परीक्षण करता आले नाही. म्हणून सदर उद्देशावर अंदाजपत्रकात नमुद केल्यानुसार 2014-2015मध्ये झालेला 19.36 कोटी रु. खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | खर्च |
|---|---|---|
| 1 | पांवर पंप व पा.पु.साहित्य खरेदी व बसविणे (नविन) | 11319000 |
| 2 | पांवर पंप व पा.पु.साहित्य खरेदी व बसविणे (दुर्बल घटक) | 8200000 |
| 3 | बुस्टर पंप मशिनरी खरेदी (नविन) | 452000 |
| 4 | कुपनलीका व जेटपंप बसविणे | 2389000 |
| 5 | पाणी पुरवठा व इमारती दुरूस्ती | 877000 |
| 6 | अमृत योजनानवर विकास कार्य | 19360000 |

वरील आकडेवरील निविदा योजनांवर प्रत्यक्ष खर्च झाल्याचे दिसते तथापी अर्धसमास पत्रात विचारणा केल्याप्रमाणे योजनेचे फलीत/ साध्य याबाबतचा खुलासा करण्यात आला नाही. तसेच 2014-2015 मध्ये सर्वाधिक खर्च अमृतयोजना अंतर्गत विकास कार्य या योजनेवर करण्यात आला तथापी अदयापही सदर योजनेअंतर्गत पाणीपुरवठा यंत्रणा कार्यान्वित झालेली नाही म्हणून पाणी पुरवठा योजनेवर 2014-2015 मध्ये खर्च झालेली रक्कम रु.19.36 कोटी रूपये रक्कम आक्षेपधीन ठेवण्यात येत आहे.

DATAPJF8101 (Ref No : 112, Hmm No : 30)

## *50 उल्हासनगर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विषयक पडताळणीसाठी आवश्यक दस्तऐवज व आकडेवारी उपलब्ध करुन न दिलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***राष्ट्रीय लेखा संहिता 2004 मधील नियम क्रं.9.3 नुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक व खाजगी उपयोगासाठी आवश्यक असणारा पुरेसा पाणीपुरवठा योग्य व वाजवी दरात उपलब्ध करुन देणे तसेच त्यासाठीचे व्यवस्थापन देखभाल व गरजेनुसार नवीन काम हाती घेणे इत्यादी हे महानगरपालिकांना कायदेशीररित्या बंधनकारक असतांना वरील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सन 2013-14 2014-15 या वित्तीय वर्षात पाणीपुरवठा विषयक कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन न दिलेबाबत.***

राष्ट्रीय लेखा संहिता 2004 मधील नियम क्रं.9.3 नुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक व खाजगी उपयोगासाठी आवश्यक असणारा पुरेसा पाणीपुरवठा योग्य व वाजवी दरात उपलब्ध करून देणे तसेच त्यासाठीचे व्यवस्थापन देखभाल व गरजेनुसार नवीन काम हाती घेणे इत्यादी हे महानगरपालिकांना कायदेशीररित्या बंधनकारक आहे.वरील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सन 2013-14 व 2014-15 या वित्तीय वर्षात पाणीपुरवठा विषयक खालील कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यास अर्ध समास क्र.37 दिनाक 18/07/2016 अन्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत.

1. सन 2013-14 या वर्षात 136 नवीन नळकनेक्शन नस्ती
2. सन 2014-15 या वर्षात 137 नवीन नळकनेक्शन नस्ती
3. नवीन व जुन्या मिटरची एकूण संख्या
4. पावती पुस्तक क्रं. 1709 ते 1713,145,157,157(MAC-2)
5. महानगरपालिका अंतर्गत पाणीपुरवठा कनेक्शनची संख्या
6. महानगरपालिकेत सध्या कार्यरत असलेल्या नळजोडणीकारांचे नांव व परवाना क्रं. इत्यादी
7. नळजोडणीकारांच्या परवान्यांचे नुतनीकरणाची माहिती

DATPPTM5902 (Ref No : 115, Hmm No : 37)

### *51 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) पाणी पुरवठा वितरण कामाच्या 29 व्या धावत्या देयकात एकूण मागील प्रदानाची चढती बेरीज कमी दर्शवून प्रत्यक्ष केलेल्या कामात रु.20,19,297 चे जादा प्रदान केले बाबत तसेच 29 व्या धावत्या देयकात सब वर्क क्र.12 मधील बाब क्र.2 व 3 मधील रु.49,08,318 चे यापूर्वी केलेले प्रदान कमी करणेचे कार्यकारी अभियंता यांनी नमूद केले असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :JNNURM केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6227615.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4908318.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2019297.00/-

| ***मागील प्रदानाची चढती बेरीज रु.20,19,297 कमी दर्शवून प्रत्यक्ष केलेल्या कामात रु.20,19,297 वाढवून*** |
|---|

***ठेकेदारास जादा प्रदान करणे, 29 व्या धावत्या देयकात सब वर्क क्र.12 मधील बाब क्र. 2 व 3 मधील रु.49,08,318 चे यापूर्वी केलेले प्रदान कमी करणेचे कार्यकारी अभियंता यांनी नमूद केले असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करणे.***

1) उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) या केंद्र व राज्य शासन अर्थसहाय योजनेतुन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे काम हाती घेतले आहे. याबाबत महापालिकेच्या लेखा विभागाकडून योजनेच्या खर्चाची वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मधील लेखापरीक्षणात तपासणीस सादर केलेल्या प्रमाणकांची पडताळणी करता कामाच्या 29 व्या धावत्या देयकाचे एकूण रु.5,41,38,120 पैकी रु.2,06,56,944 चे पार्ट प्रदान प्र.क्र.4669 दि.19.03.2015 नुसार व उर्वरित रु.3,34,81,176 चे प्रदान पुढील वित्तीय वर्षात प्र.क 69 दि.08.04.2015 व प्र.क्र. 50 दि.04.04.2015 नुसार ठेकेदार मे.कोणार्क इन्फ्रा.यांना करणेत आले आहे. सदर प्रमाणक क्र. 4669 दि.19.03.2015 ची तपासणी करता केलेल्या कामानुसार व दरफरक बिल क्र.28 अशी एकूण कामाची किमत रु.5,21,18,823 येत असताना त्यामध्ये रु. 20,19,297 अधिक करून देयकाची एकूण रक्कम रु.5,41,38,120 नमूद करून त्याप्रमाणे ठेकेदारास प्रदान केले आहे. कामाच्या एकूण रक्कमेत रु.20,19,297 ची वाढ करताना 28 व्या धावत्या देयकाखेर कामाचे एकूण प्रदान प्रत्यक्षात रु.233,59,65,107 झालेले असताना ते रु.233,33,09,309 म्हणजेच रु.26,55,798 कमी दर्शविण्यात आले आहे. याबाबत लेखापरीक्षण वित्तीय वर्षात 2013-14 ते 2014-15 या कालावधीत प्रदान 21 वे 28 व्या धावत्या देयकांची प्रदान रक्कमांची एकूण बेरीज व त्यात 20 व्या देयका अखेर प्रदान देयकांची एकूण रक्कम मिळविता बेरीज रु.233,59,65,107 येत असताना ती रु.26,55,798 कमी दर्शविण्यात आल्याबाबत कोणताही तपशील प्रमाणकासोबत नाही. तसेच कामाच्या मोजमाप पुस्तिका, अंदाजपत्रक, दरपृथ:करणे, कार्यादेश, निविदा अटी/शर्ती, करारनामे, ठराव इ.अभिलेख तपासणीस उपलब्ध केलेले नाही. सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.91 दि.14/09/2016 नुसार विभागास खुलासा तसेच पूर्तता दर्शविणेस सूचित करणेत आले होते. तथापि विभागाने कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नाही.त्यामुळे जादा प्रदान रक्कम रु.20,19,297 सबंधीताकडून व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे.

2)उपरोक्त नमूद कामाच्या 29 व्या देयका सोबतच्या एक्झूकेशन अकौंट मध्ये सब वर्क क्र.12 च्या शिफ्टिंग ऑफ युटिलीटी सर्व्हिस कमिंग इन द अलाइनमेंट ऑफ पाईपलाईन या कामाच्या बाब क्र.2 व 3 नुसार यापूर्वी केलेल्या एकूण रु.37,17,296.20 च्या कामाच्या नोंदीवर कार्यकारी अभियंता यांनी पेनने मार्क करून नॉट टू बी पेड असा शेरा मारून स्वाक्षरी केल्याचे दिसून येते.याबाबत सदर बाबींनुसार केलेल्या कामाचे प्रदान 14 व्या, 15 व्या व 16 व्या धावत्या देयकानुसार दि.13.04.2012 ते दि.11. 06.2012 दरम्यान करणेत आल्याचे दिसते. तथापि अशा यापूर्वी केलेल्या कामाची रु.49,08,318 (32.04% जादा मंजूर दरानुसार) रक्कम 29 व्या देयकातून अथवा पुढील 30 व्या देयकातून कपात केल्याचे दिसून येत नाही. कार्यकारी अभियंता यांनी नॉट टू बी पेड असा शेरा का नमूद केला या बाबत देयकात काहीही नमूद केले नाही.तसेच कामाच्या मोजमाप पुस्तिका तपासणीस उपलब्ध न झाल्याने याबाबतची कारणे काय हे पडताळता आले नाही. सन 2012 मध्ये केलेल्या कामाच्या प्रदानाचे 2015 मध्ये नॉट टू बी पेड असा शेरा मारून कार्यकारी अभियंता यांना काय

अपेक्षित आहे हे समजू शकले नाही.वास्तविक पाणीपुरवठा विभागामार्फतच देयक तयार करून व मंजूर करून लेखा शाखेत प्रदानासाठी पाठविणेत येत असताना त्यांनी सदर बाबींचे केलेल्या प्रदानाची रक्कम कमी करून देयक सादर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.91 दि.14/ 09/2016 नुसार विभागास खुलासा तसेच पूर्तता दर्शविणेस सूचित करणेत आले होते. तथापि विभागाने कोणताही खुलासा अथवा पूर्तता दर्शविली नाही. त्यामुळे केलेला खर्च रु.49,08,318 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.20,19,297

आक्षेपाधीन रक्कम रु. 49,08,318

DATBEPM6101 (Ref No : 8, Hmm No : 91)

## *52 जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियांनार्गत पाणी पुरवठा वितरण योजना निविदा प्रक्रीया व 2014-2015 मधील खर्च विषयक अंमलबजावणीतील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :16 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 238350820.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 238350820.00/-

***विकास आराखडयानुसारचे प्रकल्प मुल्यापेक्षा देकार मुल्य 32.04% वा अधिक असणे, प्रकल्प मुल्यातील वाढीचा खुलासा सादर न करणे, देकार अर्हता अटी लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणे, त्रयस्त संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करून न घेणे, कार्यादेशातील विहित मुदतीत याजना पूर्ण न होणे, योजनेतील hydraulic testing न करणे, नविन जतमापके बसविले बाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध नसणे, समान उद्दिष्टासाठी खर्चाची पुनरावृत्ती होणे.***

जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानांर्गत पाणी पुरवठा वितरण योजनेचा तपशिल पुढील प्रमाणे.

1) प्रत्यक्ष प्रकल्प खर्च:- 127.65 कोटी
2) केंद्र हिस्सा 35 टक्के:- 44.68 कोटी
3) राज्य हिस्सा 15 टक्के:- 19.14 कोटी
4) मनपा हिस्सा 50 टक्के:- 63.83 कोटी
5) प्रथम सुधारीत मुल्य:- 160.02 कोटी
6) व्दितीय सुधारीत मुल्य:- 265 कोटी
7) प्रकल्प मान्यता स्थायी समिती:- ठराव क्र. 112 दिनांक 07/12/2009
8) कार्यादेश:- 21/12/2009

9) काम पूर्ण होणेची मुदत:- 24 महिने

10) काम पूर्ण होणेची अपेक्षित दिनांक:- 21/12/2011

11) मुख्य उदिष्ट:- 270 कि.मी लांबीच्या नवीन जलवाहिन्या टाकणे

सदर योजनेबाबत 2014-15 मध्ये पुढील प्रमाणकांचे लेखा परीक्षण करण्यात आले

| **अ.क्र.** | **प्रमाणक क्र.** | **रक्कम** |
|---|---|---|
| 1 | 488 | -/2,50,17,000 |
| 2 | 2144 | -/78,97,390 |
| 3 | 2145 | -/6,73,97,828 |
| 4 | 2229 | -/19,68,912 |
| 5 | 2429 | -/40,48,130 |
| 6 | 4669 | -/4,14,17,602 |
| 7 | 4669 | -/1,92,10,958 |
| **एकुण** | | **16,69,57,820/-** |

उपरोक्त विषयाबाबत अर्धसमास पत्र क्र.105 दिनांक14/10/2016 नुसार खुलासा मागविण्यात आला होता तथापि तो अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात आढळून आलेल्या पुढील अनियमितता नोंदवविण्यात येत आहेत.

1) महानगरपालिका, केंद्र शासन व राज्य शासन यांच्यात झालेल्या त्रिपक्षीय करारात दिनांक 29/12/2008 रोजी या योजनेचा विकास आराखडा अहवाल (DPR) नुसार 127.65 कोटी रुपये या प्रकल्प मुल्यास मान्यता दिली तथापी स्थायी समिती ठराव क्र. 112 दिनांक 07/12/2009 नुसार सदर देकार 32.04 टक्के जादा दराने म्हणजे 160.02 कोटी रूपये या दराने मंजुर केला. प्रत्यक्ष देकार मुल्य हे प्रकल्प मुल्या पेक्षा 32.04 टक्के अधिक आहे सदर तफावत कशामुळे निर्माण झाले याबाबतचा खुलासा सादर करावा.

2) सदर प्रकल्पाचे सुधारित मुल्य 265. कोटी रूपये इतके निश्चीत करण्यात आले सदरची वाढ ही DPR मधील प्रकल्प मुल्यापेक्षा 108.66 टक्के अधिक आहे. प्रकल्प मुल्याची सदर वाढ का निर्माण झाली याबाबत खुलासा सादर करा.

3) दिनांक 27/02/2009 रोजी पहिल्यांदा दिनांक 17/05/2009 रोजी दुस-यादा दिनांक 12/08/2009 रोजी तीसरांदया अशा एकुण तीन वेळा निविदा मगविण्यात आल्या पहिल्यावेळी DPR मुल्याच्या 59.70 टक्के आधिक दराने देकार प्राप्त झाला दुस-यादा 37 टक्के जादा दराने देकार प्राप्त झाला तीस-यांदा 35.73 टक्के जादा दराने देकार प्राप्त झाला वाटाघाटी आंती ते 32.04 टक्के जादा दराने मे. कोर्णाक इन्फ्रास्टक्चर प्रा. ली. यांची न्युनतम निविदा मान्य करण्यात आली

सदर निविदा प्रक्रीयेत प्रथम व्दितीय त्रितीय निविदेतील देकार अर्हता अटी मध्ये कोणते बदल करण्यात आले कोणत्या अटी व शर्ती रदद करण्यात किंवा शिथील करण्यात आल्या किंवा नव्याने समावेशीत करण्यात आला याबाबतची खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही. त्यामुळे निविदाप्रक्रीयेची पाददर्शकता तपासता आले नाही तरी तीनही निविदा प्रक्रियेतील अटी व शर्ती लेखा परीक्षणास तात्काळ सादर करावे.

4) पाणी पुरवठा वितरण प्रकल्प अंतर्गत जलवाहीन्या व वितरणवाहीन्या या विहीत केलेल्या आरखडया नुसार व विहीत तांत्रिक निकषानुसार पुर्ण करण्यात आल्या आहेत याबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय दिनांक 02/03/2009 नुसार 1 कोटी रूपये पेक्षा अधिक प्रकल्प मुल्य असलेल्या प्रकल्पांचे / विकास कामांचे तांत्रिक लेखा परीक्षण त्रयस्थ संस्थेकडून ( Third Party Technical Audit) करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि या प्रकल्पाबाबत असे तांत्रिक लेखा परीक्षण झालेले नाही याबाबत खुलासा सादर करावा.

5) दिनांक 21/12/2009 च्या कार्यादेशा नुसार प्रकल्प पुर्ण होण्याचा कालावधीची मुदत 24 महिने इतकी निश्चीत करण्यात आली होती तथापी तो आज आखेर अपूर्ण आहे सदर योजनेवर 2013-14 व 2014-15 अखेर 74,98,42,745/- (21वे धावते देयक - 29वे धावते देयक) इतकी रक्कम खर्ची पडली तथापि सदर योजना अपूर्ण आहे याबाबत खुलासा सादर करावा.

6) निविदेतील अटी नुसार प्रकल्पाची उंच सखलबागात पाण्याचे वितरण योग्य प्रमाणात होते तसेच कोठेही पाणी गळती होत नाही याबाबत कंत्रातदारास hydraulic testing करण्या बाबत सांगितले आहे तथापि सदर तपासणीचे अहवाल

लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत .

7) निविदेतील अटी नुसार नवीन वितरण व्यवस्थे वर व त्या अंतर्गत येणार सर्व नळ जोडण्यांवर जलमालपके बसविणे बाबत सुचित केले आहे तथापि एकुण किती नवीन जलमापके बसविली याबाबतची आकडेवारी लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

8) सदर पाणी पुरवठा वितरण योजना विहीत मुदतीत पुर्ण न झाल्याने योजनेअंतर्गत येणारी उद्दशिष्टे पूर्ण करण्यासाठी प्रकल्प खर्चाव्यतिरक्त वर्ष 2014-15 मध्ये पुढील बाबींवर खर्च करणे भाग पडले आहे.

| अं.क्र. | बाब | रक्कम |
|---|---|---|
| 1 | टॅंकर भाडे | 15142000 |
| 2 | बुस्टर पंप | 32969000 |
| 3 | पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे | 10550000 |
| 4 | कुपनलीका दुरूस्ती खर्च | 2732000 |
| 5 | पाणी पुरवठा निगराणी व दुरूस्ती खर्च | 10000000 |
| | | 71393000 |

वरील आकडेवारी वरून पाणी पुरवठा वितरण प्रकल्प विहीत मुदतीत पुर्ण न झाल्याने महानगरपालिकेस रक्कम 71.39 कोटी रूपये इतका आधिक खर्च करावा लागला आहे. योजना अपूर्ण असल्याने पाणी पुरवठया वरील खर्चाची पुनरावृत्ती झाली आहे याबाबत खुलासा सादर करावा.

DATAPJF8101 (Ref No : 111, Hmm No : 105)

## *53 स्थानिक संस्था कराच्या म.न.पा.कडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रात (ई- 2) स्थानिक संस्था कराची कमी आकारणी केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1395184.00/-

***स्थानिक संस्था कर हा आयात मालाच्या खरेदीच्या किमतीवर आकारणेचा असताना असल्याने कमी किंमतीवर आकारणी केल्याने रु.4,14,065 कराची कमी आकारणी होणे,दोन वार्षिक विवरणावर केलेल्या सह्या वेगळ्या असणे व मागील वर्षात रु.9,88,150 कराचा भरणा केलेला असताना पुढील वर्षात निरंक कर भरणा दर्शविणे, रबर केमिकल वर मंजूर दरसूचीनुसार 4% कराची आकारणी करणे आवश्यक असताना 2% दराने केल्याने रु.78,270 ची कराची कमी आकारणी दर्शविणे, स्थानिक खरेदी बाबत बिले, खरेदी नोंदवही, खरेदी केलेल्या संस्थेचा नोंदणी क्र. सोबत जोडलेले नसल्याने दोन प्रकरणात स्थानिक खरेदीवरील 2% दराने रु.54,849 ची कराची कमी आकारणी होणे, आयात मालाच्या रु. 4,53,46,500 किंमतीवर वर 2% मंजूर दराने***

***रु.9,06,930 आकारणी नमूद करणे आवश्यक असताना रु.29,46,500 वर 2% कराची आकारणी केल्याने रु.8,48,000 कमी आकारणी होणे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये तपासणीस सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांची तपासणी करता खालील तपशीलात नमूद नोंदणीकृत व्यापारी संस्थांनी महानगरपालिकेकडे सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रात स्थानिक संस्था कराची कमी आकारणी केली असल्याने रक्कम रु.13,40,335 चा कर महानगरपालिकेस प्राप्त झाला नाही.सदर कमी आकारणी बाबत अर्धसमास पत्र क्र.145 दि.29.11.2016 निर्गमित करण्यात आले होते.तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1)मे.राजेश टेक्सटाइल, नोंदणी क्र.09/अनिवासी/262 यांनी त्यांचे 2013-14 चे वार्षिक विवरणात आयात डेनिम कपडा मालाची किंमत रु.7,01,10,757 नमूद केली आहे. तथापि आकारणी करताना 470548 मीटर कपड्याचे रु.2.10 प्रती.मि ने रु.9,88,150 कराची आकारणी करून त्यानुसार भरणा केला आहे. वास्तविक स्थानिक संस्था कर हा आयात मालाच्या खरेदीच्या किमतीवर असल्याने रु.7,01,10,757 मालाच्या किमतीवर मंजूर 2% दरानुसार रु.14,02,215 कराची आकारणी होणे आवश्यक असताना ती रु.9,88,150 केल्याने रु.4,14,065 कराची कमी आकारणी झाली आहे. सदर कमी आकारणीची रक्कम त्यांचे कडून व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे.

2)मे.राजेश टेक्सटाइल, नोंदणी क्र.09/अनिवासी/262 यांनी त्यांचे 2014-15 चे वार्षिक विवरणात निरंक कर आकारणी नमूद केली आहे. तथापि सदर विवरणावर केलेली सही 2013-14 च्या विवरणावरील सहीपेक्षा वेगळी वाटते. त्यांनी 13-14 च्या विवरणात रु.9,88,150 ची आकारणी करून भरणा केला असताना पुढील वर्षात निरंक विवरण सादर करणे सयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे त्यांचे 2014-15 चे वार्षिक विवरणाची सखोल तपासणी करून स्थानिक संस्था कराची व्याजासह वसुली करणे आवश्यक आहे.

3) मे.कृष्णा रबर नोंदणी क्र.4/276 यांनी त्यांचे 2013-14 च्या वार्षिक विवरणात रबर प्रोडकट व रब्बर केमिकल च्या रु.51,20,139 किंमतीवर 2% दराने रु.1,26,536 स्थानिक संस्था कराची आकारणी करून त्याप्रमाणे भरणा केल्याचे उपलब्ध नस्तीसोबतच्या चलनांच्या प्रतीवरून दिसून येते. तथापि रबर केमिकल वर मंजूर दरसूचीनुसार 4% कराची आकारणी करणे आवश्यक असताना 2% दराने केल्याने रु.78,270 ची कराची कमी आकारणी झाली आहे. त्यामुळे सदर कमी आकारणीची रक्कम त्यांचे कडून व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे.

4)मे.कृष्णा रबर नोंदणी क्र.4/276 यांनी त्यांचे 2013-14 व 2014-15 च्या वार्षिक विवरणात स्थानिक खरेदी अनु.रु.4,95,577 व रु.4,81,953 नमूद करून एकूण खरेदीतून कमी करून स्थानिक संस्था कर आकारणी केली आहे. तथापि स्थानिक खरेदी बाबत बिले,खरेदी नोंदवही, खरेदी केलेल्या संस्थेचा नोंदणी क्र. सोबत नाही. त्यामुळे सदर स्थानिक खरेदीवरील 2% दराने रु.19,551 ची त्यांचेकडून वसुली होणे आवश्यक आहे.

5)मे.लकी होजियारी वर्क्स नोंदणी क्र.5/582 यांनी त्यांचे 2013-14 च्या वार्षिक विवरणात आयात माल रु.4,71,14,400 दर्शवून स्थानिक खरेदी रु. 17,67,900 वजा करून रु. 4,53,46,500 वर 2% मंजूर दराने रु.9,06,930 आकारणी नमूद करणे आवश्यक असताना रु.29,46,500 वर 2% कराची आकारणी केल्याने रु.8,48,000 कमी आकारणी झाली आहे. त्यामुळे कमी आकारणीची रक्कम त्यांचेकडून सव्याज वसूल होणे आवश्यक आहे.

6) मे. लकी होजियारी वर्क्स नोंदणी क्र. 5/582 यांनी त्यांचे 2013-14 च्या वार्षिक विवरणात रु. 17,67,900 स्थानिक खरेदी एकूण खरेदीतून कमी करून स्थानिक संस्था कराची आकारणी केली आहे. तथापि स्थानिक खरेदी बाबत बिले, खरेदी नोंदवही, खरेदी केलेल्या संस्थेचा नोंदणी क्र. सोबत नाही. त्यामुळे स्थानिक खरेदीवरील 2% दराने रु.35,298 ची त्यांचेकडून वसुली होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपानुसार रक्कम रु.13,95,184 लेखापरीक्षणात वसूलपात्र ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.13,95,184.

DATBEPM6101 (Ref No : 20, Hmm No : 145)

## ***54 स्थानिक संस्था कराच्या म.न.पा.कडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रात (ई-2) नमूद भरलेल्या कराची नस्तीसोबत जोडलेली भरणा चलने कमी रक्कमेची असणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1484469.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 25000.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 नियम 29(2) नुसार व्यापाऱ्याने नमुना ई-2 मध्ये वार्षिक विवरण दाखल करून त्यासोबत बँक चलने जोडणे आवश्यक असताना वार्षिक विवरणात नमूद कर भरणा रक्कमेची संपूर्ण बँक चलने न जोडता रक्कम रु.14,84,469 ची कमी चलने जोडल्याने अशी कराची रक्कम महानगरपालिकेच्या खाती जमा झाल्याची पडताळणी करता न येणे, वित्तीय वर्ष 2014-15 मधील वार्षिक विवरणासोबत विक्री व खरेदीच्या नोंदी,खाते वही, ताळेबंद, नफा तोटा पत्रक,स्थानिक खरेदी बिले व त्यांचे एल.बी.टी.क्रमांक,खरेदीची बिले ई. नसताना तसेच काही प्रकरणी वार्षिक विवरणे सादर केली नसताना नियमाप्रमाणे नोटीस न दिल्याने स्थानिक संस्था कर नियम 2010 चे नियम 48(6) अन्वये रु. 5000/- मात्र पेक्षा अधिक नसेल एवढी रक्कमेची एकूण रु. 25,000 शास्ती लावता न येणे व अशा प्रकरणातील स्थानिक***

***संस्था कर सुद्धा महापालिकेस प्राप्त न होणे, वार्षिक विवरणे सादर केलेल्या व्यापारी संस्थांनी त्यांचे विवरणासोबत विक्री व खरेदीच्या नोंदी, खाते वही,ताळेबंद, नफा तोटा पत्रक स्थानिक खरेदी बिले व त्यांचे एल.बी.टी.क्रमांक, खरेदीची बिले ई. कागदपत्रे जोडली नसताना विभागाने सदरची कागदपत्रे प्राप्त करणेसाठी कोणतीही कार्यवाही न करणे, विभागाकडील मूळ चलने व भरणा करण्यात आलेल्या बँकेचा बँक स्क्रोल तसेच संस्थाचे भरण्याबाबचे लेजर अर्धसमास पत्राद्वारे मागणी करूनही तपासणीस उपलब्ध न केल्याने सदर भरणा चलनांच्या प्रतीद्वारे भरणा केलेली रक्कम महानगरपालिका खाती जमा झाल्याची पडताळणी करता न येणे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये तपासणीस सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांची तपासणी करता खालील तपशीलात नमूद नोंदणीकृत व्यापारी संस्थांनी महानगरपालिकेकडे सादर केलेल्या त्यांचे वार्षिक विवरणपत्रात नमूद भरलेल्या कराच्या रक्कमेपेक्षा नस्तीसोबत जोडलेली भरणा चलने कमी रक्कमेची आढळून येत आहेत.

| अ.क्र. | नोंदणी क्र. | नाव | वित्तीय वर्ष | विवरणात नमूद कर रु. | नस्तीसोबतची भरणा चलने रु. | कमी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | यु-1/271 | मे.उमेश किरणा | 14-15 | 6000 | 5000 | 1000 |
| 2 | यु-1/254 | मे.जे.बी.फरसाण | 13-14 | 18700 | 16700 | 2000 |
| 3 | यु-1/242 | मे.हिरंब टी | 13-14 | 75844 | 73300 | 2544 |
| 4 | यु-8/182 | मे.मनीष थ्रेड | 14-15 | 59369 | 50695 | 8664 |
| 5 | यु-2/364 | मे.जितेंद्र कोर्पो. | 14-15 | 11493605 | 10478578 | 1015027 |
| 6 | यु-9/अ.नि./59 | मे.रजत टेक्स्ट. | 13-14 | 3575746 | 3402146 | 173600 |
| 7 | यु-9/अ.नि./57 | मे.प्रथमेश | 13-14 | 709212 | 546725 | 162487 |
| 8 | यु-9/अ.नि./58 | मे.वर्धमान टेक्स्ट. | 14-15 | 4550610 | 4543110 | 7500 |
| 9 | यु-9/अ.नि./71 | मे.युरेका फोर्ब्स | 13-14 | 140303 | 134564 | 5740 |
| 10 | यु-9/अ.नि./73 | मे.प्रभात ट्रेड लिंक | 13-14 | 218636 | 210716 | 7920 |
| 11 | यु-4/295 | मे.रोषण कार्ड सेंटर | 13-14 | 251758 | 206272 | 45486 |
| 12 | यु- | मे.महादेव | 13-14 | 105208 | 75446 | 29762 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 4/290 | इंड. | | | | |
| 13 | यु-7/250 | मे.देवा इंड. | 13-14 | 19128 | 15700 | 3428 |
| 14 | यु-2/084 | मे.मेहरूल तोलाराम | 14-15 | 76584 | 57273 | 19311 |
| | | | | | एकूण रु. | 14,84,469 |

याबाबत आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.144 दि.29.11.2016 निर्गमित करण्यात आले होते.तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 नियम 29(2) नुसार व्यापाऱ्याने नमुना ई-2 मध्ये वार्षिक विवरण दाखल करून त्यासोबत बँक चलने जोडणे आवश्यक असताना वार्षिक विवरणात नमूद कर भरणा रक्कमेची संपूर्ण बँक चलने सोबत न जोडता वार्षिक विवरणे सादर केली आहेत. याबाबत सदरची बँक भरणा चलने तपासणीस उपलब्ध करून देणेबाबत विभागाकडे अर्धसमास पत्र क्र.107 दि.15/10/2016 व अर्धसमास पत्र क्र.133 दि.25/10/2016 व पत्र क्र.139 दि. 11/11/ 2016 नुसार मागणी करूनही सदर चलने उपलब्ध करून देणेत आली नाहीत. त्यामुळे उपरोक्त नमूद व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणात नमूद केलेल्या कराचा भरणा रकमेपेक्षा कमी असलेल्या चलनांची रक्कम रु.14,84,469 महानगरपालिकेच्या खाती जमा झाल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे रक्कम रु.14,84,469 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर ) नियम 2010 नियम 33 (7) नुसार सहामाही/ वार्षिक विवरण सादर न केलेल्या किवा वार्षिक विवरणासोबत आवश्यक कागदपत्रे न जोडल्यास अथवा नोंदणीसाठी अर्ज केला नसल्यास नमुना एच मध्ये नोटीस देणे आवश्यक असताना 2014-15 मधील वार्षिक विवरणासोबत विक्री व खरेदीच्या नोंदी,खाते वही,ताळेबंद,नफा तोटा पत्रक,स्थानिक खरेदी बिले व त्यांचे एल.बी.टी.क्रमांक,खरेदीची बिले ई. नसताना तसेच वार्षिक विवरणे सादर केली नसताना नियमा प्रमाणे नोटीस दिल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.त्यामुळे नियमाप्रमाणे कार्यवाही न केल्याने स्थानिक संस्था कर नियम 2010 चे नियम 48(6) अन्वये व्यापारी किंवा व्यक्ती यांनी पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहीत कालावधीत भरण्यास कसूर केली असेल तर आयुक्तास असा व्यापारी किंवा व्यक्ती यांचेवर त्यांना त्यांचे म्हणने ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर रु.5000/- मात्र पेक्षा अधिक नसेल एवढी रक्कमेची शास्ती लावता आली नाही. उपरोक्त नमूद 14 प्रकरणापैकी अनु.2,3,7,10 व 11 वरील संस्थांनी 2014-15 चे वार्षिक विवरण सादर केले नसताना नियमाप्रमाणे कार्यवाही न केल्याने रु.25,000 शास्तीचा महसूल महानगरपालिकेस प्राप्त झाला तर नाहीच, शिवाय अशा प्रकरणातील स्थानिक संस्था कर सुद्धा महापालिकेस प्राप्त झाला नाही.त्यामुळे शास्तीची रक्कम सबंधीताकडून जबाबदारी निश्चित करून वसूल करावी व अशा सर्व प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही करून त्यांचेकडून स्थानिक संस्था कर वसूल केल्याची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

3) उपरोक्त 14 प्रकारापैकी वार्षिक विवरणे (इ-2) सादर केलेल्या व्यापारी संस्थांनी त्यांचे विवरणासोबत विक्री व खरेदीच्या नोंदी,खाते वही, ताळेबंद, नफा तोटा पत्रक, स्थानिक खरेदी बिले व त्यांचे एल.बी.टी. क्रमांक,खरेदीची बिले ई.कागदपत्रे जोडली नाहीत. विभागाने सदरची कागदपत्रे प्राप्त करणेसाठी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वार्षिक विवरण सादर केलेल्या व्यापारी संस्थांनी

भरलेला कर अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.
4) वार्षिक विवरणासोबत व्यापारी संस्थांनी भरणा चलनांच्या प्रती जोडल्या आहेत. तथापि विभागाकडील मूळ चलने व भरणा करण्यात आलेल्या बँकेचा बँक स्क्रोल तसेच संस्थाचे भरण्याबाबचे लेजर उपरोक्त नमूद अर्धसमास पत्राद्वारे मागणी करूनही तपासणीस उपलब्ध न केल्याने भरणा चलनांच्या प्रतीद्वारे भरणा केलेली रक्कम महानगरपालिका खाती जमा झाल्याची पडताळणी करता आली नाही.
उपरोक्त आक्षेपानुसार रक्कम रु.25,000 लेखापरीक्षणात वसूलपात्र व रक्कम रु.14,84,469 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.25,000.
आक्षेपाधीन रक्कम रु.14,84,469.
DATBEPM6101 (Ref No : 21, Hmm No : 144)

## *55 स्थानिक संस्था कराच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेला स्थानिक खरेदी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2568962.00/-

***स्थानिक संस्था कराच्या 38 वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांच्या तपासणीत स्थानिक खरेदीच्या किंमतीवर मंजूर दराने रु.25,68,962 स्थानिक संस्था कर महापालिकेस भरल्याची पडताळणी त्यांनी ज्यांच्याकडून खरेदी केली त्यांची खरेदी बिले, नावे व स्थानिक संस्था नोंदणी क्र. ई. अभिलेख सोबत नसल्याने करता न येणे, लेखापरीक्षण वित्तीय वर्षात वार्षिक विवरणे भरलेल्या व त्यात स्थानिक खरेदी दर्शविलेल्या सर्व संस्थांची पडताळणी करून स्थानिक संस्था कर महापालिकेस भरल्याची खात्री न करणे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाने लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये तपासणीस सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांची तपासणी करता खालील तपशीलात नमूद नोंदणीकृत व्यापारी संस्थांनी महानगरपालिकेकडे सादर केलेल्या त्यांचे वार्षिक विवरणपत्रात नमूद नोंदणी स्थानिक खरेदीच्या रकमेबाबत ज्यांच्याकडून खरेदी केली त्यांची खरेदी बिले, नावे व स्थानिक संस्था नोंदणी क्र. याबाबतचा तपशील सोबत जोडला नाही. याबाबत आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.169 दि.13.12.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

| अ.क्र. | नोंदणी क्र. | नाव | वित्तीय वर्ष | विवरणानुसार स्थानिक खरेदी रु. | दर % | स्थानिक संस्था कर रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | यु-1/273 | मे.मौर्या पानमसाला | 13-14 | 1,58,478 | 4 | 6,339 |
| 2 | यु-1/271 | मे.उमेश किरण | 13-14 | 4,75,000 | 2 | 9,500 |
| 3 | यु-1/266 | मे.जसवंत ड्रिंक्स | 14-15 | 1,08,780 | 4 | 4,351 |
| 4 | यु-1/254 | मे.जे.बी.फरसाण | 13-14 | 32,51,654 | 2 | 65,033 |
| 5 | यु-1/252 | मे.कोहिनूर प्लास्टिक | 13-14 | 7,81,100 | 2 | 15,622 |
| 6 | यु-1/251 | मे.न्यूहिंदुस्तान प्लास्टिक | 13-14 | 2,43,685 | 2 | 4,874 |
| 7 | यु-5/1564 | मे.अब्दुल प्लास्टिक | 13-14 | 1,90,750 | 2 | 3815 |
| 8 | यु-5/1593 | मे.अरमान प्लास्टिक | 14-15 | 2,63,260 | 2 | 5,265 |
| 9 | यु-5/556 | मे.महालक्ष्मी कॉस्माटीक्स | 13-14-15 | 7,56,102 | 3 | 22,683 |
| 10 | यु-5/554 | मे.सतीश इंड. | 14-15 | 4,06,913 | 4 | 16,276 |
| 11 | यु-1/37 | मे.गजानन इंटर. | 13-14 | 14,04,558 | 2 | 28,091 |
| 12 | यु-1/243 | मे.प्रीतम ड्रेसेस. | 13-14 | 1,67,24,992 | 2 | 3,34,500 |
| 13 | यु-1/242 | मे.हिरंब टी.आहजा | 13-14 | 1,32,71,707 | 2 | 2,65,434 |
| 14 | यु-1/81 | मे.महेशप्लाय व हार्डवेअर | 13-14-15 | 61,99,294 | 4 | 2,47,972 |
| 15 | यु-1/97 | मे.प्रिन्स प्रोडक्ट | 13-14 | 2,25,375 | 3 | 6,761 |
| 16 | यु-5/563 | मे.पंकज फर्निचर | 13-14 | 1,57,450 | 2 | 3,149 |
| 17 | यु-5/566 | मे.आर.एस.पेट्रो. | 13-14-15 | 81,81,498 | 4 | 3,27,256 |
| 18 | यु-5/563 | मे.अंबिका क्रीएशन. | 13-14-15 | 15,90,275 | 2 | 31,805 |
| 19 | यु-5/571 | मे.महालक्ष्मी इंटर. | 14-15 | 9,85,350 | 2 | 19,707 |
| 20 | यु-5/572 | मे.शिवंम टेक्सटाइल. | 13-14-15 | 10,15,890 | 2 | 20,318 |
| 21 | यु-5/582 | मे.लकी होसियारी | 13-14 | 17,67,900 | 2 | 35,358 |
| 22 | यु-4/395 | मे.राज स्टील सेंटर. | 13-14-15 | 12,00.924 | 4 | 48,037 |
| 23 | यु-4/947 | मे. साई कार केअर. | 13-14-15 | 22,18,636 | 4 | 88,745 |
| 24 | यु-4/543 | मे.लिओ कॉसमेटीक्स. | 13-14-15 | 4,59,585 | 4 | 18,383 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 25 | यु-8/182 | मे.मनीष होसियारी. | 13-14-15 | 21,25,000 | 4 | 85,000 |
| 26 | यु-3/16 | मे.किशोर एनएक्स शूज | 13-14-15 | 17,60,034 | 2 | 35,201 |
| 27 | यु-3/14 | मे. किशोर शूज | 14-15 | 7,12,087 | 2 | 14,242 |
| 28 | यु-5/110 | मे.भारती केबालस | 14-15 | 76,12,392 | 4 | 3,04,496 |
| 29 | यु-3/1134 | मे. मोहन सेविंग मशीन | 13-14 | 2,95,895 | 4 | 11,836 |
| 30 | यु-3/47 | मे.सुनीलपेपर पकेजिग | 13-14-15 | 31,91,450 | 2 | 63,829 |
| 31 | यु-3/951 | मे. राजकमल डायिंग | 13-14-15 | 25,03,275 | 4 | 1,00,131 |
| 32 | यु-3/871 | मे. सोनू फुट वेअर | 13-14 | 4,72,750 | 2 | 9,455 |
| 33 | यु-3/974 | मे. हर्ष इंटर. | 13-14 | 6,11,659 | 4 | 24,466 |
| 34 | यु-3/991 | मे. पूजा इंड. | 13-14-15 | 4,36,619 | 2 | 8,732 |
| 35 | यु-3/979 | मे. तराना एजन्सीस. | 13-14-15 | 7,22,117 | 4 | 28,885 |
| 36 | यु-8/1186 | मे. गोल्डन गारमेंट्स. | 13-14 | 2,91,766 | 2 | 5,835 |
| 37 | यु-4/268 | मे. मयूर इंटर. | 13-14 | 3,78,550 | 4 | 15,142 |
| 38 | यु-2/084 | मे.मेहरुमल तोलाराम | 13-14-15 | 1,16,21,887 | 2 | 2,32,438 |

**एकूण रु.25,68,962**

1) उपरोक्त नमूद विवरणामध्ये नमूद केलेली स्थानिक खरेदी ज्या दुकानदाराकडून खरेदी केलेली आहे, त्याचा तपशील विवरणपत्रा सोबत जोडण्यात आलेला नसल्यामुळे संबधित स्थानिक खरेदीदारांनी स्थानिक संस्था कराचा महानगरपालिकेस भरणा केला आहे किंवा नाही यांची लेखापरीक्षणास तपासणी करता आलेली नाही. विभागाने याबाबत कोणतीही पूर्तता न दर्शविल्याने त्यावरील स्थानिक संस्था कर रक्कम रु.25,68,962 ची सबंधीताकडून व्याजासह वसूल करणे आवश्यक आहे.

2) लेखापरीक्षण वित्तीय वर्षात वार्षिक विवरणे भरलेल्या व त्यात स्थानिक खरेदी दर्शविलेल्या सर्व संस्थांची पडताळणी करून स्थानिक संस्था कर महापालिकेस भरला नसल्यास स्थानिक संस्था कराची रक्कम परीगणित करून वरील प्रमाणे व्याजासह वसूल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपानुसार रक्कम रु.25,68,962 लेखापरीक्षणात वसूलपात्र ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.25,68,962.

DATBEPM6101 (Ref No : 22, Hmm No : 169)

***56 विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेला आयात मालाच्या किमतीवर स्थानिक संस्था कराच्या मंजूर दरसूचीनुसार आकारणी न केल्याने कमी कराचा भरणा झालेबाबत.***

**No. of Irregularities: 02**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 291268.00/-

***आयात मालावर स्थानिक संस्था कराची आकारणी करणेचे दर निश्चित केले असताना त्यापेक्षा कमी दराने आकारणी केल्याने महापालिकेस रु.2,91,268 स्थानिक संस्था कराचा कमी महसूल प्राप्त होणे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये तपासणीस सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांची तपासणी करता खालील तपशीलात नमूद नोंदणीकृत व्यापारी संस्थांनी महानगरपालिकेकडे सादर केलेल्या त्यांचे वार्षिक विवरणपत्रात नमूद आयात मालाच्या किंमतीवर मंजूर दरसूचीपेक्षा कमी दराने कराची आकारणी करून त्याप्रमाणे भरणा केला आहे.

| अ.क्र. | नोंदणी क्र. | आयात मालाची किंमत रु. | मालाचा तपशील | दरसूचीनुसार आकारणेचा दर | आकारलेला दर | कमी आकारणी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | यु-1/81 मे.महेश प्लाय | 1,64,300 (14-15) | प्लायवूड | 4% | 3% | 1,643 |
| 2 | यु-5/571 मे.महालक्ष्मी | 86,94,727(13-14-15) | केमिकल व इंधन | 4% | 2% | 1,73,895 |
| 3 | यु9/अ.नि./72 मे.प्रभात इंटर. | 5,85,557(13-14) | वाटर फिल्टर | 4% | 3% | 5,856 |
| 4 | यु9/अ.नि./73 मे.प्रभात ट्रेड | 48,97,807(13-14) | वाटर फिल्टर | 4% | 3% | 48,978 |
| 5 | यु9/अ.नि./75 मे.हर्बल लाइफ | 60,,89,628 (14-15) | तपशील नमूद नाही | 3% | 2% | 60,896 |

**एकूण रु.2,91,268.**

सदर अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.171 दि.13.12.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग राजपत्र असाधारण भाग एक -अ-मधील उप-विभाग दि. 1 जुलै 2012 नुसार महापालिकेने आयात मालावर स्थानिक संस्था कराची आकारणी करणेचे दर निश्चित केले असताना त्यापेक्षा कमी दराने आकारणी केल्याने महापालिकेस रु.2,91,268 स्थानिक संस्था कराची कमी वसुली झाली आहे. याबाबत नोंदणी धारकाने त्यांचे वार्षिक विवरणात केलेली

आकारणी योग्य असल्याची पूर्तता त्यांचेकडून आवश्यक अभिलेखे प्राप्त करून दर्शविणेस सूचित करण्यात आले होते, तथापि कोणतीही पूर्तता न दर्शविल्याने सदरची रक्कम रु.2,91,268 सबंधीताकडून वसूल करून मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

2) लेखापरीक्षण वित्तीय वर्षात सादर केलेल्या सर्व विवरणाबाबत मंजूर दरसूचीनुसार तपासणी करून वरील प्रमाणे कार्यवाही करणेस सूचित करणेत आले होते, तथापि कोणतीही पूर्तता दर्शविली नाही.

वसूलपात्र रक्कम रु.2,91,268.

DATBEPM6101 (Ref No : 23, Hmm No : 171)

## *57 मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 चे नियम 28 विवक्षित प्रकरणातील सूट व नियम 32 नुसार निर्यातीच्या बाबतीत कराचा परताव्या नुसार भरलेल्या विवरणातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4555549.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1382163.00/-

***आयात माल, निर्यात माल व out and out परचेस बाबत बिले,खरेदी नोंदवही,ताळेबंद,नफा तोटा पत्रक ई. कोणतीही कागदपत्रे नस्तीसोबत नसणे,मूळ आकारणीत निर्यात मालाची किंमत वजा करून स्थानिक संस्था कराची आकारणी केलेली असल्याने निर्यात मालावर कराचा भरणा न करता त्यास सूट दिल्याने रु.9,64,674 कराचा कमी भरणा होणे,स्थानिक संस्था कर नियम 32 नुसार निर्यात केलेल्या मालावर कर भरणा केला असल्यास व तो निर्यात केल्यानंतर त्यावर 90% परतावा देणेचा असताना अशी कार्यवाही केल्याचे भरणा चलने/ पावत्या नस्तीसोबत नसल्याने निर्यात केलेल्या मालाच्या किमतीबाबत व तो निर्यात झाल्याची पडताळणी करता न येणे तसेच 90% सुटीची कर रक्कम रु.2,18,449 ची वसुलीची खात्री न होणे, नियम 28 मध्ये विवक्षित प्रकरणामध्ये देणेच्या सुटीमध्ये अनिवासी स्थानिक संस्था नोंदणी धारकाकडून खरेदी करून आयात केलेल्या मालावर सूट देणेची कोणतीही तरतूद नसताना रु.1,99,040 ची सूट देणे,***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये तपासणीस सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांची तपासणी करता खालील तपशीलात

नमूद नोंदणीकृत व्यापारी संस्थांनी महानगरपालिकेकडे सादर केलेल्या त्यांचे वार्षिक विवरणपत्रात नमूद आयात मालाच्या किंमतीवर नियम 28 नुसार व नियम 32 नुसार परतावा नमूद करून विवरणे सादर केली आहेत. सदर वार्षिक विवरणांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.168 दि.13.12.2016 निर्गमित करण्यात आले होते, तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

**अ)**मे.आर.एस.पेट्रोकेम नोंदणी क्र.यु-5/566 यांनी त्यांचे 2013-14 या वित्तीय वर्षाच्या वार्षिक विवरणात एकूण आयात मालाच्या किमतीतून स्थानिक खरेदी व out & out परचेस रु.5,72,35,857 मालाची किंमत वजा करून उर्वरित किंमत रु.2,51,61,756 वर 4% दराने रु.10,06,470 कराची आकारणी केली आहे. त्यानंतर विवरणाच्या भाग सहा मध्ये कलम 32 नुसार निर्यात रु.2,35,97,142 किमतीवर 4% कर रु.9,43,886 या पूर्वी भरणा केल्याचे नमूद करून त्यावर 90% परतावा रु.8,49,497 दर्शवून एकूण आकारणी रु.10,06,470 मधून वजा करून रु.1,56,973 स्थानिक संस्था कर देय असल्याचे नमूद करून अशा रक्कमेचा भरणा 12 चलनाद्वारे महानगरपालिकेकडे करण्यात आला आहे.

त्यांनी त्यांचे 2014-15 च्या विवरणात सुद्धा एकूण आयात मालाच्या किमतीतून स्थानिक खरेदी व out & out परचेस रु.5,76,52,856 मालाची किंमत वजा करून उर्वरित किंमत रु.53,55,66 वर 4% दराने रु.21,423 कराची आकारणी दर्शविली आहे. त्यानंतर विवरणाच्या भाग सहा मध्ये कलम 32 नुसार निर्यात रु.5,19,705 किमतीवर 4% कर रु.20,788 या पूर्वी भरणा केल्याचे नमूद करून त्यावर 90% परतावा रु.18,710 दर्शवून एकूण आकारणी रु.21,423 मधून वजा करून रु.2,714 स्थानिक संस्था कर देय असल्याचे नमूद करून अशा रक्कमेचा भरणा 5 चलनाद्वारे महानगरपालिकेकडे केला आहे.

सदर प्रकरणी खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1)आयात माल, निर्यात माल व out & out परचेस बाबत बिले,खरेदी नोंदवही, ताळेबंद,नफा तोटा पत्रक ई. कोणतीही कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.त्यामुळे प्रत्यक्ष आयात माल किंमत व निर्यात माल व out & out परचेस किंमतीची पडताळणी करता आली नाही. निर्यात मालावर 4% कर अनु.रु. 9,43,886 व रु.20,788 भरल्याची कोणतीही भरणा चलने अथवा पावत्या नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे असा कर भरल्याची पडताळणी करता आली नाही.

2) स्थानिक संस्था कर नियम 32 नुसार निर्यात केलेल्या मालावर कर भरणा केला असल्यास व तो निर्यात केल्यानंतर त्यावर 90% परतावा देणेच असताना मूळ आकारणीत निर्यात मालाची किंमत वजा करून स्थानिक संस्था कराची आकारणी केलेली असल्याने निर्यात मालावर कराचा भरणा न करता त्यास सूट दिली आहे. त्यामुळे दोन्ही वित्तीय वर्षात मूळ आकारणीनुसार रु.9,64,674 कराचा कमी भरणा झाला आहे. त्याची सबंधीताकडून व्याजासह वसुली होणे आवश्यक आहे.

3)out & out परचेस केल्याची कोणतीही कागदपत्रे नस्तीसोबत नसल्याने दोन्ही वर्षात मूळ

आकारणीत दर्शविल्याप्रमाणे एकूण रु.11,48,88,713 किंमतीच्या out & out परचेस मालावर 4% दराने रु.45, 55,549 चा कर महापालिकेस प्राप्त झाला नाही. याबाबत विभागाने कोणताही खुलासा तसेच पूर्तता दर्शविली नसल्याने सदर कराची रक्कम रु.45,55,549 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

**ब)** मे.प्लानेट एम रिटेल नोंदणी क्र.यु-9/अ.नि./52 त्यांचे 2013-14 व 2014-15 या वित्तीय वर्षाच्या वार्षिक विवरणात एकूण आयात मालाच्या किमतीवर व निर्यात केलेल्या मालाच्या किंमतीवर 4% कर आकारणी करून निर्यात केलेल्या अनु. रु.45,50,585 व रु.17,17,444 किंमतीवर 90% सूट घेवून अनु. रु.5,98,112 व रु.रु.2,90,818 ची कराची आकारणी करून त्याप्रमाणे चलनाद्वारे रक्कम भरल्याचे चलनांच्या प्रतीवरून दिसून येते. सदर प्रकरणात खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयात माल, निर्यात बाबत बिले,खरेदी नोंदवही, ताळेबंद,नफा तोटा पत्रक ई. कोणतीही कागदपत्रे नास्तीसोबत नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष आयात माल किंमत व निर्यात माल किंमतीची पडताळणी करता आली नाही. तसेच निर्यात मालावर 4% कर अनु.रु.1,74,023 व रु.68,698 भरल्याची कोणतीही भरणा चलने अथवा पावत्या नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे असा कर भरल्याची पडताळणी करता आली नाही.

2) स्थानिक संस्था कर नियम 32 नुसार निर्यात केलेल्या मालावर कर भरणा केला असल्यास व तो निर्यात केल्यानंतर त्यावर 90% परतावा देणेच आहे. त्यानुसार निर्यात मालावर प्रथम 4% कर भरून 90% परतावा प्राप्त करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केल्याचे भरणा चलने/पावत्या नस्तीसोबत नसल्याने दिसून येत नाही. तसेच निर्यात केलेल्या मालाच्या किंमतीबाबत व माल निर्यात केलेबाबत कोणतीही कागदपत्रे नसल्याने सदर किंमतीचा माल निर्यात झाल्याची खात्री होत नाही.विभागाने याबाबत कोणतीही पूर्तता न दर्शविल्याने 90% सुटीची कर रक्कम रु.2,18,449 सबंधीताकडून व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे.

**क)** मे.तराना एजन्सीस नोंदणी क्र.यु-3/979 यांनी त्यांचे वित्तीय वर्ष 2013-14 च्या वार्षिक विवरणात नियम 28 नुसार अनिवासी स्थानिक संस्था नोंदणी धारकाकडून रु.49,76,006 किंमतीचा माल खरेदी करून एकूण आयातीतून वजावट करून आकारणी केली आहे. तथापि याबाबत सदर नोंदणी धारकाचे नाव, नोंदणी क्र.,खरेदीची बिले,नफा तोटा पत्रक ई. कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत. नियम 28 मध्ये विवक्षित प्रकरणामध्ये देणेच्या सुटीमध्ये अनिवासी स्थानिक संस्था नोंदणी धारकाकडून खरेदी करून आयात केलेल्या मालावर सूट देणेची कोणतीही तरतूद नसताना सूट घेण्यात आली आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.168 दि.13.12.2016 नुसार खुलासा अथवा पूर्तता करणेस कळविणेत आले होते. तथापि विभागाने कोणतीही पूर्तता दर्शविली नाही. त्यामुळे आयात रु.49,76,006 किंमतीवर 4% दराने रक्कम रु.1,99,040 ची सबंधीताकडून व्याजासह वसुली होणे आवश्यक आहे.

**ड)** लेखापरीक्षण वित्तीय वर्षात नियम 32 व नियम 28 नुसार सादर केलेल्या सर्व वार्षिक विवरणा बाबत तपासणी करून वरील प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.45,55,549.
वसूलपात्र रक्कम रु.13,82,163
DATBEPM6101 (Ref No : 24, Hmm No : 168)

## *58 स्थानिक संस्था कर नोंदणीकृत संस्थांनी वार्षिक विवरणे सादर न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 05**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 63980000.00/-

***स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 30 (1) अन्वये व्यापाऱ्याकडून प्रतिभूती रक्कम न घेणे, नियम 47 मध्ये नमुद केल्याप्रमाणे नोंदणीकृत व्यापारी कोणतीही कागदपत्रे सादर करण्यास कसूर करतील तर त्यास कलम 152 म'खाली माहीती पुरविण्यास भाग पाडील तेंव्हा तो नमुना ढ'मध्ये नोटीस काढणेची असताना विशेषता 2014-15 मध्ये नोटीसा न काढणे, स्थानिक संस्था कर नियम 2010 चे नियम 48(6) अन्वये व्यापारी किंवा व्यक्ती यांनी पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहीत कालावधीत भरण्यास कसूर केली असताना रु.5000/- प्रमाणे 402 संस्थांनी 2013-14 व 14-15 या वित्तीय वर्षात 742 प्रकरणी शास्तीची कार्यवाही न केल्याने अशा प्रकरणातील शास्तीची रक्कम रु.37,10,000 चा महसूल प्राप्त न होणे, 13-14 मध्ये विवरण सादर न केलेल्या 12796 संस्थाना दंडाच्या नोटीस स्पीड पोस्टाने पाठविण्यासाठी दर रु.18 प्रती नोटीस प्रमाणे रु.4,98, 078 खर्च केल्याने याबाबत 12,796 संस्थाकडून रु.5,000 प्रमाणे रु.6,39,80,000 दंड वसूल झाल्याची पूर्तता न दर्शविणे, वार्षिक विवरणपत्र न भरलेल्या व्यापाऱ्यांची संख्येची माहिती लेखी मागणी करूनही उपलब्ध न करणे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये तपासणीस सादर केलेल्या नोंदणीकृत संस्थांच्या 487 नस्ती व त्यातील वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांची तपासणी करता खालील तपशीलात नमूद नोंदणीकृत व्यापारी संस्थांची वार्षिक विवरणे त्यांचे नस्तीसोबत आढळू येत नाही.

| अ.क्र. | नोंदणी क्र. | वार्षिक विवरण सादर न केलेले वर्ष | यापूर्वी विवरण सादर केलेले वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | यु-1/275 | 13-14-15 | नाही, | 14-15 एच नोटीस नाही. |
| 2 | यु-1/273 | 13-14-15 | नाही, | 14-15 एच नोटीस नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | यु-1/272 | 13-14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 4 | यु-1/269 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 5 | यु-1/268 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही.शॉप लाय.आहे. |
| 6 | यु-1/265 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 7 | यु-1/264 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 8 | यु-1/263 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 9 | यु-1/262 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 10 | यु-1/261 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 11 | यु-1/260 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 12 | यु-1/259 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 13 | यु-1/258 | 14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 14 | यु-1/257 | 13-14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 15 | यु-1/256 | 13-14-15 | नाही. | कोणतीही एच नोटीस नाहीत. |
| 16 | यु-1/255 | 13-14-15 | नाही. | कोणतीही एच नोटीस नाहीत. |
| 17 | यु-1/254 | 14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 18 | यु-1/253 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 19 | यु-1/251 | 14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 20 | यु-5/1551 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 21 | यु- 5/1554 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 22 | यु- 5/1559 | 14-15 | 12-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 23 | यु- 5 /1560 | 13-14-15 | नाही. | कोणत्याही एच नोटीस नाहीत. |
| 24 | यु- 5 /1562 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 25 | यु-5/1563 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 26 | यु-5/1565 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 27 | यु-5/1569 | 14-15 | 12-13. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 28 | यु-5/1564 | 14-15 | 12-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 29 | यु- 5/1571 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 30 | यु-5/1572 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 31 | यु-5/1568 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 32 | यु-5/1567 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 33 | यु-5/1566 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 34 | यु-5/1570 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 35 | यु-5/1573 | 13-14-15 | 12-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 36 | यु-5/1574 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 37 | यु-5/1576 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 38 | यु-5/1577 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 39 | यु-5/1578 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 40 | यु-5/1579 | 14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 41 | यु-5/1581 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 42 | यु-5/1582 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 43 | यु -5/1585 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 44 | यु-5/1586 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 45 | यु-5/1587 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 46 | यु-5/1588 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 47 | यु-5/1589 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 48 | यु-5/1590 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 49 | यु -5/1591 | 14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 50 | यु -5/1592 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 51 | यु -5/1594 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 52 | यु -5/1595 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 53 | यु -5/1596 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 54 | यु -5/1598 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 55 | यु-5/1599 | 14-15 | 13-14 | 14-15,एच नोटीस नाही. |
| 56 | यु -5/1600 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 57 | यु -5/551 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 58 | यु -5/52 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 59 | यु -5/553 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 60 | यु -5/558 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 61 | यु -1/103 | 14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 62 | यु -1/243 | 14-15 | 2013-14 | व्हॅट नोंदणी आहे,14-15 एच नोटीस नाही. |
| 63 | यु -1/242 | 14-15 | 2013-14 | व्हॅट नोंदणी आहे,14-15 एच नोटीस नाही. |
| 64 | यु -1/92 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 65 | यु -1/97 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 66 | यु -1/61 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 67 | यु -1/60 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 68 | यु -1/281 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 69 | यु -5/559 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 70 | यु -5/560 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 71 | यु -5/562 | 14-15 | 2012-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 72 | यु -5/565 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 73 | यु -5/568 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 74 | यु -5/569 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 75 | यु -5/570 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 76 | यु -5/572 | 13-14 | 2012-13 | 13-14 एच नोटीस नाही. |
| 77 | यु -5/574 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 78 | यु -5/575 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 79 | यु -5/579 | 14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 80 | यु -5/580 | 14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 81 | यु -5/581 | 14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 82 | यु -5/584 | 14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 83 | यु -5/585 | 13-14 | 2012-13 | 13-14 एच नोटीस नाही. |
| 84 | यु -5/586 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 85 | यु -5/588 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 86 | यु -5/589 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 87 | यु -5/590 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 88 | यु -5/591 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 89 | यु -5/592 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 90 | यु -5/593 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 91 | यु -5/594 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 92 | यु -5/595 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 93 | यु -5/596 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 94 | यु -5/597 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 95 | यु -5/598 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 96 | यु -5/600 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 97 | यु -4/541 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 98 | यु -8/146 | 13-14-15 | नाही. | व्हॅट नोंदणी आहे,14-15 एच नोटीस नाही. |
| 99 | यु -8/260 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 100 | यु -8/174 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 101 | यु -8/183 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 102 | यु -8/189 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 103 | यु -9/36 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 104 | यु -8/N.R./127 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 105 | यु -8/N.R./171 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 106 | यु -3/1134 | 14-15 | 2013-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 107 | यु -3/449 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 108 | यु -4/115 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 109 | यु -4/650 | 14-15 | 2013-14 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 110 | यु -7/1075 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 111 | यु -7/1082 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 112 | यु -7/1055 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 113 | यु -7/581 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 114 | यु -9/N.R./23 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 115 | यु -9/N.R./168 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 116 | यु -7/162 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 117 | यु -4/918 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 118 | यु -7/1099 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 119 | यु -7/284 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 120 | यु -7/258 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 121 | यु -7/1075 | 13-14-15 | 2012-13 | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 122 | यु -6/74 | 13-14-15 | 2012-13 | PARMIT ROOM. |
| 123 | यु -3/952 | 13-14-15 | नाही. | व्हॅट नोंदणी आहे, |
| 124 | यु -3/953 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस आहेत. |
| 125 | यु -3/954 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 126 | यु -3/956 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 127 | यु -3/957 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 128 | यु -3/958 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 129 | यु -3/956 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाही. |
| 130 | यु -3/960 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 131 | यु -3/962 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 132 | यु -3/963 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 133 | यु -3/964 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 134 | यु -3/965 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 135 | यु -3/966 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 136 | यु -3/967 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 138 | यु -3/968 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 139 | यु -3/969 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 140 | यु -3/970 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 141 | यु -3/972 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 142 | यु -3/973 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 143 | यु -3/974 | 13-14 | नाही. | 14-15 एच नोटीस नाहीत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 144 | यु -3/975 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 145 | यु -3/976 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाहीत. |
| 146 | यु -3/977 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 147 | यु -3/981 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 148 | यु -3/982 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 149 | यु -3/983 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 150 | यु -3/985 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 151 | यु -3/986 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 152 | यु -3/987 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 153 | यु -3/988 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 154 | यु -3/989 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 155 | यु -3/992 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 156 | यु -3/994 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 157 | यु -3/995 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 158 | यु -3/996 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 159 | यु -3/997 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 161 | यु -3/999 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 162 | यु -3/993 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 163 | यु -3/984 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 164 | यु -8/1152 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 165 | यु -8/1151 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 166 | यु -8/1153 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 167 | यु -8/1154 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 168 | यु -8/1155 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 169 | यु -8/1156 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 170 | यु -8/1158 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 171 | यु -8/1159 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 172 | यु -8/1160 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 173 | यु -8/1161 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 174 | यु -8/1162 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 175 | यु -8/1163 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 176 | यु -8/1165 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 177 | यु -8/1166 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 178 | यु -8/1167 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 179 | यु -8/1168 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 180 | यु -8/1170 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 181 | यु -8/1171 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 182 | यु -8/1172 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 183 | यु -8/1173 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 184 | यु -8/1175 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 185 | यु -8/1174 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 186 | यु -8/1176 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 187 | यु -8/1177 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 188 | यु -8/1178 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 189 | यु -8/1179 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 190 | यु -8/1169 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 191 | यु -8/1180 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 192 | यु -8/1182 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 193 | यु -8/1183 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 194 | यु -8/1185 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 195 | यु -8/1186 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 196 | यु -8/1190 | 14-15 | 12-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 197 | यु -8/1188 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 198 | यु -8/1187 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 199 | यु -8/1193 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 200 | यु -8/1191 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 201 | यु -8/1192 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 202 | यु -8/1194 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 203 | यु -8/1198 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 204 | यु -8/1195 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 205 | यु -8/1199 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 206 | यु -8/1200 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 207 | यु -9/51/N.R. | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 208 | यु -9/60 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 209 | यु -9/55/N.R. | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 210 | यु -9/75/N.R. | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 211 | यु -9/57/N.R. | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 212 | यु -9/72/N.R. | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 213 | यु -9/73/N.R. | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 214 | यु -9/77/N.R. | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 215 | यु -9/76/N.R. | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 216 | यु -9/78/N.R. | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 217 | यु -9/79/N.R. | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 218 | यु -9/80/N.R. | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 219 | यु -4/263 | 14-15 | 12-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 220 | यु -4/299 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 221 | यु -4/295 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 222 | यु -4/294 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 223 | यु -4/293 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 224 | यु -4/289 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 225 | यु -4/284 | 13-14-15 | 12-13 | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 226 | यु -4/283 | 13-14-15 | 12-13 | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 227 | यु -4/279 | 13-14-15 | 12-13 | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 228 | यु -4/293 | 13-14-15 | 12-13 | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 230 | यु -4/277 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 231 | यु -4/275 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 232 | यु -4/268 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 233 | यु -4/265 | 13-14-15 | 12-13 | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 234 | यु -4/ | 13-14-15 | 12-13 | 13-14-15 एच नोटीस नाहीत.(कमलेश) |
| 235 | यु -4/258 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 236 | यु -4/257 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 237 | यु -4/251 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 238 | यु -4/261 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 239 | यु -4/260 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 240 | यु -4/259 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 241 | यु -4/269 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 242 | यु -4/267 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 243 | यु -4/274 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 244 | यु -4/271 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 245 | यु -4/282 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 246 | यु -4/280 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 247 | यु -4/287 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 248 | यु -4/285 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 249 | यु -4/288 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 250 | यु -4/292 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 251 | यु -4/296 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 252 | यु -4/301 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 253 | यु -7/202 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 254 | यु -7/203 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 255 | यु -7/204 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 256 | यु -7/205 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 257 | यु -7/206 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 258 | यु -7/207 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 259 | यु -7/208 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 260 | यु -7/209 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 261 | यु -7/210 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 262 | यु -7/213 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 263 | यु -7/214 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 264 | यु -7/217 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 265 | यु -7/220 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. व्हॅट रजी.आहे. |
| 266 | यु -7/221 | 13-14-15 | 12-13 | 14-15 एच नोटीस नाहीत. व्हॅट रजी. आहे. |
| 267 | यु -7/222 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 268 | यु -7/223 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 269 | यु -7/224 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 270 | यु -7/215 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 271 | यु -7/225 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 272 | यु -7/216 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 273 | यु -7/226 | 13-14-15 | 12-13 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 274 | यु -7/229 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 275 | यु -7/230 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 276 | यु -7/231 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 277 | यु -7/232 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 278 | यु -7/233 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 279 | यु -7/235 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 280 | यु -7/237 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 281 | यु -7/238 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 282 | यु -7/239 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 283 | यु -7/240 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 284 | यु -7/241 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 285 | यु -7/244 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 286 | यु -7/245 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 287 | यु -7/246 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 288 | यु -6/149 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. व्हॅट रजी.आहे. |
| 289 | यु -6/344 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 290 | यु -6/182 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 291 | यु -6/222 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 292 | यु -6/280 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 293 | यु -6/300 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 294 | यु -6/336 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 295 | यु -6/344 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 296 | यु -6/372 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 297 | यु -6/402 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 298 | यु -6/407 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 299 | यु -6/414 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 300 | यु -6/471 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 301 | यु -6/423 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 302 | यु -6/431 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 303 | यु -6/434 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 304 | यु -6/440 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 305 | यु -6/446 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 306 | यु -6/449 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 307 | यु -6/450 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 308 | यु -6/451 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 309 | यु -6/452 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 311 | यु -6/453 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 312 | यु -6/454 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 313 | यु -6/466 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 314 | यु -6/478 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 315 | यु -6/479 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 316 | यु -6/488 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 317 | यु -6/489 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 318 | यु -6/490 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 319 | यु -6/491 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 320 | यु -6/495 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 321 | यु -6/496 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 322 | यु -6/497 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 323 | यु -6/517 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 324 | यु -6/706 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 325 | यु -6/707 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 326 | यु -6/709 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 327 | यु -6/710 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 328 | यु -6/711 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 329 | यु -6/712 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 330 | यु -6/713 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 331 | यु -6/714 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 332 | यु -6/715 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 333 | यु -6/717 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 334 | यु -6/718 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 335 | यु -6/719 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 336 | यु -6/720 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 337 | यु -6/722 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 338 | यु -6/723 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 339 | यु -6/724 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 340 | यु -6/725 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 341 | यु -6/728 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 342 | यु -6/730 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 343 | यु -6/732 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 344 | यु -6/734 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 345 | यु -6/735 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 346 | यु -6/736 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 347 | यु -6/747 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 348 | यु -6/755 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 349 | यु -6/780 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 350 | यु -6/783 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 351 | यु -6/771 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 352 | यु -6/779 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 353 | यु -6/788 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 354 | यु -6/852 | 13-14-15 | नाही. | 14-15 एच नोटीस नाही. |
| 355 | यु -2/1250 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 356 | यु -2/1249 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 357 | यु -2/1248 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 358 | यु -2/1247 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 359 | यु -2/1246 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 360 | यु -2/1245 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 361 | यु -2/1244 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 362 | यु -2/1243 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 363 | यु -2/1242 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 364 | यु -2/1241 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 365 | यु -2/1240 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 366 | यु -2/1239 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 367 | यु -2/1238 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 368 | यु -2/1237 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 369 | यु -2/1236 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 370 | यु -2/1235 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 371 | यु -2/1234 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 372 | यु -2/1233 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 373 | यु -2/1232 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 374 | यु -2/1231 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 375 | यु -2/1230 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 376 | यु -2/1229 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 377 | यु -2/1228 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 378 | यु -2/1226 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 379 | यु -2/1225 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 380 | यु -2/1224 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 381 | यु -2/1223 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 382 | यु -2/1222 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 383 | यु -2/1221 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 384 | यु -2/1220 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 385 | यु -2/1219 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 386 | यु -2/1218 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 387 | यु -2/1217 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 388 | यु -2/1215 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 389 | यु -2/1213 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 390 | यु -2/1212 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 391 | यु -2/1211 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 392 | यु -2/1210 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 393 | यु -2/1209 | 14-15 | 13-14 | 14-15 एच नोटीस नाही. |
| 394 | यु -2/1207 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 395 | यु -2/1208 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 396 | यु -2/1206 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 397 | यु -2/1205 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 398 | यु -2/1251 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 399 | यु -2/1252 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 400 | यु -2/1253 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 401 | यु -2/1254 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |
| 402 | यु -2/1259 | 13-14-15 | नाही. | 13-14-15 एच नोटीस नाहीत. |

याबाबत अर्धसमास पत्र क्र.174 दि.13.12.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाचे उत्तर अप्राप्त असल्याने खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1)स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 30 (1) अन्वये नोंदणी प्रमाणपत्र अंमलात असताना जर एखादा नोंदणीकृत व्यापारी या नियमांच्या तरतुदीद्वारे किंवा त्या अन्वये त्याने भरणा करणे आवश्यक असलेला स्थानिक संस्था कर भरण्यास तीन किंवा अधिक वेळा कसूर करील अशा व्यापा-याकडुन येणे असलेला स्थानिक संस्था कर,व्याज किंवा शास्ती यांची योग्य वसुली होणेसाठी

तसे करणे आवश्यक आहे असे आयुक्तास योग्य वाटल्यास, व्यापा-यास नियम 30(1) नुसार बाजु मांडण्याची योग्य संधी देवून आयुक्त लेखी आदेश काढून त्यास प्रतिभुती भरण्यास फर्माविण्याचे अधिकार आहेत. परंतु विभागाने याबाबत व्यापा-यांना नोटीशी देवुन प्रतिभुती भरण्यास फर्मावण्यात आलेले नसल्याने व्यापा-याकडुन एलबीटी भरणेस प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेस व्यापा-याकडुन कराची व प्रतिभुतीची रक्कम प्राप्त झाली नाही.

2) नियम 47 मध्ये नमुद केल्याप्रमाणे नोंदणीकृत व्यापारी कोणतीही कागदपत्रे सादर करण्यास कसून करतील तर त्यास कलम 152 "म" खाली माहीती पुरविण्यास आयुक्त कोणत्याही व्यापा-यास किंवा कोणत्याही व्यक्तीस भाग पाडील तेंव्हा तो नमुना "ढ" मध्ये नोटीस काढणेची असताना विशेषता 2014-15 मध्ये नोटीस काढण्यात आल्या नाहीत. त्यामुळे याबाबत विभागाकडून कराच्या वसुली बाबत उदासीनता दर्शविली आहे.

3) स्थानिक संस्था कर नियम 2010 चे नियम 48(6) अन्वये व्यापारी किंवा व्यक्ती यांनी पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहीत कालावधीत भरण्यास कसूर केली असेल तर आयुक्तास असा व्यापारी किंवा व्यक्ती यांचेवर त्यांना त्यांचे म्हणने ऐकूण घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर रु.5000/- मात्र पेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम शास्ती म्हणून लादता येत असताना उपरोक्त नमूद 402 प्रकरणात 2013-14 व 2014-15 या वित्तीय वर्षात 742 प्रकरणी शास्तीची कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही. विभागाने याबाबत कोणताही खुलासा अथवा पूर्तता न दर्शविल्याने अशा प्रकरणातील शास्तीची रक्कम रु.37,10,000 सबंधीताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

4)उपरोक्त नमूद प्रकरणे हि लेखापरीक्षणास सादर केलेल्या नस्त्या बाबतची आहेत.लेखापरीक्षण वित्तीय वर्षात 2013-14 मध्ये 14,808 व 2014-15 मध्ये 15,091 नोंदणीकृत संस्था होत्या. अर्धसमास पत्र क्र.107 दि.15.10.2016,पत्र क्र.25.10.2016 व पत्र क्र.139 दि.11.11.2016 नुसार वार्षिक विवरण सादर केलेल्या संस्थांची माहिती लेखी मागणी करूनही उपलब्ध करून देणेत आली नाही. त्यामुळे याबाबत वार्षिक विवरण न भरलेल्या संस्थाबाबत तपासणी करून त्यांचे कडून नियम 48(6) प्रमाणे शास्तीची रक्कम वसूल करून म.न.पा. निधीत जमा करणे आवश्यक आहे.

5)विभागाने प्र.क्र.4640 दि.17.03.2015 नुसार वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये विवरण सादर न केलेल्या/ कागदपत्रे सादर न केलेल्या/कराचा भरणा नियमित न करणाऱ्या 14,875 संस्थाना व 2013-14 मध्ये विवरण सादर न केलेल्या 12796 संस्थाना दंडाच्या नोटीस स्पीड पोस्टाने पाठविण्यासाठी दर रु.18 प्रती नोटीस प्रमाणे रु.4,98,078 खर्च केला आहे. याबाबत 12,796 संस्थाकडून रु.5,000 प्रमाणे रु.6,39,80,000 दंड वसूल झाल्याची पूर्तता न दर्शविल्याने रक्कम रु.6,39,80,000 लेखापरीक्षणात वसूलपात्र ठेवणेत येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.6,39,80,000

DATBEPM6101 (Ref No : 25, Hmm No : 174)

## *59 उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये इ-गर्व्हन्स प्रकल्पा अंतर्गत SMART या संकल्पनेच्या कामात अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3011968.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3011968.00/-

***पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपमधून नागरीकांना कंत्राटदाराने मालमत्ता कर पावती, पणी पट्टी पावती, जन्म मृत्यु प्रमाणपत्र व तक्रार नोंदणी (ग्रीव्हलेक्स) इतर सेवा दिलेबाबत उल्हासनगर महानगरपालिका नागरी सेवा सुविधा केंद्र यांनी सेवानिहाय संगणकीय प्रणालीचा डाटा ठेवला नसल्याने ई- गर्व्हन्स पध्दतीचा अवलंबा बाबतच्या अटी व शर्ती नुसार झाल्याचे लेखा परीक्षणास खात्री झली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रशासन गतिमान व लोकाभिमुख होउन प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने महापालिका कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करुन शासनास अपेक्षित असलेली SMART (Simple, Moral, Accountable, Responsive & Transparent) या संकल्पनेची अंमलबजावणी करणेबाबतचा प्रस्ताव महासभा ठराव क्र. 50 दि. 31/10/2007 अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने नागरिकांना महापालिकेतर्फे पुरविल्या जाणा-या विविध सेवा प्रभाग कार्यालये व नागरीकांची जास्तीत जास्त वर्दळ असलेली ठिकाणे उदा. रेल्वे स्टेशन, गार्डन, मार्केट चौक अशा ठिकाणी उपलब्ध करुन देणेबाबत तसेच बांधकाम परवानगीचे संगणक आज्ञावलीव्दारे तात्काळ पडताळणीसाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपव्दारे दहा वर्षे कालावधीसाठी प्रकल्प राबविणेबाबत निविदा मागवून न्युनतम दरपत्रधारक मे सन डिजिटल उल्हासनगर यांचेकडून कार्यादेश क्र. UMC/CFC/318/319/08 01/12/2008 KIOSK Multi Utility Center व्दारे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मधून नागरीकांना सेवा उपलब्ध करुन देउन तशी कर पावती, पाणी पुरवठा कर(पट्टी) पावती, जन्म मृत्यू प्रमाणपत्र, इतर सेवा, ग्रीव्हनॅवस व थकित देयके बाबतची कामे, पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप व्दारे महानगरपालिकेला नागरी सेवा सुविधेव्दारे सेवा देत आहेत, त्यानुसार न्यूनतम दरपत्रधारक मे. सन डिजिटल यांची मुळ निविदा नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्याप्रमाणे न्युनतम निविदाकार मे. सन डिजिटल यांचेशी मनपाने केलेल्या करारनामाच्या मुळ प्रती व त्यांच्या अटी व शर्ती लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.

मे. सन डिजिटल यांनी प्रती माहे संगणक विभागाला देयके सादर करुन वेळोवेळी लेखाविभागातून प्राप्त करुन घेतलेली आहेत. सदरील कंत्राटदाराचे सन 2014-15 मधील कामाची देयके प्राप्त करून घेतलेली आहे. त्यानुसार लेखा परीक्षणसाठी आवक्यानुसार निवडक महिन्यातील प्रमाणके व सर्वसाधारण प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता, देयक निहाय प्रमाणकाला नागरी सुविधा केंद्र विभागाने कंत्राटदारानी सेवा पुरविलेबाबतचे महिना निहाय व कंत्राटदाराने सेवा पुरविलेल्या सेवा निहाय संगणकीय प्रणालीचा मुळ डाटा लेखा परीक्षणास उपलब्ध केला नसल्याने लेखा विभागामधून मे. सन डिजिटल यांना अदा केलेली रक्कम अक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

1) प्रती Kiosk सेंटर रक्कम रू. 21,500/- 2) मालमत्ता कर पावती, पाणी पुरवठा कर (पट्टी) पावती जन्म मृत्यू प्रमाणपत्र व इतर सेवा प्रती नग रू. 11.50/- पैसे या दराणे खालीलप्रमाणे देयके खर्ची पडली आहेत.

| अ.क्र. | देयक तपशिल | प्रमाणक क्रमाक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 1)कर भरणा पावती, पाणी पुरवठा कर(पट्टी) पावती जन्म मृत्यू प्रमाणपत्र इतर सेवा ग्रीव्हनॅवस व थकित देयके 2)kiosk सेंटर | 2029 | 05/09/2014 | 896171 |
| 2 | 1)मालमत्ता कर भरणा पावती, पाणी पुरवठा कर पावती, जन्म मृत्यू प्रमाणपत्र इतर सेवा ग्रीव्हनॅवस व थकित देयके 2)kiosk सेंटर | 3203 | 01/12/2014 | 731000 |
| 3 | 1)मालमत्ता कर भरणा पावती, पाणी पुरवठा कर पावती, जन्म मृत्यू प्रमाणपत्र इतर सेवा ग्रीव्हनॅवस व थकित देयके 2)kiosk सेंटर | 4166 | 06/02/2015 | 731000 |
| 4 | 1)मालमत्ता कर भरणा पावती, पाणी पुरवठा कर पावती, जन्म मृत्यू प्रमाणपत्र इतर सेवा ग्रीव्हनॅवस व थकित देयके 2)kiosk सेंटर | 4207 | 12/02/2015 | 653797 |

एकून रक्कम रु.3011168

उपरोक्त नमुद केलेली 2014-15 मधील एकुण रक्कम रू 30,11,968/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.41 दि.22/07/2016 अन्वये खुलासा मागविण्यात आला असता विभागाचे दि.09/08/2016 च्या खुलासामध्ये सदरील निविदा नस्ती व करारनामा प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली आहे व असे म्हटले आहे. सदरील बाबतीत विभागाने निविदेची मुळ नस्ती व करारनामा उपलब्ध करून दिलेला नाही तसेच मुद्दा क्र. 2 नुसार कंत्राटदाराने वेगवेळया प्रकारच्या कर भरणा पावती, जन्म मृत्यु प्रमाणपत्र व इतर सेवा याबाबत बाबानिहाय वितरीत करण्यात आलेल्या एकुण प्रतींची संख्या याची एकत्रित संगणकीकृत माहिती/आकडेवारी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे विभागान दिलेला खुलासा सुसंगत नसल्याने सदरील अक्षेप मान्य करता येत नाही आक्षेपाधिन एकुण रक्कम रू. 30,11,968/-

DATRYJM7501 (Ref No : 35, Hmm No : 41)

## *60 उल्हासनगर-4 येथील ख्रिश्चन स्मशानभूमीची संरक्षण भिंत बांधणे कामात अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1517747.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1500000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 17747.00/-

***उल्हासनगर-4 येथील ख्रिश्चन स्मशानभूमीची संरक्षक भिंत बांधणे हे काम मजूर कामगार सहकारी संस्था यांना देण्यात आले सदर कामात शासन निर्णय सीएटी 01/05 प्र.क्र. 26 इमारत दि. 31/05/2005 यांचे पालन केलेले नाही. नियमानुसार गौण खनिज (स्वामित्वधन) रक्कम व कंत्राटी कामाचा विमा हया रक्कम शासन खाती जमा केले नसलेबाबत.***

| अ.क्र. | कामाचे नाव | मजूर सहकारी संस्थेचे नाव | प्रमाणक क्र. | दिनाक | अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-4 येथील ख्रिश्चन स्मशानभुमीची संरक्षण भिंत बांधणे | मे. गिता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. . | 3194 | 29/11/2014 | 15,00,000/- |
| | | | एकुण | | 15,00,000/- |

उपरोक्त कामासाठी खालील अधिनियम व शासन निर्णय मधील तरतुदीचा अवलंब केलेला नाही. मनपाने मजूर कामगार सहकारी संस्था यांच्याकडून कामे करुन घेतना दिसुन आलेली नाही.

1) शासन निर्णय क्र. सीएटी01/05/प्र.क्र.26/इमारीत दि. 31/05/2005 अन्वये 15 लाखापर्यंतची कामे नोंदणीकृत कंत्राटदार, बेरोजगार अभियंता, तसेच मजूर सहकारी संस्था यांना खालीलप्रमाणे वाटप करणे अवश्यक आहे.

I) पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार - 34%

II) सुशिक्षीत बेरोजगार अभियंता - 33%

III) मजूर सहकारी संस्था - 33%

रू. 15,00,000/- वरील कामे कंत्राटदार आणि बेरोजगार अभियंता यांना अनुक्रमे 66%, 34% या प्रमाणे देणे आवश्यक आहे. मात्र उल्हासनगर महानगरपालिकेने रू. 15,00,000/- पर्यंतची सर्व कामे मजूर सहकारी संस्थेकडून करून घेण्यात आल्याने इतर घटकांना कामाचे वाटप नियमानुसार टक्केवारी प्रमाणे करण्यात आलेले नाही. तसेच प्रचलित निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ उल्हासनगर महानगरपालिकेस झालेला नाही. सदरील मजूर कामगार सहकारी संस्था हया अ किंवा ब वर्ग आहे. यांचा उल्लेख डीडीआर ठाणे यांच्या पत्रात नमूद केलेले नाही त्यामुळे सदरील कामासाठी मर्यादेपेक्षा जास्त काम दिल्याची तपासणी करता येत नाही, त्यामुळे सार्वनजिक बांधकाम विभाग मुंबई-32 शासन निर्णय क्र. सी.एटी–07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 चे पालन झालेले नाही. मजूर नेमणेबाबत मे. गिता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. यांना काम देण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र. सीएटी-07/06/प्र.क्र. 94/इमा-2 दि. 16/11/2006 अन्वये मजूर कामगार सोसायटी यांना बांधकाम संदर्भातील कामे देणेबाबत आदेश आहेत परंतू, मजूर पुरवणेचे काम दिले आहे. ते देय ठरत नाही. तसेच सदरील मजूर सहकारी संस्था यांनी सदरील कामास मजूर पुरवेलेले आहेत Estimate अ.क्र. 3 मधील दर उल्लेख केलेला आहे परंतु कंत्राटदाराने मजारांचे परवाना पत्र नस्ती सोबत जोडलेले नाही. त्यामुळे कंत्राटदारने मजुर पुंरविले बाबत लेखा परीक्षणास खात्री झालेली

नाही.

2) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - 1949 मधील प्रकरण क्र. 73(ड) नुसार मा. आयुक्तांनी तसेच तत्सम अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराच्या मर्यादेत मंजुरी दिलेल्या कामासंदर्भात मा. स्थायी समितीस कामा मंजुरी दिल्यापासुन 15 दिवसाचा आत स्थायी समितीस कळविले पाहिजे त्यानुसार कोणतेही दस्ताऐवज लेखापरीक्षणास पाहवयास मिळालेले नाही.

3) महसूल व वनविभाग यांची अधिसूचना अन्वये व शा.नि.क्र. गौण खनिज 10/1009 सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली माती, वाळू, खडी, मुरूम इत्यादी गौण खानिजाचे स्वामित्वधन (रॉयल्टी) ची रक्कम घ.मी.रू. 70.67 प्रमाणे शासन खाती भरणे बंधनकारक आहे, याची खातरजमा मनपाकडून करण्यात आलेली नाही. गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून शासन खाती भरणा न केल्याने रू. 70.67 प्रती. घ.मी. प्रमाणे, प्रमाणक क्र. 3194 दि. 29/11/2014 यांची 31.79 घ.मी. करीता शासनाचे रू. 2247/- न भरल्याने शासनास महसूल जमा झाला नाही. ठेकेदाराने स्वामित्वधनाची रक्कम शासनाकडे भरणा केलेबाबतची पावती प्रमाणका सोबतही जोडलेली नाही. त्यामुळे लेखा परीक्षणास स्वामित्वधन रक्कम भरलेबाबतची खात्री करता आलेली नाही. तसेच राष्ट्रीय लेखा संहिता नियम क्र. 12:82 नुसार कामासाठी वापलेले माल/साहीत्य इत्यादी खरेदीची चलने/Invoice/वाहतूक पास ईत्यादी अभिलेखे कंत्राटदाराचे देयक प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करून घेणे आवश्यक होते त्याप्रमाणे तसे अभिलेखे लेखा परीक्षणास प्रत्यक्ष दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे लेखा परीक्षणास प्रत्यक्ष कामाच्या सत्यतेची खात्री करता आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जी.ईएन 1098/357/प्र.क्र. 165/98 नवि. 24 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई 03/11/2003 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे त्याप्रमाणे प्रमाणक क्र. 3194 दि. 29/11/2014 मधील देयकातील कामगाराचा विमा 1टक्का रक्कम रू. 15,000/- ही रक्कम देयकातून कपात केलेली नाही परंतु कामांच्या प्रमाणका मध्ये कंत्राटी कामाचा विमा रक्कम कपात केलेली आहे. तरी सदरील देयकातून कपात केलेली रक्कम ही नियमानुसार शासन भरणा केले किंवा कसे ते लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे शासनास रक्कम जमा झालेबाबतची लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

5) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परि. क्र. 24 मधील नियम क्र. 8 (एच) नुसार झालेल्या कामाची 5% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तपासणी केल्याचे अभिप्राय मोजमाप पुस्तिकेत नोंद केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदरील प्रमाणकासोबत जोडलेले मोजमाप पुस्तके यांच्यात कंत्राटदाराने कार्यादेश प्रमाणे कामाच्या साहित्य वर्गानुसार काम केले आहे तसे नमूद केलेले नाही तारखेनिहाय मोजमाप केलेबाबत अभियंताने वेगवेगळया Estimated कामाच्या तारखा लिहून काम तपासणीची स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे काम कालमर्यादित असतांना कंत्राटदाराने काम केव्हा केव्हा, केलेले आहे, त्याबाबत लेखा परीक्षणास मोजमाप पुस्तिकेतुन खात्री करता आलेली नाही. नस्ती सोबत कामा आगोदर कामाचे फोटो काढलेले नाही व त्यावर संबंधित अभियंता यांची तारखेनिहाय स्वाक्षरीही केलेली नाही. सदरील काम पूर्ण झाल्यानंतर कामाचे फोटो काढलेले नाही, त्यामुळे काम समाधानकारक पूर्ण झाले किंवा कसे याबाबत प्रत्यक्षात लेखा परिक्षणास खात्री झालेली नाही. कामाचे History/Sheet जोडलेले नाही कार्यादेशानुसार विहीत कालावधीत सदरील काम पूर्ण झाल्याबाबत संबंधित शाखा अभियंत्यांच्या कामाच्या पूर्णत्वाचा दाखला प्रमाणकासोबत पडताळीस उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष कामाच्या सत्येतची खात्री करता आलेली नाही.

6) बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सी.ए.07/05/प्र.क्र.15 इमा. 2 दि. 16/11/2006 मधील तरतूद क्र. 02 नुसार महानगरलिकेचे कार्यकारी अभियंता यांनी मजूर सहकारी संस्थाना कार्यादेश देण्यापूर्वी सदर संस्थेचे पासबुक तपासून एकवर्षात सदरील संस्थेस 50 लक्ष रक्कमेपेक्षा जास्त काम दिले जाणार नाही याची दक्षता घ्यावी असे असतांना याबाबतचे कोणतेही दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध झालेले नाही त्यामुळे कामाची सत्यतेची लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही.

7) नोंदणी महानिरीक्षक व मुद्राक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र. 12/कलम 34/133/09 दि. 20/07/2009 नुसार कंत्राटी रक्कमेच्या रू. 10 लाखाकरीता रू. 100/% व पुढील लाख रूपयास रूपये 100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. कंत्राटाची एकूण रक्कम रू. 15,00,000/- वर रू. 100/- इतकी मुद्रांक नोंदणी शुल्काच्या पेपरवर करारनामा

करण्यात आला आहे. त्यामुळे रक्कम रू. 500/- ची निविदा धारकाकडून रक्कम वसुल करून शासनाकडे जमा केलेली नाही
तरी सदरील कामबाबतच्या प्रमाणकांची एकत्रित रक्कम रू 15,00,000/- आक्षेपधिन व रक्कम रू. 17,747/-( कामगारांचा विमा रू. 15000 + स्वामित्वधन रक्कम रू. 2247/- +मुद्रांक शुल्क 500) वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.
वरील अनयमिततेबाबत अर्धसमास क्रमांक 78 दि. 25/08/2016 अन्वये विभागास कळविले असता विभागाकडून लेखा परिक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत अनुपालन प्राप्त झालेले नाही.

DATRYJM7501 (Ref No : 36, Hmm No : 78)

## *61 2014-15 मध्ये उदयान कामाबाबतीत मजूर कामगार सहकारी संस्था यांना देण्यात आलेल्या कामातील अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1867987.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1849631.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 18356.00/-

***उदयान कामात मंजूर कामगार सहकारी संस्था यांना देण्यात आलेल्या कामात शासन निर्णय क्र. सीएटी 01/05/प्र.क्र.26 इमारत महाराष्ट्र प्रातिंक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण क्र. ड कलम 73 (ड) नुसार ची कामास मंजूरी घेतलेली नाही. तसेच नियमानुसार गौण खनिज स्वामित्वधन रक्कम कंत्राटी कामाचा विमा हया रक्कमा शासनखाती जमा न केलेबाबत.***

बांधकाम विभाग अंतर्गत लेखा शिर्ष उदयाने बनविणे दुरूस्ती करणे इतर या लेखा शिर्ष अंतर्गत खालील प्रमाणे खर्च करून मनपाने वेगवेगळया प्रकारची कामे मजूर कामगार संस्था यांचेकडून करुन घेतलेली आहे. ते उदाहरणदाखल निवड महिना मार्च 2015 मधील प्रमाणकांची एकत्रित देयक रक्कम रू 18,49,631/- खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र | कामाचे नाव | मजूर सहकारी संस्थेचे नाव | प्रमाणक क्र. | दिनांक | अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्षेत्र क्रमांक – 1 मधील उदयानामध्ये काम करण्याकरीता माळी, मजूर नेमणेबाबत. | मे. जगदंबा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. अंबरनाथ | 4543 | 09/03/2015 | 4,49,631/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | उल्हासनगर – 5 येथील शकुन अपार्टमेंट जवळील उदयानाचे सुशोभिकरण करणे व विविध कामे करणे | मे. विश्वनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. उल्हासनगर | 4884 | 27/03/2015 | 5,00,000/- |
| 3 | उल्हासनगर -5 येथील स्वामी सोभराज उदयानाचे व त्रिलोकदास उदयानाचे सुशोभिकरण व दुरूस्ती करणे | मे. सिध्दनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. उल्हासनगर | 4922 | 31/03/2015 | 9,00,000/- |
| एकुण | | | | | 18,49,631/- |

उपरोक्त कामासाठी सदरील अधिनियम व शासन निर्णय यांचा अवलंब करून मनपाने मजूर कामगार सहकारी संस्था यांच्याकडून कामे करुन घेतलेली दिसुन आलेली नाही.

1) शासन निर्णय क्र. सीएटी01/05/प्र.क्र.26/इमारत दि. 31/05/2005 अन्वये 15 लाखापर्यंतची कामे नोंदणीकृत कंत्राटदार, बेरोजगार अभियंता, तसेच मजूर सहकारी संस्था यांना खालीलप्रमाणे वाटप करणे अवश्यक आहे.

I) पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार - 34%

II) सुशिक्षीत बेरोजगार अभियंता - 33%

III) मजूर सहकारी संस्था - 33%

रू. 15,00,000/- वरील कामे कंत्राटदार आणि बेरोजगार अभियंता यांना अनुक्रमे 66%, 34% या प्रमाणे देणे आवश्यक आहे. मात्र उल्हासनगर महानगरपालिकेने रू. 15,00,000/- पर्यंतची सर्व कामे मजूर सहकारी संस्थेकडून करून घेतल्याने इतर घटकांना कामाचे वाटप नियमातील टक्केवारी प्रमाणे करण्यात आलेले नाही. तसेच प्रचलित निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ उल्हासनगर महानगरपालिकेस झालेला नाही.सदरील मजूर कामगार सहकारी संस्था हया अ किंवा ब वर्ग आहेत. यांचा उल्लेख डीडीआर ठाणे यांच्या पत्रात नमूद केलेला नाही. परणामी वर्गवारीच्या मर्यादेत अथवा मर्यादेपेक्षा जास्त काम दिल्याची तपासणी करता येत नाही. तसेच सार्वनजिक बांधकाम विभाग मुंबई-32 शासन निर्णय क्र. सी.एटी–07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 चे पालन झालेले नाही. प्रमाणक क्र. 4543 दिनांक 09/03/2015 प्रभाग क्षेत्र क्र. 1 मधील उदयानामध्ये काम करण्याकरीता माळी, मजूर नेमणेबाबत मे. जगदंबा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. अंबरनाथ यांना काम देण्यात आले आहे. तथापि सदर शासन निर्णयानुसार मजूर कामगार सोसायटी यांना बांधकाम संदर्भातील कामे देणेबाबत आदेश आहेत. परंतू, मजूर पुरवणेचे काम दिले आहे. ते देय ठरत नाही.

2) कुशल कामगार व मजूर पुरवणे, कामाचे अंदाजपत्रक बनवितांना मजूरी दर निश्चित करताना इएसआाय, पीएफ, सेवाकर कामगार कल्याण निधी हया बाबी विचारात घेउन दर निश्चित करणे आवश्यक आहे. प्रमाणका सोबत मजूरीदराचे दर पृथ:करण केलेबाबतचे पत्रक जोडलेले नाही. तसेच किमान वेतन कायदयानुसार वेतन दिल्याचे अभिलेख लेखा परीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. मजूर कामगार सोसायटी यांचेकडे मजूर पुरवण्याचा परवाना नसतांना काम देणे हे नियमाबहय झाले असल्याचे दिसून येते.

3) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - 1949 मधील प्रकरण क्र. 73(ड) नुसार ज्यात पाच लाख रूपयांपेक्षा अधिक परंतु पंचवीस लाख रूपये किंवा खंड(क) अन्वये त्या वेळी विहित करण्यात येईल अशी त्याहून अधिक रक्कम यापेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्भूत असेल अशा, आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्याने अशी संविदा केल्याच्या तारखेपासून पंधरा दिससांच्या आत स्थायी समितीस कळविली पाहिजे.

4) महसूल व वनविभाग यांची अधिसूचना अन्वये व शा.नि.क्र. गौण खनिज 10/1009 सीआर/309/ख दि.11/02/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली माती, वाळू, खडी, मुरूम इत्यादी गौण खानिजाचे स्वामित्वधन (रॉयल्टी)

ची रक्कम घ.मी.रू. 70.67 प्रमाणे शासन खाती भरणे बंधनकारक आहे, याची खातरजमा मनपाकडून करण्यात आलेली नाही. गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून शासन खाती भरणा न केल्याने रू. 70.67 प्रती. घ.मी. प्रमाणे, प्रमाणक क्र. 4884 दि. 27/03/2015 व प्रमाणक क्र. 4922 दि. 31/03/2015 यांची एकत्रित 41.64 घ.मी. करीता शासनाचे रू. 4356/- न भरल्याने शासनास महसूल जमा झाला नाही. ठेकेदाराने स्वामित्वधनाची रक्कम शासनाकडे भरणा केलेबाबतची पावती प्रमाणका सोबत जोडलेली नाही. त्यामुळे लेखा परीक्षणास स्वामित्वधन रक्कम भरलेबाबतची खात्री करता आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जी.ईएन 1098/357/ प्र.क्र. 165/98 नवि. 24 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई 03/11/2003 नुसार कंत्राटदाराने कंत्राटी कामांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे त्याप्रमाणे प्रमाणक क्र. 4884 दि. 27/03/2015 व प्रमाणक क्र. 4922 दि. 21/03/2015 मधील देयकातील कंत्राटी कामाचा विमा 1टक्का रक्कम रू. 5000/- व रक्कम रू. 9000/- हया रक्कमा देयकातून कपाती केलेल्या नाहीत, तसेच काही कामांच्या प्रमाणकात कंत्राटी कामाचा विमा रक्कम कपात केलेली आहे. परंतू सदरील देयकातून कपाती केलेल्या रक्कमा हया नियमानुसार शासन भरणा केले त्याबाबतचे दस्ताऐवज लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.

6) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परि. क्र. 24 मधील नियम क्र. 8 ( एच) नुसार झालेल्या कामाची 5% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तपासणी केल्याचे अभिप्राय मोजमाप पुस्तिकेत नोंद केल्याचे दिसून येत नाहीत. तसेच सदरील प्रमाणकासोबत जोडलेल्या मोजमाप पुस्तकेत तारखे निहाय पुर्ण केलेल्या कामाच्या बाबीनिहाय नोंदी पर्यवेक्षकांकडून घेण्यात आलेल्या नाहीत. परिणामी कार्यादेशात विहीत केलेल्या कालमर्यादेतच सदरचे काम पुर्ण झाले अथवा विलांगने पुर्ण झाले याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

7) नस्तीसोबत सदरचे काम पुर्ण होण्यापुर्वीचे फोटो व संबंधीत अभियंत्याची दिनांकीत स्वाक्षरी तसेच काम पुर्ण झाल्यानंतरचे फोटो व त्यावर दिनांकीत स्वाक्षरी हे दस्तऐवज लेखापरीक्षणास आढळून आले नाहीत. परिणामी विकास कामापुर्वीची स्थिती व काम पुर्ण झालेनंतरची स्थिती याबाबत लेखापरिक्षणास तुलनात्मक खात्री करता आली नाही.

तरी सदरील कामबाबतच्या प्रमाणकांची एकत्रित रक्कम रू 18,49,631/- आक्षेपधिन व रक्कम रू. 18356/- (स्वामित्वधन रक्कम रू. 4356 + कंत्राटी कामाचा विमा रूपये 14000/-) वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. याबाबत वरील अनियमिततेचे अर्धसमास पत्रक क्र. 77 दि.25/08/2016 नुसार विभागास विचारणा केली असता विभागाने लेखापरिक्षणाचे अतिंम तारखेपर्यंत कोणतेही अर्धसमासाचे उत्तर दिलेले नाही.

DATRYJM7501 (Ref No : 41, Hmm No : 77)

## *62 उल्हासनगर वाल्मिकी वसाहत या ठिकाणचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत झाल्याने त्या कामात अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 22320957.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 21065505.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1255452.00/-

***उल्हासनगर वाल्मिकी वसाहत या ठिकाणंचे घरकुलांचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत झाल्याने कामाची मुळ निविदा नस्ती दाखविण्यात आलेली नाही. तांत्रिक लिफाफे व वाणीज्यक दरपत्रके व सुधारीत करारनामा लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण-5 नुसार संविदा करणे नियम-1 संविदा करण्याची पध्दत व नियम-2 विवक्षित संविदासाठी प्रचलित निविदा मागविणे यांचा अवलंब केलेला दिसून येत नाही. मान्य निविदेची सुरक्षा अनामत रक्कम नियमानुसार कंत्राटदारकडून भरून घेतलेली नाही. महाराष्ट्र शासन यांचेकडील नोटीफीकेशन क्र. व्हॅट-1506/सी.आर.134/टॅकसेशनदि. 31/11/2006 अन्वये बांधकामावरील ठेक्यावर कंत्राटदाराकडून 5% व्हॅट कपात करणे आवश्यक आहे कंत्राटदाराच्या देयकातून वॅट कपात केलेला नाही. स्थानिक संस्था कर नियम 2010 नियम 27 मधील (5) महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हती घेतलेल्या कंत्राटदाराने प्रदान करावयाची ठोक रक्कम महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोणतेही कामहाती घेणा-या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करावयाच्या किंवा त्यांच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर कपात केलेला नाही व कामगारांचा शासकीय विमा निधी कपात करून तसा शासनाकडे भरलेला नाही.***

उल्हासनगर वाल्मिकी वसाहत या ठिकाणचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजने अंतर्गत झाल्याने त्या कामाचे प्रमाणक नस्तीचे लेखा परीक्षण केले असता.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियानांअंतर्गत शहरी गरीबांसाठी मुलभुत सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत DPR-1 मधील वाल्मिकी वसाहत व राहुलनगर येथील 600 घरकुलाचे रू. 35.38 कोटी रक्कमेचे सविस्तर प्रकल्प आराखडा सल्लागार मे. सुभाष पाटील असोसिएटस यांचेकडून तयार करून घेउन म्हाडाच्या मान्यतेनंतर राज्यस्तरीय सुकाणु समितीची दि. 29/12/2008 व केंद्रस्तरीय सुकाणू समितीची दिनांक 03/02/2009 रोजीच्या बैठकीत मंजुरी प्राप्त झाल्यावर त्याची निविदा कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

सदरचे निविदा प्रक्रियेबाबत मे. माधव कन्स्ट्रक्शन यांनी शासनास केलेल्या तक्रारीनुसार शासनाने दिनांक 20/01/2009 पासून स्थगिती दिल्यामुळे योजनेचे काम बंद ठेवण्यात आले होते. सदरचा स्थगन आदेश शासनाचे दि. 25/05/2009 चे पत्रानुसार रद्द करण्यात आला, त्यानंतर मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या संस्थेस दिनांक 25/08/2009 रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते, सदर कामासाठी 18 महिने मुदत होती तदनंतर दिनांक 25 फेब्रुवारी, 2011 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

त्यानंतर, वाल्मिकी वसाहत येथील सफाई कामगारांच्या चार इमारती खाली करून तेथील सफाई कामगारांना अन्य जागी स्थलांतरीत करणेत आल्यानंतर सदर इमारती निष्कांसित करणेची कार्यवाही दि. 25/12/2012 रोजी करण्यात आली.

सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर योजनेतील इमारतींचे बांधकाम सुरू करणेचे होते, बीएसयुपी योजनेसाठी शासनाने यापूर्वी मार्च 2014 पर्यंत मुदतवाढ दिली होती. त्यानंतर म्हाडाने दि. 26/09/2013 च्या पत्रान्वये या योजनेचा कालावधी केंद्र शासनाने मार्च 2015 पर्यंत वाढवून दिलेला आहे. सदर पत्रामध्ये "केंद्र शासनाचे क्र. 2 दि. 18/09/2013 च्या पत्रान्वये हा कालावधी दि. 31 मार्च 2015 पर्यंत वाढवून बीएसयुपी योजनेकरीता वितरीत करावयाच्या निधीची सुधारीत पध्दत नमुद केली होती. तसेच ज्या योजना सुरू झालेल्या नवत्या अशा योजना रद्द करण्याचे प्रस्ताव दि. 31 ऑक्टोबर, 2013 पर्यंत राज्य शासनास पाठवून राज्य शासनाच्या परवानगीने आठ दिवसात केंद्र शासनास पाठववयाच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

त्याअनुषंगाने उल्हासनगर महापालिकेसाठी बीएसयुपी योजनेअंतर्गत DPR-1 व DPR-II प्रमाणे प्रस्तावित योजनेबाबत

मा. महासभेपुढे DPR-1 मधील राहुलनगर व DPR-II मधील राजीवगांधी, बाळकृष्णनगर या वसाहतीच्या घरकुलांची बीएसयुपी मधील, योजना रद्द करून राजीव आवास योजनेअंतर्गत शासनाकडुन मान्यतेसाठी व DPR-1 मधील वाल्मिकी वसाहत योजनेचे काम सुरू असल्याने वाढीव मुदतीत सदर काम पूर्ण करण्यास व त्याअनुषंगाने सदर कामाची प्राकलने संबंधित सल्लागाराकडुन सुधारित करणेसाठी प्रस्तावित केले होते. त्यानुसार या प्रस्तावास मा. महासभेने ठराव क्र. 38, दिनांक 25/11/2013 नुसार DPR-1 मधील वाल्मिकी वसाहत या ठिकाणचे घरकुलाचे काम श्रमसाफल्य योजनेअंतर्गत त्याच ठेकेदारांकडुन करुन घ्यावे असे म्हटले आहे व DPR-1 मधील राहुलनगर व DPR-II मधील राजीव गांधीनगर व बाळकृष्णनगर या वस्तीसाठी सुधारित आराखडा तयार करुन राजीव आवास योजनेअंतर्गत प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. असे नमूद आहे. तरी सदरील श्रमसाफल्य योजनेच्या कामाबाबतची खर्च केलेली रक्कम प्रमाणके यांचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) मे. कोणार्क इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना सदरील कामासाठी दि. 25/08/2009 अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे तरी सदरील कामाबाबतची मुळ निविदा नस्ती, तांत्रिक लिफाफे व वाणीज्यक दरपत्रके व सुधारीत करारनामा लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण-5 नुसार संविदा करणे नियम-1 संविदा करण्याची पध्दत व नियम-2 विवक्षित संविदासाठी प्रचलित निविदा मागविणे यांचा अवलंब केलेला दिसून येत नाही. तसेच सदरील निविदा नस्ती लेखा परीक्षण कालावधीत मागणी करुनही विभागाने निविदा नस्ती न दिल्यामुळे लेखा परीक्षणास निविदा केली किंवा कसे याबाबत खात्री झालेली नाही.

2) बीएसयुपी योजना रद्द झाल्यानंतर महानगरपालिकेच्या निधीतून महासभा ठराव क्र. 38 नुसार श्रमसाफल्य योजनेमधून करण्यासाठी एक इमारत तळमजला + सात मजले व इतर 3(तीन) इमारी + चार मजले अशा पध्दतीने बांधण्यासाठी सुधारीत नकाशे तयार करून त्यानुसार सहाय्यक संचालक नगररचना यांची मान्यता घेतले बाबतची दस्तऐवज लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नसल्याने. त्यामुळे योजनेच्या सुधारीत नकाशात किती इमारती बांधणार आहे. याबाबत लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही.

3) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध कामांसाठी विहीत पध्दतीने कार्यवाही करून त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. 76 दि. 05/02/2014 नुसार मान्यता दिल्यानंतर पाच सल्लागारांची विविध कामांसाठी स्थापत्य सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे त्यामध्ये मे. स्पर्श प्रतिष्ठान यांना श्रमसाफल्य योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून दि. 01/08/2014 च्या आदेशान्वये नियुक्ती केली आहे. परंतु मे. स्पर्श प्रतिष्ठान यांचा कार्यादेश व त्याअनुषंगाने करारनामा तसे मे. स्पर्श प्रतिष्ठान यांना सल्लागार फी किती देणेसाठी करारनामा केलेला आहे याबाबत लेखापरीक्षणास कोणतेही दस्ताऐवज दिलेले नसल्याने मे. स्पर्श प्रतिष्ठान हे श्रमसाफल्य योजनेचे सल्लागार असल्याबाबतची लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही.

4) श्रमसाफल्य योजनेत मे. कोणर्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना देयके अदा केलेबाबतची धावते देयके यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 103 IV$^{th}$ RA Bill | 11/04/2014 | रु. 70,43,680/- |
| 2 | 4947 5$^{th}$ to 11$^{th}$ RA Bill | 31/03/2015 | रु. 1,40,21,825/- |

उपरोक्त प्रमाणकांत कपाती करावयाच्या रक्कमा हया नियमानुसार केलेल्या नाही. त्यापुढील प्रमाणे आहे.

अ) प्रमाणक क्र. 103 दि. 11/04/2014 ची एकुण स्थूल रक्कम रू.70,43,680/- अशी आहे

1) सदरील रक्कमेवर सुरक्षा अनामत रक्कम ही 2.5% कपात केलेली आहे रक्कम रू. 1,76,092/- आहे मुळ निविदा नस्ती मान्य निविदेच्या 5% सुरक्षा अनामत रक्कम भरलेबाबत लेखापरीक्षणास दाखविण्यात न आल्याने ही रक्कम नियमानुसार 5% रू. 3,52,184/- अशी करणे आवश्यक आहे तरी कपात केलेली रक्कम रू. 1,76,092/- वजा करून

शिल्लक वसुल पात्र रक्कम रू. 1,76,092/- आहे.

2) महाराष्ट्र शासन यांचेकडील नोटीफीकेशन क्र. व्हॅट-1506/सी.आर.134/टॅक्सेशनदि. 31/11/2006 अन्वये बांधकामावरील ठेक्यावर कंत्राटदाराकडून 5% व्हॅट कपात करणे आवश्यक आहे तसे कंत्राटदाराचे तांत्रिक कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात न आल्याने कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करून शासन खाती भरणा करावयाची आहे परंतू तशी केलेली नाही. तरी व्हॅट कपात केलेली रक्कम रू. 1,40,876/- एवढी आहे प्रत्यक्षात 5% कपात रक्कम ही रू. 3,52,184/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेली रक्कम रू. 1,40,874/- वजा करून रक्कम रू. 2,11,310/- वसुलपात्र आहे.

3) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जी.एंन 1098/357/प्र.क्र. 165/98 नवि-24 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दि. 03/11/2003 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा शासकिय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे त्याप्रमाणे कामगार विमा रक्कम ही स्थूल रक्कम रू. 70,43,680/- मधून 1% कपात केलेली नाही वसुलपात्र रक्कम रू. 70,437/- आहे.

4) स्थानिंक संस्थ कर नियम 2010 नियम 27 मधील (5) महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेतलेल्या कंत्राटदाराने प्रदान करावयाची ठोक रक्कम महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोणतेही कामहाती घेणा-या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिंक संस्था कर प्रदान करावयाच्या किंवा त्यांच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर प्रदान केलेला नाही त्यामुळे सदरील प्रमाणकातील रक्कमेवर स्थानिक संस्थाकर रक्कम 0.25% ही स्थूल रक्कम रू. 70,43,680/- मधून कपात केलेली नाही ती वसुलपात्र रक्कम रू. 17,609/- आहे.

कलम 87 अन्वये अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ठ नसलेली रक्कम कलम 86, पोट-कलम(2) खंड (ई),(फ),(ग), किंवा (ह) अन्वये कोणतीही रक्कम खर्च केली असेल तेव्हा त्याने ज्या परिस्थितीत ती रक्कम खर्च केली असेल ती परिस्थिती स्थायी समितीला ताबडतोब कळवली पाहीजे असे असतांना सदरील प्रमाणक क्र. 103 दि. 11/04/2014 ची स्थूल रक्कम रू. 70,43,680/- ही मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांना अदा केलेली आहे. तरी सदरील खर्च केलेली रक्कम ही मनपा फंडातून करणे आवश्यक असतांना सदरील खर्च केलेली रक्कम हा विशेष निधी spL. Grant A/c. 913010021735101 मधून खर्च केलेला आहे याबाबत खुलासा करावा.

ब) प्रमाणक.क्र. 4947 दि. 31/03/2015 ची एकुण स्थुल रक्कम रू. 1,40,21,825/- अशी आहे.

1) सदरील रक्कमेवर सुरक्षा अनामत रक्कम ही 2.5% कपात केलेली आहे ती रक्कम रू. 3,50,546/- एवढी आहे ही रक्कम नियमानुसार 5% रू. 7,01,092/- अशी करणे आवश्यक आहे तरी कपात केलेली रक्कम रू. 3,50,546/- वजा करून शिल्ल्क वसुलपात्र रक्कम रू. 3,50,546/- आहे.

2) महाराष्ट्र शासन यांचेकडील नोटिफिकेशन क्र. व्हॅट-1506/सी.आर.134/टॅक्सेशनदि. 31/11/2006 अन्वये बांधकामावरील ठेक्यावर कंत्राटदाराकडून 5% व्हॅट कपात करणे आवश्यक आहे तसे कंत्राटदाराचे तांत्रिक कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात न आल्याने कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करून शासन खाती भरणा करावयाची आहे परंतू तशे केलेले दिसून येत नाही. व्हॅट कपात केलेली रक्कम रू. 2,80,438/- एवढी आहे प्रत्यक्षात 5% कपात रक्कम ही रू. 7,01,092/- कपात करणे आवश्यक कपात केलेली रक्कम रू. 2,80,438/- वजा करून रक्कम रू. 4,20,654/- वसुलपात्र आहे.

3) स्थानिक संस्था कर नियम 2010 नियम 27 मधील (5) महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हती घेतलेल्या कंत्राटदाराने प्रदान करावयाची ठोक रक्कम महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोणतेही कामहाती घेणा-या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करावयाच्या किंवा त्यांच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर कपात केलेला नाही त्यामुळे सदरील प्रमाणकातील रक्कमेवर स्थानिक संस्था कर रक्कम 0.25% ही स्थुल रक्कमेवर करणे आवश्यक L.B.T. कपात केलेली रक्कम रू. 26,251/- अशी असून, स्थूल रक्कमेवरील 0.25% स्थानिक संस्था कर रक्कम रू. 35,055/- आवश्यक स्थानिक कपात केलेली रक्कम रू. 26,251/- वजा करून रक्कम रू. 8,804/- वसुलपात्र आहे.

उपरोक्त अक्षेपाबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र. 151 दि.29/11/2016 अन्वये खुलासा मागविला असता

विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे त्यामुळे एकूण आक्षेपधीन रक्कम रू. 2,10,65,505/- व एकुण वसुल पात्र रक्कम रू. 12,55,452/- (सुरक्षा अनामत रक्कम रू. 526638/- + मुल्यवर्धित कर रूपये 6,31,964/- + स्थानिक संस्था कर रूपये 26,413/- + कामगारांचा विमा निधी रू. 70,437/-)

DATRYJM7501 (Ref No : 44, Hmm No : 151)

## *63 सेंच्यूरी टोडलर शाळेसमोर सी.सी.गटार बांधणे बंदीस्त करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 895000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 895000.00/-

***प्रस्तुत सी.सी. गटार बांधणे व बंदीस्त करणे हे काम आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत करणेत आले असून सदरचा कामाचा कंत्राट श्री गणेश मजूर सहकारी संस्था यांना देण्यात आला असून या कामावरती एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात सी.सी. गटार बांधणे या कामाचे तांत्रीक अधिकारी यांनी मंजूर केलेले प्राकलन तसेच मोजमाप नोंदवहीतील मोजमापे यांची तपासणी केली असता बाब क्र. 1 व बाब क्र. 2 नुसार मातीमध्ये व स्लश मध्ये त्रुटी आढळून आल्या, सदर गटार भिंत (वॉल) बांधण्याचे काम पूर्ण झलेवर सदर गटारावर स्लॅब टाकणेसाठी बाब क्र. 6 नुसार एम 20 सिमेंट क्रॉक्रीटचा पुरवठा केलेला आहे. नोंद वहीत चुकीची नोंद घेतली आहे***

प्रशासकीय मंजुरी :- जिल्हा अधिकारी यांचे निधी वितरण पत्र. क्र. जिनिस/आस्थाविका/14-15/1335 दि. 16/08/2014

तांत्रीक मंजूरी:- नगर अभियंता

अंदाजपत्रकिय रक्कम :- रू. 9,00,000/-

कार्यादेश :- युएमसी.पीडबल्यूडी. 1440 दि. 10.09.2014

मक्तेदार :- श्री गणेश मजूर कामगार सहकारी संस्था

कामाची मुदत :- 6 महिने

काम पूर्ण :- 15/12/2014

मोजमाप नोंदवही:- 6094 पान क्र. 1 ते 4

झालेला खर्च - रू. 8,95,000/-

प्रमाणक क्र. 3655 दि. 07/01/2015

---

प्रस्तुत सी.सी.गटार बांधणे व बंदीस्त करणे हे काम आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत करणेत आले असून सदरचा कामाचा कंत्राट श्री गणेश मजूर सहकारी संस्था यांना देण्यात आला असून या कामावरती एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

प्रस्तुत सी.सी.गटार बांधणे या कामाचे तांत्रीक अधिकारी यांनी मंजूर केलेले प्राकलन तसेच मोजमाप नोंदवहीतील मोजमापे यांची तपासणी केली असता बाब क्र. 1 व बाब क्र. 2 नुसार मातीमध्ये व स्लश मध्ये खालीलप्रमाणे खेदाई करणेत आलेली आहे.

10.55 मीटर लांबी X 9.3 मी. रुंदी X 1 मी. उंची = 98.115 घन मीटर

बाब क्र. 4 नुसार रबल सोलींग:-

10.55 मी.लांबी X 9.3 मी. रुंदी X 0.30 से.मी. रुंदी = 29.434 घन मीटर

बाब क्र. 5 नुसार (एम 15) चे ट्रॅपमेटल फॉर फॉउंडेशन गटार वॉल

= 10.55 मी.लांबी X 9.3 मी. रुंदी X 0.30 से.मी. रुंदी = 29.434 घन मीटर सदर गटार भिंत (वॉल) बांधण्याचे काम पूर्ण झलेवर सदर गटारावर स्लॅब टाकणेसाठी बाब क्र. 6 नुसार

खालीलप्रमाणे एम 20 सिमेंट क्रॉक्रीटचा पुरवठा केलेला आहे.

2 बाजू X 10.55 मी. लांबी X 0.98 मी. रुंदी X 5.7 मी.उंची =

= 117.865 घनमीटर

याबाबत असा अभिप्राय देण्यात येतो की प्रस्तुत गटार बांधकामासाठी खोदाईची उंची बाब क्र. 1 व 3. नुसार एकूण 2 मीटर झालेली असताना दोनही बाजूस टाकणेत आलेल्या लॅब ची उंची 5.7 मीटर ने मोजमाप नोंदवहीत चुकीचे नोंदवून तसेच स्लॅबची रुदी देखील 9.3 मीटर घेणे आवश्यक असताना स्लॅबासाठी रंदीचे मापे 0.98 से.मी. नोंदविल्याने एकूण झालेले काम तंत्रीकदृष्टया निकृष्ट दर्जाचे प्रत्यक्ष दर्शनी झाल्याचे दिसून येते याबाबत अर्ध समास क्र.129 दिनांक24/10/2016 नुसार खुलासा मागविला असता विभागाचे उत्तर अप्राप्त आहे.त्यामुळे एकूण झालेला खर्च रक्कम रु. 8,95,000/- तपासणीत आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.आक्षेपाधीन खर्च रु. 8,95,000/- (आमदार निधी खर्च)

DATAPJF8101 (Ref No : 107, Hmm No : 49)

## *64 उल्हासनगर महानगरपालिका शाळेमधील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करणे कामातील अनियमितता झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

उल्हासनगर महानगरपालिका

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 16018689.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 15255894.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 762795.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका शाळेमधील विद्यर्थ्यांना गणवेश पुरवठा करणेचच्या कामी निविदा जाहिरात करणेचा अगोदर गणवेश खरेदीसाठी स्थानिक बाजारातून बाजारभावाशी तुलना करून अपेक्षित अंदाजीत रक्कम निश्चित केलेली नाही. सदरील गणवेश खरेदी करणेसाठी ई-टेंडरींग प्रणाली वापर करणेसाठी दि. 16 जानेवारी 2013 च्या शासन निर्णयान्वये ही मर्यादा रू 10 लक्ष करण्यात आली होती त्यानुसार विभागाने नियमानुसार ई-टेडरींग प्रणाली वापरून विदयार्थ्यांना शालेय गणवेश खरेदी करणेत आलेले नाही, त्यामुळे निविदा स्पर्धात्मक व जास्तीत जास्त पारदर्शक निविदा झाली नाही. नियमानुसार निविदा प्रक्रिया ई-टेंडरींग प्रणाली वापरून केलेली नाही. त्यामुळे स्पार्धत्मक निविदा झालेली नाही विदयार्थ्यांना गणवेश वाटप शाळेनिहाय संकलित नोंदवही व शाळेकडील साठा नोंदवही लेखापरिक्षणास दाखविण्यात आलेली नाही. 30 नोंव्हेंबर ला विदयार्थी पटपडताळणी प्रमाणित न केल्याने किती विदयार्थ्यांना गणवेश वाटप केले याबाबत नक्की खात्री झालेली नाही. पुरवठादारांनी सुरक्षा अनामत रक्कम म्हणून बॅक गॅरंटी स्वरूपात सादर केलेली आहे सदरील बॅक गॅरंटी लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेली नाही.***

1) कामाचे नाव :- मनपा प्राथमिक शाळा मुले यांना गणवेश पुरवठा करणेबाबत.
कार्यादेश मुले गणवेश पुरवठा :- जा.क्रा./मनपा/प्रा/शि.मं.अ./शिक्षण/627/13 दिनांक 01/10/2013
पुरवठा कालावधी :- 90 दिवस
पुरवठादाराचे नाव :- मे. जी.एस.एन.असोसीएटेस
2) कामाचे नाव :- मनपा प्रामिक शाळा मुली यांना गणवेश पुरवठा करणबाबत.
कार्यादेश मुली गणवेश पुरवठा :- जा.क्रा./मनपा/प्रा/शि.मं.अ./शिक्षण/632/13 दिनांक 03/10/2013
पुरवठा कालावधी :- 90 दिवस
पुरवठादाराचे नाव :- मे. प्रभु लिंक
प्रदानाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रूपये |
|---|---|---|
| A-3 | 02/12/2013 | 25,30,487/- |
| A-1 | 02/12/2013 | 31,66,606/- |
| A-12 | 12/04/2014 | 26,37,732/- |

| | | |
|---|---|---|
| A-13 | 12/04/2014 | 26,91,020/- |
| A-15 | 12/04/2014 | 20,72,724/- |
| A-16 | 12/04/2014 | 21,57,325/- |
| | एकुण | 1,52,55,894/- |

प्राथमिक शिक्षण विभागातील विदयार्थ्यांना सन 2013-14 व 2014-15 मध्ये गणवेश पुरवविणेबाबतच्या खर्चाच्या नस्तीचे लेखा परीक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

मा. आयुक्त यांचा दि. 22/07/2013 रोजीच्या मान्यतेनुसार सन 2013-14 व 2014-15 चा वर्षासाठी Off Line निविदा प्रक्रिया पूर्ण करूण इयत्ता 1 वी ते 7 वी विद्यांर्थासाठी गणवेश खरेदी करणेसाठी न्युनत्म दरपत्रधारक मे. जी.एस.एन.असो.व मे. प्रभु लिंक यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे तसा करारनामा ही केलेला आहे.

2013-14 व 2014-15 च्या आर्थिक वर्षातील मनपा शाळातील विदयार्थ्यांना गणवेश पुरवठा करणेबाबत मा. आयुक्त यांनी दि. 22/07/2013 रोजी मंजूरी दिली आहे. त्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण विभागाने दि. 15/08/2013 रोजीच्या पुण्यनगरी, नगर न्यूज, व अमृत कलश हया वर्तमानपत्रात जाहीरात देउन 2013-14 व 2014-15 चा दोन वर्षाकरीता गणवेश पुरवठा करणेसाठी जाहिरात दिली आहे.

वर्तमानपत्रमंध्ये दिलेल्या जाहीराती प्रमाणे निविदा विक्री कालावधी दि. 16/08/2013 ते दि. 28/08/2013 रोजी असा होता निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. 29/08/2013 रोजी एकूण तीन निविदाधारकांनी गणवेश नमूने तसेच इसारा अनामत रक्कमेचा (EMD) भरणा केलेला आहे. निविदाकार 1) मे. प्रभु लिंक. 2) जी.एस.एन. असोसिएटस 3) राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ ( मर्या) सदरील निविदा पुरवठादारांच्या समक्ष निविदा दि. 30/08/2013 रोजी उघडल्या आहे

सदरील गणवेश खरेदीसाठी अपेक्षित अंदाजपत्राकीय रक्कम एकुण विदयार्थी 8631 असून 28 शाळेतील इयत्ता 1 ली ते 7 वी मुले यांच्यासाठी रक्कम रू. 24,47,240/- व मुली यांच्यासाठी रक्कम रू. 23,82,979/- ही कशाच्या आधारे घेण्यात आली आहे? याबाबत अभिलेख नस्तीत उपलब्ध झाले नाही. तसेच इयत्ता 1 ली ते 7वीच्या विदयार्थ्याकरीता गणवेश पुरवठा करण्यात आले असून त्यांचे दर निविदा प्रक्रिया करणेच्या अगोदर बाजारभावाशी तूलना करून अपेक्षित अंदाजीत रक्कम निश्चित करणे आवश्यक आसतांना तसे केले नाही.तरी अपेक्षित अंदाजपत्रकांत एकुण रक्कम रू. 48,30,219/-/- कशी निश्चिती केली? इयत्तानिहाय मुले व मुली यांना गणवेश बाजारभावानूसार दर किती असतील? याबाबत कोणताही तपशिल नसतांना निविदा प्रक्रियेत खालीलप्रमाणे निविदा दरांचे दर प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे.

| अ.क्र | इयत्ता | मुले /मुली | मे. प्रभु लिंक | मे. जी.एन.एस असो. | मे. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1ली | मुले | 434.91 | 424.20 | 455.00 |
| 2 | 2री | मुले | 451.50 | 439.95 | 455.00 |
| 3 | 3री | मुले | 467.25 | 455.70 | 475.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4थी | मुले | 483.00 | 471.45 | 475.00 |
| 5 | 5वी | मुले | 624.75 | 602.70 | 630.00 |
| 6 | 6वी | मुले | 624.75 | 628.95 | 650.00 |
| 7 | 7वी | मुले | 666.75 | 655.20 | 670.00 |
| 8 | 1ली | मुली | 464.10 | 477.75 | 495.00 |
| 9 | 2री | मुली | 483.0 | 490.00 | 495.00 |
| 10 | 3री | मुली | 498.75 | 505.00 | 520.00 |
| 11 | 4थी | मुली | 514.50 | 520.00 | 520.00 |
| 12 | 5वी | मुली | 829.50 | 840.00 | 830.00 |
| 13 | 6वी | मुली | 834.75 | 850.00 | 850.00 |
| 14 | 7वी | मुली | 840.00 | 860.00 | 870.00 |

1) निविदा मागवितांना कागदपत्रामध्ये निविदा कालावधीतील इयतानिहाय मुले मुली यांचे गणवेश बाजारभावानुसार दर नमूद केले नसतांना निविदाकारांनी वरील तक्त्यामधील दर कशच्या आधारावर निविदेत नमूद केले? याबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आलेली नाही . त्यामुळे मे. प्रभु लिंक व मे. जी.एस. एन. असो. यांचे दर कोणत्या आधारभूत दरापेक्षा लघुतत्म आहेत याचीही लेखा परीक्षणास खात्री करता आलेली नाही.त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम 74(2) नुसार किफायतशिर असलेली निविदा स्विकारणे आवश्यक होते परंतु दरकरारारापेक्षा खरेदी किफायशीर झाली असल्याबाबत खात्री न करता जाहिर निविदा प्रसिध्द करून खरेदी करण्यात आली आहे.

2) सदरील गणवेश खरेदी करणेसाठी ई -टेंडरींग प्रणाली वापर करणेसाठी दि . 16 जानेवारी 2013 च्या शासन निर्णयान्वये ही मर्यादा रू . 10 लक्ष करण्यात आली होती त्यानुसार विभागाने नि यमानुसार ई-टेडरींग प्रणाली वापरून विदयार्थ्यांना शालेय गणवेश खरेदी करणेत आलेले नाही त्यामुळे निविदा स्पर्धात्मक व जास्तीत जास्त पारदर्शक निविदा झाली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील 73(ड) नुसार पंचविस लाख रूपयांपेक्षा अधिक नसलेला खर्च अं तर्भूत असलेले अशा आयुक्तांने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्याने अशी संविदा केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविले पाहीजे असे असतांना या नियमानूसार कार्यवाही झाली असलेबाबत अभिलेखे नस्तीत आढळून आलेले नाही.

3) विद्यार्थ्यांना गणवेश वितरीत केलेची शाळानिहाय माहितीची संकलित नोंदवही व शाळेकडील साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नसल्याने , विदयार्थ्यांना गणेवेश पुरवठा केलेबाबत लेखा परीक्षणास खात्री झाली नाही.

4) शासन निर्णय क्र . जीआरई 1993/221/प्-1 दि. 30/01/1996 नुसार 30 नोव्हेंबर 2013 व 30 नोव्हेंबर 2014 चे विदयार्थी पटपडताळणी अहवाल प्रमाणित केलेला लेखा परीक्षणास पहावयास न मिळाल्याने निश्चित किती विदयार्थ्यांना गणवेश वाटप केले या बाबतची लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही.

5) पुरवठादार यांनी सुरक्षा अनामत रक्कम म्हणून बॅक गॅरंटी स्वरूपात प्राथमिक शिक्षण विभागाकडे सादर केली

आहे असे टिप्पणीत नमूद केले आहे परंतु तशी बॅक गॅरंटी लेखा परीक्षणास दाखविण्यात न आल्याने पुरवठादाराने सुरक्षा अनांमत मान्य निविदेच्या 5% रक्कम रू. 7,62,795/- भरली किंवा कशी? याबाबतही लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही. त्यामुळे पुरवठादाराना सुरक्षा अनामत रक्कम न भरल्याने काम दिल्याचे दिसून येत आहे.

6) तसेच 2013-14 मध्ये विदयार्थ्याना गणवेश पुरवठा करणेसाठी शेक्षणीक वर्ष जून ते एप्रिल असे असतांना 2013-14 मधील शैक्षणीक वर्षात विदयार्थ्याना गणेवेश पुरव ठा करणेसाठी माहे ऑक्टोबर 2013 मध्ये कंत्राटदाराला कार्यादेश देण्यात आलेला आहे , त्यानंतर गणेवेश पुरवठादार यांनी प्रथमिक शाळेतील विदयार्थ्यांना गणेवश पुरवठा माहे नोव्हेंबर 2013 मध्ये करण्यात आला आहे त्यामुळे विदयार्थ्यांना एकंदर सहा महिने गणेवश पुरवठा उशिरा केल्याने विदयार्थ्याना गणवेशापासून वंचित राहवे लागले आहे.

सदरील आक्षेपित मुद्दयांबाबत विभागाला अर्धसमास क्र . 140 दि. 11/11/2016 रोजी खुलासा मागविला असता विभागाने लेखा परीक्षण कालावधी संपेपर्यंत अनुपालन केलेले नाही त्यामुळे एकुण रक्कम रू . 1,52,55,894/- आक्षेपाधिन व वसुलपात्र रक्कम रू. 7,62,795/- ठेवण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 39, Hmm No : 140)

## *65 उल्हासनगर महानगरपालिका शाळामधील विद्यार्थ्याना लेखन साहित्य (स्टेशनरी) पुरविणे कामातील अनियमितता झाले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1301026.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1301026.00/-

***उद्योग व उर्जा कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखस/1088(2512)उद्योग-6 दि.02/01/1992 नुसार नियम 7 चे अवलब केलेले नसल्याने शासकीय व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तूचे दर ठरविण्यासंबधी या कार्य पद्धतीचा अवलंब झाला नाही.शैक्षणिक लेखन साहित्य खरेदीसाठी प्रचलित दरानुसार बाजार भाव मागवून अंदाजित खर्चा निश्चित करून त्याप्रमाणे निविदा प्रसिध्द करून निविदा मागविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शैक्षणिक लेखन साहीत्य पुरवठा आदेश व वितरण 2010-11 मध्ये केले असतांना माहे मे 2013 मध्ये केलेल्या खर्चाच्या विलंबाबाबत कारण प्रमाणकासोबत झोडलेले नाही. त्यामुळे सदरील रक्कम यापूर्वी प्रदान केली किंवा कसे खात्री करता आलेली नाही.***

उल्हासनगर मनपा शिक्षण विभागाचे लेखा परीक्षण केले असता मनपा शाळेमधील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरविणेच्या कामाबाबत खालील पुरवठा दाराकडून कार्यादेश देउन पुरवठा करून घेतले आहे.

कामाचे नाव:- मनपा शाळामधील मुले आणि मुली या विदयार्थ्याना लेखनसाहीत्य पुरविणे (स्टेशनरी) बाबत

उल्हासनगर महानगरपालिका

कार्यादेश :- जा.क्र./मनपा/शि.म.अ./शिक्षण 953/10 दि 08/07/2010

पुरवठा कालावधी :- 15 दिवस

पुरवठादाराचे नाव :- मे. जील एंटरप्रायजेस

प्रदानाचा तपशिल खालील प्रमाणे आहे

| अ. क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| 1 | SB-42 | 22/05/2013 | 13,01,026/- |

प्राथमिक शिक्षण विभागातील विदयार्थ्यांना शैक्षणिक लेखन साहीत्य पुरवविणेबाबतच्या खर्चाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 102 नुसार संपूर्ण अर्थसंकल्पीय अहवाल किंवा त्यांच्या कोणताही भाग ज्या वर्षासाठी जे अनुदान अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ठ करण्यात आले असे त्या वर्षाच्या अखेरीस खर्च न होता तसेच राहीले असेल व ते पुढील दोन वर्षापैकी कोण्यातीही वर्षाच्या अर्थसंकल्पात नमूद केलेल्या यथास्थिती नगरपालिका निधीच्या प्रारंभिक शिलकेत हिशेबात घेतले नसेल तर यथास्थिती स्थायी समितीस असे अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्यांची खर्च न झालेली रक्कम पुढील दोन वर्षाच्या मुदतीत कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी किंवा उदीष्टांसाठी नव्हे तर ज्यासाठी ते अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करण्यात आले होते ते प्रयोजन किंवा उदिष्ट हे मुळ उद्देशाप्रमाणे किंवा मंजूरी प्रमाणे साध्य करण्यासाठी खर्च करण्यास मा. स्थायी समितीची मंजूरी देणे आवश्यक आहे.

1) शैक्षणिक लेखन साहीत्य पुरवठा आदेश व वितरण सन 2010-11 मध्ये केले असतांना माहे मे 2013 मध्ये केलेल्या प्रदानाच्या विलंबाबाबत कोणतेही कारण नस्तीत नमूद केलेले नाही त्यामुळे सदर लेखन साहीत्य पुरवठा केलेले प्रदान यापूर्वी केले नसलेबाबत प्रमाणपत्र प्रमाणकासोबत किंवा नस्तीत आढळून आलेले नाही. त्यामुळे यापूर्वी सदरील रक्कम प्रदान केली किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणाला खात्री करता झालेली नाही.

2) सदरील शालेय लेखन साहीत्य पुरवठा केलेल्या शाळांची आवक व वितरण शाळेनिहाय नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे मागणी व उपस्थितीप्रमाणे विदयार्थ्यांना लेखन साहीत्य पुरवठा झाला किंवा कसे याची लेखा परीक्षणाला खात्री करता आलेली नाही.

3) सदरील साहीत्य खरेदीची मुळ निविदा नस्ती व त्या अनुषंगाने करारनामा ई. बाब लेखा परीक्षणास पहावयास मिळाले नसल्याने सदरील लेखन साहीत्य खरेदी प्रचलित निविदा प्रक्रिया पार पाडून खरेदी केले किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आलेली नाही त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 5 नुसार संविदा करणे, नियम -1 संविदा करण्याची पध्दत व नियम 2 विवक्षित संविदासाठी प्रचलित निविदा मागविणे या नियमांचा अवलंब करण्यात आलेला नाही.

उपरोक्त बाबतीत विभागाला अर्धसमास क्र. 138 दि. 25/10/2016 अन्वये खुलासा मागविला असता विभागाचे अनुपाल अप्राप्त आहे. त्यामुळे रक्कम रू. 13,01,026/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 40, Hmm No : 138)

## 66 शालेय पोषण आहार योजनेंतर्गत 2014-15 मध्ये खाजगी शाळांना व स्वयंसेवी संस्थाना आहार खर्चासाठी अनुदान वितरीत करणेबाबत

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 08**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6616360.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6616360.00/-

***स्वयंसेवी संस्थांच्या निवड प्रक्रीयेचा तपशील लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही. खाजगी शाळांमध्ये स्वयंसेवी संस्था नियुक्त न करता शाळांच्या नांवे आहार खर्चाचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. स्वयंसेवी संस्था नियुक्त न करता खाजगी संस्थांच्या नांवे आहार खर्चाचे अनुदान वितरीत करण्याबाबत शासन आदेशात तरतूद नाही. तरीही विभागाकडून आहार खर्चाची रक्कम खाजगी संस्थांच्या नावे अदा करण्यात आली आहे. शासन तरतूदीनुसार संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून अशा स्वरुपाचे प्रमाणपत्र प्राप्त न करता विभागाने स्वयंसेवी संस्था/ बचत गटांना आहार खर्चाच्या रकमा प्रदान केल्या आहेत. खाजगी संस्थांना आहार खर्चाच्या प्रदानाच्या पोहोच प्राप्त करण्यात आलेल्या नाहीत. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये उल्हासनगर मनपास प्राप्त अनुदानाची शासनास सादर करण्यात आलेली उपयोगिता प्रमाणपत्रे लेखा परिक्षणास पडताळणीस उपलबध झाली नाहीत.***

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत 1ली ते 5वी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 450 उष्मांक आणि 12 ग्रॅम प्रथिने युक्त तसेच इ.6 ते 8वी या उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 700 उष्मांक आणि 20 ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रति विद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी 100 ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी 150 ग्रॅम तांदुळ पुरविण्यात येतो. या तांदुळापासुन शा.पो.आ. तयार करण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी विहीत केलेल्या दराने आहार खर्च (Cooking Cost) प्रदान करण्यासाठी महापालिका क्षेत्रासाठी शासनाकडून शिक्षण विभागास अनुदान वितरीत करण्यात येते.

उल्हासनगर मनपा शिक्षण विभागाकडून शालेय पोषण आहार योजनेंतर्गत मनपाच्या शाळांमधील इ.1ली ते 7वी मधील विद्यार्थ्यांना माहे जुन -14 ते सप्टेंबर-14 या कालावधीतील आहार खर्चासाठी खालील प्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

| अ.क्र. | शाळा क्र. | स्वयंसेवी संस्था | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 01 | जयश्री महिला मंडळ | 068349 | 19.12.2014 | 3800 |
| 02 | 02 | आदर्श महिला मंडळ | 68350 | --,,-- | 17111 |
| 03 | 03 | अमरज्योत महिला मंडळ | 68351 | ---,,-- | 41146 |
| 04 | 04 | श्रीसिध्दीविनायक महिला मंडळ | 68352 | --,,-- | 21346 |
| 05 | 05 | सईबाई महिला औद्यो.वि.मंडळ | 068353 | --,,-- | 98130 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 06 | 07,25,30 | भिमशक्ती महिला मंडळ | 68354 | --,,-- | 149999 |
| 07 | 08 | मातोश्री रमाबाई आंबेडकर म.मं | 068355 | --,,-- | 34664 |
| 08 | 09 | मोनिका म.मं | 068356 | --,,-- | 55352 |
| 09 | 10,12 | ज्ञानगंगा म.मं | 68357 | --,,-- | 58966 |
| 10 | 11 | कल्याणी म.मं | 68358 | --,,-- | 49081 |
| 11 | 13 | प्रेरणा महिला औद्यो.सह.सं | 68359 | --,,-- | 21515 |
| 12 | 14 | एकविरा महिला विकास मंडळ | 68360 | --,,-- | 38177 |
| 13 | 17 | तुळजा भवानी महिला मंडळ | 63761 | --,,-- | 47605 |
| 14 | 18 | जयदिप महिला मंडळ | 63762 | --,,-- | 107752 |
| 15 | 20 | आम्रपाली सार्व.म.मं | 63764 | --,,-- | 36846 |
| | पालवी कर्णबधीर विद्यालय | | --,,-- | --,,-- | 11537 |
| | साहयगीरी बहुउद्देशीय सेवा.सं. | | --,,-- | --,,-- | 22311 |
| | | | एकूण | --,,-- | 70694 |
| 16 | 22 | सावित्रीबाई फुले म.औद्यो.सह.सं. | 63766 | --,,-- | 3106 |
| 17 | 23 | उज्वला सार्व.म.मं | 63767 | --,,-- | 50898 |
| 18 | 24 | श्रेयस सामा.म.मं | 63768 | --,,-- | 141813 |
| 19 | 26 | आशाळेगाव म.मं | 63769 | --,,-- | 34932 |
| 20 | 27 | किरणबेदी महिला बचतगट | 63770 | --,,-- | 45208 |
| 21 | 28 | ज्ञानदिप म.मं. | 63771 | --,,-- | 201260 |
| 22 | 29 | सांची महिला मंडळ | 63772 | --,,-- | 52626 |
| | | एकूण | | | 1345181 |

तसेच शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खाजगी शाळांमधील इ.1ली ते 7वी मधील विद्यार्थ्यांना माहे जुन -14 ते सप्टेंबर-14 या कालावधीतील आहार खर्चासाठी खालीलप्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

| इयत्ता | शाळांची संख्या व कालावधी | रक्कम |
|---|---|---|
| 1) धनादेश क्र.068346 दि.19/12/2014 | | |
| इ.1ली ते 5वी | 22 शाळा माहे जुन ते सप्टें.14 | रु.15,68,700/- |
| इ.6ली ते 7वी | 12 शाळा माहे जुन ते सप्टें.14 | रु.5,96,128/- |
| | एकूण | रु.21,64,828/- |
| 2) धनादेश क्र.068347 दि.19/12/2014 | | |
| 1ली ते 5वी | 29 शाळा माहे जुन ते सप्टें.14 | रु.17,86,577/- |
| इ.6ली ते 7वी | 24 शाळा माहे जुन ते सप्टें.14 | रु.10,12,376/- |
| | एकूण | रु.27,98,950/- |
| 3) धनादेश क्र.68348 दि.19/12/2014 | | |
| रेंचूरी रेऑन स्कुल जुन ते सप्टें.14 | | रु.3,07,401/- |
| एकुण (1) ते (3) | | रु.52,71,179/- |

सदर खर्चाच्या प्रमाणकांची तपासणी करता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र .116 दि.18.10.2016 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही . त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र.शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशि.4 दि.02.02.2011 नुसार शालेय पोषण आहार योजनेतंर्गत आहार शिजवून शाळेमध्ये शिजविलेल्या अन्नाचे वाटप करण्यासाठी नागरी भागामध्ये स्वयंसेवी संस्थांकडून “Expression of Interest” मागवून त्याव्दारे संस्था निवड करुन कैंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहार पुरविणे आवश्यक आहे. परंतू वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये स्वयंसेवी संस्थां / बचतगट यांना प्रदान केलेल्या आहार खर्चाच्या प्रमाणकांची पडताळणी करता स्वयंसेवी संस्थांच्या निवड प्रक्रीयेचा तपशील लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे सदर स्वयंसेवी संस्था / बचतगट यांची निवड प्रक्रीयेची पडताळणी तसेच अशा संस्थांना कोणत्या शाळांमध्ये तयार अन्न पुरवठा करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे, सदर शाळांमधील लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे मनपाच्या शाळांमध्ये तयार अन्न पुरवठा करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना शिक्षण विभागाकडून प्रदान करण्यात आलेल्या आहार खर्चाच्या रक्कमा योग्य असल्याची लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

2) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तयार आहार पुरविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची नियुक्ती करणे आवश्यक असुन संबधीत शाळेच्या मुख्याध्यापकांच्या अहवालानुसार स्वयंसेवी सस्थांना आहार खर्चाच्या रकमेचे प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु खाजगी शाळांमध्ये स्वयंसेवी संस्था नियुक्त न करता शाळांच्या नावे आहार खर्चाचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. स्वयंसेवी संस्था नियुक्त न करता खाजगी संस्थांच्या नावे आहार खर्चाचे अनुदान वितरीत करण्याबाबत शासन आदेशात तरतूद नाही. तरीही विभागाकडून आहार खर्चाची रक्कम खाजगी संस्थांच्या नावे अदा करण्यात आली आहे.

3) उपरोक्त दि.02.02.2011 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.6 व 7 नुसार संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने प्रत्येक महिन्याच्या आहारामध्ये आवश्यक भाजीपाल्याचा समावेश केला असल्याचे तसेच आहार चविष्ट असल्याची खात्री करुन आहार शिजवणाऱ्या यंत्रणेस प्रमाणपत्र द्यावे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे संबंधीत यंत्रणेस आहार खर्च अदा करण्याची कार्यवाही करावी. अशी तरतूद आहे.

परंतू आहार खर्च प्रदानाच्या प्रमाणकांची तपासणी करता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून अशा स्वरुपाचे प्रमाणपत्र प्राप्त न करता विभागाने स्वयंसेवी संस्था/बचत गटांना आहार खर्चाच्या रकमा प्रदान केल्या आहेत. त्यामुळे संबधित संस्थांनी विद्यार्थ्यांना पुरविलेला आहार शासन आदेशातील विहीत निकषानुसार असल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

4) पालवी कर्णबधीर विद्यालयातील विद्यार्थ्यांना माहे डिसेंबर-13 ते मार्च-14 या कालावधीत तयार अन्न पुरवठयासाठी आम्रपाली महिला मंडळ यांना धनादेश क्र.68339 दि.12/08/2014 अन्वये रु.51118/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. सदर प्रमाणकासोबत मुख्याध्यापकांनी उपस्थित विद्यार्थी संख्या, उपलब्ध तांदूळसाठा, विनियोग व शिल्लक तांदूळ साठा याबाबत सादर केलेल्या अहवालाची पडताळणी करता उपलब्ध तांदुळ साठयापेक्षा जास्त तांदुळ शिजवल्याचे दिसून येते. (जाने-14 उपलब्ध तांदुळ 40.50 कि.ग्रॅ.शिजविलेला तांदुळ 96.80 कि.ग्रॅ., फेब्रु.14 उपलब्ध तांदुळ 59.70 कि.ग्रॅ. शिजवलेला तांदुळ 90.00 कि.ग्रॅ., माहे मार्च-14 उपलब्ध तांदुळ निरंक शिजवलेला तांदुळ 101.20 कि.ग्रॅ.) यावरुन संस्थेकडे पुरेसा तांदुळ साठा उपलब्ध नसतांना जादा तांदुळ शिजविलेल्या अहवालात नमूद केले असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात आहाराचे वाटप करण्यात आल्याबाबत खात्री होत नाही. परंतू शिक्षण मंडळाकडून याबाबीची पडताळणी न करता आम्रपाली महिला मंडळास माहे डिसे-13 ते मार्च-14 या कालावधीतील आहार खर्चासाठी रु.9360/- एवढे प्रदान करण्यात आले आहे.

5) वरील तक्त्यात अ.क्र.15 मध्ये नमूद केल्या नुसार साहयगिरी बहुउद्देशीय संस्थेमध्ये माहे जुन-14 ते सप्टें-14 या कालावधीमध्ये आहार पुरवठयासाठी आम्रपाली महिला मंडळ या स्वयंसेवी संस्थेस रक्कम रु.22,311/- एवढा आहार खर्चाची रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. परंतू संबंधीत मुख्याध्यापकांनी विद्यार्थी उपस्थिती, तांदुळ साठा व विनियोग याबाबत सादर केलेल्या अहवालाची पडताळणी करता संस्थेकडे शिल्लक तांदुळ साठा जुन-14 (-)709.3 कि.ग्रॅ., जुलै-14 (-)673.3 कि.ग्रॅ., ऑगस्ट-14 (-)257.8 कि.ग्रॅ., व सप्टे-14 (-)140.80 कि.ग्रॅ. असा वजा साठा दर्शविला आहे. त्यामुळे तांदुळ साठा उपलब्ध नसल्याने संस्थेने विद्यार्थ्यांना आहाराचे

प्रत्यक्षात वाटप केल्याबाबत पडताळणी न करता विभागाने आम्रपाली महिला मंडळास आहार खर्चाचे प्रदान केल्याचे दिसून येते.

6) शिक्षण विभागाकडून खाजगी शाळांना आहार खर्चाच्या रकमा संबंधीत शाळेच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्या आहेत. परंतू अशा वितरीत केलेल्या रक्कमा संबधित शाळेस प्राप्त झाल्याबाबत शाळांकडून पोहोच प्राप्त करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे खाजगी शाळांना वर्ग केलेल्या रकमा संबधीत शाळेस प्राप्त झाल्याबाबतची पोहोच उपलब्ध नसल्याने प्रदानाच्या रकमांची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

7) उमपा शिक्षण विभागास जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून वर्ष 2013-14 मध्ये रु.2,19,23,042/- व 2014-15 मध्ये रु.2,71,26,630/- एवढे अनुदान प्राप्त झाले आहे. परंतू अनुदान मंजूरीबाबतचे आदेश लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तसेच शालेय पोषण आहार योजनेंतर्गत वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये उल्हासनगर मनपास प्राप्त अनुदानाची शासनास सादर करण्यात आलेली उपयोगिता प्रमाणपत्रे लेखा परिक्षणास पडताळणीस उपलब्ध करण्यात आली नसल्याने मंजूर अनुदान, प्रत्यक्षात प्राप्त अनुदान, अनुदानाच्या विनियोगासाठी विहीत केलेल्या अटीशर्तींची पडताळणी करुन लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

8) वर्ष 2012-13 मधील शिल्लक अनुदान रक्कम रु.58,85,705/- व 2013-14 मधील शिल्लक रक्कम रु.93,72,173/- असे एकुण रक्कम रु.1,52,57,878/- एवढे अनुदान धनादेश क्र.9068345 दि.12.08.2014 अन्वये जिल्हा परिषद ठाणे यांना प्रत्यार्पित करण्यात आले आहे. उपलब्ध शासकीय अनुदानाचा विहीत प्रयोजनासाठी विनियोग न करता अनुदान शासनास प्रत्यार्पित केल्याबाबत विभागाकडून समर्पक खुलासा प्राप्त झाला नाही. त्यामुळे याबाबत लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

आक्षेपाधीन रक्कम 1) रु.13,45,181/- अधिक 2) रु.52,71,179/- एकूण रु.66,16,360/-

FDSANMM7201 (Ref No : 66, Hmm No : 116)

## *67 शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस खर्चासाठी स्वयंसेवी संस्था / बचत गट तसेच खाजगी शाळांना प्रदान केलेल्या अनुदानातील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2017305.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2017305.00/-

***शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशि.4 दि.02.02.2011 मधील अ.क्र.10 नुसार शहरी भागामध्ये स्वयंसेवी संस्था आणि बचतगड यांचेकडून तयार आहाराचा पुरवठा करण्यास स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चाच्या प्रदानासाठी विहीत निकषांची पुर्तता न करता अनुदान वितरीत करण्यात आले आहे. मुख्याध्यापकांचा अहवाल प्रमाणित नसतांना न्यु एरा हिंदी ॲन्ड सिधी प्रायमरी स्कुल या खाजगी शाळेस माहे डिसे.13 ते मार्च-14 या कालावधीसाठी शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार खर्चासाठी रु.37,030/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले असून वितरीत अनुदान संबधीत संस्थांना प्राप्त***

***झाल्याबाबतची पोहोच प्राप्त करण्यात आलेली नाही.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाकडून शालेय पोषण आहार योजनेंतर्गत महापालिकेच्या शाळांमध्ये आहार पुरवठा करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था/बचत गट व खाजगी संस्थांना स्वयंपाकी तथा मदतनीस खर्चासाठी वर्ष 2014-15 मध्ये खालीलप्रमाणे अनुदान अदा करण्यात आले आहे.

| अ. क्र. | मनपा शाळांमधील स्वयंसेवी संस्थेचे नाव | धनादेश क्र. | दिनांक | 2012-13 रु. | 2013-14 रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अमरज्योती महिला मंडळ | 55558 | 28.05.2014 | 20000 | 20000 | 40000 |
| 2 | आदर्श महिला मंडळ | ----- | --,,-- | 60000 | 60000 | 120000 |
| 3 | जयश्री महिला मंडळ | 55556 | --,,-- | 10000 | 10000 | 20000 |
| 4 | श्रीसिध्दीविनायक म.मं. | 55559 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 5 | सईबाई महिला औद्यो. उत्पा.सह.संस्था | 55560 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 6 | भिमशक्ती महिला मंडळ | 68321 | --,,-- | 40000 | 40000 | 80000 |
| 7 | मातोश्री रमाबाई आंबेडकर म.मंडळ | 68322 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 8 | मोनिका महिला मंडळ | 68323 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 9 | ज्ञानगंगा महिला मंडळ | 68324 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 10 | कल्याणी महिला मंडळ | 68725 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 11 | प्रेरणा महिला मंडळ | 68326 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 12 | एकविरा म.विकास मं. | 68327 | --,,-- | 60000 | 60000 | 120000 |
| 13 | तुळजाभवानी महिला मं. | 68328 | --,,-- | 60000 | 60000 | 120000 |
| 14 | जयदिप महिला मंडळ | 68329 | --,,-- | 60000 | 60000 | 120000 |
| 15 | सिध्दकला महिला मंडळ | 68330 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 16 | आम्रपाली सार्व.म.मं | 68331 | --,,-- | 60000 | 60000 | 120000 |
| 17 | अस्मिता महिला मंडळ | 68332 | --,,-- | 60000 | 60000 | 120000 |
| 18 | उज्वला सार्व.म.मं | 68333 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 19 | श्रीहर्ष सामा.म.मं | 68334 | --,,-- | 40000 | 40000 | 80000 |
| 20 | अंशाळेगाव महिला मं. | 68335 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 21 | किरणबेदी महिला मं. | 68336 | --,,-- | 20000 | 20000 | 40000 |
| 22 | ज्ञानदिप महिला मं. | 68337 | --,,-- | 60000 | 60000 | 120000 |
| 23 | सांची महिला मंडळ | 68338 | --,,-- | 60000 | 60000 | 120000 |
| | | | एकूण | | | 1620000 |

| अ.क्र. | खाजगी शाळांची नावे | बाब | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | डॉ.जाकीर हुसेन प्रायमरी स्कुल | स्वयंपाकी तथा मदतनीस 2012-13 व 2013-14 | 20000 |
| 2 | न्यु सिधी प्रायमरी स्कुल | --,,-- | 20000 |
| 3 | के.ए.हिन्दी प्रायमरी स्कुल | --,,-- | 40000 |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | न्यु एरा हिंदी ॲन्ड सिधी प्रायमरी स्कुल | आहार खर्च<br>डिसेंबर ते मार्च-14 | 37305 |
| | धनादेश क्र.**68343** दि.**19/08/2014** | एकुण अ | **117305** |
| 5 | झुलेलाल ट्रस्ट स्कुल | स्वयंपाकी तथा मदतनीस<br>2012-13 व 2013-14 | 40000 |
| 6 | विशाखा प्रायमरी स्कुल | --,,-- | 40000 |
| 7 | छत्रपती शिवाजी स्कुल | --,,-- | 40000 |
| 8 | सावित्रीबाई फुले स्कुल | --,,-- | 40000 |
| 9 | तक्षशिला प्रायमरी स्कुल | --,,-- | 120000 |
| | धनादेश क्र.**68344** दि.**19/08/2014** | एकुण ब | **280000** |
| | | एकुण अ+ब | **397305** |

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशि.4 दि.02.02.2011 मधील अ.क्र.10 नुसार शहरी भागामध्ये स्वयंसेवी संस्था आणि बचतगड यांचेकडून तयार आहाराचा पुरवठा करण्यास स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी खालील प्रमाणे निकष विहीत करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | स्वयंसेवी संस्था/बचतगट यांचेमार्फत शिजवलेल्या अन्नाचा पुरवठा होत असलेल्या लाभार्थ्यांची संख्या | स्वयंपाकाचे तसेच मदतनीसाचे कामासाठी अनुदान प्रतिमहिना वर्षासाठी 10 महिन्यांसाठी |
|---|---|---|
| 1 | 500 विद्यार्थ्यांपर्यंत | रु.2000/- |
| 2 | 1000 विद्यार्थ्यांपर्यंत | रु.4000/- |
| 3 | 5000 विद्यार्थ्यांपर्यंत | रु.6000/- |
| 4 | 1000 विद्यार्थ्यांपर्यंत | रु.8000/- |
| 5 | 1000 पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या | रु.10000/- |

त्यानुसार स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत त्यांच्या स्वयंपाक गृहातुन आहार पुरवठा होणाऱ्या सर्व शाळांमधील मिळून विद्यार्थी संख्या एकत्रित विचारात घेवून त्यानुसार वरील प्रमाणे अनुदान देण्यात यावे अशी तरतूद आहे. त्यानुसार सदर प्रमाणकांची तपासणी केली असता लेखा परिक्षणास आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्यासाठी अर्धसमास पत्र क्र.117 दि.18.10.2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही.तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) स्वयंसेवी संस्थांना स्वयंपाकी तथा मदतनीस खर्चासाठी प्रदान केलेल्या रकमांच्या खर्च प्रमाणकांची तपासणी करता उपरोक्त स्वयंसेवी संस्थांना कोणत्या शाळांना तयार आहाराचा पुरवठा करणे आवश्यक होते. याबाबतचे शिक्षण विभागाकडून देण्यात आलेले नियुक्ती आदेश प्रमाणकांसोबत उपलब्ध नाहीत. तसेच अशा शाळांमध्ये स्वयंसेवी संस्था/बचतगट यांचेमार्फत शिजवलेल्या अन्नाचा पुरवठा होत असलेल्या लाभार्थ्यांची संख्या याबाबतचा तपशिल दर्शविणारा प्रमाणित अहवाल संबधीत शाळांच्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त करण्यात आलेला नसल्याने उपरोक्त स्वयंसेवी संस्थांना स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी वितरीत केलेले अनुदान देय असल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

2) उपरोक्त शासन तरतूदीनुसार स्वयंसेवी संस्था नियुक्त् करुन शाळांमध्ये तयार आहाराचा पुरवठा करणे आवश्यक

असुन स्वयंसेवी संस्थाना आहार खर्चाचे प्रदान करणेबाबत शासन आदेश आहेत. खाजगी संस्थांना स्वयंपाकी तथा मदतनीस खर्चासाठी अनुदान वितरीत करण्याबाबतची तरतूद शासन आदेशात नाही. खाजगी संस्थांनी स्वयंपाकी तथा मदतनीस खर्चासाठी अनुदान मागणी केल्याबाबतचा तपशील तसेच शिक्षण मंडळाने अदा केलेल्या अनुदानाच्या रकमा शाळांना प्राप्त झाल्याबाबतची पोहोच प्रमाणकासोबत उपलब्ध नाहीत. त्यामुळे सदर रकमा संबंधीत शाळांना प्राप्त झाल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

3) न्यु एरा हिंदी ॲन्ड सिधी प्रायमरी स्कुल या शाळेस माहे डिसे.13 ते मार्च-14 या कालावधीसाठी शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार खर्चासाठी रु.37,030/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. परंतु प्रमाणकासोबतचा उपस्थिती अहवाल संबधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रमाणित करण्यात आलेला नाही. उपस्थिती अहवाल प्रमाणित नसतांना विभागाकडून उपस्थिती अहवाल पडताळणी न करता सदर संस्थेस आहार खर्चाचे (Cooking Cost) प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे प्रदान रकमेच्या अनुज्ञेयतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

त्यामुळे वरील आक्षेपांच्या पुर्ततेअभावी उपरोक्त प्रमाणे विविध स्वयंसेवी संस्था/बचत गट व खाजगी संस्थांना स्वयंपाकी तथा मदतनीस खर्चासाठी वर्ष 2014-15 मध्ये अदा केलेल्या अनुदानाची रक्कम रु.16,20,000/- अधिक रु.3,97,305/- अशी एकूण रक्कम रु.20,17,305/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.20,17,305/-

FDSANMM7201 (Ref No : 67, Hmm No : 117)

## *68 मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदी करणे कामावरील खर्चातील अनियमिततांबाबत 2014-15*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5893979.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 770920.00/-

***वर्ष 2013-14 मध्ये मनपा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदीसाठी पुरवठादारास रु.28,95,982/- एवढया रकमेचे कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर खर्चासाठी स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आलेली नाही. विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदीसाठी 2013-14 या एका वर्षासाठी निविदा मागविण्यात आल्या असतांना पुरवठादारास 2013-14 व 2014-15 या दोन वर्षासाठी पुरवठा आदेश देण्यात आले त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 72 मधील तरतूदीनुसार अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापुर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेण्यात आल्याचे आढळून आले नाही. पादत्राणे पुरवठयाबाबतची पुरवठा चलने, साठा नोंदवहया पडताळणीसाठी विद्यार्थी पटसंख्येपेक्षा जादा पादत्राणे खरेदी करण्यात आली आहेत. कंत्राटदाराच्या देयकातून कपात केलेली आयकर वसुलीची रक्कम शासन लेख्यात भरणा करण्यात***

***आल्याबाबतची चलने प्रमाणकासोबत उपलबध नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी वर्ष 2013-14 या वर्षात पादत्राणे (बुटमोजे) खरेदीसाठीच्या मा.आयुक्त यांनी दि.15.07.2013 रोजी दिलेल्या निर्देशानुसार विद्यार्थी पादत्राणे खरेदी (बुटमोजे) या लेखाशीर्षाखाली रु.30.00 लक्ष मंजुर अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून दि.19.07.2013 ते 25.07.2013 या कालावधीत जाहिर निविदा मागविण्यात आल्याचे विभागाच्या टिपणीत नमूद करण्यात आले आहे. जाहिर निविदेमध्ये मे.ओम मनिष एन्टरप्रायजेस या लघुत्तम निविदाधारकाची निविदा मंजूर करण्यात आली असून पुरवठादाराशी दि.05.09.2013 रोजी रु.2100/- एवढया मुद्रांक शुल्क रकमेवर करारनामा करुन वर्ष 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी कार्यादेश क्र.मनपाशिमंङ/शिक्षण/564/13 दि.5.09.2013 अन्वये बालवाडी व इ.1ली ते 7 वी मधील एकूण 8622 विद्यार्थ्यांसाठी रु.28,95,982/- एवढया रकमेचे कार्यादेश देण्यात आले असून प्रमाणक क्र.एबी-84 दि.24.09.2013 रु.3,98,169/- प्रमाणक क्र.एबी-86 व 87 दि.24.09.2013 रु.24,97,813/- असे एकूण रु.28,95,982/- एवढा खर्च करण्यात आला आहे. वर्ष 2014-15 साठी कार्यादेश क्र.मनपाशिमंङ/शिक्षण/950/14 दि.07.02.2014 अन्वये मागील वर्षाप्रमाणे विद्यार्थी संख्या नमूद करुन रु.28,95,982/- एवढया रकमेचे पुरवठा आदेश देण्यात आले असून प्रमाणक क्र.ए-31 व ए-32 दि.25.04.2014 अन्वये रु.29,97,997/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. सदर बुटमोजे खरेदीच्या निविदेच्या प्रशासकीय मान्यतेची नस्ती, पुरवठा चलने, खर्च प्रमाणके व प्रमाणकांसोबतची कागदपत्रे यांची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र .152 दि.29.11.2016 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील परिशिष्ट-ड प्रकरण 5 मधील कलम 2 नुसार रु.3.00 लक्ष पेक्षा जादा खर्चासाठी जाहिर निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही न करता सदर कामासाठी मागील वर्षातील कंत्राटदारास त्याच दराने पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

2) मनपा आयुक्तांनी दि.15.07.2013 रोजी दिलेल्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदीसाठी निविदा मागविणेस 2013-14 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार मंजुरी दिली असल्याने निविदा 2013-14 या एक वर्षासाठी मागविणे आली असतांना पुरवठादारास 2014-15 साठी कार्यादेश क्र.मनपाशिमंड/शिक्षण/950/14 दि.07.02.2014 अन्वये बालवाडी व इ.1ली ते 7वी मधील एकूण 8622 मुले व मुलींसाठी पुरवठा करण्याबाबत रु.28,95,982/- एवढया रकमेचे कार्यादेश देण्यात आले आहेत. यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 72 मधील तरतूदीनुसार अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापुर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेण्यात आल्याचे आढळून आले नाही.

3) महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण 7 मधील कलम 73(क) नुसार रु.25लाख रुपयांहून अधिक खर्च अंतर्भूत असेल अशा कोणत्याही संविदेस स्थायी समितीने आधी मान्यता दिल्याशिवाय आयुक्तांनी अशी कोणतीही संविदा करता कामा नये. वर्ष 2014-15 मध्ये मनपा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पादत्राणे (बुटमोजे) खरेदीसाठी पुरवठादारास रु.28,95,982/- एवढया रकमेचे कार्यादेश देण्यात आले आहेत. परंतु सदर कामासाठी स्थायी संमितीची मंजूरी घेण्यात आल्याबाबतचा ठराव नस्तीत आढळून आला नाही. त्यामुळे सदर खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात न घेता खर्च करण्यात आला आहे.

4) खर्च प्रमाणकांची तपासणी करता 2014-15 मध्ये इ.1ली ते 7वी ची पटावरील विद्यार्थी संख्या 7156 एवढी असून बालवाडीतील विद्यार्थी संख्या 900 विचारात घेता वर्ष 2014-15 मध्ये 8056 (7156+900) एवढी विद्यार्थी संख्या असतांना 9016 एवढया विद्यार्थ्यांसाठी बुटमोजे पुरवठा करण्यासाठी रु.29,97,997/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. यावरुन विद्यार्थी संख्येपेक्षा 960 एवढया जादा बुटमोजे खरेदी केल्यामुळे रु .375/- प्रतीनग सरासरी दराने रु.3,60,000/- जादा प्रदान करण्यात आले आहे . सदर जादा प्रदानाची एकूण रक्कम रु .3,60,000/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

7) कार्यादेशानुसार पुरवठादारास बुटमोजेंचा पुरवठा मनपाच्या 28 शाळांमध्ये करणेबाबतचे आदेश आहेत. परंतु संबधीत

शाळांकडील साठा नोंदवहया तसेच मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेली पुरवठा चलने पडताळणीसाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या बुटमोज्यांच्या पुरवठयाच्या साठा नोंदवहीतील नोंदींची पडताळणी करुन प्राप्त साठा योग्य असल्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा यांची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

8) बुटमोजे पुरवठा खर्चाच्या प्रमाणकांवर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. पुरवठादाराकडील उपप्रमाणकावर प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही. तसेच प्रदानाच्या रकमेस प्रशासन अधिकारी यांची मंजूरी घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

9) आयकर अधिनियमातील कलम 194 ( सी) नुसार कंत्राटदार मे.ओम मनिष एन्टरप्रायजेस यांचे बुटमोजे खरेदीच्या देयकातून वर्ष 2014-15 मध्ये रु.29,97,997/- एवढया प्रदानाच्या रकमेतून 2 टक्के प्रमाणे रु.59960/- एवढी आयकर कपात करणे ऐवजी 1टक्के प्रमाणे रु.29,980/- एवढी कपात करण्यात आला असल्याने रु.29,980/- एवढी आयकराची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

10) बुटमोजे खरेदीच्या देयकातून वर्ष 2014-15 मध्ये कपात केलेली रक्कम रु.29,980/- शासन खाती भरणा करण्यात आल्याबाबतचे चलन प्रमाणकांसोबत लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कपात केलेली टीडीएस आयकराची रक्कम शासन खात्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

आक्षेंपाधीन रक्कम रु.29,97,997/-

वसुलपात्र रक्कम रु.3,60,000/- अधिक रु.29,980/- अधिक रु.29,980/- एकूण रु.4,19,960/-

FDSANMM7201 (Ref No : 68, Hmm No : 152)

## *69 मनपा बालवाडीतील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी खुर्च्या, टेबल पुरवठयासाठी केलेल्या प्रदानातील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1010102.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1000000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 10102.00/-

***मनपा बालवाडीतील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी खुर्च्या, टेबल पुरवठयासाठी केलेल्या खर्चाबाबत प्रशासकीय मान्यतेची नस्ती, निविदा मागविण्यात आल्याबाबतचे अभिलेख, कंत्राटदाराशी केलेला करारनामा, पुरवठयाचे कार्यादेश, पुरवठा कालावधी, पुरवठा चलने, साठा नोंदवहया इ. तपशील पडताळणीस उलपब्ध झाला नाही. फर्निचर पुरवठा खर्चाच्या प्रमाणकावर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही अथवा प्रदानाच्या रकमेस प्रशासन अधिकारी यांची मंजूरी घेण्यात आलेली नाही. तसेच खर्चाचे प्रमाणकावर प्रशासन अधिकारी यांचा प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर खर्चाची सत्यता पडताळणी करता आली नाही.***

मनपा बालवाडीतील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी खुर्च्या, टेबल पुरवठयाबाबत मे.सिध्दान्त समाज विकास संस्था यांच्याकडील प्राप्त देयक क्र.1470 दि.निरंक ला अनुसरुन शिक्षण मंडळाकडून प्रमाणक क्रमांक एबी-308 दि.19/12/2014 अन्वये रु.10,10,102/- एवढया रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची पडताळणी करता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्यास अर्धसमास पत्र क्र.154 दि.29.11.2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण काला वधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील परिशिष्ट “ड” मधील प्रकरण-पाच मधील कलम 2(2) नुसार रु.3.00 लक्ष रकमेपेक्षा जादा खर्चासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतु मनपा बालवाडीतील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी खुर्च्या, टेबल पुरवठयासाठी केलेल्या खर्चाबाबत प्रशासकीय मान्यतेची नस्ती, निविदा मागविण्यात आल्याबाबतचे अभिलेख, कंत्राटदाराशी केलेला करारनामा, पुरवठयाचे कार्यादेश, पुरवठा कालावधी, पुरवठा चलने, साठा नोंदवहया इ. तपशील पडताळणीस उपलब्ध झाला नसल्याने सदर कामासाठी जाहिर निविदा मागवून खर्च करण्यात आल्याबाबत तसेच कार्यादेशानुसार प्रत्यक्षात पुरवठा प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करुन लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

2) प्रमाणकासोबतच्या पुरवठादाराकडील उपप्रमाणक क्र.1470 मध्ये पुरवठा केलेल्या फर्निचरच्या बाबी, बाबनिहाय परिमाण, मंजूर दर, कार्यादेशाचा तपशील, पुरवठा चलनाचा क्रमांक व दिनांक, सर्विस टॅक्स क्रमांक इ. तपशिल नमूद करण्यात आला नसून एकत्रित रु.10,10,102/- एवढया रकमेची मागणी करण्यात आली आहे. खर्चाचे प्रमाणकावर प्रशासन अधिकारी यांचा प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही. यामुळे सदर प्रमाणकांन्वये केलेल्या खर्चाच्या सत्येतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

3) फर्निचर पुरवठा खर्चाच्या प्रमाणकावर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही अथवा प्रदानाच्या रकमेस प्रशासन अधिकारी यांची मंजूरी घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

4) देयकातून कपात केलेला टिडीएस रक्कम रु.10,102/- शासन खाती भरणा करण्यात आल्याबाबतचे चलन लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कपात केलेली टीडीएस आयकराची रक्कम शासन खात्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही . त्यामुळे आयकर कपातीची रक्कम रु .10,102/- वसुलपात्र तसेच पुरवठादारास केलेल्या प्रदानाची रक्कम रु.10,00,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.10,102/-

आक्षेपाधीन रक्कम रु.10,00,000/-

FDSANMM7201 (Ref No : 69, Hmm No : 154)

## *70 मनपा शाळांमध्ये फर्निचर खरेदी करणे कामावरील खर्चातील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 38821568.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 853493.00/-

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील 28 शाळांसाठी वर्ष 2014-15 या वर्षात नव्याने फर्निचर खरेदी करण्यासाठी इतर लेखाशीर्षाखालील उपलब्ध तरतूद कमी करणे व फर्निचर खरेदी या लेखाशीर्षाखालील तरतूद वाढविणे यासाठी म.प्रां.मनपा अधिनियमातील "परिशिष्ट-ड" प्रकरण-सात मधील नियम-02नुसार स्थायी समितीच्या शिफारशीने महापालिकेची मंजूरी घेण्यात आल्याचे आढळून आले नाही.महाराष्ट्र शासन,उद्योग उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र.भांखस-1088/(2512)/उद्योग-6,दि.2 जानेवारी 1992 मधील परिशिष्ट-तीन व पाच नुसार फर्निचर खरेदी ही बाब महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखीव असतांना जाहिर निविदा मागवून खाजगी पुरवठादाराकडून फर्निचर खरेदी करण्यात आले आहे.जाहिर निविदा मागवितांना बाजारभावानुसार बेसरेट नमुद करुन निविदा न मागविता प्राप्त दरांची तुलना करुन निविदा निश्चिती करण्यात आली आहे. त्यामुळे प्राप्त दर वाजवी असल्याची खात्री झाली नाही. नामफलक पुरवठयासाठी प्राप्त साठयापेक्षा जादा संख्येचे प्रदान करण्यात आले आहे.शाळानिहाय पुरवठा केलेल्या फर्निचरच्या पडताळणीसाठी साठा नोंदवहया पडताळणीस प्राप्त झाल्या नाहीत.देयकातून कपात केलेला टिडीएस भरणा केलेले चलन पडताळणीस उपलब्ध झाले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील 28 शाळांसाठी वर्ष 2014-15 या वर्षात नव्याने फर्निचर खरेदी करण्यासाठी ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यास मा.आयुक्त यांच्या दि.01.03.2014 रोजी दिलेल्या मान्यतेने शाळेसाठी फर्निचर खरेदी या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध करुन जाहिर निविदा मागविण्यात आल्याचे विभागाच्या टिपणीवरुन दिसून येते. जाहिर निविदेमध्ये मे.जीएसएन असोसिएटस् लघुत्तम निविदाधारकाची निविदा मंजूर करण्यात आली असून स्थायी समिती ठराव क्र.21दि.01/08/2014 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार पुरवठादाराशी रु.38076/- एवढया मुद्रांक शुल्क किंमतीच्या पेपरवर दि.4/08/2014 रोजी करारनामा करुन पुरवठादारास बाबनिहाय पुरवठ्यासाठी कार्यादेश क्र.1283 ते 1295 दि.12/08/2014 अन्वये कार्यादेश देण्यात आले आहेत. पुरवठ्याचा कालावधी 90 दिवस विहीत करण्यात आला आहे. त्यानुसार वर्ष 2014-15 मध्ये फर्निचर खरेदीसाठी खर्चाच्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्य | परिमाण नग | दर प्रतीनग रु. | रक्कम रु. | प्रमाणक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | फळे | 140 | 17325 | 2425500 | AB-214 | 18.10.2014 |
| 2 | बेंच | 3080 | 7650 | 23408000 | AB-295<br>AB-306<br>AB-309<br>AB-326<br>Ab-327 | 11.12.2014<br>19.12.2014<br>19.12.2014<br>20.01.2015<br>20.01.2015 |
| | | (23562000-154000)=23408000 | | | | |
| 3 | स्टील कपाट | 56 | 24187.5 | 1354500 | AB-236 | 07.11.2014 |
| 4 | स्टील लॉकर | 140 | 33300 | 4662000 | AB-213 | 18.10.2014 |
| 5 | शिक्षक टेबल | 140 | 8887.5 | 1244250 | AB-218 | 18.10.2014 |
| 6 | शिक्षक खुर्ची | 140 | 3937.5 | 551250 | AB-217 | 18.10.2014 |
| 7 | नामफलक | 168 | 7706.25 | 1294650 | AB-270 | 30.11.2014 |
| 8 | मुख्याध्यापक टेबल | 28 | 42187.5 | 1181250 | AB-209 | 18.10.2014 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | मुख्याध्यापक खुर्ची | 28 | 8550 | 239400 | AB-212 | 18.10.2014 |
| 10 | नकाशा रॅक | 28 | 21487.5 | 601650 | AB-219 | 18.10.2014 |
| 11 | रेकॉर्ड रॅक | 28 | 15300 | 428400 | AB-210 | 18.10.2014 |
| 12 | नोटीस बोर्ड | 140 | 6525 | 913500 | AB-211 | 18.10.2014 |
| 13 | बालवाडी बेंच | 465 | 900 | 418500 | AB-216 | 18.10.2014 |
| 14 | बालवाडी मल्टी टेबल | 117 | 843.75 | 98718.75 | AB-215 | 18.10.2014 |
| | | एकूण | | 38821568 | | |

सदर फर्निचर खरेदी निविदेबाबत प्रशासकीय मान्यतेची नस्ती,पुरवठा चलने,खर्च प्रमाणके व प्रमाणकांसोबतची कागदपत्रे यांची तपासणी करता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या अनियमितांबाबत खुलासा करण्यास अर्धसमास पत्र क्र .155दि.29.11.2016अन्वये विभागास कळविण्यात आले असता लेखा परिक्षण कालावधीत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही .तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) उल्हासनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील 28 शाळांसाठी वर्ष 2014-15 या वर्षात नव्याने फर्निचर खरेदी करण्यासाठी मा.आयुक्त यांच्या दि.01.03.2014रोजी दिलेल्या मान्यतेनुसार शाळेसाठी फर्निचर खरेदी या लेखाशीर्षाखाली मंजुर तरतूद रु.2.00कोटी एवढी तरतूद उपलब्ध असल्याने नविन शाळेच्या इमारतीवरील खर्च या लेखाशीर्षाखालील रु.1.00कोटी,शाळांसाठी शिपाई व पहारेकरी ठेवणे याखालील रु.57.00लक्ष,शैक्षणिक सहल याखालील रु.20.00लक्ष,बालवाडी खेळणी साहित्य खरेदी याखालील रु.15.00 लक्ष अशी रु.3.92 कोटी एवढी रक्कम पुर्नर्विनियोजनाने उपलब्ध करुन घेवून ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. परंतू इतर लेखाशीर्षाखालील उपलब्ध तरतूद कमी करणे व फर्निचर खरेदी या लेखाशीर्षाखालील तरतूद वाढविणे यासाठी म.प्रां.मनपा अधिनियमातील "परिशिष्ट-ड" प्रकरण-सात मधील नियम-02नुसार स्थायी समितीच्या शिफारशीने महापालिकेची मंजूरी घेण्यात आल्याचे आढळून आले नाही.

2) महाराष्ट्र शासन,उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-1088/(2512)/उद्योग-6,दि.2 जानेवारी 1992 मधील परिशिष्ट-तीन व पाच नुसार फर्निचर खरेदी ही बाब महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवण्यात आली आहे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे वर्ष 2014-15 साठी दरकरार अस्तित्वात असतांना मनपाच्या शिक्षण विभागाने शासन आदेशानुसार महामंडळाकडून फर्निचर खरेदी न करता जाहिर निविदा मागवून खाजगी कंत्राटदाराकडून फर्निचर खरेदी करण्यात आली आहे.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.निर्णय क्र.भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि.2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.10.8 नुसार वस्तु खरेदीसाठी निविदा मागवितांना स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्दी देवून निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतू शिक्षण विभागाकडून फर्निचर खरेदीसाठी मागविण्यात आलेली निविदा परशुराम समाचार, नगर न्युज व अमृत कलश या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात निविदेस जाहिर प्रसिध्दी देण्यात आलेली नाही.

4) फर्निचर खरेदीसाठी निविदा मागविण्यापुर्वी बाजारभाव प्राप्त करुन त्यानुसार फर्निचर खरेदीसाठी खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. तसेच बाजारभावानुसार बेसरेट नमुद करुन त्यानुसार निविदा मागविण्यात आलेली नसल्यामुळे प्राप्त दर बाजारभावानुसार वाजवी असल्याबाबत खात्री न करता निविदाधारकांच्या प्राप्त दरांमध्ये तुलना करुन लघुत्तम निविदा मंजुर करण्यात आली आहे. त्यामुळे लघुत्तम निविदाधारकाचे दर हे बाजारभावानुसार वाजवी असल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

5) स्थायी समिती ठराव क्र.21 दि.01/08/2014 अन्वये फर्निचर खरेदी मान्यता देण्यात आली असून सदर ठरावाच्या प्रस्तावनेत फर्निचर खरेदीची खर्चाची प्रस्तावित रक्कम रु.2,05,85,165/- एवढी नमुद करण्यात आली असून स्थायी समितीने मंजूरी दिलेली रक्कम ठरावात नमुद करण्यात आलेली नाही. तथापि विभागाकडून उपरोक्त प्रमाणकांन्वये फर्निचर खरेदीवर रक्कम रु.3,88,21,568/- एवढा खर्च करण्यात आला आहे. सदर खर्चास स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही.

6) नामफलक खरेदीसाठी पुरवठादारास रु.7706.25प्रतीनग याप्रमाणे 168नगासाठी प्रमाणक क्र.270 दि.30/11/2014 अन्वये रु.12,94,650/- एवढया रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकासोबतच्या 28 पुरवठा चलनांची तपासणी करता एकूण 158 नग नामफलक प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यामुळे पुरवठादारास 10 नग नामफलकाचे रु.77062.50 एवढ्या जादा रक्कमेचे प्रदान झाले आहे. सदर रक्कम रु.77,062.50 वसुलपात्र आहे.

7) नकाशा रॅक खरेदीसाठी पुरवठादारास प्रमाणक क्र.219 दि.18/10/2014 अन्वये रु.6,01,650/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणक लेखा परिक्षणास तपासणीस उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदर प्रमाणकाची तपासणी करुन प्रदानाची रक्कम योग्य असल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

8) कार्यादेशानुसार पुरवठादारास फर्निचरचा पुरवठा मनपाच्या 28 शाळांमध्ये करणेबाबतचे आदेश आहेत. प्रमाणकासोबतच्या पुरवठा चलनानुसार संबधीत शाळेत पुरवठा करण्यात आलेल्या फर्निचरचा साठा पडताळणीसाठी संबंधीत शाळांच्या साठा नोंदवहया पडताळणीस उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या फर्निचर पुरवठयाच्या नोंदींची पडताळणी करुन प्राप्त साठा योग्य असल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

5) फर्निचर पुरवठा खर्चाच्या प्रमाणकांवर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. पुरवठादाराकडील उपप्रमाणकावर प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही. तसेच प्रदानाच्या रकमेस प्रशासन अधिकारी यांची मंजूरी घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही. पुर्तता करुन खुलासा करावा.

6) मे.जीएसएन असोसिएटस् यांचे फर्निचर खरेदीच्या देयकातून कपात केलेला टिडीएस रक्कम रु.7,76,431/- शासन खाती भरणा करण्यात आल्याबाबतचे चलन प्रमाणकांसोबत लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कपात केलेली टीडीएस आयकराची रक्कम शासन खात्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.77,062/-
अधिक रु.7,76,431/-
एकूण रु.8,53,493/-
आक्षेपाधीन रक्कम रु.3,88,21,568/-
FDSANMM7201 (Ref No : 70, Hmm No : 155)

## *71 नगररचना विभागाने बांधकाम लाईन आउट व जोता चेकींगसाठीची फी/शुल्क आकारणी केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 460000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 460000.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. 91 दि. 10/03/2010 अन्वये बांधकाम लाईन आउट व जोता चेकींग शुल्क चौ.मी प्रमाणे वसुल केले नाही तसेच बांधकाम प्रारंभ प्रमाण पत्र मधील अट क्र. 7 नुसार जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर प्रत्यक्ष जागेवर जाउन तपासणी अहवाल लेखा परिक्षणास पहावयास मिळालेला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका नगर रचना कार्यालयाचे 2014-15 मधील बांधकाम परवानगी नस्तीचे लेखा परीक्षण केले असता, उल्हासनगर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. 91 दि. 10/03/2010 अन्वये बांधकाम लाईन आउट व जोता चेकिंग साठीची फी दर 200 चौ.मी साठी रू. 7,500/- व 200 चौ.मी पेक्षाजास्त बांधकमासाठी रू. 10,000/- अशा प्रत्येक बांधकामासाठी लाईन आउट व जोता चेकिंग फीचे दर घेणेसाठी ठराव केलेला आहे तसेच उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर बांधकाम प्रारंभ प्रमाणापत्र मधील अट क्र. 7 जोत्या पर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तु विशारदने दाखल्यासह मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे त्यानंतर प्रत्यक्ष जागेवर तपासणी करून महानगरपालिकेचा दाखला प्राप्त करून घेउन नंतरच जोत्यावरील बांधकाम करावे असे नमूद आहे.

तरी 2014-15 मध्ये नगररचना विभागाने 54 बांधकामाना बांधकाम परवानगी दिली आहे, त्यानुसार सदरील बांधकाम परवानगीचे किती बांधकाम जोत्याच्यावर झाले आहे, तसे प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून बांधकामधारक/वास्तु विशारद यांनी महानगरपालिकेकडून दाखले प्राप्त करून घेतले नाही त्यामुळे 2014-15 मधील 54 बांधकामा पैकी किती बांधकामाना जोता प्रमाणपत्र दिले आहे याबाबत खात्री झाली नाही तसेच जोता चेकिंग शुल्क वसुल केलेबाबत लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. सदरील आक्षेपाबाबत अर्धसमास क्र. 201 दि. 28/12/2016 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे. त्यामुळे 2014-15 मध्ये एकुण 54 बांधकाम धारकाकडनू जोता चेकिंग शुल्क वसुल झाले नसल्याने 200 चौ.मी ची 32 बांधकाम प्रांरभ प्रकरणे आहे व 200 चौ.मी पेक्षा जास्त 22 बांधकाम प्रारंभ प्रकरणे आहे त्यांची एकत्रित वसुलपात्र रक्कम रू. 4,60,000/- (32X7500=2,40,000/- व 22X10000=2,20,000/-) आहे.

DATRYJM7501 (Ref No : 45, Hmm No : 201)

## *72 बांधकाम परवानगी मंजरी देताना स्टॅकिंग शुल्क, जिना व लिफ्ट क्षेत्रफळ शुल्क, जमीन विकास अधिभार शुल्क, रहिवाशी अधिभार शुल्क, उपकर शुल्क, प्रतिपूर्ती ठेव शुल्क व जोता प्रमाण पत्र शुल्क यांची आकारणी कमी केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 30113.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 30113.00/-

***नगररचना (सुधारणा) अधिनियम 2010 चे अधीसूचना दि. 27/12/2010 व नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना क्र.टीपीएस-1810/85 /प्र.क्र.2118/10/नवि-13 दि. 01/03/2011 नुसार इमारत बांधकाम विकास कर रहिवाशी क्षेत्रासाठी रेडीरेकनर मधील जमिन मुल्यांच्या 2% वाणीज्य वापरासाठी 4% व जमिन विकास कर रहिवासी वापरासाठी 0.5% व वाणिज्य वापरासाठी 1% इमारत बांधकाम विकास आकारणे बाबत शासन आदेश आहेत. तसेच प्रतिपूर्ती ठेव आकारणीसाठी महासभा ठराव क्र. 57 दि. 06/03/2016 नुसार रू. 10,000/- प्रतिपूर्ती ठेव घेणे आवश्यक असताना तसे पालन झाले नाही, तसेच इमारत बांधकाम विकास कर व जमिन विकास कर आकारणीची रक्कम कमी वसुल केली आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या अट क्र. 7 मधील जोता पर्यंत बांधकाम झाल्यानंतर जोता तपासणी शुल्क वसुल केलेले नाही.***

नगररचना विभागातील 2014-15 मध्ये निवडक बांधकाम परवानगी नस्तीचे लेखा परीक्षण केले असता, नगररचना (सुधारणा) अधिनियम 2010 चे अधीसूचना दि. 27/12/2010 व नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना क्र.टीपीएस-1810/85 /प्र.क्र.2118/10/नवि-13 दि. 01/03/2011 नुसार इमारत बांधकाम विकास कर रहिवाशी क्षेत्रासाठी रेडीरेकनर मधील जमिन मुल्यांच्या 2% वाणीज्य वापरासाठी 4% व जमिन विकास कर रहिवासी वापरासाठी 0.5% व वाणिज्य वापरासाठी 1% इमारत बांधकाम विकास आकारणे बाबत शासन आदेश आहेत. तसेच प्रतिपूर्ती ठेव आकारणीसाठी महासभा ठराव क्र. 57 दि. 06/03/2016 नुसार रू. 10,000/- प्रतिपूर्ती ठेव घेणे आवश्यक असताना तसे पालन झाले नाही, तसेच इमारत बांधकाम विकास कर व जमिन विकास कर आकारणीची रक्कम कमी वसुल केली आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या अट क्र. 7 मधील जोता पर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तु विशारदने दाखल्यासह मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र, महानगरपालिकेस सादर करण्यात यावे त्यानंतर प्रत्यक्ष जागेवर तपासणी करून महानगरपालिकेचा दाखला प्राप्त करून घेउन नंतर जोत्यावरील बांधकाम करावे असे आहे. त्याची जोताप्रमाणपत्र फी घेणेसाठी अट असताना सदर अटीची अमलबजावणी झालेली दिसून आलेली नाही.तसेच उल्हासनगर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. 13 दि. 28/06/1995 अन्वये बांधकाम परवानगी देण्याबाबत विकासककाकडून घ्यावयाच्या शुल्काबाबत सुधारणा करणे आवश्यक आहे.

अर्जदार श्री सुरेश अ.लालवाणी यांचा वास्तुविशारद श्री डी.जे.कोटवानी यांच्यामार्फत बांधकाम परवानगी सादर केलेला दि. 01/10/2013 रोजी प्रस्ताव बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र नगररचना विभाग यांचे जा.क्र.3 म.प्रा. / नरवि / बां.प / 119/13/337 दि. 11/03/2015 नुसार दिले आहे त्यानुसार खालीलप्रमाणे कमी शुल्क भरुन घेतलेले लेखा परिक्षणास दिसून येत आहे.

| अ.क्र | बाब व तपशिल | जिल्हा रेडीरेकनर दर/अधिभार शुल्क | वसुल केलेला दर/ अधिभार शुल्क | कमी वसुल केलेली अधिभार शुल्क रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | स्टॉकिंग शुल्क 70.40 चौ.मी | 10,000/- | 3,000/- | 7,000/- |
| 2 | जिना व लिफ्ट क्षेत्रफळ 15.56 चौ.मी ( Staire Case) 1)(15.56X16200=252072/- | 2,66,076/- | 2,52,072/- | 14,004/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | घेतलेले शुल्क)<br>2)15.56X17100=<br>266076/- घेणे<br>आवश्यक शुल्क | | | |
| 3 | जमिन विकास<br>अधिभार शुल्क<br>70.40 चौ.मी<br><br>1) (70.40 X10800X0.5%)<br>घेतलेले अधिभार<br>शुल्क<br><br>2) (70.40 X11400x0.5%)<br>घेणे अधिभार<br>शुल्क | 4,012/- | 3,801/- | 211/- |
| 4 | रहिवासी अधिभार<br>शुल्क 70.40 चौ.मी.<br><br>1) (70.40 X10800X2%)<br>घेतलेले अधिभार<br>शुल्क<br><br>2) (70.40 X11400X2%)<br>घेणे आवश्यक<br>अधिभार शुल्क | 16,051/- | 15,206/- | 845/- |
| 5 | उपकर अधिभार<br>शुल्क 1%<br><br>(92.83X10800X1%)<br>घेतलेले उपकर<br>शुल्क<br><br>(92.83X11400X1%)<br>घेणे आवश्यक<br>उपकर शुल्क | 10,583/- | 10,030/- | 553/- |
| 6 | प्रतिपूर्ती ठेव<br>आकारणी शुल्क | 10,000/- | 5,000/- | 5,000/- |
| 7 | जोता प्रमाणपत्र<br>शुल्क | 7,500/- | 5,000/- | 2,500/- |
| एकुण | | 3,24,222/- | 2,94,109/- | 30,113/- |

सदरील आक्षेपाबाबत नगर रचना विभागाला अर्धसमास क्र.202 दि. 28/12/2016 अन्वये खुलासा मागविला आसता विभागाचे सदरील अर्धसमासाचे उत्तर अप्राप्त आहे.त्यामुळे वसूल पात्र रक्कम रु.30113/-ठेवण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 46, Hmm No : 202)

## *73 उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना या कामातील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4218540.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3043632.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1174908.00/-

***उल्हासनगर शहराचा विकास आराखडा योजना कामासाठी एकूण 3 निविदा धारकांनी निविदा सादर केल्या असून EOI च्या CLAUSE 5.4 अन्वये70% पेक्षा जास्त गुण असणा-या सल्लागार संस्था पात्र ठरतील परंतु त्यामध्ये फक्त एकाच संस्थेस 70% पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत.महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम 150 अन्वये एखादया कामासाठी स्वीकारलेल्या निविदेची रक्कम हि मंजूर अंदाजापेक्षा 10% किंवा रु.20000/- एवढया रक्कमेनी (किवा दोन्ही बाबतीत त्याहून अधिक रक्कमेनी) कमी असेल तेव्हा सदर अंदाजाची पुनर मांडणी करून,कमी दराने नवीन अंदाजाचा गोषवारा तयार करून संक्षिप्त अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे निविदेमध्ये स्पर्धा झालेली नाही, अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम घेणेपासून आयुक्त यांनी सुट दिली आहे. अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास सुट देणे नियमबाहय आहे. त्यामुळे मान्य निविदेच्या 5% अनामत व सुरक्षा अनामत वसुल करणे आवश्यक आहे नियमानुसार आयकर कपात केलेला नाही व सेवाकर नियमानुसार वसुल केलेला नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका नगररचना विभागाचे 2014-15 लेखा परीक्षण केले असता सुधारीत आराखडाबाबत स्थायी समिती ठराव क्र. 116 दि. 05/2/2010 नुसार उल्हासनगर शहराचा सुधारीत योजना आराखडा बनविण्याचे काम “CEPT” अहमदाबाद यांना दिलेले आहे. सदर कामाबाबतची नस्ती व प्रमाणक क्र. खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | रक्कम अदा केलेल्या कंत्राटदाराचे नाव | प्र.क्र | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. सेंटर फॉर इनव्हारमेंन्टल प्लॉनिंग आणि टेक्नॉलॉजी अहमदाबाद | 1551 | 31/07/2014 | 3,18,910/- |
| 2 | मे. सेंटर फॉर इनव्हारमेंन्टल प्लॉनिंग आणि टेक्नॉलॉजी अहमदाबाद | 1552 | 31/07/2014 | 7,24,722/- |
| 3 | मे. सेंटर फॉर इनव्हारमेंन्टल प्लॉनिंग आणि टेक्नॉलॉजी अहमदाबाद | 3929 | 27/01/2015 | 20,00,000/- |

| एकुण | | | 30,43,632/- |
|---|---|---|---|

उपरोक्त खर्चाबाबतच्या कामाची निविदा नस्ती तपासणी केली असता 3 निविदा पात्र नसतानाही "CEPT" अहमदाबाद यांची निविदा मान्य केली आहे. सर्व दर हे करासहित असताना सेवाकर बिलात वेगळा नमूद केला आहे. आयकर कमी कपात केला आहे. वाढीव फी बाबतची कारणे नमूद केली नाहीत. सदरील खर्चाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) कामाची वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याचे अभिलेख नाहीत. एकूण 3 निविदाधारक यांनी निविदा सादर केल्या असून EOI च्या Clause 5.4 अन्वेय 70% पेक्षा जास्त गुण असणा-या सल्लागार संस्था पात्र ठरतील परंतु त्यामध्ये फक्त एकच संस्थेस 70% पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. त्यामुळे निविदेमध्ये स्पर्धा झालेली नाही तसेच अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम मान्य निविदेच्या 5% अनामत व सुरक्षा अनामत रक्कम रू. 5,31,250/- घेतलेली दिसून आलेली नाही. सदरील बाबतीत विभागाने अनुपालनात मा. आयुक्त निर्णय घेतल्याचे कळविले आहे. तरी सदरील बाबतीत नियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

2) मान्य निविदा फी व वाढीव फी असे एकूण रू. 1,06,25,000/- असून प्रत्येकी रू. 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम-1958 मधील कलम 63 नुसार रू. 9,800/- या रक्कमेच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते परंतु रू. 100/- च्या दोन मुद्रांक पेपरवर केला आहे. उर्वरित रक्कम रू. 9,600/- वसुलपात्र आहे.

3) निविदाधारक CEPT अहमदाबाबद यांन वाटाघाटीनुसार दिलेले दर हे एकत्रीत असल्याने सर्व करांसहीत आहेत. हया बाबी विचारात घेउन स्थायी समिती ठराव क्र. 116 दि. 5/02/2010 निविदा मान्य केली आहे. तसेच करारनामा अट क्र. 2.6.4 नुसार सर्व दर करासहित असल्याचे नमूद आहे. असे असताना उपरोक्त बिले प्रदान करताना 12.36% सेवाकर सबंधित संस्थेला अदा केला आहे. त्यामुळे सेवाकरापोटी रक्कम रू. 3,29,695/- जादा प्रदान झाले आहे. सदर बाबतीत विभागाने लेखा विभागाशी संबंधित असल्याने कळविले आहे. त्यामुळे सेवाकरापोटी रक्कम रू. 3,29,695/- जादा केलेले प्रदान वसूल होणे आवश्यक आहे.

4) उल्हासनगर शहराचा सुधारीत योजना आराखडा बनविण्याचे कामासाठी 2013-14 मध्ये रक्कम रू. 30,43,632/- इतका खर्च झाला असून आयकर अधिनियम 1961मधील कलम 1964(J) सल्लागार फी म्हणून 10% आयकर कपात करणे बंधनकारक आहे. परंतु रू. 20,872/- वसुल केला आहे सदर बाबतीत विभागाने लेखा विभागाशी संबंधित असल्याने कळविले आहे. तरी उर्वरित आयकर रक्कम रू. 3,04,363/- एवढी कपात केलेली दिसून आलेली नाही

5) कामाची मुदत 28 महिने असून 4/08/2012 रोजी पूर्ण झाली आहे. पहिली मुदतवाढ संपणेपूर्वी दुसरी मुदतवाढ घेणे आवश्यक होते.त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका सर्वसाधारण नियमाचे अवलंबन झालेला दिसून येत नाही. परंतु कंत्राटदाराने दि.04/06/2013 रोजी मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे. मा. महासभेने दि. 05/02/2014 अन्वये मंजुरी दिली आहे. विलंब कालावधीसाठी दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते त्याचे पालन झाले नाही. तसेच वाढीव फी रू. 41,65,000/- मंजूर करण्याची कारणे नमूद नाहीत. ही बाब आयुक्त व महासभेने मान्य केली असल्याने कामाच्या स्कोप प्रमाणे काम झाल्याचे प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे कामाबाबत लेखापरीक्षणास खात्री झालेली नाही. सुधारीत विकास आराखडा बनविण्यास विलंब झाल्याने वाढीव फी दयावी लागली. त्यामुळे रू. 41,65,000/- खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडलेला दिसून येत आहे. सदरील आक्षेप मुदयांबाबत अर्धसमास क्र. 199 दि. 28/12/2016 अन्वये विभागाला खुलासा मागविला असता तरी विभागाचा उपरोक्त मुद्दयाबाबत खुलासा समाधान कारक नसल्याने खालील प्रमाणे आक्षेपाधीन व वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रू. 30,43,632/- (कामावरील खर्च)

वसूल पात्र रक्कम रू. 11,74,908/- (सुरक्षा अनामत रू. 5,31,250/- +मुद्रांक शुल्क रू. 9,600/-+ सेवा शुल्क जादा प्रदान रू. 3,29,695/-+आयकर रू. 3,04,363/-

## *74 बांधकाम विकासकांकडून जमीन विकास शुल्काची कमी रक्कम वसूल केलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 6014.00/-

***बांधकाम विकासकांकडून जमीन विकास शुल्काची रु.6014/-इतकी रक्कम वसुलपात्र आहे.***

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम 2010 चे कलम 124 अन्वये विकास शुल्काबाबत नगर विकास विभाग,शा.नि. क्र.टिपीएस 1810/85/प्र.क्र.2118/10/नवि13 दि.01/03/2011 ची अधिसुचनेनुसार इमारतीच्या बांधकामाच्या जमीन विकासाची 0.5 टक्के विकास शुल्काची आकारणी करणे आवश्यक आहे.

नगररचना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता बांधकाम परवानगी मंजूर करतांना इमारत बांधकाम विकास शुल्काची रक्कम रु.6014/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. आक्षेपाच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.190 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | जागेचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | नगरविकास विभाग अधिसुचनेनुसार शुल्क (जमीनीचा दर) | आकारणे आवश्यक एकूण रक्कम (रुपये) | आकारलेली रक्कम (रुपये) | कमी आकारलेली वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | (4x6) | | (7-8) |
| 1 | श्री. भरत हसवानी | 79/13/358 दि.25/03/15 | 124.9 | 177 | 16900 x 0.5 टक्के | 10554 | 7750 | 2804 |
| 2 | श्री.वि.की.मोहन दास व मनोज भीम | 136/13/351 दि.16/03/15 | 441 | 604.77 | 16900 x 0.5 टक्के | 37264.5 | 35523 | 1741.5 |
| 3 | श्रीमती कमला नागदेव | 39/14 दि.16/03/15 | 112 | 112 | 16900 x 0.5 टक्के | 9464 | 8788 | 676 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | श्री.गुलाब लल्ला | 07/13/359 दि.25/03/15 | 35.11 | 23 | 16900 x 0.5 टक्के | 3042 | 2250 | 792 |
| | | | | | | | एकूण वसुलपात्र रक्कम | 6013.5 |

DATPVWM7501 (Ref No : 89, Hmm No : 190)

## *75 जीना ,पॅसेज व लॉबी इ.बाबीं सवलतीकरीता आकारणी कमी केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 724760.00/-

***जीना , पॅसेज व लॉबी इ.बाबीं सवलतीकरीता रक्कम रु.724760/- इतकी कमी आकारणी केल्याने वसुलपात्र आहे***

उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.91 दि.10/03/2010 अन्वये इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ जीना,लॉबी,पॅसेज इ.बाबींच्या सवलतीकरीता शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या 150 टक्के (रहिवास प्रयोजनार्थ) व 250 टक्के (वाणिज्य प्रयोजनार्थ) अधिमुल्य शुल्क आकारणेचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.
उल्हासनगर महानगरपालिका नगर रचना विभागाकडून देण्यात आलेल्या इमारत बांधकाम परवानगीच्या काही प्रकरणांची तपासणी केली असता आकारणी कमी केल्याने एकूण रुपये 724760/- इतकी रक्कम कमी आकारण्यात आल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे. आक्षेपाच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.188 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व | वापराचा प्रकार | जिन्याचे क्षेत्रफ | महासभा ठराव क्र.91 दि.10/03/20 | ठरावानूसार आकारणे | आकारलेली रक्कम | कमी आकारलेली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | दिनांक | | ळ (चौ.मी .) | 10 अन्वये आकारावयाचे अधिमुल्य शुल्क (जमीनीचा दर) | आवश्यक एकूण रक्कम (रुपये) | (रुपये) | वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | (5x6) | | (7-8) |
| 1 | श्री. भरत हसवानी | 79/13/358 दि.25/03/15 | रहिवास | 45.18 | 16900 x 1.5 | 1145313 | 847125 | 298188 |
| 2 | श्री.वि.की.मोहन दास व मनोज भिम | 136/13/351 दि.16/03/15 | रहिवास | 142 | 16900 x 1.5 | 3597165 | 3429014 | 168152 |
| 3 | श्री.गुलाब लल्ला | 07/13/359 दि.25/03/15 | रहिवास | 17.48 | 16900 x 1.5 | 443118 | 442000 | 258420 |
| | | | वाणिज्य | 6.09 | 16900 x 2.5 | 257302 | | |
| | | | | | एकूण वसुलपात्र रक्कम रुपये | | | 724760 |

DATPVWM7501 (Ref No : 90, Hmm No : 188)

## *76 बांधकाम विकासकांकडून कामगार कल्याण उपकराची कमी रक्कम वसूल केलेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 216251.00/-

***निवडक प्रकरणांच्या लेखापरीक्षणांती बांधकाम विकासकांकडून कामगार कल्याण उपकराची कमी आकारणी***

***केलेली रक्कम रु.216251/- वसुलपात्र आहे.***

उदयोग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र.बीसीए2009/प्र.क्र.108कामगार7अ मंत्रालय,मुंबई दि.17/06/2010 अन्वये इमारत व इतर बांधकामावर बांधकामाच्या एकूण मुल्यानूसार एक टक्का कामगार कल्याण उपकर वसूल करावयाचा आहे. तसेच सदर उपकर विहित वेळेत न भरल्यास उपकराच्या रक्कमेवर प्रतिमाह दोन टक्के व्याज भरावे लागेल, अशी तरतूद आहे.

नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका विभागामधील काही निवडक प्रकरणे तपासली असता खालील प्रकरणांत उपकराची एकूण रक्कम रु.216251/- विकासकाकडून बँक खाती कमी जमा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच विकासकांकडून बँकेत भरणा केलेली रक्कम प्रत्यक्षात बँकेत जमा झाली किंवा कसे याबाबत ताळमेळ घेणे आवश्यक आहे. परंतू याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.183 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांत देखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) (सवलतीच्या बाबींच्या क्षेत्रफळासह) | शासन निर्णयानुसार आकारावयाचा दर (बांधकामाचा दर) | आकारणे आवश्यक एकूण रक्कम (रुपये) | आकारलेली रक्कम (रुपये) | कमी आकारलेली वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | (4x5) | | (6-7) |
| 1 | श्री.प्रकाश मखिजानी | 21/13/408 दि.07/10/15 | 360 | 25000 x 1 टक्के | 90000 | 41040 | 48960 |
| 2 | श्री. भरत हसवानी | 79/13/358 दि.25/03/15 | 177 | 25000 x 1 टक्के | 44250 | 22125 | 22125 |
| 3 | श्री.अशोक कुकरेजा | 97/13/289 दि.19/01/1 | 464.33 | 25000 x 1 टक्के | 116082 | 77250 | 38832 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | | | |
| 4 | श्री.वि.कि.मोहनदास व मनोज भिम | 136/13/351 दि.16/03/15 | 604.77 | 25000 x 1 टक्के | 151192.5 | 97907 | 53286 |
| 5 | श्री.गंगाराम पवार | 18/14/335 दि.10/03/15 | 62 | 25000 x 1 टक्के | 15500 | 10309 | 5191 |
| 6 | श्री.महेंद्र शांडील्य | 21/14/352 दि.16/03/15 | 196.5 | 25000 x 1 टक्के | 49125 | 33208 | 15917 |
| 7 | श्री.मनोहर मुलचंदानी | 28/14/354 दि.16/03/15 | 53 | 25000 x 1 टक्के | 13250 | 8957 | 4293 |
| 8 | श्री.दिनेश रुपानी | 29/14/339 दि.12/03/15 | 89.9 | 25000 x 1 टक्के | 22475 | 11250 | 11225 |
| 9 | श्रीमती कमला नागदेव | 39/14 दि.16/03/15 | 112 | 25000 x 1 टक्के | 28000 | 18928 | 9072 |
| 10 | श्री.गुलाब लल्ला | 07/13/359 दि.25/03/15 | 59 | 25000 x 1 टक्के | 14750 | 7400 | 7350 |
| | | | | | | एकूण रक्कम | 216251 |

DATPVWM7501 (Ref No : 91, Hmm No : 183)

## *77 इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 158162.00/-

***निवडक प्रकरणांच्या लेखापरीक्षणांती इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेली रक्कम रु.158162/-वसुलपात्र आहे.***

नियोजन व नगररचना(सुधारणा) अधिनियम 2010 ची अधिसूचना दि.27/12/2010 व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र.टीपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि.01/03/2011 नूसार इमारत बांधकाम विकास कर रहिवास क्षेत्राकरीता रेडीरेकनरमधील जमीन मुल्याच्या दोन टक्के व वाणिज्य वापरासाठी चार टक्के आकारणेबाबत शासन आदेश आहेत.

नगररचना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता काही निवडक तपासणी केलेल्या प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना इमारत बांधकाम विकास शुल्काची रक्कम रु.269340/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.186 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | जागेचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | नगरविकास विभाग अधिसुचनेनुसार शुल्क (जमीनीचा दर) | आकारणे आवश्यक एकूण रक्कम (रुपये) | आकारलेली रक्कम (रुपये) | कमी आकारलेली वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | (7x8) | | (9-10) |
| 1 | श्री.प्रकाश मखिजानी | 21/13/408 दि.07/10/15 | 249.39 | 360 | 11400 x 2 टक्के | 82080 | 56852 | 25228 |
| 2 | श्री. भरत हसवानी | 79/13/358 दि.25/03/15 | 124.9 | 177 | 16900 x 2 टक्के | 59826 | 30750 | 29076 |
| 3 | श्री.अशोक कुकरेजा | 97/13/289 दि.19/01/1 | 336.98 | 32.27 | 16900 x 4 टक्के | 21815 | 0 | 21815 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | | | | |
| 4 | श्री.वि.कि. मोहनदास व मनोज भिम | 136/13/351 दि.16/03/15 | 441 | 604.77 | 16900 x 2 टक्के | 204412 | 142091 | 62321 |
| 5 | श्री.गंगाराम पवार | 18/14/335 दि.10/03/15 | 60.16 | 62 | 16900 x 2 टक्के | 20956 | 20222 | 734 |
| 6 | श्री.मनोहर मुलचंदानी | 28/14/354 दि.16/03/15 | 52.7 | 53 | 16900 x 2 टक्के | 17914 | 17539 | 375 |
| 7 | श्री.दिनेश रुपानी | 29/14/339 दि.12/03/15 | 70.26 | 55.9 | 12500 x 2 टक्के | 13975 | 11700 | 2275 |
| 8 | श्रीमती कमला नागदेव | 39/14 दि.16/03/15 | 112 | 112 | 16900 x 2 टक्के | 37856 | 35150 | 2706 |
| 9 | श्री.गुलाब लल्ला | 07/13/359 दि.25/03/15 | 35.11 | 23 | 16900 x 2 टक्के | 7774 | 4100 | 3674 |
| | | | | 13 | 16900 x 4 टक्के | 8788 | 4100 | 4688 |
| | | | | | | | एकूण रक्कम | 158162 |

DATPVWM7501 (Ref No : 92, Hmm No : 186)

## *78 इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कराची कमी रक्कम वसूल केलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

उल्हासनगर महानगरपालिका

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 5920.00/-

***इमारत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एकूण रक्कम रु.5920/- वसुलपात्र आहे.***

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. स्थासंक-8209/प्र.क्र.65/09/नवि-34 दि.06/08/2012 अन्वये स्थानिक संस्था कराची रक्कम खालीलप्रमाणे आकारणी करून वसूल करणे आवश्यक आहे.
चौथ्या मजल्यापर्यंत रु.100/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र
पाचवा मजला ते सातव्या मजल्यापर्यंत रु.150/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र
सात मजल्यावरील बांधकामास रु.200/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका विभागामधील काही निवडक प्रकरणे तपासली असता खालील प्रकरणांत स्थानिक संस्था कराची एकूण रक्कम रु.5920/- विकासकांकडून कमी जमा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.184 दि. 26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

इमारत बांधकाम स्थानिक संस्था कराच्या वसुलीचे विवरणपत्रक

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) (सवलतीच्या बाबींच्या क्षेत्रफळासह) | नगरविकास शासन निर्णय दि.06/08/12 नूसार आकारणी (रुपये) | स्थानिक संस्था कर रक्कम (रुपये) | स्थानिक संस्था कर भरलेली रक्कम (रुपये) | स्थानिक संस्था कर वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | श्री.अशोक कुकरेजा | 97/13/289 दि.19/01/15 | 464.33 | 200 | 92866 | 91400 | 1466 |
| 2 | श्री.वि.कि.मोहनदास व मनोज भिम | 136/13/351 दि.16/03/15 | 604.77 | 200 | 120954 | 116600 | 4354 |
| 3 | श्री.गंगाराम पवार | 18/14/335 दि.10/03/15 | 62 | 100 | 6200 | 6100 | 100 |
| | | | | एकूण वसुलपात्र रक्कम रुपये | | | 5920 |

## *79 इमारत बांधकाम प्रतिभुती ठेवीची कमी आकारणी केलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 25000.00/-

***इमारत बांधकाम प्रारंभ परवानगीच्या अनुषंगाने स्विकारण्यात येणा-या प्रतिपुर्ती ठेवीची रक्कम रु.25000/- वसुलपात्र आहे.***

उल्हासनगर मनपा ठराव क्र.42 दि.02/12/2008 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन 12 ते 18 नोंव्हेंबर 2009 नूसार प्रसिध्द केलेनूसार महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26(1) अन्वये प्रतिपुर्ती ठेव आकारणी रक्कम रु.20/- प्रती चौ.मी. किंवा कमीतकमी रक्कम रु.10000/- आकारणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. उदाहरणादाखल खालीलप्रमाणे प्रकरणांत कमी प्रतिपुर्ती ठेवीची रक्कम जमा केल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत रक्कम रु.25000/- वसुल करणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.187 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

| अ.क्र. | विकासकाचे नाव | पावती क्र. | जमा प्रतीपुर्ती ठेवीची रक्कम | जमा होणे आवश्यक प्रतीपुर्ती ठेवीची रक्कम रुपये | फरकाची वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.मनोहर मुलचंदानी | 28/14/354 दि.16/03/15 | 5000/- | 10000/- | 5000/- |
| 2 | श्री.दिनेश रुपानी | 29/14/339 दि.12/03/15 | 5000/- | 10000/- | 5000/- |
| 3 | श्री.गुलाब लल्ला | 07/13/359 दि.25/03/15 | 5000/- | 10000/- | 5000/- |
| 4 | श्री. भरत हसवानी | 79/13/358 दि.25/03/15 | 5000/- | 10000/- | 5000/- |
| 5 | श्री.गंगाराम पवार | 18/14/335 दि.10/03/15 | 5000/- | 10000/- | 5000/- |
| | | | | एकुण वसुलपात्र रक्कम रुपये | 25000/- |

## *80 मे रिजेन्सी निर्माण लि., उल्हासनगर यांचे म्हारळ येथील इमारत बांधकाम प्रारंभ परवानगीच्या अनुषंगाने अभिप्राय...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 18**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 28214062.00/-

| |
|---|
| ***जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेशानूसार विकासकाकडून वापराकरीता भुखंड आरक्षित ठेवला किंवा कसे, सर्व्हे क्र.40 ते 58 पैकी 21 एकर शासकीय जमीन शासन जमा करण्याची कार्यवाही झाली किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही. शासनाच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय जमीन किंवा तिचा कोणताही भाग विकता, गहान ठेवता, भाडेपटटयाने देता, हस्तांतरीत करता येणार नाही किंवा अन्य कोणत्याही प्रकारे ताब्यात देता येणार नाही. असे नमूद असतांना म्हारळ सहकारी सामुदायीक शेती सोसायटी.लि. म्हारळ व मे.रिजन्सी निर्माण लि. यांचेत दि.04/08/2008 रोजी साठेकरार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. जमीन मंजूरी आदेशापासून / ताब्यात घेतल्यापासून एक महीन्याच्या आत संस्थेने विहीत नमून्यात करारनामा करून देणेची कार्यवाही झाली किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे आदेशापुर्वीच म्हारळ सहकारी सामुदायीक शेती सोसायटी.लि. व मे.रिजन्सी निर्माण लि. यांचेत दि.04/08/2008 रोजी साठेकरार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. 75 टक्के रक्कम आदेशाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत जमीन खरेदीदार मे.रिजेन्सी निर्माण लि. यांनी शासन जमा केली किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई यांचे आदेशातील अट क्र.5 नूसार अर्जदार सोसायटीस जमीन विकल्यानंतर शेती योग्य अशी दुसरी जमीन घेणे बंधनकारक राहील. असे नमूद आहे. तरी म्हारळ सहकारी सामुदायीक संस्थेने दुसरी शेती योग्य जमीन घेतली किंवा कसे याबाबत याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनींचे वितरण करणे) नियम 1971 च्या नियम 14 अन्वये कब्जाहक्काची किंमत वसुल करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र.महसूल/क-9/टे-7/एलबीपी/सीआर-1/08 दि.22/07/2008 मधील अटी व शर्ती क्र.2 नूसार प्रतिग्रहीता जमीन*** |

***देण्यात आल्याच्या तारखेपासून दोन वर्षे समाप्त होण्यापुर्वी जमीन लागवडीखाली आणील, असे नमूद आहे. परंतू याप्रमाणे कार्यवाही झाली नसून मे.रिजन्सी निर्माण लि. यांचेसोबत दि.04/08/2008 रोजी साठेकरार केला असल्याचे निदर्शनास आले आहे. रक्कम रु.10000/- स्टॅकिंग शुल्क आकारणी केली नसल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे. जमीन विकास शुल्क, इमारत विकास शुल्क, सामासिक अंतरात सुट अधिमुल्य ,उपकर यांची परिगणना सन 2015 च्या शिघ्रसिध्द गणक पुस्तिकेनुसार न करता सन 2014 च्या शिघ्रसिध्द गणक पुस्तिकेनुसार केल्याने एकूण रक्कम रु.2,82,04,062/- ची वसुली प्रत्यक्ष वसुल होणेच्या दिनांकापर्यंत प्रतीमाह दोन टक्के दराने वसुलपात्र आहे.***

1) बांधकाम प्रारंभ परवानगी क्र.उमपा/नरवि/बांप/125/13/338 दि.12/03/2015
2) विकासकाचे नाव-रिजेन्सी निर्माण लि. (महेश सत्यनारायण खैरारी)
3) प्लॉट व सर्व्हे क्र.40 ते 44, 46 ते 52, 54 ते 58, उल्हासनगर -1
4) भुखंडाचे क्षेत्रफळ-247700 चौ.मी.
5) वास्तुविशारदाचे नाव- श्री. अनिल निरगुडे

उपरोक्त इमारत बांधकाम प्रारंभ परवानगी नस्तीच्या लेखापरीक्षणाअंती निदर्शनास आलेल्या अनियमिततेंच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .191 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे . सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र.महसूल/क-9/टे-7/एलबीपी/सीआर-1/08 दि.22/07/2008 नूसार सर्व्हे क्र.48,49,53,55,56 एकूण क्षेत्र 3.66 हेक्टर जमिनीवर खालीलप्रमाणे आरक्षण आहे. तरी त्याप्रमाणे विकासकाकडून वापराकरीता भुखंड आरक्षित ठेवला किंवा कसे याबाबत अभिलेख्या अभावी पडताळणी करता आली नाही.

| अ.क्र. | आरक्षण क्र. | आरक्षित वापर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | सर्व्हे क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | खेळाचे मैदान | 2.69 | 53,55,56 |
| 2 | 51 | प्राथमिक शाळा | 0.72 | 48,49 |
| 3 | 141 | मार्केट | 0.25 | 49 |

2) सर्व्हे क्र.40 ते 58 पैकी 21 एकर शासकीय जमीन शासन जमा करणेबाबत तलाठी, उल्हासनगर यांना आदेश देण्यात आले आहेत. तरी याप्रमाणे कार्यवाही झाली किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

3) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेशातील अटी व शर्ती क्र.4 नूसार जमीनीचा वापर म्हारळ सामुदायी शेती संस्थेने शेती करीताच केला पाहीजे. तसेच संस्थने किंवा तिच्या कोणत्याही सदस्याने त्या जमीनीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा वापर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे कोणत्याही वाणिज्य, व्यापारी किंवा व्यावसायीक प्रयोजनासाठी करता कामा नये, असे नमूद असतांना जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र.महसूल/क-1/टे-14/एनएपी/एसआर-(217/09) 151/10 दि.22/11/2010 अन्वये रहिवास क्षेत्र 224256.35 चौ.मी. व वाणिज्य क्षेत्र 15443.75 चौ.मी.असे एकूण क्षेत्र 239700 चौ.मी.या क्षेत्राची बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याबाबत अनुज्ञा दिली आहे. यामुळे दोन्ही आदेशात विसंगती दिसून येत आहे.

4) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र.महसूल/क-9/टे-7/एलबीपी/सीआर-1/08 दि.22/07/2008 मधील अटी व

शर्ती क्र.6 नूसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 च्या कलम 36(4) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे असेल त्या व्यतिरीक्त संस्थेस शासनाच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय जमीन किंवा तिचा कोणताही भाग विकता, गहान ठेवता, भाडेपटटयाने देता, हस्तांतरीत करता येणार नाही किंवा अन्य कोणत्याही प्रकारे ताब्यात देता येणार नाही. असे नमूद असतांना म्हारळ सहकारी सामुदायीक शेती सोसायटी.लि. म्हारळ व मे.रिजन्सी निर्माण लि. यांचेत दि.04/08/2008 रोजी साठेकरार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र.महसूल/क-1/टे-14/एनएपी/एसआर-(217/09) 151/10 दि.22/11/2010 अन्वये रहिवास क्षेत्र 224256.35 चौ.मी. व वाणिज्य क्षेत्र 15443.75 चौ.मी.असे एकूण क्षेत्र 239700 चौ.मी.या क्षेत्राची बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याबाबत अनुज्ञा दिली आहे. यामुळे जिल्हाधिकारी यांचे दि.22/07/2008 च्या आदेशाचे उल्लंघन झाले आहे.

5) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र.महसूल/क-9/टे-7/एलबीपी/सीआर-1/08 दि.22/07/2008 मधील अटी व शर्ती क्र.9 नुसार जमीन मंजूरी आदेशापासून / ताब्यात घेतल्यापासून एक महीन्याच्या आत संस्थेने विहीत नमून्यात करारनामा करून देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

6)विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई यांचे आदेश क्र.मशा/कार्या-2/जमीन-2/सीआर-406/2009 दि.14/10/2009 नूसार नवीन अविभाज्य सत्ता प्रकाराने धारण केलेली शेत जमीन बीनशेती प्रयोजनासाठी विकण्यास 75 टक्के रक्कम आकारून परवानगी दिली आहे. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त यांनी चेअरमन, म्हारळ सहकारी सामुदायीक शेती सोसा.लि. म्हारळ यांना त्यांनी मे.रिजेन्सी निर्माण लि. उल्हासनगर यांना अकृषिक प्रयोजनार्थ विक्री करण्यास परवानगी दिली आहे. असे असतांना दि.14/10/2009 चे विभागीय आयुक्त यांचे आदेशापुर्वीच म्हारळ सहकारी सामुदायीक शेती सोसायटी.लि. व मे.रिजन्सी निर्माण लि. यांचेत दि.04/08/2008 रोजी साठेकरार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

7) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई यांचे आदेश क्र.मशा/कार्या-2/जमीन-2/सीआर-406/2009 दि.14/10/2009 मधील अट क्र.1 नूसार सन 2008 चे बाजार मुल्य दर तक्त्यानूसार केलेल्या रिगणनेनूसार जमीनीची किंमत रु.10,08,61,200/- इतकी आहे. यापैकी संस्थेने रक्कम रु.16893140/- शासन जमा केली असल्याचे आदेशात नमूद आहे. तरी उर्वरीत रक्कम रु.83968060/- चे 75 टक्के रक्कम रु.62976045/- आदेशाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत जमीन खरेदीदार मे.रिजेन्सी निर्माण लि. यांनी शासन जमा केली किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

8) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई यांचे आदेश क्र.मशा/कार्या-2/जमीन-2/सीआर-406/2009 दि.14/10/2009 मधील अट क्र.5 नूसार अर्जदार सोसायटीस जमीन विकल्यानंतर शेती योग्य अशी दुसरी जमीन घेणे बंधनकारक राहील. असे नमूद आहे. तरी म्हारळ सहकारी सामुदायीक संस्थेने दुसरी शेती योग्य जमीन घेतली किंवा कसे याबाबत याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

9) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई यांचे आदेश क्र.मशा/कार्या-2/जमीन-2/सीआर-406/2009 दि.14/10/2009 मधील अट क्र.17 नूसार परवानगीच्या अनुषंगाने सर्व अटी व शर्ती विक्री करणारे व खरेदीदारास बंधनकारक राहतील अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र विहीत मुद्रांक पेपरवर खरेदीपुर्वी संबंधित तहसिलदारांकडे व जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे सादर करणे आवश्यक असतांना प्रतिज्ञापत्र सादर केले किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

10) कॉन्सिल ऑफ आर्कीटेक्चर यांचे दि.15/07/1981 चे नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रतीवर श्री.अनिल

निरगुडे यांचे नोंदणी क्र. सीए/81/6472 वर नुतनीकरण दि.31/12/2010 पर्यंत वैध होते. तरी परवान्याचे नुतनीकरण केले किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

11)जिल्हाधिकारी ठाणे यांचे दि.22/07/2008 चे आदेशानूसार संस्थेस दिलेल्या सर्व्हे क्र.40 ते 58 मधील ज्या जमीनी संपादानापुर्वी खाजगी मालकीच्या होत्या. त्या जमीनी संस्थेला कब्जेहक्काने परत देण्यात याव्यात. त्यासाठी संस्थेकडून महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनींचे वितरण करणे) नियम 1971 च्या नियम 14 अन्वये कब्जाहक्काची किंमत वसुल करणे आवश्यक आहे. तसेच संस्थेकडून संपूर्ण भुईभाडयाची रक्कम मुळ भुईभाडयाच्या रक्कमेवर 15 टक्के सन 1956 पासून आजतागायत वसूल करणे आवश्यक आहे. तरी सदर रक्कम वसुल केली किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

12) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र.महसूल/क-9/टे-7/एलबीपी/सीआर-1/08 दि.22/07/2008 मधील अटी व शर्ती क्र.2 नूसार प्रतिग्रहीता जमीन देण्यात आल्याच्या तारखेपासून दोन वर्षे समाप्त होण्यापुर्वी जमीन लागवडीखाली आणील. असे नमूद आहे. परंतू याप्रमाणे कार्यवाही झाली नसून मे.रिजन्सी निर्माण लि. यांचेसोबत दि.04/08/2008 रोजी साठेकरार केला असल्याचे निदर्शनास आले आहे.

13) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दि.05/03/2013 चे बैठकीतील इतिवृत्तानूसार मे.रिजेन्सी निर्माण लि. यांनी सदर जागा कब्रस्थानासाठी देणेकामी स्वखुशीने मंजूरी दिली असल्याने सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, उल्हासनगर मनपा यांनी वैधानिक बाबींची पुर्तता करणेकामी कार्यवाही केली किंवा कसे तसेच तालुका अभिलेख यांचेकडून जागेची मोजणी करून घेतली किंव कसे याबाबत अभिलेख नस्तीत आढळून न आल्याने पडताळणी करता आली नाही.

14)विकासकाने मंजूर विकास कामे हाती घेण्यापुर्वी आवश्यक पूर प्रतिबंधक कार्यवाही केली किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

15)उल्हासनगर मनपा ठराव क्र.13 दि.28/06/1995 अन्वये रक्कम रु.10000/- स्टॅकिंग शुल्क आकारणी केली नसल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे. तसेच सदर ठरावातील रक्कमा फारच जुना कालावधीत मंजूर केले असल्याने नवीन ठराव करून रक्कमेत सुधारणा होणे आवश्यक आहे.

16) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण अंतर्गत उपकराची रक्कम रु.1,42,23,010/- चा भरणा केलेल्या चलनाच्या प्रतीवर संबंधित बँकेने दिनांकासहीत शिक्का उमठविला नसल्याने प्रत्यक्ष भरणा केला किंवा कसे तसेच केला असल्यास दि.31/12/2014 रोजी किंवा त्यानंतर केलेबाबत पडताळणी करता आलेली नाही. सन 2015 मध्ये भरणा केला असल्यास रु.25000/- प्रती चौ.मी. प्रमाणे 101957 क्षेत्राकरीता एक टक्के दराने अगोदर जमा रक्कम रु.1,42,23,010/- वजा करून उर्वरीत रक्कम रु.1,12,66,240/- शासन जमा करणे आवश्यक आहे.

17) विटान कंन्सल्टंट (अनिल निरगुडे) यांनी अर्जावर दि.20/10/2014 नमूद केला आहे. परंतू प्रत्यक्षात अर्ज महानगरपालिकेस कधी सादर केला याची पोचपावती नस्तीत आढळून आलेली नाही. तसेच विकासकाने आरसीसी नकाशे, स्टॅबिलीटी प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे दि.07/01/2015 रोजी मनपा कार्यालयात जमा केल्याचे नगररचना विभागातील लिपीक यांची स्वाक्षरी व दिनांकावरून दिसून येते. तरी कागदपत्रे सादर करणेपुर्वी उपकर, विकास शुल्क, सामासिक अंतरात सुट, स्थानिक संस्था कर इत्यादीबाबत मागणीपत्रक विकासकास कोणत्या आधारावर पाठविण्यात आले आहे. याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही. जमीन विकास शुल्क, इमारत विकास शुल्क, सामासिक अंतरात सुट अधिमुल्य ,उपकर यांची परिगणना सन 2015 च्या शिघ्रसिध्द गणक पुस्तिकेनुसार न करता सन 2014 च्या शिघ्रसिध्द गणक पुस्तिकेनुसार केल्याने खालीलप्रमाणे एकूण रक्कम रु.2,82,04,062/- ची वसुली प्रत्यक्ष वसुल होणेच्या दिनांकापर्यंत प्रतीमाह दोन टक्के दराने वसुलपात्र आहे.

उल्हासनगर महानगरपालिका

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्रफळ (चौ.मी.) | दर (रुपये) | टक्के | एकूण शुल्काची रक्कम (रुपये) | जमा केलेली रक्कम रुपये | वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जमीन विकास शुल्क | 247700 | 9800 | 0.50% | 12137300 | 25536710 | 6584162 |
| 2 | रहीवास विकास शुल्क | 101957 | 9800 | 2% | 19983572 | | |
| 3 | उपकर | 101957 | 25000 | 1% | 25489250 | 14223010 | 11266240 |
| 4 | स्थानिक संस्था कर | 101957 | 200 | --- | 20391400 | 10195700 | 10195700 |
| 5 | सामासिक अंतरात सुट अधिमुल्य शुल्क | 44x7.18=315.92 | 9800 | --- | 3096016 | 2938056 | 157960 |
| | | | | | | | 28204062 |

18) प्रकरणाच्या अनुषंगाने सादर टिपण्णीस व नकाशास आयुक्त , उल्हासनगर महानगरपालिका यांनी दि.23/01/2015 रोजी मान्यता दिली असतांना बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दि .12/03/2015 रोजी विलंबाने देण्यामागील कारणमिमांसा नस्तीत आढळून आली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 95, Hmm No : 191)

## *81 महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्त्यांची पावर स्विपींग मशिनद्वारे साफसफाई करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : घनकचरा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1766676.00/-

***करारनामा करतांना कंत्राटदाराची एकून रक्कम विचारात न घेता कमी रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. दि.24/01/2015 ते 13/02/2015 या कालावधीची बँक हमीची वैधता नस्तीसोबत नाही. जानेवारी 2014 ते फेब्रुवारी 2014 चे लॉगशिट लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. पावर स्विपिंग मशिन सोबत असलेले सफाई कामगारांचे हजेरी पुस्तक तसेच वेतनपट व विमा उतरविल्याचे कागदपत्र लेखापरीक्षणास***

***दाखविण्यात आले नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांची साफसफाई करण्यासाठी अभिकर्त्यांची नेमणुक करणेबाबत स्थायी समितीने ठराव क्र.16 दि. 01/06/2009 अन्वये मंजुरी दिली असुन सदर कामाची निविदा सुचना दैनिक अमृत कलश, दै. नगर न्यूज,एशियन एज व मुंबई लक्षव्दिप या वर्तमानपत्रात दि. 05/06/2009 रोजी प्रसिध्द करण्यात येउन निविदा मागविण्यात आली होती. एकुण चार निविदा प्राप्त झाल्या त्या अनुक्रमे 1) मे. अएलएल सर्व्हिसेस 2) मे. अन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा. लि.) 3) मे. राम इजिनिअरिंग 4) मे. लायन सर्व्हिसेस या पैकी मे. ॲन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग प्रा. लि. यांची न्युनतम दराची निविदा दर रू.1375 प्रती किलो मीटर असल्याने स्थायी समिती ठराव क्र. 52 दि. 20/08/2009 अन्वये त्यांचेशी संविदा करण्यास मान्यता दिली. आरोग्य विभागाचे पत्र क्र.196 दि. 24/08/2009 नुसार कार्यादेश देण्यात आला आहे. घनकचरा विभागा कडील प्राप्त नस्तीचे लेखापरिक्षण करून अर्धसमास पत्र क्र. 27 दि. 29/06/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाकडून आलेले उत्तर विचारात घेउन खालील प्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहे.
1) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र.12/कलम/34/133/09 दि.20/07/2009 नुसार एकुण कंत्राट रक्कमेच्या रु.10 लाखाकरिता रु.100 व पुढील प्रत्येक लाख रुपयास रुपये 100 प्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. निविदाकाराच्या दहा वर्ष कालावधीकरिता कंत्राटाची एकुण रक्कम रु. 160697811 वर रु.159798 इतकी मुद्रांक नोंदणी शुल्क रक्कम आकारणे आवश्यक असतांना रु.100 च्या मुंद्राक शुल्काच्या पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. उर्वरीत रक्कम रु.159698 निविदाकाराकडून वसुल करुण शासनाकडे जमा केलेली नाही.

2) सदरचा ठेका दहा वर्ष इतक्या कालावधी करिता दिला असल्याने ठेक्याच्या कालावधीपर्यंत बॅक गॅरंटीची वैधता वाढविणे आवश्यक आहे. दि. 24/01/2015 ते 13/02/2015 चा कालावधीची बँक गॅरंटी नस्तीत नाही.
3) प्रमाणक क्र.1924 दि. 27/08/2014 रक्कम रु.3220500 इतक्या निव्वळ प्रदान रक्कमेच्या प्रमाणकाची तपासणी केली असता माहे जानेवारी 2014 ते मार्च 2014 या कालावधीत पॉवर स्विपिंग मशिनद्वारे साफसफाई केलेल्या रस्त्याच्या कामाची रक्कम अदा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जानेवारी 2014 ते मार्च 2014 चे लॉगशिट लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नसल्याने प्रदानाच्या योग्यतेबाबत पडताळणी करता आली नाही.
4) निविदेत नमुद केल्याप्रमाणे पावर स्विपिंग मशिनसोबत प्रत्येक 2 किलोमीटरवर एक कर्मचारी फुटपाथ सफाई व पावर स्विपिंगच्या मेन्टेंन्ससाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. यानुसार 25 किलोमीटरसाठी 13 सफाई कामगार नेमलेले आहेत. सदर सफाई कामगारांचे दैनदिन हजेरी पुस्तक तसेच वेतनपट लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही.त्यामुळे त्यांना किमान वेतन कायदा 1970 नुसार वेतन मिळाले याची खातरजमा करता आली नाही.
5) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जी.ईएन 1098/1357/प्र.क्र.166/98 नवि- 24 नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई दि. 3/11/2003 नुसार ठेकेदाराने कंत्राटकामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमा पत्राखाली उतरविणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणात फक्त कंत्राट कामाचा विमा उतरविला आहे.कंत्राटी कामगारांचा विमा उतरविल्या बाबतचे कागदपत्र नस्तीसोबत नाहीत. 1% रक्कम रुपये 1606978 ठेकेदाराकडून वसूल करण्यात आल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.
याबाबत अर्धसमास पत्र क्र. 27 दि.29/06/2016 रोजी निर्गमित केले असता प्राप्त अनुपालनाची तपासणी करून आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKCM7101 (Ref No : 50, Hmm No : 27)

## *82 मे. कोनार्क इनव्हायरो प्रा.लि. यांना झालेल्या प्रदानाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :19 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 103594000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 103594000.00/-

***कचरा वाहतुकीसाठी एकुण वहाने त्यांचे प्रकार, R.C.Books, यांच्या प्रती उपलब्ध नसणे, कचरा वजनामापेसाठी महापालिकेची स्वतंत्र यंत्रणा कार्यरत नसणे, जंतुनाशक फवारणी करणे मुळ करारनाम्यात ठरलेले असताना प्रत्यक्ष एकदाही न करणे, मनुष्यबळ वापराबाबतच्या दैनंदिन नोंदवहया लॉग बुक उपलब्ध नसणे, कचरा सपाटीकरणाबात माहिती उपलब्ध नसणे, वहानतळासाठी आकारण्यात येणारे पार्किंग भाडे आकारलेबाबत लेखे उपलब्ध नसणे.***

उल्हासनगर मनपा क्षेत्रातील कचरा गोळा करून डंपिंग ग्राऊंडपर्यंत वाहून नेण्याचे 8 वर्षासाठीचे कंत्राट मे. कोनार्क इनव्हायरो प्रोजेक्ट प्रा.लि. यांना देण्यात आले. एप्रिल-2014 ते मार्च 2015 चे देयकांबाबत पुढील बाबींचा खुलासा करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.38 दिनांक19/07/2016 नुसार खुलासा मागविण्यात आला होता तथापि तो अप्राप्त असल्याने लेखापरीक्षणात आढळून आलेल्या पुढील अनियमितता नोंदविण्यात येत आहेत.

1) कचरा वाहतुकीसाठी दैनंदिन वापरण्यात येणा-या वाहनांची एकुण संख्या व प्रकार लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) वाहतुकीसाठी वापरण्यात येणा-या वाहनांचे R.C.Book च्या सांक्षांकीत प्रती अभिलेख्यांमध्ये जतन करुन ठेवल्या किंवा कसे सदर प्रती लेखा परीक्षणासाठी उपलब्ध झाल्या नाहीत.

3) दैनंदिन गोळा होणा-या कच-याचे वजन केले जाते किंवा नाही सरासरी दैनंदिन किती मे. टन कचरा जमा होतो तसेच वजनमापेसाठी महापालिकेची यंत्रणा कार्यरत आहे किंवा कसे याबाबतचे दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

4) एप्रिल 2014 ते मार्च 2015 च्या देयकातील भाग-4 दंड आकारणीचे एकत्र प्रपत्र यामधील मुददा क्र. 4 मध्ये प्रति ठिकाण प्रति दिन जंतूनाशक न फवारणेसाठी रु. 10/- व मुददा क्र. 5 नुसार प्रति गाडी प्रति दिन जंतूनाशक न फवारणेसाठी 25/- रु. दंड आकारणीची तरतुद आहे तरी 2014-15 मधील एकुण 12 पैकी 12 देयकांमध्ये सदर वजातीची पुनरावृत्ती झालेली दिसते. जंतुनाशक फवारणी न होणे ही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे सदर पुनरावृत्ती टाळण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

5) मुद्दा क्र. 7 नुसार वेळापत्रका प्रमाणे कचरा न उचलल्यास प्रति ठिकाण प्रति दिन 100/- दंड आकारणीची तरतुद आहे. व 2014-15 मधील 12 देयकांपैकी 12 देयकांमध्ये सदरची वसुली दाखविली आहे वेळेवर कचरा न उचलणे ही बाब कंत्राटाच्या मुख्य उद्देशापासून फारकत घेणारी व सार्वजनिक आरोग्यास धोका पोहचविणारी आहे.
तथापि सदर बाबींची पुनरावृत्ती होत असलेबाबत संबंधित कंपनीला विचारणा करण्यात आली किंवा कसे असल्यास

त्याबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत.

6) मार्च 2015 च्या देयकातील भाग - 3 वाहन व मुनष्यबळ वापराबाबतचे परिमाण प्रपत्र आहे यामध्ये एकुण 11 बाबींच्या वापराबाबतचे units दर्शविले आहेत. सदर अभिलेख संबंधीत प्रभागातील स्वच्छता निरिक्षकांनी प्रमाणित केले आहेत. तरी सदर लेखा ज्या दैनंदिन नोंदीच्या आधारे प्रमाणित करण्यात आला त्या नोंदीचे अभिलेखे (लॉग बुक, दैनंदिन नोंदव्हया) लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

7) डंपिंग ग्रांऊडवर जमा होणा-या कच-याचे सपाटीकरण करणेसाठी एकुण किती JCP मशिन/बुलडोजर वापरले जातात व त्यांची भाडे आकारणी कशा पध्दतीने केली जाते याबाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत.

8) मे. कोनार्क इनव्हायरो प्रोजेक्ट प्रा.लि. मार्फत कचरा उचलण्यासाठी वापरण्यात येणा-या वाहनांसाठी कोणते वहनातळ वापरले जाते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 243(अ) मधील तरतुदी नुसार वहानतळासाठी आकारण्यात येणारे पार्कींग भाडे संबंधित कंपनीकडून वसुल झाले किंवा कसे याबाबत खुलासा होत नाही. वरील बाबीवरून कचरा वाहतूक करणा-या वाहनांचे प्रदान करणाच्या आधारे केले जाते व ते कोणत्या मोजमापांवर आधारीत आहे याची खातरजमा लेखापरीक्षणास करता आले नाही म्हणून 2014-2015 मध्ये याबाबत झालेले 10,35,94,000/- रू प्रदान आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATAPJF8101 (Ref No : 109, Hmm No : 38)

## *83 मिळकतीची आकारणी चुकीची केल्याने फरकाची रक्कम वसुलीबाबत...व अर्धसमास ज्ञापनाच्या अनुषंगाने मागणी केलेले अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता प्राप्त न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 16**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 594308.00/-

***मालमत्ता क्र.11 एआय019560700 प्रकरणात कर निर्धारण दिनांक-10/09/2009 रोजी केले असून मागणी विलंबाने केल्याने मिळकत कराची एकूण रक्कम रु.16080/-वसुलपात्र आहे. सन 1996-97 नंतर अदयापपर्यंत नवीन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले नाही. अर्जासोबत वाणिज्य वापरापृष्ठयर्थ कोणतेही अभिलेख जोडलेले नाही. कमी क्षेत्रफळाच्या जागेची कर आकारणी केली आहे. स्थळ पहाणी अहवाल कर निर्धारण व संकलक यांनी साक्षांकीत केलेला नाही. कर आकारणी विलंबाने केली आहे. भाडेवाढ न केल्याने जुन्याच भाडेनूसार कर आकारणी चालू आहे. कर आकारणी नोंदवहीत संबंधीत लिपीक, कर निरीक्षक, कर निर्धारक यांची स्वाक्षरी नाही. कर निरीक्षकांचा स्थळ पाहणी अहवाल नाही.कर आकारणी नोंदवहीतील नोंदी अपुर्ण आहेत. कर आकारणी नोंदवहीत कराची परिगणना केलेली नाही. संबंधित प्रकरणांच्या मुळ नस्ती***

***तपासणीकरीता अप्राप्त आहेत. कर आकारणी नोंदवहीतील नोंदी व संगणकात नोंद केल्यानंतरच्या नोंदीची पुर्नतपासणी केलेली नाही. नियम 267(अ) प्रमाणे शास्ती आकारणी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. अर्धसमास ज्ञापन क्र.128 दि.20/10/2016 च्या अनुषंगाने परिपुर्ण लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत.***

अर्धसमास ज्ञापन क्र.128 दि.20/10/2016 अन्वये मिळकत कर विभागामधील लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतू अर्धसमास ज्ञापनानूसार परिपुर्ण लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. काही प्रमाणात उपलब्ध झालेल्या नोंदवहया तपासल्या असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.156 दि.29/11/2016 दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यत येत आहेत.

1) मालमत्ता क्र.11एआय019560700 , कर निर्धारण दिनांक-10/09/2009

उपरोक्त मिळकतीचे मालमत्ता पत्रक(प्रॉपर्टी कार्ड) तपासले असता मिळकत कराची मागणी सन 2015-16 पासून केली आहे. तरी दि.10/09/2009 ते दि.31/03/2010 व सन 2010-11, 2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15 ची मिळकत कराची एकूण रक्कम रु.16080/-वसुलपात्र आहे.

| वसुलीचा कालावधी | मिळकत कराची रक्कम (रुपये) | | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| दि.10/09/2009 ते दि.31/03/2010 | 2894 | दिवस 203 | रु.1610/- |
| सन 2010-11 | 2894 | 1 वर्ष | रु.2894/- |
| सन 2011-12 | 2894 | 1 वर्ष | रु.2894/- |
| सन 2012-13 | 2894 | 1 वर्ष | रु.2894/- |
| सन 2013-14 | 2894 | 1 वर्ष | रु.2894/- |
| सन 2014-15 | 2894 | 1 वर्ष | रु.2894/- |
| | | एकूण | रु.16080/- |

2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 च्या नियम 21(2) नुसार आयुक्तांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पाच वर्षातून एकदा तरी आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे, अशी तरतूद आहे. उल्हासनगर मनपा महासभा ठराव क्र.4 दि.19/05/2004 मध्ये नमूद केलेनूसार सन 1996-97 नंतर अदयापपर्यंत नवीन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले नाही.

3) मिळकतीचे मालक - कविता दुलानी यांनी त्यांच्या दि.27/02/2013 च्या अर्जानूसार त्यांची मालमत्ता क्र.15एआय015796500 (जुना मिळकत क्र.15/1428) चा दि.01/01/2013 पासून वाणिज्य कारणाकरीता वापर होत असल्याचे नमूद केले आहे. परंतू अर्जासोबत वाणिज्य वापरापृष्ठयर्थ कोणतेही अभिलेख जोडलेले नाही. दि.13/02/14 च्या मागणी देयकानूसार मिळकतीचा वापर निवासी दर्शविला आहे. कर निरीक्षक यांचे दि.27/02/2015 च्या स्थळ पहाणी अहवालानूसार जागेचे क्षेत्रफळ 286 चौ.फुट नमूद असून कर निर्धारण 250

चौ.फुटाचे केले आहे. 36 चौ.फुट x 2.190 दरx12महीने-10%=851.47x62.5%=532.16*2वर्षे=1064.32/- वसुलपात्र आहे. स्थळ पहाणी अहवाल कर निर्धारण व संकलक यांनी साक्षांकीत केलेला नाही. त्यामुळे केलेले कर मुल्यांकन योग्य असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

4) श्रीमती कविता दुलानी यांना मालमत्ता कर क्र.15एआय 015796500 अर्जात नमूद केला आहे. परंतू त्यांचा स्वत:चा मिळकतीचा क्र.15एआय020448900 आहे. अर्जात नमूद क्र.15एआय015796500 श्रीमती शिलाबाई दुलानी यांचा आहे. तसेच सदर अर्ज दि.27/02/2013 चा असतांना दि.27/02/2015 रोजी स्थळ पहाणी विलंबाने केली आहे. त्यामुळे कर आकारणी विलंबाने केली आहे.

5) श्रीमती जिजाबाई मनोहर पगारे, मिळकत कर क्र.43 सी ओ 020781200

यांनी कर निर्धारणाकरीता विदयुत बिलाची छायांकीत प्रत सादर केली आहे. सदर विदयुत बिल हे माहे एप्रिल 2014 चे असल्याने व कर निर्धारण सन 2015-16 पासून केल्याने सन 2014-15 पासून कर निर्धारण करणे आवश्यक होते. सन 2014-15 ची कर निर्धारणाची रक्कम रु.453/- वसुलपात्र आहे.

6) श्री. शहनवाझ शेख, मिळकत कर क्र.43 सी ओ 020785800 यांनी कर निर्धारणाकरीता जागेचे खरेदी खत करारनामा दि.24/03/2014 चा जोडला आहे. परंतू कर आकारणी 2015-16 पासून सुरू केल्याने सन 2014-15 ची कर आकारणी करणे आवश्यक आहे. सन 2015-16 ची कर निर्धारणाची रक्कम रु.800/-वसुलपात्र आहे.

7) श्री. शकील शेख, मिळकत कर क्र.43 सी ओ 020792000 सदर मिळकतीची विक्री खत करारनाम्याची तपासणी केली असता सदर मिळकतीचा करारनामा दि.10/04/2014 रोजी केल्याने 2014-15 पासून मिळकत कर आकारणी करणे आवश्यक असतांना सन 2015-16 पासून कर आकारणी केल्याने सन 2014-15 पासून कर आकारणी करणे आवश्यक आहे. करयोग्य मूल्याची रक्कम रु.956/- च्या 62.5 टक्के रु.597/- प्रमाणे करनिर्धारणात दुरूस्ती करून सन 2014-15 ची रक्कम रु.597/- वसुलपात्र आहे.

8) श्री अशोक वाधवा, मिळकत कर क्र.43 सी आय 020801700 , सदर मिळकतीचा करारनामा दि.20/01/2002 रोजी केल्याने सन 2002-03 पासून कर आकारणी करणे आवश्यक असतांना सन 2015-16 पासून केल्याने सन 2002-03 ते 2013-14 कालावधीची एकूण रक्कम रु.12702/- व 2014-15 ची रक्कम रु.1734.48/- अशी एकूण रक्कम रु.14436.6/- वसुलपात्र आहे.

9) बीपीएल टॉवर/ एटीसी टेलिकॉम टॉवर कॉर्पो. लि.( सुरेश/अनिल/कमलेश चोटवानी) मिळकत कर क्र.44सीआय 019194100 मालक व मोबाईल कंपनी यांचेत दि.21/02/2012 रोजी रु.317262/-प्रती वर्ष याप्रमाणे करारनामा झाला असून करारनाम्यानूसार तिन वर्षानंतर 15 टक्के भाडेवाढ करणे आवश्यक होते. परंतू भाडेवाढ न केल्याने जुन्याच भाडेनूसार कर आकारणी चालू आहे. तसेच वापराचा प्रत्यक्ष दि.30/04/2012 पासून कर आकारणी करणे आवश्यक असतांना सन 2014-15 पासून कर आकारणी केल्याने फरकाची रक्कम रु.460537/- वसुलपात्र आहे. तसेच सदर वसुलपात्र रक्कमेवर प्रति माह दोन टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम वसुलपात्र रक्कम मनपा निधीत प्रत्यक्ष जमा होण्याच्या दिनांकापर्यंत परिगणना करून वसल होणे आवश्यक आहे.

| कालावधी | वार्षिक भाडयाची रक्कम रुपये | आकारणी करणेयोग्य करयोग्य मुल्य रक्कम रुपये | करयोग्य मुल्य रक्कम रुपये | करयोग्य मुल्य फरकाची रक्कम रुपये | कराचा दर (%मध्ये) | वार्षिक कराची रक्कम रुपये | वसुलपात्र रककम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि.30/04/12 | 317262 | 285536 | 0 | 285536 | 73.5 | 209869 | 574.9835 |
| दि.01/05/12 ते दि.31/03/13 | 317262 | 285536 | 0 | 285536 | 73.5 | 209869 | 192379.9 |
| 2013-2014 | 317262 | 285536 | 0 | 285536 | 73.5 | 209869 | 209869 |
| 2014-2015 | 317262 | 285536 | 285536 | 0 | 73.5 | 0 | 0 |
| दि.01/04/15 ते दि.30/04/15 | 364851 | 328366 | 285536 | 42830 | 73.5 | 31480.05 | 28856.71 |
| दि.01/05/15 ते दि.31/03/16 | 364851 | 328366 | 285536 | 42830 | 73.5 | 31480.05 | 28856.71 |
| | | | | एकूण वसुलपात्र रक्कम रुपये | | | 460537 |

10) श्री. हरेष तलरेजा, मिळकत कर क्र.44 सी आय 020803600,

सदर मिळकतीचा करारनामा दि.09/02/2011 रोजी केल्याने कर आकारणी तेव्हापासून करणे आवश्यक असतांना 2015-16 पासून केल्याने कराची रक्कम वसुलपात्र आहे. तसेच कर निर्धारण नोंदवहीनूसार 473.06 चौ.फुट इतक्या जागेची कर आकारणी करणे आवश्यक असतांना 467.72 चौ.फुट इतक्या क्षेत्रफळावर आकारणी केल्याने फरकाची रक्कम रु.21976/- वसुलपात्र आहे. तसेच सदर वसुलपात्र रक्कमेवर प्रति माह दोन टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम वसुलपात्र रक्कम मनपा निधीत प्रत्यक्ष जमा होण्याच्या दिनांकापर्यंत परिगणना करून वसुलपात्र आहे.

| कालावधी | मिळकतीचे क्षेत्र नोंदवहीनूसार (चौ.मी.) | कर आकारणी केलेले क्षेत्र (चौ.मी.) | फरकाचे वसुलपात्र क्षेत्र (चौ.मी.) | करयोग्य रक्कम रुपये | | वार्षिक कराची रक्कम रुपये | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि.09/12/11 ते दि.31/12/11 | 473.06 | 0.00 | 473.06 | 10683.02 | 62.50 | 6676.89 | 439.03 |
| दि.01/01/12 ते दि.31/03/12 | 473.06 | 0.00 | 473.06 | 10683.02 | 62.50 | 6676.89 | 1669.22 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2012-2013 | 473.06 | 0.00 | 473.06 | 10683.02 | 62.50 | 6676.89 | 6676.89 |
| 2013-2014 | 473.06 | 0.00 | 473.06 | 10683.02 | 62.50 | 6676.89 | 6676.89 |
| दि.01/04/14 ते दि.28/02/15 | 473.06 | 0.00 | 473.06 | 11188.82 | 62.50 | 6993.01 | 6410.26 |
| दि.01/03/15 | 473.06 | 0.00 | 473.06 | 11188.82 | 62.50 | 6993.01 | 19.16 |
| दि.02/03/15 ते दि.31/03/15 | 473.06 | 467.75 | 5.31 | 125.59 | 62.50 | 78.50 | 6.45 |
| 2015-16 | 473.06 | 467.75 | 5.31 | 125.59 | 62.50 | 78.50 | 78.50 |
| | | | | एकूण वसुलपात्र रक्कम रुपये | | | 21976.39 |

11) श्री. गिरीश शिवदासानी, मिळकत कर क्र. 44 सी आय 020803500

सदर मिळकतीचा करारनामा दि.19/07/2012 रोजी केल्याने कर आकारणी तेव्हापासून करणे आवश्यक असतांना 2015-16 पासून केल्याने कराची रक्कम वसुलपात्र आहे. तसेच कर निर्धारण नोंदवहीनूसार 297.26 चौ.फुट इतक्या जागेची कर आकारणी करणे आवश्यक असतांना 292.81 चौ.फुट इतक्या क्षेत्रफळावर आकारणी केल्याने फरकाची फरकाची रक्कम रु.12699/- वसुलपात्र आहे. तसेच सदर वसुलपात्र रक्कमेवर प्रति माह दोन टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम वसुलपात्र रक्कम मनपा निधीत प्रत्यक्ष जमा होण्याच्या दिनांकापर्यंत परिगणना करून वसल होणे आवश्यक आहे.

| कालावधी | मिळकतीचे क्षेत्र नोंदवही नूसार (चौ.मी.) | कर आकारणी केलेले क्षेत्र (चौ.मी.) | फरकाचे वसुलपात्र क्षेत्र (चौ.मी.) | करयोग्य रक्कम रुपये | | वार्षिक कराची रक्कम रुपये | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि.19/07/12 ते दि.31/07/12 | 294.26 | 0.00 | 294.26 | 6645.21 | 62.50 | 4153.26 | 1741.69 |
| दि.01/08/12 ते दि.31/03/13 | 294.26 | 0.00 | 294.26 | 6645.21 | 62.50 | 4153.26 | 2768.84 |
| 2013-2014 | 294.26 | 0.00 | 294.26 | 6645.21 | 62.50 | 4153.26 | 4153.26 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि.01/04/14 ते दि.28/02/15 | 294.26 | 0.00 | 294.26 | 6959.84 | 62.50 | 4349.90 | 3987.41 |
| दि.01/03/15 | 294.26 | 0.00 | 294.26 | 6959.84 | 62.50 | 4349.90 | 11.92 |
| दि.02/03/15 ते दि.31/03/15 | 294.26 | 292.81 | 1.45 | 34.30 | 62.50 | 21.43 | 1.94 |
| 2015-16 | 294.26 | 292.81 | 1.45 | 34.30 | 62.50 | 34.30 | 34.30 |
| | | | | | | | 12699.36 |

12) श्री. शामलाल खिलनानी, मिळकत कर क्र.44 सी आय 020803700

सदर मिळकतीचा करारनामा दि.13/06/2013 रोजी केल्याने कर आकारणी तेव्हापासून करणे आवश्यक असतांना 2015-16 पासून केल्याने कराची रक्कम वसुलपात्र आहे.

| कालावधी | मिळकतीचे क्षेत्र नोंदवही नूसार (चौ.मी.) | कर आकारणी केलेले क्षेत्र (चौ.मी.) | फरकाचे वसुलपात्र क्षेत्र (चौ.मी.) | कराचा दर | करयोग्य रक्कम रुपये | | वार्षिक कराची रक्कम रुपये | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दि. 13/06/13 ते दि.30/06/13 | 472.06 | 0.00 | 472.06 | 2.09 | 10660.44 | 62.50 | 6662.77 | 6218.59 |
| दि. 01/07/13 ते दि.31/03/14 | 472.06 | 0.00 | 472.06 | 2.09 | 10660.44 | 62.50 | 6662.77 | 4997.08 |
| दि. 01/04/14 ते दि.28/02/15 | 472.06 | 0.00 | 472.06 | 2.19 | 11165.16 | 62.50 | 6978.23 | 6396.71 |
| दि. 01/03/15 | 472.06 | 0.00 | 472.06 | 2.19 | 11165.16 | 62.50 | 6978.23 | 19.12 |
| दि.02/03/15 ते 31/03/15 | 472.06 | 467.75 | 4.31 | 2.19 | 101.94 | 62.50 | 63.71 | 59.60 |
| 2015-2016 | 472.06 | 467.75 | 4.31 | 2.19 | 101.94 | 62.50 | 63.71 | 63.71 |
| | | | | | | | | 17754.81 |

13) श्रीमती लक्ष्मी केवलरामानी, मिळकत कर क्र. 44 सी आय 020803800

सदर मिळकतीचा करारनामा दि.20/03/2012 रोजी केल्याने कर आकारणी तेव्हापासून करणे आवश्यक असतांना 2015-16 पासून केल्याने कराची रक्कम रु.47912/- वसुलपात्र आहे. तसेच सदर वसुलपात्र रक्कमेवर प्रति माह दोन टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम वसुलपात्र रक्कम मनपा निधीत प्रत्यक्ष जमा होण्याच्या दिनांकापर्यंत परिगणना करून वसल होणे आवश्यक आहे.

| कालावधी | मिळकतीचे क्षेत्र नोंदवही नूसार (चौ.मी.) | कर आकारणी केलेले क्षेत्र (चौ.मी.) | फरकाचे वसुलपात्र क्षेत्र (चौ.मी.) | करयोग्य रक्कम रुपये | | वार्षिक कराची रक्कम रुपये | वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि.20/03/12 ते दि.31/03/12 | 1011.52 | 0.00 | 1011.52 | 22842.95 | 62.50 | 14276.85 | 5526.52 |
| 2012-2013 | 1011.52 | 0.00 | 1011.52 | 22842.95 | 62.50 | 14276.85 | 14276.85 |
| 2013-2014 | 1011.52 | 0.00 | 1011.52 | 22842.95 | 62.50 | 14276.85 | 14276.85 |
| दि.01/04/14 ते दि.28/02/15 | 1011.52 | 0.00 | 1011.52 | 22842.95 | 62.50 | 14276.85 | 13087.11 |
| दि.01/03/15 | 1011.52 | 0.00 | 1011.52 | 23924.47 | 62.50 | 14952.79 | 482.35 |
| दि.02/03/15 ते दि.31/03/15 | 1011.52 | 1002.50 | 9.02 | 213.34 | 62.50 | 133.34 | 129.04 |
| 2015-2016 | 1011.52 | 1002.50 | 9.02 | 213.34 | 62.50 | 133.34 | 133.34 |
| | | | | | | | 47912.05 |

14) उपरोक्त तपासणी केलेल्या मिळकतीच्या नोंदीबाबत खालीलप्रमाणे इतर सर्वसाधारण अनियमितता आहेत.

ए) कर आकारणी नोंदवहीत संबंधीत लिपीक, कर निरीक्षक, कर निर्धारक यांची स्वाक्षरी नाही.

बी) कर निरीक्षकांचा स्थळ पाहणी अहवाल नाही.

सी) कर आकारणी नोंदवहीतील नोंदी अपुर्ण आहेत.

डी) कर आकारणी नोंदवहीत कराची परिगणना केलेली नाही.

इ) संबंधित प्रकरणांच्या मुळ नस्ती तपासणीकरीता अप्राप्त आहेत.

एफ) कर आकारणी नोंदवहीतील नोंदी व संगणकात नोंद केल्यानंतरच्या नोंदीची पुर्नतपासणी केलेली नाही.

जी) निवासी कर आकारणीत पाणीपटटीची आकारणी करण्यात येते, परंतू वाणिज्य कर आकारणीत पाणीपटटी

कर आकारणी केली जात नसल्याने निवासीतून वाणिज्य गटात कर आकारणी करतांना पाणीपटटी विभागास रहीवास वापराची नळजोडणी खंडीत करून वाणिज्य वापर असलेल्या दराने स्वतंत्र नळजोडणी घेणेकरीता व त्याप्रमाणे पाणीपटटी आकारणी होणे आवश्यकतेच्या अनुषंगाने कळविण्यात आलेबाबत अभिलेख अप्राप्त आहे. सबब, पाणीपटटी वाणिज्य दराने स्वतंत्र आकारणी होत नसल्याची शक्यता असून मुळ पाणी कनेक्शन्द्वारे पाणी पुरवठा बंद केला जात नसून कोणतीही आकारणी न करता पाणी पुरवठा होत असल्याची शक्यता आहे.

एच) निवासी वापरातून वाणिज्य वापरात कराचे रुपांतर करताना वाणिज्य वापराच्यापृष्ठयर्थ कोणतेही कागदपत्रे मिळकतीच्या मालकाकडून न घेता मिळकतीच्या वापरात बदल मंजूर करण्यात आले आहेत.

15) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनधिकृत बांधकामांवर नियम 267(अ) प्रमाणे शास्ती आकारणी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याप्रमाणे शास्तीची रक्कम परिगणना करून मिळकतधारकांकडून वसुलपात्र आहे.

16) अर्धसमास ज्ञापन क्र.128 दि.20/10/2016 च्या अनुषंगाने अदयापपर्यंत परिपुर्ण लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत. सबब, त्याबाबतचा स्वतंत्र आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DATPVWM7501 (Ref No : 83, Hmm No : 156)

## *84 मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2464831006.00/-

| |
|---|
| ***थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 42 ते 48 नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इत्यादी सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात वेळीच केलेली नाहीत महानगरपालिका क्षेत्रात मोकळया जागाजमिनी असल्याचे अभिलेखे व अशा मालमत्तावर कर आकारणी मागणी व वसुलीचे लेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.*** |

उल्हासनगर महानगरपालिका लेखापरिक्षणात मालमत्ता कराची वर्ष 2014-2015 अखेर खालीलप्रमाणे मोठया

प्रमाणावर थकीत रक्कम असल्याचे दिसुन आले आहे.

| अ.क्र. तपशिल | रक्कम रूपये |
|---|---|
| 1) 2014-2015 ची थकबाकी मागणी | : 2,38,33,44,522/- |
| 2) 2014-2015 ची चालु मागणी | : 1,11,23,48,797/- |
| 3) एकुण मागणी | : 3,49,56,93,319/- |
| 4) 2014-2015 मध्ये थकबाकी वसुली | : 54,07,95,629/- |
| 5) 2014-2015 चालु मागणी वसुली | : 4,90,06,66,84/- |
| 6) एकुण वसुली | : 1,03,08,62,313/- |
| 7) 2014-15 अखेर थकबाकी पैकीबाकी | : 1,84,25,48,893/- |
| 8) 2014-15 चालु मागणी पैकीबाकी | : 62,22,82,113/- |
| 9) एकुण थकबाकी | : 2,46,48,31,006/- |

कर निर्धारण व संकलन अधिकारी यांनी लेखा परिक्षणास सादर केलेल्या विवरणपत्र व अभिलेख्यानुसार वर्ष 2014-2015 करिता मालमत्ता कराची एकुण मागणी रक्कम रूपये 3,49,56,93,319/- इतकी असुन एकुण वसुली रुपये 1,03,08,62,313/- आहे तर एकुण थकबाकी रक्कम रूपये 2,46,48,31,006/- इतकी दर्शविलेली आहे म्हणजेच वसुलीची टक्केवारी 29.48% आहे तर थकबाकीची टक्केवारी 70.51% आहे एकंदरीत वसुलीचे प्रमाण फारच कमी आहे. अर्धसमास पत्र क्र. 165 दि. 30/11/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाचे प्राप्त अनुपालन विचारात घेवून खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1) थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 42 ते 48 नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इत्यादी सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात वेळीच केलेली नाहीत कर वसुली संदर्भात अशी कारवाई न केल्याने वसुलीचे प्रमाण कमी होऊन महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात घट झाली आहे.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मोकळया जागांवर कर आकारणी करणेचे आहे. महानगरपालिका क्षेत्रात अशा मोकळया जागा-जमिनी असल्याचे अभिलेखे व अशा मालमत्तावर कर आकारणी, मागणी व वसुलीचे लेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही

3) दि. 01 मार्च 2015 ते 31 मार्च 2015 या कालावधीत मालमत्ता कराची रोख रक्कम व धनादेशाव्दारे जमा झालेली रक्कम रू. 6,97,84,942/- इतकी आहे दि. 31/03/2015 रोजी प्राप्त झालेले 132 धनादेशाची रक्कम रूपये 3,82,25,849/- स्टेट बॅक ऑफ इंडिया, उल्हासनगर, मालमत्ता कर खाते क्र. 910020040029894 या मध्ये जमा करण्यात आली असुन सदर धनादेशाची रक्कम 2014-2015 या आर्थिक वर्षाच्या एप्रिल व मे 2015 मध्ये जमा झाल्याचे स्टेट बॅक ऑफ इंडिया चे बॅक विवरणपत्रावरून दिसुन येते मालमत्ता कराचे धनादेश हे 31 मार्च 2015 पर्यंत वटतील अशा पध्दतीने काहि दिवस आधीच स्विकारणे आवश्यक होते परंतु अशी कारवाई झालेली नाही.

4) 2014-2015 या आर्थिक वर्षात मालमत्ता कराचे जमा झालेल्या धनादेशापैकी 63 धनादेश रक्कम रू. 2404918 बॅकेंत वटलेले नाहीत. मालमत्ता कराचा धनादेश न वटल्यास Negotiable Instrument Act 1881 चे कलम 138 अन्वये नोटीस देणे दंडात्मक कारवाई करणे, जप्तीची कारवाई केली पाहिजे. परंतु अशी कारवाई झालेली नाही.

## *85 उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरूस्तीवर विहित मार्यादेपेक्षा जास्त खर्च केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1491364.00/-

***उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनाच्या दुरूस्तीवर करण्यात आलेल्या विहित मर्यादेपेक्षा जास्त खर्च केला आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2007/वाहनखरेदी/ प्र.क्र.27/2008/नवि.26 दिनांक 18/02/2008 अन्वये आयुक्त यांना खर्चाचे अधिकार आहेत. परंतु उप आयुक्त यांनी अधिकारात नसतांना वाहन दुरूस्तीवरील खर्चाचे मंजुरी दिलेली असल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे. वाहन दुरूस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधुन दरपत्रके मागवून करणे आवश्यक होते. परंतु सर्व वाहनांची दुरूस्ती स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेजवाल्याकडून करूण घेण्यात आलेली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांच्या दुरूस्तीवर 2014-2015 या आर्थिक वर्षामध्ये एकुण रक्कम रूपये 14,91,364/- खर्च करण्यात आला असुन झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण करून अर्धसमास पत्र क्र. 196 दिनांक 28/12/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर विचारात घेउन खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महानगरपालिकेच्या मालकीची 2014-2015 या आर्थिक वर्षात एकुण 39 अवजड व 11 हलकी वाहने असुन प्रस्तुत वाहनांच्या दुरूस्तीचे अभिलेखे यांची तपासणी केली असता वाहनांच्या दुरूस्तीवरील खर्चाबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008/नवि. 26 दिनांक 18/02/2008 नुसार काटकसरीच्या धोरणाची उपाययोजना करून उपलब्ध निधीचा जास्तीत जास्त सुयोग्य वापर होण्यासाठी व महानगरपालिकेकडील असलेली वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी आणी त्याच्या दुरूस्तीच्या खर्चास मंजुरी देण्यासाठी काही विहीत पध्दती अंमलात आणलेल्या असुन त्यानुसार अतिरिक्त आयुक्त यांना पेट्रोलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी रूपये 25,000/- व डिझेल वर चालणा-या वाहनासाठी रूपये 30,000/- (टायर,टयुब,बॅटरी इत्यादी खर्चासह) खर्च करण्याच्या मंजुरीच्या शक्ती प्रदान केलेल्या आहेत. त्यापैकी निवडक वाहनांच्या नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे खर्च झाला आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वर्ष | एकुण झालेला खर्च रूपये |
|---|---|---|---|---|
| 1 | MH-05-P-17 | पीकअप व्हॅन | 2014-2015 | 59,480/- |
| 2 | MH-05-P-69 | फायर व्हॅन | 2014-2015 | 39,117/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | MH-05-P-38 | टॅंकर (पाणी) | 2014-2015 | 39,927/- |
| | एकुण रूपये | | | 1,38,524/- |

वाहनांचे दुरूस्तीच्या खर्चास मंजुरी देण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना शासन निर्णयाव्दारे दिलेले असतांना वरील झालेल्या खर्चास उप आयुक्त यांनी अधिकारात नसतांना मंजुरी दिलेली असल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लघंन झालेले आहे.

2) उपरोक्त शासन निर्णयामध्ये सर्व वाहनांच्या दुरूस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधुन तीन दरपत्रके मागवून न्युनत्तम दर असलेल्या गॅरेजवाल्याकडून वाहन दुरूस्ती करावयाची असताना सर्व वाहनांची दुरूस्ती स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेजवाल्येकडून वाहने दुरूस्त करून घेण्यात आलेली आहेत.

3) महानगरपालिकेच्या सर्व वाहनाच्या दुरूस्तीसाठी केलेल्या खर्चाचे हिस्ट्रीशीट (इतिहास पुस्तिका) यांची तपासणी केली असता अशी नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. प्रतिमहा वाहनाच्या दुरूस्तीचा गोषवारा तसेच वाहनावरती झालेल्या खर्चाची बेरीज घेउन मेळ घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वर्षामध्ये प्रत्येक वाहनावर दुरूस्तीसाठी झालेल्या खर्चाची लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

4) वाहनांचे हिस्ट्री शीट (इतिहास पुस्तक) मध्ये वाहनाचे मॉडेल, वर्ष, इंजिन चेसी क्रमांक, विमा इत्यादी बाबतची माहिती आरटीओ पासिंग, आरसी बुकची प्रत इत्यादी नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत तसेच नोंदवहीवर वाहनप्रमुख यांनी तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी केलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 99, Hmm No : 196)

## *86 वेतन राखीव निधी नियमाप्रमाणे ठेवला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***उल्हासनगर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 101 नुसार नमुना क्रं. 74 प्रमाणे 1 डिसेंबर-2014 रोजी असलेल्या आस्थापना विवरणपत्राप्रमाणे वेतन राखीव निधी ठेवणे आवश्यक असून त्यानुसार निधी 3 महिन्याचे वेतनाऐवढा वेतन राखीव निधी ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सदरील वेतन राखीव निधी ठेवलेबाबतची कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971चे नियम 101 नुसार नमुना

क्रं. 74 प्रमाणे 1 डिसेंबर-2014 रोजी असलेल्या आस्थापना विवरणपत्राप्रमाणे वेतन राखीव निधी ठेवणे आवश्यक आहे. त्याची भरपाई,प्रतिपूर्ती काटेकोरपणे केली पाहीजे. माहे डिसेंबर-2014चे एकूण वेतन रुपये 4,80,46,418/- असून त्यानुसार निधी 3 महिन्याचे वेतन रु144139254/-.वेतनाऐवढा वेतन राखीव निधी ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सदरील वेतन राखीव निधी ठेवलेबाबतची कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

1..महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 101 नुसार वेतन राखीव निधी लेखा नमुना क्रं.73 नुसार ठेवला पाहीजे. व दयावयाची अंशदाने अनुसुचीव्दारे पृष्टी देण्यांत आलेल्या नमूना क्रं.4 प्रमाणे असलेल्या प्रमाणकाव्दारे रक्कम काढली पाहीजे असे असतांना सदरचा निधी नियमानुसार विहीत नमुन्यात ठेवला नसल्यामुळे लेखा परीक्षणात दाखविण्यांत आलेला नाही

2.उल्हासनगर महानगरपालिका यांनी ब-याच वर्षापासुन सदर निधीमध्ये आवश्यक ती रक्कम ठेवली नसल्यामुळे सदर निधीकडे महानगरपालिकेचे पुर्णता दुर्लक्ष झाल्याची शक्यता लेखा परीक्षणात वर्तविण्यांत येत आहे.

DATPPTM5902 (Ref No : 116, Hmm No : 84)

# कलम ९ क खालील आक्षेप

## लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

-------------------- **निरंक** -------------------

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *87 वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये वार्षिक विवरण भरलेल्या संस्थांच्या नस्त्यामध्ये अशी विवरणे आढळून आली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***नोंदणीकृत व्यापारी संस्थांनी 2012-13 मध्ये महानगरपालिकेकडे सादर केलेल्या वार्षिक विवणाबाबत मागील लेखापरीक्षण अहवालात तपासून आक्षेप नोंदविला असताना अशा 13 संस्थांच्या नस्त्यामध्ये मागील वर्षाची विवरणे,भरणा चलने ई.कागदपत्रे आढळून न येणे.***

महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये तपासणीस सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रांच्या नस्त्यांची तपासणी करता खालील तपशीलात नमूद नोंदणीकृत व्यापारी संस्थांनी 2012-13 मध्ये महानगरपालिकेकडे सादर केलेल्या वार्षिक विवरणा बाबत मागील लेखापरीक्षण अहवालात तपासून आक्षेप नोंदविला असताना अशा संस्थांच्या नस्त्यामध्ये मागील वर्षाची विवरणे, भरणा चलने ई.कागदपत्रे आढळून येत नाहीत. सदर संस्थांच्या नस्तीत फक्त नोंदणी केल्याचा फॉर्मची प्रत लावल्याचे दिसून येते. तसेच 2013-14 व 2014-15 ची वार्षिक विवरणे व भरणा चलने आढळून येत नाहीत.

1) नोंदणी क्र. यु-7/1075 मे.लाखी फॅब्रिक्स. 2) नोंदणी क्र. यु-7/1082 मे.शांता सर्विस स्टेशन.
3) नोंदणी क्र. यु-7/1055 मे.रामकृष्ण मार्बल इंड. 4) नोंदणी क्र. यु-7/581 मे.आशा केमिकल.
5) नोंदणी क्र. यु-9/अ.नि./023 मे.दीपक ट्रेडिंग कंपनी. 6) नोंदणी क्र. यु-9/अ.नि./168 मे.राजेश अग्रवाल.
7) नोंदणी क्र. यु-7/162 मे.प्रेम इंटर. 8) नोंदणी क्र. यु-4/918 मे.किरण जनरल स्टोअर.
9) नोंदणी क्र. यु-7/1099 मे.प्रिन्स रेडीमेड स्टोअर.10) नोंदणी क्र. यु-7/284 मे.कॉमन लॉक इंड.
11) नोंदणी क्र. यु-7/258 मे.लकी इंटर. 12) नोंदणी क्र. यु-7/1074 मे. मॉडन वाइंस.
13) नोंदणी क्र. यु-6/074 मे.जनता परमिट रूम.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.173 दि.13.12.2016 निर्गमित करण्यात आले होते. तथापि विभागाने कोणताही खुलासा अथवा पूर्तता न दर्शविल्याने सदरच्या मूळ नस्त्यांचा शोध घेवून लेखापरीक्षणात

तपासणीस सादर करून अनुपालन दर्शवावे.

DATBEPM6101 (Ref No : 26, Hmm No : 173)

## *88 उल्हासनगर महानगरपालिका शाळेतील विदर्यार्थ्यांची दि. 30/09/2013 व दि. 30/09/2014 अखरे पटपडताळणी न केल्याने शिक्षकांची पदे निश्चिती झाली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्णय क्र. जीआई-1993/221/प्राशि-1 दि: 30/01/1996 अन्वये उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागने शाळा माध्यमानिहाय शिक्षक निश्चिती व एकत्रित गोषवारा,शिक्षण उपसंचालक बृहन्मुंबई यांचेकडून तपासणी करून घेतलेला नाही त्यामुळे शिक्षकांची निश्चित पदे व अतिरिक्त पदे याबाबत खात्री झालेली नाही.***

उल्हासनगर मनपा प्राथमिक शाळेचे लेखा परीक्षण केले असता मनपा शिक्षण विभागाने पटपडताळणी न केल्याने प्राथमिक शिक्षण विभागात मराठी माध्यमाच्या 10 शाळा व हिन्दी माध्यमाच्या 13 शाळा, गुजराती माध्यमाध्यमाची 1 शाळा व सिंधी माध्यमाच्या 4 शाळा अशा एकूण उल्हासनगर मनपाच्या सर्व माध्यमाच्या 28 शाळा असून दि.30सप्टेंबर 2013 व 30सप्टेंबर 2014 च्या विद्यार्थी पट संख्या व सरासरी उपस्थितीनुसार शिक्षक संख्या निश्चित करणे आवश्यक होते, त्याप्रमाणे केले नाही तरी उल्हासनगर मनपा शाळा माध्यमनिहाय शिक्षक निश्चिती व एकत्रित गोषवारा शिक्षण उपसंचालक बृहन्मुंबई यांचेकडून शासनमान्य पायाभूत पदे/आवश्यक पदे प्रत्यक्ष कार्यरत पदे असा माध्यमनिहाय शिक्षक निश्चिती गोषवारा उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे तपासून घेतलेला नाही. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका मधील प्राथमिक शिक्षकांची निश्चित पदे व अतिरिक्त पदे किती आहे याबाबत लेखा परीक्षणास खात्री झालेली नाही.

सदरील आक्षेपित मुद्द्याबात विभागाला अर्धसमास पत्र क्र. 148 दि. 29/11/2016 नुसार कळविले असता विभागने अनुपालन केले नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 42, Hmm No : 148)

## *89 शिक्षण मंडळ येथील जादा प्रदान निवृत्तीवेतन व लेख्यासंबंधी इतर अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 17**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 70620.00/-

| |
|---|
| ***सेवापुस्तकातील निवृत्तीवेतनाच्या नोंदीवर प्रशासकीय अधिका-यांची स्वाक्षरी नाही. उपदान व अंशराशीकरण रक्कम प्रदान केलेले प्रमाणक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. पदोन्नतीनंतर त्या पदावर सहा महीने पुर्ण झाले नसतांनादेखील वेतनवाढ दिलेली आहे. निवृत्त होणारे शिक्षकांनी कुटूंब निवृत्तीवेतनाकरीता विवाहीत मुलगा किंवा मुलगी किंवा नातेवाईक यांची नावे नामनिर्देशित केली आहे. उपदान व अंशराशीकृत रक्कम प्रदान करण्याच्या प्रमाणकावर संबंधित प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी नाही. प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाची नोंद निवृत्तीवेतनधारकांच्या संपुर्ण तपशिलासह विहीत नमून्यात लेखे ठेवले असलेची पडताळणी करता आली नाही. हयातीचे दाखले लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने हयात असलेल्याच निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन प्रदान होत असलेबाबत तपासणी करता आली नाही. निवृत्तीवेतन निधीचा जमा-खर्च व शिल्लक दर्शविणारा लेखा सामान्य रोखवहीच्या विहीत नमून्यात नमूना क्र.1 ठेवल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. शासनाकडून निवृत्तीवेतनापोटी प्राप्त अनुदान याबाबत तसेच निवृत्तीवेतन निधी इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही. निवृत्तीवेतनाचे अंशराशीकृत रक्कम त्या महीन्याच्या सरुवातीपासून कपात करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. निवृत्तीवेतन निधीबाबत अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत. निवृत्तीवेतनाच्या प्रमाणकांवर कोणत्याही प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी नसतांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सेवेतील कर्मचा-यांच्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम निवृत्तीवेतनाच्या लेखाशिर्षात खर्ची टाकल्याने अनियमितता झाली आहे.*** |

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातील काही निवडक निवृत्तीवेतन प्रकरणांची तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.130 दि.25/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)श्रीमती सविता आर भंभानी, सहाय्यक शिक्षक यांचे सेवापुस्तकातील निवृत्तीवेतनाच्या नोंदीवर प्रशासकीय अधिका-यांची स्वाक्षरी नाही.

2) श्रीमती सुभद्रा अ. कोळंबे, शिक्षक , श्रीमती कल्पना अडवानी, मुख्याध्यापिका व श्रीमती. मानिक सी. थोरात, उपशिक्षिका यांचे उपदान व अंशराशीकरण रक्कम प्रदान केलेले प्रमाणक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने त्यांची तपासणी करता आली नाही.

3) श्रीमती कल्पना सी. थोरात, मुख्याध्यापिका यांना उमपा शिक्षण मंडळ यांचे आदेश क्र.166/13 दि.07/03/2013 अन्वये दि.01/03/2013 पासून मुख्याध्यापिका पदावर पदोन्नती दिल्याने त्यांचे

पदोन्नतीच्या दिनांकास एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती केल्यानंतर दि.01/07/2013 रोजी सहा महीन्यापेक्षा कमी कालावधी होत असल्यामुळे जुलै 2013 ची वेतनवाढ देय होणार नाही. त्याऐवजी दि.01/07/2014 रोजी पुढील वेतनवाढ मंजूर होणे आवश्यक होईल. असे असतांना पदोन्नतीनंतर लगेच दि.01/07/2013 रोजी वेतनवाढ दिल्याने दि.01/07/2013 पासून वेतनात सेवानिवृत्तीचा दि.31/05/2014 पर्यंत अतिप्रदान झाले आहे. वेतनातील महागाई भत्ता व इतर अनुषंगिक भत्याची परिगणना करून अतिप्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे. तसेच श्रीमती थोरात दि.31.05.2014 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने खालीलप्रमाणे फरकाची रक्कम वसुलपात्र आहे.

| दिनांक | वेतन बँडमधील देय वेतन | देय ग्रेड पे | वेतन बँडमधील दिलेले वेतन | दिलेला ग्रेड पे | फरकाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 01.07.2012 | 16550 | 4200 | 16550 | 4200 | 0 |
| 01.03.2013 | 17180 | 4300 | 17180 | 4300 | 0 |
| 01.06.2013 | 17180 | 4300 | 17830 | 4300 | 650 |
| 31.05.2014 (सेवानिवृत्तीचा दिनांक) | 17180 | 4300 | 17830 | 4300 | 650 |

निवृत्तीवेतनाच्या निश्चितीकरीता सेवानिवृत्तीच्या दिनांकावेळी असलेले मुळ वेतन चुकीचे विचारात घेतल्याने मासिक निवृत्तीवेतनात अतिप्रदान झाले आहे. तसेच उपदान व अंशराशीकृत रक्कमेत अनुक्रमे रक्कम रु.10725/- व रु.13059/- चे अतिप्रदान झाले आहे.

4) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 116 (16)बी अन्वये कुटूंब निवृत्तीवेतनाकरीता कुटूंबाची व्याख्या खालीलप्रमाणे आहे. शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत कुटूंब म्हणजे पुरूष शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत पत्नी आणि महिला कर्मचा-याच्या बाबतीत पती, एकविस वर्ष वयाच्या आतील मुलगा आणि अविवाहीत चोविस वर्ष वयाच्या आतील मुलगी यांचा समावेश होतो. सेवानिवृत्तीपुर्वी निवृत्तीवेतनाची कागदपत्रे भरून देतांना निवृत्त होणारे शिक्षकांनी कुटूंब निवृत्तीवेतनाकरीता पती/पत्नी किंवा अविवाहीत/बेरोजगार मुलगी (वय 24 वर्षेपर्यंत) किंवा मुलगा (वय 21 वर्षेपर्यंत) यांचे नाव नामनिर्देशित न करता विवाहीत मुलगा किंवा मुलगी किंवा नातेवाईक यांची नावे नामनिर्देशित केली असल्याचे खालील निवृत्तीवेतनधारकांचे कागदपत्रे तपासली असता निदर्शनास आले आहे.

अ) श्रीमती.कल्पना सी थोरात, मुख्याध्यापिका

ब) श्रीमती सुनिता बोराळे, (क) श्रीमती पींकी भगवानदासानी, सहाय्यक शिक्षक

व (ड) श्री.जगन्नाथ नेमाडे, शिक्षक

5) श्रीमती निलीमा सपकाळे, सहाय्यक शिक्षक यांचे उपदान व अंशराशीकृत रक्कम प्रदान करण्याच्या प्रमाणक क्र.एबी 65 दि.07/06/2014 वर संबंधित प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी नसतांना रक्कम अदा करण्यात आली आहे.

6) श्री. गोरख कृष्णा सुर्यवंशी, शिक्षक यांना उमपा शिक्षण मंडळ यांचे आदेश क्र.152/12 दि.21/04/2012 अन्वये दि.23/04/2012 पासून मुख्याध्यापिका पदावर पदोन्नती दिल्याने त्यांचे पदोन्नतीच्या दिनांकास एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिंती केल्यानंतर दि.01/07/2012 रोजी सहा महीन्यापेक्षा कमी कालावधी होत असल्यामुळे जुलै 2012 ची वेतनवाढ देय होणार नाही. त्याऐवजी दि.01/07/2013 रोजी पुढील वेतनवाढ मंजूर होणे आवश्यक होईल. असे असतांना पदोन्नतीनंतर

लगेच दि.01/07/2012 रोजी वेतनवाढ दिल्याने दि.01/07/2012 पासून वेतनात सेवानिवृत्तीचा दि.31/05/2014 पर्यंत अतिप्रदान झाले आहे. वेतनातील महागाई भत्ता व इतर अनुषंगिक भत्याची परिगणना करून अतिप्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे. तसेच श्री. सुर्यवंशी दि.31.05.2014 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने खालीलप्रमाणे फरकाची रक्कम वसुलपात्र आहे.

| दिनांक | वेतन बँडमधील देय वेतन | देय ग्रेड पे | वेतन बँडमधील दिलेले वेतन | दिलेला ग्रेड पे | फरकाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 01.07.2011 | 15610 | 4200 | 15610 | 4200 | 0 |
| 23.04.2012 | 16210 | 4300 | 16210 | 4300 | 0 |
| 01.07.2012 | 16210 | 4300 | 16830 | 4300 | 620 |
| 01.07.2013 | 16830 | 4300 | 17470 | 4300 | 640 |
| 31.05.2014 (सेवानिवृत्तीचा दिनांक) | 16830 | 4300 | 17470 | 4300 | 640 |

निवृत्तीवेतनाच्या निश्चितीकरीता सेवानिवृत्तीच्या दिनांकावेळी असलेले मुळ वेतन चुकीचे विचारात घेतल्याने मासिक निवृत्तीवेतनात अतिप्रदान झाले आहे. तसेच उपदान व अंशराशीकृत रक्कमेत अनुक्रमे रक्कम रु.10560/- व रु.12858/- चे अतिप्रदान झाले आहे.

7) श्री. जगन्नाथ् नेमाडे, मुख्याध्यापक यांना उमपा शिक्षण मंडळ यांचे आदेश क्र.152/12 दि.21/04/2012 अन्वये दि.21/04/2012 पासून मुख्याध्यापिका पदावर पदोन्नती दिल्याने त्यांचे पदोन्नतीच्या दिनांकास एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिपती केल्यानंतर दि.01/07/2012 रोजी सहा महीन्यापेक्षा कमी कालावधी होत असल्यामुळे जुलै 2012 ची वेतनवाढ देय होणार नाही. त्याऐवजी दि.01/07/2013 रोजी पुढील वेतनवाढ मंजूर होणे आवश्यक होईल. असे असतांना पदोन्नतीनंतर लगेच दि.01/07/2012 रोजी वेतनवाढ दिल्याने दि.01/07/2012 पासून वेतनात सेवानिवृत्तीचा दि.31/05/2014 पर्यंत अतिप्रदान झाले आहे. वेतनातील महागाई भत्ता व इतर अनुषंगिक भत्याची परिगणना करून अतिप्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे. तसेच श्री. नेमाडे दि.31.05.2014 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने खालीलप्रमाणे फरकाची रक्कम वसुलपात्र आहे.

| दिनांक | वेतन बँडमधील देय वेतन | देय ग्रेड पे | वेतन बँडमधील दिलेले वेतन | दिलेला ग्रेड पे | फरकाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 01.07.2011 | 15610 | 4200 | 15610 | 4200 | 0 |
| 21.04.2012 | 16210 | 4300 | 16210 | 4300 | 0 |
| 01.07.2012 | 16210 | 4300 | 16830 | 4300 | 620 |
| 01.07.2013 | 16830 | 4300 | 17470 | 4300 | 640 |
| 31.05.2014 (सेवानिवृत्तीचा दिनांक) | 16830 | 4300 | 17470 | 4300 | 640 |

निवृत्तीवेतनाच्या निश्चितीकरीता सेवानिवृत्तीच्या दिनांकावेळी असलेले मुळ वेतन चुकीचे विचारात घेतल्याने मासिक निवृत्तीवेतनात अतिप्रदान झाले आहे. तसेच उपदान व अंशराशीकृत रक्कमेत अनुक्रमे रक्कम रु.10560/- व रु.12858/- चे अतिप्रदान झाले आहे.

8) शिक्षण मंडळाकडून प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाची नोंद निवृत्तीवेतनधारकांच्या संपुर्ण तपशिलासह मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 मधील नियम 22(2) अन्वये नमुना क्र.26 किंवा महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम क्र.325 नूसार नमूना क्र.34 मधील नमून्यात निवृत्ती प्रदान आदेश नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतू सदर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे विहीत नमून्यात लेखे ठेवले असलेची पडताळणी करता आली नाही.
9) प्रत्येक निवृत्तीवेतनधारकांने निवृत्तीवेतन घेत असलेल्या बँकेचे बँक व्यवस्थापक किंवा राजपत्रीत अधिकारी यांचे स्वाक्षरीने हयातीचा दाखला प्रत्येक वर्षी माहे नोंव्हेंबर मध्ये शिक्षण मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतू माहे नोंव्हेंबर 2013 व नोव्हेंबर 2014 या दोन महीन्यात दिलेले हयातीचे दाखले लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने हयात असलेल्याच निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन प्रदान होत असलेबाबत तपासणी करता आली नाही.
10) मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 मधील नियम 22(1) नुसार निवृत्तीवेतन निधीचा जमाखर्च व शिल्लक दर्शविणारा लेखा सामान्य रोखवहीच्या विहीत नमून्यात नमूना क्र.1 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तसेच 22(7) नूसार निवृत्ती वेतन प्रदान केल्याबाबतची प्रमाणपत्रे ठेवणे आवश्यक आहे. परंतू सदर नमूना नोंदवही व प्रमाणपत्रे लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही.
11) मासिक निवृत्तीवेतनाच्या निम्मी रक्कम राज्य शासनाकडून अनुदानाच्या स्वरुपात देण्यात येते. उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाकडून प्रदान केलेली निवृत्तीवेतनाची रक्कम व शासनाकडून निवृत्तीवेतनापोटी प्राप्त अनुदान याबाबत तसेच निवृत्तीवेतन निधी इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने त्यांची तपासणी करता आली नाही.
12) महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम क्र.342 अन्वये विवाहानंतर अथवा पुनर्विवाहानंतर ज्यांचे निवृत्तीवेतन संपुष्टात येण्याजोगे असेल अशा स्त्री (70 वर्षापेक्षा कमी वय असलेल्या महिलांकडून) निवृत्तीवेतनधारकाकडून नमूना क्र.40 या नमून्यात दर सहामाही प्रतिज्ञापत्र घेण्यात येईल व ते प्रतिज्ञापत्र जून आणि डिसेंबरसाठी देण्यात येणा-या निवृत्तीवेतनाच्या बिलाला जोडण्यात येईल. परंतू उमपा शिक्षण मंडळ यांचेकडून सदर अभिलेख लेखापरीक्षणास उपलबध झाले नाही.
13) निवृत्तीवेतनाचे अंशराशीकृत रक्कम निवृत्तीवेतन धारकास अदा केल्यानंतरच्या दिनांकानंतर अंशराशीकृत रक्कम निवृत्तीवेतनातून कपात करणे आवश्यक असतांना शिक्षण मंडळाकडून त्या महीन्याच्या सरुवातीपासून रक्कम कपात करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.
14) मुंबई प्राथमिक शिक्षण मंडळ 1949 मधील नियम क्र.194 नूसार अनुसुची एन मधील क्र.4 नूसार निवृत्तीवेतन घेण्यास पात्र असतील अशा कर्मचा-यांसाठी निवृत्तीवेतन निधी स्थापन केला पाहिजे. त्या निधीचे हिशोब वेगळे ठेवली जातील व दरवर्षी त्यांची शासनाच्या लेखा परीक्षकांकडून हिशोब तपासणी केली जाईल, असे नमूद आहे. परंतू याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.
15) निवृत्तीवेतनाच्या खालील प्रमाणकांवर कोणत्याही प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी नसतांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | प्रदान रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | एबी-38 | 09/05/2014 | 323142 | प्रमाणकासोबत महागाई भत्ता फरकाची परिगणना विवरणपत्रक जोडलेले नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | एबी-39 | 09/05/2014 | 141930 | प्रमाणकासोबत महागाई भत्ता फरकाची परिगणना विवरणपत्रक जोडलेले नाही. |
| 3 | एबी-4 | 19/04/2014 | 290660 | |
| 4 | एबी-5 | 19/04/2014 | 422296 | |
| 5 | एबी-6 | 19/04/2014 | 299866 | |
| 6 | एबी-7 | 19/04/2014 | 3130278 | |
| 7 | एबी-8 | 19/04/2014 | 472967 | |
| 8 | एबी-9 | 19/04/2014 | 407009 | |
| 9 | एबी-37 | 09/05/2014 | 22810 | |
| 10 | एबी-56 | 04/06/2014 | 324451 | |
| 11 | एबी-57 | 04/06/2014 | 413221 | |
| 12 | एबी-58 | 04/06/2014 | 293592 | |
| 13 | एबी-59 | 04/06/2014 | 3146515 | |
| 14 | एबी-60 | 04/06/2014 | 472967 | |
| 15 | एबी-61 | 04/06/2014 | 407009 | |
| 16 | एबी-64 | 07/06/2014 | 8779140 | |

16) प्रमाणक क्र.34 दि.09/05/2014 अन्वये सेवेतील कर्मचा-यांच्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम रु.24,39,080/- अदा केली आहे. सदर खर्चाची रक्कम निवृत्तीवेतनाच्या लेखाशिर्षात खर्ची टाकल्याने अनियमितता झाली आहे.

17) माहे नाव्हेंबर 2014 व डिसेंबर 2014 च्या निवृत्तीवेतन रक्कमांची तुलना केली असता श्री सुभेदार यादव यांना नोव्हेंबर 2014 मध्ये रु.8864/- अदा करण्यात आली असून माहे डिसेंबर 2014 मध्ये रक्कम रु.16064/- अदा करण्यात आली आहे. जादा प्रदानाबाबत कोणतेही कारण प्रमाणकासोबत जोडलेले नाही. तसेच श्रीमती लक्ष्मी खियानी यांना माहे डिसेंबर 2014 मध्ये निवृत्तीवेतन अदा करण्यात आले नाही. याबाबतची कारणमिमांसाबाबतचे अभिलेखे तपासणीकरीता उपलब्ध न झाल्याने त्यांची तपासणी करता आली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 77, Hmm No : 130)

## *90 शालेय विदयार्थ्यांकरीता पुरक पोषण आहार चिक्की खरेदी करणे कामातील अनियमितता..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 21**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

*निविदा जाहीरातीची प्रसिध्दी राज्यस्तरीय वर्तमानपत्रात देणे आवश्यक असतांना स्थानिक वर्तमानपत्रात दिली आहे. मा.आयुक्त, उल्हासनगर मनपा यांनी सन 2014-15 या एकाच वर्षाकरीता चिक्की खरेदी निविदा प्रक्रीया राबविण्यास दि.18/02/2014 रोजी मान्यता दिली होती. परंतू निविदा निवड प्रक्रिया प्रत्यक्षात दोन वर्ष म्हणजे सन 2014-15 व 2015-16 करीता राबविली आहे. सदर प्रक्रियेस स्थायी समितीची प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे. चिक्कीची आधारभुत किंमत कशी निश्चित केली याबाबत अभिलेख नस्तीत आढळून आले नाही. व्यापारी लखोटे दि.05/05/2014 रोजी विलंबाने उघडण्यात आले आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांनी चिक्की प्राप्त झाल्याची पोच पुरवठादाराने प्रमाणकासोबत जोडली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच शाळेतील विदयार्थ्यांची पटसंख्या व उपस्थिती अहवाल व प्राप्त चिक्कीचे नग यांचेसह अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत. बालवाडीच्या विदयार्थ्यांना चिक्की पुरवठा करणेचे आदेश निविदा प्रक्रिया न राबविता दिले आहेत. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या चिक्कीवरील स्थानिक संस्था कराची रक्कम उल्हासनगर महानगरपालिका निधीत जमा केलेबाबत अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत. रक्कम रु.75531/- मुद्रांक शुल्क असलेल्या स्टँम्प पेपरवर करणे आवश्यक असतांना निरंक शुल्क असलेल्या पेपरवर करारनामा केलेला आहे. नमूना चिक्कीची तपासणी शासनाच्या किंवा शासनमान्य प्रयोगशाळेत तपासणी केलेली नाही. माहे सप्टेंबर 2013 अखेरची विदयार्थ्यांची पटसंख्या विवरणपत्रे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाहीत. सबब, चिक्की पुरवठादारास दिलेले आदेश व पुरवठा केलेली चिक्कीचे नग यांचे प्रमाण योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही. चिक्की वाटपाकरीता अतिरीक्त प्रदान रक्कम रु.0.05/- प्रती नग पुरवठादाराला देय रक्कमेमधून वसुल करून उर्वरीत रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे. मे.हिंदूजा इंटरनॅशनल प्रा.लि. हे स्वतः चिक्की उत्पादक असल्याचे तसेच एखादया चिक्की उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेता असल्याचे अभिलेख नस्तीत निदर्शनास आले नाही. खर्चाच्या प्रमाणकांवर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आले आहे. आयकर भरलेच्या चलनाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने आयकर जमा रक्कमेची पडताळणी करता आली नाही. 31650 नग चिक्कीकरीता रक्कम रु.609262/-इतकी रक्कम अदा केल्याने रक्कम रु.335296/- इतकी रक्कम जादा प्रदान केली आहे. निविदेनूसार उपस्थित प्रती विदयार्थी एक नग चिक्की वाटप होणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात काही विदयाथर्यांना 2 नग चिक्की वाटप केल्यामुळे पुरवठादारास अतिप्रदान झाले आहे. मुल्यवर्धित कराची रक्कम रु.245481/- शासनाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.*

कामाचे नाव:- शालेय विदयार्थ्यांकरीता पुरक पोषण आहार चिक्की खरेदी करणे.
निविदा क्र. सीके-5
निविदा जाहिरात वर्तमानपत्र:-परशुराम समाचार, नगर न्युज, अमृत कलश
पुरवठा आदेश क्र.- मनपाशिमं/शिक्षण/1220/14 दि.17/06/2014

पुरवठादाराचे नाव- हिंदूजा इंटरनॅशनल प्रा.लि.
पुरवठा कालावधी - दोन वर्षे
प्रदानाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | एबी-401 | 15/03/2015 | 641385/- |
| 2 | एबी-403 | 16/03/2015 | 15573/- |
| 3 | एबी-416 | 18/03/2015 | 962077/- |
| 4 | एबी-447 | 31/03/2015 | 962077/- |
| 5 | एबी-448 | 31/03/2015 | 801731/- |
| 6 | एबी-449 | 31/03/2015 | 801731/- |
| 7 | एबी-450 | 18/03/2015 | 8116/- |
| 8 | एबी-451 | 31/03/2015 | 65447/- |
| 9 | एबी-452 | 31/03/2015 | 883052/- |
| | | एकूण रक्कम रुपये | 5141189/- |

शालेय विदयार्थ्यांकरीता पुरक पोषण आहार चिक्की खरेदी करणे या कामाची निविदा नस्ती व प्रमाणके तपासली असता लेखापरीक्षणाअंती निदर्शनास आलेल्या अनियमिततांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .124 दि. 18/10/16 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे . सबब, खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) निविदा जाहीरात प्रसिध्दीकरीता परशुराम समाचार , नगर न्युज, अमृत कलश या वर्तमानपत्रात दिली असल्याचे नस्तीमधील नोंदीवरून निदर्शनास आले आहे . परंतू वर्तमानपत्रातील जाहीरातीची प्रत लेखापरीक्षणास उपलबध झाली नाही . सबब, निविदा जाहीरातीची प्रसिध्दी राज्यस्तरीय वर्तमानपत्रात देणे आवश्यक असतांना स्थानिक वर्तमानपत्रात दिल्याचे नस्तीत नमूद असल्याने निविदा प्रक्रियेस व्यापक प्रसिध्दी दिली असल्याचे निदर्शनास आले नाही.

2) मा.आयुक्त, उल्हासनगर मनपा यांनी सन 2014-15 या एकाच वर्षाकरीता चिक्की खरेदी निविदा प्रक्रीया राबविण्यास दि.18/02/2014 रोजी मान्यता दिली होती. परंतू निविदा निवड प्रक्रिया प्रत्यक्षात दोन वर्ष म्हणजे सन 2014-15 व 2015-16 करीता राबविली आहे. नस्तीतील पृष्ठ क्र. 2/टी वरील दि.09/05/2014 च्या टिपणीत सन 2014-15 व 2015-16 या दोन वर्षाकरीता मा. आयुक्त यांनी निविदेस मान्यता दिली असल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर टिपणीत निविदा प्रक्रियेतील लघुत्तम निविदाकार मे. हिंदूजा इंटरनॅशनल प्रा .लि. यांचेशी करारनामा करणेकरीता मा .स्थायी समितीसमोर ठेवण्यासाठी मा.आयुक्तांची मंजूरी घेण्यात आली आहे व स्थायी समितीने ठराव क्र.7 दि.20/06/2014 अन्वये करारनामा करण्यास मंजूरी दिली आहे . मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील 73(क) नूसार पंचविस लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भुत असेल अशा संविदेस स्थायी समितीची पूर्व मान्यता आवश्यक असेल , असे नमूद असतांना सदर प्रक्रियेस स्थायी समितीची प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

3) दि.24/12/2013 च्या टिपणीत 50 ग्रॅम वजनाच्या एक नग चिक्कीच्या बाजारभावाची किंमत रु.15/- नमूद आहे. किंमत रु .15/- कशाच्या आधारावर नमूद केली आहे ? याकरीता बाजारातून पुरवठादारांकडून दरपत्रके मागविली किंवा कशी? याबाबत अनुपालन अप्राप्त आहे. पृष्ठ क्र.2/टी वरील टिपणीत निविदा प्रक्रियेत खालीलप्रमाणे निविदाकारांचे दर प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | निविदेतील दर |
|---|---|---|
| 1 | हिंदूजा इंटरनॅशनल प्रा.लि. | कमी 1.75 टक्के |
| 2 | जीएसएन असोसिएटस | अधिक 2.25 टक्के |
| 3 | राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह.ग्राहक संघ मर्यादित | अधिक 1.50 टक्के |

निविदा मागवितांना कागदपत्रांमध्ये निविदा कालावधीतील एकूण अंदाजपत्रकीय रक्कम किंवा एक नग चिक्कीचे आधारभूत दर नमूद केले नसतांना तसेच किती ग्रॅम चिक्कीचा पुरवठा करावा याबाबत काहीही नमूद नसतांना निविदाकारांनी वरील तक्त्यामधील दर कशाच्या आधारावर निवेदेत नमूद केले? याबाबत अनुपालन अप्राप्त आहे . तसेच हिंदूजा इंटरनॅशनल प्रा .लि. यांचे दर कोणत्या आधारभूत दरापेक्षा लघूत्तम आहेत? याबाबत अभिलेख नस्तीत आढळून आले नाही.

4) निविदा प्रक्रियेत निविदाकारांचे तांत्रिक लखोटे दि .01/04/2014 रोजी उघडण्यात आल्यानंतर व्यापारी लखोटे दि .05/05/2014 रोजी विलंबाने उघडण्यात आले आहे . विलंबाबाबत कोणतेही कारण नस्तीत नमूद नाही.

5) निविदा अटी व शर्तीनूसार शाळेत चिक्की स्विकारल्या नंतर त्यांची अधिकृत पोच पुरवठादाराने बिलाची मागणीसोबत जोडणे आवश्यक आहे, असे नमूद आहे. पुरवठादाराने शाळेला चिक्कीचा पुरवठा केल्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापकांनी किती नग चिक्की प्राप्त झाली याची पोच पुरवठादारास व शाळा मंडळास देणे आवश्यक आहे . परंतू शाळेच्या मुख्याध्यापकांनी चिक्की प्राप्त झाल्याची पोच पुरवठादाराने प्रमाणकासोबत जोडली नसल्याचे निदर्शनास आले आहे . तसेच शाळेतील विदयार्थ्यांची पटसंख्या व उपस्थिती अहवाल व प्राप्त चिक्कीचे नग यांचेसह अहवाल देणे आवश्यक आहे . परंतू याप्रकारे अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही. सबब, पुरवठादारास केलेले प्रदान योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

6) चिक्की पुरवठा करणेची निविदा प्रक्रिया फक्त इयत्ता पहिली ते सातवीच्या विदयार्थ्यांकरीता राबविली असतांना तसेच पुरवठा आदेश क्र .मनपाशिमं/शिक्षण/1220/14 दि.17/06/2014 अन्वये इयत्ता पहिली ते सातवीच्याच विदयार्थ्यांना चिक्की पुरवठा करणेचे असतांना शिक्षण मंडळाने कार्यादेश क्र.1422/14 दि.03/12/2014 अन्वये बालवाडीच्या विदयार्थ्यांना एकूण 593 नग चिक्की पुरवठा करणेचे आदेश निविदा प्रक्रिया न राबविता दिले आहेत . शिक्षण मंडळाच्या कक्षेत इय त्ता पहिली ते सातवी येत असतांना बालवाडी विदयार्थ्यांना चिक्की पुरवठा कोणत्या निकषावर केला ? याबाबत अनुपालन प्राप्त झाले नाही.

7) चिक्की पुरवठादारास 2014-15 करीता प्रती नग चिक्कीकरीता रु.19.25 अधिक सुट रु. 0.05 व मुल्यवर्धित कराची रक्कम रु.0.96 असे एकूण रक्कम रु.20.16 प्रती नग प्रदान केली आहे. परंतू सदर रक्कम निविदाकाराने सादर केलेल्या व्यापारी अभिलेख्यात नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सदर दर कोणत्या आधारावर मंजूर करण्यात आले ? याबाबतचे अभिलेखे तपासणीकरीता प्राप्त झाले नाही.

8) पुरवठादाराने पुरवठा केलेल्या चिक्कीवरील स्थानिक संस्था कराची रक्कम उल्हासनगर महानगरपालिका निधीत जमा केलेबाबत अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत.

9) उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळ जा .क्र.1202/14 दि.31/05/2014 अन्वये करारनामा रक्कम रु.75531/- मुद्रांक शुल्क असलेल्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक असतांना निरंक शुल्क असलेल्या पेपरवर करारनामा केलेला आहे.

10) नमूनादाखल प्राप्त चिक्कीच्या स्पेसिफीकेशनची तपासणी शासनाच्या किंवा शासनमान्य प्रयोगशाळेत करणे आवश्यक आहे . परंतू सदर नमूना चिक्कीची तपासणी मायक्रोकेम सिलीकर लॅबोरेटरीमध्ये करण्यात आली आहे . या प्रयोगशाळेची निवड कशी निश्चित करण्यात आली ? तसेच शासनाच्या किंवा शासनमान्य प्रयोगशाळेत तपासणी का केली नाही ? याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही.

11) निविदा प्रक्रिया सुरू करण्यापुर्वी शाळेच्या मुख्याध्यापकांकडून शाळेची पटसंख्या शाळा मंडळाने मागविणे आवश्यक होते . तसेच माहे सप्टेंबर 2013 अखेरची विदयार्थ्यांची पटसंख्या विवरणपत्रे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाहीत . सबब, चिक्की पुरवठादारास दिलेले आदेश व पुरवठा केलेली चिक्कीचे नग यांचे प्रमाण योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

12) राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह. ग्राहक संघ मर्यादित यांनी इसारा अनामत रक्कम रु.15,60,000/- शिक्षण मंडळाकडे जमा केल्याचे नस्तीत आढळून आले नाही.

13) निविदा अटी व शर्तीनूसार प्रशासकीय अधिकारी , उमपा शिक्षण मंडळ त्यांचा प्रतिनिधी महीन्यातून एकदा वितरीत केलेल्या चिक्कींमधील नमूना चिक्की नग शासकीय किंवा शासनमान्य प्रयोगशाळेकडे तपासणीकरीता पाठवू शकतो आणि जर तपासणीत स्पेसिफीकेशनप्रमाणे अहवाल प्राप्त न झाल्यास एकूण पुरवठा केलेल्या चिक्कीच्या रक्कमेपैकी 50 टक्के रक्कम दंडाच्या स्वरुपात वसुल करू शकेल. असे नमूद आहे . तरी याप्रमाणे तपासणीची कार्य वाही केलेली अहवाल नस्तीत आढळून आले नाही.

14) निविदा कागदपत्रांमधील जोडपत्र -डी मधील क्र .6 नूसार पुरवठादाराने शिक्षण मंडळाच्या सर्व शाळांना पुरवठा करणे आवश्यक आहे, असे नमूद आहे. परंतू सर्व शाळांना चिक्कीचा पुरवठा करण्याचे कामाकरीता श्री .गुलाब मराठे व श्री .सुभाष सुर्यवंशी यांना प्रति नग रु .0.05/- इतकी रक्कम अदा करण्यात येत आहे. उपरोक्त प्रमाणकामधील प्रमाणक क्र.450 दि.18/03/2015 नूसार श्री.मराठे व श्री. सुर्यवंशी यांना दिनांक 02/03/2015 ते दि .28/03/2015 कालावधीत शाळांना वाटप केलेल्या चिक्कीच्या कामाकरीता प्रत्ये की रक्कम रु .4058/- प्रमाणे एकूण रक्कम रु .8116/- प्रदान करण्यात आली आहे . चिक्की वाटपाकरीता अतिरीक्त प्रदान रक्कम रु .0.05/- प्रती नग पुरवठादाराला देय रक्कमेमधून वसुल करून उर्वरीत रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे . तसेच वाटपाकरीता श्री.मराठे व श्री.सुर्यवंशी यां ची नेमणूक व रक्कम कोणत्या कार्यालयीन आदेशानव्ये व मंजूरीने प्रदान केली ? याबाबतचे अभिलेख नस्तीत निदर्शनास आले नाही.

15) चिक्कीचा पुरवठा चिक्की उत्पादक कंपनीकडून करणे आवश्यक आहे . मे.हिंदूजा इंटरनॅशनल प्रा.लि. हे स्वत: चिक्की उत्पादक असल्याचे तसेच एखादया चिक्की उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेता असल्याचे अभिलेख नस्तीत निदर्शनास आले नाही. मे.हिंदूजा इंटरनॅशनल प्रा.लि. यांचे मुल्यवर्धित कर प्रमाणपत्र क्र.27800646983व्ही वर व्यवसायाचे स्वरुप एक्सपोर्टर , रिसेलर, रिटेलर, तसेच विक्रीकर प्रमाणपत्र क्र .27800646983सी व र व्यवसायाचे स्वरुप एक्सपोर्टर , रिसेलर, गारमेंटसचे रिटेलर व उल्हासनगर मनपा स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्र क्र .स्थासंक/उमनपा/युनिट-09/अनिवासी/362/2012-13 दि.11/02/2014 वर व्यवसायाचे स्वरुप कॉटन क्लॉथचे व्यवसाय असल्याचे नमूद आहे.

16) उपरोक्त नमूद प्रमाणकांवर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आले आहे.

17) उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाच्या अखत्यारीतील शाळानिहाय माहे सप्टेंबर 2013 व सप्टेंबर

2014 अखेर पटसंख्या लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने चिक्कीचा पुरवठा योग्य व उपस्थित विदयार्थ्यांच्या संख्येनूसार झाल्याची पडताळणी करता आली नाही.

18) प्रमाणक क्र .एबी 451 दि.31/03/2015 रु.65447/- अन्वये चिक्की पुरवठादाराच्या देयकातून आयकर वसुलीची रक्कम बँकेत जमा केली आहे. परंतू आयकर भरलेच्या चलनाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने आयकर जमा रक्कमेची पडताळणी करता आली नाही.

19) प्रमाणक क्र.एबी 452 दि25/03/2015 रु.625303/- अन्वये बालवाडी वर्गाच्या 593 विदयार्थ्यांना चिक्की पुरवठा केला आहे . परंतू जानेवारी 2015 मध्ये 24 शालेय दिवस असल्याने प्रती नग रु.19.25/-प्रमाणे एकूण रक्कम रु.273966/- अदा होणे आवश्यक असतांना 31650 नग चिक्कीकरीता रक्कम रु.609262/-इतकी रक्कम अदा केल्याने रक्कम रु.335296/- इतकी रक्कम जादा प्रदान केली आहे.

20) उदाहरणादाखल शाळा क्र.4, 28 व 30 मधील प्राप्त चिक्की व विदयार्थी उपस्थितीनूसार वितरीत चिक्की खालीलप्रमाणे आहे.

| दिनांक | शाळा क्र.4 | | | शाळा क्र.28 | | | शाळा क्र.30 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मार्च 2015 | प्राप्त चिक्की संख्या | विदयार्थी उपस्थिती संख्या | शिल्लक चिक्की संख्या | प्राप्त चिक्की संख्या | विदयार्थी उपस्थिती संख्या | शिल्लक चिक्की संख्या | प्राप्त चिक्की संख्या | विदयार्थी उपस्थिती संख्या | शिल्लक चिक्की संख्या |
| 02/03/15 | 139 | 78 | 61 | 806 | 628 | 178 | 253 | 132 | 121 |
| 03/03/15 | 139 | 79 | 60 | 806 | 637 | 169 | 253 | 135 | 118 |
| 04/03/15 | 139 | 76 | 63 | 806 | 634 | 172 | 253 | 136 | 117 |
| 07/03/15 | 139 | 71 | 68 | 806 | 571 | 235 | 253 | 119 | 134 |
| 09/03/15 | 139 | 74 | 65 | 806 | 617 | 189 | 253 | 133 | 120 |
| 10/03/15 | 139 | 77 | 62 | 806 | 648 | 158 | 253 | 139 | 114 |
| 11/03/15 | 139 | 77 | 62 | 806 | 640 | 166 | 253 | 134 | 119 |
| 12/03/15 | 139 | 73 | 66 | 806 | 644 | 162 | 253 | 126 | 127 |
| 13/03/15 | 139 | 71 | 68 | 806 | 640 | 166 | 253 | 129 | 124 |
| 14/03/15 | 139 | 76 | 63 | 806 | 605 | 201 | 253 | 131 | 122 |
| 16/03/15 | 139 | 70 | 69 | 806 | 643 | 163 | 253 | 132 | 121 |
| 17/03/15 | 139 | 75 | 64 | 806 | 644 | 162 | 253 | 133 | 120 |
| 18/03/15 | 139 | 75 | 64 | 806 | 646 | 160 | 253 | 136 | 117 |
| 19/03/15 | 139 | 75 | 64 | 806 | 650 | 156 | 253 | 138 | 115 |
| 20/03/15 | 139 | 76 | 63 | 806 | 648 | 158 | 253 | 142 | 111 |
| 23/03/15 | 139 | 70 | 69 | 806 | 654 | 152 | 253 | 140 | 113 |
| 24/03/15 | 139 | 77 | 62 | 806 | 667 | 139 | 253 | 142 | 111 |
| 25/03/15 | 139 | 63 | 76 | 806 | 654 | 152 | 253 | 145 | 108 |
| 26/03/15 | 139 | 77 | 62 | 806 | 651 | 155 | 253 | 142 | 111 |
| 27/03/15 | 139 | 75 | 64 | 806 | 651 | 155 | 253 | 141 | 112 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 30/03/15 | 139 | 78 | 61 | 806 | 660 | 146 | 253 | 146 | 107 |
| 31/03/15 | 139 | 78 | 61 | - | - | - | 253 | 150 | 103 |
| एकूण | 3058 | 1641 | 1417 | 16926 | 13432 | 3494 | 5566 | 3001 | 2565 |

उपरोक्त विवरणपत्रानूसार शाळा क्र. 4 व 30 मध्ये दि.31/03/2015 रोजी चिक्की आवक व वाटप झाली असल्याचे नोंदवहीत निदर्शनास आले असतांना शाळा क्र .28 च्या चिक्की वाटप अहवालात दि.31/03/15 रोजी चिक्की आवक-वाटप झाल्याची नोंद नाही. तरी या शाळेत दि.31/03/2015 रोजी चिक्की प्राप्त झाली किंवा कसे? याबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

शाळा क्र.4, 28 व 30 मध्ये दि.01/03/2015 ते दि.31/03/2015 कालावधीत वाटप झालेल्या चिक्कीपैकी अनुक्रमे 1417, 3432 व 2565 इतके नग चिक्की शिल्लक आहे . शिल्लक चिक्की प्रशासन अधिकारी, उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळ यांचे जावक क्र .1461 दि.01/01/2015 च्या पत्रानूसार प्रतिविदयार्थी दोन नग प्रमाणे वितरीत करण्याची सुचना देण्यात आली आहे . निविदेनूसार उपस्थित प्रती विदयार्थी एक नग चिक्की वाटप होणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात काही विदयाथर्यांना 2 नग चिक्की वाटप केल्यामुळे पुरवठादारास अतिप्रदान झाले आहे . शिल्लक चिक्की पुरवठादारास परत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यामुळे अतिप्रदान झाले आहे.

शाळा क्र.19 मध्ये चिक्की आवक, वाटप व शिल्लक नोंदवही ठेवण्यात आली नसल्याचे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकांकडून सांगण्यात आले आहे.

21) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील कलम 41 नूसार खरेदी करण्यात आलेल्या वस्तुचा उपयोग लोकांच्या फायदयाकरीता होणार असल्यास शासन सदर वस्तुंवर आकारलेला मुल्यवर्धित कर परतावा करीन , अशी तरतुद आहे . चिक्कीचा उपयोग शिक्षण मं डळामार्फत (सार्वजनिक) कार्यासाठी करण्यात येणार असल्याने यामध्ये कोणताही लाभ मिळविण्याचा उददेश नसल्याने मुल्यवर्धित कराची रक्कम रु .245481/- शासनाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | मुल्यवर्धित कराची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | एबी-401 | 15/03/2015 | 31165/- |
| 2 | एबी-416 | 18/03/2015 | 46748/- |
| 3 | एबी-447 | 31/03/2015 | 46748/- |
| 4 | एबी-448 | 31/03/2015 | 38956/- |
| 5 | एबी-449 | 31/03/2015 | 38956/- |
| 6 | एबी-449 | 31/03/2015 | 38956/- |
| 7 | एबी-452 | 31/03/2015 | 42908/- |
| | | एकूण रक्कम रुपये | 245481/- |

## *91 मनपा शाळामधील विदयार्थ्यांना सन 2014-15 करीता रेनकोट पुरविणे कामातील अनियमितता..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*
आक्षेपाधीन रक्कम रु. 2492313.00/-

***निविदा जाहीरात प्रसिध्दी राज्यस्तरीय वर्तमानपत्रात देणे आवश्यक असतांना स्थानिक वर्तमानपत्रात दिल्याचे नस्तीत नमूद असल्याने निविदा प्रक्रियेस व्यापक प्रसिध्दी दिली असल्याचे निदर्शनास आले नाही. मा.आयुक्त, उल्हासनगर मनपा यांनी सन 2014-15 या एकाच वर्षाकरीता रेनकोट खरेदी निविदा प्रक्रीया राबविण्यास दि.17/02/2014 रोजी मान्यता दिली असतांना निविदा निवड प्रक्रिया प्रत्यक्षात दोन वर्ष म्हणजे सन 2014-15 व 2015-16 करीता राबविली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील 73(ड) नूसार संविदा केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत स्थायी समितीस कळविलेबाबत अभिलेख नस्तीत आढळून आले नाही. व्यापारी लखोटे दि.05/05/2014 रोजी विलंबाने उघडण्यात आले असल्याचे नस्तीत नमूद आहे. अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम कशाच्या आधारे घेण्यात आली आहे? याबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध झाले नाही. रेनकोटचे दर कशाच्या आधारावर घेतले याबाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आले नाहीत. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह. ग्राहक संघ मर्यादित यांनी इसारा अनामत रक्कम रु.1,50,000/- शिक्षण मंडळाकडे जमा केल्याचे नस्तीत आढळून आले नाही. रेनकोटचा पुरवठा रेनकोट उत्पादक कंपनीकडून करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह. ग्राहक संघ मर्यादित हे स्वतः रेनकोट उत्पादक असल्याचे तसेच एखादया रेनकोट उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेता असल्याचे अभिलेख नस्तीत निदर्शनास आले नाही. रेनकोट वितरीत केलेची शाळानिहाय माहीतीची संकलित नोंदवही व शाळेकडील साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त् झाली नाही. शाळा क्र.19 मध्ये मुलांचे एकूण 82 नग व मुलींचे 63 नग व शाळा क्र.30 मध्ये मुलांचे एकूण 33 नग व मुलींचे 22 नग रेनकोट शिल्लक असतांना ते पुरवठादारास परत केले नसल्याचे साठा नोंदवहीवरून निदर्शनास आले आहे. सप्टेंबर 2014 अखेरची पटसंख्या प्राप्त न झाल्याने पटसंख्येनूसार रेनकोटची मागणी केली किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.***

कामाचे नाव:- विदयार्थ्यांना रेनकोट पुरविणेबाबत
कार्यादेश क्र. 241 दि.20/05/2014 व 1222 दि.21/06/2014
पुरवठा कालावधी :- कार्यादेशानंतर 90 दिवस
पुरवठादाराचे नाव:- राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह.ग्राहक संघ मर्यादित
प्रदानाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | एबी-114 | 02/08/2014 | 2420196/- |
| 2 | एबी-115 | 02/08/2014 | 49645/- |
| 3 | एबी-138 | 20/08/2014 | 22472/- |
| | | एकूण रक्कम रुपये | 2492313/- |

प्राथमिक शिक्षण मंडळातील विदयार्थ्यांना रेनकोट पुरविणेबाबतच्या खर्चाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .125 दि.18/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) निविदा जाहीरात प्रसिध्दीकरीता परशुराम समाचार , नगर न्युज, अमृत कलश या वर्तमानपत्रात दिली असल्याचे नस्तीमधील नोंदीवरून निदर्शनास आले आहे . परंतू वर्तमानपत्रातील जाहीरातीची प्रत लेखापरीक्षणास उपलबध झाली नाही. सबब, निविदा जाहीरात प्रसिध्दी राज्यस्तरीय वर्तमानपत्रात देणे आवश्यक असतांना स्थानिक वर्तमानपत्रात दिल्याचे नस्तीत नमूद असल्याने निविदा प्रक्रियेस व्यापक प्रसिध्दी दिली असल्याचे निदर्शनास आले नाही.

2) मा.आयुक्त, उल्हासनगर मनपा यांनी सन 2014-15 या एकाच वर्षाकरीता रेनकोट खरेदी निविदा प्रक्रीया राबविण्यास दि.17/02/2014 रोजी मान्यता दिली होती. परंतू निविदा निवड प्रक्रिया प्रत्यक्षात दोन वर्ष म्हणजे सन 2014-15 व 2015-16 करीता राबविली आहे. नस्तीतील पृष्ठ क्र. 2/टी वरील टिपणीत सन 2014-15 व 2015-16 या दोन वर्षाकरीता निविदा प्रक्रिया राबविणेस दि.19/05/2014 रोजी मंजुरी घेतली आहे . स्थायी समितीने ठराव क्र .8 दि.20/06/2014 अन्वये करारनामा करण्यास मंजूरी दिली आहे . मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील 73(ड) नूसार पंचविस लाख रुपयांपेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्भुत असेल अशा आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहीती त्याने अशी संविदा केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत स्थायी समितीस कळविली पाहीजे. परंतू या नियमानूसार कार्यवाही झाली असलेबाबत अभिलेख नस्तीत आढळून आले नाही.

3) निविदा प्रक्रियेत निविदाकारांचे तांत्रिक लखोटे दि .01/04/2014 रोजी उघडण्यात आल्यानंतर व्यापारी लखोटे दि.05/05/2014 रोजी विलंबाने उघडण्यात आले असल्याचे नस्तीत नमूद आहे . परंतू व्यापारी लिफाफे लेखापरीक्षणाकरीता प्राप्त आले नाहीत . तसेच स्थायी समितीची मंजूरी दि.20/06/2014 रोजी घेतली आहे. विलंबाबाबत कोणतेही कारण नस्तीत नमूद नाही.

4) अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम रु.24,82,252.50 कशाच्या आधारे घेण्यात आली आहे? याबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध झाले नाही . तसेच इयत्ता पहिली ते सातवीच्या विदयार्थ्यांकरीता खालीलप्रमाणे रेनकोट नग मागणी करण्यात आले असून त्यांचे दर पुढीलप्रमाणे आहेत. परंतू सदर दर कशाच्या आधारावर घेतले याबाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आले नाहीत.

| इयत्ता | रेनकोटचे दर (रुपये) | |
|---|---|---|
| | मुले | मुली |
| पहिली | 283.50 | 288.75 |
| दुसरी | 283.50 | 288.75 |
| तिसरी | 294 | 299.25 |
| चौथी | 294 | 299.25 |

| | | |
|---|---|---|
| पाचवी | 309.75 | 315 |
| सहावी | 320.25 | 325.50 |
| सातवी | 330.25 | 336 |

5) उदयोग,उर्जा व कामगार विभाग शा .नि.क्र.भाखंस1088/2512/उदयोग 6 दि.02.01.1992 मधील तरतूदीनूसार शासन मान्य सहकारी संस्थेकडून रेनकोट खरेदी करणे आवश्यक आहे . राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह. ग्राहक संघ मर्यादित यांचे सहकारी संस्था असलेचे प्रमाणप त्र नस्तीत आढळून आले नाही. 6) अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम रु.24,82,252/- कशी निश्चित केली ? इयत्तानिहाय मुले व मुली यांचे रेनकोटचे बाजारभावानूसार दर किती असतील ? याबाबत कोणतेही अभिलेख नस्तीत आढळून आले नाहीत . याबाबत नस्तीत कोणताही तपशिल नसतांना निविदा प्रक्रियेत खालीलप्रमाणे निविदाकारांचे दर प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | निविदेतील दर |
|---|---|---|
| 1 | हिंदूजा इंटरनॅशनल प्रा.लि. | अधिक 4.89 टक्के |
| 2 | जीएसएन असोसिएटस | अधिक 3.51 टक्के |
| 3 | राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह.ग्राहक संघ मर्यादित | कमी 2.5 टक्के |

निविदा मागवितांना कागदपत्रांमध्ये निविदा कालावधीतील इयत्तानिहाय मुले व मुली यांचे रेनकोटचे बाजारभावानूसार दर नमूद केले नसतांना निविदाकारांनी वरील तक्त्यामधील दर कशाच्या आधारावर निवेदेत नमूद केले? याबाबत अनुपालन प्राप्त झाले नाही. तसेच राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह.ग्राहक संघ मर्यादित यांचे दर कोणत्या आधारभूत दरापेक्षा लघूत्तम आहेत ? याबाबत अभिलेख नस्तीत आढळून आले नाही.

7) राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह. ग्राहक संघ मर्यादित यांनी इसारा अनामत रक्कम रु.1,50,000/- शिक्षण मंडळाकडे जमा केल्याचे नस्तीत आढळून आले नाही.

8) रेनकोटचा पुरवठा रेनकोट उत्पादक कंपनीकडून करणे आवश्यक आहे . राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह. ग्राहक संघ मर्यादित हे स्वत : रेनकोट उत्पादक असल्याचे तसेच एखादया रेनकोट उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेता असल्याचे अभिलेख नस्तीत निदर्शनास आले नाही. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सह. ग्राहक संघ मर्यादित यांचे मुल्यवर्धित कर प्रमाणपत्र क्र .27200045234व्ही वर व्यवसायाचे स्वरुप रिसेलर , रिटेलर, तसेच विक्रीकर प्रमाणपत्र क्र .27200045234सी वर व्यवसायाचे स्वरुप रिसेलर, रिटेलर व उल्हासनगर मनपा स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्र क्र.स्थासंक/उमनपा/युनिट-09/अनिवासी /360 /2012-13 दि.11/02/2014 वर व्यवसायाचे स्वरुप होलसेल व किरकोळ माल पुरवठा करणेचा व्यवसाय असल्याचे नमूद आहे.

9) रेनकोट वितरीत केलेची शाळानिहाय माहीतीची संकलित नोंदवही व शाळेकडील साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त् झाली नाही. त्यामुळे किती रेनकोटचा पुरवठा केला . याबाबतची तपासणी करता आली नाही.

10) उदाहरणादाखल शाळा क्र .19 व 30 मधील साठानोंदवहीनूसार प्राप्त रेनकोट व विदयार्थीनूसार वितरीत रेनकोट खालीलप्रमाणे आहे.

| | शाळा क्र.19 | | | शाळा क्र.30 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | प्राप्त | विदयार्थीनिहाय | शिल्लक | प्राप्त रेनकोट | विदयार्थीनिहाय | शिल्लक |

| | रेनकोट संख्या | | रेनकोट वाटप संख्या | | रेनकोट संख्या | | संख्या | | रेनकोट वाटप संख्या | | रेनकोट संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| पहिली | 15 | 16 | 7 | 8 | 8 | 8 | 10 | 12 | 6 | 11 | 4 | 1 |
| दुसरी | 29 | 30 | 13 | 10 | 16 | 20 | 13 | 12 | 8 | 14 | 5 | +2 |
| तिसरी | 39 | 24 | 12 | 15 | 27 | 9 | 20 | 19 | 14 | 7 | 6 | 12 |
| चौथी | 39 | 25 | 14 | 10 | 25 | 15 | 13 | 23 | 11 | 11 | 2 | 12 |
| पाचवी | 21 | 13 | 30 | 31 | +9 | +18 | 15 | 15 | 14 | 13 | 1 | 2 |
| सहावी | 36 | 28 | 32 | 19 | 4 | 9 | 13 | 12 | 12 | 17 | 1 | +5 |
| सातवी | 33 | 32 | 22 | 12 | 11 | 20 | 22 | 18 | 8 | 16 | 14 | 2 |
| | 212 | 168 | 130 | 105 | 82 | 63 | 106 | 111 | 73 | 89 | 33 | 22 |

उपरोक्तनूसार शाळा क्र .19 मध्ये मुलांचे एकूण 82 नग व मुलींचे 63 नग व शाळा क्र .30 मध्ये मुलांचे एकूण 33 नग व मुलींचे 22 नग रेनकोट शिल्लक असतांना ते पुरवठादारास परत केले नसल्याचे साठा नोंदवहीवरून निदर्शनास आले आहे . तसेच शाळा क्र .19 च्या साठा नोंदवहीनूसार मुलींचे 18 नग रेनकोट वाटप केल्याचे दर्शविले आहेत . परंतू ते रेनकोट कोणत्या वर्गातील विदयार्थीनींना वाटप केले याबाबत नोंदवहीत नोंद नाही . सप्टेंबर 2014 अखेरची पटसंख्या प्राप्त न झाल्याने पटसंख्येनूसार रेनकोटची मागणी केली किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.

11) प्रमाणक क्र .एबी-115 दि.02/08/2014 अन्वये रक्कम रु .49645/- इतकी रक्कम आयकर विभागात भरणेकरीता बँकेत भरणा केली असल्याचे दिसून येते. परंतू चलनाची प्रत लेखापरीक्षणाकरीता प्राप्त न झाल्याने पडताळणी करता आली नाही.

DATPVWM7501 (Ref No : 79, Hmm No : 125)

## *92 जाहिरात व मागासवर्गीय भत्ता या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 396000.00/-

***बॅनर्स व स्टिकर्सची मागणी संबंधात नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. पुरवठा आदेश, प्राप्त मालाची पोच व नोंदवही, टॅक्स इनव्हॉईस, बॅनर्स व स्टिकर्सद्वारे जाहिरातीकरीता कोणकोणते ठिकाण निश्चित***

***केले? याबाबत अहवाल व प्रत्यक्ष बॅनर्स व स्टिकर्सद्‌वारे जाहीरात केलेली ठिकाणे ईत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. आयकर भरणा केलेबाबत चलनाची प्रत लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे. जाहिरातीऐवजी कार्यालयीन सामग्री खरेदीकरीता प्रदान केल्याचे प्रमाणकावरून निदर्शनास आले आहे. खरेदीची नस्ती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. प्रमाणकासोबत असलेल्या चलनावर दिनांक, पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक नमूद नाही. प्रमाणकांवर प्रशासकीय अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. बॅनर्सच्या मागणी संबंधात नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. अनामत रक्कमेची नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना सदर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळ अधिनस्त शाळांमधील विदयार्थ्यांची पटसंख्या वाढविणेकरीता जाहीरात खर्चापोटी 2014-15 या वित्तीय वर्षात रक्कम रु.396000/- इतकी रक्कम खर्च केल्याचे अर्थसंकल्पात नमूद आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रुपये | कंत्राटदाराचे नाव | वित्तीय वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एबी-163 | 10/09/2014 | 198000/- | ओम मनिष एन्टरप्रायझेज | 2014-15 |
| 2 | एबी-164 | 10/09/2014 | 198000/- | ओम मनिष एन्टरप्रायझेज | |

प्रमाणक क्र.163 दि.10/09/2014 अन्वये रक्कम रु.198000/- ओम मनिष एन्टरप्रायझेज यांना खालीलप्रमाणे जाहिरातीऐवजी कार्यालयीन सामग्री खरेदीकरीता प्रदान केल्याचे प्रमाणकावरून निदर्शनास आले आहे.

| अ.क्र. | खरेदीचा तपशिल | नग | दर (रुपये) | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | ए-4 साईझ पेपर रिम | 100 | 165/- | 16500/- |
| 2 | लिगल साईझ पेपर रिम | 500 | 265/- | 132500/- |
| 3 | कलर झेरॉक्स पेपर | 170 | 300/- | 51000/- |
| | | | एकूण रक्कम रुपये | 200000/- |

खरेदीची नस्ती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे प्रशासकीय मान्यता घेतलेबाबत, दरपत्रके मागविली किंवा कसे, याबाबतच्या अभिलेखांची तपासणी करता आली नाही.

उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) बॅनर्स व स्टिकर्सची मागणी संबंधात नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. त्यामुळे बॅनर्स व स्टिकर्सची मागणी कोणत्या निकषावर निश्चित करण्यात आली? दर निश्चितीकरीता दरपत्रके मागविली किंवा कसे? प्रशासकीय मान्यता घेतली किंवा कसे? याबाबत तपासणी करता आली नाही.

2) पुरवठा आदेश, प्राप्त मालाची पोच व नोंदवही, टॅक्स इनव्हॉईस, बॅनर्स व स्टिकर्सद्‌वारे जाहिरातीकरीता कोणकोणते ठिकाण निश्चित केले? याबाबत अहवाल व प्रत्यक्ष बॅनर्स व स्टिकर्सद्‌वारे जाहीरात केलेली ठिकाणे ईत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.

3) प्रमाणकासोबत असलेल्या चलनावर दिनांक, पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक नमूद नाही. त्यामुळे कोणत्या आदेशान्वये व कधी मागणी करण्यात आली याबाबत तपासणी करता आली नाही.

4) उपरोक्त प्रमाणकांवर प्रशासकीय अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

ब) बॅनर्सच्या प्रिंटीग व फ्रेमकरीताचे प्रदान प्रमाणक क्र. एबी-164 दि.10/09/2014 अन्वये करण्यात

आले असून तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | नग | दर (रुपये) | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | फ्रेमसह बॅनर्स | 500 | 400/- | 200000/- |

उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) बॅनर्सच्या मागणी संबंधात नस्ती लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही. त्यामुळे बॅनर्सची मागणी कोणत्या जाहिरातीसाठी व कोणत्या निकषावर निश्चित करण्यात आली? दर निश्चितीकरीता दरपत्रके मागविली किंवा कसे? प्रशासकीय मान्यता घेतली किंवा कसे? याबाबत तपासणी करता आली नाही.

2) पुरवठा आदेश, प्राप्त मालाची पोच व नोंदवही, टॅक्स इनव्हॉईस, बॅनर्सच्या जाहिरातीकरीता कोणकोणते ठिकाण निश्चित केले? याबाबत अहवाल व प्रत्यक्ष बॅनर्सद्वारे जाहीरात केलेली ठिकाणे ईत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.

3) आयकर कपातीची रक्कम रु.4000/- आयकरपोटी बँकेत भरणा केली किंवा कसे याबाबत आयकर भरणा केलेबाबत चलनाची प्रत लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे.

क) अनामत रक्कमेच्या परताव्यापोटी वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.5345000/- इतकी रक्कम अर्थसंकल्पात नमूद असतांना सन 2014-15 मध्ये निरंक रक्कम खर्ची पडल्याचे दर्शविले आहे. अनामत रक्कमेची नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना सदर नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही.

उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि. 25/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

DATPVWM7501 (Ref No : 80, Hmm No : 131)

## *93 संगणकाची दुरूस्ती व देखभाल तसेच मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे कामातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 576772.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5400.00/-

***स्टारनेट कॉम्प्युटर एज्युकेशन यांची संगणक देखभाल व दुरूस्तीकरीता निवड केलेबाबत निविदा नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. संगणकाची दुरूस्ती व देखभाल केल्यानंतर स्टारनेट एज्युकेशन यांनी शाळा मंडळास अहवाल सादर केला किंवा कसे याबाबत अभिलेख अप्राप्त आहे. टोनरची रिफिल करणे आवश्यक***

***असलेबाबत संबंधित शाळा मुख्याध्यापकांचे मागणीपत्रक प्रमाणकासोबत नाही. विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणेबाबत निविदा नस्ती लेखापरीक्षण उपलबध झाली नाही. इनव्हॉईसच्या दिनांक व प्रमाणकाचा दिनांकानूसार माहे मार्च 2015 चा कालावधी पुर्ण होण्याअगोदरच मागणी व रक्कम प्रदान केली आहे. संगणक प्रशिक्षण देणा-या प्रशिक्षकांनी विदयार्थ्यांना प्रशिक्षण दिले किंवा कसे याबाबत मुख्याध्यापकांचे अहवाल प्रमाणकासोबत जोडलेले नाही. इनव्हॉईसचा दिनांक व प्रमाणकाच्या दिनांकानूसार माहे मार्च 2015 चा कालावधी पुर्ण होण्याअगोदरच मागणी करण्यात आली आहे. व त्यानुसार रक्कमदेखील प्रदान केली आहे.***

अ) स्टारनेट कॉम्प्युटर एज्युकेशन यांना शिक्षण मंडळ कार्यालय व शाळेतील संगणकाची मासिक देखभाल व दुरूस्तीकरीता प्रती संगणक रु.750/- प्रमाणे प्रमाणक क्र.एबी-424 दि.18/03/2015 अन्वये रक्कम रु.36000/- प्रदान करण्यात आली आहे. तसेच प्रमाणक क्र.एबी-425 दि.18/03/2015 अन्वये 3 प्रिटर टोनरच्या रिफिलींगकरीता एकूण रक्कम रु.750/- प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) स्टारनेट कॉम्प्युटर एज्युकेशन यांची संगणक देखभाल व दुरूस्तीकरीता निवड केलेबाबत निविदा नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्यांची निवड, नेमणूक कशी,कोणी व कोणत्या निकषावर केली, दर निश्चिती कशी केली याबाबत तपासणी करता आली नाही.

2) मनपा शिक्षण मंडळ व शाळेत एकूण किती संगणक आहेत? त्यापैकी किती चालू स्थितीत आहेत? याबाबत लेखापरीक्षणाकरीता लेखे उपलब्ध झाले नाहीत.

3) संगणकाची दुरूस्ती व देखभाल केल्यानंतर स्टारनेट एज्युकेशन यांनी शाळा मंडळास अहवाल सादर केला किंवा कसे याबाबत अभिलेख अप्राप्त आहे.

ब) प्रमाणक क्र.एबी-425 दि.18/03/2015 अन्वये टोनरची रिफिल करणे आवश्यक असलेबाबत संबंधित शाळा मुख्याध्यापकांचे मागणीपत्रक प्रमाणकासोबत नाही.

क) उल्हासनगर मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देणा-या शिक्षकांचे वेतनापोटी पानसी टेक्नॉलॉली, कल्याण यांना खालीलप्रमाणे रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | रककम रुपये |
|---|---|---|
| 1 | एबी-402 दि.16/03/2015 | 540022/- |

1) विदयार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणेबाबत निविदा नस्ती लेखापरीक्षण उपलबध झाली नाही. त्यामुळे मे.पानसी टेक्नॉलॉजी यांची निवड कोणी, कशी व कोणत्या निकषावर केली? प्रशिक्षणाकरीता कोणत्या अभ्यासक्रमावर शिक्षण देणे कंत्राटदारावर बंधनकारक होते? दराची निश्चिती कशी केली? याबाबत लेखापरीक्षणात तपासणी करता आली नाही.

2) इनव्हॉईस क्र.1187 दि.01/03/2015 अन्वये माहे सप्टेंबर 2014 ते मार्च 2015 या कालावधीत दिलेल्या प्रशिक्षणापोटी रक्कम रु.5,40,022/-ची मागणी केली आहे. इनव्हॉईसच्या दिनांक व प्रमाणकाचा दिनांकानूसार माहे मार्च 2015 चा कालावधी पुर्ण होण्याअगोदरच मागणी करण्यात आली आहे. व त्यानुसार रक्कमदेखील प्रदान केली आहे.

3) संगणक प्रशिक्षण देणा-या प्रशिक्षकांनी विदयार्थ्यांना प्रशिक्षण दिले किंवा कसे याबाबत मुख्याध्यापकांचे अहवाल कंत्राटदारास रक्कम अदा करण्यापुर्वी घेणे आवश्यक असतांना तसे अहवाल प्रमाणकासोबत जोडलेले नाही.

4) आयकर अधिनियम 1968 अन्वये एक टक्के आयकराची रक्कम रु.5400/-कपात केलेली नाही.
सदर रक्कम वसुल करून शासन सदरी भरणे आवश्यक आहे.
उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.132 दि. 25/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

DATPVWM7501 (Ref No : 81, Hmm No : 132)

## *94 उल्हासनगर 4 मधील प्रभाग क्र. 26 मध्ये वाघरी पाडा ते रोशन तबेला पर्यंत मोठा नाला बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 999000.00/-

***जिल्हा उपनिबंधक ठाणे, मजूर कामगार सहकारी संस्था यांची मंजुरी न घेता नियमबाहय पध्दतीने काम देण्यात आले आहे.आयुक्ताने तातडीच्या परिस्थितित विनानिविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीच्या कार्यवृत्तात तातडीची बाब नमुद करून विनानिविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेतलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण सात मधील कलम 73 (ड) नुसार रू 3 लाख रूपयांपेक्षा अधिक परंतु 10 लाख खर्चाचा समावेश असलेल्या कामासाठी जाहिर निविदा मागवून कंत्राटदार नेमणे आवश्यक आहे तसेच केलेली संविदा पुढील 15 दिवसाच्या आत स्थायी समितीपुढे आवलोकनार्थ सादर केलेली नाही.***

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 26 मध्ये वाघरीपाडा ते रोशन तबेला पर्यत नाला बांधण्यासाठी मे. वणीदेवी मजुर कामगार सहकारी संस्थेस काम देण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष | : D(I) P-II |
| प्राकलन रू. | : 9,99,000/- |
| प्रशा. व वित्तीय मान्यता | : अति. आयुक्त दि. 24/06/2014 |
| तांत्रिक मान्यता | : कार्यकारी अभियंता 1498 दि. 13/01/2014 |
| कामाचे आदेश | : UMC/PWD/EE/1041 दि.24/06/2014 |
| कालावधी | : 180 दि. |
| कामपूर्ण | : 19/08/2014 |
| कामाचा खर्च | : 9,99,000/- |
| मोजमाप पुस्तिका | : 3584 पान क्र. 1 ते 4 |

प्रमाणक क्र. 4899 दि. 30/03/2015 धनादेश क्रमांक 301448 अन्वये रक्कम रूपये 8,66,632/- प्रदान करणेत आले आहे अर्धसमास पत्र क्र. 87 दि. 31/08/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही याबाबत खालील अनियमितता आहे.

1) प्रभाग क्र. 26 मध्ये वाघरीपाडा ते रोशन तबेला पर्यंत नाला बांधण्यासाठी रक्कम रू. 9,99,000/- च्या खर्चास अति. आयुक्त यांच्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेने वणीदेवी मजुर सहकारी संस्थेस काम देण्यात आले आहे.

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. एलसीएस 1077/55933/डेस्क-27 डी, दि. 30/03/79 अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार व तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि. क्र. सीए.टी 07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्थाना निविदा न मागविता काम देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा उपलनिबंधक, ठाणे, मजूर कामगार सहकारी संस्था यांची मंजुरी न घेता नियमबहाय पध्दतीने काम देण्यात आले आहे

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 चे कलम 2(2) नुसार आयुक्तांनी तातडीच्या परिस्थितीत विनानिविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीच्या कार्यवृत्तांत तातडीची बाब नमुद करून विनानिविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण सात मधील कलम 73 (ड) नुसार रू. 3 लाख रूपयांपेक्षा अधिक परंतु 10 लाख खर्चाचा समावेश असलेल्या कामासाठी जाहिर निविदा मागवून कंत्राटदार नेमणे आवश्यक असुन केलेली संविदा पुढील 15 दिवसाच्या आत स्थायी समितीपुढे आवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु स्थायी समितीची मान्यता घेण्याबाबतचा ठराव प्रमाणका सोबत जोडलेला नाही.

DATPKCM7101 (Ref No : 51, Hmm No : 87)

## *95 वार्ड क्र. 13 मध्ये सोनवणे यांच्या घरापासुन ते अमरज्योत अर्पाटमेंट पर्यंतचा नाला व संरक्षणाभिंत बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 898000.00/-

***शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. एलसीएस 1077/55933/डेस्क-27 डी, दि. 30/03/79 अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार व तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग शा. नि. क्र. सीए.टी07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्थाना निविदा न मागविता काम देण्यासाठी कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, ठाणे मजूर कामगार सहकारी संस्था यांची मंजूरी न घेता नियमबाहय पध्दतीने काम देण्यात आले आहे. स्थायी समितीची मंजुरी घेतलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण सात मधील कलम 73 (ड) नुसार रू 3 लाख रूपयांपेक्षा अधिक परंतु 10***

| ***लाख खर्चाचा समावेश असलेल्या कामासाठी जाहिर निविदा मागवून कंत्राटदार नेमलेले नाही.*** |
|---|

उल्हासनगर - 2 मधील वार्ड क्र. 13 मध्ये सोनवणे यांच्या घरापासुन ते अमरज्योत अपार्टमेंट पर्यंतचा नाला व संरक्षण भिंत बांधण्यासाठी मे वणीदेवी मजुर कामगार सहकारी संस्थेस काम देण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष | : D(I) P-II |
| प्राकलन रू. | : 8,98,000/- |
| प्रशा. व वित्तीय मान्यता | : अति. आयुक्त दि. 01/08/2014 |
| तांत्रिक मान्यता | : 3024 दि. 20/06/2014 |
| कामाचे आदेश | : UMC/PWD/EE/1147 दि.01/08/2014 |
| कालावधी | : 180 दि. |
| करारनामा | : 01/08/2014 |
| कामपूर्ण | : 24/11/2014 |
| कामाचा खर्च | : 8,98,000/- |
| मोजमाप पुस्तिका | : 8042 पान क्र. 1 ते 5 |

प्रमाणक क्र. 4721 दि. 23/03/2015 धनादेश क्रमांक 301397 अन्वये रक्कम रूपये 7,79,015/- चे प्रदान करणेत आले आहे अर्धसमास पत्र क्र. 86 दि. 31/08/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील अनियमितता आहेत.

1) वार्ड क्र. 13 मध्ये सोनवणे यांच्या घरापासून ते अमरज्योत अपार्टमेंटपर्यंतचा नाला व संरक्षण भिंत बाधण्याच्या खर्चास अति. आयुक्त यांच्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेने वणीदेवी मजुर सहकारी संस्थेस काम देण्यात आले आहे.

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. एलसीएस 1077/55933/डेस्क-27 डी, दि. 30/03/79 अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि. क्र. सीए.टी 07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्थाना निविदा न मागविता काम देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, ठाणे, मजूर कामगार सहकारी संस्था यांची मंजूरी न घेता नियमबाहय पध्दतीने काम देण्यात आले आहे.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 चे कलम 2(2) नुसार आयुक्ताने तातडीच्या परिस्थितीत विना निविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीच्या कार्यवृत्तांतात तातडीची बाब नमुद करून विनानिविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण सात मधील कलम 73 (ड) नुसार रू. 3 लाख रूपयांपेक्षा अधिक परंतु 10 लाख खर्चाचा समावेश असलेल्या कामासाठी जाहिर निविदा मागवून कंत्राटदार नेमणे आवश्यक असुन केलेली संविदा पुढील 15 दिवसाच्या आत स्थायी समितीपुढे आवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 52, Hmm No : 86)

## ***96 प्रभाग क्र. 1 मधील दत्तवाडी व गुलशणनगर येथे सी सी पेव्हमेंट रस्ता व नाला बाधंणे कामातील अनियमिततेबाबत.***

उल्हासनगर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 497666.00/-

***शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. एलसीएस 1077/55933/डेस्क-27 डी, दि. 30/03/79 अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार व तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि. क्र. सीए.टी 07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्थाना निविदा न मागविता काम देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, ठाणे, मजूर कामगार सहकारी संस्था यांची मंजुरी न घेता नियमबाहय पध्दतीने काम देण्यात आले महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 चे कलम 2(2) नुसार आयुक्तांनी तातडीच्या परस्थितीत विना निविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीच्या कार्यवृत्तांतात तातडीची बाब नमुद करून विनानिविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेतलेली नाही. शाखा अभियंता यांचा काम पूर्णत्वाचा दाखला प्रमाणकासोबत जोडलेला नाही.***

प्रभाग क्र. 1 मधील दत्तवाडी व गुलशननगर येथे सी सी पेव्हमेंट रस्ता व नाली बांधणेच्या कामासाठी मे कलश मजुर कामगार सहकारी संस्थेस विनानिविदा काम देण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष | : C-4(6)P-II |
| प्राकलन रू. | : 6,00,000/- |
| प्रशा. व वित्तीय मान्यता | : अति. आयुक्त दि. 26/06/2014 |
| तांत्रिक मान्यता | : 2003 दि. 28/02/2014 |
| कामाचे आदेश | : UMC/PWD/EE/1184 दि.09/09/2014 |
| कालावधी | : 120 दिवस |
| कामपूर्ण | : निरंक |
| एकूण खर्च | : 4,97,666/- |
| मोजमाप पुस्तिका | : 6056 पान क्र. 1 ते 7 |

प्रमाणक क्र. 4702 दि. 20/03/2015 धनादेश क्र. 301305 अन्वये रक्कम रूपये 4,31,725/- चे प्रदान करणेत आले आहे. अर्धसमास पत्र क्र. 90 दि. 14/09/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) प्रभाग 1 मधील दत्तवाडी व गुलशननगर येथे सी.सी. पेव्हमेंट रस्ता व नाली बांधण्याच्या खर्चास अति. आयुक्त यांच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेने मे. कलश मजुर सहकारी संस्थेस काम देण्यात आले आहे. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. एलसीएस 1077/55933/डेस्क-27 डी, दि. 30/03/79 अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार व तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि. क्र. सीए.टी 07/06/प्र.क्र.94/इमा-2 दि. 16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्थाना निविदा न मागविता काम देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, ठाणे, मजूर कामगार सहकारी संस्था, यांची मंजुरी न घेता नियमबाहय पध्दतीने काम देण्यात आले आहे.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 चे कलम 2(2) नुसार आयुक्तांनी तातडीच्या परस्थितीत

विना निविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीच्या कार्यवृत्तांतात तातडीची बाब नमुद करून विनानिविदा काम करून घेण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे परंतू अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.
3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण सात मधील कलम 73 (ड) नुसार रू. 3 लाख रूपयांपेक्षा अधिक परंतु 10 लाख खर्चाचा समावेश असलेल्या कामासाठी जाहिर निविदा मागवून कंत्राटदार नेमणे आवश्यक असुन केलेली संविदा पुढील 15 दिवसाच्या आत स्थायी समितीपुढे आवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु स्थायी समितीची मान्यता घेण्याबाबतचा ठराव प्रमाणका सोबत उपलब्ध झालेला नाही.
4) कार्यादेशानुसार विहित कालावधीत वरील कामे पूर्ण झाल्याबाबत संबंधित शाखा अभियंता यांचा काम पूर्णत्वाचा दाखला प्रमाणकासोबत पडताळणीस उपलब्ध झाला नाही.

DATPKCM7101 (Ref No : 53, Hmm No : 90)

## *97 बांधकाम विभागाकडील ठेवण्यात आलेल्या लेख्यांच्या अनियिमितता व त्रुतींबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभागाचे 2013-14 व 2014-15 या वर्षाचे लेखा परीक्षण केले असता बांधकाम विभागाने ठेवलेले अभिलेख्यामध्ये बांधकाम बाबत एखाद्या कामाची नस्ती तपासताना नस्ती सोबत त्या बांधकामासाठी अथवा कामासाठी घेण्यात आलेली प्रशासकिय मंजूरी व अशी मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तांत्रीक अधिकारी यांनी केलेले अशा कामाचे प्राकलन व त्यासोबतचे मोजणी पत्रक शेडयूल बी, जाहिरात प्रसिध्दी वृतपत्रे अथवा कात्रणे ठेकेदारा सोबत केलेला मुळ करारनामा, ठेकेदारास दिलेले कार्यदेश मुळ प्रति, इत्यादी कागदपत्रोसह मुळ नस्तीला जोडणे आवश्यक असून अशाप्रकारे प्रत्येक कामाची स्वतंत्र नस्ती तयार करुन लेखा परीक्षणास सादर करण्यात आलेल्या नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभागाचे 2013-14 व 2014-15 या वर्षाचे लेखा परीक्षण केले असता बांधकाम विभागाने ठेवलेले अभिलेख्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता व त्रुटी आढळून आल्या आहेत.
1.विभागाने लेखा परीक्षणासाठी अभिप्रेत लेखे ठेवण्यात देण्यात आलेले नाहीत. बांधकाम बाबत एखाद्या कामाची नस्ती तपासताना नस्ती सोबत त्या बांधकामासाठी अथवा कामासाठी घेण्यात आलेली प्रशासकिय मंजूरी व अशी मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तांत्रीक अधिकारी यांनी केलेले अशा कामाचे प्राकलन व त्यासोबतचे मोजणी पत्रक शेडयूल बी, जाहिरात प्रसिध्दी वृतपत्रे अथवा कात्रणे ठेकेदारा सोबत केलेला मुळ करारनामा, ठेकेदारास दिलेले कार्यदेश मुळ प्रति, इत्यादी कागदपत्रासह मुळ नस्तीला जोडणे आवश्यक असून अशाप्रकारे

प्रत्येक कामाची स्वतंत्र नस्ती तयार करुन लेखा परीक्षणास सादर करण्यात आलेल्या नाहीत.

2 ठेकेदारास एखाद्या कामाचे कार्यादेश भेटल्यानंतर काम सुरू झाल्यापासून काम पूर्ण होईपर्यत तसेच ठेकेदारास कामाचे प्रदान होईपर्यंत असलेले दस्तऐवज मोजमाप नोंदवहया धावत्या देयकांसह अंतिम देयकाच्या मोजमाप नोंदवहया तसेच मोजमाप नोंदवहयांच्या अनुषंगाने सादर करावयाचे कॉंक्रिट, डांबरीकरण, खडीकरण यांचे दक्षता गुणनियंत्रण विभागाकडून घेणेत आलेली टेस्ट रिपोर्ट, ठेकेदाराने वापरलेल्या साहित्याची नोंदवही,लेखा शाखेमार्फत मोजमाप नोंदवहीनुसार ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकांच्या (धावत्या/देयका पासून अंतिम देयकापर्यंत) प्रमाणक क्रमांकासाहित फोटो प्रति, कामपूर्ण झाल्याबाबतचा तांत्रीक अधिकारी यांचा दाखला, कामपूर्ण झाल्यानंतर अशा कामाची मालमत्ता नोंदवहीला घेतलेली नोंदी, प्रोग्रेसिव्ह नोंदवही, निविदाधारकांनी सादर केलेल्या निविदा नस्ती,

अशाप्रकारे सर्व नमूद केलेल्या बाब कामनिहाय एकाच नस्ती सोबत जोडून लेखा परीक्षणास सादर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

3. विभागाणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकिय तरतुदीनुसार वाटप झालेल्या अनुदानाची नोंदवही (बजेट नोंदवही)व लेखा शिर्षानुसार खर्च झालेल्या रक्कमांची नोंदवही ठेवलेली नाही.

4. लेखा परीक्षणास उक्त नमूद केलेली सर्व कागदपत्रे व नोंदवहया विभागाने त्यांच्या स्तरावर विहीत नमून्यामध्ये तसेच कामनिहाय एकाच मुळ नस्तीत ठेवून लेखा परीक्षणास सादर केलेल्या नाहीत या उलट विभागाणे अशी सर्व कागदपत्रे लेखा शाखेकडे पाठविण्यात येत असल्याचे चर्चेअंती सांगीतले परंतू याबाबत लेखा शाखेनेही अशी कागदपत्रे सादर करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे लेखा परीक्षणास अडथळे निर्माण झाले असल्याची वस्तुस्थिती आहे. लेखा शाख्नेने विभागानिहाय प्रमाणकांच्या नस्ती ठेवलेल्या नाहीत. लेखा शाखेमध्ये विहीत नमुन्यात रोखवही ठेवण्यात आलेली नाही. रोखवही सादर करताना विशेषत: बांधकाम विभागासाठी, कामाचे नांव मक्तेदारचे नाव अदा केलेल्या देयकाची स्थिती (पहिले, दुसरे,तिसरे अथवा अंतिम देयक) याबाबत कोणतीही खात्री लेखा परीक्षणास करता आलेली नाही. सदरील वस्तुस्थिती बाबत बांधकाम विभागाला अर्धसमास क्र.40 दिनांक 22/07/2016 अन्वये खुलासा मागविला असता विभागचे उतर अप्राप्त आहे

DATAPJF8101 (Ref No : 105, Hmm No : 40)

## *98 बांधकाम विभागची लेखे उपलब्ध करून न दिले बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***बांधकाम विभागाचे 2013-14 व 2014-15 या वर्षाचे लेखा परीक्षणासाठी खालील नमूद माहिती व लेख, लेखा परीक्षणास उद्याप उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. बी.एस.यु.पी. अतंर्गत शासनातर्फे महानगरपालिकेस 2013-14 व 2014-15 उपलब्ध झालेले अनुदान व सदर वर्षात झालेला एकूण खर्च, आमदार/खासदार निधी अंतर्गत शासनाकडून एकूण प्राप्त झालेले अनुदान 2013-14 व 2014-15 मध्ये खर्च करण्यात आलेली रक्कम तसेच विविध शासन योजनाअंतर्गत प्राप्त झालेले अनुदान खर्च व शिल्लक रक्कमांचा योजनानिहाय तपशील लेखा परीक्षणास दाखविनेत आलेले नाही*** |

बांधकाम विभागाचे 2013-14 व 2014-15 या वर्षाचे लेखा परीक्षणासाठी खालील नमूद माहिती व लेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

1. बी.एस.यु.पी.अतंर्गत शासनातर्फे महानगरपालिकेस 2013-14 व 2014-15 उपलब्ध झालेले अनुदान व सदर वर्षात झालेला एकूण खर्च तसेच अखर्चित अनुदान शिल्लक असल्यास असे अनुदान शासनास परत केले अशा रक्कमांचा तपशील.

2.आमदार/खासदार निधी अंतर्गत शासनाकडून एकूण प्राप्त झालेले अनुदान 2013-14 व 2014-15 मध्ये खर्च करण्यात आलेली रक्कम सदर वर्षात शिल्लक असलेल्या अनुदानाची रक्कम अथवा अशी शिल्लक रक्कम पुढील वर्षात वापरणेत आली असल्यास अशा रक्कमेचा तपशील.

3. विविध शासन योजनाअंतर्गत प्राप्त झालेले अनुदान खर्च व शिल्लक रक्कमांचा योजनानिहाय तपशील.

4. विविध लेखा शिर्षाखाली अंदाजपत्रकानुसार बांधकाम विभागास प्राप्त झालेली तरतुद व त्या अनुषंगाने झालेला खर्च याबाबतची तरतुद नोंदवही व शिल्लक तरतुदींचा लेखाशिर्षानिहाय तपशील.

5.बांधकाम विभागामार्फत 2013-14 व 2014-15 विविध तरतुदीनुसार झालेल्या खर्चाची सर्व प्रमाणके, संबंधित कागदपत्रे प्रत्येक कामाची निविदा नस्ती, प्राकलणे, कामाच्या मोजमाप नोंदवहया.

6.सार्वजनिक बांधकाम विभागकडील 2011-12 ते 2013-14 पर्यंतच्या जिल्हा दरसूची (D.S.R.) बांधकाम विभागाकडील दरसूचीनुसार प्रत्येक बाबीचे केलेले दरपृथ्थकरण (रेट ॲनालिसेस)

वरील सर्व लेखे, कागदपत्रे व माहिती लेखा परीक्षण सुरू झाल्यानंतर तोंडी सूचना देउनही सदरील बाबतीत अर्धसमास क्र 47 दिनांक 27/07/2016 अन्वेये खुलासा मागविला असता विभागाचे उत्तर अप्राप्त आहे .

DATAPJF8101 (Ref No : 106, Hmm No : 47)

## *99 करनिर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे विहीत नमुन्यात ठेवले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***कर निर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2004 मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात ठेवलेले नाही.*** |

**1) महापालिकेने खालील विहित नमुन्यात लेखे ठेवलेले नाहीत.**

**1) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा-11)**

**2) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा-12)**

**3) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा-20)**

**4) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा-21)**

**5) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा-22)**

**6) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा-23)**

**7) नोटीस फी वांरट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा-24)**

**8) परतावा, remission व write off नोंदवही (नमुना सर्वसा-25)**

**9) परतावा व remission गोषवारा विवरणपत्र.**

**10) काढून टाकलेल्या मालमत्ताचे गोषवारा विवरणपत्र (नमुन सर्वसा-26 तसेच या व्यतिरिक्त**

**11) दरवाढीचे गोषवारा विवरणपत्र (नमुणा P&OT-1)**

**12) मागणी व वाढचे जुळवणी गोषवारा विवरणत्र (नमुना P&OT-2)**

**13) वर्षानुसार सारांश विवरणपत्रे, मालमत्ता व इतर करांचे लेखाशिर्षानुसार जमा विवरणपत्रे (नमुना P&OT-3)**

**14) परतावा व सवलतीचे सारांश विवरणपत्र**

**15) वाढ व घट नोंदवही.**

DATPKCM7101 (Ref No : 54, Hmm No : 163)

## *100 मालमत्ता कर विभागातील अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसलेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***मालमत्ता कर विभागातील अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत.*** |

स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 मधील कलम 4 व 6 अन्वये ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या संस्थेने लेखापरीक्षणाकरीता लेखे सादर करणे बंधनकारक आहे. अर्धसमास ज्ञापन क्र .128 दि.20/10/2016 अन्वये मालमत्ता कर विभागातील लेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत कळविले होते . परंतू अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने दि .27/10/2016 च्या पत्रान्वये अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत संबंधितांना सुचना देणेबाबत मा .आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना विनंती करण्यात आली. तसेच पुन्हा अर्धसमास क्र.156 दि.29/11/2016 अन्वये अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात आले होते . तरीदेखील खालीलप्रमाणे अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.

1) मिळकत कर विभागातील 2014-2015 या वित्तीय वर्षामधील एकूण कर निर्धार णांची एकूण प्रकरणे किती आहेत ? त्यापैकी लेखापरीक्षणाकरीता निवडक महीना मार्च 2015 मधील एकूण कर निर्धारणाच्या मुळ प्रकरणे नस्ती , कर निर्धारणाची नोंदवही , कर निरीक्षकांचे स्थळ पाहणी अहवाल , त्यांची क्षेत्रीय स्तरावरील अहवालाची नोंदवही इ ., तसेच मार्च 2015 मधील स र्व कर निर्धारण प्रकरणांची ॲसेसमेंट डिटेल्स व प्रॉपटी कार्डची प्रिंट आऊट.

2) मिळकत कराची कर निर्धारण नोंदवही व मागणी नोंदवही , तसेच सन 2014-15 पर्यंत कर निर्धारण केले परंतू कराची संबंधित ग्राहकांकडे मागणी केली नाही किंवा विलंबाने प्रत्यक्ष कर निर्धारणाच्या दिनांकापासून मागणी न करता चालू कालावधीपासून मागणी केली, असे प्रकरणांची यादी व प्रकरणांच्या नस्ती.

3) मालमत्ता करामध्ये सुट किंवा परतावा देण्याची कार्यवाही केलेली प्रकरणांची नस्ती , वाढ-घट नोंदवही.

4) 2010-11, 2011-12 व 2012-13 या तीन वर्षांत बांधकाम प्रारं भ परवानगी देण्यात आलेली प्रकरणे व त्यांची संख्या, त्यानंतर त्यापैकी किती प्रकरणे मिळकत कर निर्धारणाकरीता घेण्यात आली व उर्वरीत कर निर्धारण न केलेल्या मिळकतींवर केलेली कार्यवाही,

5) उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे मालमत्ता असलेले परंतू भाडेतत्वावर दिलेल्या प्रकरणांवर मालमत्ता कराअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत अभिलेख /नस्ती. तसेच शासनाच्या मालमत्तेवर कर आकारणी केलेल्या कराची प्रकरणे व अभिलेख

6) अनधिकृत बांधकामांवर कर निर्धारणाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचे अभिलेख तसेच मिळकत कराची थकबाकी वसुलीकरी ता कोणकोणत्या सवलतीच्या योजना राबविण्यात आल्या त्यांच्या मंजूरीचे व त्याप्रमाणे झालेल्या कार्यवाहीचे अभिलेख

7) मिळकत कराच्या अनुषंगाने विवाद व कोर्टातील दावे प्रकरणे व अभिलेखे

8) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 च्या नियम 21(2) नुसार आयुक्तांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पाच वर्षांतून एकदा तरी आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे , अशी तरतूद आहे . याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे नव्याने कर निर्धारण केले किंवा कसे ? केले असल्यास त्यासंबंधीचे अभिलेख नस्ती . जर के ले नसल्यास त्यामागील कारणमिमांसा.

9) शासनाच्या वतीने मिळकत करात समाविष्ठ असलेला मोठा निवासी कर , रोजगार हमी योजना

कर, शिक्षण उपकर इ. शासनास भरणा करण्याच्या रकमांचे अभिलेख.

10) नगर विकास विभाग , शासन निर्णय क्र .टीपीएस-1810/1975/प्र.क्र.2417/10/नवि-13 दि.26/07/2011 अन्वये मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात शासनाने धोरण निश्चित केले आहे. मोबाईल टॉवर प्रकरणी मिळकत कराची प्रकरण नस्ती व नोंदवही , कर निरीक्षकांचे मोबाईल टॉवर उभारण्यात आलेल्या ठिकाणाचा स्थळ पहाणी अहवाल व नोंदवही , त्याप्रमाणे तसेच विहीत पध्दतीनूसार मिळकत कर आकारणीचे देयक तयार होते किंवा कसे इ. अभिलेख.

11) मा.आयक्त, उल्हासनगर मनपा यांचे कार्यालयीन आदेश क्र .उमपा/करविभाग/195/13 दि.01/01/2014 अन्वये 'अ' प्रमाणे मासिक भाडे दरात सुधारणा केली आहे . तसेच 'ब' प्रमाणे वापरकर्ता प्रवर्गनिहाय कर आकारणी करणेचे आदेश आहे. तरी खालीलप्रमाणे कर आकारणी प्रकरणांची यादी व कर निर्धारण प्रकरणे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत . सबब, त्यांचे लेखापरीक्षण करता आले नाही.

a) उमपा क्षेत्रातील निवासी प्रकरणांची यादी व त्यांची कर निर्धारण प्रकरण नस्ती

b) उमपा क्षेत्रातील दुकाने कार्याल य व वाणिज्यीक वापर असलेल्या मिळकती यांची यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

c) उमपा क्षेत्रातील बियर बार / परमिट रुम यांची यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

d) विदेशी बँकाची यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

e) राष्ट्रीयकृत बँक, शेडयुल्ड बँक , मोबाईल टॉवर, सिनेमा हॉल/सिनेमागृह/नाटयगृह, खुले सिनेमागृह-रंगमंच, मल्टीप्लेक्स, मॉल, बँकेतर वित्तीय संस्थ , जीवन विमा योजना कार्यालय , जनरल विमा योजनेंतर्गत कार्यालये, व इतर ज्यांना भाडे नियंत्रण अधिनियमात संरक्षण नाही. अशी प्रकरणांची यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

f) सहकारी बँक, पतसंस्था यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

g) हॉटेल ( 3 व त्यापेक्षा अधिक तारांकीत हॉटेल) यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

h) स्वतंत्र बंगले यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

I) खाजगी हेल्थ क्लब,जिम्नॅशियम,शिकवणी वर्ग यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

j) दवाखाने, क्लिनीक, पॅथॉलाजी, नर्सिंग होम, हॉस्पिटल यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

k) फॅक्टरी/इंडस्ट्री ज्यांना फॅक्टरी ॲक्ट 1948 लागू आहे. यांचे यादी व कर निर्धारण प्रकरण नस्ती

l) महाराष्ट्र शासन क्र . आयटीपी 2003/सीआर/3311/इंड, मंत्रालय, मुंबई 32 दि.12/07/2003 महाराष्ट्र शासनाने आयटी/आयटीइएस योजना 2003 मधील परिशिष्ठ -4-6 या संस्थांच्या मिळकती तसेच ज्या संस्थामध्ये डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रिज महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र असलेल्या आयटी/आयटीइएस संस्थांच्या मिळकती यांचे यादी व प्रकरण नस्ती

m)नोंदणीकृत धर्मदाय / सार्वजनिक संस्था म्हणून नोंद असलेल्या मिळकतींची यादी व कर निर्धारण प्रकरणांची नस्ती

n) राज्य शासन / मनपा मालकीच्या मिळकतींची यादी व कर निर्धारण प्रकरणांची नस्ती

0) अनधिकृत व विनापरवाना मिळकतींची यादी व कर निर्धारण प्रकरणांची नस्ती

p)निवासी मिळकतींची यादी व कर निर्धारण प्रकरणांची नस्ती

## *101 उल्हासनगर मनपा अग्निशमन विभागांतर्गत सर्वसाधारण अभिप्राय...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,2006 चे कलम 25 अन्वये आग सुरक्षा निधी स्थापन करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशसे/1407/360/211 दि.31/08/2009 मधील परिच्छेद क्र.3 अन्वये सर्व मंजूर पदे तात्काळ भरून अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. उल्हासनगर मनपा महासभा ठराव क्र.26 दि.09/07/2012 अन्वये विविध व्यवसायाकरीता अग्निशमन दलाचा ना-हरकत दाखला घेणेकरीता कार्यवाही होत नसलेचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 13 अन्वये आकारण्यात आलेल्या किमान शुल्काच्या 1 टक्के दराने वार्षिक शुल्क आकारणे आवश्यक आहे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3(3) अन्वये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत ठेवलेचे प्रमाणपत्र परवानाधारक अभिकरणामार्फत भोगवटाधारकाने प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै महिन्यात मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा नामनिर्देशित अधिकारी यांच्याकडे सादर करणेची कार्यवाही होत नाही. बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत खाजगी रुग्णालयांना नोंदणी किंवा पुर्ननोंदणी देतांना अग्निशमन दलाकडून किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे परीपत्रक क्र.संआसे/ फायर सेफटी/ कक्ष 3/2011 दि.17/12/2011 नुसार बंधनकारक केले आहे. 12 रुग्णालयांनी अग्निशमन सुरक्षा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचे नमूद आहे.*** |

अग्निशमन विभाग,उल्हासनगर महानगरपालिका येथील लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .97 दि.14/09/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,2006 चे कलम 25 अन्वये आग सुरक्षा निधी स्थापन करणे आवश्यक आहे . तरी सदर अधिनियमानूसार उल्हासनगर मनपातर्फे आग सुरक्षा निधी स्थापन केला किंवा कसे व वित्तीय वर्ष 2014-15 अखेरपर्यंत जमा रक्कम किती? तसेच रोखवहीनूसार जमा होणे अपेक्षित रक्कम किती ? याबाबत आक्षेपाच्या प्राप्त अनुपालनात आग सुरक्षा निधी स्थापन करण्यात आला असून दि .01/04/2013 ते दि .31/03/2015 पर्यंत एकूण रक्कम

रु.4570940/- जमा करण्यात आली असल्याचे नमूद आहे . तसेच सोबत विवरणपत्र जोडले असल्याचे नमूद आहे. परंतू अनुपालनासोबत विवरणपत्र जोडले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

2) नगर विकास विभाग , शासन निर्णय क्र .अशसे/1407/360/211 दि.31/08/2009 मधील परिच्छेद क्र.3 अन्वये सर्व मंजूर पदे तात्काळ भरून अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवायचा आहे . उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.65 दि.08/09/2011 अन्वये अग्निशमन विभागात एकूण 60 फायरमनच्या मंजूर पदापैकी केवळ 18 पदे कार्यरत असून एकूण 42 पदे रिक्त आहेत . तरी अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवणेकरीता महानगरपालिकेकडून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3)उल्हासनगर मनपा महासभा ठराव क्र .26 दि.09/07/2012 अन्वये विविध व्यवसायाकरीता अग्निशमन दलाचा ना-हरकत दाखला घेणेकरीता प्रथमवेळी रु .1000/- व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी नुतनीकरणाकरीता रु.500/- इतके शुल्क आकारणे आवश्यक आहे . उल्हासनगर मनपा क्षेत्रात एकूण किती व्यवसाय कार्यरत आहेत ? याबाबतची माहीती अग्निशमन विभागाकडे उपलब्ध नसल्याने तशाप्रकारची माहीती मनपाच्या किंवा शासनाच्या संबंधित विभागाकडून प्राप्त् करून त्या त्या व्यवसाय मालकांकडे अग्निशमन दलाचा ना -हरकत दाखला घेणेबाबत नोटीस व तदनंतर नुतनीकरण करण्याकरीता नोटीस पाठवून त्यांच्याकडून येणे रक्कमांचा तपशिल वसुलपात्र ठरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही होत नसलेचे निदर्शनास आले आहे. याबाबत प्राप्त अनुपालनात स्थानिक संस्था कर विभागाकडून मनपा क्षेत्रातील व्यवसायांची माहीती प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद आहे.

4) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 13 अन्वये आकारण्यात आलेल्या किमान शुल्काच्या 1 टक्के दराने वार्षिक शुल्क आकारणे आवश्यक आहे . उल्हासनगर मनपा क्षेत्रातील एकूण किती इमारतींना अग्निशमन विभागाने ना -हरकत दाखला दिला आहे. तसेच त्यापैकी किती इमारतधारकांनी वार्षिक शुल्काची रक्कम मनपा खाती जमा के ली आहे? याबाबत अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने वार्षिक शुल्क भरणा न केलेल्या इमारतींचीकडून वसुलपात्र रक्कमेची पडताळणी करता आली नाही . याबाबत प्राप्त अनुपालनात एकूण 18 प्रकरणांची शुल्क रक्कम रु.7950/- वसूल केलेचे नमूद आहे. परंतू सदर माहीती अपुर्ण आहे.

5) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3(3) अन्वये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत ठेवलेचे प्रमाणपत्र परवानाधारक अभिकरणामार्फत भोगवटाधारकाने प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै महीन्यात मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा नामनिर्देशित अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतू याप्रमाणे प्रमाणपत्र संबंधित इमारतींकडून सादर करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे . याबाबतचे प्राप्त अनुपालन अपुर्ण आहे.

6) बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत खाजगी रुग्णा लयांना नोंदणी किंवा पुर्ननोंदणी देतांना अग्निशमन दलाकडून किंवा संचालक , महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेकडून ना -हरकत प्रमाणपत्र घेणे आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे परीपत्रक क्र.संआसे/फायर सेफटी/कक्ष 3/2011 दि.17/12/2011 नुसार बंधनकारक केले आहे . तरी उल्हा सनगर मनपा क्षेत्रात एकूण किती खाजगी रुग्णालये अस्तित्वात आहेत ? त्यापैकी किती रुग्णालयांनी अग्निशमन विभागाचे ना -हरकत प्रमाणपत्र घेतले किंवा कसे , याबाबतची एकत्रित माहीती अग्निशमन विभागाकडे नसल्याचे निदर्शनास आले आहे .

उल्हासनगर मनपा आरोग्य विभागाकडे किंवा स्था निक संस्था कर नियम 2010 नियम 10(1) अन्वये मनपा क्षेत्रातील व्यवसायाची नोंद करणे बंधनकारक आहे . संबंधित विभागाकडून खाजगी रुग्णालयांची माहीती प्राप्त् करून ना -हरकत प्रमाणपत्र न घेतलेल्या रुग्णालयांना नोटीस पाठवून ना -हरकत प्रमाणपत्र घेणेबाबत सुचित करणे शक्य आहे. याबाबतच्या प्राप्त अनुपालन व अनुपालनासोबतच्या विवरणपत्रात उल्हासनगर मनपा क्षेत्रात एकूण 78 खाजगी रुग्णालये असून त्यापैकी 11 रुग्णालये बंद आहेत व 12 रुग्णालयांनी अग्निशमन सुरक्षा विभागाचे ना -हरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचे नमूद आहे. तरी शासन परिपत्रकानूसार काय्रवाही होणे आवश्यक आहे.

DATPVWM7501 (Ref No : 71, Hmm No : 97)

## *102 नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तीवर मात करण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे खरेदी करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2471860.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 280256.00/-

***खरेदी केलेल्या साहित्यांची अंदाजित रक्कम कशाच्या आधारे निश्चित करण्यात आली आहे, याबाबतचे अभिलेख नस्तीत आढळून आले नाही. शासनाचे कोणतेही आधारभुत दर नसल्यास निविदा प्रक्रिया बी-2 पध्दतीने दरपत्रके मागवून राबविणे आवश्यक असतांना बी-1 पध्दतीने राबविली आहे. पुरवठादार मे.श्रीकृष्ण ॲग्रो इक्विपमेंट प्रायव्हेट लि.,पुणे यांचेसोबत शासनाने दरकरार केलेबाबत किंवा ते नामनिर्देशित शासकीय कंत्राटदार असलेबाबत कोणतेही अभिलेख नस्तीत आढळून आले नाही. खरेदीच्या अनुषंगाने जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी दिलेबाबत अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही. मुल्यवर्धित कराची रक्कम रु.280256/- शासनाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांची स्वाक्षरी नाही.***

कामाचे नाव- आपत्ती व्यवस्थापन कक्षाकरीता साहीत्य खरेदी करणे

प्रशासकीय मान्यता क्र.-स्थायी समिती ठराव क्र.17 दि.01/08/2014

कार्यादेश क्र. उमपा/284/14 दि.13/08/2014

पुरवठादाराचे नाव- श्रीकृष्ण ॲग्रो इक्विपमेंट प्रायव्हेट लि.,पुणे

कालावधी- एक महीना

अंदाजपत्रकीय रक्कम रु.2534981/-

निविदाकाराची रक्कम रु.2522306/-(-0.5%)

प्रमाणक क्र.3078 दि.21/11/2014 रक्कम रु.2471860/-

उपरोक्त कामाबाबत निविदा नस्ती व देयकाच्या स्थळ प्रतीच्या नस्तीची तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.98 दि.14/09/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)उपरोक्त खरेदीकरीता खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | खरेदी करावयाच्या वस्तुचा तपशिल | नग | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | हायड्रॉलिक रॉक स्प्लिटर मॉडेल एस -36 विथ रोटरी हॅमर ड्रील मशिन | 1 | 1108244 |
| 2 | हायड्रॉलिक पौवर पॅक | 1 | 346000 |
| 3 | दहा मिटर लांबीचे दोन होस पाईप | 1 | 26750 |
| 4 | काँक्रिट क्रशर एससीसी 20 | 1 | 757237 |
| 5 | एअर व्हेंटिलेटरकरीता डिझेल इंजिन | 1 | 296750 |
| | अंदाजपत्रकीय एकूण रक्कम रुपये | | 2534981 |

वरीलप्रमाणे वस्तुनिहाय अंदाजित रक्कम कशाच्या आधारे निश्चित करण्यात आली आहे, याबाबतचे अभिलेख नस्तीत आढळून आले नाही व त्यां वस्तुंकरीता शासनाने निश्चित केलेले दराबाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आले नाही. शासनाचे कोणतेही आधारभुत दर नसल्यास निविदा प्रक्रिया बी-2 दरपत्रके मागवून राबविणे आवश्यक असतांना बी-1 पध्दतीने राबविली आहे.

2) महसुल व वनविभाग(मदत व पुर्नवसन), शासन निर्णय क्र.आव्यप्र-2012/प्र.क्र.111/आव्यप्र-1 मंत्रालय दि.07/12/2013 मधील क्र.5 नूसार साधन सामग्री खरेदी करतांना शासकीय दरकरारानूसार नामनिर्देशित शासकीय कंत्राटदारांकडून खरेदी करावी,असे नमूद आहे.परंतू पुरवठादार मे.श्रीकृष्ण ॲग्रो इक्विपमेंट प्रायव्हेट लि.,पुणे यांचेसोबत शासनाने दरकरार केलेबाबत किंवा ते नामनिर्देशित शासकीय कंत्राटदार असलेबाबत कोणतेही अभिलेख नस्तीत आढळून आले नाही.यामुळे शासन निर्णयानूसार खरेदीची कार्यवाही झाली असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) विभागाचे पत्र क्र.238/13 दि.24/12/2013 अन्वये जनसंपर्क विभाग,उल्हासनगर मनपा यांना उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने जाहीरात वर्तमानपत्रात देणेबाबत कळविले आहे.परंतू जनसंपर्क विभागाने याबाबत जाहीरात कोणत्या वर्तमानपत्रात दिली किंवा कसे तसेच त्या वर्तमानपत्राची प्रत नस्तीत आढळून आलेली नाही. त्यामुळे जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी दिलेबाबत पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील कलम 41 नूसार खरेदी करण्यात आलेल्या वस्तुचा

उपयोग लोकांच्या फायदयाकरीता होणार असल्यास शासन सदर वस्तुंवर आकारलेला मुल्यवर्धित कर परतावा करीन,अशी तरतुद आहे.सदर साहित्यांचा उपयोग विभागामार्फत (सार्वजनिक) कार्यासाठी करण्यात येणार असल्याने यामध्ये कोणताही लाभ मिळविण्याचा उददेश नसल्याने मुल्यवर्धित कराची रक्कम रु.280256/- शासनाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. याबाबतच्या प्राप्त अनुपालनात प्रतिपुर्तीची कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद आहे.

5) तयार करण्यात आलेल्या करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक असतांना सदस्यांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आले आहे.

DATPVWM7501 (Ref No : 72, Hmm No : 98)

## *103 प्रभाग कार्यालय क्र.1 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 2300.00/-

***पावती पुस्तकांची साठा नोंदवही व चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नाही. पावती क्र.34955 दि.13/06/2014 अन्वये रु.150/- इतकी रक्कम जमा केली आहे. परंतू मुख्यालयात (रोखवहीनूसार) रक्कम रु.50/-भरणा केली आहे. पावतीनूसार जमा रक्कम रु.1950/- मुख्यालयातील लेखा विभागात जमा केलेचे चलन लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही व तशी नोंद रोखवहीवरदेखील नोंदविण्यात आलेली नाही. तसेच पावती क्र.34943 दि.30/05/2014 अन्वये रक्कम रु.250/- मुख्यालयात जमा केलेबाबत चलन तपासणीकरीता प्राप्त झाले नाही. विवाह नोंदणीची रक्कम शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रभाग कार्यालयाकडील प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात येत नाही. जमा रक्कम विलंबाने भरणा करण्यात आली आहे. माहे जानेवारी 2015 पासून नवीन रोखवही वापरात असल्याने अगोदरच्या रोखवहीत माहे डिसेंबर 2014 अखेरपर्यंत नोंद घेणे आवश्यक असतांना दि.29/11/2014 पर्यंत नोंद घेण्यात आली आहे. माहे जानेवारी 2015 पासून नवीन रोखवही चालू केली असून त्यामध्ये दि.12/08/2015 पासून नोंदी नोंदविण्यात आल्या आहेत.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.1 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेंच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .108 दि.15/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली होती, किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही. तसेच प्रभाग कार्यालय स्तरावरील जमा रक्कम मुख्यालयात जमा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत.

2) प्रभाग समिती क्र.1 अंतर्गत 2014-15 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 26 अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली आहेत. याबाबत निष्कासनाची नोंदवही तपासली असतां निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही.

3) प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत असल्याचे नि दर्शनास आले आहे. पावती क्र.34901 अन्वये रक्कम रु.500/- जमा केलेची रोखवहीत नोंद आहे. परंतू पावतीची स्थळ प्रत लेखापरीक्षणास प्राप्त झाली नसल्याने पावतीवरील रक्कमे बाबतची पडताळणी करता आली नाही. पावती क्र.34955 दि.13/06/2014 अन्वये रु.150/- इतकी रक्कम जमा केली आहे. परंतू मुख्यालयात ( रोखवहीनूसार) रक्कम रु.50/-भरणा केली आहे. खालीलप्रमाणे पावतीनूसार जमा रक्कम रु.1950/- मुख्यालयातील लेखा विभागात जमा केलेचे चलन लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही व तशी नोंद रोखवहीवरदेखील नोंदविण्यात आलेली नाही. तसेच पावती क्र.34943 दि.30/05/2014 अन्वये रक्कम रु.250/- मुख्यालयात जमा केलेबाबत चलन तपासणीकरीता प्राप्त झाले नाही.

| अ.क्र. | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 34913 | 14/02/2014 | 250 |
| 2 | 34914 | 17/02/2014 | 250 |
| 3 | 34915 | 17/02/2014 | 250 |
| 4 | 34916 | 17/02/2014 | 150 |
| 5 | 34917 | 20/02/2014 | 50 |
| 6 | 34918 | 21/02/2014 | 1000 |
| | | एकूण रक्कम रुपये | 1950 |

4) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील कलम 14 नूसार विवाह नोंदणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तपासणी करता आली नाही. माहे मार्च 2015 मध्ये विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

5) प्रभाग कार्यालयात जमा झालेली विवाह नोंदणीची रक्कम मुख्यालयातील लेखा विभागात रोखपालाकडे भरणा केल्यानंतर शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत . त्यामुळे सदर रक्कम शासनाकडे जमा केल्याची पडताळणी करता आली नाही.

6) मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्राकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र संगणकावर नोंदविण्यात येतात . परंतू नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रभाग कार्यालयाकडील प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

7) प्रभाग कार्यालय स्तरावर जमा रक्कम त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी मुख्यालयातील रोखपालाकडे भरणा

करणे आवश्यक असतांना खालीलप्रमाणे रक्कम रु .800/- दि.10/05/2016 रोजी विलंबाने भरणा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पावती क्रमांक | पावती दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 34993 | 20/10/2014 | 50 |
| 2 | 34994 | 21/10/2014 | 250 |
| 3 | 34995 | 01/11/2014 | 50 |
| 4 | 34996 | 25/11/2014 | 50 |
| 5 | 34997 | 26/11/2014 | 50 |
| 6 | 34998 | 26/11/2014 | 50 |
| 7 | 34999 | 28/11/2014 | 250 |
| 8 | 35000 | 29/11/2014 | 50 |
| | | एकूण रक्कम रुपये | 800/- |

8) माहे जानेवारी 2015 पासून नवीन रोखवही वापरात असल्याने अगोदरच्या रोखवहीत माहे डिसेंबर 2014 अखेरपर्यंत नोंद घेणे आवश्यक असतांना दि .29/11/2014 पर्यंत नोंद घेण्यात आली आहे . माहे जानेवारी 2015 पासून नवीन रोखवही चालू केली असून त्यामध्ये दि.12/08/2015 पासून नोंदी नोंदविण्यात आल्या आहेत.

DATPVWM7501 (Ref No : 73, Hmm No : 108)

## *104 प्रभाग कार्यालय क्र.2 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत आहे. माहे मार्च 2015 नऊ प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. विवाह नोंदणीची रक्कम शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र .2 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता

निदर्शनास आलेल्या अनियमिततेंच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.109 दि.15/10/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रभाग समिती क्र.2 अंतर्गत 2014-15 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 31 अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली आहेत . याबाबत निष्कासनाची नोंदवही तपासली असतां निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही . तसेच सदर खर्चाची मागणी देखील संबंधिताकडून वसूल करण्यात आलेली नाही. याबाबतच्या प्राप्त अनुपालना वसुलीच्या अनुषंगाने कार्यवाही चालू असल्याचे नमूद आहे.

2) प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे . पावती क्र.145301 ची स्थळ प्रत रक्कम रु.60/- लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

3) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील कलम 14 नूसार विवाह नोंदणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे . सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. माहे मार्च 2015 नऊ प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

4) प्रभाग कार्यालयात जमा झालेली विवाह नोंदणीची रक्कम लेखा विभागात रोखपालाकडे भरणा केल्यानंतर शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत . त्यामुळे जमा रक्कम शासन जमा केलेची पडताळ णी करता आली नाही . याबाबत प्राप्त अनुपालनात सदर आक्षेप मुख्यालय लेखा विभागाशी संबंधित असल्याचे नमूद केले आहे.

5) मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्राकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र संगणकावर नोंदविण्यात येतात . परंतू नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्र करणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे . याबाबत प्राप्त अनुपालनात आक्षेपाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद आहे.

DATPVWM7501 (Ref No : 74, Hmm No : 109)

## *105 प्रभाग कार्यालय क्र.3 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

| |
|---|
| ***पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. निष्कासना करीता मनपाकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. दि.28/02/2013 ते दि.14/07/2013 ,*** |

***दि.16/07/2013 ते दि.11/08/2013, दि.13/08/2013 ते दि.30/08/2013, दि.01/09/2013 ते दि.06/10/2013 व दि.08/10/2013 ते दि.29/10/2013 या कालावधीत रोखवही नोंदविली नसल्याचे निदर्शनास आले आहे. पावती पुस्तक क्र.917 व 743 लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही. जमा रक्कम विलंबाने भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे. विवाह नोंदणी शुल्काची रक्कम शासनाकडे भरणा केल्याची पडताळणी अभिलेख्याअभावी करता आली नाही. नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका प्र भाग समिती क्र .3 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेंच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.110 दि.15/10/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पावती पुस्तकांची साठा नोंदवही ले खापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली होती, किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

2) 2014-15 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 34 अनधिकृत बांधकामे प्रभाग कार्यालय क्र .3 कडून निष्कासित करण्यात आली आहेत . याबाबत निष्कासनाची नोंदवही तपासली असतां निष्कासना करीता महानगरपालिकेकडून झालेल्या खर्चाची परीगणना व वसुली प्रभाग कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही.

3) प्रभाग कार्यालयात राष्ट्रीय लेखा संहिता नियम 5.3 नूसार विहित नमून्यात रोखवही ठेवण्यात आली नसून एका साध्या नोंदवहीत नोंदी ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे . पावती पुस्तक क्र.917 व 743 लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही . प्रभाग कार्यालय स्त रावर जमा रक्कम त्याच दिवशी किंवा दुस -या दिवशी मुख्यालयातील रोखपालाकडे भरणा करणे आवश्यक असतांना खालीलप्रमाणे रक्कम विलंबाने भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे.

| अ.क्र. | पावती क्रमांक | पावती दिनांक | लेखा विभागात रक्कम भरणा केल्याचा दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 155151 | 29/10/2013 | 15/06/2015 | 24/- |
| 2 | 155152 व 155153 | 30/10/2013 | 15/06/2015 | 5260/- |
| 3 | 155154 | 31/10/2013 | 15/06/2015 | 1000/- |
| 4 | 155155 | 16/11/2013 | 15/06/2015 | 1000/- |
| 5 | 155156 | 21/11/2013 | 15/06/2015 | 1000/- |
| 6 | 155157 व 155158 | 26/11/2013 | 15/06/2015 | 252/- |
| 7 | 155159 | 29/11/2013 | 15/06/2015 | 500/- |
| 8 | 155160 | 07/12/2013 | 15/06/2015 | 6/- |
| 9 | 155161 | 13/12/2013 | 15/06/2015 | 12/- |
| 10 | 155162 | 28/02/2014 | 15/06/2015 | 2/- |
| 11 | 155163 | 03/03/2014 | 15/06/2015 | 500/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | 155164 | 06/03/2014 | 15/06/2015 | 500/- |
| 13 | 155165 | 04/05/2014 | 15/06/2015 | 3000/- |
| 14 | 155166 | 05/08/2014 | 15/06/2015 | 44/- |
| 15 | 155167 | 00/09/2014 | 15/06/2015 | 250/- |
| 16 | 155168 | 06/12/2014 | 15/06/2015 | 250/- |
| 17 | 155101 ते 155104 | 20/05/2013 | 18/07/2013 | 584/- |
| 18 | 155105 ते 155109 | 04/06/2013 | 18/07/2013 | 850/- |
| 19 | 155110 ते 155112 | 06/06/2013 | 18/07/2013 | 550/- |
| 20 | 155113 | 07/06/2013 | 18/07/2013 | 250/- |
| 21 | 155114 | 10/06/2013 | 12/08/2013 | 250/- |
| 22 | 155115 | 11/06/2013 | 12/08/2013 | 250/- |
| 23 | 155116 व 155117 | 19/06/2013 | 12/08/2013 | 100/- |
| 24 | 155118 ते 155120 | 25/06/2013 | 12/08/2013 | 350/- |
| 25 | 155121 ते 155124 | 28/06/2013 | 12/08/2013 | 600/- |
| 26 | 155125 व 155126 | 29/06/2013 | 12/08/2013 | 500/- |
| 27 | 155127 ते 155131 | 26/07/2013 | 31/08/2013 | 550/- |
| 28 | 155132 | 19/09/2013 | 08/10/2013 | 500/- |
| 29 | 155133 | निरंक | 08/10/2013 | 250/- |
| 30 | 155134 ते 155135 | 26/09/2013 | 08/10/2013 | 750/- |
| 31 | 155136 | 27/09/2013 | 08/10/2013 | 250/- |
| 32 | 155137 ते 155139 | 04/10/2013 | 08/10/2013 | 350/- |
| 33 | 155140 ते 155144 | 05/10/2013 | 08/10/2013 | 850/- |
| 34 | 155145 | 08/10/2013 | 30/10/2013 | 250/- |
| 35 | 155146 | 15/10/2013 | 30/10/2013 | 8/- |
| 36 | 155147 व 155148 | 19/10/2013 | 30/10/2013 | 258/- |
| 37 | 155149 व 155150 | 29/10/2013 | 30/10/2013 | 500/- |

4) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील कलम 14 नूसार विवाह नोंदणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे . सदर नोंदवही तपासली असता दि .07/08/2013 नंतर विवाह नोंदणी प्रकरणांची नोंद घेण्यात आलेली ना ही. विवाह नोंदणीची मार्च 2015 मधील 5 प्रकरणे विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

5) प्रभाग कार्यालयात जमा झालेली विवाह नोंदणीची रक्कम लेखा विभागात रोखपालाकडे भरणा केल्यानंतर शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्रा प्त झाल्या नाहीत . त्यामुळे विवाह नोंदणी शुल्काची रक्कम शासनाकडे भरणा केल्याची पडताळणी करता आली नाही.

6) मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्राकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र संगणकावर नोंदविण्यात येतात . परंतू नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणां चा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

## *106 प्रभाग कार्यालय क्र.4 अंतर्गत लेख्यांतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***प्राप्त व वापरलेल्या पावती पुस्तकांचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनाकरीता आलेल्या खर्चाची वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे नमूद केले आहे. माहे मार्च 2015 मधील श्री.विनित वानखेडे व श्री. अमित मसंद यांची विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. विवाह नोंदणीची रक्कम शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.4 मधील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र .111 दि.15/10/2016 रोजी दिले असता प्राप्त अनुपालन तपासून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली असून सदर नोंदवहीत माहे एप्रिल 2015 पासून प्राप्त पावती पुस्तकांची नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे 2013-14 व 2014-15 वर्षात प्राप्त व वापरलेल्या पावती पुस्तकांचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात किती साठा पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली होती, किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही. याबाबतच्या प्राप्त अनुपालनात पावती पुस्तकांच्या नोंदी पावती पुस्तके साठा नोंदवहीत घेण्यात येत असल्याचे नमूद आहे.

2) प्रभाग समिती क्र.4 अंतर्गत 2014-15 या वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकूण 57 अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली आहेत. परंतू अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनाकरीता आलेल्या खर्चाची वसुली करण्यात आली नाही. याबाबतच्या प्राप्त अनुपालनात निष्कासन केलेल्या अनधिकृत बांधकामांना परिगणनाबाबत नोटीस बजावण्यात आल्या असल्याचे , सहा जणांकडून रक्कम रु .69000/- वसुल केल्याचे व उर्वरीत जणांकडून वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे नमूद केले आहे.

3) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील कलम 14 नूसार विवाह नोंदणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे . माहे मार्च 2015 मधील श्री.विनित वानखेडे व श्री . अमित मसंद यांची विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

5) 2014-15 वित्तीय वर्षात प्रभाग कार्यालयात जमा झालेली रोखवहीनूसार विवाह नोंदणीची लेखा विभागात रोखपालाकडे भरणा केल्यानंतर शासन निधीत भरणा केलेबाबत चलनाच्या प्रती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. याबाबत लेखा विभागाकडून अहवाल प्राप्त होवू शकेल, असे अनुपालनात नमूद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्राकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र संगणकावर नोंदविण्यात येतात . परंतू नागरी सुविधा केंद्राकडील नोंदणी केलेल्या विवाह प्रकरणांचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने विवाह प्रकरणांचा ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे . याबाबतच्या प्राप्त अनुपालनात येथून पुढे याप्रमाणे कार्यवाही होणार असल्याचे नमूद आहे.

DATPVWM7501 (Ref No : 76, Hmm No : 111)

## *107 अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील जमा रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाली नाही. कार्यवाहीत जप्त केलेल्या मालाची/सामानाची नोंदवही लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाली नाही. पदपथ विभागाकडून मार्च 2015 मध्ये एकूण रक्कम रु.10000/- वसूल केली असतांना अंदाजपत्रकात निरंक रक्कम दर्शविली आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेतील अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.157 दि.29/11/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे . सबब,खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून घेण्यात आली? किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला? व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत ? याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) पदपथ विभागाकडून केलेल्या कार्यवाहीत जप्त केलेल्या मालाची /सामानाची नोंदवही

लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाली नाही.
3) 2014-15 या कालावधीत पदपथ विभागाकडून एकूण किती रोखवही वापरात होत्या ? याबाबत अभिलेख अप्राप्त आहे.
4) पदपथ विभागाकडून मार्च 2015 मध्ये एकूण रक्कम रु .10000/- वसूल केली असतांना अंदाजपत्रकात निरंक रक्कम दर्शविली आहे.

DATPVWM7501 (Ref No : 84, Hmm No : 157)

## *108 अनाधिकृत बांधकामांच्या निष्कासना करीता महानगरपालिकेने केलेला खर्च संबंधिताकडून वसूल केला नसल्याबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2014-15 या वित्तीय वर्षात एकूण 145 अनधिकृत बांधकामांचे निष्कासन केलेल्या अनधिकृत बांधकामांच्या मालकांकडून निष्कासनाचा खर्च वसूल केलेला नाही.***

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधिल कलम 260 (2) नुसार अनाधिकृत इमारतीच्या बाबतीत सदर इमारत किंवा काम काढून टाकण्यांत येऊ नये. त्यात फेरफार करण्यात येऊ नये किंवा काम पाडण्यात येऊ नये याबाबत आयुक्तांची खात्री होईल अशा रीतीने कारण दाखविण्यात जर अशी व्यक्ती कसूर करील तर आयुक्तांस इमारत काढून टाकता येईल. त्यात फेरफार करता येतील किवा ते पाडता येईल आणि त्याचा खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे अशी तरतूद आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 264(4) पोटकलम 3 अन्वये धोकादायक बांधकामाच्या निष्कासनाचा खर्च इमारत मालक/भोगवटादाराने दिला पाहिजे अशी तरतूद आहे. तसेच उल्हासनगर महापालिका आयुक्तांचे आदेश क्र.उमपा/अवानिवी/अतिक्रमण/196/2001 दिनांक 30/10/2001 उल्हासनगर महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागाकडून अनधिकृत बांधकाम निष्कासित करतांना होणारा खर्च 1 (प्रती) चौरस फूट चटई क्षेत्राचे बांधकामास रु. 63/- या प्रमाणे अनधिकृत बांधकाम कर्त्याकडून वसूल करण्यात यावेत असे नमूद करण्यात आले आहे. सन 2013-2014 व 2014-15 या वित्तीय वर्षात एकूण 145 अनधिकृत बांधकामांचे निष्कासन महानगरपालिकेने केल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु सदर अनधिकृत बांधकामांच्या मालकांकडून निष्कासनाचा खर्च वसूल झाला नसल्याने वसूल होणे आवश्यक आहे.
उपरोक्तबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.158 दि.29/11/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.

DATPVWM7501 (Ref No : 85, Hmm No : 158)

## *109 अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ङ*

***अतिक्रमण व पदपथ विभागातील अनधिकृत बांधकामांची संख्या, त्याचे सर्वेक्षण कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांनी केले त्यांच्या दैनंदिनी अहवालासह अनधिकृत बांधकामे पाडल्याचे कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत. बांधकामे निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे, बांधकामे निष्कासित करतांना निरुपयोगी साहित्य निघाल्याची जमा नोंद व त्यांचा लिलावाद्वारे केलेल्या विक्रीची कागदपत्रे, धोकादायक इमारतींची संख्या इ.बाबत अभिलेख अप्राप्त आहे.***

उल्हासनगर महानगरपालिकेचे अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागातील अभिलेखाचे लेखापरीक्षण करणेसाठी अर्धसमास ज्ञापन क्र.159 दि.29/11/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. तसेच खालील अभिलेख उपलब्ध झालेले नाहीत.

1) सन 2014-15 अखेर एकूण किती अनधिकृत बांधकामे आहेत. त्याचे सर्वेक्षण कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांनी केले त्यांच्या दैनंदिनी अहवालासह अनधिकृत बांधकामे पाडल्याचे कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत.

2) बांधकामे निष्कासित करणेसाठी मंजुरी मागितली व विभागाने दिलेल्या मंजुरीचे आदेश व त्यानुसार निष्कासनाबाबत केलेल्या कार्यवाहीचे पंचनामे, फोटो अभिलेख उपलब्ध झाले नाहीत.

3) अनाधिकृत बांधकामे निष्कासित करतांना निरुपयोगी साहित्य निघाल्याची जमा नोंद ठेवली नसल्याचे दिसून आहे व लिलावाद्वारे केलेल्या विक्रीची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

4) अनाधिकृत बांधकामे निष्कासित करणेसाठी आयुक्त यांचे पत्र क्र.उमपा/अबांनिवि/अतिक्रमण/ 196 /2001 दि. 30/10/2001 चे आदेश आहेत. त्यामध्ये प्रति चौरस फुट रु.63/- दर असून महानगर पालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी दर सुधारीत करणे आवश्यक आहे.

5) उल्हासनगर मनपा क्षेत्रातील धोकादायक इमारतींची संख्या इ.बाबत अभिलेख अप्राप्त आहे. त्याबाबत मनपाने पुढील काय कार्यवाही केली याबाबतची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

DATPVWM7501 (Ref No : 86, Hmm No : 159)

## *110 नगररचना विभागातील जमा होणा-या रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1992955.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 55000.00/-

***नगररचना विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाली नाही. पावती पुस्तक क्र.1906 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही. उल्हासनगर मनपा अंतर्गत नोंदणीकृत एकूण किती वास्तुशिल्पकार/स्थापत्य अभियंता आहेत? त्यांनी परवान्याचे नुतनीकरण केले किंवा कसे? तसेच नुतनीकरण केले नसल्यास नुतनीकरणापोटी एकूण किती रक्कम वसुलपात्र आहे? इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाहीत. श्री. दौलत कोटवानी, वास्तुविशारद यांचेकडून परवाना नुतनीकरणाची रक्कम रु.30000/- वसुलपात्र आहे. विकासकांनी धनाकर्षाद्वारे जमा केलेल्या रक्कमेची मनपा खाती जमा झाली किंवा कसे याबाबत बँकेच्या पासबुक/ विवरणपत्राअभावी पडताळणी करता आलेली नाही. प्रतीपुर्ती ठेवीची रक्कम रु.25000/- वसुल करणे आवश्यक आहे.***

नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका विभागांतर्गत नविन इमारत बांधकामास मंजूरी देण्यात येते. मंजूरीच्या अनुषंगाने विकासकाकडून जमीन विकास शुल्क, निवासी/वाणिज्य इमारतीकरीता विकास शुल्क, उपकर, स्थानिक संस्था कर, जीना/लिफट अधिमुल्य शुल्क इत्यादीच्या अनुषंगाने रक्कम आकारण्यात /जमा करण्यात येतात. याबाबतचे लेखे तपासले असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.185 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे. सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नगररचना विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून प्राप्त झाली? किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला? व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत? याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) पावती पुस्तक क्र.1906 लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाले नाही.

3) उल्हासनगर मनपा ठराव क्र.26 दि.09/07/2012 अन्वये अभियंता/पर्यवेक्षक परवाना रु.10000/- इतके शुल्क आकारून देण्यात येतो. तसेच सदर परवान्याचे नुतनीकरण रक्कम रु.10000/- आकारून करण्यात येते. उल्हासनगर मनपा अंतर्गत नोंदणीकृत एकूण किती वास्तुशिल्पकार /स्थापत्य अभियंता आहेत? त्यांनी परवान्याचे नुतनीकरण केले किंवा कसे? तसेच नुतनीकरण केले नसल्यास नुतनीकरणापोटी एकूण किती रक्कम वसुलपात्र आहे? इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाहीत.

4) पावती क्र.163652 दि.14/08/2014 अन्वये श्री. दौलत कोटवानी यांचेकडून दि .01/01/2008 ते दि.31/12/2014 या 7 वर्षाकरीता रक्कम रु .40000/- स्विकारून वास्तुशिल्पकार परवान्याचे नुतनीकरण केले आहे . उल्हासनगर मनपा ठराव क्र .26 दि.09/07/2012 अन्वये अभियंता/पर्यवेक्षक यांचा वैध परवाना रु .10000/- इतके शुल्क आकारून देण्यात येते . तसेच सदर परवान्याचे नुतनीकरणदेखील रक्कम रु.10000/- आकारून करण्यात येते. असे असतांना सात वर्षाकरीता एकूण रक्कम रु.70000/- स्विकारणे अपेक्षित असताना रक्कम रु .40000/- आकारल्याने केल्याने फरकाची रक्कम रु .30000/- वसुलपात्र आहे . तसेच दि .01/01/2008 पासूनचे नुतनीकरण विलंबाने दि.14/08/2014 रोजी नुतनीकरण शुल्क आकारून कोणत्या नियमा नूसार करण्यात आले ? विलंबाने नुतनीकरण करतांना कोणतीही दंडात्मक कार्यवाही अनुसरलेली नाही.

5) विकासकांनी खालीलप्रमाणे रक्कम धनाकर्षाद्वारे नगररचना विभागाकडे जमा केल्याचे व नगररचना विभागाने मनपाच्या लेखा विभागाकडे जमा केल्याचे दिसून येते . परंतू धनाकर्षाची सदर रक्कम मनपा खाती जमा झाली किंवा कसे याबाबत बँकेच्या पासबुक / विवरणपत्राअभावी पडताळणी करता आलेली नाही . तसेच नगररचना विभागाकडून लेखा विभागाकडे धनाकर्षाद्वारे जमा केलेल्या रक्कमेचा ताळमेळ घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे . तरी उदाहरणादाखल खालीलप्रमाणे विकासकांनी जमा केलेल्या रक्कमा मनपा खाती जमा झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

| अ.क्र. | विकासकाचे नाव | पावती क्रमांक | धनाकर्ष क्रमांक व दिनांक | धनाकर्षावरील बँकेचे नाव | धनाकर्षावरील रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्हैयालाल लुंड | 163669 | 85604/21-10-14 | इंडियन बँक | 16924/- |
| 2 | कन्हैयालाल लुंड | 163670 | 85605/21-10-14 | इंडियन बँक | 3000/- |
| 3 | कन्हैयालाल लुंड | 163671 | 85605/21-10-14 | इंडियन बँक | 5000/- |
| 4 | कन्हैयालाल लुंड | 163672 | 85605/21-10-14 | इंडियन बँक | 6100/- |
| 5 | सुनिता सु.बागडे | 163680 | 9875/20-11-14 | ICICI | 53367/- |
| 6 | सुनिता सु.बागडे | 163681 | 9876/20-11-14 | ICICI | 4000/- |
| 7 | सुनिता सु.बागडे | 163682 | 9876/20-11-14 | ICICI | 5000/- |
| 8 | सुनिता सु.बागडे | 163683 | 9876/20-11-14 | ICICI | 19314/- |
| 9 | कमला नागदेव | 190509 | 251692/02-03-15 | बँक ऑफ बडोदा | 43950/- |
| 10 | कमला नागदेव | 190510 | 251691/02-03-15 | बँक ऑफ बडोदा | 4000/- |
| 11 | कमला नागदेव | 190511 | 251694/02-03-15 | बँक ऑफ बडोदा | 5000/- |
| 12 | कमला नागदेव | 190512 | 251693/02-03-15 | बँक ऑफ बडोदा | 11200/- |
| 13 | महिंद्र शांडिल्य | 190513 | 739016/02-03-15 | बँक ऑफ बडोदा | 83236/- |
| 14 | महिंद्र शांडिल्य | 190514 | 739015/02-03-15 | बँक ऑफ इंडिया | 4000/- |
| 15 | महिंद्र शांडिल्य | 190515 | 739015/02-03-15 | बँक ऑफ इंडिया | 5000/- |
| 16 | महिंद्र शांडिल्य | 190516 | 739015/02-03-15 | बँक ऑफ इंडिया | 19650/- |
| 17 | लक्ष्मण चालरामानी | 190517 | 715076/02-03-15 | कॉर्पोरेशन बँक | 73938/- |
| 18 | लक्ष्मण चालरामानी | 190518 | 715078/02-03-15 | कॉर्पोरेशन बँक | 1585643/- |
| 19 | लक्ष्मण चालरामानी | 190519 | 715078/02-03-15 | कॉर्पोरेशन बँक | 4000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 20 | लक्ष्मण चालरामानी | 190520 | 715078/02-03-15 | कॉर्पोरेशन बँक | 5000/- |
| 21 | लक्ष्मण चालरामानी | 190521 | 715078/02-03-15 | कॉर्पोरेशन बँक | 35633/- |
| | | | | एकूण रक्कम रु. | 1992955/- |

6) उल्हासनगर मनपा ठराव क्र.42 दि.02/12/2008 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन 12 ते 18 नोंव्हेंबर 2009 नूसार प्रसिध्द केलेनूसार महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26(1) अन्वये प्रतिपुर्ती ठेव आकारणी रक्कम रु.20/- प्रती चौ.मी. किंवा कमीतकमी रक्कम रु.10000/- आकारणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. उदाहरणादाखल खालीलप्रमाणे प्रकरणांत कमी प्रतीपुर्ती ठेवीची रक्कम जमा केल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत रक्कम रु.25000/- वसुल करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | विकासकाचे नाव | पावती क्र. | धनाकर्ष क्र. व दिनांक | धनाकर्षाची बँक | जमा प्रतीपुर्ती ठेवीची रक्कम | जमा होणे आवश्यक प्रतीपुर्ती ठेवीची रक्कम रुपये | फरकाची वसुलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्हैयालाल लुंड | 163671 | 85605/ 21-10-14 | इंडियन बँक | 5000/- | 10000/- | 5000/- |
| 2 | सुनिता सु.बागडे | 163682 | 9876/ 20-11-14 | ICICI | 5000/- | 10000/- | 5000/- |
| 3 | कमला नागदेव | 190511 | 251694/ 02-03-15 | बँक ऑफ बडोदा | 5000/- | 10000/- | 5000/- |
| 4 | महिंद्र शांडिल्य | 190515 | 739015/ 02-03-15 | बँक ऑफ इंडिया | 5000/- | 10000/- | 5000/- |
| 5 | लक्ष्मण चालरामानी | 190520 | 715078/ 02-03-15 | कॉर्पोरेशन बँक | 5000/- | 10000/- | 5000/- |
| | | | | | | | 25000/- |

DATPVWM7501 (Ref No : 87, Hmm No : 185)

## *111 नगररचना विभागातील सर्वसाधारण अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 601572.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 500869.00/-

***अधिमुल्य शुल्काची रक्कम रेडीरेकनरमधील दराच्या दिडपटनुसार आकारणी करून वसुल करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे जोता तपासणी रक्कम मनपाकडे जमा केलेबाबत अभिलेख नस्तीत नाहीत. जोता तपासणी केल्याचे स्थळ पहाणी अहवालावर जोता तपासणी केल्याचा दिनांक नमूद नाही. भोगवटा प्रमाणपत्र देणेपुर्वी प्रत्यक्षात बांधकाम केलेल्या इमारतीचा नकाशा, जल-मल निस्सारण विभाग, अग्निशमन विभाग, वृक्ष प्राधिकारण नियमांतर्गत इमारतीभोवती झाडे लावले किंवा कसे तसेच जमीन विकास करण्याच्या अनुषंगाने तोडण्यात आलेल्या झाडांच्या बदलात नवीन झाडे लावण्यात आली किंवा कसे, सोलर सुविधा बसविली किंवा कसे व रेन वॉटर सुविधा बसविण्यात आली किंवा कसे याबाबत संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना व स्थापत्य अभियंता/ वास्तुविशारद यांचे इमारत बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणत्र सादर करणे आवश्यक असतांना कोणत्याही अभिलेख्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले असल्याचे निदर्शनास आले आहे. उपकराची रक्कम बँकेत जमा करण्यापुर्वीच बांधकाम परवानगी प्रमाणपत्र दिले आहे. विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.4.22.3 व नियम क्र.5.3 नूसार कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. 5.5 व 5.6 नूसार इमारत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र वास्तुविशाररद / स्थापत्य अभियंता यांनी महानगरपालिकेस सादर करून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.***

नगररचना विभागातील अभिलेख्यांच्या लेखापरीक्षणांती निदर्शनास आलेल्या सर्वसाधारण अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.189 दि.26/12/2016 रोजी दिले असता अनुपालन अप्राप्त आहे.सबब, खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) श्री.भरत हसवानी यांचे बांधकाम परवानगी क्र.79/13/358 दि.25/03/2015 यांचे प्रकरणात लिफट निवासी वापर अधिमुल्य शुल्काची रक्कम 8.4 चौ.मी. क्षेत्राकरीता रु.16900/- प्रती चौ.मी. रेडीरेकनरमधील दराच्या दिडपटनुसार रु.212940/- आकारणी करून वसुल करण्यात आली नसल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे. त्याचप्रमाणे जोता तपासणी रक्कम रु.5000/- मनपाकडे जमा केलेबाबत अभिलेख नस्तीत नसल्याने सदर रक्कम जमा केली किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे जोता तपासणी केल्याचे स्थळ पहाणी अहवालावर जोता तपासणी केल्याचा दिनांक नमूद नाही. श्री.हसवानी यांचे बांधकामास दि.22/07/2016 रोजी प्रमाणपत्र क्र.79/13/249 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. परंतू भोगवटा प्रमाणपत्र देणेपुर्वी प्रत्यक्षात बांधकाम केलेल्या इमारतीचा नकाशा, जल-मल निस्सारण विभाग, अग्निशमन विभाग, वृक्ष प्राधिकारण नियमांतर्गत इमारतीभोवती झाडे लावले किंवा कसे तसेच जमीन विकास करण्याच्या अनुषंगाने तोडण्यात आलेल्या झाडांच्या बदलात नवीन झाडे लावण्यात आली किंवा कसे, सोलर सुविधा बसविली किंवा कसे व रेन वॉटर सुविधा बसविण्यात आली किंवा कसे याबाबत संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना व स्थापत्य अभियंता/वास्तुविशारद यांचे इमारत बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणत्र सादर करणे

आवश्यक असतांना कोणत्याही अभिलेख्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच इतर प्रकरणांत देखील उपरोक्तप्रमाणे अनियमितता झाली असण्याची शक्यता आहे.

2) श्री.अशोक कुकरेजा , बांधकाम परवानगी क्र.97/13/289 दि.19/01/2015 यांचे नस्तीत इमारतीच्या निळया रंगाच्या नकाशाची प्रत नस्तीत नाही. उपकराची रक्कम रु.77250/- दि.09/02/2015 रोजी बँकेत जमा केली असतांना त्यापुर्वीच बांधकाम परवानगी प्रमाणपत्र दि.19/01/2015 रोजी दिल्याने अनियमितता झाली आहे. नस्तीतील दि.11/07/2016 च्या टिपणीत बांधकाम न करण्याचे कळविले असल्याचे नमूद आहे. परंतू तदसंबंधी अभिलेख नस्तीत आढळून आले नाही.

3) श्री.वि.की.मोहनदास यांचे प्रकरण क्र.136/13/351 दि.16/03/2015 मध्ये उपकर व जीना/लिफट/पॅसेज यांची अधिमुल्य शुल्काची रक्कम रु.3985/- व रु.597587/- भरणा केलेची पावती नस्तीत नाही. सदर प्रकरणाचे दि.16/03/2015 चे बांधकाम प्रमाणपत्र प्रथम वेळी श्री. विजेंदरलाल किशारी मोहनदास व मनोज भिम यांचे नावे देण्यात आली आहे. तदनंतर दि.08/08/2016 व दि.09/08/2016 चे बांधकाम परवानगी प्रमाणपत्र श्री.हरेश हरीसिंघानी व इतर यांचे नावे देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. नावामधील तफावतीबाबत कोणतेही कारण नस्तीत निदर्शनास आले नाही. नगररचना विभाग पत्र क्र.136/13/389 दि.07/09/2016 अन्वये श्री.हरेश हरीसिंघानी यांना पुढील आदेश मिळेपर्यंत बांधकाम न करणेचे कळविले आहे. याबाबत कारण मिमांसा नस्तीत नमूद नाही व अभिलेख देखील लेखापरीक्षणाकरीता अप्राप्त आहे.

4) उल्हासनगर महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. 4.22.3 नूसार बांधकाम परवानगी प्रमाणपत्राची वैधता चार वर्षाची असून बांधकाम परवानगी प्रमाणपत्राच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत इमारत बांधकामास सुरूवात करणे आवश्यक आहे. किंवा एक वर्ष पुर्ण होण्याअगोदर बांधकाम परवानगी प्रमाणपत्राचे नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडून नुतनीकरण करुन घेणे आवश्यक आहे. तसेच नियम क्र.5.3 नूसार जोता तपासणी दाखला महानगरपालिकेकडून घेणे आवश्यक असतांना खालील प्रकरणांत वरीलप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. याप्रमाणे इतर बांधकाम परवानगी प्रकरणांत देखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| 1 | श्री.महेंद्र शांडील्य | 21/14/352 दि.16/03/2015 |
| 2 | श्री.गंगाराम पवार | 18/14/335 दि.10/03/2015 |
| 3 | श्री.गुलाब लल्ला | 07/13/359 दि.25/03/2015 |

5) उल्हासनगर महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. 5.5 व 5.6 नूसार इमारत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र वास्तुविशारद / स्थापत्य अभियंता यांनी महानगरपालिकेस सादर करून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक असतांना खालीलप्रकरणांत वरीलप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. उदाहरणादाखल प्रकरणांव्यतिरीक्त इतर प्रकरणांत देखील वरीलप्रमाणे अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व |
|---|---|---|

| | | दिनांक |
|---|---|---|
| 1 | श्री.प्रकाश मखिजानी | 21/13/408 दि.07/10/2015 |
| 2 | श्री. भरत हसवानी | 79/13/358 दि.25/03/2015 |
| 3 | श्री.अशोक कुकरेजा | 97/13/289 दि.19/01/2015 |
| 4 | श्री.वि.कि.मोहनदास व मनोज भिम | 136/13/351 दि.16/03/2015 |
| 5 | श्री.गंगाराम पवार | 18/14/335 दि.10/03/2015 |
| 6 | श्री.मनोहर मुलचंदानी | 28/14/354 दि.16/03/2015 |
| 7 | श्री.दिनेश रुपानी | 29/14/339 दि.12/03/2015 |
| 8 | श्रीमती कमला नागदेव | 39/14 दि.16/03/2015 |
| 9 | श्री.गुलाब लल्ला | 07/13/359 दि.25/03/2015 |

6) श्री.गंगाराम पवार, बांधकाम परवानगी क्र.18/14/335 दि.10/03/2015 यांचे प्रकरणांत नगररचना विभागाचे पत्र क्र.18/14/130 दि.02/07/2015 अन्वये श्री.पी.आर.आठल्ये, वास्तुविशारद यांचा परवाना रदद झाल्याने नविन वास्तुविशारदाची नेमणुक करणेचे कळविले असतांनादेखील जागा मालकाने कोणतीही पुढील कार्यवाही केली नसल्याचे नस्तीवरून निदर्शनास आले आहे.

7) श्री.महेंद्र पी. शांडिल्य, बांधकाम परवानगी क्र.21/14/352 दि.16/03/2015 यांचे प्रकरणांत नविन वास्तुविशारदाची नेमणुक करणेचे कळविले असतांना जागा मालकाने कोणतीही पुढील कार्यवाही केली नसल्याचे नस्तीवरून निदर्शनास आले आहे.

8) श्री.मनोहर मुलचंदानी, बांधकाम परवानगी क्र.28/14/354 दि.16/03/2015 यांचे प्रकरणांत नगररचना विभाग, उल्हासनगर मनपा यांनी पत्र क्र.32/14/257 दि.30/12/2014 अन्वये सदर बांधकामाच्या अनुषंगाने सनद पडताळणी करून देणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना कळविले आहे. परंतू सदर सनद पडताळणी प्रमाणपत्र लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाही.

9) श्री.दिनेश रुपानी, बांधकाम परवानगी क्र.29/14/339 दि.12/03/2015 यांचे प्रकरणांत नगररचना विभागाचे पत्र क्र.130/14 दि.12/08/2014 अन्वये श्री.कमलेश सुतार, वास्तुविशारद यांचा परवाना रदद झाल्याने नविन वास्तुविशारदाची नेमणुक करणेचे कळविले आहे. परंतू नवीन वास्तुविशारद नेमणुकीबाबत अभिलेख नस्तीत आढळून आले नाही. सदर बांधकामाच्या अनुषंगाने रुम क्र.5 चे मिळकत कर विभागाकडील थकबाकी निरंक असलेचे प्रमाणपत्र नस्तीत नाही. उपकराची रक्कम रु.11250/- बँकेत भरणा केलेचे चलन नस्तीत नाही.

10) श्री.कमला नागदेव, बांधकाम परवानगी क्र.39/14 दि.16/03/2015 यांचे प्रकरणात मिळकत कर क्र.48सी1010531700 पत्ता-बॅरेक क्र.1679 रु.क्र.7 वर जागा मालकाचे नाव श्री.जुरोमल बझारीमल व मिळकत कर क्र.48सीआय 01010531800 पत्ता-बॅरेक क्र.1679 रु.क्र.8 वर जागा मालकाचे नाव श्रीमती मोहीनीबाई रोहरा असे असतांना श्रीमती कमला नागदेव यांचा बांधकाम परवानगीसाठीचा अर्ज कशाच्या आधारावर विचारात घेण्यात आला? याबाबतच्या कारणमिमांसेबददल अभिलेख नस्तीत निदर्शनास आले नाहीत.

## *112 संगणक संच खरेदीतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : महिला व बालकल्याण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1529985.00/-

***संगणक संच नस्ती सोबत आयकर भरल्याचे विवरणपत्र जोडलेले नाही. राज्यस्तरीय वृत्तपत्रात ई निविदा सुचना प्रसिध्द केलेली नाही.***

महिला बालकल्याण समितीची टिपणी दिनांक 26/02/2013 नुसार शासकीय मुलांचे बालगृह (कनिष्ठ) कुर्ला कॅम्प, उल्हासनगर-4 यांचे पत्र क्र. जा.क्र.शा.मु.बा.(क) उल्हासनगर-4/आस्था/12-13/428 दिनांक 28/01/2013 रोजी 6 ते 12 वयातील विद्यार्थ्यासाठी 4 संगणक संचाची मागणी केली होती, तसेच प्रशासकीय अधिकारी मनपा शिक्षण मंडळ, उल्हासनगर यांचे पत्र. क्र. जा.क्र./मनपा.शि.म.उ./शिक्षण/115/2013 दिनांक 14/02/2013 नुसार मनपाच्या 28 शाळांसाठी एकुण 44 संगणक संच उपलब्ध करून देण्यास विनंती केली होती.
महिला व बालकल्याण समितीच्या 2013-2014 च्या अंदाजपत्रिकेत नमुद केलेल्या रूपये 40 लाखाच्या तरतुदीतून संगणक संच खरेदी करण्याचे ठरले होते. एकुण 48 संगणक संच खरेदीसाठी इंटरनेटवरून संगणक कंपनीचे तुलनात्मक दर व बाजारातील दर यांचे अंदाज घेवूण 48 संगणक संच खरेदीसाठी रूपये 20 लाख पर्यंत खर्च येणार होता सदर खर्चासाठी मनपा आयुक्त यांनी दिनांक 11/03/2013, तसेच स्थायी समितीने ठराव क्र. 74 दिनांक 28/03/2013 रोजी खर्चास मान्यता दिली आहे.
उल्हासनगर महापालिकेच्या वेबसाईटवरून ई टेंडर प्रक्रियेव्दारे दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या दोन वेळा मुदतवाढ देवूनही दोनपेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्या नाहीत सबब प्राप्त निविदा उघडणेस आयुक्त यांनी दिनांक 20/07/2013 रोजी मान्यता दिली आहे.
विहित कालावधीत दोन निविदाकारांनी वेबसाईट वरूण निविदा सादर केल्या होत्या त्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | किंमत |
|---|---|---|
| 1 | मे.आदित्य कॉम्प्युटर सर्व्हिस , उल्हासनगर | प्रति संगणक संच रू 40770 .x 48 = 1956960 |
| 2 | मे. प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा .लि. उल्हासनगर | प्रति संगणक संच रू 41626 .x 48 =1998048 |

वरील दोन्ही निविदाकारापैकी मे. आदित्य कॉम्प्युटर सर्विस यांचा रू. 19,56,960/- या दराची न्युनत्तम निविदा स्विकारलेली आहे मे. आदित्य कॉम्प्युटर सर्विस, उल्हासनगर यांचे बरोबर वाटाघाटी करून 48 संगणक संचासाठी रू. 40670 x 48 =1952160 रूपये च्या खर्चास मा. आयुक्त यांनी दि. 18/02/2014 रोजी मान्यता दिली आहे. उमपा/मबाकस/45 दि. 04/03/2014 रोजी मे. आदित्य कॉम्प्युटर सर्व्हिस यांना कार्यादेश दिला

असता दि. 27/03/2014 रोजी संगणक संचाचा पुरवठा केलेला आहे.

| अ.क्र. | तपशिल | मुळ रक्कम रू. | आयकर वजाती 2% | एकुण रक्कम रू. | प्रमाणक क्र व . दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मे आदित्य . सर्व्हिस कॉम्प्युटर | 15,00,000/- | 30,000/- | 14,70,000/- | 4723 24/03/2015 |
| 2 | मे आदित्य . सर्व्हिस कॉम्प्युटर | 61,210/- | 1,224/- | 59,985/- | 4732 24/03/2015 |
| | एकुण रक्कम | 15,61,210/- | 31,224/- | 15,29,985/- | ---- |

1) उदयोग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र. भाखस-1088/2512 उदयोग-6 दि. 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.5(इ) नुसार निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत आयकर कायदा 1961 नुसार ग्राहय असलेले आयकर भरल्यांचे विवरणपत्र नस्ती सोबत जोडलेले नाही.

2) संगणक संच खरेदी किंमत रक्कम रूपये 10 लाखापैक्षा जास्त असल्याने शासन परिपत्रक क्र. जीइएन 1093/2365/प्रक्र126/93/नवि.14 दिनांक 20/10/1993 व सुधारण क्र. नप्रस/निविदा मागविणे/05/प्र.क्र. 151/05/9 दिनांक 5 जून 2006 अन्वये ई निविदा जाहिरात राष्ट्रीय स्तरावरील दैनिक, व राज्यस्तरावरील दैनिक व 20000 प्रति खप असलेले जिल्हास्तरीय दैनिकामध्ये जाहिरात देवून स्पर्धात्मक दर प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. परंतू अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 100, Hmm No : 206)

## *113 उल्हासनगर महानगरपालिकेत आस्थापना खर्चावर नियंत्रण नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शा.नि.संकीर्ण 1005/वर्गीकरण/व.क्र.379/05/नवि24, मंत्रालय, मुंबई-32 दिनाक 04/05/2006 अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचा आस्थापनावरील खर्च विहित मार्यादेपेक्षा जास्त झालेला आहे***

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शा.नि.संकीर्ण 1005/वर्गीकरण/व.क्र.379/05/नवि24,मंत्रालय,मुंबई-32 दिनाक 04/05/2006 अन्वये महानगरपालिकांना विकास कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध होणेसाठी महापालीकेच्या आस्थापना खर्चवर नियंत्रण रहाण्यासाठी एकून खर्चच्या जास्तीत जास्त 35%रक्कम खर्च मर्यादा ठेवण्यात आली आहे.अस्थापना खर्चामध्ये वेतन,निवृतीवेतन,कर्यालयीन खर्च,वाहन इंधन,स्टेशनरी,बैठ्कावरील खर्च दुरुस्ती खर्च महानगरपालिकेतील आउट सोर्सिंग मार्फत होणारी कामे या साठी महापालिकेस येणारा खर्च याचा देखील समावेश आहे.

उल्हासनगर महापालिकेच्या खार्चाची पडताळणी केली असता महानगरपालिकाकडून सन 2013-2014 व 2014-2015 या वित्तीय वर्षात आस्थापनेवर एकून खर्चाच्या सुमारे 38% खर्च केला आहे उपरोक्त नमूद शासन आदेशाचे पालन झालेले दिसून येत नाही.

DATNTBM6101 (Ref No : 102, Hmm No : 11)

## *114 . उल्हासनगर महानगरपालिकेने पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसा हक्काने नियुक्त केलेल्या कर्मचारी यांच्या नियुक्त्या नस्ती उपलब्ध करून दिली नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहा.विभाग शासन परिपत्रक क्र.2011/प्र.क्र.सफाई-2011प्र.क्र.327/विधोय-2 मंत्रालय मुंबई दिनाक.21/10/2011 नुसार पागे समितीच्या शिफारसी अवलंबून मनपा मध्ये वर्ग-4 चे कर्मचारी नियुक्ती बाबत व त्या अनुषंगाचे अभिलेखे दाखविनेत आलेली नाही.***

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहा.विभाग शासन परिपत्रक क्र.2011/प्र.क्र.सफाई-2011प्र.क्र.327/विधोय-2 मंत्रालय मुंबई दिनाक.21/10/2011 अन्वये पागे समितीच्या शिफारसी नुसार 2013-2014 व 2014 -2015 मध्ये महपालिका सेवेत नियुक्ती करनेत आलेल्या कर्मच्यारेंचे निवड व नियुक्ती नसत्या लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देणेत यावेत याबाबत तोंडी सूचित करण्यात आले होते.तसेच अर्ध समास क्र.11 मधील मुद्दा क्र.4 अन्वये दिनाक 04/05/2016 नुसार खुलासा मागविला असता विभगाचे अनुपालन अप्राप्त आहे.

DATNTBM6101 (Ref No : 103, Hmm No : 11)

## *115 उल्हासनगर महानगरपालिका क्रीडा विभागाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 327385.00/-

***उल्हासनगर महानगरपालिका क्रीडा विभागाचे 2014-2015 मधील खर्च रक्कम रु.327385/-बाबतचे लेखे उपलब्ध करून दिले नाहीत.***

उल्हासनगर महानगरपालिका क्रीडा विभागाचे सन 2014-2015 मध्ये 7 प्रमाणकांची रक्कम रु.327385/-एवढा निधी खर्च केला असल्याचे मनपा अनुदान पुस्तीकावरून दिसून येत आहे.तरी सदर खर्च केल्याचे खर्चाची प्रमाणके व त्या संबंधित निविदा नस्ती व इतर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावेत या बाबत तोंडी सूचित करून व तसेच अर्धसमास क्र.203 दिनाक 07/01/2017 अन्वये क्रीडा विभागाला कळविले होते.परंतु लेखापरीक्षणाचे शिबीर कालवधी संपेपर्यंत क्रीडा विभागाकडून खर्चची कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविणेत आलेले नाहीत,त्यामुळे रक्कम रु,327385/-आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATNTBM6101 (Ref No : 104, Hmm No : 203)

## *116 कर्ज निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :07 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***कर्ज निवारण निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध नसलेने स्थानिक निधी लेखा विभागाकडून तपासणी झालेली नाही***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामाचे कलम 112 नुसार महानगरपालिकेने कर्जनिवारण निधी स्थापन करणेचा आहे व उक्त अधिनियमाचे कलम 115(1) नुसार कर्जनिवारण निधीची तपासणी स्थानिक निधी लेखा विभागाकडून करणेची आहे याबाबत अर्धसमासपत्र क्र. 2 दि.03//05/2016 अन्वये कर्जानिवारण निधीच्या लेख्यांची तपासणीसाठी मागणी करणेत आली होती तथापी असे कर्ज निवारण निधीचे लेखे तपासणीस उपलब्ध न केल्याने अशा लेख्यांची तपासणी करता आली नाही.

DATAPJF8101 (Ref No : 113, Hmm No : 2)

## *117 पाणी पुरवठा विभागातील जमेचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील 2014-15 मधील जमा पडताळणीसाठी माहिती उपलब्ध करुन न दिल्याने पाणीपुरवठा विभागातील जमेचे लेखापरीक्षण करता आले नाही.***

राष्ट्रीय लेखा संहीता 2004 मधील नियम क्र. 9.3 मध्ये पाणी पुरवठा कर आकारणी बाबतची तरतुद विषद केली आहे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी कर आकारणी बाबत कोणती पध्दत अवलंबली जाते तसेच 2013-14 व 2014-15 मधील पाणी पुरवठा विषयक एकुण जमेची सांखिकी माहिती खालील मुददे विचारात घेउन लेखा परीक्षणास सादर करणेबाबत अर्धासामास पत्र. क्र.31 दि.11/07/2016 नुसार विचारणा करण्यात आली होती तथापि लेखे उपलब्ध करून न दिल्याने पुढील लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केलेची अनियमितता कायम करण्यात येत आहे.

1) पाणी कर
2) मलनिस्सारण कर
3) पाणी पुरवठा मुल्य
4) मलनिस्सारण मुल्य
5) पाणी पुरवठा मिटर भाडे

6) पाणी पुरवठा नवीन जोडणी मुल्य

7) पाणी पुरवठा TANKER मुल्य

8) रस्ता दुरुस्ती भरपाई मुल्य

9) नोटीस फी

10) वारंट फी

11) दंडात्मक रक्कम

12) थकीत रक्कम

13) बुडीत रक्कम

वरील बाबी विचारात घेऊन 2013-14 व 2014-15 मधील पाणी पुरवठा विषयक जमा नोंदवहया व जमा रोखवहया तसेच जमेची बॅंक विवरणपत्रे (Bank Statement) लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही.

DATAPJF8101 (Ref No : 114, Hmm No : 31)

**आक्षेप विवरणपत्राबाबत:-**

लेखापरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट केलेल्या सर्व परिच्छेदांबाबत लेखापरीक्षण चालू असताना अर्धसमासपत्रे निर्गमित करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त उत्तरे व अनुपालने तपासून सर्वसामान्य स्वरुपांच्या आक्षेपांची पूर्तता करुन घेण्यात आली असल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित केले नाही.

**विवरणपत्रे व परिशिष्टे :-**

2014-2015 या आर्थिक वर्षाच्या महानगरपालिका लेखापरीक्षण अहवालासाठी आवश्यक विहीत नमुन्यातील 1 ते 8 विवरणपत्रांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी विवरणपत्र क्रं.1 ते 3 व 5(अ) विवरणपत्र अशी एकूण 4 विवरणपत्र प्राप्त झालेली असून ती या अहवालासोबत जोडण्यात आली आहेत. विवरणपत्र क्रं. 4, 5(ब), 6 (प्रलंबित अग्रिमाचे विवरणपत्र), विवरणपत्र क्रं. 7 (अपूर्ण बांधकाम) व विवरणपत्र क्र.8 अप्राप्त असल्याने अहवालासोबत जोडता आली नाहीत.

**अनुपालन :-**

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम कलम 10 (1) मधील तरतुदीनुसार सदरचा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून चार महिन्याच्या आत या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपावरील अनुपालन अहवाल (तीन प्रतीत) महासभेच्या मान्यतेच्या ठरावाच्या प्रतीसह आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांच्या स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

**पोहोच :-**

सदर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद करुन तात्काळ पोहोच देण्यात यावी.

(मंगेश ना. गावडे)
उप संचालक (मनपालेप)
उपविभाग-2
स्थानिक निधी लेखापरीक्षा
नवी मुंबई.

प्रत अग्रेषित :-

1.मा.प्रधान महालेखापाल,(लेखापरीक्षा)-1, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
2.मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
3.मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
4.मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
5.मा.सह संचालक(म.न.पा.ले.प.), स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
6.पुनर्विलोकन अहवाल शाखा, रायगड भवन, नवी मुंबई.

स्वा/-
(मंगेश ना. गावडे)
उप संचालक (मनपालेप)
उपविभाग-2
स्थानिक निधी लेखापरीक्षा
नवी मुंबई.

***लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र***

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| अश्विनी प्रकाश जाखलेकर, सहाय्यक संचालक | 1, 116, 117, 34, 48, 49, 52, 63, 82, 97, 98 |
| भाई एकनाथ पाटील, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 3, 39, 4, 40, 5, 51, 53, 54, 55, 56, 57, 58, 6, 7, 87 |
| निवृत्ती तुकाराम भांगरे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 113, 114, 115 |
| पंडित काशीनाथ चंद्रमोरे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 112, 19, 2, 20, 21, 37, 38, 81, 84, 85, 94, 95, 96, 99 |
| प्रदिप पंढरीनाथ तेलवणे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 50, 86 |
| प्रविणकुमार वसंत वाघ, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 100, 101, 102, 103, 104, 105, 106, 107, 108, 109, 110, 111, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 83, 89, 90, 91, 92, 93 |
| राजु यमू जाधव, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 18, 30, 31, 32, 33, 35, 36, 59, 60, 61, 62, 64, 65, 71, 72, 73, 88 |
| अनिल नामदेव माळी, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 66, 67, 68, 69, 70, 8, 9 |

## विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 5758051.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 2 | 4 | 9768545.00 | 2230850.00 | ---- | ---- | 11999395.00 |
| 3 | 5 | 537597.00 | 40465.00 | ---- | ---- | 578062.00 |
| 4 | 6 | 790795.00 | ---- | ---- | ---- | 790795.00 |
| 5 | 7 | 4860146.00 | 148582.00 | ---- | ---- | 5008728.00 |
| 6 | 8 | 4020692.00 | 437070.00 | ---- | ---- | 4020692.00 |
| 7 | 9 | ---- | ---- | ---- | ---- | 465496475.00 |
| 8 | 10 | 32430039.00 | 2998961.00 | ---- | ---- | 35429000.00 |
| 9 | 11 | 6107626.00 | 5758402.00 | ---- | ---- | 11866028.00 |
| 10 | 12 | 82922082.00 | 5144635.00 | ---- | ---- | 88066717.00 |
| 11 | 13 | 2324609045.00 | 29993709.00 | ---- | ---- | 2354602754.00 |
| 12 | 14 | 26020.00 | 2895.00 | ---- | ---- | ---- |
| 13 | 15 | 688500.00 | 61500.00 | ---- | ---- | 750000.00 |
| 14 | 16 | 4137446.00 | ---- | ---- | ---- | 4137446.00 |
| 15 | 17 | 5604768.00 | ---- | ---- | ---- | 5604768.00 |
| 16 | 18 | 920422.00 | ---- | ---- | ---- | 920422.00 |
| 17 | 19 | ---- | 4103.00 | ---- | ---- | ---- |
| 18 | 20 | 25461862.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 19 | 22 | 6750000.00 | 31000.00 | ---- | ---- | ---- |
| 20 | 23 | 196300.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 21 | 24 | 4008044.00 | 90000.00 | ---- | ---- | ---- |
| 22 | 26 | 512600000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 23 | 27 | ---- | 209100.00 | ---- | ---- | 418200.00 |
| 24 | 29 | 11100000.00 | ---- | ---- | ---- | 11100000.00 |
| 25 | 30 | 9452800.00 | ---- | ---- | ---- | 9452800.00 |
| 26 | 31 | 4765378.00 | ---- | ---- | ---- | 4765378.00 |
| 27 | 32 | 399393.00 | ---- | ---- | ---- | 399393.00 |
| 28 | 33 | 7317561.00 | 42560.00 | ---- | ---- | 7360121.00 |
| 29 | 34 | 16692952.00 | 1091768.00 | ---- | ---- | 17784720.00 |
| 30 | 35 | ---- | 73896356.00 | ---- | ---- | 73896356.00 |
| 31 | 36 | 2999250.00 | 149963.00 | ---- | ---- | 3149213.00 |

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | 37 | 5865704.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 33 | 38 | 9821263.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 34 | 39 | 1467372.00 | 240703.00 | ---- | ---- | 1708075.00 |
| 35 | 40 | 19200720.00 | 534060.00 | ---- | ---- | 19254780.00 |
| 36 | 41 | 10477896.00 | 2184860.00 | ---- | ---- | ---- |
| 37 | 42 | 6391389.00 | 1178707.00 | ---- | ---- | 7570096.00 |
| 38 | 43 | 6944798.00 | 1292354.00 | ---- | ---- | ---- |
| 39 | 44 | 1741300.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 40 | 45 | 704139.00 | ---- | ---- | ---- | 704139.00 |
| 41 | 46 | 404366.00 | ---- | ---- | ---- | 404366.00 |
| 42 | 47 | 532607.00 | 10897.00 | ---- | ---- | 532607.00 |
| 43 | 48 | 454074204.00 | ---- | ---- | ---- | 454074204.00 |
| 44 | 49 | 19360000.00 | ---- | ---- | ---- | 19360000.00 |
| 45 | 51 | 4908318.00 | 2019297.00 | ---- | ---- | 6227615.00 |
| 46 | 52 | 238350820.00 | ---- | ---- | ---- | 238350820.00 |
| 47 | 53 | ---- | 1395184.00 | ---- | ---- | ---- |
| 48 | 54 | 1484469.00 | 25000.00 | ---- | ---- | ---- |
| 49 | 55 | ---- | 2568962.00 | ---- | ---- | ---- |
| 50 | 56 | ---- | 291268.00 | ---- | ---- | ---- |
| 51 | 57 | 4555549.00 | 1382163.00 | ---- | ---- | ---- |
| 52 | 58 | ---- | 63980000.00 | ---- | ---- | ---- |
| 53 | 59 | 3011968.00 | ---- | ---- | ---- | 3011968.00 |
| 54 | 60 | 1500000.00 | 17747.00 | ---- | ---- | 1517747.00 |
| 55 | 61 | 1849631.00 | 18356.00 | ---- | ---- | 1867987.00 |
| 56 | 62 | 21065505.00 | 1255452.00 | ---- | ---- | 22320957.00 |
| 57 | 63 | 895000.00 | ---- | ---- | ---- | 895000.00 |
| 58 | 64 | 15255894.00 | 762795.00 | ---- | ---- | 16018689.00 |
| 59 | 65 | 1301026.00 | ---- | ---- | ---- | 1301026.00 |
| 60 | 66 | 6616360.00 | ---- | ---- | ---- | 6616360.00 |
| 61 | 67 | 2017305.00 | ---- | ---- | ---- | 2017305.00 |
| 62 | 68 | 5893979.00 | 770920.00 | ---- | ---- | ---- |
| 63 | 69 | 1000000.00 | 10102.00 | ---- | ---- | 1010102.00 |
| 64 | 70 | 38821568.00 | 853493.00 | ---- | ---- | ---- |
| 65 | 71 | ---- | 460000.00 | ---- | ---- | 460000.00 |
| 66 | 72 | ---- | 30113.00 | ---- | ---- | 30113.00 |

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 67 | 73 | 3043632.00 | 1174908.00 | ---- | ---- | 4218540.00 |
| 68 | 74 | ---- | 6014.00 | ---- | ---- | ---- |
| 69 | 75 | ---- | 724760.00 | ---- | ---- | ---- |
| 70 | 76 | ---- | 216251.00 | ---- | ---- | ---- |
| 71 | 77 | ---- | 158162.00 | ---- | ---- | ---- |
| 72 | 78 | ---- | 5920.00 | ---- | ---- | ---- |
| 73 | 79 | ---- | 25000.00 | ---- | ---- | ---- |
| 74 | 80 | ---- | 28214062.00 | ---- | ---- | ---- |
| 75 | 81 | ---- | 1766676.00 | ---- | ---- | ---- |
| 76 | 82 | 103594000.00 | ---- | ---- | ---- | 103594000.00 |
| 77 | 83 | ---- | 594308.00 | ---- | ---- | ---- |
| 78 | 84 | ---- | 2464831006.00 | ---- | ---- | ---- |
| 79 | 85 | 1491364.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 80 | 89 | ---- | 70620.00 | ---- | ---- | ---- |
| 81 | 91 | 2492313.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 82 | 92 | 396000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 83 | 93 | 576772.00 | 5400.00 | ---- | ---- | ---- |
| 84 | 94 | 999000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 85 | 95 | 898000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 86 | 96 | 497666.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 87 | 102 | 2471860.00 | 280256.00 | ---- | ---- | ---- |
| 88 | 103 | ---- | 2300.00 | ---- | ---- | ---- |
| 89 | 110 | 1992955.00 | 55000.00 | ---- | ---- | ---- |
| 90 | 111 | 601572.00 | 500869.00 | ---- | ---- | ---- |
| 91 | 112 | 1529985.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 92 | 115 | 327385.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| **एकूण रक्कम** | | **4091350968** | **2702245864** | **0** | **0** | **4030663959** |

①

# विवरणपत्र 1 – (अ)

## वर्ष:- 2014-2015 गोषवारा जमाबाजू

(रक्कम रु लाखात)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे सुधारित अंदाज | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे प्रत्यक्ष आकडा | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | उल्हासनगर महानगरपालिका | 335.15 | 254.98 | | 80.17 |
| 2 | | | | | |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

(2)

| विवरण पत्र - 1 (ब) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गोषवारा खर्चबाजू | | | | | |
| वर्ष:- 2014-2015 | | | | | रक्कम रू. (लाखात) |
| अ.क्र | लेखाशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे सुधा रित अंदाज | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे प्रत्यक्ष आकाडा | वाढ | घट |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | एकूण | 335.15 | 254.98 | | 80.17 |
| | | | | | |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

(3)

उल्हासनगर महानगरपालिका

विवरणपत्र क्र. 1 (क)

महानगरपालिकेचे दिनांक लेखापरीक्षण वर्ष अखेर मत्ता व दायित्व विवरणपत्र

आकडे रक्कम रु. (लाखात)

| अ.क्र. | मत्ता | रक्कम रु. | अ.क्र. | दायित्व | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 14-15 | 902.85 | 1 | | 950.99 |
| | एकूण | 902.85 | | एकूण | 950.99 |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विवरण पत्र क्र. 2

लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र

आकडे रक्कम रु. (लाखात)

| अ.क्र. | अनुदानाचे नाव | मंजूर करणारे प्राधिकारी | राज्य लेख्यातील प्रधानशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाच्या आरंभीची शिल्लक अनूदान रक्कम रु. | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाच्या आरंभीची प्राप्त अनूदान रक्कम रु. | एकुण उपलब्ध अनुदान रक्कम रु | लेखापरीक्षण वर्षामध्ये केलेला खर्च रु. | शिल्लक अनुदान रु. | सन (लेखापरीक्षण वर्षानंतरचे वर्ष) मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची रक्कम रु. | शासनास परत करावयाची अनुदानाची रक्कम रू. | उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले किंवा नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | 14-15 | | | | | 292.23 | 254.98 | 32.25 | | | | |

मुख्य लेखा अधिकारी

उल्हासनगर महानगरपालिका

(5)

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

विवरणपत्र क्र. 3

महापालिकेने घेतलेल्या व सन 2014- 2015 या वित्तिय वर्षात थकीत असलेल्या कर्ज रकमांचे विवरणपत्र.

आकडे - रक्कम (रू लाखात)

| अ. क्र. | कर्जाचा तपशिल | कर्जाचे प्रयोजन | कर्जाची रक्कम | कर्ज प्राप्त दिनांक | व्याजाचा दर | परता व्याचा अवधी | सरकारने हमी हमी आहे काय? | दि.1/04/2014 रोजी शिल्लक कर्ज मुददल | दि.1/04/2014 रोजी शिल्लक कर्ज व्याज | सन 14 - 15 मधील परतफेड मुददल | सन 14 - 15 मधील परतफेड व्याज | दि 31/03/ 15 रोजी शिल्लक कर्ज मुददल | दि 31/03/ 15 रोजी शिल्लक कर्ज व्याज | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9अ | 9ब | 10अ | 10ब | 11अ | 11ब | 12 |
| 1 | एम.जे.पी. | भुयारी गटार | 11.84 | 1986-97 | 6.75 | 25 | | 9.2 | 4.33 | 0 | 0 | 9.2 | 4.33 | |
| 2 | (एम.जे.पी. खुल्या बाजारातील) | पाणी पुरवठा | 8.5 | 1997-98 | 14.55 & 15.35 | 10 | | 7.65 | 5.54 | 0 | 0 | 7.65 | 5.54 | |
| 3 | (एम.जे.पी. एलआयसी) | पाणी पुरवठा | 5.18 | 1999-02 | 11.5 | 25 | | 3.06 | 1.49 | 0 | 0.29 | 3.06 | 1.2 | |
| 4 | एम.एम.आर. डी.ए. | रोड व उड्डानपूल बनविणे | 19.27 | 2000 | 11 | 15 | | 1.37 | 0.91 | 1.37 | 0.91 | 0 | 0 | |
| 5 | एम.एम.आर.डी.ए. | जेएन.एन.यू. आर.एम. | 46.5 | 2011 | 8 & 10 | 15 | | 2 | 4.81 | 2 | 4.81 | 0 | 0 | |

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका,

विवरणपत्र क्र. ५ ( अ )

महानगरपालिकेने दिलेल्या व दिनांक ( लेखापरीक्षण वर्ष ) अखेर थकीत कर्ज व आगाऊ रक्कमा दर्शविणारे विवरणपत्र

वर्ष 14-15

आकडे रक्कम रु.(लाखात)

| अ.क्र. | कर्जाऊ/आगाऊ रकमेचा प्रकार | मागणी | | | वसुली (लेखापरीक्षण वर्षातील) | | | थकबाकी (लेखापरीक्षण वर्ष अखेर) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील | लेखापरीक्षण वर्ष मधील प्रदान | एकूण | मुद्दल | व्याज | एकूण | मुद्दल | व्याज | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

निरंक

मुख्य लेखा अधिकारी
[illegible] महानगरपालिका

ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

| YEAR 2013/14 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| GRANT | OP BAL | GRANT RECEIVED | TOTAL | EXPENDITURE | CLOSING BALANCE |
| | | | | | |
| ROAD GRANT | 0 | 28894048 | 28894048 | 2889048 | 0 |
| DPDC 9MLA FUND) | 13004292 | 50534000 | 63538292 | 37781245 | 25757047 |
| NIRMAL MMR | 8979332 | 0 | 8979332 | 1880885 | 7098447 |
| MP FUND | 543664 | 27826000 | 28369664 | 17988652 | 10381012 |
| JNNURM(WS) | 23102320 | 0 | 23102320 | 23102320 | 0 |
| JNNURM (BSUP) | 46782336 | 0 | 46782336 | 46782336 | 0 |
| JNNURM(E GOV) | 522520 | 0 | 522520 | 522520 | 0 |
| DALIT VASTI | 10629837 | 36467184 | 47097021 | 14147944 | 32949077 |
| RAJIV GANDHI | 1651665 | 0 | 1651665 | 1651665 | 0 |
| 12TH FINANCE COMMISSION | 371230 | 330709120 | 331080350 | 304098176 | 26982174 |
| UIDAI GRANT | 4217139 | 0 | 4217139 | 0 | 4217139 |
| CENSUS GRANT | 0 | 6551694 | 6551694 | 3691152 | 2860542 |

| YEAR 2014/15 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| GRANT | OP BAL | GRANT RECEIVED | TOTAL | EXPENDITURE | CLOSING BALANCE |
| ROAD GRANT | 0 | 3226597 | 3226597 | 2472959 | 753638 |
| DPDC 9MLA FUND) | 25757047 | 46732520 | 72489567 | 37955672 | 34533895 |
| NIRMAL MMR | 7098447 | 0 | 7098447 | 7056614 | 41833 |
| MP FUND | 10381012 | 24521000 | 34902012 | 23267698 | 11634314 |
| JNNURM(WS) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| JNNURM(E GOV) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| DALIT VASTI | 32949077 | 0 | 32949077 | 21852958 | 11096119 |
| RAJIV GANDHI | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 12TH FINANCE COMMISSION | 26982174 | 91197578 | 118179752 | 118074244 | 105508 |
| UIDAI GRANT | 4217139 | 0 | 4217139 | 0 | 4217139 |
| CENSUS GRANT | 2860542 | 2469400 | 5329942 | 5329942 | 0 |

CHIEF ACCOUNTS OFFICER
ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION